
# मुलाँ रूज

मूळ फ्रेंच
पीएर ल मूर

स्वैर रूपांतर
जयंत गुणे



# मुलँ रूज

मूळ इंग्लीश लेखक – पीएर ल मूर

स्वैर रूपांतर – जयंत गुणे

© जयंत गुणे
सर्व हक्क अनुवादकाच्या स्वाधीन. या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मूद्रण किंवा नाट्य, चित्रपट किंवा दूरदर्शन किंवा इतर कोणत्याही माध्यमातून रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

पत्ता – ए ४०१, मधु मधुरा, प्रार्थना समाज, विले पार्ले, मुंबई ४०००५७
टेलीफोन – ९६१९०१६३८५, इमेल – jayant.gune@gmail.com
ब्लॉग - jayantgune.blogspot.com

This declaration is as per Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literaly, dramatic, musical, sound recording and artistic works. Although the author’s copyright in a work is recognized even without registration, infringement of copyright entitles the owner to remiedies of injunction, dmages and accounts.

# मुलँ रूज

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला

पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

मुलँ रूज

© जयंत गुणे

पत्ता – ए ४०१, मधु मधुरा, प्रार्थना समाज, विले पार्ले, मुंबई ४०००५७
टेलीफोन – ९६१९०१६३८५, इमेल – jayant.gune@gmail.com
ब्लॉग - jayantgune.blogspot.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १५ डिसेंबर २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# मुलँ रूज


| | |
|---|---|
| मनोगत | ४ |
| हे पुस्तक का वाचावे | ७ |
| माँ पेतित | ९ |
| मोंमार्त्र | ४२ |
| मुलँ रूज | १६१ |
| मारी शार्लेत | २४३ |
| पोस्टर | ३२६ |
| मिरीयम | ३६३ |
| ॲबसिंथ | ४३७ |
| उपसंहार | ४८६ |
| परिचय | ४८९ |

# मनोगत

तुलूझ लोत्रेकच्या जीवनावर आधारीत पीएर ल मूर याने लिहीलेली मुलँ रूज ह्या कादंबरीचे हे स्वैर रूपांतर. पीएर ल मूर हा फ्रेंच लेखक. दुसऱ्या महायुध्दानंतर त्याने अमेरीकेत स्थलांतर केले. तो पर्यंतचे त्याचे सगळे लिखाण फ्रेंचमध्ये आहे. पण अमेरीकेत आल्यानंतर त्याने इंग्रजीतून लिहायला सुरवात केली. मुलँ रूज ही त्याची इंग्रजीतील पहिली कादंबरी. ती अतिशय लोकप्रिय झाली. हॉलीवूडमध्ये त्या कादंबरीवर त्याच नावाने दोन चित्रपटही निघाले.

हेन्री तुलूझ लोत्रेकचा जन्म फ्रान्समधील एका प्रख्यात राजघराण्यात झाला होता. ऐन शैशवात एका विचीत्र आजाराची शिकार झाल्याने त्याच्या कंबरेखालील शरीराची वाढ खुंटली. यौवनात प्रवेश करण्यापूर्वीच त्या मौजमस्तीला तो पारखा झाला. चित्रकाराचा पेशा घराण्याच्या इतमामाला शोभेसा नसला तरी हेन्रीने घरच्यांच्या विरोधाला न जुमानता आपला हट्ट पूरा केला. त्यासाठी तो पॅरीसच्या प्रतिष्ठीत वस्तीतील आपले निवासस्थान सोडून शहरा बाहेरील मोंमार्त्र या गरीब वस्तीत रहायला जातो. आपल्या तोलामोलाच्या राजघराण्यातील जगापेक्षा मोंमार्त्रमधील कष्टकरी, सर्कस व नाटकातील कलाकार, नाईट क्लबमध्ये नाचणाऱ्या मुली, रस्त्यावर भटकणाऱ्या गावभवान्या यांच्या विश्वात तो समरसून रममाण होतो. हे जीवन जगतानाच आपल्या कलेत त्याचे चित्रणही करत होता. आपल्या सभोवतालच्या रंगील्या निशाजीवनाची त्याने केलेल्या पेंटींग्जनी त्याला आधुनिक चित्रकलेच्या प्रवाहात स्वत:चे स्थान कसे मिळवून दिले, त्याची ही आई-मुलाच्या गहिऱ्या नात्याचे पदर उलगडत वाचकांच्या भावनेला हात घालत असतानाच चित्रकलेचा आस्वाद कसा घ्यावा हे ही सांगणारी हृदयस्पर्शी कहाणी.

माधूरी पुरंदरे यांना लस्ट फॉर लाईफ या कादंबरीचा अनुवाद करून व्हिन्सेंट व्हॅन गॉगचा परिचय मराठी वाचकांना अगोदरच करून दिला आहे. मून अँड सिक्सपेन्स आणि मुलँ रोज मराठीत आणल्याने पॉल गोगँ आणि तुलूझ लोत्रेक या त्याच कालखंडातील दोन महान चित्रकारांचा परिचय होईल. युरोपच्या सहलीवर जाणाऱ्यांनी या कादंबऱ्या वाचल्या तर त्यांना स्थलदर्शना बरोबरच युरोपच्या कला-संस्कृतीचीही ओळख होऊन त्यांचा आनंद द्विगुणित होईल अशी आशा करतो.

मुलँ रूजचे मी केलेले रूपांतर लोकवाङमयगृहाने २०११ मध्ये अगोदरच प्रसिद्ध केले होते. मून अँड सिक्सपेन्सच्या डिजीटल आवृत्तींना चांगलाच प्रतिसाद होता. त्यामुळे गेल्या महिन्यात मुलँ रूज ब्लॉगवर प्रसिद्ध केला. या कादंबरीच्या ई-आवृत्तीसाठी ई-साहित्य प्रतिष्ठानाच्या संपादकांनी केलेल्या मार्गदर्शनासाठी त्यांचे विशेष आभार.

जयंत गुणे
२४ ऑगस्ट २०१८, पुणे.

# हे पुस्तक का वाचावे

इतकं सुंदर पुस्तक ई साहित्यच्या शोकेसचा भाग असेल. फारच छान पुस्तक झालं आहे. इथल्या चित्रकारांनाच नाही तर सर्वच प्रकारच्या कलाकारांना एका कलाकाराच्या जीवनाचं वेगळेपण जाणवून देणारं हे पुस्तक म्हणजे एक महत्त्वाचा दस्ताइवज आहे.
**संपादक, ई-साहित्य प्रकाशन, ३० सप्टेंबर २०१८**

चित्रकारां संबंधी मराठीत कमी लिखाण आहे, आपलं लिखाण ही महत्वाची भर आहे. 'मून अॅन्ड सिक्सपेन्स' ही कादंबरी पण विशेष वाटली. लेखकाच्या लिखाणाच्या क्षमता आपण अनुवादात समर्थपणे उतरवल्या आहेत. हेन्रीच्या विद्यार्थी दशेतल्या काळातील घटना, त्यांचे इतर मित्रांसोबत होणारे कलेसंबंधी वादविवाद, प्रत्येक चित्रकाराला जवळचे वाटतील, आपलेसे वाटतील.
**यशवंत देशमुख, प्रसिद्ध चित्रकार. फेसबुक, १० ऑक्टोबर २०१८**

पॅरीसमधल्या तुलूझ लोत्रेक या विलक्षण जीवन जगलेल्या जीवन जगलेल्या कलावंताचं अफलातून आयुष्य जयंत गुणे यांच्या अप्रतिम अनुवादातून मराठी वाचकांपर्यंत पोचलं. लेखकाची कारकीर्द बँकिंग आणि आयटी क्षेत्रातील. पण म्हणतात ना संवेदनाशील मन आणि काहीतरी अत्युत्तम करावं याची आस असली की काहीच कठीण रहात नाही हे त्यांनी लेखक म्हणून सिद्ध केलंय.
**सुहास बहुलकर, प्रसिद्ध चित्रकार आणि चित्रविषयक लेखक. ३० ऑक्टोबर २०१८**

I read your blog ‘Moulin Rouge’ regularly. Translations are difficult especially when describing foreign lands and distant times. But you have succeeded in creating a virtual reality of life in Paris of late eighteenth century. I was moved while reading the last moments in Henry’s life, which have come with great clarity in a few words, a great achievement. I should have read such book before visiting Paris. Now I would recommend this book for anyone visiting Paris and France in a leisurely way. The tragedies and triumphs of the artists all over the world have something in common, is a theme which has come out in the choice of book for translation I want to congratulate you because this is a part of public education which you are doing with enthusiasm.
**डॉ.विनायक श्रीखंडे, प्रख्यात सर्जन, लेखक आणि जाणकार रसिक, १ नोव्हेंबर २०१८**

कादंबरीचं शेवटचं प्रकरण वाचलं की मन विषण्ण होतं. हे यश विषयाचं, मांडणीचं आणि त्याहीपेक्षा उत्कृष्ट अनुवादाचं. एक स्वतंत्र कलाकृती म्हणून याचा आस्वाद घेता येतो. अनेक ठिकाणी दिलेली पूरक माहिती, चित्रं या सगळयामुळे चित्रकलेतील काहीही न कळणाऱ्या माणसालाही रस घ्यायला ही कादंबरी भाग पडते. उपसंहार अप्रतिम.
**आनंद पत्की, ब्लॉगर आणि जाणकार रसिक, ५ नोव्हेंबर २०१८**

ब्लॉगवरची मुलँ रूज मनोगत ही पोस्ट आली आणि शेवटच्या उपसंहाराच्या पोस्टपर्यंत मी या कादंबरीत कसा बुडून गेलो हे कळलंच नाही. पॅरीस पाहिलेल्या मंडळींना तर पॅरीसमधल्या खास जागा, म्युझियम्स, कलादालनं, बार व कॅफे इत्यादिंची वर्णन व उल्लेख वाचून प्रसंग नि स्थळ यांची सांगड घालायलाही मदत होते. ही कादंबरी वाचताना मी जणु काय त्या काळात तूलूझ लोत्रेकच्या आसपासच वावरतोय असा मला भास झाला. अर्थात हे श्रेय मूळ लेखकाइतकंच किंवा त्याहूनही जास्त जास्त जयंत गुणे यांचे आहे असं म्हणायला हवं. इतकं अप्रतिम रूपांतर करण्यासाठी प्रतिभाशाली लिखाण तर हवंच पण त्याच बरोबर तात्कालिक समाजभान, विषयाची, चित्रकला, त्यातले बारकावे इत्यादिची जाण आणि उत्तम भांषाशैली हे सारं हवं. ते सारं नि अधिक काही लेखकाकडे निश्चित आहे. आणखी एक वैशिष्टय म्हणजे लेखकाने फ्रेंच भाषा, संस्कृती आणि चित्रकाराच्या शैलीचे वर्णन करताना अनुवादकाने योजिलेली भाषाशैली नेमकी आणि चपखल आहे. मूळ कादंबरी बाजूला ठेवली तरी हे रूपांतर इतकं जिवंत झालंय की या कादंबरीचे मूळ लेखकही जयंत गुणेच असावेत असं वाटावं. मराठीत सांगायचं तर 'अप्रतिम', इंग्रजीत 'सुपर्ब' नि फ्रेंचमध्ये 'त्रे बँ'

**प्रदीप प्रधान, सीमेन्स मधील निवृत्त सीनीयर इंजिनीअर, प्रसिद्ध नाट्यकर्मी आणि जाणकार रसिक. ३१ ऑक्टोबर २०१८**

मुलँ रुज ह्या कादंबरीचा स्वैर अनुवाद वाचणं, हा खरोखरीच एक झपाटून टाकणारा अनुभव आहे. पात्रांची नावं सोडल्यास, फ्रान्समध्ये घडणारी ही कथा, त्यातील वातावरण, संवाद सारं काही मराठीमय होऊन गेलंय, इतका सुंदर, अकृत्रिम आणि ओघवता अनुवाद केल्याबद्दल गुणे यांचं मन:पूर्वक अभिनंदन! फार पूर्वी Irving Stone ने लिहिलेल्या Lust for Life या व्हॅन गॉगच्या जीवनावरील कादंबरी वाचतानाही असाच भारावून गेलो होतो. पॅरिसचं ते कलामय वातावरण पुन्हा एकदा अनुभवताना नॉस्टॅलजिक वाटलं.

**दीपक कुळकर्णी. प्रसिद्ध लेखक आणि नाट्यकर्मी. ५ नोव्हेंबर २०१८**

पुस्तकांतील अक्षरां इतकीच चित्रंही महत्वाची आहेत. कारण त्यातूनच हेन्री तुलूझ लोत्रेकचा उलगडा आपल्याला होतो. अंगावर येणारे प्रसंग आणि धीटपणाच्या मर्यादाही ओलांडणाऱ्या वर्णनांपलिकडे काय आहे याचा अंदाज विचाराअंतीच लागू शकतो. त्यामुळेच हे पुस्तक वाचून पचवायचे आहे. त्यासाठी वाचकाने आपल्या आपणच आखून घेतलेल्या चांगल्या-वाईट, निती-अनिती, सभ्य-असभ्य यांच्या चौकटीचा विस्तार करण्याची गरज आहे. तसा तो चौकटी विस्तार झाला तर मात्र या पुस्तकाची शक्ती आणि त्यातील मजा आपल्याला फार चांगल्या समजतात. पुस्तकाचा अनुवाद चांगला झाला आहे. मुख्य म्हणजे चाकोरीबाह्य विषयाला न्याय देणारा आहे.

**श्रीराम शिधये, लक्षवेधी पुस्तके, ललित जून २०१२**

कॅनव्हासः पॅरीसच्या सांस्कृतीक कलाजीवनाचा. वेगळ्या मातीतील, एकोणीसाव्या शतकातील पॅरीसच्या सांस्कृतिक आणि कलाजीवनावर जरी ही कादंबरी बेतलेली असली तरी ती मराठी वाचकालाही भिडते; कारण कलावंताची प्रतिभा, निर्मीती प्रक्रिया, कॅनव्हास, शब्द आणि संगीत या माध्यामातून निर्माण होणारी कलाकृती हा सृजनशीलतेचा प्रवास सार्वकालिक आणि सनातन असतो. प्रस्थापितांविरूद्ध साचलेपणाविरोधात बंड करणारा, न्युड मॉडेल संबंधी आपली मते ठामपणे मांडणारा तुलूझ लोत्रेक देशकालाच्या सीमा ओलांडत आपल्या संवेदनशीलतेला आवाहन करत रहातो.

**मीनाक्षी दादरावाला, प्रहार, १८ डिसेंबर २०११**

विश्ववाङमयः अभ्यासू लालित्य जपणारी चरित्रकादंबरी. या कादंबरीतून अभ्यास आणि लालित्य यांचा जो गोफ पिएर ल मूर यांनी विणला होता, तो याच कादंबरीवर सही सही बेतलेल्या आणि त्याच नावाच्या चित्रपटामध्येही दिसला असेलच असे नाही. पण भाषांतरात मात्र हे अभ्यासू लालित्य प्रकटले आहे. कारण अनुवादकानेही अभ्यास आणि लालित्य यांच्या मार्गावर अनुगमन केले आहे.
**विबुधप्रिया दास, लोकसत्ता १३ फेब्रुवारी २०१२**

स्वैर रुपांतर आहे हे विसरून मी त्याकाळात समरस झाले. लोत्रेकमध्ये मी इतकी गुंतले की त्याच्या दुःखात मी सहभागी झाले. ओघवत्या भाषेमुळे कुठेही खंडीत न होता सुसंगत असे कथानक मनाला भावते. डोळयांच दुखणे असूनही दोन दिवसा वाचून पूर्ण केली. थोडा आराम मिळाल्यावर पुन्हा वाचली. जागो जागी पेंटींग्ज व पोस्टर यांची चित्रे टीपांसहित दिल्यामुळे तो काळ, ते प्रसंग जिवंत झाले आहेत. ही आई-मुलाची कहाणी खरोखरच अतिशय हृदयस्पर्शी आहे. **वेदवती हब्बू, ग्रंथपाल, ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, २० फेब्रुवारी २०१२**

शापित कलावंताची दास्तान. नियतीच्या विलक्षण खेळाची शिकार बनलेल्या हेन्री तुलूझ लोत्रेक या शापित प्रतिभावंताचं डोळयांच्या कडा ओलावणारं चित्र मुलँ रूज या कादंबरीत रंगवलेलं आहे. काहीश्या पाल्हाळीक आणि प्रदीर्घ अशा मूळ कादंबरीचा अनुवाद न करता स्वैर रुपांतर केले आहे. गुण्यांचे भाषाप्रभुत्व आणि संपादन कौशल्या यामुळे या रुपांतराला एक छानसा प्रवाहितपणा आणि चटपटीतपणा आला आहे. त्यांच्या मनात मुळात चित्रकेलविषयी प्रेम आहे, मराठी भाषेवर प्रभुत्व आहे आणि चांगल्या इंग्रजी साहित्याची जाण आहे.
**सुहास भास्कर जोशी, भाषा आणि जीवन, उन्हाळा २०१२**

# *माँ पेतीत*

“प्लीज ममा. हलू नका. मी तुमचं चित्र काढतोय ना.”

“किती चित्रं काढायची ती. कालच एक काढून झालं ना. तेव्हापासून माझं नाक, कान, डोळे सर्व काही आहे तिथेच आहे की बदललंय?”

अेदल कॉम्ते द तुलूझ लोत्रेक यांनी हातातील काम थांबवले आणि आपल्या लाडक्या लेकाकडे एकवार कौतुकाने पाहिले. काळेभोर कुरळे केस, सेलर सूट घातलेला छोटा रिरी समोरच्या स्केचबुकमध्ये पेन्सिलीने भराभर चित्र रेखाटत होता. त्यांचा एकुलता एक मुलगा. त्यांच्या निराशामय एकाकी जीवनातील एकमात्र विरंगुळा.

“तुम्ही त्या जोसेफचं का नाही चित्र काढत?”

“त्याची केव्हाच चांगली दोन चित्रं काढून झालीयत.” तो त्यांच्या नोकराकडे बघून म्हणाला, “आता तो झोपलाय आणि झोपल्यावर त्याचा चेहरा अगदी ठोकळ्यासारखा दिसतोय. माशी बसली तरी हलत नाही.”

“ठीक आहे, तू एवढा आग्रह करतोयस तर. पण मी आणखी फक्त पाच मिनिटंच देईन हां.”

१८७२ च्या सप्टेंबरमधली ती एक शांत दुपार होती. वर आकाशात सूर्य मावळतीकडे संथपणे उतरत होता. पक्षी घरट्यांच्या काठावर बसून एकमेकांशी गुजगोष्टी करत होते. झाडांच्या पिवळट पडू लागलेल्या पानांमधून झिरपणाऱ्या उन्हामुळे ती मध्ययुगीन गढी सुस्तावल्यासारखी वाटत होती. गढीची डागडुजी बऱ्याच वर्षांत झालेली दिसत नव्हती. तरीही गढीच्या गतवैभवाच्या खुणा तिच्या कानाकोपऱ्यांतून विखुरलेल्या तऱ्हेतऱ्हेच्या उंची सामानसुमानांतून दिसून येत होत्या. इकडे तिकडे फिरणारे गणवेशधारी नोकरचाकर, या ना त्या निमित्ताने वाड्यात मुक्कामाला असलेली असंख्य माणसे उमराव घराण्यातील खानदानी रीतिरिवाजात

अगदी मुरलेली होती. पण अशा या भाऊगर्दीतसुद्धा ती मायलेकरांची जोडी अगदी एकाकी होती.

मायलेकरांचा संध्याकाळचा कार्यक्रम ठरलेला असे. थोडा वेळ बग्गीतून शेतीवाडीवर फेरफटका. फिरून आल्यावर साधे जेवण नंतर झोप. झोपी जाण्यापूर्वी आई त्याला गोष्टी सांगायची. येशू ख्रिस्ताच्या, जोन ऑफ आर्कच्या आणि पूर्वजांच्या पराक्रमाच्या. त्याच त्याच गोष्टी आलटून-पालटून व्हायच्या. पण हेन्रीची सर्वात आवडती गोष्ट म्हणजे पहिल्या क्रुसेडची. ती रोजच सांगावी लागे. पहिल्या क्रुसेडमध्ये त्याच्या खापर खापर पणजोबांनी मोठा पराक्रम गाजवला होता. रेमंड कॉम्ते डी तुलूझ द फोर्थ त्या युद्धात ख्रिश्चन सरदारांच्या एका तुकडीचे नेतृत्व करीत होते. त्या वेळी त्यांनी पॅरीस ते थेट जेरुसलेमपर्यंत मजल मारली होती. अशा गोष्टी ऐकता ऐकता हेन्रीला झोप लागायची. छोटा हेन्री झोपल्यावर वाड्यातील दिवे एक एक करून मालवले जात.

थोड्याच वेळात हेन्रीने स्केच पूर्ण करून वही आईसमोर धरली.

“बघ. पाच मिनटंसुद्धा लागली नाहीत.”

“छान आहे. अगदी हुबेहूब काढलंयत की!” तिने कौतुक केले खरे, पण ते फारसे मनापासून नव्हते.

लोत्रेकने लहानपणी काढलेल्या चित्रांपैकी काही विस्मयकारक चित्रे सध्या आल्बीमधल्या म्युझियममध्ये आहेत. या चित्रांतील सफाई त्याच्या वयाच्या मानाने विलक्षण आहे.

“तुम्ही आता सात वर्षांचे झालात. किती दिवस हे असं चित्र काढत बसणार आहात? आता शाळेत नाव घालायला पाहिजे.”

“मी नाही जा शाळेत जाणार.”

“राजे, असं कसं म्हणून चालेल. तुम्हाला जहाजाचा कप्तान व्हायचंय ना? मग त्यासाठी शाळेत जावच लागतं. पॅरीसमध्ये फॉन्तॉन म्हणून एक मोठी शाळा आहे. त्या शाळेत तुमचं नाव घालायचं ठरवलंय काउंटसाहेबांनी.”

शाळेत जाण्याच्या कल्पनेने त्याचे बालविश्व उद्ध्वस्त झाले. शेतीवाडीवर आता हुंदडायला मिळणार नाही या कल्पनेने त्याला रडू फुटले.

“शू ऽऽ असे रडतायत काय वेड्यासारखं. तुलूझ लोत्रेकांच्या घराण्यात कधी कोणी रडत नसतं. नीट लक्षात ठेवा.”

“पॅरीसमध्ये पण खूप मज्जा असते. जोसेफ आणि ऑनेतसुद्धा आपल्याबरोबर आहेत की. शिवाय तिकडे आपल्याला पप्पांबरोबर राहायला मिळेल. मग काय अगदी मजाच आहे बुवा एका माणसाची.”

वर्षातून कधीतरी पपा वाडीवर आले की कशी धमाल उडायची. सुस्तावलेल्या गढीला जाग यायची. अभ्यासाला बुट्टी. पपा रोज घोडागाडीतून लांबवर फिरायला घेऊन जात. घोड्यांच्या खुरांचा टपटप आवाज, चाकांची करकर, मधेच चाबकाचा कडकडाट. या पार्श्वभूमीवर चालायच्या शिकारीच्या व लढाईच्या गोष्टी. दिवस कसे भुर्रकन उडून जात. पपांच्या आठवणीने तो मोहरून गेला. पपांबरोबर राहायला मिळत असेल तर मग पॅरीसला जायला हरकत नाही.

पुढचा आठवडा धावपळीचा गेला. प्रवासाची तयारी, सामानाची बांधाबांध, गढीच्या देखभालीच्या काळजीपूर्वक केलेल्या असंख्य सूचना. मोठ्या लवाजम्यासह गाजावाजा करीत लोत्रेक मंडळी एकदाची रेल्वे स्टेशनवर येऊन डेरेदाखल झाली. आगगाडीत बसायला मिळणार म्हणून हेन्री अगदी उत्तेजित झाला होता. वाफेचे लोट सोडीत गाडी एकदाची चालू झाली. दुतर्फा वाऱ्यावर डोलणारी खेड्यातील शेते, हिरवीगार वनराई हे दृश्य पाहता पाहता हेन्री पटकन झोपी गेला. जाग आली तेव्हा गाडी पॅरीसमध्ये नुकतीच शिरत होती. पाऊस पडल्याने सगळीकडे चिखलाची नुसती राड झाली होती. कारखान्यांच्या काळाकुट्ट धूर ओकणाऱ्या चिमण्या, गिचमिड घरे,

अरुंद रस्ते. पॅरीसचे हे पहिलेवहिले दर्शन त्याला मुळीच आवडले नाही. गाडी स्टेशनात शिरली तेव्हा प्लॅटफॉर्मवरच्या गर्दीत सर्वात उठून दिसणाऱ्या पपांना त्याने लांबूनच ओळखले. अंगात लांब कोट, हनुवटीवर दाढी, डोक्यावर हॅट घातलेले पपा कॉम्ते अल्फान्सो द तुलूझ लोत्रेक मोठे देखणे आणि रुबाबदार दिसत होते. पॅरीसमध्ये काउंटसाहेबांचा मुक्काम एका बड्या हॉटेलमध्ये ठरलेला असायचा. त्याप्रमाणे ते काउंटेस आणि हेन्री यांना हॉटेलमध्ये घेऊन गेले. त्या रात्री जेवणानंतर शेकोटीशी गप्पा मारता मारता त्यांनी छोट्या हेन्रीला मोठ्या प्रेमाने जवळ बसवून घेतले आणि तुलूझ लोत्रेक घराण्याचे ऐतिहासिक महत्त्व समजावून सांगायला सुरुवात केली.

त्या काळी तुलूझ लोत्रेक घराण्याची गणना फ्रान्समधील फार महत्वाच्या घराण्यांमध्ये केली जाई. ते फ्रान्समधील एक इतिहासप्रसिद्ध असे तालेवार घराणे होते. चौदाव्या लुईच्या दरबारात त्यांना खूप मान होता. कालांतराने राजसत्तेचे महत्त्व कमी झाल्यावर सर्व सरदार घराण्यांचे मानमरातब बरेच कमी झाले होते खरे असले तरी एके काळी लोत्रेक घराण्याची फ्रान्समधल्या तुलूझ या बऱ्याच मोठ्या प्रांतावर सत्ता होती. त्यांच्या ताब्यातील जहागिरीच्या प्रचंड महसुलामुळे त्यांच्याकडे अमाप संपत्ती जमा झाली होती. त्यामुळे त्यांचा तोरा अजून थोडाफार शिल्लक होता. निरनिराळी घराणी, त्यांच्या अखत्यारीतील वेगवेगळे प्रांत, सध्याच्या घराण्यांतील आपापसातील नातेसंबंध, तुलूझ लोत्रेकांची वंशावळ, त्यातील ऐतिहासिक पुरुषांची कामगिरी वगैरे बरीच तपशीलवार माहिती त्यांनी हेन्रीला सांगितली. काउंट, ड्युक, मार्क्वेज वगैरे विविध पदव्यांचे अर्थ, त्यांचा अधिकार, दरबारी रीतिरिवाजातील बारीकसारीक तपशील, चमत्कारिक प्रथा या सगळया गोष्टी सद्य परिस्थितीत कितीही कालबाह्य झाल्या असल्या तरीही त्या सांगताना ते अगदी रंगून गेले होते. झोपेमुळे हेन्रीचे डोळे मिटत होते तरीही त्यांनी त्याला मोठ्या आग्रहाने आपल्या बंदुका, पिस्तुले, तलवारी, पदके, मानचिन्हे वगैरे गोष्टींचा संग्रह मोठ्या प्रौढीने दाखवला.








(फोटो हेन्री, आई एदल, वडिल कॉम्टे अल्फान्सो)

- २ –

दुसऱ्या दिवशी सोझेक कुटुंबीय नव्या जागेत राहायला गेले. ही जागा म्हणजे बुलेव्हारवरील एक प्रशस्त अपार्टमेंट होते. त्यांच्या इस्टेटवरच्या गढीच्या मानाने खूपच लहान असले तरी एकंदर खोल्या भरपूर होत्या व खेळायला जागाही त्या मानाने बरीच होती. दोन दिवसात सगळे सामानसुमान लावून झाल्यावर लगेच हेन्रीची शाळा सुरू झाली. इस्टेटीवर खेळायला फारसे सवंगडी नसत. पण येथे मात्र जिकडेतिकडे मुले खेळताना दिसत होती. हेन्रीला नव्याने आलेला पाहून त्यातला एक जण धावत धावत पुढे आला.

“तू नवीन आहेस का रे?”

“होय. आज माझा पहिला दिवस.”

“मला एक महिना झालाय.”

थोडा वेळ ते दोघे एकमेकांकडे लहान मुलांच्या निरागसतेने रोखून बघत होते.

“तू मोठा झाल्यावर कोण होणारेस रे?”

“मी किनई कप्तान होणार आहे. जहाजाचा कप्तान. माहितीय.”

“छ्या. कप्तान काय सगळेच होतात. आपण बुवा समुद्री चांचा होणार.”

“चांचा? तो काय करतो रे?”

“त्यांचं स्वतःचं जहाज असतं. ते दुसऱ्या जहाजांना पकडतात आणि त्याच्यावरचा खजिना लुटून तो एका गुप्त बेटावर लपवून ठेवतात. ती जागा अगदी कोणाला म्हणजे कोणालासुद्धा माहीत नसते.” ट्रेझर आयलंड वगैरे वाचून झालेल्या माहितीवर त्याच्या बढाया चालू होत्या. चांचा बनून काळा झेंडा फडकावलेल्या जहाजावरून समुद्रात फिरता फिरता मधेच कधी युनियन जॅक फडकावलेले इंग्लिश

जहाज दिसले रे दिसले की त्याच्यावर कशी झडप घालायची याची सगळी तपशीलवार योजना त्याच्याकडे तयार होती.

“तुझं नाव काय रे?”

“मॉरीस. मॉरीस ज्वायाँ. तुझं?”

“हेन्री द तुलूझ लोत्रेक.”

“केवढं लांब नाव आहे तुझं. तू कोणत्या गावचा?”

“आल्बी. खूप लांब आहे. आगगाडीत बसून जायला अख्खा दिवस लागतो.”

“तिकडे बर्फ पडतो का?”

“नाही. लांब डोंगरावर पडतो कधी कधी.”

“आमच्या गावाला हिवाळ्यात खूप बर्फ पडतो. सगळे रस्ते, झाडं, घराची छप्परं कापसासारख्या बर्फाने भरून जातात. खूप मजा येते बर्फात खेळायला.”

या पहिल्या ओळखीनंतर दोघांची दोस्ती जी पक्की झाली ती अगदी कायमची. दोघेजण सारखे एकमेकांच्या बरोबर असत. वर्गात एका बाकावर, मधल्या सुटीत खाऊ खाताना, खेळात आणि अभ्यासात.

एके दिवशी मधल्या सुटीत मॉरीस त्याला म्हणाला, “मोठेपणी आपण चांचा व्हायचं ठरवलं होतं ना त्यात एक अडचण आहे. आमचे काका सांगत होते की चांचे अगदी दुष्ट असतात. लोकांना नुसती गंमत म्हणून ते ठार मारतात. त्यापेक्षा आपण कॅनडात जाऊन फासेपारधी होऊया. चालेल तुला?” मॉरीसने त्याच्यासमोर दुसरा पर्याय ठेवला.

“कॅनडात जाऊन फासेपारधी व्हायचं म्हणजे काय करायचं असतं?”

“तुला अगदी काहीच ठाऊक नाहीसं दिसतंय. अरे त्यात तर खूप मजा येते. माहितीय. कॅनडामध्ये किनई खूप दाट जंगल आहे. त्या जंगलात बंदूक घेऊन फिरायचं, अस्वलांची शिकार करायची आणि त्यांची फर काढून विकायची. खूप पैसे मिळतात. माहितीय.”

“जंगलात आपण राहायचं कुठे?”

“कॅनडात तिकडे लोक लाकडाच्या घरात राहतात.”

त्याच्या म्हणण्याला लागलीच मान्यता दिली असे व्हायला नको म्हणून त्याने खूप खुसपटे काढली. पण मॉरिसने ती सगळी उडवून लावली.

“चालेल, पण आपण एकाच घरात राहायचं बरं का. तू कध्धी म्हणून मला सोडून जायचं नाहीस. घे शपथ.” हेन्रीने अट घातली.

“घेतली शपथ. पण त्यापेक्षा आपण ब्लड ब्रदरच होऊ. म्हणजे अगदी मरेपर्यंत आपली मैत्री कायम राहील. मग तर झालं!”

“मी पण घेतो शपथ.”

“तसं नको. अगदी पद्धतशीर करू या सगळं.”

मॉरीसने एका टाचणीने आपल्या मनगटाला टोचून थेंबभर रक्त काढले व हेन्रीलासुद्धा तसे करायला सांगितले. मग दोघांनी हाताला हात लावून आपल्या हातावरचे रक्ताचे थेंब एकमेकांत मिसळले आणि मोठ्या गांभीर्याने शपथ घेतली.

*“अ ला व्हिए अ ला मोर्त.”*

“चल, आता आपण या विस्तवात थुंकू. म्हणजे आपलं नातं अगदी मरेपर्यंत पक्कं होईल.”

दोघेही एकाच वेळी शेकोटीतल्या विस्तवात थुंकले. अशा रीतीने पॅरीस मुक्कामी पहिल्याच वर्षी त्या दोघांच्या मैत्रीवर एका अनोख्या नात्याचे शिक्कामोर्तब झाले.



(फोटो – तुलूझ लोत्रेकांचा आल्बी येथील शॅटो – गढी/वाडा)

- ३ –

लवकरच शाळेला सुट्टी पडली आणि हेन्री आपल्या इस्टेटीवर परतला. जवळ जवळ चार महिन्यांनी परत येत असल्याने हेन्रीने मनसोक्त हुंदडून घेतले. परत पॅरीसला परतल्यावर सारखे नजरेसमोर असावे म्हणून त्याने आपल्या स्केचबुकमध्ये भरपूर स्केचेस करून घेतली. धान्याचे कोठार, कोंबड्यांचे खुराडे, गायींचा गोठा, घोड्यांचा तबेला, शेतातली पाणबदके, शेतकरी. तेथे विषयांना काहीच तोटा नव्हता. सकाळी हातात स्केचबुक घेतलं की संध्याकाळपर्यंत सगळं बुक भरून जायचं. दुसऱ्या दिवशी नवी वही.

(या मुक्कामात हेन्रीने काढलेल्या चित्रांपैकी गाढव जुंपलेली खतांची गाडी हे जलरंगातील चित्र आणि इतर अनेक स्केचेस सध्या आल्बीमधल्या म्युझियममध्ये आहेत.)

त्या सुटीत हेन्रीची दोन विषयांची जंगी तयारी करून घेण्यात आली. पहिला विषय म्हणजे पाटर्या, सभारंभांत वावरण्याचे रीतिरिवाज. पार्टीला जाताना कोणता पोशाख करावा, कोणी एखाद्याची ओळख करून दिल्यावर तोंडावर उसने हसू आणत कंबरेत किंचित वाकून आपल्याशी ओळख होण्यात माझा बहुमानच झाला आहे, असे मी समजतो वगैरे कृत्रिम संभाषण कसे करावे. पुरुषांचे एक ठीक. थोड्याशा जुजबी संभाषणानंतर लगेच ते आपले मद्यपानाकडे वळायला मोकळे होत. ...अय्या किती छान दिसतो नाही या पिंक कोटमध्ये... किती कुरळे केस आहेत नाही... वगैरे संभाषणांचा शेवट बहुधा गालगुच्चा किंवा मुका घेऊनच होई. आईने तर बजावूनच सांगितले होते की कोणी मुका घेत असेल तर घेऊ द्यावा. तोंड बाजूला फिरवायचे नाही. दुसरा विषय शिकारीचा. त्यासाठी हेन्रीला खास कपडे शिवण्यात आले. लाल रंगाचा कोट व गुडघ्यांपर्यंत वर येणारे शिकारीचे बूट. कोटाचा रंग लाल असला तरी त्याला पिंक कोट म्हणायचे असा शिरस्ता होता.


हेन्रीचा बुजरेपणा जावा म्हणून त्याला जवळच असलेल्या लॉरी नावाच्या गावातल्या इस्टेटीवर पाठवण्यात आले. त्या पाटर्या आणि शिकारींचा हेन्रीला मनस्वी कंटाळा येई. जेव्हा कधी त्याला संधी मिळे तेव्हा मधेच सटकून काखोटीला स्केचबुक

मारून तो सरळ तबेल्यावर जाई. घोड्यांना खडीसाखर भरवल्यावर ते त्याला हवी ती पोज देत.

(घोड्यावर बसायला सज्ज असलेली स्त्री, तिची वस्त्रे वाऱ्यावर फडफडत आहेत असे एक आणि पाळीव प्राण्यांची अनेक चित्रे आल्बीमधल्या म्युझियममध्ये आहेत.)

सगळया लवाजम्यानिशी त्याला सांबराच्या शिकारीला नेत असत. घोडेस्वारी त्याला बऱ्यापैकी जमू लागली पण शिकारीच्या सगळया धामधुमीच्या शेवटी सांबर तोंडातून विचित्र आवाज काढून टाचा घासत प्राण सोडे. ते दृश्य बघताना त्याच्या पोटात कसंसंच होई आणि डोळयांतून टपकन पाणी येई. या सगळया जबरदस्तीमुळे सुट्टी संपून जेव्हा शाळा सुरू झाली तेव्हा त्याला मनापासून आनंद झाला.

शालेय शिक्षणाबरोबरच त्याचे दरबारी रीतिरिवाजांचे शिक्षणसुद्धा चालू झाले. खरे म्हणजे त्यालाच जास्त महत्त्व होते. बीजगणित, व्याकरण व सिसेरोच्या भाषणांपेक्षा तलवारबाजी व नृत्य महत्वाचे. व्याकरण व सिसेरोची भाषणे बायकांना एक वेळ ठीक आहेत. पण वादविवादात पुरुषांना पांडित्यापेक्षा तलवारबाजीतल्या कौशल्याचाच जास्त उपयोग होतो. पुरुषांच्या शब्दांना वजन तलवारीनेच येते, पुस्तकांनी नव्हे. नृत्यातील कौशल्य म्हणजे पुरुषांच्या यशाची गुरुकिल्लीच. या किल्लीनेच पुढील कारकिर्दीचे दरवाजे उघडत असतात. प्रतिष्ठितांच्या वर्तुळात प्रवेश व्हावा म्हणून हेन्रीला पाटर्या-समारंभांना कटाक्षाने नेले जाई. पार्टीला आलेल्या सर्व बड्या हस्तींशी हेन्रीची रीतसर ओळख करून दिली जाई. धिस इज् किंग लिओपाल्ड ऑफ बेल्जम. मीट मिस्टर ह्युगो. हे लिहितातसुद्धा बरे का. वगैरे वगैरे. मद्यपानच्या प्रसंगी हेन्रीला ग्रेनेडाईनचा पेला भरून दिला जाई. कोणत्या प्रसंगी कोणाबरोबर काय प्यावे या शास्त्राची तोंडओळख हेन्रीला एवढ्या लहान वयातच करून देण्यात आली.



(फोटो – हेन्री तुलूझ लोत्रेक म्युझियम)

- ४ –

सन १८५५ मध्ये पॅरीसमध्ये शाँझ एलिजेतील एका मोकळया मैदानावर एक भव्य एक्स्पोझिशन भरले होते. तेथे जागोजागी कमानी, महिरपी, प्लॅस्टरचे प्रचंड पुतळे वगैरे गोष्टींची एकच गर्दी झाली होती. एरवी त्या मैदानाचा काही तरी उपयोग व्हावा या उद्देशाने तेथे चित्रकार व शिल्पकारांचे एक वार्षीक संमेलन, सॅलाँ द पेंटर ए स्कल्प्चर द आर्टिस्ट्स ऑफ फ्रान्स भरत असे. हे प्रदर्शन नुसत्या सॅलाँ या नावाने ओळखले जाई. याव्यतिरिक्त तेथे गुराढोरांचे प्रदर्शन, चॅरिटी बाजार, देशभक्तिपर मेळावे वगैरे नियमितपणे भरत असत. शिवाय कधी कधी खास निमंत्रितांसाठी कार्यक्रम आयोजित केलेले असत. एकदा हेन्रीला त्याचे काका जॉकी क्लबच्या कार्यक्रमाला घेऊन गेले. तेथे चालू असलेल्या घोड्यावरच्या कसरतींचे एक वृद्ध चित्रकार आपल्या स्केचबुकात भराभर चित्रण करत असताना हेन्री त्याच्याकडे अगदी टक लावून बघत होता. ते त्याच्या लक्षात आले व तो त्याच्याकडे पाहून कौतुकाने हसला.

तुम्हाला चित्र काढायला आवडते का, असे आपल्या वहीत लिहून त्याने ती वही त्याच्या पुढ्यात धरली. हेन्रीला गोंधळात पडलेला पाहून त्याने आपण बहिरा व मुका असल्याचे खुणेने सांगितले. त्याने पुढे केलेल्या वहीत हेन्रीने अडथळयावरून उड्या मारणाऱ्या घोड्यांचे भराभर स्केच करायला सुरुवात केली. त्याचा वेग व आरेखन कौशल्य पाहून तो वृद्ध अचंबित झाला. हेन्रीचे चित्र काढून संपल्यावर त्याने त्या चित्राखाली तू खूप छान चित्र काढतोस असा शेरा लिहून दिला. त्यातील खूप या शब्दाखाली त्याने ठळक रेघ मारली व खाली सही ठोकली. घरी गेल्याबरोबर त्याने ताबडतोब आईला तो शेरा दाखवला. दिवसभराच्या दगदगीने तो अगदी दमून गेला होता. आईला फारसे कौतुक वाटले नसले तरी त्या वृद्ध चित्रकाराने केलेल्या कौतुकाने त्याची स्वारी खूश होती. त्या खुशीतच तो झोपी गेला.

दुसऱ्या दिवशी हेन्री उठला तो तापाने फणफणतच. त्यात त्याचे डोकेसुद्धा ठणकत होते. डॉक्टरांनी तपासून काही घाबरण्याचे कारण नाही असे सांगितले. पण एका आठवड्यानेसुद्धा ताप जाईना तेव्हा ते गोंधळात पडले. म्हणून त्यांनी दुसऱ्या एका ज्येष्ठ डॉक्टरांना बोलावून आणले. त्यांनी हेन्रीला मोठ्या काळजीपूर्वक तपासले.

पण लक्षणांची संगती काही केल्या लागेना. ॲनिमियामुळे आलेला अशक्तपणा म्हणावे तर ताप व डोकेदुखीचे काय?

"त्याला आमेली ले बँला घेऊन जा. थोडा हवापालट झाला की बरं वाटेल. विशेषतः तिथलं पाणी. ते फारच गुणकारी आहे ॲनिमियावर."

पुढच्याच आठवड्यात सगळे सामानसुमान बांधून जाण्याची तयारी झाली. निघताना वडिलांनी फाल्कनरीवरचे एक पुस्तक दिले. मॉरीसने निरोप देताना कॅनडाला जायचा बेत विसरू नकोस असे बजावून सांगितले.

ग्रँड हॉटेल द आमेली ले बँ जवळ जवळ रिकामेच होते. वातावरणात एक विचित्र उदासीनता भरून राहिल्यासारखे वाटत होते. जणू काही तिथे पूर्वी राहून गेलेल्या लोकांच्या दुःख व वेदनांचा दर्वळ मागे रेंगाळत राहिला होता. जेवणाचा भव्य हॉल, वाद्यवृंद, नृत्यगृह सर्व प्रकारच्या राजेशाही सुखसोयी हजर होत्या पण तरीही वातावरणातील मरगळ दूर करण्यास त्या फारशा उपयोगी पडत नव्हत्या.

तेथे नव्या तज्ज्ञ डॉक्टरांनी हेन्रीची पुन्हा एकदा सर्वांगीण तपासणी केली. आपसात बराच वेळ चर्चा करूनही नक्की निदान होईना तेव्हा मात्र आईचा चेहरा चिंतेने पांढराफटक पडला होता. निदान झाले नाही तरी हेन्रीचा ताप अचानक पळाला. एके दिवशी तो अगदी खुटखुटीत बरा झाल्यासारखा दिसायला लागला. डॉक्टरांच्या दृष्टीने हेन्रीच्या रहस्यमय आजाराइतकेच त्याचे अचानक बरे होणेसुद्धा तितकेच चिंतेचे होते. कदाचित आमेलीच्या पाण्याचा जादूई परिणाम असेल, काही सांगता येत नाही.

हवापालटासाठी त्यांनी रिव्हिएरासारख्या स्वच्छ सूर्यप्रकाशाच्या ठिकाणी जायचे ठरविले. आणि इस्टरनंतर पॅरीसला परत. हेन्री आजारपणात बुडालेल्या अभ्यासाच्या तयारीचे बेत आखू लागला. त्याने एक लांबलचक पत्र मॉरीसला लिहिले. ते नीसमध्ये आले तेव्हा कार्निव्हल नुकताच संपला होता. तुटलेल्या पताका व रंगीबेरंगी पट्ट्यांची भेंडोळी ॲव्हेन्यू व बुलेवारवर लोंबकळत होती. हिवाळयातला गारठा अजून ओसरला नव्हता. तीन-चार रशियन ग्रँड ड्युक व दोन-तीन अमेरिकन लक्षाधीशांचा शहरातील मुक्काम अजूनही हलला नव्हता. ग्रँड हॉटेल

डी सिमेज्च्या बागेतील मिमोसाची वेल ऐन बहरात होती. तिच्या फुलांच्या वासाने हेन्री मोहरून गेला.

हॉटेलातील नाश्ता खूप छान असायचा. ठीक दहा वाजता शिकवणीचा शिक्षक यायचा. मग संध्याकाळी आईबरोबर प्रोम्नोद द आँग्लेवरून घोडागाडीतून फेरफटका मारताना व्हिक्टोरिया, लँडाऊ, फिॲकर, टिल्ब्युरी अशा विविध प्रकारच्या घोडागाड्या व डॉगकार्ट इकडून तिकडे जाताना दिसत. झोकदार पोशाखातल्या तरुण स्त्रिया हातातला चाबूक फडकावत, दाताखाली हळूच जीभ चावत गाडी दौडत मजेत चालल्या आहेत आणि त्यांचा कडक गणवेशधारी गाडीवान मात्र मागे बग्गीत अंग चोरून ताठ बसलाय हे दृश्य मोठे मजेशीर दिसे. हॉटेलमध्ये परत आल्यावर हेन्रीला जलरंगातल्या चित्रांसाठी चांगला विषय मिळालेला असे.

(वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी काढलेल्या जलरंगातील या चित्रांचा लोत्रेकच्या सर्वात लोकप्रिय कामात समावेश होतो. या चित्रांचे आजपर्यंत असंख्य प्रिंट्स निघाले आहेत.)

जसा गेला तसा अचानक ताप परत आला. तापाबरोबरच डोक्यातील गुणगुण. पुन्हा एकदा डॉक्टरांच्या सर्वांगीण तपासण्या. पण नवीन कोणतेही निदान होईना. वरवर अशक्तपणा आणि ॲनिमिया वाटत होता पण आत काहीतरी गंभीर आजार असावा याची अस्पष्ट चाहूल डॉक्टरांना लागली होती. पुन्हा हवापाणी पालटण्याचा सल्ला. आता या वेळी बर्जेसचे पाणी.

ताबडतोब हेन्रीला घेऊन त्याची आई बर्जेसला रवाना झाली. तिथेसुद्धा मागचीच पुनरावृत्ती झाली. बर्जेसला आल्याबरोबर आजारात उतार पडला. रोज संध्याकाळी आई त्याला घेऊन नगरपालिकेच्या वाद्यवृंदाला जाई. पण थोड्याच दिवसात परत ताप आणि डोकेदुखी चालू झाली. हेन्रीचे हिंडणे-फिरणे पार बंद झाले.

या वेळी डॉक्टरांनी प्लाँबीएर्सला जायला सुचविले. लगोलग आई त्याला घेऊन प्लाँबीएर्सला गेली. पुन्हा ये रे मागल्या. दरवेळी डॉक्टर नवे ठिकाण सुचवीत. आता एव्हीअँ, महिन्याभराने गुयाँ आणि मग नीस असे करता करता परत एकदा आमेली ले बँची पाळी आली आणि एक फेरा पूर्ण झाला. फ्रान्सच्या नकाशावरची सर्व ठिकाणे

पालथी घालून झाली. दर वेळी तोच प्रकार. थोडे दिवस आराम नंतर परत ताप, डोकेदुखीचा फेरा चालू. आता हेन्री बहुतेक वेळ अंथरुणात पडून असे. जसजसे दिवस जाऊ लागले तसतसे हेन्रीचे शाळेत परत जाण्याचे स्वप्न क्षितिजावर दूरदूर जाणाऱ्या जहाजासारखे हळूहळू धूसर होत गेले. पॅरीसमधले बुलेव्हार मलेशर्ब्सवरील घर, मित्रांबरोबरचा इंडियन वॉर हा लुटुपुटीच्या लढाईचा खेळ, कॅनेडियन ट्रॅपर फासेपारधी बनून मॉरीसबरोबर जंगलात लॉग हाऊसमध्ये राहण्याचे स्वप्न हे सारे हळूहळू विस्मृतीत विरून जाऊ लागले. उरले ते फक्त अंथरूण, ताप, डोक्यातील घण, थर्मामीटर, डॉक्टर, बेडस्टँड व त्यावरील नाना औषधांच्या बाटल्यांची किणकिण. डोळे मिटले तरी कानात चालू असलेली गुणगुण काही थांबत नसे. डोळे उघडताच उशाशी प्रार्थना पुटपुटत बसलेली दक्ष आई दिसे. सततच्या जागरणाने थकल्यामुळे तिच्या चेहऱ्यावरचे हास्य मलूल झाले असले तरी त्यामुळे हेन्रीला मोठा दिलासा मिळे.



(डॉग कार – तुलूझ लोत्रेक, तैलरंग लागडी पृष्ठभाग, २७x३५ से.मी. लोत्रेक म्युझियम, आल्बी)

- ५ –

लहानग्या हेन्रीच्या आजारपणात बघता बघता दोन वर्षे उलटून गेली. आता कोणताही डॉक्टर, कोणतेही आरोग्यधाम, फ्रान्समध्ये ज्ञात असलेला कोणताही उपचार करायचा बाकी राहिला नव्हता. शेवटी अगदी नाइलाजाने आई आपल्या लाडक्या लेकराला घेऊन निराश मनाने इस्टेटीवर परतली. सगळया गोष्टी अगदी आपापल्या जागी जशाच तशा होत्या. शेवाळाचा राप चढलेल्या गढीच्या काळपट भिंती, वटवाघळे वस्तीला असलेले बुरूज, सर्वत्र भरून राहिलेला कुबट दर्प, दिवाणखान्यातील भली मोठी फायरप्लेस, तुलूझ लोत्रेक घराण्यातल्या पुरुषांच्या

छातीवर पदकांच्या माळा लटकावलेल्या भल्या मोठ्या तसबिरी, कशात काहीही फरक पडला नव्हता. नाही म्हणायला तान्ते नावाची मोलकरीण केसांचा टोप घालू लागल्याने दहा एक वर्षांनी तरुण दिसत होती इतकेच. ऋतुचक्र नेहमीप्रमाणे फिरत होते. वसंत ऋतू ऐन बहरात होता, बागेत फुले फुलली होती, फुलपाखरे उडत होती, पक्षी कुजन करीत होते. फरक पडला होता तो फक्त हेन्रीमध्ये. सततच्या आजाराने तो खूप अशक्त झाला होता. त्याचे खेळणे, बागडणे, हसणे सारे काही हरवून गेले होते. घोडदौड तर दूरच राहिली, चित्र काढण्यासाठी पेन्सिल घेऊन बसणेसुद्धा त्याच्याने होत नव्हते. आपल्या खोलीतून गच्चीवर जायलासुद्धा त्याला एका बाजूने आई व दुसऱ्या बाजूने जोसेफचा आधार लागत होता.

जून महिन्यात प्रकृतीला थोडासा आराम पडताच त्याला त्याच्या आजोळी पाठवण्यात आले. आजोबा ग्रँपेर त्याची वाट पाहत दरवाजातच उभे होते. हेन्रीला दुरून येताना पाहताच त्यांच्या हृदयात आनंदाचे भरते आले. पण तो जवळ येताच त्याची अवस्था पाहून त्यांच्या पोटात अगदी गलबलून गेले. किती अशक्त आणि बारीक दिसत होता तो. आपला नातू उमरावपुत्र असावा या आपल्या हव्यासाची तर ही किंमत नसावी, या शंकेने त्यांच्या काळजात चर्रर्र झाले. तरी अेदल व काउंट अल्फान्सो यांच्या विवाहापूर्वी डॉक्टरांनी त्यांच्या परीने धोक्याचा इशारा दिला होता. चुलत-मावस भावंडांच्या संबंधातून झालेल्या संततीत आनुवंशिक दोष असण्याची शक्यता खूप जास्त असते. त्यात अेदल व काउंट अल्फान्सो तर सख्खी मावस भावंडे. पण काय दुर्बुद्धी सुचली आणि तुलूझ लोत्रेक घराण्याच्या नावाचा मोह पडला. नातवाच्या नावामागे लांबलचक उपाध्यांची बिरुदावली असेल आणि नावापुढे राजे-महाराजांप्रमाणे रोमन अंक असतील. कॉम्ते द तुलूझ लोत्रेक हेन्री द फिफ्त. खानदानापुढे काही दिसेनासे झाले होते. हेन्रीच्या धमन्यातून वाहणारे रक्त शुद्ध होते हे खरेच, पण तेवढेच ते अशक्तही होते.

“बाळराजे थोडे दिवस विश्रांती घ्या. लवकरच तुम्ही बरे व्हाल.” पोटाशी धरून हेन्रीला थोपटताना कदाचित हा आपला एकुलता एक नातू कधीच बरा होणार नाही, या विचाराने त्यांचे डोळे भरून आले. गळयात दाटलेल्या हुंदक्याने स्वर रुद्ध झाला.

"आजोबा तुम्ही रडू नका. मला आता बरं वाटतंय."

आजोळचा मुक्काम हेन्रीला फारसा लाभला नाही. किंबहुना त्याची तब्येत थोडीशी ढासळली. परतीच्या प्रवासात तो सतत आईच्या मांडीवर डोके ठेवून होता. अशक्तपणाने आलेल्या ग्लानीत मधेच डोळे किलकिले करून तो आईकडे बघून मलूल हसायचा. दुतर्फा लालबुंद फळांनी लगडलेल्या चेरीच्या बागा होत्या. वसंत ऋतूचा बहर ओसरायला अजून अवकाश होता. पण गाडीत बसलेल्या माय-लेकरांच्या आयुष्यातील वसंत केव्हाच ओसरला होता.

तीन दिवसांनी एक अपघात झाला.

काउंटेस लायब्ररीत वरच्या फळीवरचे एक पुस्तक काढीत असता एक क्षणभरच तिचे हेन्रीवरचे लक्ष विचलित झाले. तेवढ्यात हेन्री खुर्चीवरून उठला आणि नुकत्याच पॉलीश केलेल्या जमिनीवरून घसरून पडला. वास्तविक खाली पडणे तसे अगदी किरकोळीत जमा होण्यासारखे होते, पण हेन्रीला परत उठून आपल्या पायावर उभे राहणे काही जमले नाही. डॉक्टर आले आणि त्यांनी पाय मोडल्याचे सांगितले. दोन्ही हाडे अगदी वेडीवाकडी मोडली होती. हाडे जुळून कुबड्यांच्या आधाराने चालायला येईपर्यंत दोन महिने गेले.

एके दिवशी हेन्री आईबरोबर गावातल्या बागेत फिरायला गेला असताना कुबडीच्या खाली एक छोटा वाटाण्याएवढा दगड आल्याचे निमित्त झाले आणि काखेतली कुबडी निसटून हेन्री धाडकन खाली आपटला.

"ममाऽऽ" हेन्रीच्या किंकाळीने संध्याकाळच्या गर्दीतील सर्वजण दचकले. या वेळी त्याचे दोन्ही पाय मोडले होते.

त्या रात्री तो असह्य वेदनांनी तळमळत होता. वेदनेची कळ येताच त्याचा चेहरा पिळवटून गेला. हातापायांना कापरे भरले. दात वाजू लागले. पायांच्या स्नायूतून सुरू झालेली वेदनेची तीव्रता हळूहळू वाढत जात मांड्यांमध्ये, पाठीच्या कण्यामधून सर्व शरीरभर पसरली. तोंड वेडेवाकडे झाले. हाताची मूठ घट्ट आवळली गेली. मस्तकात घुसलेली कळ कवटी फोडून बाहेर पडेल की काय असे वाटू लागले. सुरुवातीला सुईच्या तीक्ष्ण अग्राप्रमाणे असलेली वेदना अवघे शरीर व्यापून उरली.

असह्य होऊन तोंडावाटे बाहेर पडू पाहणारी किंकाळी आतल्या आत घुसमटून गेली. डोळे खोबणीत गरकन फिरले. मिनिटभरात सर्व शांत झाले. आईच्या हातावरची पकड सैल झाली. आईकडे बघून तो किंचित हसला. आईने त्याच्या ओठांच्या कोपऱ्यातून ओघळणारा फेस रुमालाच्या टोकाने हलकेच टिपला.

थोड्या वेळात वेदनेचे दुसरे आवर्तन. पुन्हा एकदा सर्वांगाला कंप, श्वासाची घुसमट... नंतर कितीही इलाज झाले तरी त्या रात्री सुरू झालेल्या यातनाचक्रातून पुढे केवळ मृत्यूनेच त्याची सुटका केली.

या वेळी जे डॉक्टर आले ते बरोबर क्लोरोफॉर्मचा वास व चकाकणारी स्कॅलपेल घेऊनच. एकूण चार शस्त्रक्रिया झाल्या. तरी तुटलेली हाडे काही जुळून येईनात. निदान... कॅल्शियम व खनिजांचा अभाव. पुन्हा एकदा वेगवेगळया आरोग्यधामांच्या वाऱ्या चालू झाल्या. पण या वेळी प्रवास करणे मागच्यापेक्षा जास्त कष्टप्रद होते. कारण हेन्रीचे दोन्ही पाय प्लास्टरमध्ये होते. त्याच्या सर्व हालचाली स्ट्रेचरवरून व्हायच्या. पांढरा गणवेश घातलेल्या परिचारिकांचा तांडा, रुग्णवाहिका, खास राखून ठेवलेला रेल्वेचा डबा, या बिछान्यातून दुसऱ्या नव्या बिछान्यात. सर्व उपचार थकले. इलेक्ट्रोथेरपी, मालीश, गंधकाच्या पाण्याचे स्नान, पुन्हा एक नवी शस्त्रक्रिया. सर्व तज्ज्ञांचा सल्ला घेऊन झाला. सगळे उपचार करून झाले पण व्यर्थ. दुखण्यात काही केल्या उतार पडेना.

हळूहळू डॉक्टरांना दाखवायचे कमी होत गेले. वेदना सुद्धा कमी कमी होत गेल्या. जणू काही थकूनभागून संवेदनाच बोथट झाल्या होत्या. वेदनांचा आवेग बराच ओसरला होता. एखाद्या मंद्र सप्तकातल्या पार्श्वसंगीताप्रमाणे वेदनांच्या संथ लयीची त्याला सवय होऊन गेली. आयुष्याशी एकरूप झाल्यासारखी.

हेन्रीचा आजार असाध्य आहे हे तोपर्यंत सर्वांना कळून चुकले. काळयाकुट्ट निराशेने त्या दोघा माय-लेकरांचे जीवन ग्रासून गेले. वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षीच हेन्रीला खूप समज आली. दोघेही माय-लेकरे आपापल्या मनातील नैराश्य दुसऱ्याला कळू नये म्हणून एकमेकांच्या नजरेला नजर देणे टाळू लागली. एवढ्या कोवळया वयात त्याने फार मोठ्या धीराने सत्याचा कडू घोट गिळला होता. या रुग्णशय्येवरून उठून उभे राहणे आपल्याला आता कधीच जमणार नाही. प्लॅस्टरमध्ये अडकलेले ते

जडशीळ आणि दुखरे पाय. अंथरुणावर झोपून छतावरतीच काय ती कल्पनाचित्रे रंगवायची. पडल्या पडल्या खिडकीतून दिसतोय तेवढाच आकाशाचा तुकडा म्हणजे आपले जग. घोड्यावरची रपेट, फाँतॉनची शाळा, मॉरीस, कॅनेडियन ट्रॅपरचे जंगलातील लाकडी खोपटे हे सर्व हळूहळू विस्मृतीच्या पडद्याआड झाले. आई, आई आणि आई हेच जीवन आणि हेच सत्य. सकाळी उठल्याबरोबर पहिले दर्शन व्हायचे ते आईचे. फिकुटलेले मंद स्मित, *बॉन्ज्युर माँ पेतीत*, गुड मॉर्निंग माझ्या राजा हे शब्द. नंतर दिवसभर ती त्याच्या अवतीभवती सारखी वावरताना दिसायची. नंतर रात्री झोपताना डोळे मिटावेत तर आई प्रार्थना पुटपुटत असायची.

(खाली दिलेले पोर्ट्रेट करताना कॉम्ते एदल शेतॉ द मार्लोम येथील वाड्यातील ब्रेकफास्ट रूममध्ये बसलेली आहे. आपल्या मुलाच्या आयुष्यतील दु:ख तिने ज्या शांतपणे स्विकारले आहे तो हताश भाव आणि तिचे खानदानी सौम्य व्यक्तिमत्व लोत्रेकने या पोर्ट्रेटमध्ये अचूक पकडले आहे. लोत्रेक ब्रशचा वापर पेन्सिल ड्रॉईंगसारखा फार प्रभावीपणे करायचा. त्याच्या या तंत्राची झलक या पोर्ट्रेटमध्ये दिसून येते.)



(कॉम्ते एदल तुलूझ लोत्रेक, तैलरंग – कॅनव्हास ९२x८० सेमी – १८८१
म्युझियम, आल्बी)

- ६ –

नीसमध्ये मुक्काम असताना एक चमत्कार घडला. त्या वेळी ती दोघे ग्रँड हॉटेल द सिमेझमध्ये राहत होती. एके दिवशी उठल्याबरोबर हेन्रीला काहीतरी वेगळेच वाटले. रोजच्यासारखी तापाची कडवट चव आज तोंडात नव्हती. त्याने श्वास घेतला. त्याला मिमोसाच्या फुलांचा ओळखीचा वास आला. बागेत मिमोसाला मोसमातला पहिला बहर आला होता. त्याने आनंदाने आईला हाक मारली.

“ममा, ममा. काल रात्री माझे पाय दुखले नाहीत. आतासुद्धा दुखत नाहीयेत. आणि बघितलेत का. मला आज ताप नाही आलाय.” त्याने एका दमात सगळे सांगून टाकले.

“ताप नाही आला. तुम्हाला कसं कळलं?” आईने कपाळाला हात लावून पाहिला.

तिने जेव्हा थर्मामीटर लावून पहिला तेव्हा तिला आपले आनंदाश्रू लपवता आले नाहीत. गेल्या दोन वर्षांत सकाळी ताप आला नाही असे पहिल्यांदाच घडत होते. त्या दिवशी संध्याकाळीसुद्धा ताप आला नाही. थोड्या दिवसांनी डॉक्टरांनी निश्चित स्वरूपाची सुधारणा होतेय हे मान्य केले. त्याची मोडलेली हाडेसुद्धा जुळून यायला लागली होती. निराशेच्या खोल गर्तेत पडलेल्या मायलेकरांना आशेचा किरण दिसतोय हे कबूल करायला भीती वाटत होती.

शेवटी तो सुदिन एकदाचा उगवला. हेन्रीच्या पायांचे प्लॅस्टर डॉक्टरांनी काढून टाकले. पायांची हाडे इतक्या ठिकाणी सांधली होती की त्यांची वाढ पहिल्यासारखी होणे कठीण होते. पण हेन्रीला कुबड्या घेऊन चालणे शक्य होणार होते. सुधारणा अशाच वेगाने चालू राहिली तर काय सांगावे. हेन्री कदाचित आपल्या पायांनी चालू शकणार होता. फक्त आधाराला एखादी काठी लागली असती इतकेच. हेन्री आता पौगंडावस्थेत प्रवेश करत होता आणि त्या वयाचा त्याच्या शरीरावर जादूई परिणाम व्हायला लागला होता.

डॉक्टर गेल्यावर त्या मायलेकरांनी एकमेकांच्या कुशीत तोंड लपवून मनसोक्त रडून घेतले.

दिवस भराभर उलटत होते. आई त्याला पुस्तक वाचून दाखवे. बिछान्यावर पट ठेवून ती दोघे चेकर्स खेळत. कधी कधी उशांची फेकाफेक. आजारपणात करपून गेलेल्या बालपणातल्या दिवसांची जणू भरपाईच चालू होती. कित्येक वेळा हसण्या-खिदळण्याला इतका ऊत येई की मायलेकरांचे ते खेळणे बघून नोकरचाकरांच्या डोळयांत आनंदाश्रू उभे राहत. जेवताना हेन्रीला कोंबडीचा एखादा तुकडा नाहीतर पावाची एखादी काप किंवा चमचाभर कस्टर्ड यांचा आग्रह व्हायचा. आईने त्याला चित्रकलेचे सर्व साहित्य नव्याने आणून दिले. हेन्रीला तर कानात वारे शिरलेल्या शिंगरासारखे झाले होते. आपल्याला पुन्हा चालता येईल, चित्रे काढता येतील या सर्वांपेक्षा त्याला आनंद व्हायचा तो आईला आनंदी बघून.

डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे त्याची आजारपणामुळे तीन-चार वर्षं खुंटलेली वाढ चालू झाली खरी, पण फक्त कंबरेच्या वरील शरीराची. छाती रुंदावली, खांदे भरले, पण पाय मात्र होते तसेच राहिले. किडकिडीत, लहानखुरे. त्याच्या चेहऱ्यावरील बाल्याचा नाजूकपणा एखाद्या मुखवट्यासारखा गळून पडला. आवाज फाटला. चाफेकळीसारख्या नाजूक नाकाचे रूपांतर फताड्या नाकात झाले. ओठ बाहेरच्या अंगाला वळल्याने बटबटीत दिसू लागले. डोळयांना जाड भिंगांचा चष्मा लागला. चेहऱ्यावर, हातांवर आणि छातीवर दाट काळेभोर केस उगवू लागले. वर्षभरातच हेन्री एखाद्या मोठ्या पुरुषासारखा बाप्या दिसू लागला. इतके दिवस थांबलेल्या निसर्गाने घाईघाईत शैशवातील एका कोवळया मुलाचे मोठ्या पुरुषात रूपांतर केले. पण त्या घाईत पौगंडावस्थेची पायरी गळून गेली होती.

अशा रीतीने थोड्याच दिवसात त्याच्या कंबरेच्या वरचे शरीर एका मोठ्या दांडग्या पुरुषासारखे दिसू लागले. पण कंबरेच्या खालचा भाग मात्र एखाद्या किडकिडीत लहान मुलाचा राहिला. त्याच्या शरीरात झपाट्याने होत असलेला हा विचित्र बदल पाहून त्याची आई घाबरून गेली. तिने डॉक्टरांना विचारले. त्यांनी कोणत्यातरी ग्रंथींच्या स्त्रावात काहीतरी बिघाड झाला असावा असे निदान केले. पण त्यावर काही इलाज नव्हता. हा नवा आघात, नवे सत्य तिला स्वीकारणे खूप कठीण गेले. अंथरुणाला खिळलेला एक पांगळा लहान मुलगा पत्करायची तिच्या मनाची तयारी होती. पण खाली लहानखुरे आखूड पाय आणि वर मात्र बटबटीत चेहऱ्याचे

बेंगरूळ शरीर असे विचित्र मूल स्वीकारायला तिचे मन तयार होईना. हाच का आपला लहानगा रिरी. तिने काउंटना पत्र लिहून बोलावून घेतले.

काउंटसाहेब जेव्हा हेन्रीच्या खोलीत शिरले तेव्हा त्यांनी त्याला ओळखलेच नाही.

“पपा,” पलंगावर पडलेल्या हेन्रीने हाक मारून त्यांचे लक्ष वेधले. “आता मला चालता यायला लागलं बरं का.” पांघरूण उडवून मोठ्या उत्साहाने तो पलंगावर उठून बसला. हा कोण अनोळखी इसम, दाढीदीक्षित, बुटबैंगण, खुरट्या पायांचा, खुजा, जाड भिंगांच्या चष्म्यामधून आपल्याकडे बघत हसतोय. हा आपला एकुलता एक मुलगा, तुलूझ लोत्रेकांच्या घराण्याचा वंशज. छे. शक्यच नाही. काउंट त्याच्या दिशेने दोन पावले सरकले. ते धेडगुजरे रूप पाहताना त्यांचा स्वतःच्या डोळयांवर विश्वास बसेना.

तोंडाने चुकचुक असा आवाज करत ते गरकन मागे वळले आणि ताडकन चालते झाले. पाठोपाठ आई धावत खोलीत आली.

“पपा असे अचानक निघून का गेले?” हेन्रीने आईला विचारले.

“तुला माहितेय ना त्यांना नेहमी किती काम असतं ते,” उशी सारखी करायचे नाटक करीत ती म्हणाली. ‘‘ते काम संपलं की लगेच परत येणारेत.’’

आई आपल्याला बनवतेय हे त्याच्या लक्षात आले. दुसऱ्या दिवशी आईने सांगितले की काउंटना एका महत्वाच्या कामासाठी पॅरीसवरून तातडीचा निरोप आला होता म्हणून त्यांना असे अचानक जावे लागले, तेव्हा तो मोठ्या समंजसपणे म्हणाला, “आपल्या पपांच्या मागे किती कामं असतात नाही.”

थोड्याच दिवसांत त्याला हॉटेलच्या परिसरात फिरण्याची परवानगी मिळाली. स्वच्छ ऊन पडले होते. बागेत पक्षी कुजन करीत होते. हेन्री कुबड्यांचा आधार घेत घेत बागेत फिरत होता आणि आई त्या दृश्याकडे टक लावून पाहत होती.

आई म्हणाली, “डॉक्टर म्हणतायेत की आपल्यालासुद्धा थोड्या दिवसांत घोडागाडीतून फिरायला हरकत नाही. पण त्याच्या आधी आपल्याला नवीन कपडे शिवायला हवेत.”

शिंप्याला मापे घ्यायला जाण्यापूर्वी सगळे नीट समजावून सांगितले होते. म्हणूनच तो अगदी ठरवून कोऱ्या चेहऱ्याने हेन्रीच्या खोलीत गेला. इतके असूनही हेन्रीला पाहिल्यावर तो क्षणभर दचकलाच. फक्त अगोदर पूर्वकल्पना दिली असल्याकारणाने त्याने स्वतःला सावरून घेतले आणि चेहरा असा काही मख्ख ठेवला की जणू काही हेन्रीला तो रोजच बघत होता.

कपडे शिवून आल्यानंतर ते दोघे रोज संध्याकाळी घोडागाडीतून फेरफटका मारायला बाहेर पडू लागले. हेन्रीला अगदी नव्याने जन्म झाल्यासारखे वाटत होते. त्याचा उत्साह उतू जात होता. योगायोगाने इंग्लंडची राणी व्हिक्टोरियासुद्धा त्याच हॉटेलात मुक्कामाला होती. मोठ्या लवाजम्यासह घोडागाडीतून तिचा संध्याकाळचा फेरफटका चालला होता. एकदा सहज त्यांची गाठ पडली असता त्यांनी हवापाण्यावर गप्पा मारल्या.

असे थोडे दिवस अगदी मजेत, आनंदात गेले. एके दिवशी रात्री झोपताना आई हेन्रीला म्हणाली, “रिरी, मों पेती, डॉक्टरांचं म्हणणं आहे की तुम्ही आता चांगले बरे झाला आहात. आता आपल्याला अगदी हवं तिकडे जाता येईल. तुम्हाला हवं असेल तर अगदी पॅरीसलासुद्धा जायला हरकत नाही.”

हेन्रीने आपल्या आईकडे पाहिले. ती अगदी पार गळून गेल्यासारखी वाटत होती. केसांची सोनेरी झळाळी गेल्याने ते कोरडे तपकिरी दिसत होते. सततच्या जागरणांमुळे तिच्या डोळयांखाली काळी वर्तुळे पडली होती. भोगलेल्या दुःखाच्या खुणा तिच्या चेहऱ्यावर उमटल्या होत्या. इतके दिवस महत्प्रयासाने दाबून ठेवलेल्या भावना अचानक अनावर झाल्या आणि तिला हुंदका आवरला नाही. तिने तोंड उशीत खुपसले. त्या रात्री खूप उशिरापर्यंत तिच्या शयनगृहातून हुंदक्यांचे दबके आवाज ऐकू येत होते.



(फोटो – तारूण्याच्या उंबरठ्यावरील हेन्री)




(प्रोमोनेद दी अँग्लीस, नीस – तुलूझ लोत्रेक, तैलरंग लाकडी पृष्ठभाग, लोत्रेक म्युझियम, आल्बी)

## मोंमार्त्र

“आय ॲम प्राउड ऑफ यू हेन्री.”

“खरंच ममा?”

“येस रिरी. मला वाटलं नव्हतं तुम्ही इतक्या लवकर ग्रॅज्युएट व्हाल म्हणून.” आई त्याचा हात धरून फायरप्लेसकडे नेत म्हणाली.

“म्हणूनच मी इतका जोरात अभ्यास करत होतो.”

पॅरीसला येताच हेन्रीने धडाक्याने अभ्यास करीत शाळेची शेवटच्या वर्षाची परीक्षा दिली. त्याचा आज निकाल लागला होता.

“पुढे मास्टर्स डिग्री करा. अभ्यासही होईल आणि वेळही चांगला जाईल.”

अभ्यासात गाडून घेतल्याने गेल्या दीड-दोन वर्षांचा काळ कसा भुर्कन उडून गेला ते हेन्रीला कळलेच नाही. वेळ जायला पुस्तके आणि अभ्यास हेच एक साधन होते हे खरेच. शाळेतल्या सगळया जुन्या सवंगड्यांच्या मैत्रीत एवढ्या वर्षांच्या खंडानंतर अंतर पडले होते. त्यातच मॉरीस पॅरीस सोडून गेला होता. त्याच्या प्रकृतीमुळे त्याला इकडेतिकडे हिंडणे शक्य नव्हते. आता चाकांच्या खुर्चीची तशी गरज भासत नव्हती. काठीच्या आधाराने चालायला जमत असे, पण ते अगदी जेवढ्यास तेवढे. याहून जास्त प्रगती करता येणे आपल्याला शक्य नाही, हे त्याला मनोमन उमगले होते.

“तुम्ही म्हणता ते खरं आहे, पण आता बस झाला अभ्यास. नुसती पुस्तकं वाचत बसायला कंटाळा येतो.”

“मग काही लेखन वगैरे तरी करून बघा.”

“बघू या. काय करायचं ते अजून मी काही नीट ठरवलं नाही.”

"हेन्री. तुम्ही तुमच्या प्रार्थना वगैरे नीट म्हणता की नाही."

थोडा वेळ निःशब्द शांतता पसरली. हेन्रीची जीवनावर आसक्ती होती, प्रेमासाठी तो आसुसलेला होता. त्याचे जीवन उमलू लागण्यापूर्वीच कोवळ्या वयात त्याच्यावर दुर्दैवाचा आघात झाला होता. ह्याचा पुढील आयुष्यात त्याच्यावर किती घोर परिणाम होणार आहे याची कल्पना त्याला अनुभवाचे टक्के-टोणपे खाल्ल्याशिवाय येणार नव्हती.

"नाही," हेन्री मान खाली घालून फायरप्लेसमधल्या विस्तवाकडे पाहत म्हणाला. "आपण नीसमध्ये असताना मी एकदा प्रार्थना केली होती ती शेवटची. त्या दिवशी तुम्हाला रडताना पाहिलं आणि देवावरचा माझा विश्वासच उडाला. देव असता तर निष्पाप लोकांच्या वाट्याला दुःख आलं नसतं आणि पापी लोक सुखात लोळताना दिसले नसते."

"ममा प्लीज मला समजून घ्या," मान वर करत तो म्हणाला. "ज्याच्यापाशी दया, क्षमा, शांती यांना स्थान नाही, अशा देवाची प्रार्थना करणं मला जमणार नाही."

तिने हेन्रीकडे मोठ्या करुणेने पाहिले. तो पांगळा, बुटका, कुरूप व एकाकी होता. त्याचे शैशव अजून संपले नव्हते. रंगीबेरंगी गुलाबी स्वप्ने पाहण्याच्या त्या वयात वास्तवाची कल्पना येणे कठीण होते. पुढचा प्रवास खडतर होता. देवावरच्या श्रद्धेलाच तडा गेल्याने एरवी प्रार्थनेच्या रूपाने जो दिलासा त्याला मिळाला असता तोसुद्धा आता त्याला मिळणार नव्हता.

"ठीक आहे," मोठा उसासा सोडीत आई निर्जीव आवाजात म्हणाली. "देव दयाळू असतो यावर विश्वास ठेवणं कठीण असतं हे खरंय, पण विश्वास न ठेवता जगणं त्याहून कठीण असतं हे लक्षात घे."

शेकोटीतल्या विस्तवाचा जाळ जास्त झाला होता. तिने आपली खुर्ची थोडी मागे ओढली आणि हेन्रीची खुर्ची मागे ओढायला म्हणून ती उठून त्याच्या खुर्चीमागे गेली.

"ममा. मी चित्रकार व्हायचं ठरवलंय."

"चित्रकार!" तिच्या तोंडातून आश्चर्योद्गार बाहेर पडला.

त्या काळी चित्रकार हा काही फारसा सन्माननीय पेशा समजला जात नसे. हाताच्या बोटावर मोजता येतील असे काही सन्माननीय अपवाद सोडले तर बहुतेक चित्रकारांची जीवनपद्धती खा-प्या, मौज करा अशी बोहेमियन शैलीची असे. शहराच्या बाहेर वसलेल्या मोंमार्त्रर्ं येथे ते राहत. नग्न स्त्रियांची पेंटिंग, विवाहबाह्य संबंध, दिवसभर दारू ढोसत कॅफेत बसून चकाट्या पिटणे अशा प्रच्छन्न आयुष्यक्रमामुळे कोणीही सभ्य प्रतिष्ठित मंडळी त्यांच्या वाटेस जात नसत. त्यांच्याशी कोणीही फारसे संबंध ठेवत नसे. त्या काळी लेखक, कवी, संगीतकार, नट व चित्रकार अशा कलाकार मंडळींची समाजातील उच्चभ्रू वर्गात गणना होत नसे. सभ्य नागर लोक या व्यवसायांपासून दोन हात दूरच राहत. एक वेळ एखाद्या दुकानदाराच्या मुलाने चित्रकार होण्याची इच्छा बाळगली असती तर ते चालले असते पण एका घरंदाज उमरावाच्या मुलाने, त्यात तुलूझ लोत्रेकांच्या एकुलत्या एका वंशजाने. छे. कदापि शक्य नाही.

"हेन्री, चित्रकार म्हणजे..."

"मला कल्पना आहे तुम्ही काय म्हणणार आहात त्याची," हेन्री तिला अडवत म्हणाला, "पण मी करू तरी काय? तुम्हाला माहितीय, मला चित्रकला बऱ्यापैकी जमते. त्यात माझं मनही रमतं. तुम्हाला आठवतंय, शॅतोमध्ये असताना मी काढलेली चित्रं व पोर्ट्रेट्स. आपण त्या मस्य प्रँस्तोंची शिकवणी ठेवू या. ते म्हातारेसे बहिरे-मुके चित्रकार. त्यांनी मला त्यांची वही दिली होती."

खिडकीतून शरद ऋतूतील काळयाभोर आकाशात चांदणे चमचमताना दिसत होते. नुसती शिकवणी ठेवल्याने फारसे काही बिघडत नाही. तिने मोठ्या कष्टाने परवानगी दिली.

(खालिल पोर्ट्रेट लोत्रेकने वयाच्या केवळ सतराव्या वर्षी केलेले आहे. त्याच्या वडिलांचा स्कॉट वेषातील एक फोटो उपलब्ध आहे. या पेंटींगसाठी कदाचित त्याने त्या फोटोचा आधार घेतला असावा. फोटोत डावीकडे बघत असलेल्या वडिलांचे उजवीकडे बघत शिकारीवर बघत शिकारीवर निघालेल्या घोडेस्वारात रूपांतर करताना लोत्रेकने विलक्षण कौशल्या दाखवलं आहे. पोर्टेट घोडेस्वाराचे असल्याने चित्रचौकट खूपच लांबट घ्यावी लागली आहे. घोडेस्वाराची दौड हळूवार फटकाऱ्यात अलगद पकडल्यामुळे चित्राला जिवंतपणा आला आहे. रेखाटनात अचूकता यावी म्हणून आर्टस्कूलमध्ये सुरवातीला मॉडेलवरून स्थिरचित्रणा करण्यावर भर दिला जातो. पण लोत्रेकने मात्र अगदी लहान वयातच निसर्गातील गतिमान दृष्यांची निवड करत असे. गडद छटांत केलेल्या झटपट रंगकामातून त्याच्यावरील सुरवातीचा दलाक्रवाचा प्रभाव दिसून येतो.)




(कॉम्ते अल्फान्सो द तुलूझ द फाल्कनर – हेन्री तुलूझ लोत्रेक – तैलरंग – लाकडी पृष्ठभाग २३.४x१४ से.मी., १८८१. तुलूझ लोत्रेक म्युझियम, आल्बी)

- ८ -

पहिल्या दिवसापासूनच त्या मूक-बधिर चित्रकाराचे आणि सतरा वर्षांच्या हेन्रीचे चांगले सूत जमले. एकमेकांच्या मनातले ओळखायला खाणाखुणांच्या भाषेची कधीच अडचण भासली नाही. प्रँस्तो काही स्वतः फारसा मोठ्या दर्जाचा चित्रकार

नव्हता. पण आपल्या विद्यार्थ्याला लाभलेली असामान्य प्रतिभेची देणगी त्याच्या लवकरच लक्षात आली आणि तो अचंबित झाला. चित्रकलेचे कोणतीही शिक्षण न घेतलेल्या या लहान मुलाला इंम्प्रेशनिझमसारख्या चित्रकलेतील नव्या प्रवाहाबद्दल काहीही माहिती असण्याची शक्यता नव्हती. तरीही त्याची चित्रशैली आणि इंप्रेशनीझम यात असलेलं साम्य लपून रहात नव्हते. सरळ जोरकस रेखाटन, रंगांची निवड, स्वतंत्र स्वयंभू शैली. छे. हे चलणार नाही. ही शैली ग्राहकांच्या पसंतीला उतरली नसती. चमकदार थेट रंगांपेक्षा गडद करड्या रंगात, नजाकतदार शैलीत, बारीकसारीक कलाकुसरीने नटलेल्या आणि रंग घोटून गुळगुळीत केलेल्या पेंटिंग्जवर लोकांच्या उड्या पडत. तो स्वतः तशीच चित्रे रंगवायचा. त्याच्या स्वतःच्या स्वार्थासाठी त्याला या मुलाची स्वतंत्र शैली दडपणे, त्यात सुधारणा करणे भाग होते. सुरुवात रंगांपासून. मुळात रंग फारसे वापरायचेच नाहीत. अगदी वापरलाच तर फक्त एकच रंग पॅलेटवर घ्यायचा. काळा.

एके दिवशी सकाळी चौखूर दौडणाऱ्या घोड्याचा प्लॅस्टरमधला पुतळा हेन्रीला आपल्या टेबलावर ठेवलेला आढळला. बाजूला भरपूर इन्ग्रेस पेपर व टोक केलेल्या चारकोल स्टिक्स. त्याने इझलवर कागद लावला व भराभर स्केच पुरे केले आणि मास्तरांना दाखविले. मास्तर चेहऱ्यावरची सुरकुतीसुद्धा न हलवता शांतपणे आपल्या जागेवरून उठले व घोड्याचा कोन काही अंशाने बदलला. आणखी एक स्केच. दुपारपर्यंत तब्बल सत्तावीस स्केचेस पूर्ण झाली. दुसऱ्या दिवशी नवा पुतळा व कोऱ्या कागदांचा नवा गठ्ठा. हेन्रीच्या मनात पोर्ट्रेट शिकायचे होते. पण इथे फक्त रोज घोड्यांची स्केचेस काढणे चालू होते. तो लवकरच कंटाळला. त्यात भर म्हणजे नुसते रेखाटन करायचे. रंगवायचे नाही. तरी तो नेटाने स्टुडिओत जाई. एके दिवशी सकाळी टेबलावर नवी रंगपेटी ठेवलेली होती. समोर इझलवर कोरा कॅनव्हास लावलेला होता. आज आपल्याला रंगवायला मिळणार या कल्पनेने तो अगदी हुरळून गेला. घाईघाईत त्याने ट्युबमधील रंग पॅलेटवर पिळायला सुरुवात केली. ते रंग पाहून त्याला थोडे विचित्र वाटू लागले. त्याला पिवळा रंग कुठे मिळेना. हिरवा, निळा आणि भडक लालसुद्धा.

“मस्य प्रँस्तो!” तो आश्चर्याने उद्‌गारला. त्याने भराभर ट्युबवरील रंगांची नावं वाचायला सुरुवात केली. टोबॅको ब्राउन, ममी ब्राउन, महॉगनी रेड, बर्न्ट अंबर, रॉ सायना, ऑकर, टेर व्हर्ट आणि ब्लॅक. आयव्हरी ब्लॅक, लॅम्प ब्लॅक, चारकोल ब्लॅक. एखादे कोळशाचे अख्खे इंजिन रंगवायला पुरून उरेल एवढा ब्लॅक.

“मस्य. नुसत्या ममी ब्राउन आणि लॅम्प ब्लॅकमध्ये कसे काय रंगवायचे हो. मला सगळे रंग हवे आहेत.” प्रँस्तो बहिरा आणि मुका आहे हे तो क्षणभर विसरूनच गेला.

थोड्या वेळाने एक कागदाचे चिटोरे त्याच्यासमोर आले.

‘ब्राइट कलर्स फसवे असतात. ते फार जपून वापरावे लागतात. रेब्रांद गडद रंगांमधूनच प्रकाश दाखवीत असे. आदर्श ठेवायचा तर त्याचा ठेव. उगाच त्या इंप्रेशनिस्ट लोकांच्या नादी लागू नका.’

‘पण मी काही रेम्ब्रांद नाहीय.’ हेन्री स्वतःशीच पुटपुटला. एक क्षणभर विचार करून चिठीच्या उलट्या बाजूवर त्याने लिहिले, ‘मला लोकांनी रेब्रांद म्हणून ओळखायला नकोय. त्याचा जमाना केव्हाच गेलाय.’

एक मोठा उसासा टाकून प्रँस्तो आपल्या इझलकडे गेला आणि इकडे हेन्रीने तोंड वाकडे करीत व्हॅन डाइक पॅलेटवर पिळला. कधी नव्हे ती रंगवायची संधी मिळतेय तर रंगवून घ्या. मग समोर ममी ब्राउन, व्हॅन डाइक, टेर व्हर्ट का असेनात. थोडासा पिवळा रंग जर वापरावासा वाटला तर अगोदर झालेले काम दाखवून प्रँस्तोकडून तोंड वेंगाडत मागून घ्यावा लागे. मग अगदी मिळालाच तर एखादा ठिपका क्रोम यलो मिळायचा.

‘पिवळा रंग हा एकदम खतरनाक आहे. त्याचा वापर खूप जपून करावा. ऑर्केस्ट्रामधल्या सिंबलसारखा.’ इति प्रँस्तोची चिठी.




(प्रँस्तोने कागदावर केलेले रेखाटन - काउंट आल्फान्सो, हेन्री, प्रँस्तो)

- ९ –

नाताळच्या थोडे आधी प्रँस्तो आजारी पडला. त्याने काउंटेसला तो पॅरीस सोडून जात असल्याचे कळविले. जाताना हेन्रीचे नाव पोर्ट्रेट पेंटिंग शिकवणाऱ्या प्रोफेसर बॉन्नासारख्या एखाद्या नामांकित चित्रकाराच्या अॅतलिएमध्ये घालण्याची शिफारस केली.

आईने घरीच कोणाची तरी शिकवणी ठेवण्याचा आग्रह धरला. पण हेन्री अॅतलिएमध्ये जायला खूप उत्सुक होता. तेथील वातावरण. झालेच तर कोणाशीतरी मैत्री. हेन्री अगदी काकुळतीला येऊन विनवत होता. त्याच्या आवाजातल्या आर्जवाने आईच्या डोळयांत पाणी तरारले.

“बरं. एकदा तुमच्या मनासारखं होऊ दे. पण अॅतलिएमध्ये सांभाळून वागा. तरुण मुलं आपापला एक गट करून असतात. टर्म केव्हाच सुरू झालेली आहे. मधेच

आलेल्या तुमच्यासारख्याला कोणी आपल्या गटात घेणार नाहीत. आणखी एक महत्वाची गोष्ट. तिथे येणारी मुलं अगदी खालच्या वर्गातली असतात. त्यांच्यात मिसळणं तुम्हाला शक्य होणार नाही. तुम्हाला कोणी समजून घेणारा भेटला तर ठीक. पण तशी शक्यता कमीच दिसतेय."

"मला कल्पना आहे, तुम्हांला कशाची काळजी वाटतेय ती." त्याचे गडद तपकिरी डोळे खिन्नतेने भरून आले. "मी करू तरी काय ममा? मी काही जन्मभर घरात लपून बसू शकत नाही."

बऱ्याच ऊहापोहानंतर हेन्री एकदाचा ॲतलिएमध्ये दाखल झाला. प्रोफेसर बॉन्ना हात पाठीमागे बांधून वर्गात येरझाऱ्या घालत होते. मधेच थांबून मुलांपुढील कॅनव्हासवर एक दृष्टिक्षेप टाकीत फिरत होते.

"पोर्ट्रेट पेंटिंग म्हणजे चित्रकलेतला सर्वोत्कृष्ट कलाप्रकार. फक्त आविष्काराच्या दृष्टीने नव्हे तर अर्थप्राप्तीचे एक साधन म्हणूनसुद्धा. पैसा काय तसा इतर कसलीही रंगरंगोटी करून कसाबसा मिळत असतो. पण पोर्ट्रेट पेंटिंग जर जमायला लागलं तर जरा सुस्थिर जीवन जगण्याची आशा धरायला हरकत नाही."

"एक यशस्वी पोर्ट्रेट पेंटर होण्यासाठी काही प्राथमिक नियमांचे ज्ञान असणं आवश्यक आहे. एखाद्या मोठ्या कर्तृत्ववान पुरुषाचं चित्रण कसं करायचं. उदाहरणार्थ, तुमचा चित्रविषय एखादा सरदार, सेनापती, उद्योगपती नाहीतर एखादा राजकारणी असेल तर त्याला ताठ उभा, कपाळावर किंचित आठी, हाताची दोन बोटं वेस्टकोटमध्ये असाच दाखवला पाहिजे. नेपोलियनचं पोर्ट्रेट डोळयांसमोर आणा. याच्या उलट तुम्ही जर एखाद्या विचारवंताचं पोर्ट्रेट करत असाल उदाहरणार्थ, शास्त्रज्ञ, लेखक, कार्डिनल वगैरे तर त्याला बसलेला दाखवा. उजवा हात हुनवटीवर. चेहऱ्यावर जगाच्या चिंतेचे भाव."

हेन्री एका कोपऱ्यातल्या स्टुलावर घाबरून अंग आक्रसून बसला होता. समोरच्या इझलवर थरथरत्या हाताने चित्र काढत होता. प्रोफेसरांनी आपले चित्र

पाहिले तर ते काय म्हणतील, आपण काढलेले चित्र त्यांच्या पसंतीला उतरेल की ते आपली नेहमीसारखी चेष्टा करतील या विचाराने तो खूप अस्वस्थ झाला होता.

“विषय कोणताही असला तरी तंत्र मात्र तेच. तुमच्या फिगरचे चार भाग करा. प्राथमिक रेखाटन करून घ्या. ठळक छाया प्रदेश रॉ अँबरने दाखवा. रॉ अँबर. मी काय म्हणतोय इकडे लक्ष आहे ना.” अचानक त्यांचा आवाज चढला, “त्या इंप्रेशनिस्ट आणि इंडिपेंडन्सच्या पोरांना काय हवा तो रंग वापरू दे. जांभळा नाहीतर निळासुद्धा. आपण तिकडे मुळीच लक्ष द्यायचं नाही. माझ्याकडे असले थेर मुळीच चालणार नाहीत. इथे फक्त रॉ अँबरच. दुसऱ्या रंगाला चुकूनही हात लागता कामा नये. काय समजलात.”

फिरत फिरत तो हेन्रीकडे येऊन पोहचला. त्याच्या कॅनव्हासकडे डोळे किलकिले करून त्याने एकवार पाहिले. सगळया वर्गात टाचणी पडली तरी ऐकू येईल एवढी शांतता पसरली.

“काय गिरमिटलंयत हे राजेसाहेब. हे पोर्ट्रेट पेंटिंग चाललंय का मस्करी. रंग आणि कॅनव्हासचा नुसता नाश चालवला आहात आपण.” त्यांच्या या बोलण्याने सर्व वर्गात हास्याची एक लाट उसळली. त्याने त्याला अधिकच चेव आला. “तुम्हाला कल्पना नसेल इथे येणाऱ्या कित्येक मुलांना रंग आणि कॅनव्हास विकत घेण्यासाठी एक वेळ उपास काढावा लागतो. पण उद्या पोटाची खळगी भरता यावी म्हणून आज ते पोटाला चिमटा घेत असतात. तुमचं काय. तुम्हाला कशाचीही ददात नाहीये. तुम्ही येथे कशाला येता आहात. स्वतःच्या या कारागिरीकडे बघून तुम्हाला वाटतं का की कधी काळी तरी आपण चित्रकार होऊ म्हणून. उगाच कशाला कॅनव्हास, रंग वगैरे फुकट घालवताय. त्यापेक्षा एखाद्या गुणी गरिबाला द्या. त्याला त्यातून काही करायला जमलंच तर त्याच्या दोन घासांची सोय केल्याबद्दल तो तुम्हाला आयुष्यभर दुवा देईल.”

“तुम्हाला किती वेळा मी समजावून सांगितलंय. तुमच्यात कोणतेही कलागुण नाहीयेत. अगदी नावालासुद्धा. आपण चित्रकार बनू शकू अशी फक्त ऊर्मी आहे तुमच्या

जवळ. अशा नुसत्या ऊर्मीचा काही उपयोग नसतो. त्यासाठी सौंदर्यदृष्टी असावी लागते. ती तुमच्याकडे औषधालासुद्धा नाही. तुम्हाला सगळीकडे दिसते ती फक्त कुरूपता. स्वतःवरून तुम्ही जगाची कल्पना करता. तुम्हाला चित्रकला येणे कालत्रयी शक्य नाही. आमच्यावर कृपा करा आणि आपल्या घरी स्वस्थ बसा. दुसरं काही काय वाट्टेल ते करा. पण कृपा करून चित्रकलेच्या वाटेला पुन्हा जाऊ नका. म्हणजे असले हे रंगांचे फरांटे बघण्याची पाळी आमच्यावर येणार नाही. मोठे उपकार होतील आमच्यावर."

प्रोफेसरांनी टाळी वाजवून हॉलच्या मध्यभागी बसलेल्या मॉडेलचे लक्ष वेधून घेतले आणि पाच मिनिटांची सुट्टी जाहीर केली. इतका वेळ पुतळ्याप्रमाणे स्तब्ध बसलेल्या मॉडेलमध्ये टाळीचा आवाज ऐकताच जीव आला आणि तिने चटकन बाजूला पडलेली जुनी मळकट चादर उचलून आपल्या नग्न देहाभोवती गुंडाळून घेतली. काडीने दात कोरत पेपर वाचत ती तेथेच बसून राहिली. सर्वांनी आपापले ब्रश पॅलेटवर ठेवून दिले. तरी हेन्रीचे पेंटिंग चालूच होते. त्याचे डोळे पाण्याने डबडबले होते. आठवड्यातून एकदा तरी त्याला अशी चेष्टा ऐकून घ्यावी लागे. आईचे म्हणणे बरोबर होते. वर्गातील इतर मुलांनी त्याला खड्यासारखा दूर ठेवला होता. त्यांच्या दृष्टीने तो एक श्रीमंत, खुशालचेंडू, आईचा लाडावलेला एकुलता एक लेक. वेळ घालवायला म्हणून अॅतलिएमध्ये नाव घातलेला. त्यात हेन्रीचे शारीरिक व्यंग. उपेक्षा आणि कुचेष्टा अशीच चालू राहिली तर आई म्हणत होती तशी सरळ मास्टर्स डिग्री करावी हे उत्तम.

- १० –

प्रोफेसर बॉन्नाच्या हेटाळणीमुळे हेन्रीचे डोळे अश्रूंनी डबडबले. डोळयात आलेले पाणी पुसण्यासाठी रुमाल काढणार तेवढ्यात आपल्यामागे कोणीतरी उभे आहे अशी चाहूल त्याला लागली. त्याने मागे वळून पाहिले. एक ताडमाड उंच तरुण त्याच्याकडे सहानुभूतीने बघत उभा होता. कपडे अगदी गबाळे आणि कुठे कुठे फाटलेलेसुद्धा होते. दाढी व केस अस्ताव्यस्त.

"त्या भडव्याकडे लक्ष देऊ नका. तुम्ही फी भरलीयत ना. मग कशाला एवढं ऐकून घेता त्यांचं. पुन्हा असं काही बोलायला लागले तर सरळ त्यांच्या तोंडावर

थुंका. काही झ्याटसुद्धा वाकडं करू शकणार नाही तुमचं. बाय द वे, माझं नाव हेन्री रॅंचो. आज दुपारी आपण जेवायला दोघं बरोबरच जाऊ. ओग्युस्तिनाच्या कॅफेमध्ये. नंतर तुम्हाला वेळ असेल तर माझा स्टुडिओ बघायला या. इथे जवळच आहे मोंमार्त्रमध्ये. जागा काही एवढी खास नाहीये. पण खिडकीतून समोरच्या स्मशानचं दृश्य काय छान दिसतं म्हणून सांगू."

हेन्री जेव्हा ओग्युस्तिनाच्या कॅफेमध्ये जाऊन पोहचला तेव्हा तिथला गोंगाट अगदी टिपेला जाऊन पोहचला होता. मोंमार्त्रमधील चित्रकार मंडळी काळया कॉर्दुरॉयच्या सुटात डोक्यावर भल्याथोरल्या हॅट घालून गप्पा मारत बसली होती. सगळा मिळून एवढा गोंधळ चालू होता की एकमेकांशी बोलताना जवळपास ओरडावेच लागत होते. वातावरण तंबाखूच्या धुराने व लसणीच्या वासाने भरले होते. टपोऱ्या पाणीदार डोळयांची एक कृष्णकेशी हसतमुख स्त्री त्या गर्दी-गोंधळातून हातातल्या प्लेट सावरीत, ऑर्डर घेत सराईतपणे इकडे तिकडे फिरत होती. या सगळया धावपळीत अधूनमधून तिची गिऱ्हाईकांशी चेष्टामस्करी अव्याहतपणे चालू होती. तिचे हसणे मोठे लाघवी होते.

"ती ओग्युस्तिना. ती पूर्वी मॉडेल म्हणून काम करीत असे." रॅंचो म्हणाला.

वयाच्या एकोणचाळिसाव्या वर्षातच ओग्युस्तिना मोंमार्त्रमधली एक आख्यायिका झाली होती. सोळाव्या वर्षी ती सिसिलीमधून पोटाची खळगी भरायला म्हणून पॅरीसमध्ये आली होती. अनवाणी, अंगावर मळक्या कपड्यांची लत्तरे, जवळ एक कवडीही नाही. पण तिच्याकडे होते बांधेसूद शरीर व मादक सौंदर्याचा खजिना. अवघ्या सहा महिन्यांत पॅरीसमधील सर्वांत लोकप्रिय मॉडेल अशी ख्याती तिने मिळवली. मोठमोठ्या व्यक्ति तिच्या नजरेच्या एका कटाक्षासाठी जीव टाकू लागल्या. तिच्या पुष्ट वक्षस्थळांचा उठाव आपल्या कॅनव्हासवर साकार करण्यासाठी चित्रकार ब्रश घेउन इझलसमोर तिची तासन्तास वाट बघत. तिच्या नितंबांची गोलाई समोरच्या पत्थरात बद्ध करण्यासाठी शिल्पकार आपल्या छिन्नीने नव्या जोमाने घाव घालू लागत. जवळपास दोन दशके सॅलॉंच्या वार्षिक प्रदर्शनातील बहुतेक पेंटिंग व शिल्प तिचा कमनीय देह समोर ठेवून साकारलेली असत. डायना, डेमॉक्रसी, स्पिरीट ऑफ मार्सेलीज्चे चौकाचौकांतील पुतळे तिच्या प्रमाणबद्ध बांध्याची आजही साक्ष

आहेत. तिने ज्या स्टुडिओत पोज दिल्या त्यातल्या काही ठिकाणी तिच्याबद्दल रोमँटिक कथा ऐकायला मिळत. नैराश्याने ग्रासलेल्या कलाकारांना तिने सहानुभूतीच्या शब्दांनी धीर दिला होता. कित्येक कलाकारांना त्यांच्या पडत्या काळात तिने आधार दिला होता. तीनएक वर्षांपूर्वी तिने हे कॅफे चालू केले तेव्हा बऱ्याच कलाकारांनी तिच्यासाठी काहीतरी करण्याची इच्छा दर्शवली. एवढे जण पुढे आले की सगळयांकडून घेणार तरी काय. शेवटी तिच्या मित्रांनी एका भिंतीवर चित्रे रंगविली व खाली आपल्या सह्या ठोकल्या. एकदोघांनी तर तिला आपली ताम्बुरीन भेट म्हणून दिली. ती तिने एका भिंतीवर लटकविली.

(मोंमार्त्रमधील ल ताम्बुरीन या नावाने प्रसिद्ध असलेल्या ह्या कॅफेच्या भिंतीवर लटकवलेली ताम्बुरीन पहायला पॅरीसला भेट देणारे पर्यटक आजही गर्दी करतात.)

हेन्री ओग्युस्तिनाकडे कुतूहलाने पाहत होता. ती गिऱ्हाईकांची मोठ्या आस्थेने विचारपूस करीत होती. मधेच एका दाढीवाल्या चित्रकाराच्या फिरक्या घ्यायची तिला लहर आली. त्याचे नुकतेच लग्न झालेले असावे. ती विचारत होती, “आता तुझं लग्न झालंय. तुझी आवडती रिसोते खायचं आता बंद कर. त्यात लसूण जास्त असते. बायको रात्री जवळ यायला देणार नाही. त्यापेक्षा ही पेपरोनी एकदा खाऊन बघ. तुझ्यासारख्या नवीन लग्न झालेल्यांसाठी खास बनवलीय. अंगात रक्त असे काही सळसळू लागेल की मग बघच बायको कशी खूश होईल ते.”

“ओऽह, बाम्बीनी.” तिने रॅंचोकडे लक्ष जाताच त्याला हाक मारली. तिच्या गिऱ्हाईकांमधल्या सर्व विद्यार्थ्यांना ती नेहमी लाडाने बाम्बीनी म्हणून हाक मारायची. मग तो वयाने किंवा देहाने केवढा का मोठा असेना.

“तुला जे काही योग्य वाटेल ते आण. आम्हाला काहीही चालेल.” जेवण चालू असताना रॅंचो गप्प होता. पण हेन्री मात्र खूप उत्तेजित झाला होता. ती जागा, तिथली गर्दी, तो गोंगाट, ओग्युस्तिना, ते जेवण, सगळयांवर तो अगदी बेहद्द खूश होता. त्याचे कौतुक भरले डोळे इकडे तिकडे भिरभिरत होते. कोपऱ्यातल्या एका टेबलावर बसलेला एक वयस्कर माणूस एका तरुणाशी तावातावाने काहीतरी बोलत होता.

“ते लांब पांढरी दाढीवाले गृहस्थ पाहिलेत का. त्यांचे नाव कमील पिस्सारो. ते इंप्रेशनिस्ट आहेत. आणि त्यांच्यासमोर जे बसलेयत त्याचं नाव आहे तेओ व्हॅन गॉग. बुलेव्हार मोंमार्त्रवरील एका कलावस्तू विकण्याच्या दुकानात ते काम करतात.”

हेन्रीच्या पुढ्यातली प्लेट अजून तशीच भरलेली आहे हे लक्षात येताच रॅंचो म्हणाला, “काय विचार कसला चाललाय. तुम्हाला रिसोते आवडो वा न आवडो ते संपवल्याशिवाय ती ओग्युस्तिना काही तुम्हाला येथून बाहेर जाऊ देणार नाही.”

जेवण झाल्यावर ते दोघे रमतगमत रॅंचोच्या स्टुडिओवर गेले. रॅंचोने स्टुडिओत आल्याबरोबर खिडकी उघडली. समोरच स्मशानाचे दृश्य होते. जिकडे तिकडे क्रॉस, थडगी, अश्रूपात करीत विलाप करणाऱ्या देवदूतांचे पुतळे, अस्ताव्यस्त वाढलेली झाडे वगैरे गोष्टींची गच्च गर्दी होती.

“काय सुंदर दृश्य आहे नाही. तुम्हाला एक गंमत सांगतो. स्त्रियांवर या दृश्याचा अगदी विलक्षण परिणाम होतो. आधी जाम टरकतात पण नंतर अशा काही उत्तेजित होतात म्हणून सांगू. तुमचा विश्वास बसणार नाही. तो कोच पाहिलात. तिथे मुद्दामच ठेवलाय. तिथून खिडकीतलं दृश्य छान दिसतं. आलेल्या पोरीला घेऊन सरळ कोचावर बसायचं. समोरचं स्मशानाचं दृश्य दाखवलं की टरकून कुशीत शिरलीच म्हणून समजा. जरा थोपटल्यासारखं केलं की तिची मिठी अधिकच घट्ट होते. मग कोचावर आडवं व्हायला कितीसा वेळ.”

बोलता बोलता त्याने भिंतीवर लटकावलेले मेंडोलीन काढले व त्या काळी मोंमार्त्रमध्ये लोकप्रिय असलेले बॅलड गायला सुरुवात केली.

*‘आह, क त्यु फे बीयाँ लामोर* ... आह, दॅट यू डू गुड लव्ह.’

(व्हॅन गॉगची आणि ऑग्युस्तिनाची खास मैत्री होती. जेवणाचे बिल देण्यासाठी कित्येक वेळा व्हॅन गॉगच्या खिशात पैसे नसत. तेव्हा तो त्याच्या बदल्यात आपले

एखादे पेंटींग देत असे. ऑग्युस्तिना ती पेंटींग मोठ्आ अभिमानाने आपल्या कॅफेमध्ये टांगून ठेवी. दुर्दैवाने तिच्या कॅपेचे दिवाळे वाजल्यावर देणेकरी ती सर्व पेंटींग घेऊन गेली. खालिल पेंटींगमध्ये ऑग्युस्तिना बीअर पित बसलेली दाखवला आहे. तिचा हा दुसरा ग्लास आहे हे खाली ठेवलेल्या दोन बशांवरून दिसून येते. या पेंटींगवर इंप्रेशनिस्ट शैलीचा प्रभाव दिसून येतो.)



(ऑग्युस्तिना सिटींग इन कॅफे तांबोरीन – व्हॅन गॉग – तैलरंग, कॅनव्हास, ५५.५x४६.५ सेमी. १८८७, व्हॅन गॉग म्युझियम, अमेस्टरडॅम)

## - ११ –

दुपारचे जेवण रॅंचोबरोबर घेणे हा हेन्रीचा नित्याचा कार्यक्रम झाला. नंतर संध्याकाळी रॅंचोच्या स्टुडिओवर कधी पेंटिंग करा नाहीतर कधी मेंडोलीनवर रॅंचोच्या साथीने गाणी गा. कित्येक वेळा खिडकीतून अंत्यविधी बघण्यात वेळ जाई. अंत्यविधीचे साहाय्यक, शववाहिनीचे ड्रायव्हर्स, कबरी खणणारे स्मशानातले कामगार वगैरे मंडळी कधीतरी स्टुडिओत येऊन पोर्ट्रेटसाठी पोज देत. मग त्यांच्या बरोबरीने गप्पा करत मद्यपान करण्यात वेळ कसा छान निघून जाई ते कळतच नसे.

“हेन्री” एके दिवशी रॅंचो त्याला मोठ्या गांभीर्याने म्हणाला, “मी गेल्या कित्येक दिवसांपासून बघतोय. तुमच्यामध्ये कसलंही वैगुण्य नाहीय. असलंच तर ते फक्त तुमचं मन. ते तेवढं अगदी लहान मुलासारखं आहे. निरागस. त्यामुळे काय होतं की कोणाशी काय बोलावं, कसं वागावं ते तुम्हाला कळतच नाही. तुमची चित्रकला तर अगदी उत्तम आहे. मग कशाला तुम्ही एवढं मनाला लावून घेता. त्या बॉन्नाला काय बकबक करायची ती करू दे.”

रॅंचोच्या बोलण्याने हेन्रीच्या मनावरील सावट थोडे दूर झाले. कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने तो म्हणाला, “थँक्यू. तुमच्यासारखा मित्र मला मिळालाय म्हणून माझा...”

“शट अप,” सहा फुटी अगडबंब देहातून तोफेसारखी गर्जना झाली. आपल्या भावनांचे नाजूकपणे प्रदर्शन करणाऱ्यांची बंडखोर तरुणांच्या गटात नेहमी टिंगल केली जाई. त्यांच्या मैत्रीची भाषा रांगडी असायची. “तुझं काम मोठं कठीण दिसतंय.” रॅंचो मुद्दाम एकेरीवर येत म्हणाला.

रॅंचोच्या ओरडण्याने हेन्री अगदी केविलवाणा दिसू लागला. त्याकडे दुर्लक्ष करून रॅंचो पुढे म्हणाला, “तू अगदी सभ्य आहेस. तुझं मन स्फटिकासारखं निर्मळ आहे. पण त्यामुळेच तू एकदम शामळू झाला आहेस. तुझी हाताची नखंसुद्धा बघ किती स्वच्छ आहेत ती. अरे कलाकाराचे हात आपले. थोडासा मळ, थोडासा रंग अडकलेला

असला नखात म्हणून काही बिघडत नाही. तुझं बोलणंसुद्धा किती मिळमिळीत आहे. तुझ्यापेक्षा त्या ओग्युस्तिनाची भाषा जास्त तिखट असेल. उठता बसता सारखं मी तुझ्या तोंडावर थुंकेन अशी आव्हानात्मक भाषा बोलण्यात आली पाहिजे तरच तुझा येथे निभाव लागेल. नाही तर तुझ्या या सभ्यपणाला लोक बावळटपणा समजतील."

पॅरीसमधल्या तरुण कलाविद्यार्थ्यांचे जग, त्यांचे वागणे, बोलणे, वगैरे बारीकसारीक गोष्टींची माहिती रॅंचोने हेन्रीला समजावून सांगितली. मोंमार्त्रच्या कलाविश्वात हेन्रीचा शिरकाव विनासायास व्हावा म्हणून रॅंचो त्याची पद्धतशीर तयारी करून घ्यायच्या मागे लागला.

"समज बोलता बोलता कोणी सहज रूबेन्सचा विषय काढला आणि म्हणायला लागला की रूबेन्स हा जगातला महान चित्रकार आहे तर यावर तू काय म्हणशील?"

"असते एकेकाची आवड. मी काय बोलणार त्यावर."

"वादात असं गुळमुळीत बोलून चालत नसतं. आपलं मत कसं जोरकसपणे मांडायचं असतं. *नॉम द दियू*. देवाच्यान. *मेर द लोर*. ओह शिट. मी तुझ्या तोंडावर थुंकतो. हे शब्द वारंवार आपल्या बोलण्यात आले पाहिजेत. कोण तो. रूबेन्स गेला तेल लावत. त्याचे कॅनव्हास मी गांड पुसायला वापरतो. असं काहीतरी बोललास तरच लोकांचं तुझ्याकडे थोडंतरी लक्ष जाईल."

प्लास पिगालवरील ला नुव्हेल हे कॅफे मोंमार्त्रमधील नवचित्रकारांचा गप्पा मारायचा एक अड्डा होता. तिथे नेहमी येणाऱ्या कलाविद्यार्थ्यांच्या एका गटाशी ओळख करून द्यायला म्हणून रॅंचो एक दिवस हेन्रीला घेऊन ला नुव्हेलमध्ये गेला. रॅंचोच्या या श्रीमंत, गुलहौशी मित्राला भेटण्यासाठी त्याचे मोंमार्त्रमधील मित्र अगोदरपासून तेथे हजर होते. फ्रँक्वा गोझी, लुई अँक्तां व रेने ग्रॅनीए.

हेन्रीचे त्यांनी अगदी थंडे स्वागत केले. बऱ्याच जणांनी त्याच्याकडे पाहिल्या न पाहिल्यासारखे करून आपल्या गप्पा पुढे चालू ठेवल्या. हेन्री बिचारा मुकाट्याने सावकाश बीअरचे घुटके घेत बसला. हेन्री एक चांगला श्रोता होता. विद्यार्थ्यांचे

बोलण्याचे विषय, त्यांना पडलेले प्रश्न बहुधा आर्थिक असत. त्यांचे प्रश्न सहानभूतीपूर्वक ऐकणारा एक श्रोता त्यांना हेन्रीच्या रूपाने लाभला. हेन्रीच्या या गुणामुळे त्यांची हेन्रीविषयीची अढी पहिल्याच बैठकीत नाहीशी झाली. त्याहून महत्वाचे म्हणजे अडल्या-नडल्या गरजेला हेन्रीकडे पैसे उसने मागायची एक हक्काची सोय झाली. पण थोड्याच दिवसांत आर्थिक संबंधांच्या पलीकडे जाऊन त्यांच्यात जिव्हाळा निर्माण झाला. हेन्रीला त्याच्या एकाकी शुष्क आयुष्यात मैत्रीचा ओलावा मिळाला.

प्रत्येक जण आपले सुखदुःख हेन्रीजवळ व्यक्त करत असे. गोझीने आपण नवी मैत्रीण कशी पटवली त्याची गोष्ट मोठ्या मिटक्या मारत सांगितली. तर लुई अँक्तांने आपण कशी गमावली त्याची. लुई अँक्तां दिसायला तसा देखणा होता. सुंदर स्त्रिया त्याच्याकडे चटकन आकर्षित होत. पण त्यांचा मूर्खपणा व अज्ञान त्याला सहन होत नसे. आपल्या नव्या मैत्रिणीचे अज्ञान दूर करण्याचा तो त्याच्यापराने प्रामाणिक प्रयत्न करे. आणि तिथेच त्याचा घात होई. जिथे गप्प बसायला हवे तिथे तो आपले ज्ञान पाजळायला जाई. चित्रकलेतील नव्या प्रवाहांविषयीच्या बौध्दिक बडबडीने तो आपल्या मैत्रिणींना वात आणी. एकदा तो त्याच्या मैत्रिणीला घेऊन लुव्हरला गेला. प्रत्येक पेंटिंगसमोर उभे राहून कलास्वाद कसा घ्यावा ते समजावून सांगत असताना फ्लेमिश पेंटिंगच्या दालनातून त्याची मैत्रीण जी गायब झाली ती त्याला नंतर संपूर्ण पॅरीस शोधूनही सापडली नाही.

ॲतलियेमधल्या चित्रकलावर्गाच्या शेवटच्या दिवशी त्या सगळयांनी एकच धमाल उडवून दिली. वर्गातून हसत-खेळत, जोरजोरात आरडाओरडा करत ते बाहेर पडले. प्लेस व्हिशी येथे आल्यावर गॉझी एका दिव्याच्या खांबावर चढला व जाणाऱ्या-येणाऱ्या प्रत्येक स्त्रीकडे बघून उडते चुंबन देऊ लागला. अँक्तांने हार्मोनिका वाजवायला सुरुवात केली. त्या तालावर रॅचोने दोन्ही हात एकात एक गुंफून डोक्याच्या मागे घेत ढुंगण हलवत डान्स द व्हेन्त्रे इतका अप्रतिम केला की त्यांच्याभोवती एकच गर्दी जमली. तेवढ्यात पोलीस आले. त्यांनी त्या टोळक्यावर अश्लील हावभाव करून नृत्य करणे आणि गर्दी जमवून रहदारीला अडथळा आणणे असे दोन आरोप ठेवले. पण नशिबाने वाईनच्या एकेका ग्लासवरच निभावले. दुपारी

ओग्युस्तिनाच्या कॅफेमध्ये चालू झालेला जल्लोष पहाटे ला नुवेलच्या गल्ल्यावर बसलेल्या खडूस कॅशियर मुलीचा मुका घेऊन संपला.



(फोटो- मोंमार्त्र मधील मित्रांसोबत – डावीकडून उजवीकडे रेने ग्रॅनीअर, हेन्री रॅंचो, लुई आँक्ताँ, लीली ग्रॅनीअर आणि हेन्री तुलूझ लोत्रेक)

- १२ –

ऑक्टोबरमध्ये हेन्रीने प्रोफेसर कोर्मोनच्या वर्गात नाव घातले. हे हेन्रीचे कलाशिक्षणाचे दुसरे वर्ष होते. दररोज सकाळी तो आपल्या आईच्या घरातून मोंमार्त्रमध्ये जाण्यासाठी घोडागाडीतून निघायचा. पण ॲतलिएच्या वाटेवर थोडे अलीकडेच उतरायचा. आपली गाडी, गणवेशधारी गाडीवान कोणाच्या नजरेला पडू नये म्हणून ही काळजी. ठीक नऊ वाजता वर्गात शिरल्याबरोबर सर्वजण आपापल्या इझलकडे जाऊन कामाला सुरुवात करीत. व्हीनस, डायना, लेडा किंवा त्या आठवड्याची जी देवता असे तिच्या पुतळयावरून काम चालू होई. कित्येक वेळा प्रत्यक्ष मॉडेल असायची. मुले वर्गात येऊ लागली की मॉडेलची बाई एक एक करून सर्व कपडे उतरवायला सुरुवात करी. मॉडेलचा हळूहळू अनावृत्त होणारा देह बघून नव्याने आलेली मुले सुरुवातीला थोडी उत्तेजित व्हायची. पण एकदा का ती संपूर्ण नग्न होऊन आपल्या स्टुलावर जाऊन बसली की लगेच मुले डोळे बारीक करून, अंगठ्याने, पेन्सिलने माप घेत समोरचा कॅनव्हास पुरा करायच्या मागे लागत.

आठवड्यातून एकदा प्रोफेसर महाशय येत. ते बऱ्याच देशी-परदेशी अकादमी व म्युझियमच्या सल्लागार मंडळांवरचे सन्माननीय सदस्य होते. त्यांच्याकडे नेहमी बरेच काम असे. बँका, नगरपालिका, चर्च वगैरेंसाठी म्युरल, समाजातल्या बड्या धेंडांची पोर्ट्रेटस् वगैरे. थोडक्यात ते एक प्रथितयश चित्रकार होते. पण वर्गातल्या मुलांच्या दृष्टीने सर्वांत महत्वाची बाब म्हणजे सॅलाँच्या निवड समितीवरचे ते एक ज्युरी होते. वर्गात ते दोन-तीन फेऱ्या मारत. प्रत्येकाच्या इझलकडे जाऊन पाचएक मिनिट डोळे किलकिले करून बघत. मग आपल्या नागरी, अतिशय हळुवार आवाजात सौम्यपणे पण किंचित आढ्यतेने काही सूचना करत. ब्रशने एक-दोन फटकारे मारून दाखवीत. प्रोफेसरांच्या अशा या फेऱ्यांमधून हेन्रीला लवकरच मोठा बोध झाला तो असा की सुंदर गोष्टींची सुंदर सुंदर चित्र काढणे हीच कलेतील सर्वात महत्वाची बाब आहे. रंगकाम अगदी हलक्या हाताने ब्रशने घोटून घोटून गुळगुळीत केले पाहिजे. चित्ररचना त्रिकोणात्मकच असली पाहिजे.

"पोर्ट्रेट, मेझ अमिस, माझ्या मित्रांने, खास करून स्त्रियांचं पोर्ट्रेट म्हणजे," प्रोफेसर कोर्मोन म्हणाले, "चित्रकलेचा सर्वोच्च आविष्कार. त्यासाठी केवढं कौशल्य, केवढी मेहनत लागते याची कल्पना नसेल तुम्हाला. बरं नुसत्या कौशल्य आणि मेहनतीच्या जोरावर एक वेळ दुसऱ्या कोणाचं पोर्ट्रेट जमेल पण स्त्रीचं. शक्यच नाही. कोणत्याही स्त्रीचं पोर्ट्रेट करायला कौशल्य आणि मेहनतीच्या जोडीला अंतःदृष्टीची आवश्यकता असते. आता असं पहा. पोर्ट्रेट करून घ्यायला आलेल्या स्त्रिया बहुधा प्रौढत्वाकडे झुकलेल्या असतात. कारण तेवढी ऐपत येईपर्यंत तारुण्य ओसरू लागलेलं असतं. या वयात साधारणतः आपण आहोत त्यापेक्षा जास्त सुंदर विशेषतः तरुण दिसावं अशी अपेक्षा असते. आपल्या सध्याच्या वयापेक्षा दहा पंधरा वर्षांनी लहान. यामुळे चित्रकाराला पोर्ट्रेट काढायला म्हणून आपल्याकडे आलेल्या स्त्रीच्या स्वत:च्या सौंदर्याबद्दल नक्की काय कल्पना आहेत हे प्रथम जाणून घेतलं पाहिजे."


"एकदा हे नक्की केलं की मग कुठे नाक थोडं सरळ करा, चेहऱ्यावर थोडा गुलाबी रंग फासा, डोळे थोडे मोठे करा, कांतीचा रंग अगदी घासूनपुसून नितळ गुळगुळीत करा. मान थोडीशी लांब, खांदे गोल, हात नाजूक करा. या वयात स्त्रिया थोड्या सुटायला लागलेल्या असतात. स्केच करतानाच जरा काळजी घेतली की झालं. स्तनांची उभारी थोडी वाढवायची तर कटिप्रदेश थोडा कृश करायचा. चेहऱ्यावरची एकही सुरकुती, एखादा डाग, चामखीळ तर चुकूनही चित्रात दिसता कामा नये. छबी रंगवण्यापेक्षा जास्त मेहनत घ्यायची ती कपडे व दागदागिने रंगवताना. अंगठी, ब्रेसलेट, ब्रूच वगैरे हिरेजडित दागिन्यांवर जेवढं जास्त लक्ष पुरवावं तेवढं कमीच. मग पाहा तुमचा चित्रविषय कसा खूश होईल तो. स्त्रियांची स्तुती करायला मुळीच मागे-पुढे बघू नका. मग पाहातच रहा पैशांचा कसा वर्षाव होतो ते तुमच्यावर. मानसन्मानांचे ते काय. ते तर पैश्यापाठोपाठ चालत येतातच."

कोणी थोडे जरी वेगळ्या पद्धतीने काम करायला सुरुवात केली किंवा कोणाच्या कामात तिळमात्र जरी स्वतंत्र बाणा दिसू कागला तर लगेच प्रोफेसरांचे इतका वेळचे सौजन्य, संयम संपून त्यांचे खरे रूप दिसू लागे.

“तुमच्या अशा कामाने कलेचा उपमर्द होतोय, हे तुमच्या लक्षात येत नाहीसं दिसतंय. तुमची चित्रं अजून सॅलाँमध्ये लागायचीयत. निवड समितीवर कोण कोण आहेत ठाऊक आहे ना.”

हेन्रीचे निसर्गदत्त कलागुण कलेच्या दृष्टीने नुसते कुचकामीच नव्हेत तर घातकही आहेत. ही प्रवृत्ती वेळीच निपटून टाकली तरच तुमची प्रगती होईल हे पुन्हा एकदा हेन्रीला बजावून सांगण्यात आले. बिचारा मुकाट्याने आपल्या प्रायमरी शॅडोज् रॉ अंबरने रंगवायचा, ब्रशचा फटकारा दिसू नये म्हणून घोटून घोटून गुळगुळीत करायचा. इतका की एक-दोनदा खुद्द कोर्मोनने त्याची पाठ थोपटली.

“हे पाहा. निसर्गदत्त गुणवत्ता काय सगळ्यांनाच लाभते असं नाही. पण त्याची भरपाई चिकाटीने करता येते. ती तुमच्यात भरपूर आहे. माझ्या सूचनाबरहुकूम काम करत राहिलात तर एक दिवस तुम्हाला पेंटिंग बऱ्यापैकी जमू लागेलही. अंगी गुणवत्ता नाही म्हणून असे निराश होऊ नका. लक्षात ठेवा. अशीच ढोर मेहनत करत राहिलात तर एखाद्या दिवशी त्या परमेश्वराला तुमची दया येईल आणि कोणी सांगावं कदाचित तुमचं एखादं चित्र सॅलाँच्या वार्षिक प्रदर्शनासाठी निवडलंही जाईल.” कोर्मोनच्या अशा शब्दांनी हेन्रीला धन्यता वाटे आणि धीर येई.



(फोटो - प्रोफेसर कोर्मोनच्या स्टुडियोत हेन्री तुलूझ लोत्रेक)

- १३ –

कोर्मोनचा वर्ग संपल्यावर हेन्री आपल्या मित्रांच्या टोळक्याबरोबर ओग्युस्तिनामध्ये जाऊन बसे. तिकडच्या सर्व गडबड-गोंधळामध्येच त्या सर्वांचे तावातावाने वादविवाद चालत. कलेचा इतिहास, प्रगती, कलाविक्रेत्यांची व समीक्षकांची बदमाषी, त्यांचे साटेलोटे वगैरे वगैरे. त्या वेळी नव्या विचारांच्या काही तरुण मंडळींनी आपली एक संघटना नुकतीच स्थापन केली होती. सोसायटी द आर्टिस्ट्स इंडिपेंडंट्न्स. त्यांचे बरेच सभासद तेथे गप्पा मारायला येत. बाकी कितीही मतभेद असले तरी अकादमीच्या सभासदांना शिव्या देण्यात त्यांचे एकमत होई. तिथे हेन्री आणि त्याच्या मित्रांची काही समविचारी चित्रकारांशी ओळख झाली. गोबऱ्या

गालांचा, दांडगट शरीरयष्टीचा पॉइंट्यालिस्ट जॉर्ज सुरा हा त्यापैकी एक. बहुतेक वेळा तो ओग्युस्तिनामध्ये पाइप ओढत, कॉफी पीत कुठेतरी तंद्री लावून बसलेला असे. खूपशी न्युड पेंटिंग आपल्या खात्यात जमा असलेला रेन्वा. श्रीमंत जमीनदार घराण्यात जन्मलेला एदुआर माने. कधी कधी पोल सेझान.

एकदा हेन्रीच्या टोळक्याला ओग्युस्तिनासह कमील पिस्सारोने आपल्या घरी जेवायला बोलाविले. तेथे त्याची ओळख त्यावेळी प्रख्यात झालेल्या एदगर देगासशी झाली.

तुम्ही सगळे चित्रकलेचे विद्यार्थी आहात तर. भावी चित्रकार. आपल्या प्रतिभेच्या आविष्काराने सगळया जगाचे डोळे दिपवण्याची अगदी घाई झालेली दिसतेय तुम्हाला." बॅले गर्ल या सुप्रसिद्ध पेंटिंगचा चित्रकार काहीशा कुचेष्टेने म्हणाला. पण त्याच्या बोलण्यातील वक्रोक्ती हेन्रीच्या लक्षात आली नाही. देगाससारख्या दैवताबरोबर कॉफी प्यायला मिळतेय यानेच तो भारावून गेला होता.

"तुमच्या चित्रकलेकडून काय अपेक्षा आहेत? प्रसिद्धी, पैसा, मानमरातब की तुम्हाला कलेच्या इतिहासात आपला वेगळा ठसा उमटवायचा आहे? या दोन्ही अपेक्षा असण्यात काहीच गैर नाही. पैसा मिळवण्याचे अनेक मार्ग आहेत. पण आपला वेगळा ठसा उमटवण्याचं तुम्ही ठरवलं असेल तर एक लक्षात ठेवा. जगाच्या इतिहासात आजतागायत महान म्हणता येतील असे फक्त साठ चित्रकार होऊन गेलेयत. त्यातले पाच या शतकात. जेरीकोल, दॉमिए, माने, इन्ग्रेस आणि दलाक्रवा. या शतकाचा कोटा केव्हाच संपलाय. आता तुमच्यापैकी कोणालाही इतिहासात अमर होण्याची शक्यता मुळीच राहिलेली नाही. आता राहिला पैसा. त्यासाठी तुम्ही चित्रकार व्हायचं ठरवलं असेल तर हा पेशा अगदी बेभरवशाचा आहे हे विसरू नका." देगास म्हणाला.

"एडगर प्लीज्." पिस्सारो त्याला मधेच अडवीत म्हणाला, "असं बोलून या पोरांना तुम्ही नाउमेद करू नका."

“माझा नाइलाज आहे. पण सत्य परिस्थिती कोणीतरी सांगायलाच हवी. ते कटू काम मी वेळीच करतोय. याबद्दल ही तरुण मंडळी आयुष्यभर माझी आठवण काढतील.” देगास परत विद्यार्थ्यांकडे वळून म्हणाला, “हे पाहा चित्रकारांची परिस्थिती फार वाईट आहे. सबंध पॅरीसमध्ये शोधून शोधून फार तर पन्नास जण असे निघतील की ज्यांचं पोट चित्रकलेवर भरत असेल. उरलेल्या सर्वांना दोन वेळचे फाके पडत असतात. आज जे घरं रंगवणारे रंगारी आहेत ना त्यातला प्रत्येक जण एके काळी उगवता चित्रकार समजला जायचा.”

ओग्युस्तिनाने त्याला पाठीमागून हळूच हाक मारली. “सिन्योर देगास-”

“आता काय पाहिजे तुला?’’ मधेच व्यत्यय आल्याने देगासने वसकन ओरडून विचारले.

“तुम्हाला एक मॉडेल हवीय का. एकदम नवी कोरी. माझी एक चुलत बहीण नुकतीच पालेर्मावरून आलीय. दिसायला अगदी चिकनी आहे बरं का.”

“दिसायला कशी का असेना. माझी काही हरकत नाही. प्रॉटेस्टंट आहे का.”

“आता पालेर्मामध्ये तुम्हाला कोण प्रॉटेस्टंट मिळणार आहेत. आमच्या तिकडचे झाडून सगळे श्रद्धावान कॅथलिक असतात.”

“तिचे उरोज कसे आहेत. ते जर चांगले असतील तर मग श्रद्धावान कॅथलिक असली तरी चालेल.”

“आता उरोजांचं ते काय. आहेत चारचौघींसारखे. छान, गोल, भरलेले.”

“तसं नसतं. प्रत्येक स्त्रीच्या उरोजांचा आकार वेगवेगळा आणि वैशिष्ट्यपूर्ण असतो. तुझ्या बहिणीचे उरोज जर सफरचंदासारखे गोल गरगरीत असतील तर मला

मुळीच चालणार नाही. पण पेरसारखे टोकदार असतील तर उद्या लगेच पाठवून दे स्टुडिओवर. आणि आता फूट इथून. या तरुण मुलांना चार गोष्टी सांगायच्यायत मला."

हेन्री व त्याच्या साथीदारांकडे वळून देगास म्हणाला, "तर मी काय सांगत होतो ते लक्षात घ्या. या चित्रकार बनण्याच्या नादाने तुम्ही फुकट उपाशी मराल. फाटके बूट घालून रस्तोरस्ती कामाची भीक मागत वणवण फिरावे लागेल. थंडीच्या दिवसात स्टुडिओ नामक तुमच्या खोपटात गारठून मरण्याची वेळ येईल. घरमालक समोर दिसताच हातापायांना कापरं भरेल. यापेक्षा आपण कारकून नाही तर पोस्टमन झालो असतो तर फार बरं झालं असतं असं वाटायला लागेल."

"मस्य देगास, तुम्ही त्यांचा आत्मविश्वास खच्ची करताहात." पिस्सारो म्हणाला.

"मी कोण यांचा आत्मविश्वास खच्ची करणारा. यांच्या चेहऱ्याकडे बघा. आपण मायकेल अँजेलोचे बाप लागून गेलो आहोत असा भाव आहे की नाही सगळयांच्या चेहऱ्यावर. या कॅफे बाहेरच्या जगाची यांच्यापैकी कोणाला कल्पना नाहीय. हे जीवन फार कठोर आहे रे बाबांनो. गुड डे-" असे म्हणून देगास उठला.

"त्यांच्या बोलण्याकडे काही लक्ष देऊ नका. जेवणानंतर पाचक म्हणून उगाच काहीतरी बोलत असतात ते." पिस्सारो म्हणाला.

"म्हातारा भडवा खट आहे नाही." रॅंचो सर्वात अगोदर भानावर आला.

(लोत्रेकवर देगासचा खूपच प्रभाव होता. एका अर्थाने तो लोत्रेकचा गुरूच होता असं म्हणावे लागेल. लोत्रेक प्रमाणेच तो सुद्धा एका प्रतिष्ठीत घराण्यातून आला होता. देगासने इंप्रेशनीस्ट शैलीमध्ये प्रामुख्याने पेस्टल या माध्यमाचा फार प्रभावी वापर केला आहे. त्याची बहूतेक कामे स्टुडियोत किंवा आठवणावर विसंबून केलेली आहेत. विषय, हाताळणी आणि तंत्राच्या अंगाने त्याने बरेच प्रयोग केले. तो काळजीपूर्वक विचार करून पेंटींग करे. तो म्हणायचा कलेच्या प्रांतात कोणतीही गोष्ट योगायोगावर सोडून चालत नाही. लोत्रेकच्या सुरवातीच्या कामावर देगासचा प्रभाव स्पष्ट दिसून येतो. बॅलेरीना आणि स्टँडिंग डान्सर्स, आफ्टर द बाथ आणि एट द टॉयलेट या चित्रांत देगासचा प्रभाव कुठे सुरू होतो आणि कुठे संपतो ते दोन्ही कळून येते. दोघांच्या स्वभावत जो फरक होता तो त्यांच्या कामात दिसून येतो. देगास एकांत प्रिय होता तर लोत्रेक नेहमी लोकांच्या गर्दीत रमत असे. लोत्रेकमधील असामान्य गुणवत्ता अगदी सुरवातीलाच देगासच्या लक्षात आली होती. तो त्याचे खूप कौतूक करायचा. ‘आम्हाला ज्या गोष्टी शिकण्यात आयुष्य घालवायला लागलं ते पहा या पोराने किती चटकन आत्मसात केलं आहे ते.’ पण लोत्रेकची लोकप्रियता वाढू लागल्यावर याच कौतूकाची जागा असूयेने घेतली. ‘लोत्रेक काय माझेच कपडे वापरतो, पण थोडे आखूड करून’ लोत्रेकच्या मागे तो बघायचा.)



(वुमन कोम्बींग हर हेअर - एडगर देगास – कागदावर पेस्टल, ५२x५१ सेमी , १८८५ – हर्मिटाज म्युझियम, सेंट पीटर्सबर्ग)



(एट द टॉयलेट – तुलूझ लोत्रेक – तैलरंग कार्ड ६७x५४ सेमी, १८८६ – म्युसी डी'ओर्से, पॅरीस)

## - १४ –

हेन्री दुपारचा सगळा वेळ रॅंचोच्या स्टुडिओवर घालवी. पेंटिंग, गाणे बजावणे, गप्पा-टप्पा. नंतर संध्याकाळी सगळया मित्रांच्या टोळक्याबरोबर ला नुव्हेलमध्ये. तो आता त्यांच्यातलाच एक झाला होता. कधी कोणाला पैसे उसने दे, अधूनमधून बीअर पाजणे, त्यांच्या वादविवादात हळूच आपले मत मांडणे. त्याचा बुजरेपणा हळूहळू जात होता. त्याच्या वागण्या-बोलण्यातील खानदानी हळुवारपणा जाऊन त्याच्या जागी मोंमार्त्रमधल्या तरुण चित्रकारांच्या कोणत्याही गटात शोभेल असे त्याचे व्यक्तिमत्त्व आकार घेत होते. बोलताना अधूनमधून *नॉम दे दियू, मेर दलोर*, मी तुझ्या थोबाडावर थुंकीन वगैरे मोंमार्त्रमधली भाषा त्याच्या तोंडी रुळली होती. कोणत्याही विषयावर बोलता बोलता गाडी शेवटी स्त्रियांवर येऊन थांबे. ओळखीच्या स्त्रिया, ओळख व्हावी असे वाटणाऱ्या स्त्रिया, भोगलेल्या स्त्रिया, भोगाव्या असा ध्यास धरलेल्या स्त्रिया, स्त्रियांपासून काय सुख मिळाले, स्त्रियांना काय सुख दिले, स्त्रीचे शरीर, स्त्रीचा स्वभाव, प्रेमशास्त्र ते कामशास्त्र, स्त्रियांचे हृदय कसे जिंकावे, तिचा प्रतिकार कसा मोडून काढावा, तिचा कामाग्नी कसा प्रज्वलित करावा, कुमारिकांना कसे वश करावे, विवाहितांना कसे नादी लावावे, स्त्रियांपासून होणारे फायदे-तोटे वगैरे एक ना हजार गोष्टींवर त्यांच्या तासन्तास गोष्टी चालत. न कंटाळता, न थकता.

हेन्रीला आश्चर्य वाटायचे. या गोष्टी ज्यांच्याविषयी चालायच्या त्या सर्व जणी हेन्रीच्या बघण्यातल्या होत्या. पोर्ट्रेट काढून झाल्यावर कपडे घालण्यापूर्वी पेंटरबरोबर तिथेच इझलखाली फाटक्या जाजमावर झोपणाऱ्या मुली, काबाडकष्टांमुळे तारुण्याची रया गेलेल्या धोबिणी, वयपरत्वे निवृत्ती जवळ आलेल्या वेश्या. त्यांच्यापैकी कोणालाही कोणत्याही अर्थाने सुंदर म्हणणे अशक्य होते. कित्येक जणींकडे सर्वसाधारण स्वच्छतासुद्धा अभावानेच होती. त्यांचे कपडे स्वस्तातल्या स्वस्त कापडाचे, घरी शिवलेले असत. गळयात स्वस्त हलक्या दर्जाचा हार. सूप पिताना त्या तोंडाने फुर्रफुर्र असा आवाज करीत. पर्फ्युम लावलेला असेल तर तो अगदी उग्र वासाचा असायचा. या मुली कशाही असल्यातरी त्याच्या मित्रांना त्या

आवडायच्याच. त्यांच्या मते त्यांच्या ठायी अवर्णनीय काही तरी सुप्त आकर्षण होते. कामुकता, लासवटपणा किंवा दुसरे काही तरी. पण त्याला काही ते पटत नसे.

तेथल्या कोणत्याही स्त्रीविषयी त्याला कधी फारसे आकर्षण वाटले नाही. तरी त्याला कॅफेतले एकूण वातावरण खूप आवडायचे. किचनमधल्या भांड्यांचा आवाज, गाणी गुणगुणत फिरणाऱ्या वेट्रेस, सगळया आवाजावर मात करून चाललेल्या गप्पा, कोणत्याही क्षणी हमरीतुमरीवर येणारे वाद, मोठमोठ्याने हसणे-खिदळणे. तीन-चार वर्षांपूर्वी तो बिछान्याला खिळून होता. पाय प्लॅस्टरमध्ये. पुन्हा कधी काळी चालता येईल याची आशा सोडलेली. आता वयाच्या एकोणिसाव्या वर्षी तो एक लोकप्रिय असा कलाविद्यार्थी झाला होता. कॅफेत बीअरचे घुटके घेत घेत मायकेल अँजेलो किंवा पुरातन इटालियन चित्रकला किंवा अशाच दुसऱ्या विषयांवरची आपली मते इतरांना ऐकवीत नाहीतर बायकांवरचे चावट किस्से ऐकत ऐकत त्याचा वेळ कसा निघून जाई ते कळतच नसे. त्या धुंद वातावरणातून घरी परत जायला अगदी जिवावर येई. दर वेळी उशीर झाला की काहीतरी सबब सांगावी लागे. चित्रकला वर्ग तर दुपारीच संपायचा. त्यामुळे ट्रॅफिक जॅम वगैरे रोज कसे पटणार. गाडी जुनी-पुराणी झालीय या सबबीचा फार तर एकदाच उपयोग झाला असता. कारण दुसऱ्याच दिवशी आईने नवी गाडी घेऊन दिली असती. मोंमार्त्रमधून हेन्रीचा पाय निघत नसे. रोज नवीन सबबी तरी किती शोधायच्या? आपण मोंमार्त्रमध्येच मुक्काम ठोकावा असे हेन्रीला प्रकर्षाने वाटायचे. पण तो विषय आईकडे कसा काढायचा याचा त्याला मोठा प्रश्न पडला. रोज संध्याकाळच्या प्रवासात थंडीवारा बाधून न्युमोनिया वगैरे होईल त्यापेक्षा मोंमार्त्रमध्येच राहायला जागा बघतो असे काहीतरी खोटे सांगून आईला भावनिक कोंडीत पकडणे त्याच्या जिवावर आले होते. कशा रीतीने हा विषय आईकडे काढावा याचा त्याने खूप विचार केला. पण प्रत्यक्ष विचारायच्या वेळी त्याला वाटायचे की आपण फक्त स्वतःचाच विचार करतोय. म्हणून तो ते पुढे ढकलीत होता.

शेवटी एके दिवशी आईने आपण होऊन विचारले, “तुमचा मोंमार्त्रमध्ये राहायला जाण्याचा विचार दिसतोय वाटतं.”

"मी काही अजून तसं ठरवलं नाहीय. पण तुम्ही म्हणताय तर बघू या. जवळपास जागा घेतली तर खूप सोयीचं पडेल नाही."

"म्हणजे तुम्हाला तुमच्या त्या मित्रांबरोबर कॅफेत जास्त वेळ काढता येईल. शिवाय रात्री गाव भटकता येईल."

आईला सगळे कळलेले दिसतेय. आडवळणे घेण्यात काही अर्थ नाही. "प्लीज ममा. तसं काही नाहीय. माझ्या शिक्षणाच्या दृष्टीने बघा. अॅतलिएच्या जवळपास कुठेतरी राहायला जागा मिळाली तर किती बरं होईल."

"तशी माझी काही हरकत नाहीय. पण तुमची काळजी कोण घेणार? पुन्हा पडलात वगैरे आणि पायांना काही दुखापत वगैरे झाली तर काय घ्या. देव करो आणि तसं काही न होवो."

"त्याची तुम्ही काही काळजी करू नका. ग्रेनिएकडे चांगली दोन खोल्यांची जागा आहे. तुम्हाला मस्य ग्रेनिए माहीत आहेत ना. मी बोललो होतो त्यांच्याविषयी. मागच्या आठवड्यातच ते मला विचारत होते. त्यांना एवढ्या मोठ्या जागेची गरज नाहीये. शिवाय भाडंही त्यांना परवडत नाही. मी त्यांच्याकडे राहायला गेलो तर तेवढीच त्यांना मदत होईल."

"मागच्या आठवड्यात त्यांनी तुम्हाला विचारलं. तुम्ही मला बोलला नाहीत ते कधी."

"तसं नव्हे मीच त्यांना विचारलं."

"हेन्री. तुम्ही कधी खोटं बोलायला जाऊ नका. तुम्हाला नाही जमणार." ती जड अंतःकरणाने म्हणाली, "सांगा तुमच्या मित्राला तुम्हाला केव्हापासून त्यांच्याकडे रहायला जायचंय ते. माझी हरकत नाही." ती जड अंतःकरणाने म्हणाली.

“मी खरंच मोंमार्त्रमध्ये राहायला जाऊ?” हेन्रीचा स्वतःच्या कानांवर विश्वास बसेना. त्याला वाटले नव्हते इतक्या सहज परवानगी मिळेल म्हणून.

“खरंच हेन्री. फक्त स्वतःची काळजी घ्या म्हणजे झालं.”

“थँक्यू ममा. थँक्यू व्हेरी मच.” हेन्री आनंदाने उचंबळून घाईघाईने म्हणाला, “माझी खात्री होती की तुम्ही मला समजून घ्याल.” थोडी उसंत घेऊन तो पुढे म्हणाला, “ज्या जागेत मी राहायला जाणार आहे ना ती अगदी मस्तच आहे. खिडकी उघडली की समोर मस्य देगास यांचा स्टुडिओ दिसतो. कल्पना करा नजरेसमोर सतत देगास यांचा स्टुडिओ असणार आहे.”

“कोण हे मस्य देगास.” देगासच्या नावाची छाप पडण्याचे सोडा पण देगास हा कोण हे तिला मुळात माहीतही नव्हते.

“देगास म्हणजे कोण तुम्हाला माहीत नाही. आजच्या घटकेला जगातल्या महान चित्रकारांत त्यांची गणना केली जाते. बॅले गर्ल, लाँड्रेसिस्, न्युड्स वगैरे त्याची पेंटिंग तुम्ही पाहायला हवी होती. गेल्या आठवड्यात द्युराँ रुएल येथे त्याचं प्रदर्शन होतं. मी रॅचोबरोबर गेलो होतो बघायला.’’

त्याच्या बोलण्याकडे तिचे लक्ष नव्हते. त्याचे विषय, त्याच्या आवडीनिवडी, त्याचे जग हळूहळू तिच्यापासून दूर चालले होते. तो आता तारुण्यात पदार्पण करत होता. घराबाहेर पडायला लागल्यामुळे त्याच्यात आत्मविश्वास निर्माण झाला होता खरा पण हे बाहेरचे जग किती कठोर असते याची कल्पना यायला तो अजून खूप लहान होता. या कठोरतेचे काटे त्याला टोचू नयेत म्हणून आईला तो आपल्याजवळ राहायला हवा होता. तिने कितीही काळजी घेतली तरी त्याच्या जीवनाचा स्वतंत्र प्रवास ती आता फार काळ रोखू शकणार नव्हती. शारीरिक व्यंगामुळे आपल्या वाट्याला दुःखांचा कोणता भोगवटा येणार आहे याची नीटशी जाणीव हेन्रीला व्हायला अजून अवकाश होता. त्यात भर स्वतःविषयीच्या भ्रामक कल्पनांची. तारुण्यातील स्वप्ने बघत सुरू झालेला वेगळया वाटेवरचा प्रवास शेवटी हेन्रीला कुठे

घेऊन जाईल या चिंतेने आईचे हृदय व्याकूळ झाले. शिवाय हेन्रीचे बिऱ्हाड वेगळे झाल्यावर या भल्या मोठ्या जागेत एकट्याने भुतासारखे दिवस कंठायचे या विचाराने तिच्या अंगावर शहारे आले.

त्या रात्री हेन्री झोपल्यावर ती हळूच त्याच्या खोलीत गेली. किती शांतपणे झोपला होता तो. त्याच्या शरीराचा कंबरेखालचा भाग एखाद्या दहा-बारा वर्षांच्या शाळकरी मुलासारखा दिसत होता. मोंमार्त्रमधले रांगडे जीवन त्याला कसे काय झेपेल. त्याचा चेहरा दाढी-मिशांनी भरून गेला होता तरी कोवळीक लपत नव्हती. स्त्री-पुरुष संबंधांवरील कॅफेतल्या चावट गप्पा, पेंटिंगच्या निमित्ताने घडणारा नग्न मॉडेल सहवास वगैरे गोष्टींचा त्याच्यावर अजून फारसा परिणाम झालेला नव्हता. पण एक ना एक दिवस त्याला या सर्व गोष्टी जाणवू लागतील. जेव्हा त्याला स्त्रीसहवासाची, प्रेमाची गरज भासू लागेल तेव्हा त्याला स्वतःच्या देहाविषयीचे निष्ठुर सत्य उमगेल. अरे देवा! लवकरच येऊ घातलेल्या त्या वादळाच्या नुसत्या कल्पनेनेच ती हादरली.



(पोर्ट्रेट कॉउंटेस एदल - तुलुझ लोत्रेक - तैलरंग कॅनव्हास)

## - १५ –

रॅंचो आणि कंपनीप्रमाणे तो मोंमार्त्रमधल्या एका मोडकळीला आलेल्या घरात राहू लागला. खिदमतीला नोकरचाकर नव्हते की तळहातावरील फोडासारखी जपायला आई नव्हती. पण तिथे होते मनमुराद स्वातंत्र्य. सकाळी उशिरा उठा. जवळच्या एखाद्या बिस्ट्रोमध्ये जाऊन नाश्ता करा व नंतर सावकाश रमतगमत ॲतलिएवर जा. दुपारी ओग्युस्तिनातल्या भरल्या बैठकीतून अर्ध्यावर उठून घरी जाण्याची घाई नव्हती. वर संध्याकाळी मनाला येईल तिकडे जायला मोकळीक. कॅफे शाँतॉन, अधूनमधून फर्नांदोची सर्कस किंवा ॲरिस्टीड ब्रुअँटची देशभक्तीने ओथंबलेली गाणी.

सर्वात महत्वाचे म्हणजे आता ल एलीसमध्ये जाण्यात कोणतीही अडचण नव्हती. ल एलीस मोंमार्त्रमधले एक जुनेपुराणे प्रचंड गोंगाट असलेले नृत्यगृह होते. प्लास पिगालच्या कारंज्याप्रमाणेच चित्रकार, मॉडेल वगैरे लोकांची एक आवडती जागा. काही वर्षांपूर्वी मोंमार्त्र पॅरीस शहराच्या सीमेवरील एक शांत असे खेडेगाव होते. मोंमार्त्रच्या परिसरात जुन्या, वापरात नसलेल्या मोडक्या पवनचक्क्या आढळत. त्यांची न फिरणारी पाती एके काळच्या खेडेगावाची साक्ष होती. त्या वेळी मोंमार्त्र गुंड, मवाली, वेश्या व त्यांचे भडवे यांचा एक आ म्हणून प्रसिद्ध होते. सभ्य नागरिक तर जाऊद्याच पोलिसांचीसुद्धा तेथे फिरकण्याची सहसा छाती होत नसे.

जवळ जवळ एक शतकभर मोंमार्त्रचे स्थानिक रहिवासी ल एलीसला उदार आश्रय देत आले होते. पण उर्वरित पॅरीसमध्ये मात्र ल एलीसची ख्याती फारशी पसरली नव्हती. व्हिन टॉड नावाची साखरेच्या पाकापासून बनवलेली स्वस्त वाईन, कपच्या उडालेल्या क्रॉकरीमधील जेवण. तिथल्या ओकच्या टेबलांवर प्रेमिकांनी आपल्या चाकूने कामबाणांनी रुद्ध झालेले हृदय व आपल्या नावाच्या आद्याक्षरांची आकृती कोरून आपले प्रेमसंबंध अजरामर करण्याचा प्रयत्न केला होता. पण इतक्या वर्षांच्या वापराने ती टेबले एवढी गुळगुळीत झाली होती की ती आद्याक्षरे काही नीट वाचता यायची नाहीत. धोबीकाम, शिवणकाम, कारखान्यातील मोलमजुरी वगैरे कष्टाची कामे करणाऱ्या स्त्रिया नेहमी तेथे येत. ल एलीसमध्ये त्या कष्टकरी स्त्रियांना

नुसत्या विरंगुळयांपेक्षा अधिक काहीतरी मिळत असे. काही थोड्या दिडक्यांच्या बदल्यात तिथल्या संगीतात आणि मोकळया वातावरणात त्या आपले काबाडकष्टांचे, हलाखीचे जीवन काही वेळ विसरून जात. तिथे कोणाचे पाऊल थोडे वाकडे पडले तर कोणाला त्यात फारसे काही वाटत नसे. खाजगी बाब म्हणून तिकडे दुर्लक्ष व्हायचे.

एका रात्री रॅंचो हेन्रीला ल एलीस दाखवायला घेऊन गेला. संगीताची धून नुकतीच चालू झाली होती. गर्दी बऱ्यापैकी दिसत होती. आतमध्ये शिरताच रॅंचोला बघून एका पोरीने त्याचा हात धरला व त्याला सरळ स्टेजवर घेऊन गेली. स्टेजवर जाताच त्या दोघांनी संगीताच्या तालावर नाचायला सुरुवात केली. हेन्रीने एका कोपऱ्यातले टेबल पकडले व कोमट व्हिन शॉड मागवली. हेन्री शांतपणे गंमत बघत होता. थोडा वेळ गेल्यावर त्याने स्केचबुक काढले व स्टेजवर नाचणाऱ्या मुली, इकडेतिकडे फिरणारे वेटर, बसलेले गिऱ्हाईक यांचे स्केच करायला सुरुवात केली.

वादनाचा एक फेरा संपल्यावर रॅंचो हेन्रीच्या टेबलाकडे आला व म्हणाला, “इथल्या या मुलींनी सगळा ताळतंत्र सोडलाय. त्या तरी काय करतील. त्यांना वारसाच तो मिळालाय. त्यांच्या आया, आज्या, पणज्या सगळयांची प्रेमप्रकरणे या ल एलीसमध्येच जमली. येथे शब्दांपेक्षा ओळख स्पर्शानेच जास्त होते. सुरुवात खुर्चीवर बसून एकमेकांच्या पायावर पाय घासण्यात व्हायची. शेवट बहुधा टेबलाखाली जाऊन एकमेकांवर झोपण्यात. या पोरी ल एलीस म्हणजे आपली झोपण्याची खोली समजतात वाटतं. मनात येईल त्याचा हात धरून सरळ मूत्रीत जाऊन त्याच्यासमोर झगा वर करून उभ्या राहतील. *नॉम दे दियू*, देवाच्यान काही बोलायची सोय राहिलेली नाही. तो ऑर्केस्ट्राचा कंडक्टर पाहिलास ना. या सगळयाला जबाबदार तो आहे. त्याने जो हा कॅनकॅन म्हणून नाच बसवलाय त्याने डोकंच फिरतं बघ सालं. त्या मुली नाचताना एवढ्या ढेंगा वर करतात की सगळं दर्शन होतं. या दरवाजात एक पोलीस चौकी आणून बसवली तरी या मस्तवाल पोरी काही ताळयावर येणार नाहीत.”

ल एलीसमध्ये हेन्रीची ओळख ला गुल्वीशी झाली. ती रॅंचोबरोबर वेगवेगळया प्रकारचे नाच करी. त्या नाचात तिचे असे काही खास वैशिष्ट्य असे. ती अठराएक

वर्षांची धोबीण होती. तिला बोलताना सारखं हसू फुटायचं. तिच्या तोंडची भाषा अतिशय शिवराळ होती. पण कॅनकॅन नृत्यात तिचा हात मात्र कोणी धरू शकत नसे. नृत्याचा ताल तिच्या रोमारोमांतून व्यक्त व्हायचा. शरीराच्या कामूक हालचालीतल्या तिच्या कौशल्याला तर तोडच नव्हती. हेन्रीच्या दृष्टीने ती मोंमार्त्रमधील परिटीणींचा एक नमुना होती. या मुली दिवसभर धुणी बडवून झालेली कमाई उधळायला रात्री ल एलीसमध्ये हजेरी लावीत. दिवसभर धुणी बडवण्याचे कंबरतोड श्रम केल्यानंतरसुद्धा त्या नृत्यासाठी रात्री ताज्यातवान्या असायच्या. नृत्यसुद्धा कॅनकॅनसारखे सर्वात कठीण व अंगमोडे.

कितीही वेळ झाला तरी हेन्रीला कंटाळा म्हणून कधी यायचा नाही. त्या सगळया गर्दी-गोंधळाची त्याला मोठी मौज वाटायची. तेथे जमणारे पुरुष बहुधा लोफर, लफंगे, भुरटे चोर वगैरे कोणीतरी अगदी समाजाच्या तळागाळांतले असत. ते बरोबर आपापल्या मैत्रिणींना घेऊन येत. एकटे असले तर तशाच एकट्या आलेल्या दुसऱ्या मुलीबरोबर तेवढ्या रात्रीपुरती मैत्री होई. वातावरणातली धुंदी मंद प्रकाश व सिगारेटच्या धुराने अधिकच वाढायची. कानाकोपऱ्यांत युगुले एकमेकांच्या मिठीत प्रणयचेष्टा करण्यात मशगूल असायची.

बरोबर बाराच्या ठोक्याला सिंबलच्या झणत्कारापाठोपाठ ड्रमची तडतड सुरू झाली आणि एकदम कळ फिरल्याप्रमाणे सर्व जण नृत्यासाठी पुढे सरसावले. मुलींनी आपापले स्कर्ट वर उचलून धरले तर पुरुषांनी पायाने ठेका धरला. संगीताची लय हळूहळू जलद होऊ लागली. मुली गिरक्या घेत अंग आणि नितंब हलवीत उड्या मारीत नाचत होत्या. त्यांचे पुरुष जोडीदार हाताने टाळया वाजवीत, मधेच मांडीवर थाप मारत, जोडीदाराला ओरडून उत्तेजन देत होते. ला गुल्वी तर बिजलीसारखी नाचत होती. ऑर्केस्ट्राचा कंडक्टर लय सतत वाढवत होता. वादक, नर्तक आणि प्रेक्षक सर्वांचे भान हरपले होते. वाद्यांच्या जोडीला टाळया व बुटाच्या टाचांनी धरलेला ठेका आणि जोडीदारांच्या आरोळयांची भर पडली होती. वाद्यांचा ताल व नृत्य यांची लय टिपेला जाऊन पोहचली. नर्तकांच्या वासनेला नृत्यातून जणू काही प्रकट स्वरूप मिळाले होते. पुरुष ॲकॉर्डियनच्या उघडझापीसारखे आपले पाय फाकवीत होते तर मुली हवेत टांगा झाडत होत्या. पाय इतक्या वर नेत की क्षणभर त्यांच्या अंतर्वस्त्राचे ओझरते दर्शन व्हायचे.

हेन्री अधूनमधून जेव्हा आईकडे राहायला जायचा तेव्हा तो मोंमार्त्रमधील सर्व गमती-जमती आईला न विसरता सांगायचा. मोंमार्त्रमधील वातावरण शब्दांत पकडणे कठीण होते. ती एक जीवनशैली होती. स्वतः अनुभवल्याशिवाय त्यातील मजा कळणे शक्य नव्हते.

कॉर्मेनच्या हाताखाली स्वतःची शैली मारून हेन्रीचे धडे गिरवणे जोरात चालू होते. दिवस भराभर उलटत होते. हिवाळा संपून वसंताची चाहूल लागली होती. रस्त्याच्या कडेला फरसबंदीच्या फटींतून पोपटी तृणांकुर डोकावू लागले. परटिणी धुणी बडवता बडवता गाणी गुणगुणु लागल्या. पोलीस दोन्ही हातांचे अंगठे कंबरपट्ट्यात अडकवून रस्त्याने फिरताना हलकेच शीळ वाजवू लागले. हेन्री 'मेर दलोर' व 'नॉम दे दिऊ'सारखे शब्द सहजतेने वापरू लागला. आता तो मोंमार्त्रमधला एक बनचुका, टपोरी चित्रकला विद्यार्थी म्हणून ओळखला जाऊ लागला.

त्या उन्हाळयाच्या सुटीत त्याने आईकडे हळूच विषय काढला.

"पुढल्या वर्षी मला सॅलाँसाठी पेंटिंग करायचंय. खूप मोठं काम आहे ते. घरी होण्यासारखं नाही. त्यासाठी स्वतंत्र स्टुडिओ लागेल."



(मर्सिल लेंडर डान्सिंग बोलेरो एँट शिल्पेरी – तुलूझ लोत्रेक – तैलरंग, कॅनव्हास, १४५x१५० सेमी)

- १६ –

२१ रू कुलॅनकुर ही एक चार मजली जुनी इमारत होती. प्रथमदर्शनी हिरव्या काचांच्या खिडक्या व तिचे ऐसपैस लोखंडी सज्जे नजरेत भरत. इमारतीच्या मूळ आराखड्यात सर्व सुखसोयींची नीट योजना केलेली होती. तिच्या मालकाने सभ्य व इज्जतदार लोकांना राहायला चांगले घर मिळावे हा उच्च उद्देश ठेवून ती इमारत बांधायला घेतली होती. फ्रँको-प्रुशियन युद्ध संपता संपता ती तयार झाली. सुरुवातीला मोंमार्त्रची शुद्ध हवा, शांत वातावरण पसंत पडल्याने काही मध्यमवर्गीय कुटुंबे राहायला आली. पण मोंमार्त्रचे दिवसभरचे शांत वातावरण संध्याकाळ झाली रे झाली की पार बदलून जाई. रस्त्यावरची वर्दळ वाढू लागे. शहरातल्या दिवसभराच्या कामाने दमलेल्या पुरुषांना रस्त्यावरच्या गर्दीतून वाट काढणे कठीण जाई. वाटेत एखादी बाई हळूच धक्का मारी. कधी कधी सरळ हात पकडून बाजूला खेचे. घरी बायकोकडून काय मिळेल असे सुख देण्याची तयारी ती बेधडकपणे त्याच्या डोळ्याला डोळा भिडवून दर्शवी. हे सांगताना तिच्या उरोजांचा ओझरता स्पर्श होत असे. काही सभ्य गृहस्थ तरीही आपापल्या घरी सरळ परत जात. पण सगळयांनाच तसे सभ्य राहणे जमत नसे. मग घरी भांडणे होत. हळूहळू अशी कुटुंबे एक एक करून सोडून जाऊ लागली. मग घरमालकाला आपल्या भाडेकरूंना काही सवलती द्याव्या लागल्या. उदाहरणार्थ, नैतिक आचरणविषयक असलेल्या कडक अटी थोड्या शिथिल झाल्या. एक एक करून सर्व अटी कमी होत गेल्या. शेवटी फक्त भाडे भरले पाहिजे, याशिवाय दुसरी कोणतीही अट शिल्लक राहिली नाही. एके दिवशी चक्क एक वेश्या भाडेकरू म्हणून राहायला आली तेव्हा लॉजची व्यवस्थापक मादाम ल्युबेतला खूप वाईट वाटले. पण करता काय! भाडे वेळेवर मिळत असल्याने तिला तक्रारीला दुसरी जागा नव्हती.

तिच्यापाठोपाठ एक चित्रकार राहायला आला. चौथ्या मजल्यावर. उंचापुरा आडमाप देहाचा. त्याच्याकडे बघून भीतीच वाटायची. त्याने आल्या आल्या दोन खोल्यांमधील पार्टिशन पाडून टाकले आणि सगळा कचऱ्याचा ढीग जिन्यात लोटून दिला. रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांच्या डोक्यावर रॅबिटचा वर्षाव होऊ लागला. लोक वर बघून शिव्या देऊ लागले तर हा खिडकीतून त्यांच्यावर थुंकला. काय प्रकार आहे म्हणून बघायला मादाम ल्युबेत वर आली. दरवाजा बंद होता व आतून तोडफोडीचे

आवाज येत होते. बराच वेळ दरवाजा ठोकल्यावर तिला चित्रकार महाशयांचे दर्शन झाले. संपूर्ण नग्न, घामाने भिजलेला, हातात हातोडा व दाढीत प्लास्टरची धूळ. रस्त्याकडच्या भिंतीला एक मोठे भगदाड पाडून झाले होते. 'आता पेंटिंग करायला हरकत नाही. झकास स्टुडिओ तयार झालाय. काय अंधार होता पहिल्यांदा.' हवा खेळती राहावी म्हणून त्याने जेव्हा करवतीने दरवाजा कापायला घेतला तेव्हा मात्र पोलिसांना बोलावून जबरदस्तीने त्याला जागा खाली करायला भाग पाडावे लागले.

त्यानंतर आलेले भाडोत्री त्यामानाने सौम्य होते पण त्यांनी आपापल्या परीने लवकरच त्या इमारतीला अवकळा आणली. भिंतीवरचा रंग उडाला, छताच्या ढलप्या पडल्या, कॅारिडॉरमधून झुरळे फिरताना दिसू लागली. पण मादाम ल्युबेत आता त्याच्याकडे दुर्लक्ष करायला शिकली होती. फक्त आपल्यापुरते पहायचे व आला दिवस ढकलायचा. वर्तमानपत्र वाचत, खिडकीतल्या जेरेनियमच्या वेलाची काळजी घेत, मांडीतल्या मांजराला कुरवाळत वेळ कसाबसा निघून जायचा.

१८८५ च्या ऑक्टोबर मधली ती एक सकाळ होती. त्या दिवशी नेहमीप्रमाणे वर्तमानपत्र वगैरे वाचून झाल्यावर ती उगाचच खिडकीतून बाहेर बघत बसली होती. नुकताच पाऊस रिपरिपून गेला होता. वातावरणात एक प्रकारची मरगळ भरून राहिली होती. तेवढ्यात एक घोडागाडी लॉजसमोर येऊन उभी राहिली. त्यातून काळीभोर दाढी राखलेला एक बुटबैंगण तरुण उतरताना तिला दिसला. डर्बी हॅट, ओव्हरकोट अशा झकपक पोशाखातल्या तरुणाची बेढब शरीरयष्टी पाहून तिला आश्चर्याचा धक्का बसला. पण तो लॉजच्या दिशेने येतोय हे दिसताच ती सावरून लगबगीने पुढे झाली.

"बाहेर फळयावर जे लिहिलंय ते स्टुडिओ अपार्टमेंट मला दाखवता का?" आपली हॅट काढीत त्या तरुणाने मोठ्या अदबीने विचारले.

"दाखवते ना," त्याच्या खुरट्या पायांकडे बघत ती म्हणाली, "पण जागा आहे चौथ्या मजल्यावर आणि या पायऱ्या तशा खूप उंच आहेत."

“दिसतायत खऱ्या पायऱ्या उंच. चला बघूया मला कितपत जमतंय ते.” एका हाताने जिन्याचा कठडा धरून दुसऱ्या हाताने काठीचा आधार घेत त्याने मोठ्या कष्टाने जिना चढायला सुरुवात केली. चौथ्या मजल्यावर पोह्चेपर्यंत त्याला जोराची धाप लागली.

“अगदी आल्प्स पर्वत चढल्यासारखं वाटतंय.” तो हसून म्हणाला.

त्याचे हास्य एखाद्या लहान मुलासारखे निर्मळ होते. पांढरीशुभ्र दंतपंक्ती आणि गडद तपकिरी डोळे यांमुळे त्याचा चेहरा थोडा बालिश वाटत होता. बुटक्या व बेढब शरीरयष्टीमुळे दुरून तिला तो सर्कशीतल्या एखाद्या विदूषकासारखा वाटला. पण जवळ आल्यावर तिला तो आवडू लागला.

“मस्य. तुम्ही आर्टिस्ट वगैरे आहात की काय.” तिने संशयाने विचारले.

“छे छे ! मी अजून विद्यार्थीच आहे. तिसरं वर्ष चालू आहे. कॉर्मेनच्या ॲतलिएमध्ये. या वर्षी आम्हाला सॅलाँसाठी एक पेंटिंग करायचंय. त्याकरता जागा बघतोय.”

चित्रकारांच्या वाऱ्यालासुद्धा उभे राहायचे नाही असा निश्चय तिने केला होता. पण हेन्रीचा एकूण सभ्यपणा व कोवळे वय पाहता हा काही आपल्याला फारसा त्रास देणार नाही असे तिला वाटले. तिने चावीने दरवाजा उघडला.

“ओह! काय छान स्टुडिओ होईल येथे.”

प्रशस्त जागा, उंच छत, मध्यभागी गॅसचा स्टोव्ह, मोठी खिडकी वगैरे गोष्टी पाहून त्याला आनंद झाला. खिडकीतून बाहेर दिसणारे दृश्य मोठे विलोभनीय होते. जिकडे पाहावे तिकडे घरांची वेगवेगळया आकारांची छपरे, त्याच्यातून डोकावणाऱ्या चिमण्या आणि वर मोकळे आकाश. हेन्री खिडकीजवळ गेला व त्या दृश्याकडे लांबवर नजर लावून बघू लागला.

“आकाश स्वच्छ असेल तर येथून नोत्र दॅमचा घुमट दिसतो.”

त्या अपार्टमेंटमध्ये वर एक शयनगृह व बाथटबची सोय असलेले स्नानगृह होते. त्याने ताबडतोब जागा आवडल्याचे सांगून वर्षाला चारशेवीस फ्रँकचे भाडे कोणतीही घासाघीस न करता तात्काळ कबूल केले. एवढेच नव्हे तर वर आगाऊ भाडे देण्याची तयारी दाखवली.

“तुमचं नाव काय?” मादाम ल्युबेतने विचारले, “येथे नोंद करायचीय.”

“हेन्री द तुलूझ.”

“तुलूझ हे काय नाव झालं. गावाचं नाव नको. खरं नाव सांगा.”

“मी खरं तेच सांगतोय.”

“चेष्टा करू नका. तुलूझ हे नाव कधी ऐकलं नाही. ते गावाचं नाव आहे.”

“माझं नावच तसं आहे त्याला मी तरी काय करणार. तरी मी तुम्हाला थोडक्यात सांगतोय. संपूर्ण नाव पाहिजे ना. मग घ्या लिहून. हेन्री मारी रेमंड द तुलूझ लोत्रेक मोंफा. जन्म आल्बी. नोव्हेंबर चोवीस, अठराशे चौसष्ट.”

संध्याकाळी लॉजसमोर एक राजेशाही थाटाची घोडागाडी येऊन उभी राहिलेली पाहून मादाम ल्युबेत अगदी चकित झाली. त्यातून फिकटलेल्या चेहऱ्याची पण खानदानी व्यक्तिमत्वाची एक स्त्री उतरली. त्या स्त्रीने तिच्याकडे चौकशी केली.

“माझ्या मुलाने तुमच्या येथे जागा भाड्याने घेतल्याचं मला सांगितलंय.”

“तो बुटका...” तिने चटकन जीभ चावली.

“होय.” एक सुस्कारा सोडून ती म्हणाली. मग तिने मादाम ल्युबेतला हेन्रीच्या विचित्र आजारपणाची हकिगत सांगितली. मादाम ल्युबेतचे डोळे पाणावले.

“तुम्ही काही काळजी करू नका. मी त्यांची माझ्या मुलासारखी काळजी घेईन.” तिने आश्वासन दिले.

जाता जाता तिने हेन्रीच्या आईला मधेच थांबवून विचारले.

“हेन्रीचं खरं नाव काय? त्यांनी तुलूझ म्हणून सांगितलंय. मस्करीत तर सांगितलं नाही ना.”

“मस्करी नाही. खरंच त्यांचं नाव तुलूझ आहे. त्यांच्या वडलांचं नाव कॉम्ते अल्फान्सो द तुलूझ लोत्रेक.”

“अग बाई. म्हणजे ते काउंट आहेत म्हणायचं की.”

“होय. पण काउंट ही उपाधी लावायला त्यांना आवडत नाही. म्हणून ते फक्त तुलूझ एवढेच लावतात.”



(फोटो - हेन्री तुलूझ लोत्रेक)

- १७ -

दोन दिवसांनी मोंमार्त्रमधल्या लोकांना एक विचित्र प्रेतयात्रा बघायला मिळाली. मरतुकडे घोडे एक जुनाट शववाहिनी कसेबसे ओढत होते. त्यात वेताचे फर्निचर, तीन इझल, ड्रॉइंग टेबल, एक उंच शिडी वगैरे चित्रविचित्र सामान शिगोशीग भरलेले होते. शवपेटीऐवजी मधेच आडवा ठेवलेला व्हीनस द मिलोचा प्लॅस्टरमधला मळकट पांढरा पुतळा डुगडुगत होता. जणू काही मुडद्यात पुन्हा धुगधुगी येत असावी. गाडीवानाच्या जागी एक उंचापुरा, तगडा दाढीवाला तरुण बसला होता. मोठ्याने गाणे गात, खिडकीतून गंमत बघणाऱ्या मुलींना बघून शिटी मारून डोळा मारीत, वाटेत मधे येणाऱ्यांना अस्सल शिव्या घालीत तो मजेत गाडी हाकत होता. मागून पिंजारलेल्या केसांचे, गबाळया कपड्यातील चार तरुण चालले होते. हेन्री मात्र काठी टेकून पाय ओढत चालल्यामुळे थोडासा मागे पडला होता. गाडी लॉजसमोर येताच सगळया मंडळींनी भराभर सामान सोडले व आरडाओरडा करत मोठ्या गडबड-गोंधळात वर चढवले. शेवटी रहायला व्हीनस द मिलोचा प्लॅस्टर कास्ट. एकमेकांना भरपूर शिव्या घालत तो अवजड पुतळा सगळयांनी मिळून चार मजले चढवून एकदाचा खोलीत आणून टाकला.

“*नॉम दे दियू!* काय वजन आहे भडवीचं. कमीत कमी एक टन भरेल.”

“सगळं वजन त्या कुल्ले आणि स्तनांमध्ये भरलंय. कसले गोल गुबगुबीत आहेत बघ.”

“पुतळा वर चढवता चढवता ॲनाटॉमीचा अभ्यास करत होतो. तीन वर्षं वर्गात बसून जे डोक्यात शिरलं नाही ते आज ओझं खांद्यांवर घेतल्यावर समजलं.”

हेन्रीचा स्टुडिओ सगळयांना आवडला. मोठ्या आपुलकीने त्यांनी सगळे सामानसुमान नीट लावून ठेवले. हेन्री मित्रांच्या आपुलकीने अगदी भारावून गेला. त्याला सगळयांचे अगदी मनापासून आभार मानायचे होते. पण असे भावनांचे प्रदर्शन

करणे त्याच्या मित्रमंडळीत भंपकपणाचे समजले जाई. म्हणून त्याने आपले आभारप्रदर्शन मनातच ठेवले.

हेन्री मग सर्व मित्रांच्या टोळक्याला श्रमपरिहारासाठी म्हणून ला नुव्हेलमध्ये घेऊन गेला. तेथे यथेच्छ बीअरपान झाले. सर्वांनी व्हेरोनीस, गोया व दलाक्रवावरून भांडण होईस्तोवर एकमेकांशी वितंडवाद घातला. शेवटी आणखी वाद घालण्याचे अंगात त्राण न उरल्याने एकमेकांचा उद्धार करत सर्वजण थकून-भागून संध्याकाळी खूप उशिराने आपापल्या घरी गेले. फक्त हेन्री आणि रॅंचो सोडून. त्यांची सॅलॉंमध्ये पाठवायच्या पेंटिंगविषयी चर्चा चालू होती.

“बायबलमधला एखादा प्रसंग घेऊ या का. उदाहरणार्थ, मुलाचा बळी देताना अब्राहम. नाहीतर मोझेसचा शिलाभंग.” हेन्री म्हणाला.

“खूप किचकट विषय आहेत ते. फार पसारा मांडावा लागेल.” रॅंचोने त्याला कल्पना दिली.

“इकॅरस कसा वाटतो. तुला माहितेय ना ती गोष्ट. इकॅरस भुयारांच्या भूलभुलय्यातून निसटल्यावर मेणाच्या पंखांनी आकाशात उडण्याचा प्रयत्न करतो ती. त्याने शरीराला मेणाचे पंख चिकटवले आहेत. तो एका खडकावर ते मेणाचे पंख पसरून आकाशात झेप घेऊन उडण्याची पोज घेऊन उभा आहे. त्रिकोणात्मक रचनेत छान बसेल.” हेन्रीच्या चेहऱ्यावरून उत्साह उतू जात होता.

“त्यापेक्षा तू नेहमीचे यशस्वी व्हीनस किंवा डायना असे विषय का निवडत नाहीस. लूव्हरमध्ये जा. बोशेच्या एखाद्या पेंटिंगची नक्कल कर. स्टुडिओत येऊन थोडे इकडेतिकडे फेरफार कर की काम झालं. कशाला ती इकॅरसची झगझग. संदर्भ मिळण्याचं तर सोडा, ती गोष्टसुद्धा फारशी कोणाला माहीत नसेल.” रॅंचोने प्रतिवाद केला.

“हे बघ. उगाच काहीतरी नवीन करण्यात काही अर्थ नाही. आपल्याला काय. सॅलॉंमध्ये पेंटिंग झळकल्याशी कारण. त्यासाठी क्रूसिफिक्शन अगदी उत्तम. लूव्हर तर

क्रूसिफिक्शनने भरलेलंच आहे. एक महत्वाची गोष्ट ध्यानात ठेव. क्रूसिफिक्शन, पिएता, मेरी मॅग्दालेन सॅव्हिअरचे पाय पुसतेय, सेंट सॅबॅस्टिअन आपल्या छातीवर बाण झेलतोय या विषयांवरची पेंटिंग निवड समिती सहसा नाकारत नाही." रॅचो थोडे थांबून पुढे म्हणाला, "वा! काय कल्पना सुचलीय. घोडदळाची लढाई. किती जबरदस्त ॲक्शन आहे बघ."

"अरे पण पेंढा भरलेला घोडा चार मजले वर चढवणार कसा."

"त्याची काही गरज नाही. फक्त लक्झेंबर्गला एक फेरी टाकली की झालं. तिथल्या म्युझियममध्ये स्टब्सची घोड्यांवरची भरपूर पेंटिंग आहेत. स्टब्सच्या घोड्यांची नीट नक्कल केलीस आणि नशीब बरोबर असेल तर एखाद्या वेळेस चक्क ब्रॉंझ पदक वगैरे मिळून जाईल."

"घोड्यांचं ठीक आहे. पण बाकीच्या साधनसामग्रीचं काय?" हेन्रीने विचारले.

''तुझं म्हणणं बरोबर आहे. तो व्हीनसचा पुतळा चढवतानाच माझी फाटलीय. या बायबलच्या विषयांसाठी लागणारं सामान गोळा करता करता अर्धी शक्ती खर्च होते. त्यापेक्षा एखादा साधा, कौटुंबिक प्रसंग घेऊया. नेहमीच्या जीवनातला.''

"उदाहरणार्थ. बाहुली मोडलेली पाहून रडणारी लहान मुलगी, आईच्या नकळत जॅम चोरून खाणारा छोटा मुलगा." हेन्री वेडावत म्हणाला.

"काय वाईट आहे यात?" रॅचो.

"भातुकली खेळणं, रात्री अंथरूण ओलं करणं यात काही वाईट नसतं रे. पण ते कधी. लहानपणी. जन्मभर तसंच करत राह्यलं तर कसं होईल?"

"ठीक आहे बाबा. तू म्हणतोस तसा इकॅरस करायला घे. पण त्यात भरपूर घोटकाम करावं लागेल. आणि तुला तर घोटकाम मुळीच आवडत नाही."

हेन्रीचे लक्ष दुसरीकडेच होते. बाजूच्या टेबलावर एक तरुणी एकटीच बसली होती. तिचे कपडे हलक्या दर्जाचे होते. तिने चेहऱ्यावर भडक रंगरंगोटी केली होती. ती आपले खाणे संपवून बिल देण्याच्या तयारीत होती.

“तिच्या मानेवर बघ कशी हिरवट शॅडो आहे ती.”

“मानेवर हिरवट शॅडो काय च्यायला. सगळया शॅडोज् रॉ अँबर, डार्क ब्राऊन ते ब्लॅक या दरम्यानच असतात. मस्य कॉर्मेनची शिकवण एवढ्यात विसरलास की काय? डोकं ठिकाणावर आहे का तुझं.” रॅचो वैतागून म्हणाला.

“तिचा चेहरा बघ कसा विलक्षण पारदर्शी आहे तो. खिडकीच्या तावदानासारखा.” हेन्रीची तंद्री दुसरीकडेच लागली होती. “ते जाऊ दे. तू इकॅरस घोटण्याविषयी काय म्हणत होतास?”

“तुझं आज लक्षण ठीक दिसत नाहीय. त्या गावभवानीचं पोर्ट्रेट करायचा विचार आहे की काय तुझा. गळयाभोवतीची हिरवट शॅडो, काचेसारखा पारदर्शी चेहरा. अशानं एक दिवस गोत्यात येशील तू.”

“मी तिचं पोर्ट्रेट करणारय असं काही नाही. मला फक्त एवढंच म्हणायचं होतं की...”

“बकवास करू नकोस. माझं ऐक. हे पोर्ट्रेट करून काय फायदा होणार आहे. कोण विकत घेईल. कोणत्या प्रदर्शनात पाठवशील. कोणाला रस आहे मोंमार्त्रमधल्या रांडांच्या पोर्ट्रेटमध्ये. एखाद्या रात्री दारू पिऊन धुंद झाल्यावर झोपायला बऱ्या वाटल्या तरी त्यांचं पोर्ट्रेट काही कोणी आपल्या दिवाणखान्यात टांगायला तयार होणार नाही.”

“तू म्हणतोयस ते अगदी सगळं बरोबर आहे. एखादं कुत्रंसुद्धा ढुंकून बघणार नाही अशा पेंटिंग कडे. पण तुझा तो घोडेस्वार, जॅम चोरणारा मुलगा, माझा

इकॅरससुद्धा त्यात आला, या सर्वांपेक्षा तिच्या चेहऱ्यात जान आहे. त्यातला जिवंतपणा अगदी अल्पांशाने जरी कॅनव्हासवर उतरवता आला तरी ते एक ग्रेट पोर्ट्रेट होईल." हेन्री थोडे थांबून पुढे म्हणाला, "तू कधी स्वतःच्या निव्वळ आनंदासाठी म्हणून एखादं पेंटिंग केलंयस. मी लहानपणी खूप पोर्ट्रेट करायचो. माझ्या आईची. घरातल्या सगळयांना मला पोज द्या पोज द्या म्हणून भंडावून सोडायचो."

"आणि आता पेंटिंग करायचं म्हणजे जिवावर येतं असंच ना."

"अगदी जिवावर येतं असंच काही नाही. पण च्यायला आपण ते अ‍ॅतलिएमध्ये रोज व्हीनस आणि डायना घोटत बसतो ना त्याने जाम वात आणलाय बघ. प्रायमरी शॅडोज् नेहमी रॉ अँबरनेच भरायच्या, रचना त्रिकोणात्मकच करायची, ब्रशस्ट्रोक्स चाटून-पुसून गुळगुळीत करायचे. असंच का? कोणी ठरवलं हे? एखाद्याला जसं आवडतं तसं तो का रंगवू शकत नाही? एकदा कॅनव्हासवर ब्रशचा फटकारा मारला की तो कायमचा. मनासारखा आला नाही तर दुसरा घ्या. नाही जमलं तर पेंटिंग सोडून द्या. त्याच कॅनव्हासवर रंगाचे थरांवर थर देत बसणं म्हणजे फारच भयंकर आहे. कोणाला शॅडोज् हिरव्या आणि निळया दिसत असतील तर त्याने तशा का रंगवू नयेत? मला त्या तशाच दिसतात."

"तुला तसं रंगवता येणार नाही. तुझ्या पेंटिंगची सॅलाँमध्ये वर्णी लागायला हवी तर मस्य कॉर्मेन जसं सांगतात तसंच तुला रंगवायला हवं. वेगळा मार्ग चोखाळायचा विचारसुद्धा मनात आणलास तर त्याचा अर्थ काय तो तुला ठाऊक आहे ना. आर्टिस्ट म्हणून तुझं भवितव्य खल्लास."

"ठीकय," एक उसासा सोडून हेन्री म्हणाला, "मधूनच डोक्यात काय वारं शिरतं काही कळत नाही. मी आता माझा इकॅरस बघ कसा घोटून घोटून तयार करतो ते. एवढ्या शिव्या खाऊन गाढवासारखं राबल्यावर आता सॅलाँमध्ये माझ्या पेंटिंगची वर्णी लागण्यासाठी तेवढंच करायचं उरलं असेल तर माझी काही हरकत नाही. माझं चित्र सॅलाँमध्ये लागलं तर मला नाही तरी आईला खूप आनंद होईल."



(फोटो - 'व्हीनस डी मिलो' चा प्लास्टर कास्ट)

- १८ –

हेन्री आणि त्याच्या मित्रांच्या गप्पा ऐन भरात होत्या तेवढ्यात कॅफेमध्ये दोन इसम शिरले. त्यांच्यापैकी एक बुस्साँ अँड व्हलादों गॅलरीचा व्यवस्थापक तेओ व्हॅन गॉग होता.

“तो दुसरा कोण?” हेन्रीने कुजबुजत विचारले.

“कोणीतरी फुकट्या दिसतोय.”

तो दुसरा इसम मजबूत बांध्याचा होता. त्याच्या वेल्वेटच्या तुमानीवर रंगांचे ठिपके उडालेले होते. भुरकटलेल्या निळसर रंगाचा जर्सी त्याच्या भरदार छातीवर अगदी घट्ट बसला होता. त्याच्या डोक्यावर हॅट नव्हती. त्याचे केस विस्कटलेले होते. हेन्री व रॅचोला तेथे बसलेले पाहून तो त्यांच्या दिशेने आला.

“पॉल, तुम्हाला काय हवं ते मागवा. माझं जेवण झालंय. ह्यांच्याकडे माझं थोडं काम आहे.” तेओ व्हॅन गॉग त्या तरुणाची माफी मागून त्यांच्या टेबलावर येऊन बसला.

“कोण तो.” रॅचोने विचारले.

“पॉल गोगँ. पूर्वी शेअरच्या धंद्यात होता. आता आर्टिस्ट होण्याचा किडा त्याच्या डोक्यात वळवळतोय. चांगला चालणारा धो धो पैसे देणारा धंदा सोडून इकडे आलाय.”

“काय भिकेचे डोहाळे लागलेयत. येडपट दिसतोय.” रॅचो त्याच्याकडे बघत म्हणाला.

“तो एकटाच नाहीय. माझा मोठा भाऊही त्याच माळेतला म्हणता येईल. त्यालासुद्धा आर्टिस्ट बनण्याच्या वेडाने झपाटलंय. बरेच धंदे करून पाहिलेत त्याने. बेल्जममधल्या खाण कामगारांमध्ये पाद्री म्हणून काम करून पाहिलं. पण कशातच जीव रमला नाही.”

“काय वयाचा आहे तुमचा भाऊ?” हेन्रीने सहज विचारले.

“तेहतीस,” तेओ व्हान गॉगला थोडं संकोचल्यासारखं झालं, “मला माहीतेय, या वयात काही नवं शिकणं विशेषतः चित्रकला तर खूप कठीण आहे. कदाचित यातसुद्धा तो फारसा रमणार नाही. पण माझा भाऊ म्हणून मला थोडी मदत करायचीय. या नाताळमध्ये तो पॅरीसला येतोय. तुमच्या कॉर्मेनच्याच वर्गात मी त्याचं नाव घातलंय. माझी तुम्हा मित्रांना एक विनंती आहे. त्याला जरा समजावून घ्या. खूप हळव्या स्वभावाचा आहे तो. त्याचे फ्रेंचचे उच्चार व त्याचं वय यावरून त्याच्या फिरक्या घेऊन त्याला सतावू नका.”

“नाव काय त्याचं?”

“व्हिन्सेंट. व्हिन्सेंट व्हॅन गॉग. तुम्ही त्याला सहज ओळखाल. अगदी माझ्यासारखा दिसतो. त्याची दाढीसुद्धा लालसर आहे माझ्यासारखी. तो तसा गमत्या आहे. फक्त ओळख व्हायचा अवकाश.”

- १९ -

दुसऱ्या दिवशी हेन्री रू क्लॉझेलवरच्या पिएर टँग्वीच्या दुकानात रंग व कॅनव्हास घ्यायला म्हणून गेला. कला साहित्याच्या दुकानासाठी रू क्लॉझेल अगदी सर्वतोपरीने अयोग्य असा भाग होता. दिवसभर तिकडे शुकशकाट असे. रात्र जसजशी उलटू लागे तशी त्या भागाला जाग येई. त्या भागातल्या काळयाकुट्ट अंधारामुळे मोंमार्त्रमधल्या ठग, वेश्या व त्यांचे भडवे यांना हा भाग आपल्या हालचालींना सोयीचा वाटे. पण टँग्वीचे तेथे दुकान असायला नेमकी हीच गोष्ट कारणीभूत होती. कारण तो एक पक्का अराजकवादी होता. कला ही सामाजिक जाणिवेचा एक आविष्कार आहे आणि त्यासाठी कलेने आपल्या सभोवतालच्या तळागाळातल्या सर्वहारावर्गाच्या सान्निध्यात राहिले पाहिजे आणि प्रस्थापितांविरुद्ध बंड करणाऱ्यांना सर्वतोपरीने मदत केली पाहिजे, असे त्याचे ठाम मत होते. या मताला अनुसरून त्याने आपल्या खिडकीवर सेझानची काही फ्रेम न केलेली पेंटिंग्ज लावली होती.

हेन्री दुकानात गेला तेव्हा टँग्वी पाइप ओढत काउंटरवर बसला होता.

''या! मस्य. अलभ्य लाभ. तब्येत काय म्हणतेय तुमची? मस्य रँचो काय म्हणताहेत.'' त्याने सगळयांची मोठ्या आस्थेने चौकशी केली. ''सध्या हवा अगदी खराब आहे. या खराब हवेने धंदा बसलाय हो. दिवसभर काळोखी वातावरण. या वातावरणात स्टुडिओत चित्र रंगवायला पुरेसा उजेड कुठून मिळणार. परिणामी रंगांचे गिऱ्हाईक बंद.''

''पण थोडे दिवस थांबा.'' दरवाजाकडे हळूच बघत तो म्हणाला, ''जेव्हा क्रांती होईल तेव्हा हे सगळं बदलून जाईल. सर्व चांगल्या कलाकारांना, म्हणजे आपले सामाजिक जाणीव असलेले हो, सरकारतर्फे सर्व काही पुरवलं जाईल. आम्ही त्यांची अगदी खास बडदास्त ठेवू.''

''आणि सामाजिक जाणीव नसलेल्यांचं काय करायचं?''

"त्यांचं काय करायचं म्हणता. अहो क्रांतीत त्यांना सरळ गोळ्या घालायच्या. मुळावरच घाव. काय?" टँग्वी अगदी हलक्या आवाजात बोलला.

नंतर बराच वेळ टँग्वी *ल कम्युन* च्या आठवणी सांगत होता. १८५० मध्ये पॅरीसमध्ये समाजवाद्यांनी केलेल्या त्या ऐतिहासिक उठावात त्याचा थोडाफार सहभाग होता. त्याच्या रूमानी आठवणी सांगताना तो अगदी मोहरून गेला होता. दर वेळेला तीच ती गोष्ट ऐकून हेन्रीला पाठ झाली होती. पण पुन्हा एकदा ते पुराण हेन्रीला ऐकवून झाल्यावरच त्याने हेन्रीला काय हवे आहे ते विचारले.

बरोबर घेता येईल ते सर्व सामान घेऊन हेन्री घरी परतला. मागाहून पाठवून दिलेला आठ बाय आठचा कॅनव्हास दुपारपर्यंत येऊन पोहचला. पुढच्या दोन-तीन दिवसात हेन्रीने कामाला सुरुवात केली. इकॅरस ड्रॉइंग हिज विंगज्. त्या उडणाऱ्या अथेन्सवासीयांचे भूत पुढचे काही महिने त्याच्या मानगुटीवर स्वार झाले होते. त्याचे भवितव्य, सारी उमेद त्या इकॅरसशी निगडित झाली. ओग्युस्तिनामध्ये दुपारचे जेवण झाल्यावर गप्पाटप्पात वेळ न दवडता तो सरळ घरी जायचा व तडक कामाला सुरुवात करायचा. रॉ अँबरच्या शॅडोज् व रंगांची काळजीपूर्वक घुटाई.

हेन्रीचे काम बघायला काहीतरी निमित्त काढून मादाम ल्युबेत येऊन बसायची. त्याची पॅलेट रॉ अँबरने भरलेली असायची. बहुतेक प्रायमरी शॅडोज् भरून झाल्या होत्या. ब्रशचे फटकारे दिसू नयेत म्हणून हेन्रीने ते घोटून घोटून इतके गुळगुळीत केले होते की सगळया कॅनव्हासला सॅटीनसारखी चकाकी आली होती. इकॅरससाठी निवडलेल्या डमीचा चेहरा अगदी कमालीचा रेखीव होता. सरळ नाक, नाजूक जिवणी, पुष्ट स्नायू. पण डोळे निर्जीव आणि चेहरा मूर्खासारखा. हे सगळे कॅनव्हासवर चितारताना कधी एकदा हा इकॅरस संपतोय असे हेन्रीला झाले होते. सारखे खाली-वर करून हेन्री अगदी थकून जाई. अशा वेळी तो दुसरा एखादा छोटा कॅनव्हास रंगवायला घेई. रू कुलँकुरवरील एखादी धोबीण हातात कपड्यांनी भरलेली टोपली घेऊन जातेय किंवा कॅफेत पाहिलेल्या एखाद्या वेश्येचा चेहरा. नाहीतर ल एलीसमधल्या कॅनकॅन डान्सरचे आदल्या रात्री केलेले स्केच रंगवायला घ्या. अशा पेंटिंगमध्ये तो हिरवा, लाल, निळा मनाला येईल त्या रंगांचा अगदी मुक्तपणे वापर करायचा. त्या वेळी त्याचा शीण कुठल्या कुठे पळून जाई.

एके दिवशी असाच तो कॅनकॅनचे दृश्य रंगवत बसला असता धाडकन त्याचे वडील आत आले. मादाम ल्युबेतने घाबरून नजर फिरवली आणि ती हळूच निघून गेली.

“तुमच्या मांसाहेबांनी सांगितलं की तुम्ही एक स्टुडिओ घेतला आहे. म्हणून मी तुमचं कसं काय चाललंय ते बघायला आलो.” हात पाठीमागे घेऊन येरझाऱ्या घालत ते बोलत होते. इकडे तिकडे पाहत ते हळून म्हणाले, “जागा काय वाईट नाहीय. पण इमारत थोडी मोडकळीला आलेली दिसतेय. मी ऐकलंय की मोंमार्त्रमधल्या बहुतेक सगळया इमारतींची अशीच अवस्था आहे.”

बोलता बोलता ते खिडकीजवळ गेले. ‘‘वा! इथून बाहेरचं दृश्य मात्र अगदी झकास दिसतय हां.’’ त्यांनी पाठ वळवली. स्टुडिओतल्या इकडे तिकडे पडलेल्या कॅनव्हासवर नजर फिरवत ते पुढे म्हणाले, ‘‘लहानपणी तुम्हाला सारखी चित्रं काढायला हवी असायची. आता तुम्हाला इकडे हवी तितकी चित्रं काढता येतील. कोणी सांगावं एके दिवशी तुम्ही चांगले चित्रकार व्हाल. त्या बिचाऱ्या मस्य प्रँस्तोंसारखे.’’

त्याने वडिलांकडे भीत भीत पाहिले. त्यांचा तो पहिला रुबाब वरवर कायम होता. पण आत ते कुठेतरी दुःखाने पोखरल्यासारखे वाटत होते. आपला मुलगा, लोत्रेक घराण्याचा वंशज आपल्यासारखा देखणा, दणकट, घोडेस्वारीत तरबेज असावा. शिकारी, मेजवान्या, नृत्य समारंभाला त्याला आपल्याबरोबर नेता यावे हे त्यांच्ये स्वप्न मोडल्याचे दुःख ते लपवू शकले नव्हते.

‘‘अरे हे काय आहे?’’ इकॅरसच्या कॅनव्हासकडे हातातल्या काठीच्या टोकाने निर्देश करत ते म्हणाले.

‘‘माझं सॅलाँसाठी पेंटिंग.’’

‘‘हा या विचित्र पंखांनी काय करतोय?’’

"ती एक ग्रीक पुराणातली कथा आहे. इकॅरसची. त्याला पक्ष्यासारखं उडून समुद्रापार जायचं असतं. त्यासाठी त्याला त्याचे वडील डीडॅनस मेणाचे पंख बनवून देतात. पण उडण्याच्या भरात तो सूर्याच्या इतका जवळ जातो की त्याचे मेणाचे पंख वितळून जातात व तो भर समुद्रात कोसळून पडतो."

"बरं झालं. जगातला एक मूर्ख कमी झाला." हातातली काठी गरगर फिरवीत ते म्हणाले, "ठीक आहे मी निघतो आता. तुम्ही आनंदात आहात हे बघून बरं वाटलं."

जाता जाता त्यांचे लक्ष कॅनकॅनच्या कॅनव्हासकडे गेले. "तुम्ही असली चित्रं काढता ते तुमच्या मॉंसाहेबांना ठाऊक आहे का?" यावर हेन्री काही बोलला नाही.

"ही तर शुद्ध अश्लील चित्रं झाली. आपला मुलगा असली गलिच्छ चित्रं काढतो हे त्यांना कळलं तर त्यांना केवढा धक्का बसेल याचा विचार कधी केलाहेत तुम्ही? वेश्या त्यांच्या जागीच ठीक दिसतात. कॅनव्हासवर नव्हे." असे बोलून दुसऱ्या क्षणाला ते ताडताड निघून गेले.

- २० -

डिसेंबरच्या सुरुवातीपासूनच पॅरीसमध्ये जागोजागी उत्साहाचे वातावरण जाणवू लागले. दुकानात नाना तऱ्हेचा माल दिसू लागला. लोक खरेदीसाठी गर्दी करू लागले. मित्रांशी बोलताना हेन्रीच्या लक्षात आले की प्रत्येकाचा नाताळच्या सुटीत काय काय करायचे याचा बेत ठरलेला आहे. कोण मैत्रिणीकडे तर कोण नातेवाइकांकडे जाणार असतो. तीन वर्षांची मैत्री अॅतेलिएमधील शेवटच्या टर्मबरोबर संपणार होती. सर्वजण लवकरच वेगवेगळया दिशेने पांगणार होते. दुपारचे ओग्युस्तिनामधील आनंदी वातावरण, ल नुव्हेलमधील वादविवाद व रात्रीची ल एलीसमधली धमाल या सगळयांना हेन्री लवकरच मुकणार होता.

नाताळच्या संध्याकाळी आईच्या घरी बसला असताना तो या विचारांनी उदास झाला. छतावर दिव्याच्या प्रकाशाचा लंबगोल कवडसा पडला होता. फायर प्लेसमध्ये एक मोठा ओंडका धगधगत होता. मेंटलवर ठेवलेल्या अॅलॅबॅस्टर क्लॉकची

टिकटिक एखाद्या गळक्या नळातून पाणी ठिबकण्याचा आवाज यावा त्याप्रमाणे वाटत होती. बाहेरच्या शांत वातावरणात बर्फ भुरभुरत होता. मधूनच रस्त्यावरच्या रहदारीचे आणि नाताळच्या गर्दीचे आवाज येत आणि विरून जात. उरे फक्त दिव्याच्या पिवळसर प्रकाशातील निःस्तब्ध शांतता.

"तुमचा इकॅरस काय म्हणतोय?" हातातले विणकाम मधेच थांबवीत आईने विचारले, "तुमच्या मनासारखं काम होतंय ना."

"फारच छान चाललंय." आई आपल्या चित्रकलेविषयी उत्सुकता दाखवतेय याचा त्याला फारच आनंद झाला. "प्रायमरी शॅडोज् रंगवून झाल्यात. चेहरासुद्धा संपत आलाय. पण अजून खूप घोटकाम करायचं बाकी आहे."

बोलताना तो आईकडे बघत होता. बिचारी. तीही त्याच्यासारखीच एकाकी होती. एका परीने ती मायलेकरे दोघेही समदुःखी असली तरी हळूहळू वाढत जाणाऱ्या दुराव्याचा एक अदृश्य पडदा त्या दोघांच्या मधे लटकत होता. त्यामुळे त्यांच्या संवादात मधेच खंड पडायचा.

नाताळमध्ये काय करावे याचा बेत काही नक्की होऊ शकला नाही. पण बोलता बोलता पुढच्या वर्षी स्टुडिओ भाड्याने घेण्याचा विषय निघाला. आईने स्वतंत्र स्टुडिओ असावा याला मान्यता दिली. पण मोंमार्त्रमध्ये स्टुडिओ थाटायला तिचा ठाम विरोध होता.

"हे बघ. पाहिजे तर मादाम ल्युबतेला देखरेखीला म्हणून ठेवता येईल. पण स्टुडिओ घ्यायचा असेल तर तो चांगल्या वस्तीतच हवा."

त्याची नजर परत शेकोटीतल्या विस्तवाकडे वळली. या वेळी आपले मित्र काय करत असतील असे त्याच्या मनात आले. फ्रँक्वा गोझी, लुई आँक्तां, रेने ग्रॅनीए, रॅचो व त्याच्या मैत्रिणी.

हातातील विणकाम चालू ठेवून मधेच आई त्याच्याकडे बघत होती. त्याचा अस्वस्थपणा तिच्या लक्षात आला. तिला वाटले, अजून तरी सगळे ठीक चाललेय.

पण पुढे काय वाढून ठेवलेय देव जाणे. हेन्रीची थोडा काळ लांबलेली पौगंडावस्था संपत आली होती आणि आता तो तारुण्यात पदार्पण करू पाहत होता. कळी पूर्ण उमलायला अजून थोडा अवकाश होता. तुलूझ् लोत्रेकांचे गरम रक्त त्याच्या धमन्यांत सळसळू लागले होते. वारे घोंगावू लागले होते पण वादळ सुरू व्हायला अजून अवकाश होता.

- २१ -

नाताळची सुटी संपली. हेन्री परत इकॅरसच्या कामाला लागला. ॲतलिए, ओग्युस्तिना, ल एलीसचे रहाटगाडगे परत चालू झाले. एकदा वर्गात डायना ॲट बाथ हे चित्र रेखाटताना तो नेहमीप्रमाणे मॉडेल मारियाच्या नग्न देहाकडे टक लावून पाहत होता.

*(मारियाचे लोत्रेकने केलेले स्टडी पेंटिंग स्टॉकहोम म्युझियममध्ये आहे)*

पण त्या दिवशी त्याचे पेंटिंगकडे लक्ष लागेना. त्याला काहीतरी वेगळेच वाटू लागले. मध्यभागी फुरफुरणारा स्टोव्ह, लाकडासारखी ताठ बसलेली मारिया, पेपर वाचत बसलेले मस्य कॉर्मेन, आपापल्या इझलवर मान खाली घालून काम करत असलेली मुले. म्हटले तर सगळया गोष्टी अगदी नेहमीसारख्या होत्या. कदाचित त्या दिवशी सकाळपासून त्या सगळयांचे संदर्भ पार बदलून गेले होते.

हेन्री अतिशय बुद्धिमान होता. त्याच्या हातात कला होती. मायकेल अँजेलो, एल ग्रेको, हाल्से, व्हेलाक्वेझ वगैरे महान कलाकारांच्या गाजलेल्या चित्रांच्या अभ्यासपूर्ण नकला त्याने केल्या होत्या. गेल्या तीन वर्षांत कलेकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन चांगलाच विकसित झाला होता. कलेतील महानता म्हणजे काय याची प्रगल्भ जाण त्याला होती. सुंदर गोष्टींचे नुसते सुंदर चित्रण म्हणजे कला नव्हे हे त्याला समजले होते. आणि इथे या कला शिक्षणाच्या वर्गात न्युडचे चित्रण कसे आखीव-रेखीव, गुळगुळीत करायचे हे त्याच्या गळी उतरवले जात होते. व्यक्तिचित्रण करण्याचे नियम कवायतीच्या शिस्तीसारखे कडक होते आणि त्यात न्युडची शिस्त तर फारच कडक. न्युडचा विषय असलेली स्त्री अगदी सुरेख बांधेसूद दिसायला हवी.

तिच्या स्तनांनी बघणाऱ्याचे कुतूहल चाळवले गेले पाहिजे. जांघा अगदी स्वच्छ दाखवायच्या. तेथे केस दाखवून चालणार नाही. योनी शक्यतो वस्त्राच्या मागे लपलेली किंवा हाताने झाकलेली असावी. तितीॲनच्या व्हीनससारखी. योनी दाखवायचीच झाली तर ती अनाघ्रत वाटायला हवी. मग ती मॉडेल कशी का असेना.

*नॉम दे दियू.* च्यायला. कुठे गेला तो भिकारडा रॉ अँबर. हा इकॅरस कधी संपणार आहे देव जाणे. इकॅरसच्या कामाला त्याने सुरुवात केली तेव्हाच पुढे त्याला कंटाळा येणार आहे याची कल्पना होती. मग आजच हा सगळा उपद्व्याप टाकून पळून जाऊन सरळ आईच्या कुशीत तोंड खुपसून रडावे असे का वाटत आहे?

आदल्या रात्री त्याच्या स्वप्नात ज्युली आली होती. रॅचोची नवी मैत्रीण. कोचावर पहुडलेला तिचा नग्न देह एका बाजूने अँबर तर दुसऱ्या बाजूने मिडनाइट ब्ल्यू रंगात न्हाऊन गेला होता. तिची रानटी स्ट्रॉबेरीसारखी रेडिश पर्पल रंगाची टचटचीत स्तनाग्रे उठून दिसत होती. त्याने तिला हलकेच स्पर्श केला. तिची अंगकांती फाइन ग्रेनच्या कॅनव्हासच्या पोताप्रमाणे होती. नकळत त्याचे ओठ तिच्या ओठांवर टेकले गेले. श्वासात श्वास मिसळला. देहातून वीज सळसळली. तिच्या मांड्या विलग झाल्या. त्याचा देह तिच्या देहात शिरण्यासाठी धडपडू लागला. सुखाच्या स्पंदनांची एक तीव्र लाट सर्व देह व्यापून उरली.

रात्री स्वप्नात आलेली ज्युली दिवसासुद्धा त्याच्या नजरेसमोर तरळत असायची. त्याच्या देहाला स्वप्नपूर्तीची आस लागून राहिली. दिवस-रात्र तो तळमळत असायचा. मोंमार्त्रमध्ये असा सहवास मिळणे मुळीच अप्राप्य नव्हते. मुली तर पैशाला पासरी पडल्या होत्या. थोडीशी खुशामत, एखादी सुंदरशी भेट, चांगल्या हॉटेलमध्ये मस्तपैकी पुख्खा, नाही तर चक्क पैसे. रोख पैसे कोणाला नको होते? तसे पाहिले तर काम खूप सोपे होते.

- २२ –

अर्धवट केलेल्या न्युडकडे तंद्रीत बघत असताना पाच मिनिटांची सुटी केव्हा झाली ते हेन्रीला कळलेच नाही. तो जागेवरून उठला. फक्त एका नवीन आलेला विद्यार्थी सोडला तर इतर सर्वांनी हातातले काम थांबवले होते. हेन्री त्या नवशिक्या विद्यार्थ्याकडे गेला.

"तुम्ही व्हिन्सेंट व्हॅन गॉग ना? तुम्ही नाताळच्या सुटीनंतर या वर्गात नाव घालणार आहात म्हणून तुमच्या भावानं सांगितलं होतं."

"आणि तुम्ही तुलूझ लोत्रेक." नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्याने आपले चित्र काढण्याचे मधेच थांबविले व मान वर करून हेन्रीकडे बघितले. त्याचे डोळे नीलमण्याप्रमाणे चमकत होते.

"तेओ व्हॅन गॉगनी मला तुमच्याविषयी सांगितलं होतं."

"तुम्ही कधी आलात?"

"कालच. आल्याबरोबर ताबडतोब लुव्हर बघायला गेलो." त्याने लुव्हरचा उल्लेख इतक्या भाबड्या उत्साहाने केला की हेन्रीला आपले हसू आवरता आले नाही. हेन्रीला हसताना बघून त्या नवख्या तरुणाच्या चेहऱ्यावरचे भाव पालटू लागले. त्याच्या नजरेतील स्निग्धता लोपली.

"माझं काही चुकलं का?" तो चाचरत म्हणाला.

हेन्रीला वाटले की किती संवेदनशील आहे हा. तरी त्याच्या भावाने बजावून सांगितले होते.

"अहो तुमची चेष्टा करण्याचा माझा उद्देश नव्हता. पॅरीसमध्ये लुव्हरशिवाय बघण्यासारख्या खूप गोष्टी आहेत. त्या बघायच्या ऐवजी तुम्ही सरळ लुव्हरमध्ये जाऊन टपकलात. आम्ही लुव्हरला कबरस्तान म्हणतो. माहित्येय तुम्हाला."

लुव्हरसारख्या जगप्रसिद्ध कलासंग्रहालयाचा उल्लेख हेन्रीने कबरस्तान असा केलेला पाहून व्हिन्सेंट एक क्षणभर गोंधळला पण त्यातील व्यक्रोक्ती ध्यानात येताच त्याच्या तोंडावर हसू फुटले. त्याचा चेहरा उन्हातान्हात रापलेला होता व गालफडे थोडी वर आलेली दिसत होती. त्याच्या ओठातील हास्य हळूहळू सर्व शरीरभर पसरू लागले. लुव्हर एक कबरस्तान असे म्हणत हसता हसता त्याची लांबुडकी मान, खांदे, छाती, लांबलचक हात असे सर्व शरीर त्याच्या खदाखदा हसण्याने गदगदू लागले. त्याचे ते शरीर पिळवटल्यासारखे हसणे एखाद्या भुताने झपाटल्यासारखे वाटत होते.

हेन्री अवघडून त्याच्याकडे बघत राहिला. सर्व डच लोक असेच हसत असतील का? त्या अचानक झालेल्या हास्यस्फोटाने वर्गातल्या सर्वांच्या गप्पा थांबल्या. मॉडेलच्या स्टुलावर शून्यात नजर लावून बसलेल्या मारियाने दचकून बाजूला पडलेला गाऊन उचलून आपल्या विवस्त्र अंगावर पांघरला. एखादी प्रचंड लाट किनाऱ्यावर फुटून गेल्यानंतर वाळूवर पसरणाऱ्या फेसाप्रमाणे हळूहळू त्याचे हसू विरत गेले.

‘‘लुव्हर एक कबरस्तान. क्या बात है!’’ डोळ्यातील पाणी पुसत पुसत व्हिन्सेंट म्हणाला. त्याच्या डोळयांत पूर्वीची चमक परत आली होती.

‘‘तुम्ही आज आमच्याबरोबर जेवायला चला. ओग्युस्तिनाच्या हाताची चव एकदा चाखून पाहिल्यावर जन्मभर विसरणार नाही. मग वाटलं तर माझ्या स्टुडिओवर चला.” जेवताना व्हिन्सेंटला सर्वांनी प्रश्न विचारून भंडावून सोडले. हॉलंड, तेथल्या प्रसिद्ध पवनचक्क्या व कालवे, ट्युलिपची फुले, चीज वगैरे. त्याच्या नावाचा योग्य उच्चार. गॉग. डच उच्चार हॉप्. फ्रेंचांच्या कानाला डच भाषा तोंडात पाण्याची गुळणी केल्याप्रमाणे वाटे. हॉलंडमधील कलाविश्वाची परिस्थिती काय आहे? इथल्यासारखी कलाविद्यालये तेथे आहेत का? असल्यास तिथले पंतोजीसुद्धा इथल्यासारखे रंग घोटायला शिकवतात का? आणि ती वैताग आणणारी ॲनाटॉमीची घोकंपट्टी? रेब्रांदची कितीशी पेंटिंग तिथे आहेत? त्यातली कितीशी तुम्ही पाहिली आहेत? आणि रेब्रांदचे ते ॲमस्टरडॅम का रॉटरडॅममधील घर? पॅरीससारखी

लज्जतदार खाद्य संस्कृती तिकडे आहे का? एक ना हजार प्रश्नांची सरबत्ती त्याच्यावर चालू होती आणि सर्वात मुख्य म्हणजे तिथल्या पोरी कशा आहेत? इथल्या पोरी कशा सुरुवातीला तोऱ्यात असतात. अगदी ओझरता स्पर्शही करू देत नाहीत. पण एकदा प्रेमात पडल्यावर सरळ बिछान्यात शिरतात. जेवढे जास्त डिवचावे तेवढ्या जास्त चवताळून उठतात.

तो वयाच्या बत्तिशीतला ताम्रकेशी तरुण त्या कोवळया पोरसवदा विद्यार्थ्यांच्या घोळक्यात घोडाच वाटत होता. त्याच्या ससाण्यासारख्या तीक्ष्ण गहिऱ्या निळया डोळयांत एक प्रकारचे गूढ आकर्षण होते. शिवाय त्याचे फ्रेंचवरील प्रभुत्व. अगदी शिव्यांसकट. त्यामुळे थोड्याच वेळात तो सर्वांच्या आकर्षणाचा विषय झाला.

- २३ -

वर्ग संपल्यानंतर दुपारच्या जेवताना भरणाऱ्या गप्पांच्या मैफिलीत आज तेओचा भाऊ व्हिन्सेंटची भर पडली होती.

"तुम्ही लुव्हरमध्ये आमची मोनालिसा नक्कीच पाहिली असेल." आँक्तां साळसूदपणे म्हणाला. ''अप्रतिम मास्टरपीस. असं पेंटिंग करणं लिओनार्दोसारख्या प्रतिभेची दैवी देणगी असलेल्या चित्रकारालाच शक्य आहे. मोनालिसा ही या पृथ्वीतलावरची एक उत्कृष्ट कलाकृती आहे. काय म्हणताय, माझं म्हणणं मान्य आहे ना?'' सर्वांकडे एक आव्हानात्मक दृष्टिक्षेप टाकत तो पुढे म्हणाला, ''ज्याला मान्य नसेल त्यानं माझ्याकडे मान वर करून तर पाहा. मी त्याच्या थोबाडावर थुंकेन. काय समजलात!'' व्हिन्सेंटकडे वळून तो पुढे म्हणाला, ''मागच्याच आठवड्यात मी लुव्हरला जाऊन आलो. एवढी परिपूर्ण कलाकृती जगात दुसरीकडे असणं शक्यच नाही. काय काम आहे मोनालिसाचं! नतमस्तकच व्हायला होतं तिच्यासमोर.''

''मग का नाही तिथल्या तिथे गुडघे टेकून गांड वर केलीस.'' हेन्री कुचेष्टेने हसत म्हणाला, ''तुला कसं कळलं की मोनालिसा जगातील एक उत्कृष्ट कलाकृती आहे

म्हणून? जगातील अशी कितीशी पेंटिंग तू पाहिलीयस? जगातील जाऊ दे. फ्रान्समध्ये एकूण किती म्युझियम्स आहेत ते तरी तुला ठाऊक आहे का? तेसुद्धा लांब राह्यलं. आपल्या पॅरीसचं सांग. लुव्हरला किती वेळा गेला आहेस? जे पाहिलंस ते तरी नीट विचक्षण दृष्टीने पाहिलंयस का? अरे जग खूप मोठं आहे. पॅरीसच्या जरा बाहेर बघ. युरोप, रशिया, अरेबिया, आशिया, अमेरिका, आफ्रिका. कित्येक देश, भाषा, धर्म, संस्कृतींचे विविध कालखंड. या सगळयात विखुरलेल्या अगणित कलाकृती. त्यांच्या सौंदर्याचे आकलन करण्यासाठी वेगवेगळया मापदंडांचा शोध घ्यावा लागेल. आणि तू मात्र लुव्हरमधलं रेनेसान्सवरील एखादं दालन जेमतेम बघून झाल्यावर बिनधास्त ठोकून देतोस, मोनालिसा जगातील एक उत्कृष्ट पेंटिंग आहे म्हणून.''

हेन्रीच्या धडाक्याने आँक्तां गारच झाला. आपल्या बोलण्याचा परिणाम अजमावण्यासाठी हेन्री थोडा वेळ थांबून पुढे म्हणाला, ''मोनालिसा उत्कृष्ट कलाकृती आहे की नाही हे एक वेळ बाजूला ठेवू या. मुळात प्रश्न आहे ती नक्की लिओनार्दोचीच आहे, हे तुला कशावरून कळलं?''

''मला कसं काय कळलं?'' कपाळावर आठ्या घालत तो त्वेषाने ओरडला. त्याला हेन्रीच्या वादविवादपटुत्वाचा नेहमी हेवा वाटायचा. आता त्याला त्याच्यावर मात करण्याची संधी आली होती. त्याने टेबलाभोवती जमा झालेल्या विद्यार्थ्यांच्या कोंडाळयावरून एकदा नजर फिरवून हेन्रीकडे बोट दाखवीत म्हटले, ''बघा. हा मच्छर मला विचारतोय मोनालिसाचा कर्ता लिओनार्दोच कशावरून?'' गोलिएथने डेव्हिडकडे बघून असेच दात विचकले असतील. त्याने पुढ्यातला ॲबसिंथचा पेला एका दमात घशात ओतून आपला आवेश द्विगुणित केला. मिशा पुसत तो पुढे म्हणाला, ''अरे अर्धवटा, ते कळायला काही फारशी अक्कल लागत नाही. ते इथे जाणवतं. अभिजात कलाकृतीचं सौंदर्य या इथे हृदयाला भिडतं.''

''तुला कुठे जाणवतं हृदयात, पोटात की आणखी कुठे याला काहीच किंमत नाही. मलासुद्धा इथे माझ्या हृदयात जाणवतंय की तू एक निव्वळ गाढव आहेस. पण

माझ्या जाणवण्याने तू गाढव ठरतोस का? की मला जाणवायला लागल्याबरोबर झालास की काय गाढव?''

सर्वजण हसू लागले. व्हिन्सेंटने आपला पाइप पेटवला. आँक्तां रागाने लालबुंद झाला. त्याला वाटले होते की पुराव्यांची चिरफाड करत बसण्यापेक्षा आतल्या आवाजावर काम सोपविले की हेन्रीला प्रतिवाद करणे कठीण जाईल पण झाले उलटेच.

''ते तिच्या नजरेतलं गूढ स्मित.'' अचानक त्याच्या डोक्यात नवा मुद्दा डोकावला, ''ते अनोखे, कंपायमान, संमोहित करणारे सांद्र स्मित अगदी आंधळ्यालासुद्धा दिसेल. आता तुला जर असं म्हणायचं असेल की ते स्मितच नव्हे तर मात्र मला तुझ्या थोबाडावर थुंकायलाच हवं.''

''ती तुझी मोनालिसा. तिला तिच्या ओठातून हसू दे, डोळ्यांतून नाही तर बेंबीतून. माझं काही म्हणणं नाही. मला फक्त एवढंच विचारायचंय की तू म्हणतोस त्याप्रमाणे त्या जगप्रसिद्ध पोर्ट्रेटचा चित्रकार लिओनार्दोच कशावरून?'' हेन्री प्रत्येक शब्दावर जोर देत म्हणाला.

थोडा वेळ शांतता.

''हात्तीच्या. त्यात काय. टेक्निकवरून सांगता येईल. प्रत्येक चित्रकाराची स्वतःची अशी शैली असते. आता लिओनार्दोसारख्या जगप्रसिद्ध चित्रकाराच्या हाताचं काम त्याच्या शैलीवरून एखाद्या शेंबड्या शाळकरी मुलालासुद्धा ओळखता येईल. पण काही ठोकळ्यांना तीन वर्षं घासूनसुद्धा शैली म्हणजे काय ते समजत नसेल तर त्याला माझा नाइलाज आहे.'' आपण हेन्रीला निरुत्तर केले या विश्वासाने आँक्तां खुर्चीत थोडा मागे रेलला.

''अरे फुकट तू लुव्हरमध्ये खेपा मारल्यास. तिथल्या त्या बागेतल्या कीडमुंग्यांनासुद्धा तुझ्यापेक्षा जास्त अक्कल असेल. आता नीट लक्ष देऊन ऐक मी काय सांगतोय ते. लंडनमध्ये नॅशनल गॅलेरी नामक एक म्युझियम आहे. आपल्या

लुव्हरसारखं. त्यात मॅडोना ॲट रॉक या आपल्या लुव्हरमधल्या प्रसिद्ध पेंटिंगची एक दुसरी प्रतिकृती आहे. ते लिओनार्दोने आपल्या एका शिष्याच्या मदतीनं रंगवलेलं आहे. जरा थांब. मधेच बोलू नकोस. अजूनपर्यंत कोणत्याही तज्ञाला त्या पेंटिंगमधला कोणता भाग लिओनार्दोचा आणि कोणता त्याच्या शिष्याचा असा फरक दाखवून देता आलेला नाही. तू जे म्हणतोस ती शैली, ते ब्रशस्ट्रोक्स सर्व पेंटिंगभर अगदी सारखे आहेत. कदाचित सगळं पेंटिंगच त्या अनामिक शिष्याने केलं असेल आणि तुझ्या लिओनार्दो महाशयांनी आपल्या सिद्धहस्त हातांनी खाली फक्त सही ठोकून दिली असेल. झालं.''

आँक्तांने आपला पाइप शिलगावला व हेन्रीच्या तोंडावर धुराचे लोट सोडायला सुरुवात केली. वाग्‌युद्धात मुद्दे संपल्यावर खेळली जाणारी एक सर्वसाधारण चाल तो वापरू पाहत होता. हेन्री ते धुराचे लोट आपल्या हाताने बाजूला सारत म्हणाला, ''आता मीच तुम्हाला सांगतो की ते पेंटिंग लिओनार्दोनेच केलं याचा ठोस पुरावा काय तो.'' असे म्हणून तो नाट्यपूर्ण रीतीने थांबला.

''चल सांग पाहू लवकर.'' सर्वांची उत्सुकता ताणली होती.

''त्या पेंटिंगखाली ती छोटीशी चकचकीत पितळी पाटी आहे ना त्यावर लिहिलंय, 'लिओनार्दो द व्हिन्सी. १४५२-१५१९'. ती पाटी नसती तर तुला समजलं असतं का ते पेंटिंग एक महान कलाकृती आहे म्हणून. ते पेंटिंग लुव्हरऐवजी तुला एखाद्या रद्दीच्या दुकानात धूळ खात पडलेलं दिसलं असतं तर जाणवली असती का त्याची महानता तुझ्या त्या हृदयात. तू काय म्हणाला असतास ते मी सांगतो तुला. रेनेसान्सच्या काळातलं दिसतंय. रंगकाम बरं केलंय पण खूप तडे गेलेयत. शिवाय वॉर्निशसुद्धा जास्तच लावलेलं दिसतंय. पाचशे फ्रँकपेक्षा एक छदामसुद्धा कोणी जास्त मोजला नसता.'' हेन्रीने सर्वांकडे मिस्कील हसत पाहिले, ''काय बरोबर आहे की नाही?''

हेन्रीचा युक्तिवाद इतका बिनतोड होता की पुढे वादाला वावच नव्हता. त्यामुळे विषय आपोआपच बदलला. ''पाचशे फ्रँक माझ्याकडे असते तर मी काय केलं असतं

माहितेय?'' रॅचो मधेच म्हणाला आणि मग सर्वांनीच पाचशे फ्रँकमध्ये आपण काय काय केलं असतं त्याचे हवेत किल्ले बांधायला सुरुवात केली. त्यात कोणी कल्पनेतसुद्धा पाच फ्रँक खर्चून एखादं पेंटिंग विकत घेण्याची तयारी दाखवली नाही.

''पण लुव्हरची बातच न्यारी.'' गप्पांचे रूळ बदलले तरी हेन्री आपला मुद्दा सोडायला तयार नव्हता. ''आत शिरताच लोक अगदी गंभीर होतात. एकदम चिडीचूप. डोक्यावरची हॅट हातात. दबक्या पावलांनी चालत. तोंडावर आश्चर्याचे भाव. आता काही अप्रूप पाहायला मिळणार आहे असे. कसले मूर्ख चुत्ये लोक लुवरमध्ये येत असतात. पेंटिंगकडे कोणाचंही लक्षच नसतं. सगळयांच्या नजरा खालच्या पितळी पाट्यांकडे. एखादं ओळखीचं नाव दिसलं रे दिसलं की मान वर करून पेंटिंगकडे एक दृष्टिक्षेप टाकला की ताबडतोब यांचा शेरा तयार. 'वा! कॉरेज्जो काय, उत्तम! काय टॉप काढलंय. इकडे बघ, रेम्ब्रांद! किती मस्त आहे नाही. अय्याऽ हा पाहिलास का तितीअन. इकडे बघ रूबेन्स आहे.' येथे येऊन जन्माचं सार्थक झालं असा भाव सगळयांच्या चेहऱ्यावर झळकत असतो. पेंटिंग कोणती पाहिली, त्यात काय पाहिलं म्हणून विचारलं तर कोणाला काही सांगता येणार नाही. पण कोणाची पाहिलीत म्हणून विचारलंत तर पोपटासारखी सगळी यादी घडाघडा म्हणून दाखवतील. खरं सांगू, त्या मोनालिसाच्या पेंटिंगला प्रत्यक्ष सामोरं जाण्यापूर्वीच एका प्रचंड आदराच्या भावनेखाली आपण दडपून गेलेलो असतो. साहजिकच प्रत्यक्ष चित्रासमोर येऊन उभे ठाकतो तेव्हा फ्लॉरेन्समधल्या एका व्यापाऱ्याच्या कुटुंबातील, साधारण व्यक्तिमत्वाची, हाताची घडी घालून ओठांच्या कोपऱ्यातून किंचित हसणारी एक मध्यमवयीन स्त्री असं रूप आपल्याला दिसतच नाही. आपल्याला दिसतो तो लिओनार्दो. एक ख्यातनाम रोमँटिक नायक. लांब दाढी व प्रतिभेच्या वलयामागे झाकलेला त्याचा चेहरा. नकळत तुमच्या नजरेसमोर येतात ते चारशे वर्षांपूर्वीचे फ्लॉरेन्सवासी. त्यांची उच्च अभिरुची आणि कलेची जाण. वैभवसंपन्न जीवन. दागिन्यांनी मढलेल्या लावण्यवान दरबारी स्त्रिया. आणि तुम्ही पेंटिंगसमोर नतमस्तक होता ते या जाणिवेने. अभिजात कलेच्या अनुभूतीने नव्हे.''

"ही सगळी बंडलबाजी आहे." आँक्तांचा पारा आता खूप चढला होता, "मूर्खा, जातीच्या प्रतिभावंताची कला आपल्या स्वयंभू तेजाने एखाद्या हिऱ्यासारखी झळकत असते. भर दिवसासुद्धा त्या तेजाने डोळे दिपतात. ते तेज एका दृष्टिक्षेपातच ओळखू येतं. रेम्ब्रांद, तितीअन, लिओनार्दो..."

"थांब, थांब-" हेन्रीचा स्वर उत्तेजित झाला होता. "तसं असेल तर त्या मोनालिसाच्या नवऱ्याला बरं दिसलं नाही आपल्या बायकोच्या पोर्ट्रेटचं ते दैदीप्यमान तेज?" रॅचोने आपल्या शिष्याकडे अभिमानाने पाहिले.

"तुला माहितेय त्याला ते पोर्ट्रेट मुळीच आवडलं नव्हतं. इतकं की त्याने ते स्वीकारायला चक्क नकार दिला होता. आणि त्याला ते पसंत पडावं म्हणून लिओनार्दो त्यात सुधारणा करून देणार होता. स्वतः चित्रकारालासुद्धा आपल्या कलाकृतीचं तेज जाणवलं नव्हतं. कलाकृतीमधील तेज कोणालाही जाणवतं असं म्हणतोस तर ते त्या फ्लॉरेन्सच्या राजाला का नाही रे दिसलं. तो तर एवढा मोठा जाणकार, सर्व कलांचा आश्रयदाता. तू म्हणतोस तसं असतं तर लिओनार्दोला नाट्यगृहाच्या कपडेपटात पडदे रंगवण्याचं काम करायला लागलं नसतं. तुझ्या त्या रेम्ब्रांदच्या नाइटवॉच या चित्राची लोकांनी कुचेष्टा नसती केली. त्याच्या आयुष्याची अखेर निष्कांचन अवस्थेत झाली नसती. वॉत्तोवर दुकानांच्या पाट्या रंगवायची वेळ आली नसती. तिनिअर्स माहित्येय तुला? आपल्या पेंटिंगला पाच-दहा फ्रँकचं गिऱ्हाईक मिळावं म्हणून चक्क आपण मेल्याची हूल त्याला उठवावी लागली. शॅद्राँ. कुडकुडणाऱ्या थंडीपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी त्याला आपलं पेंटिंग एका फाटक्या कोटाच्या बदल्यात विकावं लागलं. हे सगळे लोक प्रतिभावान होते. पण त्यांच्या प्रतिभेचा प्रत्यय त्यांच्या समकालीन एकाही महाभागाला जाणवला नव्हता. मागचा भूतकाळ कशाला तपासायला पाहिजे. आपलंच उदाहरण घेऊ. आपण स्वतःला एवढे मर्मज्ञ जाणकार समजतो. आपल्या पूर्वसूरींची महानता कळण्याएवढी उमज आपल्यापाशी आहे असाही गर्व आपल्याला असतो. पण आपल्या समकालीन चित्रकारांकडे बघताना ती दिव्य दृष्टी कुठे जाते. सेझानचंच उदाहरण घेऊ या. सेझान या जमान्यातला एक महान चित्रकार आहे हे मत किती जणांना मान्य होईल कोण जाणे. एखाद्या दिवशी त्याची

पेंटिंग लुव्हरमध्ये लिओनार्दोच्या बरोबरीने लटकतील. खाली एक पॉलीश केलेली छोटीशी पाटी चमकत असेल. पॉल सेझ्झान."

"हा सेझ्झान कोण?" इतका वेळ गप्प बसलेल्या व्हिन्सेंटने निरागसपणे विचारले.

"आहे एक असाच कोणीतरी. वादासाठी कोणाचंतरी नाव घ्यायचं म्हणून सेझ्झानचं घेतलं. एवढंच." गोझी म्हणाला.

रॅचो हेन्रीला शाबासकी देण्याच्या सुरात म्हणाला."तू म्हणतोस ते सर्व खरंय. पण उदाहरण देण्याच्या भरात फार वाहवत गेलास. आता सेझ्झानची चित्रकला काय लायकीची आहे ते एक हा व्हिन्सेंट सोडला तर इथे सगळयांना चांगलंच ठाऊक आहे. अगदी इंप्रेशनिस्टांनासुद्धा त्याला आपला म्हणवून घ्यायला लाज वाटते. इंडिपेन्डन्सच्या प्रदर्शनात त्याची पेंटिंग लावायचीच झाली तर ते अगदी नाइलाजाने एखाद्या काळोख्या कोपऱ्यात कोणाच्या चटकन दृष्टीला पडणार नाहीत अशी लावतात." रॅचोने हेन्रीकडे अभिमानाने पाहिले. आईचे बोट धरून चालणाऱ्या एका मुलाचे रूपांतर मोंमार्त्रमधल्या एका चित्रकलेत मुरलेल्या विद्यार्थ्यांत झाले होते.

"अरे अज्ञ बालका, लुव्हरमध्ये प्रवेश मिळणं हे काही इतकं सोपं नाहीये. सेझ्झानच्या पेंटिंगला लुव्हरमध्ये कधी काळी जागा मिळेल असं चेष्टेतसुद्धा म्हणणे मोठ्या धाडसाचे ठरेल. आता तुझी पेंटिंगसुद्धा लुव्हरमध्ये लागतील असंही कोणी म्हणेल एखादे वेळेस." रॅचो मोठा गडगडाट करून हसला.

- २४ -

लूव्हरवरून चाललेल्या वादविवादाचा ओघ व्हिन्सेंटकडे वळला. रोजच्या जगण्यातील विषय जास्त महत्वाचे होते. रंग उधारीवर कुठून घ्यावेत, चारकोल फिक्सर स्वस्तात कुठे मिळतो, ॲनाटॉमीचे मॅन्युअल जुन्या बाजारात कुठे मिळते या आणि इतर अनेक बारीकसारीक बाबतीत उलटसुलट सल्ले व्हिन्सेंटला बसल्या जागी मिळाले. तो अगदी गोंधळून गेला. गप्पांच्या ओघात लांबलेले जेवण संपता संपता

फिरून एकदा, चित्राच्या त्रिकोणात्मक रचनेचे महत्त्व, रंगांचे गुणधर्म, रंगचक्रावरील त्याचे स्थान आणि रंगसंगती, रेषेवरील हुकमत वगैरे बाबींचा आपल्या पेंटिंगची सॅलाँमध्ये निवड होण्यासाठी कितपत उपयोग होईल यावर जोरदार वितंडवाद झाला. जेवण संपले तरी मुद्दे संपले नाहीत. त्यामुळे कॅफेमधून बाहेर पडल्यावर भर रस्त्यात त्याच विषयांवर नव्या मुद्द्यांनी जोरदार चर्चा चालूच राहिली. दिवसाअखेरी सर्वजण आपापल्या दिशांना पांगेपर्यंत.

रू कुलँकूर येईपर्यंत व्हिन्सेंट अगदी गप्प होता. जिना चढता चढता तो गंभीरपणे म्हणाला, “मला वाटलं होतं पॅरीसला येऊन चित्रकलेतलं काहीतरी शिकता येईल. पण भावाचं म्हणणं खरं दिसतंय. नवं काही शिकण्याच्या दृष्टीने माझं वय जास्त आहे.” मोंमार्त्रमध्ये फिरताना रस्ता चुकलेल्या नवख्या माणसासारखा तो गोंधळलेला दिसत होता.

“तुम्ही असे निराश होऊ नका मस्य व्हिन्सेंट. ही त्रिकोणात्मक रचना, रंगांचं संतुलन जेवढं वाटतं तेवढं मुळीच कठीण नाहीय. सुरुवातीला सगळयांनाच नवीन असतं. थोड्या दिवसात सगळं जमू लागेल तुम्हाला.” हेन्रीने दिलासा दिला.

स्टुडिओ येईपर्यंत त्या दोघांतील औपचारिकपणा जाऊन तो हेन्रीच्या मोंमार्त्रमधील मित्रांच्या टोळक्यातील एक सदस्य झाला. स्टुडिओत शिरल्यावर हेन्रीने व्हिन्सेंटकडे त्याची स्केचेस बघायला मागितली.

“पहिल्यांदा तुझं पेंटिंग बघू दे.” अर्धवट काढून झालेल्या इकॅरसकडे बघत व्हिन्सेंट म्हणाला, “वा! काय छान काम केलंयस. तुझी ॲनाटॉमी अगदी पक्की दिसतेय बरं का. ती नावं माझ्या लक्षात राहत नाहीत.”

“असा घाबरतोस काय ॲनाटॉमीला. नागडी बाई काढता येते ना. आता उरोजांना आणि कुल्ल्यांना लॅटिनमध्ये काय म्हणतात ते लक्षात ठेवलं की झालं. तुझं म्हणणं खरंय. लॅटिन लक्षात ठेवायला थोडं कठीण जातं. तू असं कर. अभ्यास करायला माझ्याकडेच येत जा. सगळी ॲनाटॉमी आपण पाठ करून टाकू.”

"स्त्रियांपेक्षा मला शेतात राबणारे शेतकरी रंगवायला आवडेल. दिवसभराच्या अंगमेहनतीने दमलेले शेतकरी कधी पाहिलेयस तू? आपल्या शर्टाच्या बाहीने कपाळावरचा घाम कसा पुसतात ते. माझी रेषा त्यांचे श्रम घेऊन कागदावर उमटली पाहिजे. उन्हात चमचमणारी शेते, झाडे, फुले आणि आकाशीचा सूर्य हे सगळं काही मी रंगांत पकडण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यासाठी मला केवढा पिवळा रंग लागेल नाही? एकदम पिवळाधम्मक. देवाचा रंग कोणता ठाऊक आहे. पिवळा. म्हणूनच त्याने सूर्य पिवळया रंगाचा केलाय."

व्हिन्सेंटचे असे भारावून जाऊन बोलणे हेन्रीला थोडसे चक्रमपणाचे वाटले. तो त्याच्याकडे नजरेच्या कोपऱ्यातून बघत होता. "तुझ्या देवाला ढीग पिवळा रंग आवडत असेल, पण आपल्या कॉर्मेन मास्तरांना मात्र फक्त तपकिरी आणि तपकिरी रंगच आवडतो बरं का. व्हॅन डाइक आणि रॉ अँबर. येथे असेपर्यंत दुसऱ्या रंगाचं नावसुद्धा काढू नकोस."

व्हिन्सेंटचे लक्ष कोपऱ्यात पडलेल्या एका लहान कॅनव्हासकडे गेले. त्याने झटकन पुढे जाऊन तो कॅनव्हास उचलला.

"ल एलीसमध्ये नाचणाऱ्या एका मुलीचं पेंटिंग आहे ते. आज रात्री प्रत्यक्षच बघू या तिला."

"ओह! काय छान जमलंय तुला. तुझ्या या मोठ्या कॅनव्हासपेक्षा खूपच जिवंत आणि अस्सल. नर्तकीच्या नाचाची गती, मद्य आणि संगीताची धुंद चढलेली गर्दी सर्व काही अप्रतिमपणे उतरलंय या कॅनव्हासवर. एवढंच नव्हे तर वातावरणातील मद्य आणि तंबाखूचा गंधसुद्धा येतोय या कॅनव्हासमधून. टक लावून पाहिलं तर यातील संगीताच्या सुरावटीवर नकळत पाय ताल धरतील. त्या इकॅरसपेक्षा तू हाच कॅनव्हास अगोदर पुरा कर."

“मी ऐकलं होतं की डच लोक चटकन आपल्या भावना व्यक्त करत नाहीत. पण तू अपवाद दिसतोयस. आमच्या पिताजींचं या पेंटिंगविषयी काय मत आहे ते तुला माहीत नाहीय. त्यांच्या मते हे एकदम फालतू आणि अश्लील आहे.”

“तू सगळ्या गोष्टी त्यांच्या परवानगीनेच करतोस वाटतं?”

“तसं मुळीच नाही.”

“मग तर तुला काय हरकत आहे?”

“इकॅरसला अगोदर हात घालायला आणखी एक कारण आहे. सॅलाँच्या वार्षिक प्रदर्शनासाठी एक पेंटिंग पाठवायचंय. तेथे या कॅनकॅन नर्तकीला हाकलवून देतील. चल. आता तुझं स्केच बुक दाखव बरं.”

व्हिन्सेंटने भीत भीत आपला पोर्टफोलियो त्याच्या हातात दिला. “मी चित्रकलेचा तसा अभ्यास केलेला नाहीय. काहीतरी खरडलंय झालं.” तो संकोचाने अगदी आक्रसून गेला होता.

“हे अगदी सुरुवातीच्या चित्रांपैकी. ही मिलेटची कॉपी,” तो एकामागोमाग एक चित्रे दाखवीत होता. “हे रॉटरडॅमचे दृश्य, हे फिशरमन, ही सीन नदी आणि हे ब्रेबँटचे शेतकरी. पोटॅटो इटर्स.”

*(पोटॅटो इटर्स हे गडद काळपट रंगातील पेंटिंग पुढे जगप्रसिद्ध झाले. ते सध्या ॲमस्टरडॅममधल्या व्हिन्सेंट व्हॅन गॉग म्युझियममध्ये आहे)*

“आणखी आहेत की एवढीच.”

“आणखी बरीच आहेत. खाणीतल्या कामगारांची, शेतकऱ्यांची. भावाकडे ठेवायला दिलीयत.”

बाहेर हळूहळू अंधारून येत होते. हेन्रीने चित्रे खाली ठेऊन दिली.

“माझा पोर्टफोलियो बघून तुला काय वाटतं? जमेल मला चित्रकार व्हायला.”

“व्हिन्सेंट, तुझी चित्रं मला खूपच आवडलीत. असं वाटतं की तुला काहीतरी सांगायचंय तुझ्या चित्रांतून. पोटॅटो इटर्स. उकडलेले बटाटे खाऊन भूक भागवणारे ते गरीब शेतकरी अगदी विलक्षण प्रत्ययकारी वाटतात.”

“तुला खरंच असं वाटतं का? अगदी मनापासून? ” तो कापऱ्या आवाजात म्हणाला, “खरं सांग. जमेल ना मला चित्रकार व्हायला?”

“जमेल म्हणून काय विचारतोस? तू एक चांगला चित्रकार आहेसच.”

व्हिन्सेंटला धन्य वाटले. “थँक्यू सो मच. कोणाला तरी असं वाटतंय हेच खूप आहे.”

बराच वेळ ते दोघे एकमेकांकडे मूकपणे बघत होते. शेवटी शांततेचा भंग करत व्हिन्सेंट म्हणाला, “आपली दोस्ती चांगली जमेल.”

“तू पॅरीसला आलास ते किती बरं झालं. चल, आपण नुव्हेलमध्ये जाऊन बीअर घेऊ या.”




(पोटॅटो ईटर्स – व्हॅन गॉग – तैलरंग कॅनव्हास – ८२x११४ से.मी. - १८८५
व्हॅन गॉग म्युझियम, अमस्टरडॅम)

- २५ -

वर्ष जवळ जवळ संपत आले होते. तरीही हेन्रीच्या मित्रांचे कला आणि स्त्रिया या विषयांवरून अहमहमिकेने एकमेकांशी वाद घालणे काही संपत नव्हते. एवढ्या तेवढ्यावरून एकमेकांना आव्हान देणे, तोंडावर थुंकायची भाषा हे सगळे वरवरचे होते. पाइपचा झुरका मारत आपला खंबीर स्वभाव आणि कणखर पौरुषाच्या कितीही वल्गना केल्या तरी भविष्याच्या कल्पनेने सर्वजण आतून हादरले होते. ॲतेलीएच्या सुरुवातीच्या दिवसांत चित्रकारांच्या भवितव्याबद्दल असलेल्या रोमँटिक कल्पनांना देगाने मागच्या वर्षी जमिनीवर आणण्याचा प्रयत्न केला होता. त्या वेळी त्याच्याकडे कोणी लक्ष दिले नव्हते. पण आता ॲतेलीएतील शिक्षण संपता संपता त्याचे उद्गार आठवले की पोटात गोळा उठत होता.

त्यांनि वरून कितीही आव आणला तरी त्यांची बोहेमिअन जीवनशैली वरवरचीच होती. आतून ते सगळे खरे तर सर्वसामान्यांसारखे डरपोक होते. दुपारी ओग्युस्तिनामध्ये टवाळक्या करीत भोजन, संध्याकाळी नुव्हेलीत बीअरपान आणि

नंतर ल एलीसमध्ये रात्रभर हैदोस हा दिनक्रम आयुष्यभर चालणे शक्य नव्हते. कॉर्मेनच्या वर्गात डायना किंवा पहुडलेली व्हीनस कॅनव्हासवर कितीही घोटून घोटून रंगवली तरी सॅलाँमध्ये पेंटिंग लागेल याचा काही भरवसा नव्हता. जरी एखादे वेळेस लागले तरीही त्याने दोन वेळेच्या जेवणाची भ्रांत काही दूर होणार नव्हती.

ॲतेलीएच्या वाटेवर एका बिस्ट्रोमध्ये बसून हेन्रीचा सकाळचा नाश्ता शांतपणे चालला होता. बाहेर रू फोंतेनमधला दिवस सुरू होत होता. ढकलगाडीवरच्या विक्रेत्यांचा ओरडा, घोडागाडी हाकताना गाडीवानांनी वाटेतल्या लोकांना घातलेल्या हाका, बायकांची कोळीणींशी चाललेली घासाघीस, जुन्या कपड्यांच्या व्यापाऱ्यांच्या आरोळया, चिनी दुरुस्ती कामगारांचा घंटानाद, खिडक्यांना काचेचे तावदान बसवून देणाऱ्याची तारस्वरातली लकेर या सर्वांमुळे वातावरणात एक जिवंतपणा आला होता. धारवाला एक पाय रस्त्याच्या कडेच्या गटारात तर एक फुटपाथवर असे उभे राहून सावकाश धार लावत उभा होता. मुले बाजूला उभे राहून उडणाऱ्या ठिणग्या बघण्यात गुंग होती. हेन्रीला रेम्ब्रांदचे एखादे इचिंगच जिवंत झाल्यासारखे वाटले.

त्या वर्षी हिवाळयात हेन्री आणि व्हिन्सेंटची चांगली गट्टी जमली. हेन्रीने व्हिन्सेंट ॲबसिंथचा पेला पुढ्यात घेऊन बसलाय असे एक पोर्ट्रेट केले.

(हे पेस्टलमधील पोर्ट्रेट सध्या ॲमस्टरडॅम म्युझियममध्ये आहे)

या काळात हेन्रीने व्हिन्सेंटला अगदी जवळून पाहिले. व्हिन्सेंटला आत्मनाशाविषयी सुप्त आकर्षण होते. त्याची राजकीय मते तो मोठ्या आग्रहाने मांडे. त्याच्या अंतर्मनात अखंड खळबळ चालू असे. त्यात गूढवाद, सतत मद्यपान, जडलेला उपदंशाचा विकार अशा गोष्टींनी भर पडे. त्याच्यात असलेला असामान्य प्रतिभावंत त्या वेळी जागृत होत होता. या सर्वांच्या एकत्रित परिणामामुळे की काय प्रचंड मानसिक उद्रेक होई आणि त्यामुळे की काय एरवी सौम्य असलेल्या त्याच्या वागणुकीत विलक्षण बदल घडून येई. एखाद्या धबधब्यासारखे हास्य, राक्षसी उत्साह व अस्वस्थ करणारी शांतता, काही सांगता येत नसे.

त्या दोघांच्या स्वभावात खूप फरक होता. त्यामुळे साध्या साध्या गोष्टींवरून त्यांचे खटके उडत. वादविवाद करता करता क्षणात हमरीतुमरीवर येत. पण अशा भांडणातून मैत्री पक्की होत गेली.

“आपण एक सहकारी वसाहत वसवू या. सर्व कलाकारांना एकत्र घेऊन.” एकदा उत्साहाच्या भरात व्हिन्सेंट म्हणाला.

“असा वेडपटपणा तुला सुचतो तरी कसा?” हेन्री जमिनीवर होता, “अरे दोन आर्टिस्ट कधी स्वप्नात तरी एकत्र राहू शकतील का? कधी राहिलेच तर दुसऱ्या दिवशी पॅलेट नाइफने एकमेकांचे गळे कापतील.”

एके दिवशी व्हिन्सेंटने जाहीर केले, “आज मला प्रकाशाचा किरण दिसला. मी पॉइंटॅलिस्ट व्हायचं ठरवलंय.”

“पॉइंटॅलिस्ट?” हेन्री म्हणाला, “कालपर्यंत तू इंप्रेशनिस्ट होतास. रेन्वा आणि मॉने तुझे आदर्श होते. विसरलास एवढ्यात.”

“काल रात्री बिस्ट्रोमध्ये जेवताना जॉर्ज सुरा भेटला. जेवता जेवता त्याने मला त्याचं पॉइंटॅलिझमच शास्त्र समजावून सांगितलं. याने चित्रकलेतले आजचे बहुतेक प्रश्न सुटतील. काय अफलातून कल्पना आहे म्हणून सांगू. थोडंसं प्रकाशाचे वक्रीभवन, पृथक्करण, प्रिन्सिपल ऑफ कलर डॉमिनन्स, विविध तरंग लांबीच्या प्रकाशकिरणांचा नेत्रपटलावर होणारा परिणाम, यांचा थोडाफार अभ्यास केला की काम झालं.”

“अभ्यास तसा चार दिवसांत संपेल. नंतर ते बारीक बारीक ठिपके काढत एक कॅनव्हास पुरा व्हायला एक वर्ष लागेल त्याचं काय. हे असलं किचकट काम जमेल तुला. पॉइंटॅलिझमने प्रश्न सुटलाय तो एकट्या सुराचा. बाकी कोणीही त्या वाटेला फिरकलेला नाही.”

कधीतरी राजकीय मतांवरून खडाजंगी उडे.

"प्रत्येक जागृत व्यक्तिला राजकीय मत असलंच पाहिजे. आणि जर तो कलाकार असेल तर त्याने आपलं मत आपल्या कलेतून ठामपणे जगापुढे मांडलं पाहिजे." व्हिन्सेंट.

"म्हणजे तुझ्यासारख्या आदर्शवाद्याने आपली सगळी चित्रं गुलाबी, झुळझुळीत रंगातच रंगवायला हवीत. तुझ्या त्या मिलेटसारखी. तू त्याच्या पेंटिंगची नक्कल करतोस तितपत ठीक आहे. पण नशीब तुझ्या स्वतःच्या चित्रांवर त्याचा प्रभाव मुळीच नाहीय. उदाहरणार्थ, तुझे पोटॅटो इटर्स घे. अगदी अस्सल आहेत. त्या शेतकऱ्यांचा गलिच्छपणा, भूक, दारिद्र्य, दुःख, दैन्य सर्व काही त्या कॅनव्हासच्या प्रत्येक इंचाइंचातून जाणवतोय. वर टांगलेल्या दिव्याच्या मिणमिणत्या प्रकाशात त्यांचे किडलेले दात दिसतायत. जवळ गेलं तर त्यांच्या श्वासाची दुर्गंधी येईल अशी भीती वाटते."

"शेतकऱ्यांच्या वाटेला दुःख आणि दारिद्र्य नेहमीचंच. पूर्वीच्या काळी तर फारच असायचं. राजे लोक तेव्हा त्यांचे उभे पीक जबरदस्तीने कापून न्यायचे."

"कुठे वाचलंस हे?"

"कुठे कुठे वाचलं त्याचे पुरावे काही आता आठवत नाहीयेत. पण ही सत्य परिस्थिती आहे."

"मुळीच नाही. या सगळ्या थापा आहेत. *नॉम दे दियू!* पुरावे शोधायला विद्यापीठातील वाचनालये फिरायची गरज नाही. एकदा लुव्हरला जा आणि ब्रुघेल, हाल्से, तिनिअर्स यांच्या पेंटिंगमधले शेतकरी कसे दिसतात ते नीट बघ आणि मला येऊन सांग. उपाशी शेतकरी शोधून सापडणार नाही तुला. सगळेजण कसे गुबगुबीत दिसतात. कारण त्या काळी बहुतेक शेतकरी खाऊन-पिऊन सुखी असायचे. दिवसभराची कष्टाची कामं आटोपली की सगळेजण विसाव्याला संध्याकाळी एखाद्या मोठ्या झाडाखाली एकत्र जमत आणि नाचत-गात जेवणावर आडवा हात मारत.

बसल्या बैठकीला बॅरलभर वाईन नाहीतर साइडर संपे. त्यांच्या बायका नीट बघ, कशा माजलेल्या कोंबडीसारख्या गलेलठ्ठ दिसतात त्या. त्यांच्या ब्लाऊजमधून खाली लोंबणाऱ्या स्तनांकडे पाहून त्यांनी एक वेळ तरी उपास काढलाय यावर कोणाचा विश्वास बसेल.''

''सगळे खाऊन-पिऊन सुखी होते तर शेतकऱ्यांनी बंड का केलं.''

''शेतकऱ्यांनी बंड केलं ही एक मोठी थाप आहे. उलट शेतकरी बंडाच्या विरोधात होते. जिवात जीव असेतो त्यांनी बंडाला विरोधच केला. त्यांच्या आजच्या दुर्दशेला तुझे प्रजासत्ताकवादी क्रांतिकारकच कारणीभूत आहेत. सक्तीच्या लष्करभरतीचा शोध त्यांनीच लावला. अरे राजा हा प्रजेचा पालक असतो. शेतकऱ्याला त्याच्या जमिनीपासून दूर करण्याची त्याची अशी छाती झाली नसती.'' मोंमार्त्रमध्ये राजेशाहीची बाजू घेऊन बोलणारा हेन्री एकटाच असावा. त्यामुळे या विषयाची दुसरी बाजू कोणी ऐकलीही नव्हती.

''असले फुकट वाद घालण्यापेक्षा चल नुव्हेलीत जाऊ या. आज मला पत्ते खेळण्याची सुरसुरी आलीय. आज सकाळपासून नशीब जोरदार असावं असं वाटतंय.''

पॅरीसला आल्यावर व्हिन्सेंटच्या जुन्या अस्वस्थपणाने पुन्हा डोके वर काढले. ॲतेलीएमधल्या तोचतोचपणाला तो लवकरच कंटाळला. कधीतरी दांडी मारून तो इझल घेऊन मोंमार्त्रच्या एखाद्या चौकात नाहीतर चक्क घरी बसे. एखाद्या चिखलाने बरबटलेल्या बुटाचे नाहीतर जुन्या पुस्तकाचे असले काहीतरी वस्तुचित्र काढी. एकदा अचानक दोन-तीन दिवस काही न सांगता तो गायब झाला. परतला तेव्हा त्याचा अवतार अगदी बघण्यासारखा झालेला होता. नखशिखांत भिजलेला, केस विस्कटलेले, पाय चिखलाने बरबटलेले. हेन्रीने विचारले तर म्हणाला,

''रान पाहायला गेलो होतो. शहरी हवेत मला अगदी घुसमटल्यासारखं होतं.''

''रानात हिंडायला ठीक आहे पण झोपलास कुठे? आणि पावसात काय केलंस.''

“झोपायला मिळते शेतातली एखादी झोपडी नाहीतर आहे आपलं सीन नदीकाठचं एखादं बाकडं. आणि पावसाचं काय घेऊन बसलायस. आम्ही डच लोक पावसाला मुळीच घाबरत नाही हे तुला ठाऊक नाही वाटतं.”

त्याने लाजत लाजत काही कॅनव्हास हेन्रीच्या पुढ्यात ठेवले. काम विलक्षण झपाट्यात केलेले दिसत होते. एका कॅनव्हासवर फार तर तीन-चार तास खर्च केले असतील. पिस्सारो, दलाक्रुवा, सुरा यांच्या शैलीची कशीतरी नक्कल केली होती. नक्कल म्हणावी तर बरोबर उतरली नव्हती. पण नक्कल करतानासुद्धा त्यात व्हिन्सेंटचा स्वतःचा ठसा होता. हेन्रीच्या मनात आलं की ह्या भणंग वाटणाऱ्या डच माणसात काही वेगळंच पाणी दिसतंय. हा आपला मार्ग शोधण्यात यशस्वी झाला तर चित्रकलेच्या इतिहासात याची कायमची नोंद घेतली जाईल.

एकदा अचानक व्हिन्सेंट आपला पोर्टफोलिओ काखोटीला मारून हेन्रीच्या स्टुडिओत येऊन दाखल झाला. गळयात एक चपटी बाटली अडकवलेली होती. त्यातल्या रमचा एक घुटका घेत तो म्हणाला, “मला ॲनाटॉमी शिकायचीय. ॲनाटॉमी चांगली आल्याशिवाय आर्टिस्ट बनणं कठीण आहे.”

मग बराच वेळ स्टर्नोक्लेईडो मॅसेटॉईड, लॅटिसिमस डॉर्सी वगैरे लॅटिन शब्दांच्या जंजाळात गुरफटल्यावर वैतागून त्याने हातातील चारकोल स्टिक कोपऱ्यात भिरकावून दिली.


“माझ्या टाळक्यात हे काहीएक शिरत नाही. नवीन काही शिकण्याच्या दृष्टीने माझं वय झालंय हेच खरं. त्यापेक्षा तू माझ्याकडे चल. मी तुला स्टॉकव्हिश पाजतो. कधी चाखलीयस?”

तेथून ते दोघे व्हॅन गॉग भावंडांच्या खोलीवर गेले. तेथे मोठा भाऊ तेओ व्हॅन गॉग होता. त्याच्याबरोबर इंडिपेंडन्सचा एक बोलघेवडा मित्र आला होता. दोघा भावांनी मिळून एक खास डच खाद्यप्रकार बनवला. बरोबर प्यायला स्टॉकव्हिश ह्या डच दारूची बाटली होती. मग गप्पागोष्टी करीत जेवायला सुरुवात झाली. तेओने आपल्या मित्राची ओळख करून दिली. तेओ त्याच्या गॅलेरीतून त्याची चित्रे

खपवण्याचा प्रयत्न करणार होता. लोकप्रिय नावांबरोबर मधेच एखादा या नव्या चित्रकाराचा कॅनव्हास.

"तुझा प्रयत्न स्तुत्य आहे. पण सांभाळून. मालकाच्या लक्षात आलं तर याचे सगळे कॅनव्हास तो शोधून फेकून देईल. नाही तर तुला तरी हाकलून देईल."

मग स्टॉकव्हिशची बाटली संपेपर्यंत जोरजोरात चर्चा झाली. टीकाकार, कलासमीक्षक, अकादमीचे सभासद, कलावस्तूंचे विक्रेते, आर्ट गॅलरींचे मालक यांपैकी कोणालाही खऱ्या कलेची जाण नाहीय. कदर करणे तर दूरच, उलट सर्वांनी मिळून नव कलाकारांविरुद्ध कट केलाय. सर्वांनी एकत्र येऊन हा कट हाणून पाडण्याच्या निश्चयाने त्या दिवसाच्या चर्चेची सांगता झाली.



(पोर्टेट ऑफ व्हिन्सेंट व्हॅन गॉग – तुलूझ लोत्रेक – पेस्टल, कार्डबोर्ड – ५४x४५ सेमी - १८८७, व्हॅन गॉग म्युझियम, अमस्टरडॅम)



(हार्वेस्टर्स मील – पीटर ब्रुघेल द यंगर, ऑईल ऑन पॅनेल, ७३x१०४ सेमी, १६६३, मेट्रोपोलिटन म्युझियम ऑफ आर्ट्स, न्यु यॉर्क)

- २६ –

वरवर पाहता हेन्रीचे दिवस असे मजेत जात होते. पण आतल्या आत तो स्त्रीसुखासाठी आसुसला होता. पण ते कसे मिळणार हा मोठाच प्रश्न होता. त्याच्या बहुतेक मित्रांना मैत्रिणी होत्या. कायमची मैत्रीण नसली तरी तात्पुरती मिळवणे काही फारसे कठीण नसे. ल एलीसमध्ये जायचे, कोणाला तरी डोळा मारून नृत्यासाठी बोलवायचे, नाचता नाचता तिच्या नकळत कोपरा गाठायचा आणि हळूच चुंबन घ्यायचे. मग एक-दोन दिवसात खोलीवर घेऊन जाण्यापर्यंत प्रगती होत असे. पण यासाठी नाचता येणे आवश्यक होते. त्यामुळे हा सर्वमान्य मार्ग बाद झाला.

दुसरा मार्ग म्हणजे रस्त्यावरचा. रस्त्यावर भरपूर संधी उपलब्ध असत. बऱ्याच स्त्रियांना ते सुख हवे असते. जर तुम्ही सतत प्रयत्न करीत राहिलात तर कधी ना कधी कोणीतरी भेटतेच. साधा सरळ हिशेब. रॅंचो या बाबतीत तरबेज होता. प्लास पिगाल

ते प्लास क्लिशी या रस्त्यावर बरेच मासे त्याच्या गळाला लागले होते. पण हेन्रीला कसे जमणार? त्याने धीर करून कोणाला गाठलेच तर त्याच्या विचित्र देहयष्टीकडे पाहून ती स्त्री काय प्रतिसाद देईल याची शंकाच. एकूण हा मार्गसुद्धा जमण्यासारखा नव्हता.

शेवटचा मार्ग म्हणजे वेश्यागृह. ल पेरोक्वेत ग्रि. एकदा मित्रांबरोबर माडी चढून झाली होती. वर जाण्यासाठी एक अरुंद मोडकळीला आलेला जिना होता. वर दिवाणखान्यात फाटका गालिचा अंथरलेला होता. भिंतीवर क्लिओपात्राचे तैलरंगातील भडक बटबटीत पेंटिंग टांगलेले होते. बसायला लालभडक रंगाचा ठिकठिकाणी उसवलेला कोच. वातावरणात स्वस्त पर्फ्युमचा उग्र दर्प दरवळत होता. भडक रंगरंगोटी केलेल्या मुली. झिरझिरीत वस्त्रांखालचे त्यांचे नग्न देह. त्यांच्या हाताचा थंडगार विळविळीत स्पर्श. चुंबन घेण्याच्या नुसत्या कल्पनेनेच एखाद्याला वांती व्हायची. पुढचा शृंगार दूरच राहिला. तेथल्या वातावरणात एक प्रकारचा उग्र दर्प भरलेला असायचा. सार्वजनिक मुतारीसारखा.

एकच मार्ग होता. स्वप्ने बघण्याचा. रात्रभर तो या कुशीवरून त्या कुशीवर तळमळत असे. नजरेसमोर एखाद्या तरुणीचं विवस्त्र शरीर तरळत असे. सर्वांगाची आग आग व्हायची. ही एक नवीनच वेदना सुरू झाली होती. पण सांगणार कोणाला? ही आग आपली आपणच सहन करत आला दिवस ढकलायचा. हळूहळू सवय होऊन जाईल.

रॅंचोची ज्युली नावाची एक मैत्रीण होती. रॅंचोचा मित्र म्हणून हेन्रीलासुद्धा ती ओळखायची. मार्च महिना उजाडेपर्यंत रॅंचोचा ज्युलीमधला रस संपला. रॅंचो सांगत होता,

"सुरुवातीला नुसता स्पर्श जरी झाला तरी ताबडतोब अंग चोरून घ्यायची. हातात हात घेतला तर हात झटकून टाकायची. ओठावर नुसते ओठ टेकायला गेलं तर तोंड फिरवून घ्यायची. पहिल्यांदा तिचे स्तन दाबायला गेलो तर तिने थोबाडीतच मारली. बिछान्यावर घेतली तर मांड्या अशा काही आवळून धरल्या की काय बिशाद आहे पुढे घुसशील. शेवटी चक्क मारामारीच व्हायची. बोचकारायची काय, गुद्दे काय

मारायची. काय सांगू तुला. त्यातच खरी मजा यायची. आता ती मारामारी संपली आणि ती मजाच गेली. विश्वास बसणार नाही एवढी ती आता बदलली आहे. खोलीवर येईपर्यंत आता तिलाच धीर निघत नाही. खरंही वाटत नाही की महिन्या दोन महिन्यांपूर्वी ही एक अनाघ्रत कुमारिका होती म्हणून.''

रँचोचे बिछान्यातले पराक्रम हेन्री लक्षपूर्वक ऐकत होता. आपल्याला अशी मजा कधीच उपभोगता येणार नाही या कुशंकेने तो हादरून गेला.

''एरवी कशी आहे ज्युली?''

''तशी मुलगी चांगली आहे रे. पण म्हणून काय जन्मभर झेंगट मागे लावून घ्यायचं? उत्तर ध्रुव गाठण्यासाठी माणसाने कितीही आटापाटा केला तरी एकदा ध्रुवावर पाऊल ठेवल्यावर तिथेच बैठक मारून बसत नाही कोणी.''

रँचोबरोबर ज्युलीला लगट करताना हेन्रीने बऱ्याच वेळा पाहिले होते. त्यांचे चाळे बघून हेन्रीचे मन थोडेसे चाळवले जायचे. ज्युली रात्री स्वप्नात यायची आणि त्याला अपराध्यासारखे वाटायचे. पण आता तिला रँचोने कटवल्यावर त्याला रोज तिची स्वप्ने पडायला लागली. स्वप्नामध्ये रँचोच्या जागी तो स्वतः असायचा. या स्वप्नातल्या कामक्रीडेने त्याचा कामज्वर अधिकच चाळवला गेला.

एकदा मनाचा मोठा धीर करून हेन्री प्लास पिगालवरील ब्रासेरी मोन्से या कॅफेत गेला. तो भाग मोंमार्त्रमध्ये मोडत असला तरी चित्रकार मंडळी तिकडे फारशी फिरकत नसत. व्यापारी, दुकानदार, विक्रेते वगैरे मंडळींचे ते एक आवडते ठिकाण होते. त्याने तिथे पाऊल टाकल्याबरोबर भीत भीत इकडे तिकडे पाहिले. एकही ओळखीचा चेहेरा नव्हता. चटकन एक कोपऱ्यातले टेबल निवडून त्याने बेनेडिक्टाइन मागवली. ग्लासच्च्या दांड्याशी चाळा करीत हळूच चोरट्या नजरेने त्याने एक चौफेर दृष्टिक्षेप टाकला. आजूबाजूला काही मुली घोटाळताना दिसल्या. म्हणजे त्याने निवडलेले ठिकाण योग्य होते. पण यातली कोणती मुलगी तशी असेल. ती सुवर्णकेशी की ती कृष्णकेशी. ती शेलाटी की ही जाडी ढोल. ती कोवळी करकरीत की ही निबर काकूबाई. इशारा करण्याचा धीर होत नव्हता. जी पहिल्यांदा येईल तिला घेऊ.

थोड्या वेळात तिथली पद्धत त्याच्या लक्षात आली. गिऱ्हाईकाने ड्रिंक मागविले की तेथे बसलेल्यांपैकी एखादी मुलगी हळूच उठून त्याच्या जवळ जाऊन लाडीक हसून त्याला वाजले किती ते विचारायची. त्याने जर भिंतीवरच्या घड्याळाकडे बोट दाखवले तर प्रकरण तेथेच संपायचे. पण जर त्याने खिशातून घड्याळ काढून वाजले किती ते सांगितले तर ती हळूच त्याच्या शेजारच्या खुर्चीवर बसे. मग खुर्ची थोडी जवळ घेत घड्याळे कशी बेभरवशाची असतात, एकदा मी दिलेली वेळ कशी चुकली वगैरे काहीतरी बोलून संभाषण चालू करायची. असे संभाषण करताना मधूनच ती अस्पष्ट स्पर्श करे. बोलता बोलता तिचा हात चुकून मांडीवर पडायचा आणि सरकत सरकत वर जाऊ लागायचा. या वेळी दोन गोष्टी होण्याची शक्यता असायची. एक म्हणजे तो पुरुष मी बायकोची नाही तर दुसऱ्या कोणाची वाट पाहत आहे असे अचानक जाहीर करायचा. ताबडतोब पँटीच्या बटनांकडे गेलेला तिचा हात झरकन खाली येई. दुसरी शक्यता म्हणजे तो पुरुष एखादे ड्रिंक तिच्यासाठी मागवे. मग तिचा हात तिथेच रेंगाळे आणि पुढच्या वाटाघाटींना सुरुवात होई. त्याच्यासारख्या मर्द पुरुषाला बघून तिला राहावले नाही. जवळच एक वाजवी दराचे हॉटेल आहे. अगदी स्वच्छ आणि मऊमऊ गाद्या. संपूर्ण समाधानाची हमी दिली जाई. मग पुढे सौद्याला सुरुवात होई. सर्वांना माहितीय वीस फ्रँक. तू मला कोण समजलीस? टुरिस्ट की एखादा अमेरिकन. चला तुम्हाला म्हणून पंधरा. पंधरा खूप जास्त होतात. सगळ्या जणी पाच घेतात. मी पाचवाल्यांतली वाटते का? मी किती तरुण आहे. माझ अंग काही त्यांच्यासारखे ढिले पडलेले नाहीय. शेवटी हो-ना करता करता दहा फ्रँकवर सौदा पटे. कोणाला सांगू नका मी दहा फ्रँकमध्ये तुमच्याबरोबर आले म्हणून. तुमच्यासारख्या मर्द माणसाला सुख देताना मलासुद्धा मजा येईल म्हणून दहा फ्रँकला मी तयार झालेय.

सौद्याची बोलणी चालू असताना तिचा हातही वाटाघाटीचे काम चालू ठेवी. त्यामुळे कधी कधी सौदा तिला फायद्याचा पडे. मग दोघे जण आपापला ग्लास एका घोटात संपवून उठत. नंतर अर्ध्या-पाऊण तासात ती एकटीच रेस्तराँमध्ये परत येई. तोंडाला पावडर, ओठांना रंग वगैरे लावून नव्या गिऱ्हाइकाची वाट बघणे पुन्हा चालू होई.

हा प्रकार इतक्या झटपट होत होता की हेन्रीच्या लक्षात येईपर्यंत एक तास सहज निघून गेला. पण तेवढ्या वेळात हेन्रीकडे आपण होऊन कोणीही आले नाही. त्याला वाटले की त्या मुलींना वाटत असेल की आपण बच्चा आहोत. त्याच्यासमोर एक मुलगी सिगारेट फुंकत बसली होती. त्याने ग्लासाने टेबलावर हळूच आवाज करून तिचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले. तिच्याशी नजरानजर होताच आपल्या ओठांची सूचक हालचाल केली. तिने त्याच्याकडे आपादमस्तक पाहत सिगारेटचा एक मोठा झुरका घेतला. एक क्षणभर थांबून त्याच्या दिशेने धुराचा लोट सोडत तिने हळूच आपली मान दुसरीकडे वळवली.

ते पाहून त्याच्या संतापाचा पारा वर चढला. कानशिले गरम झाली. हातातला ग्लास थरथरू लागला. छातीत धडधडू लागले. साल्या या दीडदमडीच्या रांडा. पाच-दहा फ्रँकसाठी कोणाच्याही खाली पडणाऱ्या. पण आपल्याकडे कोणी ढुंकूनही पाहत नाही. त्याला आपली कुरूपता विदारकपणे भेडसावू लागली. पैसे घेऊनही आपल्याबरोबर झोपायला कोणी तयार होत नाही याची जाणीव होताच दुःखाच्या आवेगाने त्याला भरून आले. आवंढा घशात अडकला. श्वास क्षणभर थांबला. मोठ्या प्रयासाने त्याने स्वतःला सावरले. त्याने झटकन हातात काठी घेतली. कोचावरून थरथरत उठला व तात्काळ बाहेर पडला.

- २७ -

वसंत ऋतूच्या उरलेल्या दिवसांत हेन्रीने स्वतःला कामात झोकून दिले. दिवसा ॲतेलीएमध्ये व्हीनस नाहीतर लॅडा, घरी स्टुडिओत इकॅरस. रंगकाम इतके घोटून घोटून गुळगुळीत केले की एकदा कॉर्मेनने त्याची चक्क तारीफसुद्धा केली. 'चित्रकलेच्या नावाने अगदी मठ्ठ असलात तरी अशीच मेहनत घेत राहिलात तर मोठेपणी थोडीफार कामं मिळायला हरकत नाही. अर्थात तुम्हाला त्याची गरज नाही.' वसंत ऋतू संपता संपता इकॅरस एकदाचा पूर्ण झाला. कॅनव्हासच्या कोपऱ्यात स्वतःची सही ठोकताना त्याला एकीकडे सुटल्याची भावना होती तर दुसरीकडे आता आपण ॲतेलीएमधील मित्रमंडळी, ओग्युस्तिनामधील जेवताना घातलेले वादविवाद, ल नुव्हेलीमधील बीअरपान, ल एलीसमधले कॅनकॅन नृत्य आणि मादाम ल्युबेतचे अगत्य या सर्वांना आता आपण मुकणार याची हळहळ वाटत होती.

एके दिवशी कॅनव्हासला फ्रेम करण्यासाठी म्हणून तो पीएर टँग्वीकडे चालला होता. स्वच्छ ऊन पडले होते. पाय पण दुखत नव्हते. म्हणून त्याने चालत जायचे ठरवले. मोंमार्त्रमधला त्याचा हा बहुधा शेवटचा फेरफटका असणार होता. तो थोडा रमतगमत चालला होता. जुनाट मोडकळीला आलेली घरे, अंधाऱ्या अरुंद गल्ल्या. वातावरणात स्वैंपाकघरातील तळण आणि कुजणाऱ्या केरकचऱ्याच्या वासाचा एक संमिश्र दर्प दरवळत होता. हाडीमाशी मुरलेल्या पिढ्यान्‌पिढ्याचा दारिद्र्याचा दर्प.

तो धोबीघाटावरून चालला होता. हा मोंमार्त्रमधला एकमेव उद्योग. बऱ्याच स्त्रियांना त्यातून रोजगार मिळायचा. म्हाताऱ्या, कुरूप, निराधार स्त्रिया व अजाण बालिका. वयाच्या सातव्या वर्षापासून सुरुवात होई. धुतलेले कपडे गावात घरोघरी पोचते करायचे, येताना धुवायचे कपडे घेऊन यायचे. वयाच्या चौदाव्या वर्षी बढती मिळे धुण्याच्या हौदावर. दहा तासांचे दोन फ्रँक. कपडे घासा, आपटा, धोपटा, पिळा. दिवसभराच्या श्रमाने अंग मोडून जायचे. साबणाच्या पाण्यात उभे राहून काम केल्याने हातापायांना खाज सुटे, बोटाच्या बेचक्यांमधली त्वचा कुजे. अंगाची आग होई. पाण्याच्या नुसत्या स्पर्शाने झोंबू लागे. एक-दोन वर्षांत कंबरेचा काटा ढिला

होई. यातून केव्हा एकदा सुटका होतेय असे वाटे. सगळे सोडून पळून जावेसे वाटे. पण पळून जाऊन करणार काय? परिसरात धोबीघाट सोडून दुसरा कोणताही उद्योग नव्हता. राहिला वेश्याव्यवसाय. वय वर्षे सोळा आणि बऱ्यापैकी रूप एवढे भांडवल सुरुवातीला पुरेसे होई. पण वाढत्या वयाबरोबर रूपही ओसरू लागे. परिणामी दुसऱ्या एखाद्या कमी दर्जाच्या वेश्यागृहात जावे लागे. असे करता करता एक दिवस असा येई की अगदी तिसऱ्या दर्जाच्या वेश्यागृहातूनसुद्धा हकालपट्टी होई. मग मात्र पोटाची खळगी भरण्यासाठी परत धुण्याच्या भट्टीसमोर उभे राहून धुणी धोपटण्याशिवाय दुसरा पर्याय नसे. भट्टीची आग, साबणाची राड व अंगमोड श्रम यामुळे येथून मृत्यू मात्र लवकरच त्यांची सुटका करी.

येथल्या बऱ्याच तरुण धोबिणी संध्याकाळी विरंगुळयासाठी ल एलीस किंवा नुव्हेलीत येत. त्यामुळे हेन्रीच्या चांगल्या परिचयाच्या होत्या. धुणी बडवता बडवता एखादी धोबीण रस्त्याने चाललेल्या हेन्रीकडे बघून आपुलकीने हसे. हेन्री थांबून, हॅट किंचित हातात घेऊन त्यांच्या अभिवादनाचा स्वीकार करी.

(खिडकीतून आतुरतेने बाहेर बघणाऱ्या ‘लाँड्रेस ऑफ मोंमार्त्रे’ ह्या लोत्रेकच्या पेंटिंगची गणना त्याच्या महान कलाकृतींमध्ये केली जाते)



(लाँड्रेस – तुलूज लोत्रेक – तैलरंग, कॅनव्हास – ९३ x ७५ सेमी – १८८४ खाजगी संग्राहक)

- २८ –

पीएर टँग्वी अराजकवादी म्हणून प्रसिद्ध होता. दुकानात येणाऱ्या-जाणाऱ्याला आपली राजकीय मते व भूमिका सुनावल्याशिवाय तो सोडत नसे. त्याच्या दुकानात पोचल्यावर हेन्रीने इकॅरससाठी फ्रेम मागताच दुसऱ्या क्षणी टँग्वी उसळून म्हणाला,

''सॅलाँसाठी पेंटिंग पाठवत आहात. तुम्हाला माहितेय. हे सॅलाँ वगैरे म्हणजे सगळा बकवास आहे. भांडवलदारांचा भंपकपणा दुसरं काही नाही. हे तुझे अकादमीवाले, भडवे समजतात कोण स्वतःला? भांडवलदारांचे पित्ते आहेत एकजात. गोळ्या घातल्या पाहिजेत एकेकाला.''

हेन्री टँग्वीचा प्रतिवाद करण्याच्या मूडमध्ये नव्हता. त्याने चटकन फ्रेमची मापे टँग्वीला संगितली. मापे वहीत टिपून घेतल्यावर टँग्वीने कोपऱ्यातला एक पोर्टफोलिओ उचलला व त्यातले जपानी प्रिंट हेन्रीला दाखवले. ''त्या कॉर्मेनकडे रंग कितीही घोटलेस तरी याची सर येणार नाही.''

ते एकूण तीन प्रिंट होते. एकात समुद्रकाठी बसलेल्या तीन वेश्यांचे चित्र होते. त्यातली एक केस विंचरीत होती, दुसरी वाळूत गुडघ्यांवर बसून शिंपले वेचीत होती, तर तिसरी आपल्याच नादात समुद्राच्या लाटांकडे टक लावून बघत होती. ते चित्र म्हणजे नजाकतदार शैलीतील चित्रणाचा एक अप्रतिम नमुना होता. चित्रातील रेषा संगीतातली लय व नृत्यगतीतला ताल घेऊन कागदावर उतरली होती.

''अप्रतिम!'' हेन्री त्याच्या हातातला प्रिंट जवळ जवळ हिसकावून घेत म्हणाला, ''केवढ्याला?''

''हे विकण्यासाठी नाहीत. तुम्हाला फक्त दाखवायला म्हणून बाहेर काढलेयत.''

''पण विकत का नाही? दुकान तर थाटून बसला आहात.''

''अरे या ज्या मुली आहेत ना त्या अगदी माझ्याच मुलींसारख्या वाटतात मला. आपल्या मुली कोणता बाप विकायला काढेल.''

एवढ्यात पाठच्या खोलीतून आवाज आला, ''बारा फ्रँक पडतील. फ्रेम करून पाहिजे असेल तर चौदा.''

“अग लाडके, एवढं सुंदर चित्र तू विकायला काढलंस.”

“त्यांच्याकडे काही लक्ष देऊ नका मस्य तुलूझ्. यांना काहीच विकायचं नसतं. मागच्या आठवड्यात एकाने सेझानच्या पेंटिंगची किंमत विचारली. कधी नव्हे तर सेझानला गिऱ्हाईक मिळत होतं. यांनी काय किंमत सांगितली असेल माहितेय. दहा हजार फ्रँक. नशीब मी होते. पंचवीस फ्रँकला काढलं. तीन सफरचंद तर होती त्यात.”

(सेझानच्या पश्चात थोड्याच दिवसांत त्या तीन सफरचंदांना खरेच दहा हजार फ्रँक किंमत आली. सध्या त्याची किंमत कित्येक लाख फ्रँकच्या घरात जाईल)

“बायकांना कलेची काही कदर नसते. त्यांना दिसतो नुसता पैसा पैसा आणि फक्त पैसा.”

“रोजच्या जेवणातला पाव, तुमच्या चित्रांना लागणारा कॅनव्हास या सगळया गोष्टींना जोपर्यंत दिडक्या मोजाव्या लागतात तोपर्यंत पैशाचं महत्त्व राहणारच आहे.” तिने फणकाऱ्याने सांगितले.

“थोडे दिवस थांब एकदा कामगारांचं राज्य येऊ दे मग...”

नंतर दोघा नवरा-बायकोचे प्रेमळ भांडण झाले. टँग्वीने देगाससाठी थोडे रंग बांधून दिले आणि हेन्रीला निरोप दिला.



(थ्री ॲपल्स – पॉल सेझान – तैलरंग – कॅनव्हास, १८७२
म्युसे डी’ओर्से – पॅरीस)

## - २९ -

ॲतेलीएच्या शेवटच्या दिवशी आपापली एंट्री सॅलाँमध्ये पाठवून दिल्यावर सर्वजण एखादी परीक्षा संपल्याच्या आनंदात ओग्युस्तिनामध्ये जेवायला गेले. सर्वांनी मिळून एकत्र घालवलेली ती शेवटची संध्याकाळ होती. जेवण झाल्यावर ला नुव्हेलमध्ये यथेच्छ बीयरपान. असा दिवस परत येणार नाही याची त्यांना कल्पना होती. हास्यविनोद, चेष्टामस्करी यांना ऊत आला होता. नंतर सर्वजण मिळून ल एलीसमध्ये गेले. प्रत्येकाने आपापली मैत्रीण पकडली व नृत्याला सुरुवात केली. हेन्री एकटाच बापुडवाणा होऊन कोपऱ्यात बसला. शेवटी तगमग असह्य होऊन तो तेथून हळूच सटकला. उद्विग्न मनःस्थितीत तो ब्रासेरी मोंसेत जाऊन कधी पोचला ते त्याचे त्यालाच कळले नाही.

त्याने घाबरत घाबरत इकडेतिकडे पाहिले. काय होईल ते होऊ दे. या खेपेला सरळ विचारून मोकळे व्हायचे असे त्याने ठरवले. धीर येण्यासाठी त्याने ॲबसिंथ मागवली. ग्लास समोर येताच त्याने साखरेचा एक खडा त्यात टाकला. पण खडा नीट विरघळण्याच्या आत त्याने ग्लास एका घोटात रिकामा केला. पोटात जाळ उठला व थोडा धीर आला. समोरच्या एका बाईकडे त्याने हळूच पाहिले. थोडी वयस्कर व बेढब दिसत होती. पण म्हणूनच तयार होईल असा विचार करून त्याने तिच्याकडे मोर्चा वळवला. जवळ जाऊन मोठ्या अदबीने विचारले,

‘‘मादम्वाझेल, माझ्याबरोबर ड्रिंक घ्यायला आवडेल का तुम्हाला.’’

तिने एकवार त्याच्या हातातल्या काठीकडे व त्याच्या चेहऱ्याकडे पाहिले व म्हणाली, ‘‘तुम्हाला दिसत नाहीय का मी कामात आहे ते.’’

हेन्री वरमून तसाच स्तब्ध उभा राहिला.

‘‘आरशात कधी स्वतःचा मुखडा पाहिलायत का? मला ड्रिंक घ्यायला बोलावायला आलात ते.’’

तिचे हेटाळणीचे उद्गार त्याच्या कानात तप्त शिशासारखे शिरले. त्याच्यासारख्या कुरूप, फेंगड्या पायांच्या बुटबैंगणाबरोबर दोन घटका घालवायला एखादी म्हातारी वेश्यासुद्धा तयार नव्हती. त्याच्या शारीरिक दुःखात एका नव्या दुःखाची त्या दिवसापासून भर पडली. स्त्रीसुख आपल्याला कधीच उपभोगायला मिळणार नाही या जाणिवेने तो व्याकूळ झाला.

काठी टेकत, पाय फरफटत, अपमानित, व्यथित मनाने तो लॉजवर परतला. देगासच्या स्टुडिओत अजून दिवा जळत होता. त्याची सावली खिडकीच्या तावदानावर पडली होती. दूर कित्येक खिडक्यांमधून दिवे जळताना दिसत होते. या क्षणी पॅरीसमध्ये हजारो युग्मे एकमेकांच्या मिठीत मैथुनमग्न असतील. हे शारीरिक व्यंग, खुजेपण, कुरूपता आपल्याच वाटेला का यावी की कोणतीही स्त्री आपल्याला कधीही जवळ करणे शक्य नाही.

'हेन्री तू नुसता बुटका नाहीयेस. जोडीला कुरूपसुद्धा आहेस हे कधीही विसरू नकोस.'

निराशेच्या खोल गर्तेत त्याला दुःखाचे कढ येत होते. त्याच्या गालावरून उष्ण अश्रू वाहू लागले.

'ममा, मला तेव्हाच का मरू दिलं नाहीस? का जगवलंयस मला जिवाचा एवढा आटापिटा करून.'

- ३० -

ऑगस्ट महिन्यातली ती एक दुपार होती. बाहेर ऊन रणरणत होते. सर्व सृष्टी आळसावली होती. शॅतो द माल्रोमवरील मंडळींची वामकुक्षी चालू होती. एका चेस लाउंजवर पुस्तक वाचता वाचता हेन्रीला डुलकी लागली होती. बाजूला अर्धवट प्यालेल्या लेमोनेडचा ग्लास पडला होता. मादाम एदल एका आरामखुर्चीवर पडल्या पडल्या अर्धमिटल्या डोळ्यांनी लेकाकडे पाहत होती. शेवटी एकदा मोंमार्त्रचे खूळ संपले तर. सॅलाँमधले अपयश सुटीत विसरायला होईल. अभ्यासात त्याला गती आहे. युनिव्हर्सिटीत वेळ चांगला जाईल. तेवढ्यात जोसेफने मादाम ल आंद्रे द प्राँतनेक

आल्याची वर्दी दिली म्हणून ती उठली आणि हेन्रीला जाग आली. कोण आलेय ते बघण्यासाठी हेन्री गच्चीच्या कठड्याकडे गेला. घोडागाडीतून आईच्याच वयाची एक स्त्री उतरत होती. एकमेकांना 'एदल','एंजेलिक' अशा हाका मारत त्यांनी धावत जाऊन मिठी मारली.

घोडागाडीतून सतरा-अठरा वर्षांची एक मुलगी आपला पायघोळ स्कर्ट सांभाळत खाली उतरली.

''माझी मुलगी डेनिस-'' बॅरोनेसने ओळख करून दिली.

चहाच्या टेबलावर हेन्रीची ओळख करून देण्यात आली. मग पुढचा तासभर प्राँतनेक कुटुंबाची वंशावळ, त्यांच्या शाखा, उपशाखा यांचे गुऱ्हाळ हेन्रीला ऐकावे लागले.

''गेल्या वर्षी बॅरोनेट वारले आणि डेनिस बिचारी पोरकी झाली.'' एंजेलिकचे डोळे पाणावले.

''*शेरी* डीअर. मस्य द तुलूझ् लोत्रेकना जरा पियानो वाजवून दाखवतेस का?'' एंजेलिक म्हणाली, ''आमची डेनिस पियानो खूप छान वाजवते बरं का.''

आज्ञाधारक मुलांप्रमाणे ती दोघे खुर्चीवरून उठली. हेन्री मोठ्या अदबीने तिला दिवाणखान्यात घेऊन गेला. तिने पियानो वाजवायला सुरुवात केली. हेन्री सोफ्यावर बसून तिच्याकडे बघत होता. पाठीमागच्या फ्रेंच विंडोमधून येणाऱ्या संध्याकाळच्या उन्हात भिंतीवर पडलेली तिची सावली मोठी छान दिसत होती. सुरावटीतला शेवटचा कॉर्ड वाजवून होताच ती पियानोस्टुलावरून गरकन वळली. तिचा एक हात अजून पियानोच्या पट्टीवर होता.

''कसं वाटलं? सेझार फ्रँकचा प्रील्यूड आहे. ही रचना फारशी कोणाला माहीत नाही. पण माझ्या पपांना फार आवडायची.'' ती उठली आणि सोफ्यावर त्याच्या शेजारी जाऊन बसली. दोघेही तसे समवयस्क होते. त्या दोघांनाही इतर मित्रमैत्रिणी

कोणीही नव्हते. वय पालकांपासून फटकून राहण्याचे होते. त्यामुळे दोघांची थोड्याच वेळात चांगली मैत्री जमली.

दुसऱ्या दिवसापासून ते दोघे रोज संध्याकाळी फिरायला जाऊ लागले. तिच्या आगमनामुळे हेन्रीच्या दिनक्रमात फरक पडला. आयुष्यात प्रथमच त्याला एखाद्या मुलीशी मैत्री करण्याची संधी मिळत होती. प्रथमदर्शनी मनात आलेले रोमँटिक विचार त्याने कटाक्षाने मनातून काढून टाकले. तरीही नकळत तो थोडा नीटनेटका राहायला लागला होता. त्याने पॅरीसमधून डझनभर नवे शर्ट मागवून घेतले. दाढी व्यवस्थित कोरून घेतली. कपड्यांची इस्त्री, टायची गाठ, बुटांचे पॉलीश वगैरे गोष्टींवर जास्त लक्ष पुरवायला लागला. हातात अंगठी, गळयात सोन्याची साखळी घातल्याशिवाय तो बाहेर पडत नसे.

रोज फिरायला जाण्यासाठी तो नवनवी ठिकाणे शोधून काढायचा. लोत्रेकांच्या इस्टेटची त्याला चांगली माहिती होतीच. भरीला त्याने स्थानिक इतिहासाची पुस्तके नीट वाचून काढली. संध्याकाळी फिरायला जाताना तो तिचा वाटाड्या असे. आपल्या गप्पा मनोरंजक व्हाव्यात म्हणून तो खूप काळजी घेई.

मोंमार्त्रमधल्या कनिष्ठ वर्गातून आलेल्या मुलींशी कित्येक वेळा काय बोलावे हा प्रश्न त्याला पडे. तसा प्रकार डेनिसच्या बाबतीत होत नसे. एक तर ती त्याच्या तोलामोलाच्या उमराव घराण्यातली होती. साहजिकच त्यांच्या परंपरा, आचारविचार, पूर्वग्रह, आवडी -निवडी मिळत्याजुळत्या होत्या. त्यामुळे लवकरच त्यांची चांगली गट्टी जमली.

ऑक्टोबरमध्ये पावसाला सुरुवात झाली आणि त्यांचे बाहेर फिरायला जाणे बंद झाले. त्यामुळे हेन्रीने तिचे पोर्ट्रेट करायला घेतले. रोज दुपारी ती त्याच्या स्टुडिओत जायची. आरशासमोर नट्टापट्टा झाला की हेन्री तिला पोज देऊन बसवायचा. मग गप्पागोष्टी करत, हसत-खिदळत वेळ कसा जायचा ते तिच्या आईचे बोलावणे येईपर्यंत कळायचे नाही.

एके दिवशी ती नेहमीप्रमाणे पोज देऊन बसली होती. त्या दिवशी बाहेर पाऊस पडत होता. का कोण जाणे दोघेही गप्प होते. पावसाची रिपरिप व शेकोटीतल्या

लाकडांची तडतड याशिवाय सगळे काही चिडीचूप होते. अचानक डेनिस स्टुलावरून उठली व हेन्रीचा हात हातात घेऊन म्हणाली, ''हेन्री, तुम्ही किती चांगले आहात. माझ्यासाठी केवढं करता. तुम्ही नसता तर मी कंटाळयाने अगदी वेडी झाले असते. तुमचे आभार कसे मानावे ते कळतच नाही.''

अचानक झालेल्या या प्रकारामुळे हेन्री थोडा गोंधळून गेला. ''वास्ताविक मीच तुमचे आभार मानायला हवेत. तुझ्यापेक्षा मीच जास्त कंटाळलो होतो. चल. तो चहा घेऊया आणि कामाला लागू.'' हेन्री म्हणाला, ''असे एकमेकांचे आभार मानायच्या अगोदर ते पोर्ट्रेट एकदाचं पूर्ण करूया.''

- ३१ -

डेनिस हेन्रीला पोर्ट्रेटसाठी पोज द्यायला लागल्यानंतर त्या दोघांत अधिक जवळीक निर्माण व्हायला लागली. दोघांनी आपापल्या जीवनातल्या बारीकसारीक घटना एकमेकांना सांगितल्या. आपल्या मनाचे कप्पे एकमेकांजवळ उघडे केले. या जवळिकीचा अर्थ लावताना हेन्रीच्या मनात चलबिचल होऊ लागली. डेनिस एवढी आपुलकी दाखवतेय त्या अर्थी आपण तिला नक्कीच आवडत असलो पाहिजे. पण तिला लग्नाची मागणी घालायला त्याला धीर होत नव्हता. ब्रासेरीमधल्या त्या वेश्येचे शब्द अजून त्याच्या कानात घुमत होते. तू खुजा आहेस, दिसायला कुरूप आहेस. पण तरी काय झाले? काही मुली जाणूनबुजून असल्या व्यंगाकडे दुर्लक्ष करतात. युद्ध संपल्यावर नाही का रणभूमीवर लढताना अपंगत्व आलेल्या वीरांशी लग्न करण्याची लाट येते. कोणी सांगावे डेनिससुद्धा अशा निःस्वार्थी मुलींत मोडणारी एक असेल. शारीरिक सौंदर्यापेक्षा आंतरिक सौंदर्याला महत्त्व देणारी.

डेनिसच्या साध्या साध्या वागण्यात काहीतरी अर्थ काढण्याचा हेन्रीला नंतर कित्येक दिवस चाळाच लागला. तिच्या प्रेमात पडल्यामुळे तो सारासार बुद्धी गमावून बसला होता. मग अगदी क्षुल्लक गोष्टींचा आपल्याला हवा तो अर्थ लावून तो मोकळा व्हायचा. तिला तो आवडत असे. अगदी मनापासून आवडत असे ही गोष्ट खरी होती. लोत्रेकांचे इतिहासप्रसिद्ध घराणे, त्यांना मिळणारे मानमरातब, त्यांची अफाट

संपत्ती. शिवाय हेन्रीच्या हातातली कला वगैरे सगळया गोष्टींनी ती प्रभावित झाली होती. पण ते तेवढ्यापुरतेच होते. डोक्यात प्रेमज्वर चढल्यामुळे हेन्रीच्या हे सगळे लक्षात येणे शक्य नव्हते.

तिला मागणी घालण्यासाठी हेन्री संधी शोधत होता. एखाद्या दबा धरून बसलेल्या शिकाऱ्यासारखा. तिच्या मनात काहीच नसल्याने ती बेसावध होती. हेन्रीच्या वाढदिवसाच्या निमीत्ताने सगळे जण जमले होते. त्याचे चित्त अगोदरच थाऱ्यावर नव्हते. तेवढ्यात डेनिस अजाणतेपणाने त्याच्या अगदी जवळ येऊन उभी राहिली. तिच्या शरीराची धग त्याला जाणवली. त्याच्या हातातला शँपेनचा ग्लास थरथरू लागला. तिने शांतपणे विचारले, ‘‘मी ती प्रील्यूड वाजवू का. पहिल्या दिवशी वाजवलेली.’’

तिने पियानो वाजवायला सुरुवात केली. हेन्री तिच्याकडे टक लावून पाहत होता. तिचे वादन संपल्यावर तिने हेन्रीकडे वळून पाहिले. त्याने ग्लासातली शँपेन एका घोटात संपवली व लगबगीने तिच्या जवळ जाऊन तिला विचारले,

‘‘प्लीज. वर स्टुडिओत जाऊ या का जरा.’’

‘‘आता! या वेळी?’’ तिने प्रश्नार्थक नजरेने त्याच्याकडे पाहिले.

‘‘होय. माझं खूप महत्वाचे काम आहे.’’

त्याच्या घशाला कोरड पडली होती. छाती धडधडत होती. तो तिला घेऊन वर स्टुडिओत गेला.

‘‘काय दाखवणार आहात मला?’’ तिने विचारले.

‘‘जरा बस इथे.’’

ती मुकाट्याने कोचावर बसली. हेन्री तिच्या शेजारी जाऊन बसला. त्याने तिचा हात आपल्या हातात घेतला. त्याचे ओठ थरथरत होते. दिव्याच्या मंद प्रकाशात

त्याचा कुरूपपणा अधिकच उठून दिसत होता. त्याच्या रूपात झालेल्या या बदलामुळे ती थोडी घाबरली.

‘‘तुला ही गोष्ट विचित्र का वाटतेय? माझ्यातल्या शारीरिक व्यंगामुळेच ना?’’

मनातल्या खळबळीमुळे बोलताना नकळत त्याच्या हाताची पकड घट्ट होत गेली. तिचा हात दुखू लागला. इतका की कळ मस्तकात गेली. होणाऱ्या वेदनेने तिची भीड, भीती दूर पळाली. तिने आपल्या हाताला जोराचा हिसडा दिला आणि त्याच्या अंगावर ती ओरडली,

‘‘होय. पहिला माझा हात सोडा.’’

त्याने एका झटक्यात तिला आपल्या जवळ ओढून तिच्या ओठांचे चुंबन घेण्याचा प्रयत्न केला. एक क्षणभर काळाची गती स्थिर झाल्यासारखी वाटली. ओठांचा ओलसरपणा, स्तनांची उष्णता, तिचे आक्रसणारे शरीर, त्याच्या मांसात रुतणारी तिची नखे. सर्व काही फक्त एक क्षणभरच. दुसऱ्या क्षणी तिने आपला हात त्याच्या हातातून सोडवून घेतला. धावत ती दरवाजाकडे गेली. तेथे थांबून किंचाळत ती म्हणाली,

‘‘हलकटा. तुझ्याएवढा नीच मी आयुष्यात पाहिला नव्हता. लक्षात ठेव. कोणतीही अव्यंग मुलगी जीव गेला तरी तुझ्यासारख्या बुटक्या, फेंगाड्या आणि कुरूप मुलाशी लग्न करायला तयार होणार नाही.’’

जिन्यावर दाणदाण पाय आपटत ती निघून गेली. त्याचे डोके सुन्न झाले. थोड्या वेळात तो भानावर आला. काय घडले असावे याचा आईला सुगावा लागला असावा. अजून ती वर कशी आली नाही याचे त्याला आश्चर्य वाटले. आता खाली जाऊन आपण होऊन तिला तोंड दाखवणे भाग होते. त्याने काठी उचलली व मोठ्या कष्टाने एक एक पाऊल टाकत खाली गेला. सर्वजण परत गेले होते. आई फायरप्लेसच्या बाजूला एकटीच बसली होती. तो शेजारच्या खुर्चीवर जाऊन बसला. थोडा वेळ कोणीच काही बोलले नाही.

“मी तोंडघशी पडणार आहे याची तुम्हाला जर अगोदरपासून कल्पना होती तर जरा सावध करायचंत मला.” हेन्री आईची नजर टाळत शेकोटीतल्या लाकडांकडे बघत म्हणाला.

थोडा वेळ तसाच गेला. शेकोटीतल्या विस्तवातली लाकडे तडतडत होती.

“असं काहीतरी घडेल असं मला आत कुठेतरी वाटत होतं. पण आशा फार वेडी असते. वाटलं होतं डेनिस इतर मुलींपेक्षा कदाचित वेगळी असेल. पण मी स्वतःला फसवत होतो. ममा, तुम्हाला कल्पना येणार नाही की कुरूप व्यक्ति स्वतःला कशी फसवत असते ती. अशा फसवणुकीने ती स्वतःच्या कुरूपतेला, व्यंगाला झाकत असते. या कल्पनारंजनामुळे थोडा वेळ का होईना तिला आपल्या कुरूपतेचा, व्यंगाचा विसर पडतो.”

“रिरी, *माँ पेतीत*, माझ्या राजा, प्लीज असं बोलू नका. काळजाला घरं पडतात.”

“पण ममा, सत्य परिस्थिती नाकारून काय होणार आहे? तुम्हाला ठाऊक नसेल. मी मोंमार्त्रमध्ये होतो तेव्हा एक-दोनदा ब्रासेरी मोंतेमध्ये गेलो होतो. कशाला ठाऊक आहे? स्त्रीसुखासाठी. दोन्ही वेळा माझ्याबरोबर यायला कोणीही तयार झालं नाही. दीडदमडीच्या वेश्यांनीसुद्धा मला नकार दिला. माझ्या अशा रूपामुळे. रोज रात्रभर मी तळमळत असतो. स्त्रीचे विचार मनातून काढून टाकण्याचा कितीही प्रयत्न केला तरी मनात ते येतच राहतात. अगदी वेड लागण्याची पाळी येते.”

“तुम्हाला ह्या सत्य परिस्थितीची कल्पना यावी म्हणून मुद्दाम होऊन हे सगळं सांगतोय.” आईकडे बघत तो पुढे म्हणाला, “मी मोंमार्त्रमध्ये परत राहायला जायचं ठरवलंय. तिकडेच माझ्या मनाला थोडी शांतता लाभेल. आजच्यासारखा प्रसंग कुठेही येऊ शकला असता. सॅन रेमो, फ्लॉरेन्स कुठेही. आज नाहीतर उद्या सहा महिन्यांनी

केव्हाही. डेनिस फक्त निमित्त झाली. मी तिकडे राहिलो तर माझ्यापासून किमान तुम्हाला त्रास होणार नाही. आज झाला तसा.''

''तुम्हाला तिकडे अगदी एकटं वाटेल.'' तिच्या डोळयांत अश्रू दाटून आले होते.

त्याने काठी घेतली आणि तो उठून आईजवळ गेला.

''प्लीज ममा, तुम्ही रडू नका. आपल्याला मन थोडं घट्ट करायला हवं. तसा मी अधूनमधून भेटायला येत जाईन.''

एवढे बोलून तो आपल्या झोपण्याच्या खोलीकडे जायला निघाला. आई त्याच्याकडे अश्रू भरल्या नजरेने बघत होती. काठी टेकत टेकत पाय ओढत चाललेली त्याची पाठमोरी आकृती मोठी करुणास्पद दिसत होती. डोळयांत दाटलेल्या अश्रूंनी तिची नजर अंधूक झाली. तिने पापण्या घट्ट मिटून घेतल्या. अश्रू गालांवरून घळघळा ओघळू लागले. आपल्या मुलाला कठोर नियतीपासून जपण्याचा आजवर तिने आपल्यापरीने खूप प्रयत्न केला होता. पण आता प्रार्थना करण्यापलीकडे तिच्या हातात काहीच राहिले नव्हते. शेकोटीतल्या विझत जाणाऱ्या विस्तवाच्या ठिणग्यांकडे विषण्णपणे पाहता पाहता ती पुटपुटत प्रार्थना करत होती.

# मुलँ रूज

''मस्य तुलूझ!''

घोडागाडी दरवाजात थांबलेली पाहताच मादाम ल्युबेत अचंबित होऊन मोठ्या आनंदाने उद्गारली. दोन हातांत स्कर्ट किंचित उचलून धरत ती जवळपास धावतच बाहेर आली. तार हातात पडल्यापासून काळजीने तिचा जीव सारखा वरखाली होत होता. मोंमार्त्रमध्ये परतण्यामागे निश्चितच तसे काहीतरी कारण घडले असले पाहिजे. नाहीतर एवढ्या मोठ्या घरातला मुलगा परत या दरिद्री बकाल वस्तीत कशाला पाऊल टाकेल? नक्कीच काहीतरी घडले असेल. आई-वडिलांशी भांडण तर नाही ना? कारण काही का असेना. पण हेन्री परत येतोय या विचाराने तिचा जीव सुखावला होता खरा. आज सकाळपासून लॉजमध्ये तिची उगाचच धावपळ चालू होती. रोजचे वर्तमानपत्र वाचताना तिची नजर सारखी दरवाजाकडे वळत होती. गेल्या तासाभरात एक ओळही वाचून झाली नसेल.

''तुम्ही गेल्यापासून तुमच्या स्टुडिओतली एक काडीसुद्धा जागची हलली नसेल. तुम्ही येणार म्हणून आज झाडून पुसून ठेवलाय एवढंच. स्टोव्हसुद्धा पेटवून ठेवलाय म्हणजे...'' बोलताना ती अचानक थांबली. लक्षण काही ठीक दिसत नव्हते. तसा तब्येतीत काही फारसा फरक पडलेला वाटत नव्हता पण डोळे मात्र थोडे वेगळे दिसत होते. खोल आणि शुष्क. खोडकर बालिशपणा कुठल्या कुठे लोपला होता.

''तब्येत वगैरे ठीक आहे ना?''

''थँक्यू मादाम ल्युबेत. मी अगदी टुणटुणीत आहे,'' तो तिच्याकडे बघून मोठ्या आपुलकीने हसला खरा पण त्या हसण्यामागचा विषाद काही लपत नव्हता. ''परत रहायला आलो ते चांगलं झालं की नाही. अहो, तुमच्याशिवाय घरी चुकल्याचुकल्यासारखं वाटायचं.''

चौथ्या मजल्यावरील आपल्या स्टुडिओचे दार उघडताच त्याने तडक खिडकी गाठली. हातातल्या काठीवर भार देत तो उभा राहिला. एकमेकांना खेटून

असल्यासारखी वाटणारी घरांची छपरे, त्यातून डोकावणारी धुरांडी हे खिडकीतून दिसणारे परिचित दृश्य त्याने डोळे भरून पाहून घेतले. हवेत शरद ऋतूतला सौम्य गारठा होता. त्याला डेनिसबरोबर मारलेल्या सायंकालीन फेरफटक्यांची आठवण झाली आणि तो किंचित उदास झाला. त्याने खिडकीकडे पाठ फिरवली व चौफेर नजर टाकली. स्टुडिओत रेंगाळणाऱ्या टर्पेंटाइनचा वास त्याच्या नाकात शिरला. भिंतीवर टांगलेले कॅनव्हास, इझल, वेताच्या खुर्च्या, ढेरपोट्या स्टोव्ह, व्हीनसचा अवजड पुतळा सगळया गोष्टी अगदी तिथल्या तिथे होत्या. त्याच्या जानी दोस्तांप्रमाणे, त्याच्या गोतावळयाचा एक भाग असल्यासारख्या.

दरवाजात उभ्या असलेल्या मादाम ल्युबेतकडे पाहून तो म्हणाला, “आता मी इथेच मुक्काम ठोकणार आहे. नुसता कामापुरता नव्हे. कायमचा. आता हाच माझा स्टुडिओ आणि हेच माझे घर.”

लोखंडी कठड्याची बाल्कनी, मोठ्या खिडक्या आणि पांढऱ्या-पिवळया डेझीच्या फुलांचा नवा वॉलपेपर यामुळे जागा प्रशस्त वाटत होती. आईचा एक डेग्युरोटाइप फोटो त्याने झोपण्याच्या पलंगाजवळ उशाशी ठेवला. काही स्केचेस् त्याने भिंतीवर चिकटवली. टेबलावर एक मॉरीसबरोबर काढलेला त्याचा लहानपणचा अर्ध्या चड्डीतला एक जुना फोटो होता. फोटोत त्याचे उघडे पाय किती निरोगी दिसत होते. त्याने फोटोकडे एकवार डोळे भरून पाहिले.

दोन दिवसांनी त्याच्या सामानाच्या पेट्या आल्या. मादाम ल्युबेतने त्याचे शर्ट, सूट व इतर कपडे वॉर्डरोबमध्ये व्यवस्थित लावून दिले. त्याचे पायमोजे, हातमोजे, दाढीच्या सामानाचा चांदीचा टॉयलेट सेट, महागड्या पर्फ्युम्सच्या बाटल्या, कोपऱ्यात नावाच्या आद्याक्षरांचे नाजूक भरतकाम केलेले टॉवेल आणि हातरुमाल वगैरे बारीकसारीक गोष्टी जागच्या जागी लागल्यामुळे त्याला घरच्यासारखे वाटू लागले.

सगळे घर मनासारखे लागल्यावर तो रॅचोला भेटायला गेला. त्याला वाटले होते की एक तर तो पेंटिंग करताना सापडेल, नाही तर मेंडोलीन वाजवताना किंवा

आलतूफालतू मित्रांना गोळा करून बीअर ढोसताना. कदाचित एखाद्या प्रियपात्राच्या बाहुपाशात. परंतु हेन्रीने त्याच्या स्टुडिओत पाऊल टाकले तेव्हा त्याला धक्काच बसला. महाशयांच्या हातात तेव्हा कलेचा इतिहास नामक प्रचंड मोठा ग्रंथराज होता.

''च्यायला. म्युझियमच्या क्युरेटरच्या या टुकार जागेसाठी अर्ज करण्याचं ठरवल्याबरोबर माझे दिवस फिरलेयत बघ. तुला कल्पना नाहीये काय काय अभ्यास करावा लागतो याची. एवढी परीक्षा घेऊन जागा कोणती तर कन्सर्जची. म्युझियमचा का होईना पण शेवटी दरवानच की.''

रॅचोच्या चेहऱ्यावरचे नेहमीचे हास्य कुठल्या कुठे गेले होते. त्याने बहुढंगी बोहेमियन जीवन पद्धतीला तिलांजली दिली होती. त्याच्यातील मध्यमवर्गीय बुर्ज्वा आता सुरक्षिततेच्या शोधात होता. ल एलीसमधील नाच, ला नुव्हेलमधील बीअरपान यात त्याला रस वाटेनासा झाला होता. थोडा वेळ त्यांनी इकडच्यातिकडच्या गप्पा मारल्या. जुन्या दिवसांच्या स्मृती जागवण्याचा प्रयत्न केला. पण आता गप्पागोष्टींत पहिल्यासारखी जान भरत नव्हती.

''तुला कळलं का. ग्रेनीयेने लग्न केलं. ल्युकास नॉर्मंडीला परत गेला.''

''हो. तू पत्रात लिहिलं होतंस. व्हिन्सेंटचं कसं काय चाललंय.''

“अरे हो. व्हिन्सेंट मात्र अजून इथेच आहे. त्याच्या डोक्यात सध्या चित्रकारांचा भ्रातृभाव व सहजीवन याचं खूळ शिरलंय. मोंमार्त्रमध्ये येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येकाला ॲबसिंथ ढोसत लंब्याचवड्या बाता मारत आपली मतं ऐकवून वात आणतो. गेल्या वर्षी उन्हाळयात त्याने प्रदर्शन भरवलं होतं. ओग्युस्तिनाच्या कॅफेमध्ये. पार बोजवारा उडाला. प्रदर्शन संपल्यावर त्याने ओग्युस्तिनाला लग्न करशील का म्हणून विचारलं. त्याचा एकूण अवतार पाहून ती जी हसायला लागली म्हणून सांगू. ती सरळ म्हणाली की, हे काय खूळ घेतलंयस डोक्यात. आधी स्वतःचं पोट भरायला शिक. मग लग्नाचं बघ. तुला माहीतच आहे ती कशी फटकळ आहे ती. आपला व्हिन्सेंट तसा चांगला आहे रे, पण तुला खरं सांगू. त्याचा स्क्रू थोडा ढिलाच आहे.” रॅचो आपल्या डोक्यावर बोटाने दाखवत म्हणाला.

“गोझी आणि आँक्तां इथे मोंमार्त्रमध्येच आहेत. नक्की काय करतात माहीत नाही. पण खूप कामात आहेत असं ऐकून आहे.”

“काय काम करतायत?” हेन्रीने मोठ्या उत्सुकतेने विचारले.

“काम कसलं डोंबलाचं. दोन घास पोटात ढकलायला मिळावेत या माफक अपेक्षेने काय मिळेल ते काम मान खाली घालून निमूटपणे करणे ह्या मोठ्या उद्योगात दिवसभर ते मग्न असतात. दोन वेळच्या जेवणाची भ्रांत. कसली कला आणि कसली मूल्ये. काय पेशा आहे नाही चित्रकाराचा.”

- ३३ -

वसंत ऋतू संपून उन्हाळा सूरू झाला तरी त्या वर्षी रॅंचोच्या नशिबात एकही काम नव्हते. सर्व उन्हाळा अगदी फुकट गेला होता. नाही म्हणायला एकदा स्टुडिओतून घरी जाताना त्याला मोंमार्त्रच्या कबरस्तानाच्या फाटकाजवळ एक मुलगी दिसली.

रॅंचो त्याची कर्मकहाणी हेन्रीला सांगत होता, “माझ्या मॅडोनाच्या चित्रासाठी पोज देशील का म्हणून सुरुवात करून मी माझं नेहमीचं भाषण ठोकलं. तोंडावरून ती फारशी हुशार दिसत नव्हती. थोडीशी बहिरी पण असावी असं वाटत होतं. पण स्वभाव मात्र अगदी फुलासारखा कोमल आहे. ती हॉटेलमध्ये कॅशियर आहे. अर्थात तिच्या सांगण्यावर विश्वास ठेवायचा झाला तर. मुली कधी खरं बोलतील आणि कधी थापा मारतील ते तसं कळणं कठीण असतं. मी तिचं एक पोर्ट्रेट केलंय. कॅनव्हासच्या तुकड्यावरचं स्केच म्हण फार तर. मी ते तिला दिलं तेव्हा ती रडायलाच लागली.”

“छान पोरगी आहे. तू बघच एकदा,” रॅंचो प्रेमळपणे हसला, “बेर्थ तिचं नाव.”

काही क्षण विचारहीन शांततेत गेले. शेवटी आपल्या हाताचे पंजे गुडघ्यांवर ठेवत तो म्हणाला, “तू काय करायचं ठरवलंयस.”

“पेंटिंग. दुसरं काय करणार?”

"तुझं एक बरंय. तुझ्यामागे आमच्यासारखी पोटापाण्याची काळजी नाहीय. तुझ्या मनाला येईल तेव्हा मनाला येईल तशी पेंटिंग तू करू शकतोस. तुला ओग्युस्तिनातली ती पोरगी आठवतेय. तिचा चेहरा तुला पारदर्शी वाटला होता आणि तिच्या मानेवर तुला हिरव्या रंगाची सावली दिसली होती."

"सगळं काही स्पष्ट आठवतंय." हेन्री मोठ्या आत्मविश्वासाने बोलत होता, "आता मला हव्या त्या हिरव्या, निळया कसल्याही रंगांच्या प्रायमरी शॅडोज् रंगवता येतील. हौशी चित्रकार असण्याचा हा एक फायदा असतो. कॉर्मेन, सॅलाँ सबको मारो गोली."

"तू आपल्या मनाप्रमाणे काम करायला मोकळा आहेस रे बाबा. आमच्यासारखी पोटाची खळगी कशी भरावी याची काळजी नाही तुला." रॅचोने एक मोठा उसासा टाकला.

संभाषणात अचानक खंड पडला आणि त्याच्या लक्षात आले की आता बोलण्यासारखे काही उरलेच नव्हते. मैत्री पुढे चालू राहायला हरकत नव्हती पण येथून पुढे आयुष्याचे मार्ग भिन्न असणार होते. त्यांना एकत्र बांधून ठेवणारे धागे आता तुटल्यातच जमा होते. उरल्या होत्या फक्त एकत्र घालवलेल्या दिवसांच्या स्मृती. त्या आठवणींची शिदोरी संपल्यावर त्यांना आपण दोन अनोळखी इसम असल्यासारखे वाटू लागले.

"मला आता निघायला पाहिजे." हेन्री कोचावरून उठत म्हणाला, "तुझा अभ्यास चालू राहू दे. अधनंमधनं असंच भेटत राहू."

रॅचो उठून दरवाजापर्यंत आला. दोघांच्याही ओठांवर हसू होते. पण अवघडलेले.

"जाण्यापूर्वी माझी काही अलीकडची पेंटिंग्स बघून जा." एक क्षणभर थांबून रॅचो म्हणाला, "बाय द वे, तुला ज्युलीबद्दल काही कळलं का?"

“नाही.”

“तिने नदीत जीव दिला. तू गेल्यानंतर एका आठवड्याने.”

“तिचे दफन कुठे केलंय?”

“कोण जाणे. आपले म्हणावेत असे कोणी नातेवाईक नाहीत, जवळ फुटकी कवडी नाही... आपली कबर मागे ठेवण्यासाठी जवळ पैसे असावे लागतात गाठीला मस्य.”

शेवटची पायरी येईपर्यंत हेन्रीने स्वतःला कसेबसे आवरून धरले. ती पायरी येताच तो मटकन खाली बसला आणि शांतपणे अश्रू ढाळू लागला.

- ३४ -

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी हेन्री ला नुव्हेलीत जाऊन बसला. पूर्वीचे बरेच दोस्त तिथे भेटले. पण तिथेही निराशाच पदरी आली.

“कमर्शियल आर्ट,” गोझी आपल्या शर्टची फाटकी बाही वर करत म्हणाला, “खरा पैसा यातच आहे. कॅटलॉग, लेबल, पोस्टर, जाहिराती. भविष्यात याच गोष्टींना महत्त्व प्राप्त होणार आहे. साईन बोर्ड रंगवूनसुद्धा गरजेपुरते पैसे मिळवता येतात. पण एकदाची संधी मिळायला हवी.”

आँक्तां पौराणिक चित्रे घाऊक प्रमाणात रंगवण्याच्या त्याच्या कौशल्याबद्दल मोठ्या अभिमानाने बोलत होता़

“ख्रिस्ताचे स्वर्गावरोहण. मी तीन दिवसांत उडवतो. खरं तर दोनच दिवस पुरेसे आहेत. पण ते भोसडीचे देवदूत जाम वेळ खातात. आणि ख्रिस्तजन्माला एक दिवस जास्त लागतो. बारीकसारीक तपशील खूप आहेत त्यात.”

गप्पागोष्टींत जान आणण्याचा सगळयांनी आपापल्यापरीने खूप प्रयत्न केला. सर्व भूतकाळ ढवळून काढला. ॲतेलीएमधले सगळे विनोद आठवून आठवून

एकमेकांना ऐकवले. पण लवकरच विद्यार्थिदशेतल्या गमतीजमतींचा साठा संपून गेला.

संभाषणात रंग भरण्याचा ओढूनताणून आटापिटा चालला होता. आणलेले अवसान उसने होते. त्या क्षणी सर्वांना भविष्याची चिंता भेडसावत होती. गेलेल्या वर्षांबद्दल वेळ वाया गेल्याची हळहळ वाटत होती. हे सर्व हेन्रीच्या लवकरच लक्षात आले.

''गंमतच आहे नाही?'' गोझी म्हणाला, ''त्या उर्मट कॉर्मेनची सगळी मनमानी निमूटपणे ऐकून घ्यायची आणि आपणच आपली मारून घ्यायची. कशासाठी मन मारून हा जिवाचा आटापिटा करायचा तर सॅलाँसाठी आपलं पेंटिंग एकदाचं निवडल जावं म्हणून. एवढी घासल्यावर शेवटी अक्कल येते. काय तर सॅलाँसाठी पेंटिंग निवडलं गेलं काय आणि नाही काय ह्या सगळयाचा दोन घास पोटात ढकलण्याच्या दृष्टीने झ्याटभरसुद्धा उपयोग होत नाही.''

''पॅरीसमध्ये या घटकेला उपाशीपोटी फिरणाऱ्या चित्रकारांपैकी अर्ध्याअधिक चित्रकारांवर एके काळी सॅलाँच्या मान्यतेचं शिक्कामोर्तब झालेलं असेल.'' आँक्तांने दुजोरा दिला.

''तो बुढ्ढा देगास जे म्हणत होता ते बरोबर आहे. चित्रकला हे काही उपजीविकेचं साधन होऊ शकत नाही. उलटपक्षी चित्रकला तुम्हाला आत्मघाताच्या मार्गाने घेऊन जाते. आयुष्य जाळणाऱ्या पार्थिव चिंतेतून शेवटी मेल्यावरच मुक्ती मिळते.''

मोंमार्त्रमध्ये परतण्याच्या हेन्रीच्या निर्णयाबद्दल सर्वांना एकाच वेळी आश्चर्य आणि हेवा वाटत होता. त्याच्यामागचे कारण हळूहळू त्याच्या लक्षात येऊ लागले. सॅलाँचे अपयश त्याला परवडण्यासारखे होते. त्याच्या नीटनेटक्या उबदार स्टुडिओमध्ये बसून तो मनाला येतील ते रंग कॅनव्हासवर लावू शकत होता. अन्न, वस्त्र, निवारा असल्या कोणत्याही पार्थिव गोष्टींची चिंता त्याला नव्हती. तो एक गर्भश्रीमंत होता तर बाकीचे सगळे दरिद्रीनारायण. गेल्या दोन-तीन वर्षांच्या मैत्रीत त्यांच्यातील ह्या फरकाची जाणीव कोणालाही झाली नव्हती. पण आज हे विचार

मनात आले आणि मने गढूळ झाली. काचेचा पेला खळळकन फुटावा तशी मैत्री एका क्षणात संपली. हेन्रीच्या मित्रांच्या दृष्टीने तो आता एक श्रीमंत गुलहौशी चित्रकार होता. आठवणींच्या तुकड्यांत जुनी मैत्री शोधण्यात अर्थ नाही हे हेन्रीला उमगले. एकमेकांच्या कलाकृती बघण्याच्या निमित्ताने भेटत राहू या, असे वरपांगी ठरवून सर्वजण आपापल्या दिशांना पांगले.

फक्त व्हिन्सेंटला हेन्री मोंमार्त्रमध्ये परत आल्याचा मनापासून आनंद झाला होता. हेन्रीला पाहताक्षणी त्याचे नीलमण्यासारखे डोळे चमकले. आपला हडकुळा हात पुढे करत तो म्हणाला,

''तुझ्यावाचून मला करमत नव्हतं यार. तुझ्याशी बऱ्याच गोष्टी बोलायच्च्यायत. चल घरी जाऊन तेओने पाठवून दिलेली स्कॉटव्हिश घेत गप्पा करू.''

त्या दिवशी दोघांनी पहिल्यासारखाच वितंडवाद घालत गप्पा केल्या. त्यांच्या जाणिवा अजून पहिल्यासारख्याच धारदार होत्या. पण गेल्या काही महिन्यांत व्हिन्सेंट पार बदलून गेला होता. स्वतःच्याच भोवऱ्यात हरवल्यासारखा तो वाटत होता. त्याच्या अंतर्मनात जीव घुसमटवून टाकणारे, असे एक भयानक वादळ घोंघावत आकार घेत होते.

''पॅरीसमध्ये माझा जीव घुसमटतोय. मला येथून दूर जायचंय. सूर्याच्या सान्निध्यात. मला रंगवायचीयत त्याच्या लख्ख प्रकाशात डोलणारी शेतं, त्यात घाम गाळणारी माणसं, तळपत्या उन्हाने सुकून पिवळे पडलेले गवतांचे ढीग आणि खूप खूप सूर्यफुलं. पिवळीजर्द.''

एवढे बोलून त्याला धाप लागल्यासारखे झाले. त्याचे ओठ आकडी आल्यासारखे वेडेवाकडे झाले. त्याच्या स्वभावातल्या जन्मजात अस्वस्थपणाने एखाद्या नागासारखा फणा वर काढला होता. त्याची नजर एखाद्या श्वापदाप्रमाणे हिंस्र झाली. त्यात वेडाची क्षणिक लहर तरळत होती. पुढे होऊ घातलेल्या सर्वनाशाच्या चाहुलीने हेन्रीच्या अंगावर शहारे आले.

एके दिवशी व्हिन्सेंट हेन्रीच्या स्टुडिओत आला. पावसात नखशिखांत भिजून, दारू पिऊन तर्रर अवस्थेत. दरवाजातच तो फतकल मारून बसला.

"मला पकडून कोठडीत टाकणारायत. खरंच पकडतील का रे मला. तुझा तो पीएर टँग्वी मला म्हणतो की, तुझी पेंटिंग एखाद्या वेडाने पछाडलेल्या माणसाने काढल्यासारखी वाटतात."

त्याने आपले डोके दोन्ही हातांत गच्च धरून ठेवले होते. तो स्फुंदून रडत होता. टँग्वीच्या त्या शेऱ्याने जणू दारूच्या कोठारावर ठिणगी पडल्यासारखे झाले होते. असा उद्रेक त्यानंतर वारंवार होऊ लागला. कोणालाही न सांगता तो मधेच चार-सहा दिवस गायब होई. बोलताना तो मधेच ओरडायचा. त्याच्या बोलण्यातली असंबद्धता वाढत गेली. बोलण्यातला तोतरेपणा वाढला. मधेच तो फ्रेंचऐवजी अचानक डचमध्ये बोलू लागे.

फेब्रुवारीत त्याने आर्ल्सला जाण्याचा निर्णय घेतला. हेन्री त्याला निरोप द्यायला रेल्वे स्थानकावर गेला. सकाळची वेळ होती. सूर्य अजून वर यायचा होता. थंडगार वारा सुटला होता. वातावरण खिन्न आणि उदास होते. व्हिन्सेंट तिसऱ्या वर्गाच्या डब्याच्या दारात उभा होता. रात्रभरच्या मद्यपानाने त्याचे डोळे तांबारलेले दिसत होते. दोघेही एकमेकांकडे मूकपणे बघत होते. गाडी सुटता सुटता व्हिन्सेंटच्या दाभणासारख्या राठ दाढी वाढलेल्या चेहऱ्यावर किंचित स्मितरेखा उमटली. गाडी सुटली. व्हिन्सेंटने हात हलवत हलवत निरोप घेतला. गाडीने सोडलेल्या वाफेच्या ढगामागे हळूहळू अदृश्य होणारा आपला मित्र हेन्रीला एखाद्या बुडणाऱ्या माणसाप्रमाणे भासला.

दोनच दिवसांनी पुन्हा एकदा रेल्वे स्थानकावर निरोप द्यायला जायची पाळी हेन्रीवर आली. रँचो म्युझियम क्युरेटरची परीक्षा पास झाला होता. ड्रॅग्नॉन या शहरी त्याची नेमणूक झाली होती. निरोप घेताना बहुतेकजण एकमेकांना ज्या प्रकारे फुकट सल्ले देत धीराच्या पोकळ बाता मारत असतात त्याच प्रकारची निरर्थक वटवट करून उदास अंतःकरणाने हेन्री स्टुडिओवर परतला.

- ३५ -

दुसऱ्याच दिवसापासून हेन्रीने धडाक्याने कामाला सुरुवात केली. एकाच वेळी तीन-चार कॅनव्हास त्याने करायला घेतले. सकाळी अगदी दिसायला लागल्यापासून ते संध्याकाळी अगदी बाहेर अंधारून येऊन इझलवर काळोख पडेपर्यंत तो काम करत राही. हळूहळू त्याचा हात बसू लागला. दिवसेंदिवस रेखाटनातली सफाई वाढू लागली. त्याच्या कामाचा झपाटा विलक्षण होता.

दिवस कामात कसा निघून जाई ते कळत नसे. पण संध्याकाळ मात्र अस्वस्थ करणारी असे. विसरू पाहाव्यात पण विसरता न येणाऱ्या आठवणी खायला उठत. स्टुडिओत जसा अंधार दाटू लागे तशा गतस्मृती कुजबुजून त्याच्या भोवती पिंगा घालू लागत. अंधारात पेटणाऱ्या एकुलत्या एक दिव्याभोवती झुंबड उडवून देणाऱ्या पतंगांसारख्या. थंडगार भिंतीतून आठवणींची दृश्ये झिरपत त्याच्या डोळयांसमोर तरंगू लागत आणि सापासारखे वेटोळे करीत त्याच्या भोवती ठिय्या मारून बसत. अशा वेळी हेन्री डोक्यावर हॅट घालून चटकन बाहेर सटके.

अशाच एका संध्याकाळी त्याने ला नुव्हेलीत चक्कर टाकली. तिथल्या सर्व परिचित गोष्टी आता अपरिचित वाटू लागल्या होत्या. ज्या कॅफेतील वातावरण दोन वर्षांपूर्वी जिवंत वाटायचे तेच वातावरण आता एखाद्या गुत्त्यातल्या गोंगाटासारखे वाटत होते. जेथे पाऊल टाकताच चित्तवृत्ती प्रफुल्लीत होत असत तिथे आता पाय टाकताच मरगळ आली. आज तेथे बरेच नवे चेहरे दिसत होते. हेन्रीला पाहून त्या नव्या विद्यार्थ्यांची रंगात आलेली चर्चा मधेच थांबली. सॅलाँमध्ये एकदा आपटी खाऊन झाल्यावर आता याचे तिथे काय काम आहे असा एकूण आविर्भाव त्यांच्या नजरेत होता. जुने चित्रकार एक तर त्यांच्या स्वतःच्याच प्रश्नांमध्ये मशगूल होते नाहीतर डॉमिनो खेळण्यात तरी. एकूण कोणालाही त्याच्याकडे लक्ष द्यायला फुरसत नव्हती. मोंमार्त्रमधल्या अनेक अपयशी आणि बेकार लोकांपैकी एक. वय वर्षे बावीस. काहींच्या मानाने तरुण तर काहींना वयस्कर. तेथे बसलेल्यांपैकी कोणालाही त्याच्याशी मैत्री जोडण्यात किंवा गप्पा मारण्यात रस नव्हता.

प्रत्येक संध्याकाळी हेन्रीची एक दिशाहीन भटकंती चालू व्हायची. गर्दीमध्येसुद्धा त्याला एकाकीपणाची जाणीव सतत पोखरत असायची. कधी कधी तो एकटाच फर्नांदोच्या सर्कशीला जाऊन विदूषक, घोडेस्वार, शिकवलेले कुत्रे, रंगीबेरंगी तंग पोशाखातील कसरतपटू यांचे तासन्तास निरीक्षण करत बसे.

एका संध्याकाळी तो ल एलीसमध्ये जाऊन बसला. बराच वेळ कोणाचेही लक्ष त्याच्याकडे गेले नाही. शेवटी मालकाचे लक्ष त्याच्याकडे गेले. तो आपण होऊन त्याच्या टेबलावर येऊन बसला. त्याने तक्रारींचे चऱ्हाट त्याच्यापुढे लावले.

"आमचा धंदा आजकाल साफ बसलाय. तुम्हाला सांगायची गरज नाही. आमच्या धंद्याला या मुलींची अप्रत्यक्ष मदत होत असते. त्यातल्या बऱ्याच मुली थोडाफार धंदाही करतात. चार पैसे मिळतात बिचाऱ्यांना. बार्ताझार पाटू नावाचा नवा हवालदार या भागात बदलून आलाय. एकदम कडक काम आहे. कार्डाबिगर धंदा करणाऱ्या पोरींच्या अगदी हात धुऊन मागे लागलाय. तुम्हाला माहीत नसेल. पॅरीसमध्ये वेश्याव्यवसाय करणाऱ्या मुलींची नोंदणी करून त्यांना एक कार्ड दिलं जातं. प्रत्येकाने हे कार्ड नेहमी जवळ बाळगलं पाहिजे असा नियम आहे. पण ते कार्ड घ्यायचं म्हणजे फार कटकटी असतात. कोणी बिगरकार्डाची मुलगी धंदा करताना सापडतेय का ते तपासायला हा डँबीस पाटू युनिफॉर्म न घालता साध्या कपड्यात सगळीकडे कुत्र्यासारखा वास घेत फिरत असतो. कोणी जर अशी सापडलीच तर तात्काळ तिची रवानगी सँ लाझरच्या सुधारगृहात झालीच म्हणून समजा. साध्या कपड्यात असल्यामुळे याला चटकन ओळखता येत नाही. त्यामुळेच तर सगळी पंचाईत झालीय. उघडपणे काहीच करता येत नाही. आता तुम्हीच सांगा. असं युनिफॉर्म न घालता फिरणं नैतिकदृष्ट्या योग्य आहे का?"

कधी कधी तो बुलेव्हारमधील ब्रासेरीमध्ये जाऊन बसे. हॅट डोळयांवर ओढलेली, पाय खुर्चीवरून अधांतरी लोंबकळतायत अशा अवस्थेत तो तासन्‌तास बसून राही. कंटाळून जांभया देत, वर्तमानपत्र वाचत, वेटर्सची धावपळ बघत, उगाच कोणाची तरी वाट बघत असल्यासारखा. कधी उगाचच हाताला चाळा म्हणून स्केचबुकमध्ये रेखाटन करी. मधेच चष्मा पुसता पुसता चष्म्याच्या काचेत त्याला आपला कुरूप चेहरा दिसायचा. वाटायचे आईच्या म्हणण्यात किती तथ्य होते. तुला एकटे एकटे वाटेल.

एके दिवशी त्याने बसून बसून कंटाळा आला म्हणून सहजपणे कोनॅक मागवली. एक पेला. मग आणखी एक. थोड्या वेळाने पुन्हा आणखी एक. कोनॅक पिता पिता

एक विलक्षण गोष्ट घडली. त्याचे पाय दुखायचे थांबले. महत्वाचे म्हणजे त्याच्या मनावरचे मळभ दूर झाले.

'हॅट कोण लंगडा आहे. मी एका सुंदर मुलीबरोबर नृत्य करत आहे. ती सुंदरी माझ्या अंगाशी लगट करतेय. अगदी ल एलीसमधल्या पोरींसारखी. तिचे मस्तक माझ्या खांद्यावर विसावलेय. नृत्याच्या प्रत्येक पावलाबरोबर ती माझ्या बाहुपाशात शिरतेय.'

- ३६ -

हेन्रीला लवकरच स्वत:मधील नव्या क्षमतेचा शोध लागला. दारू कितीही प्यायली तरी आपल्याला पचते. इतर लोक प्यायल्यावर कसे ताळतंत्र सोडतात तसे आपले कधीही होत नाही. दारू कितीही प्यायली तरी इतरांपेक्षा आपल्याला कमी चढते याचा त्याला अभिमान वाटू लागला. या जाणिवेने तो आतल्या आत सुखावला. कोण उत्तुंग पर्वतशिखर पादाक्रांत करू शकत असेल तर कोण अथांग सागर पार करू शकत असेल. मी दारू पिऊ शकतो. कोणीही पिऊ शकणार नाही एवढी दारू मी एका बैठकीत रिचवून पचवू शकतो.

दारूमुळे हेन्रीचा दिवाभीतपणा कुठच्या कुठे पळाला. त्याच्या अंतरी एक नवे धैर्य निर्माण झाले. वेश्यागृहात पाऊल टाकण्याचे. एके दिवशी दुपारच्या जेवणानंतर तडक घोडागाडी करून तो ल पॅरॉक्के ग्रीमध्ये गेला. त्याने मुद्दामच दुपारची वेळ निवडली होती. त्या वेळी फारशी गर्दी नसायची. सर्व मुली दुपारच्या जेवणानंतर निवांतपणे लोळत पडलेल्या असत.

''या साहेब. लवकर आत या.'' एका पिचपिच्या डोळयांच्या गबाळया बाईने दरवाजा उघडून त्याला आत घेतले. बाहेर पाऊस रिमझिमत होता.

''तुम्ही पूर्वी एक दोन वेळा इकडे येऊन गेला होतात नाही का? तुमचे मित्र नाही आले वाटतं आज.'' तिच्या चेहऱ्यावर ओळखीचे स्मित होते, ''बरोबर ओळखलं की नाही? एकदा पाहिलेला चेहरा मी सहसा विसरत नाही.''

त्याने मान डोलावली आणि हाताच्या मुठीत तयारीने ठेवलेले एक चांदीचे नाणे हळूच तिच्या हातावर टेकवले.

“हे माझं बक्षीस समजायचं का? देव तुमचं भलं करो. तुमच्यासारखी भली माणसं यायला लागली तर मी लवकरच गावाला जाऊन देवाचं नाव घेत बसेन.”

हेन्रीचा बुजरेपणा पाहून ती त्याला डोळा मारत हळू आवाजात म्हणाली, “तुम्ही अगदी वेळेवर आलात बघा. वरती कोणीही नाहीय. सगळ्या पोरी मोकळ्याच आहेत.”

जिना चढताना हेन्रीची केविलवाणी धडपड पाहून ती नकळत म्हणाली, “मस्य, जमेल ना वर चढायला.” बोलण्यात अजाणता आलेली खोच लक्षात येताच तिने चटकन स्वतःला सावरून घेतले, “माणूस लहान असो की मोठा, तरणा असो की म्हातारा. या कामातल्या ताकदीचा माणसाच्या आकारावरून काही पत्ता लागत नाही. सावकाश जा हां वर. मी सगळ्यांना सांगून ठेवीन.”

एका हातात काठी तर दुसऱ्या हाताने जिन्याच्या कठड्याला घट्ट धरून हेन्री एकदाचा वर दिवाणखान्यात जाऊन पोचला. जिना अगदी उभा सरळसोट आणि पायऱ्या खूप उंच होत्या. त्यामुळे हेन्रीला धाप लागली. त्याने थोडा दम खाऊन झाल्यावर इकडे तिकडे पाहिले. गेल्या वर्षभरात काहीही बदल झालेला नव्हता. दरवाजात लोंबकळणारा तो मेणचट पडदा, गंजक्या लोखंडी मांडणीवर ओळीने मांडून ठेवलेली कपच्या उडालेली क्रॉकरी, धुळीचे थर बसलेला चावीचा यांत्रिक पियानो, जळमटे चिकटलेली कोपऱ्यातील झाडांची कुंडी, पारा उडालेले दोन आरसे, बटबटीत रंगांत रंगवलेले एक काचचित्र ‘क्लिओपात्रा ॲट बाथ’. वातावरणात फेस पावडर व तंबाखूचा संमिश्र वास. त्या जागेत एक प्रकारची कुबट शांतता होती.

हेन्री एका कोचावर जाऊन बसला. पावसामुळे भिजलेली हॅट त्याने काढून बाजूच्या टेबलावर ठेवली आणि धडधडत्या हृदयाने पुढे काय होईल त्याची प्रतीक्षा

करू लागला. एका झिरझिरीत झगा घातलेल्या मुलीने पडद्याच्या फटीतून हळूच डोकावून पाहिले. त्याच्याशी नजरानजर होताच तिच्या चेहऱ्यावरचे कृत्रिम हास्य एकदम थिजल्यासारखे झाले. तिच्या नजरेतील आश्चर्याचे भाव तत्क्षणी त्याच्या लक्षात आले. दुसऱ्याच क्षणी ती गरकन वळली आणि त्या मेणचट पडद्याआड अदृश्य झाली. त्याने मान खाली घातली. तरी हॉलवेमधून येणारी दबक्या आवाजातली कुजबुज, हसण्याचे, आश्चर्याचे चीत्कार त्याच्या कानी पडण्याचे त्याला टाळता येणे शक्य नव्हते. हृदयातली धडधड वाढली. समोरच्या पडद्याच्या फटीतून त्याला बघायला म्हणून एकाच वेळी पाच जणींनी आपली डोकी बाहेर काढली. ते दहा डोळे त्याच्याकडे टकमक बघत त्याला आपादमस्तक न्याहाळू लागले. संतापाने त्याची कानशिले गरम झाली.

“अरे देवा! हा तर आपला हेन्री.”

हेन्रीने दचकून आवाजाच्या दिशेने पाहिले. भोकरासारख्या मोठ्या डोळयांची, गोल गरगरीत देहाची एक कृष्णकेशी बाई बाहेर आली आणि त्याच्याकडे बघून तिने ओळखीचे स्मित केले.

“तुम्ही मला ओळखणार नाही, पण मी तुम्हाला चांगली ओळखते. मी बेर्थ.” त्याच्या समोरच्या टेबलावर हात टेकून ओणवी उभी राहत ती म्हणाली. तिच्या झिरझिरीत झग्याखालून तिचे थुलथुलीत स्तन दिसत होते. तिच्या टपोऱ्या डोळयांतून आनंद ओसंडून वाहत होता. एखाद्या पोरकट कोड्याचे उत्तर देताना असतो तसा. “तुमचा मित्र रँचो. तो मला तुमच्याविषयी सांगायचा.” हेन्रीला आठवलं.

“हे मोठे आर्टिस्ट आहेत बरं का. हेसुद्धा पेंटिंग करतात माझ्या शोशूसारखं.” तिच्या पाठोपाठ दिवाणखान्यात आलेल्या पाची मुलींकडे पाहत ती म्हणाली.

एका वाक्यात सगळयां गोष्टींचा खुलासा झाला. वातावरणातला सगळा ताण शिथिल झाला. सगळया मुली लगबगीने कोचाभोवती गोळा झाल्या.

“ही व्हेरोनिका,” बेर्थने एका काटकुळया, दाताड्या, कृष्णकेशी मुलीकडे निर्देश केला. एखाद्या केविलवाण्या उंदरासारखी ती दिसत होती. “तीनच महिने झाल्येत हिला इकडे येऊन.”

व्हेरोनिकाने आपला हात हळूच पुढे केला. ती काही तरी बोलणार तेवढ्यात बेर्थ दुसऱ्या मुलींची ओळख करून द्यायला पुढे सरसावली, “ही सुझान. आमची गाववाली आहे बरं का. आणि ती कोपऱ्यात बसलीय ती जियानिना.” ती एक आडव्या हाडापेरीची, उंच आणि भरल्या बांध्याची स्त्री होती. तिने फिक्या पिवळसर रंगाची स्पॅनिश शाल आपल्या पुष्ट देहाभोवती लपेटून घेतली होती. शालीच्या आत ती संपूर्ण नग्न होती हे हेन्रीला शालीवर पडलेल्या सुरकुत्यांवरून जाणवले. “ती इतालियन आहे. आणि ही मिनेट.” हेन्रीच्या शेजारी नुसती अंतर्वस्त्रे घालून बसलेल्या मुलीकडे बघत ती म्हणाली.

त्या सगळया मुलींनी त्याच्याशी हस्तांदोलन केले. त्या आता खुदूखुदू हसत होत्या. स्वतःच्या अर्धनग्नतेचा त्यांना विसर पडला. हेन्रीकडे आता त्या एक गिऱ्हाईक म्हणून बघत नव्हत्या. त्यांच्यात एक आपुलकीचे नाते निर्माण होऊ लागले होते.

गबाळया वेषातला एक वेटर आत आला. ऑर्डर घेता घेता हातातल्या मळकट फडक्याने त्याने टेबल पुसल्यासारखे केले. हेन्रीने त्याचे टर्किश सिगरेटींचे पाकीट काढले व त्यातल्या सिगरेटी सर्वांना दिल्या. मोठ्या अदबीने काडी ओढून एक एक करून सर्वांच्या तोंडासमोर धरली. त्या मुलींना असे सौजन्य कधी अनुभवायला मिळाले नव्हते. त्याचे खुरटे पाय, उंची कपडे या सगळया गोष्टींचे त्यांचे हळूच निरीक्षण चालू होते. या बुटक्या पण खानदानी वागणुकीच्या तरुणाविषयी त्यांचे मन अनुकंपेने भरून आले. तो त्यांच्यासारख्या कंगाल बाजारबसव्यांच्या दारात आज आला होता. कारण दुसऱ्या कोणा घरंदाज मुलीच्या मैत्रीचा लाभ त्याला मिळणे शक्य नव्हते, ह्या वस्तुथितीची त्यांना नकळत जाणीव झाली.

“मस्य, तुम्ही कोणत्या प्रकारची पेंटिंग करता?” व्हेरोनिकाने मोठ्या अदबीने विचारले. पण त्याचे उत्तर मात्र बेर्थने दिले, “हे आर्टिस्ट किनई सगळया प्रकारची पेंटिंग करतात. आता माझ्या शोशूच बघ ना. मनात येईल त्या कशाचेही चित्र काढतो. अगदी पोर्ट्रेटसुद्धा करतो बरं का. मी बऱ्याच वेळा त्याला पोज दिलीय.” तिच्या डोळयांत एक वेगळीच चमक आली. अंगाने थोडी सुटलेली असली तरी तिच्या देहाचे सौष्ठव चित्रकाराच्या नजरेत भरण्यासारखे होते. मानेवर मोकळया सोडलेल्या केसांची एखादी नीटशी वेणी घातली असती तर पुस्साँने रंगवलेल्या इटालीयन शेतकरी स्त्रियातली एक शोभली असती. रॅचोने तिचे पोर्ट्रेट कसे केले याचे अगदी तपशीलवार वर्णन तिने सर्वांना ऐकवले. तो पॅलेट कशी ठेवे, इझल समोर उभा कसा राही, कॅनव्हासवर ब्रशचे फटकारे कसा मारी इथपासून ते मधूनच जवळ येऊन तिच्या कुल्यांवर हळूच चापटी कशी मारी व लाडात आला की मांडीवर घेऊन स्तन कसे कुरवाळत बसे इथपर्यंत.

अशा प्रकारे एखाद्या आर्टिस्टसमोर नागव्याने पोज द्यायला सुझानचा विरोध होता. एखाद्याच्या शेजेवर झोपणे वेगळे आणि इझलसमोर तासन्तास उभे राहणे वेगळे. अगदी कसेतरीच वाटते.

“तुला काही कळत नाही. आर्टिस्टची नजर वेगळीच असते. एखाद्या डॉक्टरसारखी.” बेर्थ मधेच म्हणाली. रॅचोशी असलेल्या मैत्रीमुळे चित्रकारांविषयी काही बोलण्याचा अधिकार तिला जणू काही आपोआपच मिळाला होता.

“डॉक्टर जेव्हा तपासायला येतो तेव्हा त्याला आपण सगळं भांडवल दाखवतोच ना. तेव्हा नाही ती लाज वाटत. आर्टिस्टचं तसंच असतं.”

सर्वजणी तावातावाने आपली बाजू मांडत होत्या. हेन्री त्यांच्याकडे अंमळ गमतीने पाहत होता. विशेषतः त्यांचे धूम्रपान. प्रत्येक झुरका त्या अगदी चवीने घेत होत्या. एवढी महागडी सिगारेट पहिल्यांदाच ओढायला मिळाली असावी.

त्याला वाटले होते तेवढ्या काही त्या वेश्या घाणेरड्या नव्हत्या. गलिच्छपणा असला तरी गरिबीमुळे असतो तेवढाच होता. त्या स्वभावाने साध्या आणि प्रेमळ

होत्या. त्यांची आपापसातली थट्टा-मस्करी कोणाला न दुखवणारी होती. त्याच्या खुरट्या पायांकडे कोणाचे लक्षही नव्हते. त्याला वाटले यापूर्वीच आपण येथे आलो असतो तर केवढा मनःस्ताप वाचला असता.

बाहेर अंधारून आले. वेटरने दिवे लावले आणि पुन्हा एकदा सर्वांचे पेले व्हर्माउथने भरले. हळूहळू गिऱ्हाईकांची वर्दळ चालू झाली. चोरट्यासारखे ते हलक्या पावलांनी येत व कोणाच्याही नजरेला नजर न देता हातातल्या कॅपशी चाळा करत ते टेबलावर बसत. आपले गिऱ्हाईक आलेले पाहिले की *'अ रॉव्हर ऑरी* (हेन्री)' असे म्हणत गिऱ्हाईकाच्या दिशेने कुल्ले उडवत जायच्या व त्याच्या गळयात हात घालून म्हणायच्या *'अलोर शेरी*, ड्रिंक मागवता का माझ्यासाठी?'

समोरच्या कोपऱ्यात ठेवलेला यांत्रिक पियानो कोणीतरी चालू केला.

ल पॅरोक्के ग्रीमधली रात्र आता रंगात आली होती. त्याच्याभोवती गप्पा छाटत बसलेल्या सगळया मुली एक एक करून आपापल्या गिऱ्हाईकांबरोबर निघून गेल्या. एकटी बेर्थ त्याच्या शेजारी बसून होती.

''आता माडीवर येता ना?'' त्याच्या भेटीचा उद्देश लक्षात घेऊन तिने विचारले.

हेन्रीने क्षीणपणाने मान डोलावली व तिच्या मागोमाग माडीवर जाणाऱ्या जिन्याच्या पायऱ्या तो मोठ्या कष्टाने चढू लागला.

- ३७ -

काही महिने असेच निघून गेले. चित्रकला वर्ग संपलेला. सर्व मित्र परिवार पांगलेला. तरुण वयात हवासा वाटणारा स्त्री-सहवास मिळण्याची शक्यता त्याच्या रूपामुळे त्याला दुष्प्राप्य होती. हेन्रीला एकटेपणा खायला उठायचा. स्त्री-सहवासासाठी आसुसलेले मन स्वतःच्या रूपाच्या जाणिवेने उद्विग्न व्हायचे. त्यातून त्याला दिलासा मिळायचा तो ल पॅरोक्के ग्रीला अधूनमधून दिलेल्या भेटींनी. तेथे सहसा तो दुपारी जरा लवकरच जायचा. माडीवरच्या मुली प्रेमचेष्टांमध्ये अगदी पारंगत होत्या. तो आल्यापासून त्याची आपुलकीने विचारपूस करून त्याला काय हवे नको याची त्या अत्यंत काळजी घेत. शेवटी कामक्रीडेत त्याला अत्युच्च सुख मिळवून देत. तेथील मुलींनी अगदी सरळ मनाने त्याला स्वीकारले होते. त्या मुलींसाठी तो छोट्या-


मोठ्या भेटी आणीत असे. परफ्युम, बॉनबॉन कँडी आणि टर्किश सिगरेटी. त्यांच्या वाढदिवसांची नोंद आपल्या वहीत करून तो आठवणीने त्या दिवशी केक्स व वाइनच्या बाटल्या पाठवायचा. त्याने आपखुशीने दिलेल्या बक्षिसींबद्दल व्यक्त केलेली कृतज्ञतता, त्याच्या पौरुषाची केलेली प्रशंसा या सगळया गोष्टींत कृत्रिमतेचा लवलेशही नसायचा. त्यामुळे त्याला त्या मुली मनापासून आवडू लागल्या. त्यांच्या बाहुपाशात थोडा वेळ का होईना पण तो आपल्या सगळया वेदना, दुःख विसरून जायचा आणि आपल्या दैवावर सूड घेतल्याच्या समाधानाने सुखावयाचा. त्या सर्व वेश्यांनी मिळून त्याला प्रेमाची मुळाक्षरे व कामक्रीडेचे शरीरशास्त्र शिकविली. त्यांच्या सहवासात त्याला कामतृप्तीची विविध अंगे सापडली. कामवासनेचा सरळ शुद्ध आविष्कार. बेगडी प्रेमाच्या कोणत्याही गुंतागुंतीशिवाय. त्यांच्या सहवासात त्याला हव्या असलेल्या मैत्रीचा ओलावा मिळू लागला.

दुसऱ्यांचे बोलणे सहानुभूतीपूर्वक ऐकण्याची त्याची कला ॲतेलीएप्रमाणे येथेही त्याच्या कामी आली. त्यामुळे तो फक्त भरपूर टिप्स व भेटवस्तू देणारा नुसता दिलदार आश्रयदाता न राहता त्या वेश्यांच्या सुखदुःखांचा एक साक्षीदार झाला होता. त्या सर्वजणी त्याला आपल्या आयुष्याच्या कर्मकहाण्या सांगत. काही खऱ्या, काही रंगवलेल्या. सुखदुःख, आशा-निराशा आणि स्वप्ने यांनी भरलेल्या गुजगोष्टी ऐकता ऐकता त्या स्त्रियांच्या नग्नतेखाली लपलेले त्यांचे अनामिक व्यक्तित्व त्याच्यासमोर हळूहळू उलगडू लागले. सुझानला एक मुलगा होता आणि कमावलेला प्रत्येक पैसा ती त्याच्या पालनपोषणासाठी गावी पाठवून द्यायची. जियानिना समलिंगी संभोगी होती. व्हेरोनिका सायकल शर्यतींच्या जुगारावर सगळी कमाई उधळून टाकीत असे. मिनेट नाट्यगृहात लागलेली सर्व कौटुंबिक भावनाप्रधान नाटके न चुकता बघत असे. नाटक बघून परत आल्यावर त्याचे कथानक त्यातील बारीकसारीक तपशिलांसकट सगळया मुलींना रंगवून सांगायची.

बेर्थ एखाद्या मायाळू आईसारखी दिसे. तिच्याशी बोलताना नेहेमी रॅंचोचा विषय निघे. रॅंचोच्या रू गेनेरॉंमधल्या टिनपाट स्टुडिओत घालवलेल्या प्रत्येक क्षणाच्या आठवणी ती सतत कुरवाळीत असे. रॅंचोने तिचे केलेले एक पोर्ट्रेट. गडद रंगात केलेला एक छोटासा कॅनव्हास तिने सोनेरी रंगाच्या भल्या मोठ्या फ्रेममध्ये

बसवून आपल्या खोलीच्या दर्शनी भागात टांगला होता. ते पोर्ट्रेट म्हणजे ल पॅरोक्के ग्रीमधील मोनालिसा होती. तिचा एखादा गिऱ्हाईक त्या पोर्ट्रेटचे कौतुक करायचे विसरला तर त्याची कंबक्तीच भरली म्हणून समजा. हा एक मास्टरपीस आहे असे हेन्रीने जेव्हा जाहीर केले तेव्हा तिचे गोबरे गाल अभिमानाने अधिक फुगले आणि टपोऱ्या डोळयांत अश्रू दाटून आले.

(लोत्रेकने केलेली बेर्थची दोन पोर्ट्रेट एक स्टुडिओतील तर दुसरे पीएर फॉरेस्टच्या बागेतील 'बेर्थ द डेफ' नावाने प्रसिद्ध आहेत. ती थोडीशी बहिरी असल्याने बेर्थ द डेफ या नावाने ओळखली जायची. उपजीविकेसाठी ब्रिटनी मधून पॅरीसला आल्यावर शेवटी पोटाची खळगी भरण्यासाठी तिला वेश्यागृहात भरती व्हावे लागले. पोर्ट्रेटमध्ये उच्चभ्रू खानदानी स्त्री सारखे दिसावे म्हणून महागडी हॅट, छत्री आणि लेस लावलेला गाऊन घालून ती मोठ्या हौसेने लोत्रेक समोर बसली. त्यात ती बरीच यशस्वीही झालेली दिसत असली तरी या अवतारात ती अवघडलेली आहे. ही गंमत लोत्रेकने आपल्या समोर बसलेल्या मॉडेलची कुचेष्टा न करता मोठ्या सहानभूती पूर्वक नेमकी टिपली आहे. तिची जीवनावरील आसक्ती त्याने तिच्या टपोऱ्या डोळयातून दाखवली आहे. पण त्याच वेळेला तिचे उन्हाने रापलेले राकट हात, मुठीत घट्ट पकडून ठेवलेली छत्री यातून एक सामान्य शेतकऱ्याची मुलगी घरंदाज स्त्रीचा आव आणण्याचा प्रयत्न करत आहे हे लोत्रेक मोठ्या चतुराईने दाखवून देतो.)



(पोर्ट्रेट - वुमन वुईथ अम्ब्रेला – तुलूज लोत्रेक – जलरंग, गॉश आणि टेंपेरा – कार्डबोर्ड ७६.५x५७.५ सेमी – १८८९)

\- ३८ -

मोंमार्त्रमधल्या पुनरागमनानंतर एक वर्षभर हेन्रीचा दिनक्रम हा असा होता. रात्रभरच्या भटकंतीनंतर सकाळी खूप उशिरा उठायचे. दुपारच्या जेवणानंतर थोडी विश्रांती घेऊन संध्याकाळी फिरायला बाहेर पडायचे. या फेरफटक्यात कधी कधी तो कॅफे ल मिर्लितोंमध्ये जायचा. हे कॅफे रस्त्याच्या पातळीच्या खूप खाली असलेल्या तळघरात होते. इतके खाली की तेथील गडबड गोंधळाचा मागमूस रस्त्यावर गस्त घालणाऱ्या पोलिसाला लागणे मुळीच शक्य नव्हते. हेन्रीला तेथील गर्दी व धुराने भरलेले वातावरण मनापासून आवडत असे.

तेथे एक छोटेखानी स्टेज होते. स्टेजवर ॲरिस्टाइड ब्रुअँट हा एक तत्कालीन लोकप्रिय गायक नेहमीप्रमाणे काळा वेल्व्हेटचा सूट, गळयात लाल मफलर, पायात गुडघ्यापर्यंत येणारे उंच बूट घालून बॅलड रियालिस्त, सत्याचा पोवाडा गात होता. बॅलड मोठ्या रंगात आला होता. गीत ऐकण्यात तल्लीन झालेले लोक समोरची बीअर पाणी घालून पातळ केलेली आहे हे विसरून गेले होते. हेन्रीने धडपडत एका कोपऱ्यातले टेबल गाठले व कोणाचाही रसभंग होणार नाही अशा रीतीने हळूच एक डबल कोनॅक मागविली. टेबलावर कोनॅक येताच त्याने तो नाजूक पेला हातात घेऊन एक-दोन क्षण न्याहाळला व एका घोटात रिकामा केला. काही क्षण तो स्तब्ध झाला. डोळे मिटून त्याने डोके किंचित मागे झुकविले. खाली उतरणाऱ्या मद्याची जाणीव घसा, अन्ननलिका, जठर व मग हळूहळू सर्व शरीरभर, कानाच्या पाळीपासून ते पायांच्या तळव्यापर्यंत अशी क्रमाक्रमाने पसरत गेली. त्याने डोळे उघडले. मोठ्या समाधानाने ओठांवरून जीभ फिरवली. कोनॅक किती अप्रतिम चीज आहे नाही.

बॅलड संपला होता. टाळयांचा कडकडाट चालू होता. हेन्री त्यात सामील झाला. ब्रुअँटने त्याच्याकडे बघून ओळखीचे स्मित केले. त्याने गळयाभोवती एक मफलर मोठ्या रुबाबात गुंडाळला होता. त्यातून कवीची बेफिकिरी तो कितीही दाखवत असला तरीही एखादी बडी असामी आली तर त्याचे हसून स्वागत करायला तो विसरत नव्हता.

उपस्थितांना अभिवादन करून त्याने दुसऱ्या गीताची घोषणा केली. *अ सँ लझार*. जमलेल्या गर्दीत उत्साहाची एक लाट उसळली. वादकाने आपल्या छोट्याशा पियानोवर उदास स्वर छेडले. ॲरिस्टाइड ब्रुअँटने आपल्या चेहऱ्यावर दुःखी भाव आणले. मफलर खांद्यावर भिरकावला आणि गायला सुरुवात केली. गीताचे सूर व्याकूळ होते आणि शब्द भावनांना हात घालणारे होते. ते गीत ऐकताना मोंमार्त्रमधल्या गरीब लोकांच्या जीवनातील दुःख चित्रदर्शी होऊन डोळयांसमोर येई. ब्रुअँटच्या बॅलड रिॲलिस्तप्रमाणे ह्या गीतातही एका दारिद्र्याने गांजलेल्या तरुण मुलीची दर्दभरी कहाणी होती. दोन्ही गीतांतील तरुणी वेश्याव्यवसायात केवळ नाइलाज म्हणून पडल्या होत्या. बॅलड रिॲलिस्तमध्ये स्वतःच्या पोटाची खळगी भरण्यासाठी तर सँ लझारमध्ये प्रियकराच्या पोटाची. ही दरिद्री तरुणी एका निरुद्योगी मवाली तरुणाच्या प्रेमात पडते. आता दोघांचेही पोट भरायचे म्हणजे

वेश्याव्यवसायासारखा दुसरा सोपा मार्ग उपलब्ध नव्हता. एके दिवशी जेंडामेर (पॅरीसमधील पोलीस) तिला पकडून तिची रवानगी सँ लझार येथील सुधारगृहात करतात. आता हा फटका बसल्यावर खरे तर तिला आपल्या दुर्दैवाची काळजी वाटायला हवी होती ती. पण सुधारगृहात तिच्या मनात सतत आपल्या याराचेच विचार घोळत असत. तो आपल्या सर्व छानछौकींसाठी सर्वस्वी तिच्याच उत्पन्नावर अवलंबून असायचा. त्याचे आता कसे होईल या काळजीने तिचे मन पोखरून निघते. त्याला व्हर्माउथचा चषक कोण भरून देईल? केसांना लावायचे पोमेड आता त्याला कोण आणून देईल? दुःखातिरेकात तिने पत्र लिहायला घेतले. त्या पत्रात प्रेमज्वर पुरेपूर उतरलेला होता. स्पेलिंग आणि व्याकरणाच्या जागोजागी चुका असल्या तरी त्यामुळे एका कामविव्हल विरहिणीच्या भावना कळायला काही अडचण येत नव्हती. सुधारगृहाच्या त्या कुबट अंधाऱ्या जागेत विरहाने व्याकूळ होऊन ती आपल्या हृदयेश्वराला दिलासा देत होती, ‘माझ्या लाडक्या थोडा धीर धर. मी लवकरच परत येईन. तूर्तास कसेतरी चालवून घे. जी काही उधार-उसनवारी होईल ती मी परत आल्यावर फेडायला समर्थ आहे.’ असे प्रेम अणि अशी निष्ठा. यामुळे रस्त्यावरच्या भटकभवान्यांच्या जीवनाला एक प्रकारच्या हौतात्म्याचा स्पर्श झाला. उपस्थित स्त्रियांचे डोळे आपापल्या यारांच्या आठवणीने भरून आले.

स्टेजवर ॲरिस्टाइड ब्रुअँटचा आर्त स्वर टिपेला पोहोचला होता. त्याने एका हाताने आपल्या कोटाचे टोक घट्ट पकडले होते. त्याच्या कपाळावर घर्मबिंदू जमा झाले. गीताच्या शेवटच्या कडव्याला सुरुवात झाली. उपस्थित स्त्रियांपैकी बहुतेकींनी आपल्या याराने दिलेल्या लत्ताप्रसादाची चव कधी ना कधीतरी चाखली होती. पण सँ लझारमध्ये डांबून ठेवलेल्या वेश्येची प्रेमकहाणी वर्णन करणारे गीत ऐकता ऐकता त्यांना आपले हुंदके आवरेनात. त्या भावनेच्या भरात त्यांनी लाथा घालणाऱ्या आपल्या यारांना माफ केले. प्रेमापुढे ढुंगणावर बसलेल्या लाथांचे ते काय!

अंती या प्रेमपत्राच्या, चुंबिते मी तुजला
बाय बाय माझ्या राजा, बाय बाय करी तुजला
प्रीती जरी नसे तुझी मजवरी, प्रीती माझी परी तुजवरी

टाळयांच्या प्रचंड कडकडाटाने, स्त्रियांच्या पाणावलेल्या डोळयांनी आणि नाक शिंकरल्याच्या आवाजाने गाणे आवडल्याची पावती मिळाली. ब्रुअँट वाकून नम्रपणे अभिवादन करत करत हसतमुख चेहऱ्याने हेन्रीकडे आला. रुमालाने तोंड पुसत तो म्हणाला, "जेव्हा जेव्हा हे गीत मी गातो तेव्हा अगदी शक्तिपात झाल्यासारखं वाटतं. मी स्वतःला खूपच झोकून देतो."

हेन्रीने मोठ्या प्रयासाने हसू आवरले. गाणे ऐकून मुसूमुसू रडणाऱ्या बायकांना सांगण्यासाठी ते एक वेळ ठीक होते. पण तो अशा आविर्भावात त्याला सांगत होता की जणू काही ते खरेच असावे.

"मी एखादे ड्रिंक मागवू का तुमच्यासाठी."

"मस्य, खरं म्हणजे मीच तुमच्यासाठी ड्रिंक मागवायला हवं." त्याने घाईघाईने वेटरला हाक मारून कोनॅक मागविली.

त्याच्या या दिलदारपणामुळे हेन्रीला वाटलेले आश्चर्य फार काळ टिकले नाही. कोनॅक टेबलावर येताच तो हळूच म्हणाला, "सँ लझारचं पुस्तक प्रसिद्ध होतंय. मोठ्या प्रयासाने सगळा योग जुळून येतोय. एक प्रकाशक तयार झालाय. फक्त एकच गोष्ट बाकी राहिलीय."

त्याला हवे होते मुखपृष्ठासाठी एखादे स्केच. "ताबडतोब माझ्या डोळयांसमोर तुमचं नाव आलं. एक साधेसे स्केच. फार गुंतागुतीचं नको. तुम्हाला अगदी सहज जमेल. फार वेळही लागणार नाही त्याला." हेन्रीच्या प्रतिक्रियेसाठी थोडा वेळ थांबून तो पुढे म्हणाला, "या चित्राचे पैसे देणं काही मला जमणार नाही. माझा पेशा कवीचा. कवींची आर्थिक परिस्थिती कशी असते ते तुम्हाला सांगायला नको." येथे एक नाट्यपूर्ण उच्छ्वास. खांदे उडवल्याचा आविर्भाव. "दोन वेळच्या जेवणाचे वांदे. सगळं भागवून खिशात दमडीसुद्धा शिल्लक उरत नाही."

ब्रुअँट एक कवी होता हे खरे असले तरी प्रत्यक्षात मोंमार्त्रमधील एक चांगले चालणारे कॅबरे नृत्यगृह त्याच्या मालकीचे होते हे सांगायला तो सोईस्कररीत्या विसरला होता. त्याने गांभीर्याचा एवढा आव आणला होता की हेन्रीला तो एक खरेच गरीब बापडा कवी वाटला.

''प्लीज, पैशांची काही काळजी करू नका. तुमच्यासारख्या कवीला मदत करण्यात मला आनंदच आहे.''

दोन दिवसांनी हेन्रीने एक स्केच करून ब्रुअँटला दिले आणि तो हे सर्व विसरून गेला.

हेन्रीच्या स्केचचे मुखपृष्ठ असलेली अ सँ लझार ही पुस्तिका तडाखेबंद खपली. पॅरीसच्या रस्त्यांवर दिव्याच्या खांबाखाली उभे राहून गिऱ्हाइकांना खुणावणाऱ्या, लालबत्तीच्या नोंदणीकृत घरांमधल्या, सरकारी परवाना जवळ असलेल्या व नसलेल्या, रेल्वे स्टेशनावर उभ्या राहाणाऱ्या, बराकीमधल्या, बाजेवरच्या, कॅबरेमधल्या, धंदेवाईक रांडा, छिनाल गावभवान्या, ठेवलेल्या बायका, रखेल्या, गणिका, अंगवस्त्रे अशा सर्व प्रकारच्या व सर्व दर्जाच्या वेश्यांनी सँ लझारची पारायणे करून गाळलेल्या अश्रूंनी ब्रुअँट व त्याचे प्रकाशक लवकरच गब्बर झाले. मिळालेल्या तुफान लोकप्रियतेने सँ लझारला एखाद्या संघगीताचा मान प्राप्त झाला. जणू वेश्याविश्वाचे राष्ट्रगीतच.

हेन्रीला जरी सँ लझारमधून काही अर्थलाभ झाला नाही तरी या चित्रामुळे त्याची गणना त्या वेळच्या एका होतकरू चित्रकारांत होऊ लागली. आपल्याच वर्तुळात मशगूल असलेल्या उच्चभ्रू कलाजगताने कधी नव्हे ती एका गाण्याच्या पुस्तिकेच्या मुखपृष्ठासारख्या क्षुल्लक गोष्टीची दखल घेतली होती.

'वेश्यांच्या पुरातन काळापासून असलेल्या प्रश्नांवरील कडवट पण सखोल टीका.'

'तरुण व नवशिक्या चित्रकाराचे अंतर्मुख करणारे रेखाटन.'

‘या सिद्धहस्त तरुणाच्या पुढच्या कामावर सर्व कलाप्रेमींनी लक्ष ठेवायला हवे.’

थोड्याच दिवसांत ब्रुअँटने गाण्याचे आणखी एक पुस्तक प्रसिद्ध करायचे ठरवले. साहजिकच ज्या चित्रकाराला कवींविषयी कळकळ आहे, अशाच चित्रकाराकडे तो परत गेला. पुन्हा एकदा सर्व कलासमीक्षकांनी आपल्या लेखण्या सरसावल्या. त्याच्या मुखपृष्ठाचे ‘नागडी वास्तवता’, ‘क्रूर सत्य’ अशा विशेषणांनी कौतुक केले. या सर्व प्रसिद्धीमुळे चाणाक्ष ब्रुअँटला त्याच्या मूळ चित्रांचे मोल उमगले व त्याने ती फ्रेम करून आपल्या कॅबरेमध्ये नेऊन टांगली.


AMBASSADEURS
aristide
BRUANT
dans
son cabar

(पॅरीसमधील शाँझ् एलीझे या प्रख्यात रस्त्यावरील लेझ् आँबॉसॉदर या नृत्यगृहातील ॲरीस्टाइड ब्रुअँटच्या एका कार्यक्रमासाठी लोत्रेकने ब्रुअँटच्या आग्रहावरून एक पोस्टर करून दिले होते. पण संगीतगृहाच्या मालकाला ते न आवडल्याने त्याने ते लावायला नकार दिला. तेव्हा ब्रुअँटने पोस्टर नाही तर कार्यक्रम नाही अशी ठाम भूमिका घेतल्याने त्याचा नाइलाज झाला. आज ॲरीस्टाइड ब्रुअँट व लेझ् आँबॉसॉदर लोत्रेकच्या पोस्टरमुळे अजरामर झाले आहेत. या पोस्टरचे आजवर असंख्य प्रिंट निघाले आहेत आण आजही ते तितकेच लोकप्रिय आहे. जसे व्हॅन गॉग आणि सनफ्लॉवर किंवा पिकासो आणि गार्निका तसे लोत्रेकचे नाव या पोस्टरशी निगडीत झाले आहे. ब्रुअँटच्या धिप्पाड देहाची आकृती पोस्टरच्या कडांनी कापली गेली आहे. हातात दांडक्यासारखी दिसणारी काठी, हॅट, खांद्यांवरून बेफिकीरीने मागे फेकलेला स्कार्फ यामुळे त्याच्या रांगड्या व्यक्तिमत्वातील आक्रमकता बघणाऱ्याच्या अंगावर येते. इंग्रजी टी या अक्षरासारखा दिसणारा स्कार्फचा आकार ही या पोस्टरची खासियत समजली जाते.)

- ३९ –

गाण्याच्या पुस्तिकेचे मुखपृष्ठ आणि पोस्टर यामुळे हेन्री तुलूझ लोत्रेक या नावाला प्रसिद्धी मिळाली. रस्त्याने जाता जाता अनोळखी व्यक्ति हेन्रीला बघून हॅट उंचावून अभिवादन करू लागल्या. रू कुलँकूरमधल्या धोबिणींनासुद्धा त्याचे कपडे धुताना आपण एका चित्रकाराचे कपडे धुतोय याचा अभिमान वाटायला लागला. मोंमार्त्रमधल्या सर्व हॉटेलातल्या वेटरना त्याचे नाव रातोरात ठाऊक झाले. त्याचे हॉटेलमध्ये पाऊल पडताच सगळे वेटर अदबीने पुढे व्हायचे. त्यात त्याच्याकडून मिळणाऱ्या घसघशीत बक्षिसीचा अर्थातच थोडाफार परिणाम असायचा पण तरीही त्यात ओशाळेपणापेक्षा आपलेपणाचा अभिमान जास्त असे. ल पॅरोक्केमधल्या वेश्या त्यांच्या गिऱ्हाइकांना मोठ्या अभिमानाने सांगत की ‘इथे यायचा तो दाढीवाला बुटका मोठा आर्टिस्ट आहे बरं का.’ असे म्हणून पुराव्यादाखल त्याने काढलेले मुखपृष्ठ दाखविले जायचे. कित्येकांनी तर ते फ्रेम करून घेतले होते.

मधूनच कुठल्या तरी अनियतकालिकांचे संपादक उपटायचे. भेटायला येणाऱ्या प्रत्येकाला त्याच्याकडून एखादे रेखाटन हवे असायचे. काहीतरी पाच-दहा मिनिटांत करून दिलेत तरी चालेल. पण बिदागीचे नाव काढायचे नाहीत. आमचे मासिक

नुकतेच चालू होत आहे. पहिला किंवा दुसराच अंक आहे हा. एकदा नियमित चालू झाले की देऊ की. हेन्री स्वतःच बिदागीचा प्रश्न उडवून लावायचा. बहुधा तिसरा अंक निघतच नसे. अशा रीतीने त्याच्या कलेचा प्रसार व चर्चा होऊ लागली.

लेखक-प्रकाशकांच्या पाठोपाठ कुठल्यातरी गल्लीबोळातले कलावस्तू विक्रेते येऊन टपकायचे. त्याच्या स्टुडिओचा उंच जिना चढताना त्यांना धाप लागलेली असे. पण हेन्री दिसताच कलिंगडाच्या फोडीसारखे तोंड फाकून हसत. त्यांना म्हणे असे नवे होतकरू चित्रकार हुडकून त्यांना संधी द्यायची हौस असे. त्याची चित्रे त्यांच्या दुकानात ठेवून ते जसा काही त्याच्यावर उपकारच करत होते. जिना उतरताना ते काखोटीत दोन-तीन कॅनव्हास मारूनच उतरत. पण त्याची रीतसर पावती द्यायचे मात्र त्यांनी सोयीस्करपणे टाळलेले असे.

हे सगळे बघून मादाम ल्युबतेचा जीव तीळ तीळ तुटायचा. ती त्या सगळया फुकट्या मंडळींना चोरच म्हणायची. पण हेन्री मात्र ते हसण्यावर उडवून लावायचा, ‘चित्र काढण्यात जो काही निर्मितीचा आनंद असतो तो मला मिळालाय. आता ती चित्रे म्हणजे नुसती अडगळच.’

एकदा अनपेक्षितपणे वर्गमित्र गोझी आणि आँक्तां त्याच्याकडे येऊन टपकले. मोंमार्त्रमध्ये हेन्रीचे नाव झाल्यावर प्रथमच त्यांची भेट होत होती. चित्रकला वर्ग संपल्यानंर त्याने केलेली रेखाटने, काही नवे कॅनव्हास त्यांनी पहिले...‘आपण ज्याला सर्व विद्यार्थ्यांत ढ समजत होतो त्याचेच नाव सर्वतोमुखी झालेले पाहून त्या बुढ्ढ्या कॉर्मेनची किती करपली असेल नाही...ती चिकनी मारिया, ऑग्युस्तिना किती मजेचे दिवस होते नाही...जुने दिवस गेले तेल लावत, तुझी चित्रे ही सगळी मासिके कशी काय छापतात बुवा? तुझा काही वशिला वगैरे असेल तर आमच्यासाठी बघ जरा जमतंय का? बरं ही खडूस समीक्षक मंडळी कोणा नव्या चित्रकाराबद्दल काही बरं लिहितील तर जणू काही त्यांची लेखणी झिजेल. पण तुझ्या या साध्या रेखाटनांची कशी काय स्तुती करतात. काय जादू केलीस त्यांच्यावर. त्यांना काही खिलवावं वगैरे लागतं की काय? तसं असेल तर आम्हाला कसं काय बुवा परवडणार? आता तू तर एवढा मोठा माणूस झालायस. आमच्यासारख्या जुन्या दोस्तांसाठी एखादा तरी शब्द

टाक.' त्या संध्याकाळी ते सर्व जुने दोस्त ला नुव्हेलीत जाऊन जुन्या आठवणींना उजाळा देत बसले होते.

दोन दिवसांनी कॅमिल पिस्सारो हेन्रीच्या स्टुडिओत आला. त्याच्या एकूण अवतारामध्ये गावठी रांगडेपणा दिसून येत होता. तरीही इंप्रेशनिस्टांचा अनभिषित्त सम्राट असल्याचा डौल त्याच्या देहबोलीमध्ये स्पष्टपणे जाणवत होता. त्याने आल्या आल्या मादाम ल्युबेतला मोठ्या अदबीने अभिवादन केले. हेन्रीच्या चित्रांवरून एक नजर फिरवली आणि कोपऱ्यातल्या शेगडीवर हात शेकत म्हणाला, "तू डिझाइन केलेली मुखपृष्ठे, नियतकालिकांतील रेखाटने एक स्वतंत्र कलाकृती म्हणूनसुद्धा विचारात घेण्यासारखी आहेत. देगाससुद्धा खुश आहे तुझ्यावर. त्याला तुला एकदा भेटायचंय. पुढच्या आठवड्यात जेवायलाच ये माझ्याकडे. येताना पोर्टफोलियो आणायला विसरू नकोस. देगासला बोलावलंय. तुझ्या तोंडावर तुझी प्रशस्ती करणार नाही तो. तुझ्या कामाला अगदी फालतू आहे असंसुद्धा बोलेल. पण ते फारसं मनावर घेऊ नकोस."

कॅफेमध्ये अगदी अनोळखी लोक त्याच्या टेबलाजवळ येऊन त्याची स्तुती करीत... काय तुमची लाइन आहे... उधळपट्टी म्हणून कुठे नावालासुद्धा नाही, अगदी आवश्यक तेवढीच. केवढी जोरकस. मी तुमच्या कलेचा चाहता आहे. एखादा पेला ॲबसिंथ होऊन जाऊ दे. मीसुद्धा आर्टिस्ट आहे आणि हो...

चित्रकार, शिल्पकार, साहित्यिक, आपल्या नव्या कादंबरीने, नव्या पाच अंकी शोकांतिकेने अथवा नव्या कॅनव्हासने पॅरीसमध्ये खळबळ उडणार आहे, अशा वल्गना करणाऱ्यांची मोंमार्त्रमध्ये वाण नव्हती. अशा सर्व मंडळींचे एक व्यवच्छेदक लक्षण होते. डोळयांत बुद्धिमत्तेची चमक, नखे व दाढी वाढलेली, फाटक्या कॉलरचा शर्ट, खांद्यावर शिवण उसवलेला कोट, डोक्यावर जुनाट बसकी हॅट. वयाची तिशी उलटून गेलेली. पण तरीही विद्यार्थिदशेतल्या बंडखोरपणाला घट्ट चिकटून बसलेले. त्यांच्या बोलण्या-चालण्यात मावळत्या तरुणाईतील निसटते क्षण पकडण्याची त्यांची करुण धडपड दिसून येई. आयुष्याची लढाई आपण हरलो आहोत हे स्वीकारायला त्यांच्या

मनाची अजून तयारी होत नव्हती. त्यामुळे मोठमोठ्या योजना आखल्या जात, संकल्प सोडले जात. एकमेकांच्या अस्मितेला फुंकर मारून एकमेकांच्या आकांक्षा फुलविण्याचा प्रयत्न केला जाई. समांतर कलेला व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने काही मंडळींनी पुढाकार घेऊन सॅलाँच्या विरोधात ‘सोसायटी द अर्टिस्ट्स इंडिपेंडंटस्’ची स्थापना केली होती. हेन्री त्यांचा सुरुवातीपासूनचा एक सभासद होता. त्याच्या चित्रांना लाभलेल्या प्रसिद्धीमुळे त्याची कमिटी एक्झेक्युतीफवर निवड झाली. त्यामुळे हेन्रीवर प्रतिष्ठितपणाचे शिक्कामोर्तब झाले.

- ४० -

हेन्रीचे जीवन उलथवून टाकेल अशी एक घटना घडली. एखाद्या कादंबरीतल्याप्रमाणे कपोलकल्पित व असंभाव्य वाटावी एवढी ती घटना विलक्षण होती. पण अशा गोष्टी प्रत्यक्ष जीवनातच घडत असतात. कित्येक वेळा सत्य हे कल्पिताहून अद्‌भुत असते हेच खरे.

“मॉरीस!”

तो दरवाजात उभा होता. गोरापान, उंच, देखणा, डोक्यावर हॅट, कोट, तलवारकट मिशा. तेओ व्हॅन गॉगसारख्या. फक्त दाढीच काय ती कमी. चेहऱ्यावर तोच भोळाभाबडा, सरळ, गंभीर भाव. तसेच निळसर डोळे. बघताक्षणी प्रेमात पडावे असे.

“हेन्री!”

या धडाक्यानंतर जो जल्लोश उडाला त्यात नक्की काय झाले ते कळणे शक्य नव्हते. पण एवढे मात्र ठामपणे सांगता येईल की, मादाम ल्युबेतच्या हातातील वर्तमानपत्र खाली पडले आणि तिने जेव्हा चष्म्याच्या काचेवरून पाहिले तेव्हा तिला एक विनोदी दृश्य दिसले. एक ताडमाड उंच माणूस व एक बुटका एकमेकांना मिठी मारताहेत, हस्तांदोलन करताहेत, पाठीवर थाप मारताहेत आणि चित्रविचित्र हावभाव करून सात मजली हसताहेत.

"मादाम ल्युबेत हा मस्य मॉरिस ज्वाय्याँ. माझा लहानपणचा दोस्त. अगदी सख्ख्या भावासारखा. पंधरा वर्षांनी आम्ही भेटतोय. मला वाटत होतं की हा बेटा लिओनमध्ये आहे आणि याला वाटत होतं की मी आल्बीमध्ये. खरे म्हणजे आम्ही लहानपणी कॅनडात जाऊन फासेपारधी व्हायचं ठरवलं होतं. त्यासाठी आम्ही घोडेस्वारी शिकायला सुरुवात केली होती. पण कॅनडातील जंगलाऐवजी आता भेटतोय पॅरीसमध्ये. तसं बघायला गेलो तर पॅरीससुद्धा जंगलच म्हणायला हवं. पॅरीसमध्ये असूनसुद्धा दोन वर्षं एकमेकांना पत्ता लागला नाही. आहे की नाही गंमत."

हेन्री बोलता बोलता अचानक थांबला. त्याच्या चेहऱ्यावर क्षणिक विषण्णता दाटून आली. पण पुढच्या क्षणी तो सावरला. बालपणीच्या स्वप्नरंजनातून बाहेर पडून परिस्थितीचे दाहक वास्तव त्याने वयाची पंचविशी गाठण्याच्या आतच स्वीकारले होते. त्या दोघांचा उतू जाणारा आनंद पाहून मादाम ल्युबेतचे डोळे पाण्याने भरून आले. तिच्या लाडक्या छोट्या मस्यला त्याचा बालमित्र भेटला होता. तिने धावत खाली जाऊन दोन वाडगे भरून खीर आणली व त्या दोघांना बळेबळे खाऊ घातली.

"थंडी अजून संपलेली नाही. सकाळी बाहेर पडण्यापूर्वी काहीतरी पोटात गेलेलं बरं."

"माझा पत्ता कसा मिळाला तुला?" हेन्रीने विचारले.

"तो तर एक योगायोगच घडला. मी पॅरीस इलस्ट्रेटेडचा उपसंपादक म्हणून काम करतोय. तुझी गेल्या दोन महिन्यातली प्रसिद्धी ऐकून होतो. पण तू गेली दोन वर्षे पॅरीसमधल्या या मोंमार्त्रमध्येच ठाण मांडून आहेस हे मात्र ठाऊक नव्हतं. आज सकाळी मी आमच्या प्रिंटरकडे काही गॅलीज घेऊन गेलो होतो. तेथे लिथोग्राफीच्या डिपार्टमेंटमध्ये काही ट्रायल प्रुफ्स पडली होती. जरा वेगळी वाटली म्हणून पाहायला गेलो तर खाली तुझी सही पाहून उडालोच. त्याला विचारलं तर त्याने सांगितलं की तू पॅरीसमध्ये राहतोयस म्हणून. मी ताबडतोबच तुझ्या आईचं घर गाठलं. तिने मला हा पत्ता दिला."

मधे पंधरा वर्षांचा काळ गेला होता. शैशव संपून दोघांनीही तारुण्यात पदार्पण केले होते. बालपणीच्या मैत्रीचे धागे अजून अतूट होते. जुन्या आठवणींना उजाळा देत, मधल्या काळातल्या गोष्टी एकमेकांना सांगत लवकरच तो कालखंड भरून आला. दोघांची कार्यक्षेत्रे वेगळी असली तरी त्यात चित्रकलेवरील प्रेम हा समान धागा होता. त्यामुळे लवकरच ते एकमेकांना पूरक ठरणार होते. त्यामुळे वादांना आता नवे मुद्दे मिळाले.

"हे बघ. चित्रकलेवर माझं प्रेम आहे. तर त्यातच का करियर करू नये."

"तुला नक्की काय करावंसं वाटतंय?"

"मी स्वतः चित्रकार होऊ शकणार नाही हे मला पक्कं ठाऊक आहे. ते अंग माझ्यात नाही. पण कलेशी संबंधित असं काहीतरी. उदाहरणार्थ, आर्ट डिलर."

"आर्ट डिलर," स्टुलावरून हातातल्या पॅलेटसकट गरकन वळून हेन्री म्हणाला, "तुला हे भिकेचे डोहाळे कुठून लागले रे बाबा. चित्रकारीइतकाच चित्रविक्री हा व्यवसाय दळिंदर आहे. तुला ठाऊक नाही, आजकाल या पॅरीसमध्ये प्रत्येकजण पेंटिंग करू लागलाय. आता जर सगळे लोक स्वतःच चित्र काढायला लागले तर विकत कोण घेणार? आहेस तिथेच नेटाने राहा. चार-पाच वर्षांत पॅरीसमधल्या एखाद्या ख्यातनाम नियतकालिकाचा संपादक होशील."

- ४१ -

१८८८ चा वसंत ऋतू अशा रीतीने मोठ्या मजेत गेला. हेन्रीच्या आयुष्यातील हे वर्ष सुखाने आकंठ भरलेले होते. पुढल्या वर्षी बॅस्टीलचा तुरुंग फोडण्याच्या घटनेला शंभर वर्षे पूर्ण होत होती. त्यामुळे ते वर्ष फ्रेंच क्रांतीची शताब्दी म्हणून दणक्यात साजरे करायचे असे सरकारने ठरविले होते. त्या निमित्ताने 'एक्स्पोझिशन युनिवर्सल' नामक एक मोठे प्रदर्शन भरविले जाणार होते. अशा प्रदर्शनांबद्दल पॅरीसची ख्याती पूर्वीपासून होती. त्यामुळे या वर्षी जगभरातून खूप गर्दी लोटणार याची खात्री होती.

शाँ द मार्सच्या विस्तीर्ण मैदानावर 'थाउजंड अँड वन नाइट्स' नावाचे एक छोटेसे शहरच वसविले जात होते. पांढऱ्या प्लॅस्टरचे महाल, त्यांना लागून जनानखाना, मशिदी आणि मिनार, फरसबंदी चौक, माडाच्या झापांनी शाकारलेल्या ताहिती झोपड्या, कंबोडियन देवळे, ट्युनिशियन बाजार आणि अल्जेरियन कसबा. या पार्श्वभूमीवर आयफेल टॉवर हळूहळू उभारला जात होता. बांधकामाच्या प्रगतीनुसार दिवसेंदिवस तो अधिकाधिक उंच व निमुळता होताना दिसायचा. त्या राक्षसी पोलादी सांगाड्याला कामगार मुंग्यांसारखे अहोरात्र चिकटलेले असत. एखाद्या भाल्याच्या अग्रासारखे दिसणारे टॉवरचे टोक आकाशात घुसू पाहत होते. त्याचे वर्णन करताना निरनिराळ्या उपमा-उत्प्रेक्षांच्या शोधात संपादकांत अहमहमिका लागली होती. हा टॉवर संपूर्णपणे पोलादापासून बनवण्यात येणार होता. त्याचा पाया अठ्ठेचाळीस फूट खोल खणला होता. त्याच्या उभारणीत चोवीस लक्ष रिव्हेट लागणार होते. पूर्ण झाल्यावर हा टॉवर न्यूयॉर्कमधील फ्लॉरिटॉन इमारत, सेंट पीटर चर्चचा घुमट, वॉशिंग्टनमधली ओबेलिक्स या मानवनिर्मित वास्तूंपैकी सर्वात उंच वास्तू म्हणून जगातले एक नवे आश्चर्य होणार होता.

त्या वेळी मोंमार्त्रमधील वातावरणसुद्धा आनंद व उल्हास यांनी भारून गेले होते. ल एक्स्पोझिशनशी त्याचा अर्थाअर्थी काही संबंध नव्हता. ती किमया होती वसंत ऋतूची. झाडांना नवी पालवी फुटू लागली होती. बुलेव्हार क्लिशीमधल्या चेस्टनट वृक्षांवर पक्षी किलबिलाट करू लागले होते. फुटपाथवर बसवलेल्या फरशीच्या फटींतून गवताचे कोवळे कोंभ डोकावू लागले होते.

पाठोपाठ उन्हाळा सुरू झाला. ला नुव्हेलच्या आगाशीवर दाढीधारी चित्रकार मंडळी मोठमोठ्या हॅट घालून ॲबसिंथ पीत बसलेले आढळू लागली. कित्येक लोक आपल्या घराच्या सज्जात सहकुटुंब बसून ऊन खात खात दुपारचे जेवण घेताना आढळत. अशा वेळी समोरच्या घरातील मंडळींशी तासन्तास गप्पा चालत. गाडीवान आपल्या बग्गीचे लगाम ढिले सोडून उन्हे खात डुलक्या काढत बसलेले आढळत. घोडे गटाराच्या कडेला उभे राहून आपल्या पुठ्ठ्यांवर बसलेल्या माशा शेपटीने उडवण्यात दंग असत. निवांतपणा नसे फक्त रू कुलँकूरमधील धोबिणींच्या वाट्याला. त्यांना आपल्या कपाळावरचा घाम पुसायलासुद्धा फुरसत नसायची.

१८८८ मधल्या उन्हाळयातील मोंमार्त्र हे असे होते. सभोवतालच्या सनातनी विचारांच्या व्हिक्टोरियन वाळवंटातील सुखलोलुपतेचे ओॲसिस. स्वच्छंदी बोहेमियन लोकांचा जणू स्वर्गच. हा पॅरीसच्या वेशीवर असलेला भाग. त्याचे खेडवळ स्वरूप बदलले नव्हते. येथे अजूनही उघड्या जागा शिल्लक होत्या. तेथे चेरीच्या झाडांना बहरायला मोकळीक होती. प्रेमिकांना आपल्या घराच्या दारातच एकमेकांचे चुंबन घेण्यात संकोच वाटत नसे. तरुण धोबिणी कंबर मोडून टाकणाऱ्या कामातून विरंगुळा म्हणून कॅनकॅन नावाचे नृत्य करीत. सतत साबणाच्या पाण्यात काम करून त्यांच्या पायाला खरूज झाल्यासारखे फोड येत. नाचताना गिरकी मारल्यावर स्कर्टमधून त्यांचे ते फोडांनी भरलेले पाय दिसत. अजूनही ही वस्ती गलिच्छ, गावंढळ व रांगडी म्हणून ओळखली जायची. पण शहरीकरणाच्या प्रक्रियेत हे स्वरूप हळूहळू बदलत होते.

- ४२ -

मोंमार्त्र ह्या गांवठाणाचा कायापालट करू पाहणारा एक जादूगार मोंमार्त्रच्या वस्तीतच फिरत असे, याची कोणालाही कल्पना नव्हती. तो एक जाडजूड शरीरयष्टीचा मध्यमवयीन इसम होता. डोक्यावर विरळ केस, त्यावर कडा दुमडलेली चुरगळलेली हॅट, किंचित करड्या झालेल्या मिशा, अंगात स्वस्तातला ओव्हरकोट या वेशात तो अगदी शांतपणे फिरताना आढळत असे. अशा अवतारात तो शहरी पोशाख केलेला एखादा शेतकरी किंवा फार तर जिल्ह्याच्या गावातल्या सरकारी कारकुनासारखा दिसत असे.

हेन्रीची आणि त्याची एका संध्याकाळी ल एलीसमध्ये गाठ पडली. कॅनकॅन नृत्य मोठ्या रंगात आले होते. हेन्री आपल्या नेहमीच्या टेबलावर बसून त्या नर्तिकांचे स्केच करण्यात दंग होता. एवढ्यात एक अनोळखी इसम त्याच्या टेबलापाशी आला आणि अगदी नम्रतेने डोक्यावरची हॅट काढून त्याला अभिवादन केले.

‘‘माझं नाव झिडलर. चार्लस् झिडलर.’’

हेन्रीने नजर वर केली. ‘‘मस्य, प्लीज बी सीटेड.’’ स्केच काढता काढता तो पुढे म्हणाला, ‘‘मी तुलूझ् लोत्रेक. थोडी वाइन घेता का.’’

‘‘नो थँक्स.’’ थोडा वेळ हेन्रीचे स्केच काढणे न्याहाळून झाल्यावर तो म्हणाला, ‘‘मी गेले महिनाभर रोज संध्याकाळी येथे येतोय. तुम्ही जेव्हा जेव्हा येथे असता तेव्हा सारखी कॅनकॅनची चित्रं काढीत असता.’’

‘‘तुम्ही अल्सेशिअन दिसताय,’’ हेन्रीने त्याच्या उच्चारांवरून त्याला विचारले, ‘‘माझा एक मित्र आहे मॉरीस जॉय्यां म्हणून. तुमच्या ओळखीचा असेल.’’

‘‘मी अल्सॅकचा ही गोष्ट खरीय पण तुमच्या मित्राचा आणि माझा परिचय नाही. तसा परिचय असण्याची शक्यतासुद्धा कठीण आहे, अर्थात त्याचं बालपण माझ्यासारखं गरिबीत गेलं असतं तर कदाचित आमचा परिचय झाला असता.’’

झिडलर आत्यंतिक गरिबीतून स्वकष्टाने परिस्थितीशी झगडत वर आला होता. वयाच्या सातव्या वर्षापासून पोट भरण्यासाठी तो ढोर मेहनतीची कामे करीत असे. वयाच्या विसाव्या वर्षापर्यंत त्याला लिहिता-वाचतासुद्धा येत नव्हते. शालेय शिक्षण नसले तरी पैशाचे महत्त्व तो पुरेपूर उमगून होता. पैसे मिळवण्यासाठी त्याने काय काय केले त्याची कहाणी त्याने हेन्रीला थोडक्यात सांगितली. हेन्री त्याचे बोलणे लक्षपूर्वक ऐकत होता. त्याच्याकडे शेतकऱ्यासारखी ढोर मेहनतीची तयारी आणि बोलण्यात रोखठोकपणा होता.

‘‘तुम्हाला हा नृत्यप्रकार खूप आवडलेला दिसतोय.’’ झिडलर हळूच पुढे म्हणाला, ‘‘तुम्हाला कल्पना आहे या कॅनकॅनमधूनसुद्धा खूप पैसा मिळवता येईल.’’

‘‘कॅनकॅनमध्ये पैसे मिळून मिळून ते कितीसे मिळणारायत?’’

''अगदी बख्खळ,'' हेन्री गोंधळात पडलेला पाहून तो पुढे म्हणाला, ''त्यासाठी कॅनकॅनचे व्यापारीकरण करावे लागेल. मग बघा पैशाचा कसा पाऊस पडायला लागेल ते.''

''मी काहीतरी बरळतोय असं समजू नका. अशा व्यापारीकरणाला लागणारा अनुभव मला आहे. हिप्पो सर्कसचे नाव ऐकलेय तुम्ही. त्याचा मी मालक आहे''

त्या रात्री ब्रासेरीमध्ये जेवताना झिडलरने हेन्रीसमोर आपली योजना मांडली.

''गेले वर्षभर मी काहीतरी नवीन करण्याच्या विचारात आहे. या सर्कसमध्ये आता काही दम राहिलेला नाही. किमान दहा लाख फ्रँक सुटतील असं काहीतरी मला हवंय.''

''दहा लाख फ्रँक. तुमची उडी खूप मोठी दिसतेय.''

''होय. आणि हे पैसे ह्या कॅनकॅनमधून मी मिळवणार आहे.'' त्याच्या बोलण्यात एक दुर्दम्य आत्मविश्वास होता.

चलो इस बात पर हो जाय असे म्हणून दोघांनी आपले ग्लास उंचावून रिकामे केले.

''मी सगळ्या गोष्टींचा नीट विचार केलाय. पुढल्या वर्षी एक्स्पोझिशन आहे. त्या निमित्ताने हजारो, लाखो लोक पॅरीसमध्ये येतील. पॅरीसमध्ये त्यांना बघण्यासारखे काय आहे?''

''एक्स्पोझिशन. त्यासाठी तर ते पॅरीसला येणार आहेत.''

''एकदा तो काळाकभिन्न निग्रो, बसक्या नाकाचा चिनी, साप व गारुड्याचा खेळ, हत्ती, उंट हे सगळं बघून त्या पोलादी टॉवरच्या टोकावर जाऊन पॅरीसचं

विहंगमावलोकन करून झालं की मग पुढं काय? एकदा दिवस मावळला अंधारून आलं की मग काय करणार?''

झिडलरने खिशातून विझलेल्या सिगारचे एक थोटूक बाहेर काढले आणि न शिलगावता तसेच ओठात धरून ठेवले. ''मनुष्य साधारणतः सहवासप्रिय असतो. त्याला एकट्याला लवकरच कंटाळा येतो. त्याला करमणुकीची गरज असते. ती काही त्याला स्वतःला निर्माण करता येत नाही. दुसऱ्या कोणीतरी ती पुरवावी लागते. आणि सर्व प्रकारच्या करमणुकींमधला महत्वाचा घटक म्हणजे स्त्री. बाकी कशाला काही अर्थ नसतो. माझ्या वीस वर्षांच्या शो बिझनेसमध्ये मी जे काही शिकलो असेन तर ते हे. करमणुकीच्या कोणत्याही कार्यक्रमात बाई आणली की मग पैसा वाहायलाच लागला म्हणून समज. तुम्हाला हा सगळा मूर्खपणा वाटेल. पण एक लक्षात ठेवा. लोक मूर्खच असतात. आणि म्हणूनच मला कॅनकॅनमधून प्रचंड पैसा मिळेल याची खात्री आहे.''

''कॅनकॅनची सुरुवात या इथे ल एलीसमध्येच झाली आणि गेली दहा-बारा वर्षं तरी तो येथे चालू आहे. तुमच्या म्हणण्यात काही तथ्य असेल तर याचा मालक डेस्प्रेझ एव्हाना पॅरीसमधला एक गब्बर माणूस व्हायला पाहिजे होता.''

''ल एलीसबद्दल मला काही सांगू नका.'' झिडलर तुच्छतेच्या सुरात म्हणाला, ''काय भिकार जागा आहे ही. अशा ठिकाणी इंग्लिश किंवा अमेरिकन पाऊल तरी ठेवतील का? धड बारसुद्धा इथे नाही. याच्या मालकाला मी चांगला ओळखतो. शो बिझनेस कशाशी खातात हे त्याच्या गावीसुद्धा नाही. तो एका सोन्याच्या खाणीवर बसलाय. पण कसा तर एखाद्या आंधळ्यासारखा. तो त्यातले फक्त दगडगोटेच विकतोय. सोनं त्याला दिसतच नाहीय. पण लवकरच त्याचे डोळे उघडतील नि त्याला हात चोळत बसावं लागणार आहे.''

''कसं काय?'' हेन्रीने विचारले.

"कारण या सगळया पोरींना मी माझ्या नव्या नृत्यगृहामध्ये घेणार आहे. विशेषतः त्या गोलमटोल चिकन्या पोरीला. ती पाठीवर केसांचा बुचडा बांधते ती. काय नाव तिचं?"

"ला गुल्वी."

"काय ठसक्यात नाचते ती. सध्या या ल एलीसच्या बाहेर तिला फारसं कोणी ओळखत नसणार. माझ्याकडे आली की बघ सगळया पॅरीसमध्ये तिचं नाव होईल. माझं हे नवं नृत्यगृह अगदी भव्य असणार आहे. इथल्यापेक्षा चौपट नर्तिका आणि तेवढाच मोठा वाद्यवृंद. आणि महत्वाचे म्हणजे एक आलिशान बार असेल तिथे. खरी कमाई बारमध्येच आहे."

"तुम्ही कोणत्या बाजूला बसता त्यावर ते अवलंबून असतं." हेन्री डोळे मिचकावत म्हणाला.

"बारमध्ये वेगवगळया दर्जेदार मद्यांबरोबरीने चांगल्या बारटेंडरची गरज असते. या कामात पुरुषांपेक्षा स्त्रिया दसपट अधिक चांगल्या असतात. आणि माझ्या मनात जी आहे ती तर शंभर पटीने चांगली आहे. काय चलाख आहे ती. एका नजरेत तिला कळतं कोणाला काय व किती पाजायची ते. कोणाला चढलीय, कोण हातघाईवर येणाराय, कोण रडणाराय हे लक्षात घेऊनच तिचं काम चालू असतं. त्यामुळे सहसा विचका होत नाही. आणि दिसायलासुद्धा काय सुरेख आहे म्हणून सांगू. एकदा ती पेला भरू लागली की देखते रहो. आणि सगळयांत महत्वाचं म्हणजे ती अतिशय प्रामाणिक आहे."

"कुठे आहे तुमची ही सर्वगुणसंपन्न साकी."

"फॉलीज बर्जेरा. तुम्ही गेलायत तिकडे कधी? तिचं नाव सारा. दरमहा शंभर फ्रँक. वर गल्ल्यातील पाच किंवा दहा टक्के द्यावे लागले तरी बेहत्तर."

“इतका वेळ आपण दारूविषयी नुसते बोलतोय तर कोरडं राहून कसं चालेल? और एक हो जाय. मी कोनॅक घेणार आहे. तुम्हाला काय मागवू?”

“नो थँक्यू मस्य. मला बीअर ठीक आहे.”

हेन्रीची कोनॅक येताच झिडलरने आपली योजना पुढे सांगायला सुरुवात केली. “मी फक्त बारवरच थांबणार नाहीय. तेथे एक छोटेसे रेस्तोराँ असेल. मध्यभागी लोकांना नृत्य करण्यासाठी एक खूप मोठी जागा मोकळी सोडण्यात येईल. दररोज ठरावीक वेळी तेथे एक शो होईल.”

“शो आणि डान्सिंग प्लोअर वर.”

“होय. लोक नाचून नाचून कंटाळतात. तेव्हा विरंगुळा म्हणून ठरावीक वेळेला हा शो होईल. प्रेक्षकांच्या मधे. फॉलीज बर्जेराप्रमाणे स्टेजवर नव्हे. फॉलीज बर्जेरामध्ये नाचणाऱ्या मुलींच्या तंगड्या बघण्यासाठी लोकांना दुर्बिणी घेऊन बसावं लागतं. माझ्या या नृत्यगृहात मुली अगदी प्रेक्षकातच जाऊन नाचतील. इतक्या जवळ की कोणाला वाटलं तर कुल्ल्यावर एखादी चापटीसुद्धा मारता येईल. शोची सरुवात होईल युत्ते गिल्बर्टच्या गाण्याने. नाव ऐकलंयत कधी?”

हेन्रीने नकारार्थी मान हलविली.

“नाही ना. आता ऐकाल. मी तिला एका छोट्या कॅफेमध्ये गाताना पाहिलंय. तिची स्वतःची अशी एक खास शैली आहे. गाताना तिची नजर खाली झुकलेली असते. जशी एखादी अनाघ्रत कुमारिकाच जणू. पण चावट गाणी अशी फक्कड म्हणते की हात न लावताच गुदगुल्या व्हाव्यात. आमच्या तालमी सुरू होतील तेव्हा तुम्हाला बघायला बोलवीनच. एकदा लोक रंगात येऊ लागले की मग त्यांना थोडी ड्रिंक्स द्यायची. मग आयेशाचा नाच. नाव ऐकलंय कधी?”

हेन्रीच्या प्रतिक्रियाची वाट न बघताच तो आपली योजना पुढे सांगायला लागला. आयेशाचा कंबर लचकवीत केलेला नाच. नंतर ॲक्रोबॅटीक्स. तंग

कपड्यातल्या पीळदार शरीराच्या पुरुषांनी केलेल्या कसरती. हे मात्र खास महिलावर्गासाठी म्हणून. आणि सगळयांत शेवटी कॅनकॅनचा जल्लोश.

‘‘तुमची योजना अगदी डोळयांत भरण्यासारखी आहे. पण ती पोलिसांच्या डोळयांत खुपली तर काय हो.’’

हेन्रीचा आक्षेप त्याने हात उडवून वाटेला लावला. त्याच्या चेहेऱ्यावर किंचित आठी उमटली. ‘‘तुम्हाला काय वाटलं, एवढ्या मोठ्या योजनेत मी या गोष्टीचा विचार केला नसेल. सगळी योजना तपशीलवार तयार आहे. गेले कित्येक महिने रात्रंदिवस मी याचाच विचार करत आहे. पण एक दिवस असा येतो की आपलं मन कोणासमोर तरी उघडं करावं असं वाटू लागतं. हे बघा आपला परिचय फक्त तासाभराचा. पण तुम्हाला बघता क्षणी तुमच्याबद्दल का कोण जाणे मला विश्वास वाटू लागला. कदाचित स्केच करतानाची तुमची तन्मयता बघून असेल.’’

थोडा वेळ शांततेत गेला. झिडलरने हेन्रीच्या डोळयांत पाहत विचारले, ‘‘मस्य लोत्रेक, कशी काय आहे माझी योजना?’’

‘‘तुमचा आत्मविश्वास वाखाणण्यासारखा आहे. तुमचे हे नियोजित नृत्य, नाट्य, मद्यपान गृह वगैरे कुठे बांधणार आहात?’’

‘‘या इथेच. मोंमार्त्रमध्ये.’’

‘‘एक्स्पोझिशनपासून जरा दूरच होईल नाही का?’’

‘‘जरा लांब वाटलं तरी मोंमार्त्र हीच त्याला योग्य जागा होईल. एकतर हे ठिकाण शांत व निसर्गसुंदर आहे. शिवाय इथलं स्वच्छंदी व बाहेरख्याली जीवन. स्वतःच्या देशात जी मौजमजा ज्यांना करता येत नाही ती बाहेर पडल्यावर मिळाली तर त्यासाठी ते कोणतीही किंमत मोजायला तयार होतील. दुसरी महत्वाची बाब म्हणजे इथलं कलाकारांचं वास्तव्य व त्यांची बोहेमियन जीवनशैली. प्रवाशांच्या दृष्टीने कलाकारांचं जीवन भलतंच रोमँटिक असतं.’’

''खरंय. पुष्कळ कलाकार तसे असतातही,'' हेन्री हसत हसत म्हणाला, ''मोंमार्त्रमध्ये अगोदरच नृत्यगृहांची खूप गर्दी झालीय याचा तुम्ही विचार केला आहे का?''

''मस्य, मी म्हणतो तशा प्रकारची वैविधता देणारं एकही नाहीय. इथेच नव्हे तर अगदी लंडन ते सॅनप्रॅन्सिस्कोपर्यंत सगळया जगात शोधून सापडणार नाही. माझ्या स्वप्नातील या जागेत नृत्यगृह, आर्ट गॅलरी व वेश्यागृह यांचा मिलाफ बघायला मिळेल. इमारतीची रचना अगदी आगळीवेगळी असेल. एखाद्या पवनचक्कीसारखी. तिचा रंग लाल अगदी अंतर्बाह्य लाल. पॅरीसमध्ये लाल रंगाची एकही इमारत नाहीय. लाल रंग रात्री उठून दिसतो, त्यात स्त्रियांचे सौंदर्य खुलून उठते आणि पुरुषांची वासना उद्दिपित होते. इमारतीवर एक पवनचक्कीचे फिरते पाते बसवण्यात येणार आहे. त्यावर अमेरिकेतील हजारो इलेक्ट्रिक बल्ब बसविण्यात येतील. अर्थात लाल रंगाचे. ही रोषणाई अगदी दहा मैलांवरूनसुद्धा दिसेल. एक चित्र मनात रंगवून तर पाहा.''

झिडलर थोडा वेळ गप्प होता. रात्रीच्या वेळी चमचमणाऱ्या लालचुटूक दिव्यांचे पवनचक्र फिरताना त्याच्या नजरेसमोर तरळू लागले. त्याने हातातला बीअरचा पेला उंचावला व पिऊन रिकामा केला व दुसऱ्या हाताने मिशांना चिकटलेला फेस पुसत पुढे म्हणाला, ''सहा-सात महिन्यांत माझे नृत्यगृह चालू होईल. एक्स्पोझिशनला येणाऱ्या सगळया इंग्लिश व अमेरिकन प्रवाशांना त्या निमित्ताने फ्रान्समधील प्रख्यात नृत्यगृह पाहता येईल. आणि मग जगप्रसिद्ध व्हायला कितीसा वेळ. सर्व बारीकसारीक तपशील तयार आहेत अगदी नावासकट. काय नाव असेल? ओळखा पाहू.''

''काही सांगता येत नाही बुवा.'' हेन्रीने कबुली देत हातातला कोनॅकचा पेला मोठ्या झोकदारपणे उंचाविला.

झिडलरनेही फार न ताणता बीअरचा पेला उंचावत जाहीर केले, "मुलँ रूज. मस्य नीट लक्षात ठेवा. थोड्याच दिवसांत हे नाव जगभर सर्व शौकिनांच्या तोंडी असेल. मुलँ रूज."

- ४३ -

२ एप्रिल १८८९. एफेल टॉवरवर फ्रान्सचा ध्वज फडकू लागला. ल ग्रँड एक्स्पोझिशन युनिव्हर्सलच्या उद्‌घाटनासाठी प्रेसिडेंट सॅदी कॅर्तोत खास शिवलेल्या दिमाखदार पोशाखात आले होते. सकाळी बरोबर दहा वाजता उद्‌घाटन झाले. शाँ द मार्सवर उभारलेल्या नगरीत लोकांची रीघ लागली. पॅरीसवासीयांचे जगाची सफर करण्याचे आपले स्वप्न घरबसल्या पूर्ण झाले. निळसर झिरझिरीत वस्त्रे परिधान केलेल्या अर्धनग्न इजिप्शियन यौवना, टिंबक्तूमधील विणकर, सुदानी हिजडे, वक्षस्थळे उघडी टाकणाऱ्या दाहोमियन आदिवासी स्त्रिया, उघड्या अंगावर गेरूने रंगरंगोटी केलेला मॅलॅगे जमातीचा राजा, समुद्रातून मोती वेचणारे ताहितियन, गारुडी, वुडू मांत्रिक. कोणाच्या डोक्याला फेटा तर कोणाचा तुळतुळीत चमनगोटा. कोणाच्या कंबरेला झाडांची पाने, कधी नुसती लंगोटी, वाघाचे कातडे, सारोंग, किमोनो, जरीच्या साड्या, चोळणा, हस्तिदंत, कवड्या, शंखशिंपले, हाडे, शिंग अशा विविध वस्तूंपासून बनविलेली आभूषणे असे चित्रविचित्र वस्त्रालंकार परिधान केलेला विविध मानवजातींचा समूह तेथे दृष्टीस पडत होता. अनोख्या अनवट सुरावटीत ढोलाच्या तालावर नृत्यगान सतत चालू होते. ह्या साऱ्या गडबडीत हत्ती मात्र शांतपणे फिरत होते. हत्तीच्या पाठीवर बसलेली मुले उंटाच्या पाठीवर बसलेल्या बुटक्या विदूषकांच्या चाळयांकडे बघून खिदळत होती. स्त्रिया ट्युनिशियन ब्रेसलेट व अल्जेरियन अत्तरांच्या खरेदीत दंग होत्या. या गर्दीत आपल्या बायका-मुलांपासून हरवलेले नवरे नाचणाऱ्या मुलींच्या कनातीशी हमखास सापडत.

एक्स्पोझिशन बघण्यासाठी आलेल्या इंग्लिश लोकांमध्ये एक गोबऱ्या गालांचा शौकीन असामी होता. त्याच्या ऐटबाज कपड्यांनी सगळयांचे लक्ष वेधले जायचे. विशेषतः तरुणी तर त्याला बघण्यासाठी पागल झालेल्या दिसत होत्या. ह्या अठ्ठेचाळीस वर्षांच्या असामीचे नाव होते एडवर्ड, प्रिन्स ऑफ वेल्स. जरी हा

इंग्लंडमध्ये व्हिक्टोरिया राणीच्या दरबारातील एक वाह्यात इसम म्हणून प्रसिद्ध असला तरी इथे फ्रान्समध्ये मात्र त्याला राजाचा मान मिळत होता. आपल्या गुणी राजाचा गिलोटीनखाली शिरच्छेद करणाऱ्या क्रांतिकारकांची नातवंडे, पतवंडे या सतत सिगार ओढणाऱ्या राजपुत्राचा घसा फुटेस्तोवर ओरडून जयजयकार करीत होती. शंभर वर्षांपूर्वी एका गुणी राजाचे शिर ज्या नगरीत उडविले गेले त्याच नगरीत आज या नादान राजाच्या शिरावर फुले उधळली जात होती.

सर्वात जास्त लोकप्रियता मिळाली ती मस्य थॉमस एडिसन या अमेरिकन असामीला. बोलणारे यंत्र, सूर्याला काचेच्या गोलात बंदिस्त करणारा विजेचा दिवा अशा असंख्य विस्मयकारक गोष्टींचा जनक. तो जेव्हा विजेवर चालणाऱ्या पाळण्यात बसून एफेल टॉवरच्या सर्वात उंच टोकापर्यंत गेला तेव्हा ते दृश्य बघायला जमलेल्या अफाट जनसागराने हर्षभरित होऊन त्याचा उत्स्फूर्त जयजयकार केला. अशी मानवंदना कोणा सम्राटालासुद्धा कधी मिळाली नसेल.

वर्तमानपत्रांनी वर्णिल्याप्रमाणे पॅरीसवर अखिल जगताने जणू आक्रमण केल्यासारखे भासत होते. कॅफेमध्ये जगातल्या यच्चयावत भाषा कानी पडत. वेटर आणि बारटेंडरना विनिमयाचे दर चांगलेच कळू लागले होते. एक डॉलर म्हणजे पाच फ्रँक, पौंडाचे पंचवीस फ्रँक तर रुबलला चार फ्रँक. जुजबी व्यवहारातील चार-पाच वाक्ये बहुतेकांना येऊ लागली. तर बारमध्ये परदेशी गिऱ्हाइक पटवणाऱ्या मुली थोड्याच दिवसांत बहुभाषातज्ज्ञ झाल्या.

मोंमार्त्रमध्ये मुलँ रूजवरील पवनचक्र रात्री त्याच्यावर लावलेल्या लाल दिव्यांच्या झगमगाटात फिरू लागे. हेन्री तेथे रोज नेमाने हजेरी लावत असे. मागच्या शरद ऋतूपासून झिडलरचे स्वप्न आकारताना तो त्याचा साक्षी होता. झिडलर दररोज किमान पंधरा-सोळा तास तरी काम करी. तो सगळीकडे तोंडातील चिरूट चघळत, कधी हसत तर कधी ओरडताना आढळायचा. प्रत्येक बारीकसारीक गोष्टीवर त्याची जातीने देखरेख असायची. वेगवेगळया कामांचे कंत्राटदार, परातीवर चढलेले कामगार, गालिचे, क्रोकरी, वाणसामानाचे दलाल इत्यादी गोष्टींकडे त्याचे एकाच वेळी लक्ष असे.

इमारतीचा सांगाडा उभा राहिल्यावर तालमी सुरू झाल्या. सभोवताली घणांचे कानठळया बसवणारे आवाज, करवतीची करकर, मुकादमांचा आरडाओरडा, रंगांचे उग्र वास असा गदारोळ चालूच असायचा. ल एलीसमध्ये नाचणाऱ्या बहुतेक सगळया मुलींना झिडलरने तेथे आणले होते. त्या हेन्रीला बघून आवर्जून त्याच्याकडे येत. तालीम मास्तरच्या शिस्तबद्ध तालमींमुळे कॅनकॅनचे लोकनृत्य हे स्वरूप बदलून त्याला काटेकोरपणे ताला-सुरांवर बसवलेल्या बंदिस्त नृत्यप्रकाराचे रूप येऊ लागले. झिडलर कित्येकदा आपले मन हेन्रीजवळ मोकळे करीत असे. त्या दरम्यान हेन्रीची त्याच्याशी चांगली दोस्ती जमली. हेन्रीची काही पेंटिंग झिडलरने लॉबीत लावायला म्हणून घेतली. त्यांपैकी लॉबीमध्ये लावलेल्या ‘फर्नांदो द रिंगमास्टर’ ह्या भव्य पेंटिंगकडे आत शिरताच लक्ष जाते.



(सिर्क द फर्नांदो – तुलूज लोत्रेक – तैलरंग, कॅनव्हास – ९८x१६१ सेमी, १८८८ – आर्ट इन्स्टिट्यूट ऑफ शिकागो)

- ४४ -

उद्घाटनानंतर मुलँ रूज हे हेन्रीचे जणू दुसरे निवासस्थान बनले. तेथील प्रत्येकजण त्याला ओळखत असे. तिथे त्याची एखाद्या खास पाहुण्यासारखी बडदास्त

राखली जाई. तेथील नियम त्याला लागू नसत. तिथे तो आपल्या मर्जीचा राजा होता. तिथे खाण्याचे पदार्थ फारसे मिळत नसत. पण खास हेन्रीसाठी लहान-सहान मेजवान्यांची व्यवस्था केली जाई. सगळया नर्तिकांचा तो लाडका होता. आपल्या सुखदुःखाच्या गोष्टी त्या मोकळेपणाने त्याला सांगत. प्रेमप्रकरणात त्याचा सल्ला घेतला जाई. भांडणात त्याला आपल्या बाजूला ओढण्यात आपापसात अहमहमिका लागे. बारटेंडर सारा अधूनमधून मद्यपानाच्या दुष्परिणामांवर त्याला व्याख्यान झोडे.

एकूण १८८९ चा वसंत ऋतू मोठा बहारदार ठरला. पॅरीसवासीयांना आयफेल टॉवरप्रमाणे परदेशी प्रवासी रोज रोज बघायची सवय झाली आणि मोंमार्त्रच्या रहिवाशांना मुलँ रूजच्या फिरत्या चक्राची.

वसंत ऋतू संपता संपता एक्स्पोझिशनचे सूप वाजले. पहिल्या हिमवर्षावानंतर शाँ द मार्सवरील स्वप्ननगरी ओस पडली. वैभवाचा आभास निर्माण करणाऱ्या राजवाड्यांच्या कमानींवरील नक्षीकामाचे प्लॅस्टर उखडून गळून पडले आणि आतल्या बोडक्या लाकडी चौकटी उघड्या पडल्या. जगाच्या कानाकोपऱ्यांतून गोळा केलेले वन्य जमातींचे तांडे महासागरातील बेटे, आफ्रिकेतील वाळवंटे आणि सदाहरित जंगले यातील आपल्या मूळ वसतिस्थानाकडे डुचमळणाऱ्या जहाजातून रवाना झाली. आपल्या जागेवर उरला तो फक्त आयफेल टॉवर. शाँ द मार्सच्या ओस पडलेल्या मैदानावर आकाशाला गवसणी घालणारा तो उंच टॉवर सर्कशीचा गाशा गुंडाळताना चुकून मागे राहिल्यामुळे गोंधळलेल्या जिराफासारखा केविलवाणा दिसू लागला.

वर्ष संपता संपता हेन्रीला २१ रू द कुलँकूर या पत्त्यावर आलेले एक पत्र मादाम ल्युबेतने त्याच्या हातात ठेवले. पत्रावरील स्टॅम्प परदेशी दिसत होते. त्यामुळे काळजीत पडलेल्या मादाम ल्युबेतने भीत भीतच विचारले, "सगळे सुखरूप आहेत ना?"

"ओह! आनंदाची बातमी," हेन्री चीत्कारला, "अर्टिस्ट्स सोसायटीने मला येत्या जानेवारीत ब्रुसेल्समधील प्रदर्शनात भाग घेण्याचे निमंत्रण दिलंय."

“नुसती पेंटिंग पाठवून चालणार नाही का? अगदी स्वतःच जायला हवं का?” मादाम ल्युबेतने काळजीच्या सुरात विचारले.

“असं काय विचारता मादाम? हे निमंत्रण म्हणजे एक मोठा बहुमान आहे.”

“हं! इतक्या लांबून पॅरीसहून ब्रुसेल्सला जायचं म्हणजे बहुमानापेक्षा त्यात त्रासच जास्त.” मादाम ल्युबेत मोठ्या फणकाऱ्याने म्हणाली, “अर्थात कुठेही जायचं असेल तर तुमचे तुम्ही मुखत्यार आहातच. अगदी चीनला जा की आफ्रिकेत. मी कोण विचारणारी?” तिच्या थुलथुलीत चेहऱ्यामुळे तिच्या अंतःकरणातील खळबळ दिसून येत नव्हती. मिनिटभरात तिचा फणकारा शांत झाला. तिचे डोळे पाण्याने भरून आले. कापऱ्या आवाजात ती म्हणाली, “तिकडे तुम्हाला काही दुखलंखुपलं तर कोण बघणार आहे? त्या बल्गेरियन लोकांपैकी कोण येणार आहे का तुमच्या मदतीला?”

ब्रुसेल्स हे पॅरीसपासून फक्त काही तासांच्या अंतरावर आहे. तेथील लोकांना बेल्जियन म्हणतात. बल्गेरियन नव्हे. तिथे फ्रेंच भाषाच बोलली जाते आणि जगातील उत्कृष्ट डॉक्टर तिथे उपलब्ध आहेत. हे सगळे तिला समजवायला हेन्रीला खूप प्रयास पडला.

“काही काळजी करू नका. माझ्याबरोबर माझा मित्रसुद्धा असणार आहे. मस्य सुरा. तो उंचेला तरुण. एकदा आला होता आपल्याकडे. आठवतोय?”

- ४५ -

नव वर्षाचे स्वागत मागच्या वर्षाप्रमाणे आपल्या आईच्या सोबतीत करण्याचे हेन्रीने ठरविले. ३१ डिसेंबरला संध्याकाळी तो आईच्या घरी जाऊन पोचला. दुपारीच त्याने आईच्या आवडीचा शुभ्र गुलाबांचा गुच्छ परस्पर पाठवून दिला होता. जेवणाच्या वेळी वातावरण प्रसन्न ठेवण्यासाठी दोघेही जण कसोशीने प्रयत्न करीत होते. वादाचे विषय आज काढायचे नाहीत असे जणू काही ठरवूनच ते एकमेकांना भेटत होते. हेन्रीने मुद्दाम होऊन मादाम ल्युबेतचा विषय काढला.

"मागच्या महिन्यात थोडीशी सर्दी झाली तर मादामनी केवढा रुद्रावतार धारण केला होता. मला बिछान्यातून बाहेर पडू द्यायला तयार नव्हत्या. सारख्या उशाशी बसून होत्या. कपाळावर पोटीस बांधून त्यांनी मला अगदी भाजूनच काढलं. शिवाय ऊठसूट ती लापशी पिण्याची जबरदस्ती. शेवटी एकदाची सर्दी गेली म्हणून सुटलो नाही तर त्या लापशीत बुडून मेलो असतो. सगळ्यात कमाल म्हणजे त्यांनी मला उशाशी बसून संपूर्ण थ्री मस्केटीयर्स वाचून दाखविले."

मादाम ल्युबेतचे कुरबुरीच्या स्वरातील बोलणे आणि लटके रागावणे याची एक छान नक्कल त्याने आईला करून दाखविली. आई बळेबळे हसली. जेवणानंतर ते दोघेजण कॉफी पिण्यासाठी म्हणून बैठकीच्या खोलीत गेले. कॉफीपान चालू असताना त्यांनी हवापाणी व जुन्या नोकराचाकरांविषयी जुजबी गोष्टी केल्या. संभाषणाचा ओघ हळूहळू आटत गेला. ते दोघे एकमेकांसमोर मूकपणे बसले होते. आई हातात घेतलेल्या विणकामात दंग होती. तिच्या तोंडावर शेकोटीचा तांबूस प्रकाश पडला होता. संभाषणासाठी एखाद्या निरुपद्रवी विषयाच्या शोधात तो विस्तवाकडे थंड नजरेने बघत होता.

हेन्रीने मोंमार्त्रमध्ये आपले बस्तान हलवल्यानंतर त्या मायलेकरांमध्ये एक प्रकारचा दुरावा आला होता. दोघांचे जग आता एवढे भिन्न झाले होते की परस्परांविषयी आत्मीयता वाटावी असा रक्ताचे नाते सोडल्यास एकही समान दुवा त्यांच्यात राहिला नव्हता. तरीही एकमेकांच्या भावनांना जपण्याचा भयंकर गुंतागुंतीचा खेळ ती दोघे मोठ्या कौशल्याने खेळत होती. त्याने चित्रकलेला वाहून घेण्याचे ठरविले होते. त्यासाठी त्याने जी जीवनशैली स्वखुशीने अंगीकारली होती ते

तिला कदापि आवडणार नाही, हे तो पूर्णपणे जाणून होता आणि म्हणूनच त्याचा कोणताही उल्लेख करण्याचे तो कटाक्षाने टाळत होता. दोघेही आपापल्या वाट्याचे दुःख एकट्याने भोगत होते. दुराव्यामुळे परस्परसंबंधात कोरडेपणा आला असला तरी मायेचा ओलावा अजून शिल्लक होता. आई मुलाच्या प्रेमाचा अनादी अनुबंध अविनाशी असल्यामुळेच टिकून राहिला होता.

"ममा, मी तुम्हाला एक आनंदाची बातमी देणार आहे. ब्रुसेल्समधली सोसायटी द विंग पुढच्या महिन्यात एक प्रदर्शन भरविणार आहे. त्यांनी त्या प्रदर्शनात माझी पेंटिंग ठेवण्यासाठी मला आमंत्रण दिलंय."

"अरे वा! शाबास. तुम्हाला खूप आनंद झालेला दिसतोय." हातातील विणकाम चालू ठेवत ती म्हणाली.

त्याने आपल्या जाड भिंगांच्या चष्म्यामधून आईकडे विषण्णपणे पाहिले. बिचारी. खेळ किती काळजीपूर्वक खेळला तरी तिला त्याचे मनापासून काही अप्रूप नाही हे त्यातून लपत नव्हते. सोसायटीकडून आमंत्रण येणे हे मोठ्या सन्मानाचे समजले जाते, हे तिला माहीत नव्हते ना तिने सोसायटीविषयी काही अधिक माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला. तिच्या दृष्टीने त्याचे मद्यपान, वेश्यागमन, समाजातल्या खालच्या थरांतील लोकांमधील ऊठबस ही जीवनशैली अभिजनवर्गाच्या दृष्टीने अतिशय निंदनीय होती. मोंमार्त्रमध्ये राहून मिळवलेले मानसन्मान तिच्या लेखी फारशी दखल घेण्याच्या लायकीचे नव्हते. ह्याच कारणामुळे हेन्रीने आपण होऊन आपल्या चित्रकलेविषयी आईला काहीही सांगितले नव्हते. तरी त्याविषयी काहीतरी तिच्या कानावर गेले असेल असे त्याला वाटले. उदाहरणार्थ, त्याचे सँ लझारचे मुखपृष्ठ. प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या बहुतेक सगळ्या नियतकालिकांनी ते छापले होते. आर्ट गॅलरीमध्ये अधूनमधून दिसणारी त्याची पेंटिंग, त्याचे कौतुक करणारी समीक्षा, कदाचित यातील काहीही तिच्या कानावर गेले नसणार, नाही तर कधी ना कधीतरी तिच्या बोलण्यात याचा उल्लेख आला असता. म्हणून मोठ्या उत्साहाने तो सोसायटीविषयी तिला माहिती देऊ लागला.

"हा बेल्जियन कलाकारांचा एक गट आहे. दरवर्षी ते एखाद्या नव्या अप्रसिद्ध अशा एक-दोन कलाकारांना बोलावतात. त्यांच्या आमंत्रणाचे महत्त्व अशासाठी की त्यांनी निमंत्रित केलेले सर्व परदेशी कलाकार पुढे प्रसिद्धीच्या शिखरावर जाऊन पोचले. उदाहरणार्थ, रेन्वा, व्हिसलर, सार्जंट, रोदँ. हा बहुमान मिळणारा मी सर्वात तरुण चित्रकार ठरेन." त्याने मोठ्या आशेने आईकडे पाहिले.

"हे मला माहीतच नव्हतं. फारच छान!"

"ल फिगारोच्या समीक्षकाने या निमित्ताने एक लेखच लिहिलाय. तो म्हणतो..."

हळूहळू त्याची आशा मावळत गेली. कलेतील वास्तववाद, इम्प्रेशनीझम, पोस्ट-इम्प्रेशनीस्ट प्रवाह वगैरे गोष्टी तिने समजून घ्याव्यात अशी काही त्याची अपेक्षा नव्हती. इतरांनी केलेल्या कौतुकाची तिने साधी दखल घेतली असती तरी त्याला ते चालले असते. पण तिच्या लेखी तो एक अपयशी चित्रकार होता. कितीही लाडका असला म्हणून काय झाले त्याच्या पेंटिंगवर सँलोंच्या मान्यतेचे शिक्कामोर्तब नव्हते. शेवटी ती समाजातील उच्चभ्रू अभिजनवर्गाची एक घटक होती. या वर्गाची खास अशी एक अभिरुची तयार झालेली असते. त्यानुसार तिचे काही पूर्वग्रह तिच्या नकळत पक्के झाले होते. उदारहणार्थ, कॉन्झर्व्हेटरीमध्ये शिकून तयार झालेला तो चांगला संगीतकार, कॉमेडी फ्रँक्कामध्ये काम करतो तो चांगला अभिनेता, ऑपेरात गातो तो चांगला गायक, ज्या चित्रकाराची पेंटिंग सँलोंसाठी निवडली जातात तो चांगला चित्रकार असे तिचे समीकरण होते. कलेतील नव्या प्रवाहाबद्दल ती संपूर्ण अनभिज्ञ होती.

आपली निराशा लपवीत वेळ मारून नेण्यासाठी त्याने संभाषणाचे सूत्र पुढे रेटले. प्रदर्शनात पाठवायच्या पेंटिंगमध्ये काही पोर्ट्रेटचा समावेश केला होता. त्यात पेरॉक्केमधल्या वेश्यांच्या पोर्ट्रेटबरोबरच मादम्वाझेल दिहो नामक एका उच्चभ्रू स्त्रीचे एक पोर्ट्रेट होते. त्याने त्याविषयी सविस्तर माहिती दिली. पण पेरॉक्केमधल्या वेश्यांच्या पोर्ट्रेटबद्दल त्याने तोंडातून चकार शब्दही काढला नाही.

ह्या दिहो बाईसाहेब एक उच्चकुलीन विधवा होत्या. फावल्या वेळात त्या पियानोच्या शिकवण्या करीत असत. दर शनिवारी संध्याकाळी त्यांच्या घरी संगीताची एक छोटीशी मैफल भरे. साथीला त्यांचे दोन भाऊ असत. थोरला बॅसून वाजवायचा तर धाकटा फ्लूट. देगास त्या मैफलींना न चुकता हजर असे. त्याला संगीताची अतिशय आवड होती. विशेषतः मोझार्ट. दिहो कुटुंबीयांविषयी जेवढी म्हणून लांबण लावता येईल तेवढी त्याने लावली. किती सुसंस्कृत माणसे आहेत ती. त्यांच्या घरी केवढ्या मोठमोठ्या लोकांची ऊठबस होत असते. वगैरे वगैरे...

थोड्याच वेळात त्यांच्या संभाषणावर शांततेचा पडदा पडला. शांतता. बोलायच्या राहून गेलेल्या अनेक गोष्टींची. त्या अवघडलेल्या स्तब्धतेत एक एक क्षण कसाबसा पुढे सरकत होता. मँटलवर ठेवलेल्या ॲलबॅस्टर घड्याळाच्या टिकटिकीसारखा एकसुरी, नीरस, कंटाळवाणा.

“आज तुम्ही आलात तर किती बरं वाटलं म्हणून सांगू. पण तुम्हाला दुसऱ्या एखाद्या ठिकाणी जायचं असेल. तुमचा असा जास्त वेळ घेणं बरं होणार नाही...” आई मोठ्या खिन्नतेने पण सुज्ञतेने म्हणाली.

“हॅपी न्यू ईयर ममा.” त्याने निरोपादाखल आईच्या कपाळाचे चुंबन घेतले आणि तो मोठ्या जड अंतःकरणाने तिथून उठला.

- ४६ -

हेन्री आईला भेटून घरातून बाहेर पडताक्षणी दिसलेल्या पहिल्या घोडागाडीत लगबगीने चढला. गाडीवानाला मूलँ रूज म्हणून फर्माविले. गाडी चालू झाल्यावर त्याने मागे वळून पाहिले. झाडाच्या फांदीआडून आईच्या खोलीची खिडकी दिसत होती. तावदानातून प्रकाश क्षीणपणे झिरपत होता. बिचारी आई. तिने वर्षभर एवढ्या प्रचंड घरात एकाकी अवस्थेत दिवस काढले. वर्षातील ही शेवटची रात्र तरी तिच्या सहवासात घालवायला हवी होती. त्याच्या मनात आले. पण परस्परांच्या सहवासात दोघांनाही घुसमटल्यासारखे होत होते. त्यामुळे आपण जे ठरविले आहे ते एका परीने बरेच आहे.

बाहेर पडणाऱ्या पावसाने थंडीत भर पडली होती. त्या थंडी-पावसातसुद्धा गाडीवान गाणे गुणगुणत मोठ्या मजेत स्वतःशी हसत रस्त्यावरच्या गर्दीतून गाडी हाकत होता. हसणे हेच आनंदी आयुष्याचे साधे सरळ रहस्य आहे. हसून घ्या! जास्तीत जास्त हसून घ्या. डोक्यात विचार मात्र अगदी कमीतकमी करा. कोणीतरी म्हटलेच आहे. हसण्यासाठी एखाद्या निमित्ताची वाट पाहू नका. नाही तर सगळे आयुष्यच त्या वाट पाहण्यात संपून जायचे.

गाडी मुलँ रूजसमोर येऊन थांबली आणि हेन्रीची तंद्री भंगली. नववर्षाच्या निमित्ताने मुलँ रूजवर दिव्यांची मोठी रोषणाई केली होती. त्याला गाडीतून उतरताना बघताच सर्व कर्मचाऱ्यांनी त्याचे अगत्यपूर्वक स्वागत केले. लॉबीमध्ये लावलेल्या त्याच्या 'फर्नांदो द रिंगमास्टर' ह्या भव्य पेंटिंगवर मोठा प्रकाशझोत सोडल्यामुळे आत शिरताच सर्वांचे लक्ष वेधले जाई. तिकडे एक ओझरता दृष्टिक्षेप टाकून हेन्री सर्वांची विचारपूस करीत पुढे गेला.

"वेलकम अँड हॅपी न्यू इयर, मस्य तुलूझ." दरवान काचेचा दरवाजा उघडताना म्हणाला.

हेन्री बॉलरूममध्ये जाऊन पोचला. बॉलरूम अतिशय भव्य होती. तेथील दिव्यांच्या झगमगाटाने त्याचे डोळे दिपले. दर वेळी तेथील भव्यतेतील कुरूपता हेन्रीच्या डोळयांना खुपत असे. तो हॉल अगदी डोळयांचे पारणे फिटेल, असा असला तरी तेथे ल एलीसमधील उदास काव्यात्मता नव्हती की मोंमार्त्रमधील कोणत्याही बकाल बिस्ट्रोमधील आपलेपणा.

तो सरळ बॉलरूमच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या महॉगनी बारच्या दिशेने चालत गेला. सारा सिंकवर ओणवी होऊन ग्लास धूत होती. पार्श्वभूमीला आरसे, त्याच्या पुढ्यात मांडलेल्या विविध मद्यांच्या बाटल्या व निरनिराळ्या आकाराचे चषक. हेन्री धापा टाकत एका हाताने काउंटरचा आधार घेत उभा राहिला.

"अरे बापरे. आज तुम्ही इतक्या लवकर उगवलात?" तिच्या डोळयांत घरेलू स्मित होते.

''त्याचं काय आहे, आज मी एक पार्टी देणार आहे. त्याची सगळी व्यवस्था ठाकठीक आहे ना, त्याची खात्री करून घ्यायला म्हणून मी इतक्या लवकर आलोय.''

''आज कपडे अगदी खास घातलेले दिसतायत. या पोशाखात तुम्ही काय रुबाबदार, हँडसम दिसता आहात म्हणून सांगू.'' सारा डोळा मारत म्हणाली.

''उगाच वेळ दवडू नकोस. एक कोनॅक दे.''

तिने एक चषक कोनॅकने भरला व त्याच्या समोर ठेवला.

समोर आलेली कोनॅक त्याने एका घोटात संपविली.

''जरा अंमळ धीर धरा. एवढी घाईने पिऊ नये. अशानं पोटातील आतडी जळतात.''

तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत त्याने हातातला चषक काउंटरवर ठेवला. मोठ्या प्रयत्नपूर्वक एका बारस्टूलवर विराजमान झाला. आता तो एकदम उंच दिसू लागला. त्याचे रुंद खांदे तिच्या बरोबरीला आले.

''मस्य तुलूझ. सावकाश प्यायला काय होतं तुम्हाला?''

''माझ्या घशाला कोरड पडली होती.'' त्याने आपल्या डोक्यावरची हॅट काढून ठेवली. ''खरं म्हणजे अजूनही माझी तहान भागली नाहीय, संध्याकाळी जेवताना घोटभर वाईन घेतली होती तेवढीच.'' त्याने सावकाश एक सिगरेट शिलगावली आणि म्हणाला, ''आणखी एक देतेस का?''

''जर तहानच लागली असेल तर एक ग्लास पाणी देते मी. कोनॅकने काही तहान भागत नसते.''

“तुझं चुकतं ते इथेच. कोनॅकने तहान भागते, अन्नपचनाला मदत होते, स्नायूंमध्ये ताकद येते, रक्त शुद्ध होतं, यकृत साफ राहतं, पोटात गुदगुल्या होतात, अंगात ऊब निर्माण होते आणि वर चित्तवृत्ती उल्हसित होतात ते वेगळेच. चल चटकन माझा ग्लास भर पाहू. आणि अशी डोळे वटारून पाहू नकोस. थोड्या वेळात नव्या वर्षाची सुरुवात होईल. अरे नव्या वर्षावरून आठवलं -” त्याने कोटाच्या खिशातून एक लहानसा खोका बाहेर काढला. “ही एक छोटीशी भेट. याचा अर्थ असा नव्हे की अशा भेटीला तू पात्र आहेस. सारखी मला प्रवचन झोडत असतेस. एकेका ड्रिंकसाठी तुझ्या नाकदुऱ्या काढायला लावतेस. पण तरीही तू मला आवडतेस.”

“माझ्यासाठी -” एप्रनला हात पुसत ती जवळपास ओरडलीच.“ओह! मस्य तुलूझ्. यू आर सो स्वीट.” तिने काउंटरवर वाकून त्याच्या गालाचे एक चुंबन घेतले.

“ए, हे काय? प्रपोजल वाटतं. सांभाळ. आता एक ड्रिंक द्यायला काय घेशील.”

तिने तो खोका मोठ्या उत्सुकतेने उघडला, “वा! कित्ती छान. माझ्या नावाची आद्याक्षरंसुद्धा आहेत की.”

त्या खोक्यात तिच्या नावाची आद्याक्षरे असलेले अर्धा डझन रुमाल होते. त्या रुमालांच्या कापडाचा पोत बोटांनी बघताना ती अगदी आनंदून गेली.

“नववर्षाची भेट म्हणजे चिनी मातीची फुलदाणी हे अगदी जवळपास ठरलेलं असतं. त्यापेक्षा हे रुमाल कसे काय वाटतात?” हेन्रीने डोळे मिचकावीत विचारले, “आता कृपा करून मला ड्रिंक द्यायला काय घेशील?”

त्याच्या बोलण्याकडे लक्ष नाहीय असे दाखवीत ती दुसऱ्या कामात गुंतली. तिचा थंडपणा पाहून हेन्री थोडासा चिडून म्हणाला, “हल्ली इथली सर्व्हिस खूप खालावलेली दिसतेय.”

“तुम्हाला एक पेग अगोदरच दिलाय. एवढी दारू पिणं चांगलं नाही तब्येतीला.”

“अग काय बोलत्येस तू. अशाने कसा धंदा होणार तुमचा? झिडलरला वाटतंय की तू धंदा चांगला करतेयस म्हणून.”

सारा हेन्रीच्या जवळ गेली व कोणाला ऐकू जाणार नाही अशा सुरात म्हणाली, “इतर कोणी दारू पिऊन आपलं पोट जाळून घेतलं तर मला त्याचं काही नाही. पण तुम्ही मात्र एका पेगच्या वर पिऊ नका. माझी तुम्हाला कळकळीची विनंती आहे.” ती पोटतिडकेने बोलत होती.

“तुला एक गोष्ट माहितीय का? माझ्यावर दारूचा काहीच परिणाम होत नाही.”

“तसं सर्वच म्हणतात सुरुवातीला.”

“पण मी मला पचते तेवढीच पितो. मला कधी झिंगलेला पाहिलंयस.”

“चढली नाही तरी दारूचा दुष्परिणाम हा सगळयांवर होत असतोच.”

“या बायकांशी वाद घालण्यात काहीच अर्थ नाही. आता शेवटचं सांग मला कोनॅक देत्येस की नाही?”

“ठीक आहे.” तिने पेल्यात बदाबदा कोनॅक ओतली व त्याच्या पुढ्यात आदळला.

त्याने पेला एका घोटात रिकामा केला व ओठ पुसत तो म्हणाला, “आता ते रुमाल जरा बाजूला ठेव आणि कामाला लाग. मी मागवलेले लॉबस्टर आले का?”

“या कपाटात ठेवल्येत.”

“आणि शॅम्पेन.”

“अगदी तुम्हाला हवी होती तीच मिळाली आहे. मोये ए शांदों ७८.” तिने बकेटमध्ये थंड करीत ठेवलेल्या बाटल्या दाखवल्या.

“वाह! तेरा जवाब नहीं.”

बारच्या आरशात त्याला झिडलर येताना दिसला.

“काय झालंय काय तुम्हाला?” हेन्री स्टुलावरून मागे वळत म्हणाला, “नुकतेच कोणाला तरी पोचवून आल्यासारखे दिसताय. सारा, एक डबल रम आण पाहू.”

झिडलर हेन्रीच्या शेजारील स्टुलावर विराजमान होऊन खिन्न मुद्रेने म्हणाला, “काही कळेनासं झालंय. तुम्हाला आठवतंय मस्य, मी किती ठासून सांगायचो सगळयांना. या मुलँ रूजमधून कमीतकमी दहा एक लाख फ्रँकची कमाई अपेक्षित आहे. पण कुठे माशी शिंकली काही कळत नाही. शो चांगला दिमाखदार आहे, संगीत उत्कृष्ट आहे, मद्य लज्जतदार आहे, कॅनकॅनला लोकांची दाद मिळते, तिकिटांचे दरसुद्धा खिशाला परवडतील असेच ठेवलेत. तरीही गर्दी जशी व्हायला पाहिजे तशी होत नाही.”

“आज बघा लोक कसे गर्दी करतील ते!” हेन्री सांत्वनपर म्हणाला.

“त्यात विशेष ते काय? नूतन वर्षासाठी म्हणून सगळीकडेच गर्दी उसळत असते. माझं काहीतरी मुळातच चुकत असलं पाहिजे. एक्स्पोझिशन चालू असतानासुद्धा इथे फारसे लोक फिरकले नाहीत. इंग्लिश अमेरिकन आले तेसुद्धा अगदी रस्ता चुकून. तेवढेच. जर अमेरिकनांनाच आपल्याकडे आकर्षून घेता येत नसेल तर धंदा तो काय होणार?”

“तुमचं काहीच चुकलेलं नाहीय. फक्त लोकांना मुलँविषयी पुरेशी महिती नाहीय म्हणून.”

निराशेने ग्रासलेला झिडलर म्हणाला, “लोकांना सगळी माहिती मी दिलीय. प्रसिद्धीवर केवढा पैसा मी खर्च केलाय ठाऊक आहे? शहरातल्या प्रत्येक टपरीवर मुलँचं पोस्टर लागलंय. सगळया भिंती, अगदी मुतारीसुद्धा, मोकळी सोडलेली नाही. या पॅरीसमध्ये फिरताना पावलोपावली मुलँ रूजची पोस्टर्स नजरेस पडतात.”

“अगदी खरंय. पण कोणी तिकडे बघत नाही.”

“जाहिरातीतल्या सगळयात महागड्या आर्टिस्टकडून करून घेतलंय.”

“अगदी मायकेल अँजेलोकडून करून घेतलंत तरी त्यात काही अर्थ नाही. ते एक छान पेंटिंग होईल, पोस्टर नव्हे.”

“काय फरक आहे पेंटिंग आणि पोस्टरमध्ये?” झिडलरने चमकून विचारले.

“तोफेच्या धडाक्यात आणि बासरीच्या मंजूळ सुरात जो फरक आहे तोच. पोस्टर कसं अगदी बघता क्षणी नजरेत भरलं पाहिजे. पहिल्या झटक्यात बघणारा जागच्या जागी उडायला हवा. त्याची उत्सुकता चाळवली गेली पाहिजे. नाही तर हे तुमचे पोस्टर पाहा. एक मुलगी घोड्यावर बसून चाललीय. चेहऱ्यावर मूर्खासारखे हसू. ही मुलगी एखाद्या सर्कशीतली वाटते. मुलँ रूजमधील कॅनकॅन नर्तिकेशी तिचा अगदी दुरान्वयानेही संबंध पोचत नाही.”

“हा संबंध कसा प्रस्थापित करता येईल?”

“अगदी सोपं आहे. तिला कॅनकॅन नृत्याच्या पोजमध्ये दाखवायची.”

“माय गॉड. मला हे यापूर्वीच कसं सुचलं नाही?”

“मुलँ रूजमध्ये रोज जे घडतं त्याची झलक, थोडीतरी झलक, पोस्टरमध्ये दिसायला हवी. कॅनकॅन नाच चालू आहे. नर्तिकेने एका हाताने आपला स्कर्ट थोडा वर उचलून धरलाय. एक पाय हवेत उडवलाय. आणि हे नृत्य दूर एखाद्या कोपऱ्यातल्या स्टेजवर होत नसून अगदी सगळया प्रेक्षकांच्या मधोमध, कोणाला कुल्ल्यावर हळूच चापटी वगैरे मारायची असेल तर शक्य होईल इतक्या जवळ चालू आहे.”

झिडलरच्या डोक्यात काय किडा वळवळतोय हे ताडून हेन्री मधेच म्हणाला, “एक मिनिट थांबा. तुम्हाला वाटत असेल की हे पोस्टर मी करावं. तर छोड दो वो बात.”

“तुमच्याशिवाय दुसरा कोणीही माझ्या नजरेसमोर येत नाही.”

“पेर कोटेलकडे जा. तो एक चांगला लिथोग्राफर आहे.”

“तुम्ही केलेली स्केचेस मी पाहिलीयत. त्याचे पोस्टर केले तर ते पेर कोटेलपेक्षा चांगले होईल.”

“हे पहा. मी यापूर्वी कधीही पोस्टर केलेलं नाहीय. लिथोग्राफीमधलं ओ का ठो मला येत नाही.”

“त्यात काय आहे? तेवढ्यापुरती कोटेल तुम्हाला मदत करेल. मला वाटतं तो तेवढ्या मोठ्या मनाचा आहे.”

“लिथोग्राफीचं काम किती किचकट असतं ते तुम्हाला ठाऊक नाहीय. त्यात प्रावीण्य मिळवायला बरीच वर्षं लागतात.”

“तुम्ही मनावर घेतलंत तर काहीच कठीण नाही.”

“पुढच्याच महिन्यात मी ब्रुसेल्सला चाललोय. मला मुळीच वेळ नाहीय.”

झिडलर पुढचा अर्धा-एक तास आपले म्हणणे हर एक प्रकारे त्याच्या गळी उतरवण्याचा प्रयत्न करीत होता. हेन्रीने त्याला टाळायची खूप शिकस्त केली. मी मुलँत पुन्हा पाऊलही ठेवणार नाही, असे निक्षून सांगूनही पाहिले. पण सरतेशेवटी झिडलरच्या चिकाटीचा विजय झाला.

हेन्रीने पोस्टर करण्याला एकदाची मान्यता दिल्याचे ऐकून साराला आनंद झाला. झिडलर गेल्यावर हेन्रीला ती लाडीकपणे म्हणाली, ‘‘हे पोस्टर लागलेलं कधी एकदा बघेन असं झालंय.’’

‘‘काय कटकट माझ्यामागे लावून दिलीस. मी जवळ जवळ त्याला फुटवलाच होता. तेवढ्यात तू कशाला मधेच लुडबुडलीस. काय तर म्हणे लॉबीतल्या माझ्या पेंटिंगचं सर्वजण कौतुक करीत असतात.’’

‘‘पण मी खरं तेच सांगितलं.’’

‘‘पण वेळ चुकली. तुम्हा बायकांना आपलं तोंड कधी बंद ठेवता येईल तर शप्पथ. तुला कल्पना आहे तू काय घोटाळा करून ठेवलायस तो? तो आता सर्वांना सांगत सुटेल मी पोस्टर करतोय म्हणून. झक मारत मला त्या पेर कोटेलला गाठला पाहिजे, लिथोग्राफी शिकायला. लिथोग्राफी शिकून मग पोस्टर करायला घ्यायचं म्हणजे कमीतकमी पाच वर्षं लागतील हे पोस्टर तयार व्हायला.’’

‘‘मला काही त्यातलं कळत नाही म्हणून विचारतेय हां. तुमच्या स्केचेसवरून पेर कोटेल छापू शकणार नाही का?’’


‘‘माझं पोस्टर लोकांना माझ्या सहीशिवाय ओळखता आलं पाहिजे. त्यासाठी मला स्वतःला लिथोग्राफी मुळातून शिकण्याशिवाय पर्याय नाही.’’

त्याने खिशातून घड्याळ काढून पाहिले व म्हणाला,“माझे मित्र येण्याची वेळ झाली आहे. मी माझ्या टेबलाकडे जातोय. कोनॅकची एक बाटली पाठवून दे. आता तुझा उपदेश खूप झाला. हे बघ नो कोनॅक नो पोस्टर.”

हेन्री काउंटरच्या कडेचा आधार घेत स्टुलावरून खाली उतरला व त्याच्यासाठी राखून ठेवलेल्या टेबलाच्या दिशेने काठी टेकत टेकत निघाला. सारा त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत होती. त्याचा पोशाख अगदी झोकदार होता. तरी त्याच्या चालण्यातील बेंगरूळपणा काही त्याने लपत नव्हता. तिला त्याची कणव आली.

“थँक्यू फॉर द हँडकरचीफ्स मस्य तुलूझ,” ती लांबूनच म्हणाली, “अँड हॅपी न्यू ईयर.” त्याने मागे वळून स्मित केले. त्याचा चेहरा कुरूप असला तरी हसरा होता. पण त्याचे बदामी डोळे गहिऱ्या दुःखात झाकोळले होते.

(ज्युल्स शेरेच्या बॉल अँट मुलँ रूज या आणि लोत्रेकच्या ला गुल्वी अँट मुलँ रूज या पोस्टरची तुलना केली तर त्याला नेमके काय म्हणायचेय ते कळून येते. लोत्रेकने शेरेच्या पोस्टरमधील बराच फाफटपसारा कमी केला आणि रचना सोपी केली, ते पोस्टर सर्कसचे न वाटता कॅबरेचे आहे असे वाटू लागले आणि त्याच वेळेला ते पोस्टर बघणाऱ्याला आपण स्वत: कॅब्रेच्या प्रेक्षकांपैकी एक आहोत असे वाटायला लावणारा आभास त्याने मोठ्या चतुराईने निर्माण केला.)




(बॉल अँट मुलँ रूज – ज्युल्स शेरे / मुलँ रूज ला, गुल्वी – तुलूझ लोत्रेक)

- ४७ -

मुलँ रूजच्या बॉलरूममधे नववर्षाच्या स्वागतासाठी जमलेल्या लोकांची गर्दी हळूहळू वाढू लागली. पाहता पाहता लॉबी व बाल्कनीसुद्धा भरून गेली. व्यवस्थापनाने वाटलेल्या पिसे खोवलेल्या कागदी टोप्या घालून पिपाणी कर्कशपणे वाजवीत लोक इकडे तिकडे फिरत होते. छतावरून सोडलेली रंगीत कागदांची भेंडोळी खाली उत्साहाने नाचत बागडणाऱ्या माणसांच्या डोक्यावर हेलकावत होती. अशा उत्सवी वातावरणात सगळयांच्या चित्तवृत्ती उल्हसित झाल्या नसत्या तरच नवल.

हेन्री आपल्या टेबलावर जाऊन बसला. शेजारच्या टेबलावरील अमेरिकन प्रवासी त्यांच्या मोडक्यातोडक्या फ्रेंचमधून वेटरला ऑर्डर देत होते. शॅम्पेनची सर्वात मोठी बाटली आणि चार फटाकड्या पोरी. *'उईऽ उईऽ ओह ला ला. व्हिवा ल फ्रान्स!'*

*'बाँज्यूर मस्य तुलूझ -'* असे म्हणत वेटरने हेन्रीच्या टेबलावर कोनॅकची बाटली आणून ठेवली. त्याने हळुवारपणे आपल्या चषकात कोनॅक ओतली व टेबलावरील मांडणीचे निरीक्षण करण्यास सुरुवात केली. एवढ्यात मॉरीस तेथे आला.

''अरे तू तर पार्टी सुरू होण्याच्या अगोदरपासूनच प्यायला सुरू केलेलं दिसतंय. म्हणजे मी जे ऐकलंय ते खरंय. तुला जरा सांभाळून...''

''प्लीज. आताच साराचं प्रवचन ऐकलंय. तू तरी मला आजची रात्र मौजमजा करू देणार आहेस की नाही?''

''ठीक आहे. तुझी मर्जी. मोठा खास बेत दिसतोय! कोण कोण येणार आहेत?''

''कलाविश्वातील काही बडी मंडळी. तुझा जर आर्ट डीलर व्हायचा हट्ट कायम असेल तर मस्य बुसादशी थोडी ओळख करून देतो. तो तुला तेओ व्हॅन गॉगच्या हाताखाली जागा देईल. तेओला एखादा मदतनीस मिळाला तर हवाच आहे.''

''तेओचं कसं चाललंय?''

''नोकरी म्हणशील तर उत्तम करतोय. बुसादच्या मर्जीतला आहे पण पगार मात्र जेमतेम. स्वतःचा व्यवसाय सुरू करायला हरकत नाही एवढा अनुभव गाठीला बांधलाय त्याने. पण संसाराच्या कटकटींनी मेटाकुटीला आलाय. आजारी मूल व त्यात भर म्हणजे बंधुराज व्हिन्सेंट. त्याच्या आर्ल्समधील प्रतापांविषयी मी तुला सांगितलं होतंच.''

''ठीक आहे. आज ओळख करून दे बुसादशी. तू ल फिगारोमध्ये सोसायटीवर आलेला लेख वाचलास का?''

एवढ्यात तिथे एक सुंदर व आकर्षक तरुणी येऊन उभी राहिली व आल्या आल्या शार्लीची चौकशी करू लागली.

"जरा दम धरशील की नाही? शार्ली येईल एवढ्यात. तोपर्यंत या माझ्या बालमित्राची ओळख करून देतो. मॉरीस ज्वॉय्यां आणि ही जर्मेन. कॉमडोरची प्रेयसी."

"प्रेयसी, तुझं डोकं ठिकाणावर आहे ना?" ती हेन्रीकडे बघत खुर्चीवर बसली. "नुसत्या ओळखीवर त्या मूर्ख व आळशी इंग्लिश माणसाबरोबर झोपायला मला काही खूळ लागलं नाहीय."

हेन्रीचे माँमार्त्रमधील जुने दोस्त गर्दीतून वाट काढत टेबलाकडे येत होते. गोझीचा चेहरा पूर्वीसारखाच पडलेला होता. उदास, गंभीर व चिंताक्रांत. आँक्तां विद्यार्थी असताना जसा होता तसाच दिसत होता. फक्त दाढी थोडी दाट झाली होती. अंगावरचा कोटसुद्धा तोच होता. फक्त जुना झाल्यामुळे आता थोडासा विरला होता एवढेच.

हेन्रीला पाहताच तो 'टू यू ऑल ग्रीटिंग्ज' म्हणून बेंबीच्या देठापासून ओरडला. डोक्यावरची जुनीपुराणी हॅट हातात घेऊन मोठ्या नाटकी आविर्भावात कमरेत वाकून त्याने कुर्निसात केला. झोकदारपणे उभे राहत त्याने व्हीनस व बॅकूस या कलेच्या देवतांना आवाहन करून त्यांचा आशीर्वाद मागितला व सर्व टीकाकारांचा तळतळाट होवो असा शाप दिला.

हेन्रीने डोळ्याने इशारा करताच सर्वांनी भराभर खुर्च्या पकडल्या. 'अहाहा शेवटी अन्न हेच जीवनातील अंतिम सत्य आहे.' दुसरा एक जण एक भला मोठा खेकडा हातात उचलून सर्वांना दाखवीत म्हणाला, 'बघा. काय लाइन आहे. हे प्लेन हा कर्व्ह आणि डोळयांत घनगंभीर दुःखी भाव. काय अप्रतिम इचिंग करता येईल याचं. रेम्ब्रांद आणि ड्यूरेर झक मारतील. पण काय करणार? आता मला एवढी भूक लागलीय की मी हा ताबडतोब स्वाहा करणार आहे. चित्र काढण्याइतका धीर धरणं मला जमणार नाही. पोट आणि हृदय यांच्या संघर्षात नेहमी पोटाचाच विजय होतो.'

सर्व मंडळी जमा झाली. हेन्री मॉरीसची सर्वांशी आवर्जून ओळख करून देत होता. पुरुष नर्मविनोद करत होते व स्त्रिया त्याला हलकेच हसून दाद देत होत्या. व्हिंटेज वाईन व त्याची चव खुलवणारे खाद्यपदार्थ यांच्या साथीने चाललेल्या दिलखुलास गप्पांनी पार्टीत रंग भरू लागला.

‘लोत्रेक, ते ब्रुसेल्सचं आमंत्रण कसं काय मिळवलंस बाबा? मी एवढा प्रयत्न करीत होतो तरी मला नाही ते बोलावलं.’

‘माझ्या नव्या नाटकाच्या दुसऱ्या अंकातील एका प्रवेशात चोवीस हत्ती स्टेजवर येणार आहेत.’

‘त्या हत्तींचे संवाद लिहून झाले असतील तर एकदा त्याचं वाचन कर.’

‘लग्नसंस्था ही मुळातच अनैसर्गिक आहे. त्यामुळे लग्न करून एकत्र राहणे हे साहजिकच अनैतिक ठरतं. त्यामुळे समाजाची नीतिमत्ता उंचवायची असेल तर लग्नसंस्थेवर कायद्याने बंदी घातली पाहिजे.’

‘रेन्वाचा नवा शो तू पाहिलास काय?’

‘रूबेन्सनंतर स्त्रियांची पेंटिंग करावीत ती रेन्वानेच.’

‘कंबर आणि मोठ्ठे ढुंगण यापलीकडे काय असतं त्याच्या पेंटिंगमध्ये?’

‘लोत्रेक, तुम्हाला कळलं का? सुरा...’

‘माझ्या पुढच्या पेंटिंगमध्ये एक प्रयोग म्हणून मी व्हेरोनीज व सेझान यांच्या शैलीचा मिलाफ करणार आहे.’

सगळयांच्या तोंडाची टकळी चालू होती. बाजूच्या टेबलावरून मधेच हास्याची कारंजी उडत होती तर मधेच आरडाओरडा. त्यात भर पिपाण्यांच्या कर्णकटू आवाजाची. पुढ्यातील चवदार खाद्य, उंची मद्य व स्त्रियांची उपस्थिती यामुळे पुरुष

मंडळी रंगात योऊन मोठ्या तावातावाने गप्पा मारीत होती. अपयशाची दारुण जाणीव त्यांना विसरायची होती. त्यामुळे ते सर्वजण लंब्याचौड्या बाता मारत होते. त्यात सत्य परिस्थितीपासून दूर पळण्याची केविलवाणी धडपड दिसून येत होती. मधेच एक घास तोंडात टाका, पेला उंचावून ओठाला लावा, नाचण्यासाठी म्हणून अचानक उठा, नाचणे थांबवून धापा टाकीत चालू असलेल्या वादात कुठलाही मुद्दा धरून सामील व्हा, मधेच मित्राबरोबर आलेल्या मुलीला डोळा मारा, जमले तर टेबलाखालून पायाला पाय लागतो का ते चाचपून बघा.

त्या पार्टीला आलेल्या स्त्रिया म्हणजे मोंमार्त्रमधील स्त्रियांचा प्रातिनिधिक नमुना म्हणता आल्या असत्या. अंगावर साधे घरी शिवलेले कपडे. प्रत्येकीने आयुष्यात यशस्वी होण्यासाठी काही ना काही तरी धडपड करून पाहिलेली होती. मॉडेल, नर्तिका, गायिका, फॅशन डिझाइनर असे बरेच काही करून पाहिले होते पण कोणाच्याही हाती फारसे काही लागले नव्हते.

बहुतेक जणांनी वयाची तिशी ओलांडल्यावर तारुण्यातील स्वप्नांना तिलांजली दिली होती आणि जे काही आपल्या वाट्याला आलेय ते निमूटपणे स्वीकारले होते. रात्रीच्या उत्सवी वातावरणात आणि आसपासच्या कोलाहलात त्यांच्या जाणिवा बोथट झाल्या होत्या. जाळणारी दुःखे, खंत विसरून एक रात्र कशीतरी मजा मारायची. शॅम्पेनने डोळे धुंद झाले होते. हॉलमध्ये लाज गुंडाळून चाललेल्या प्रणय चेष्टितांमुळे कामभावना उद्दिपित झाल्या होत्या. पुरुषांच्या शारीरिक चाळयांना लटका विरोध दाखवीत स्त्रिया खिदळत होत्या.

मध्यरात्र जसजशी जवळ येऊ लागली तसतसा हा गदारोळ शिगेला पोचला. स्त्री-पुरुष युगुले एकमेकांच्या मिठीत विसावलेली, ओठ एकमेकांवर टेकवलेले, मिटल्या डोळयांमागे दडलेली अनामिक भीती, सिगरटेचा धूर व उपस्थितांच्या श्वासाने जड झालेली हवा. नववर्षाचे स्वागत करायचे ते असेच. आईच्याबरोबर शेकोटीवर हात शेकत बसण्यापेक्षा हे चालले आहे ते कित्येक पटीने उत्तम. हेन्रीने कोनॅकचा आणखी एक पेला संपविला. नशेची उब पांघरुणासारखी त्याच्या अंगावर पसरली.

तेवढ्यात मद्याने धुंद झालेला शार्लो झोकांड्या खात बरोबर एका तरुणाला घेऊन आला व म्हणाला, "हाय हेन्री. याला ओळखता का? हे माझे मित्र ऑस्कर वाइल्ड. प्रसिद्ध लेखक. आणखी बरंच काही सांगता येईल यांच्याबद्दल. आताच लंडनवरून थेट इथे आले आहेत."

शार्लो अधिक काही बोलण्याच्या शुद्धीत नव्हता. हेन्रीने लंडनहून आलेल्या पाहुण्याला अगत्याने आपल्या शेजारची एक खुर्ची दिली.

"अहाहा! सुसंस्कृत म्हणता येईल असं जगातील एकमेव शहर म्हणजे पॅरीस. दोनच दिवस झाले मला येऊन. पण कसं अगदी मोकळं वाटतंय. नाहीतर आमच्या लंडनला बघा. घरी सारखी बायका-मुलांची कटकट, बाहेर जावं तर उद्योगधंद्याशिवाय दुसरा विषय कानावर पडेल तर शप्पथ." ऑस्कर वाइल्डने सिगरेटच्या धुराने भरलेल्या हवेत एक दीर्घ श्वास घेतला व म्हणाला, "अहा! येथे जरा मोकळा श्वास तरी घेता येतोय. थोडी शॅम्पेन घेऊ या का? डोक्यातल्या विचारचक्राला एकदाची चालना मिळेल."

हेन्री ऑस्कर वाइल्डच्या सिगरेटच्या धुराच्या वलयांमागे लपलेल्या चेहऱ्याचे चित्रकाराच्या नजरेतून निरीक्षण करीत होता. त्याच्या सरळ साध्या चेहरेपट्टीवर त्याच्या अंतर्मनात चाललेला संघर्ष दिसत होता. मोठ्या डोळयांमध्ये एक प्रकारचा अपराधी भाव डोकावत होता. ओठ एखाद्या स्त्रीसारखे नाजूक. पण भुवया मात्र ठाशीव. खानदानी व्यक्तिमत्वाची झाक दाखविणाऱ्या.

हेन्रीच्या मनात ऑस्कर वाइल्डशी थोड्या गप्पा माराव्यात असे होते पण तो त्याच्या इतर मित्रांच्या संभाषणात खेचला गेला. सर्व चित्रकार मित्र मिळून आर्ट डिलरना शिव्या घालीत होते. नंतर नाटककारांनी निर्मात्यांवर मोर्चा वळवला व लेखकांनी प्रकाशकांवर. कोणालाच कलेशी काही देणे-घेणे नव्हते. स्वतःचा खिसा भरल्याशी कारण. कलाकारांना दोन दमड्या देताना त्यांचा हात आखडतो. हेन्री कोनॅक पीत शांतपणे ऐकत होता.

आयुष्य प्रत्येकाच्या वाट्याला एकदाच येते. त्यातील क्षणन्क्षण उपभोगता आला पाहिजे. त्यात आज तर नववर्षाची रात्र साजरी करायला लोकांची गर्दी जमली होती. गप्पागोष्टी, चेष्टामस्करी यांना ऊत आला होता. सर्व जण हसत-खिदळत होते. संगीताच्या तालावर नृत्य रंगात आले होते. एकच जल्लोष चालू होता. अचानक संगीताची धून थांबली. नाचणारी पावले थबकली. गप्पागोष्टी अर्ध्याच राहिल्या. ऑर्केस्ट्राच्या कंडक्टरने हातातला बॅटन उंचावून मोठ्या आवाजात जाहीर केले, 'आता या वेळी बरोबर बारा वाजले आहेत. हॅपी न्यू इयर टू ऑल. व्हिवे ला नुव्हेल ॲनी.' अशी घोषणा करून तो एक गिरकी घेऊन मागे वळला. सर्व वाद्यांचा झंकार एका क्षणात चालू झाला.

हेन्रीने शेजारच्या माणसाकडून कागदी टोपी मागून घेतली व डोक्यावर घातली. तोंडाचा चंबू करून बेंबीच्या देठापासून जोर करीत पिपाणी फुंकली. १८९० या नव्या वर्षाच्या आगमनाने हेन्रीच्या आयुष्यात एक नवा अध्याय चालू होणार होता...मारी शार्लेत.

(नववर्षाच्या पार्टीत आलेल्या जवळपास प्रत्येकाचे पोर्ट्रेट लोत्रेकने केले आहे. यातील ऑस्कर वाइल्डचे पोर्ट्रेट प्रसिद्ध आहे. इंग्लंडमध्ये ऑस्कर वाईल्डच्या तथाकथित समलिंगी संबंधांवर आरोप झाले आणि त्याला तुरूंगवासही भोगावा लागला. त्यामुळे झालेल्या बदनामीमुळे त्याला समाजात तोंड दाखवायला जागा उरली नव्हती. त्यातून सुटका मिळण्यासाठी तो पॅरीसला आला असता लोत्रेकने त्याचे एक पोर्ट्रेट केले. ते पोर्ट्रेट केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ऑस्कर वाईल्डला नैराश्याचा झटका आला आणि त्यातून तो कधीच बाहेर येऊ शकला नाही. या पोर्ट्रेटचा नंतर बरीच वर्ष कोणालाही थांगपत्ता नव्हता. जवळ जवळ अर्ध्या शतकानंतर ऑस्कर वाईल्डच्या शताब्दी वर्षात कोणीतरी ते ब्रिटीश लायब्ररीला निनावी पाठवून दिले.)



(पोर्ट्रेट ऑफ ऑस्कर वाईल्ड – तुलूझ लोत्रेक – जलरंग)

## मारी शार्लेत

हेन्री ब्रुसेल्सहून परत आल्यावर लगेच देगासने त्याला घरी जेवायला बोलाविले. हेन्री गेला तेव्हा देगास शर्टाच्या बाह्या वर सरकावून खाद्यपदार्थ टेबलावर मांडत होता. हेन्रीला पाहून त्याने विचारले, ‘‘ब्रुसेल्स कसं काय वाटलं? मुख्य म्हणजे तुझा शो कसा काय झाला?’’

‘‘शो तसा लोकांना आवडला असं दिसत होतं. पण समीक्षक मात्र...’’ देगास मोठ्याने हसताना पाहून हेन्री मधेच थांबला.

‘‘हे समीक्षक. तुला माहितेय,’’ देगास तेथे बसलेल्या कमिल पिस्सारोकडे पाहून म्हणाला, ‘‘इकडे बघ जरा. हा किती निराश झालेला दिसतोय बघ.’’ परत हेन्रीकडे पाहत तो पुढे म्हणाला, ‘‘समीक्षकांना तुझी पेंटिंग आवडली नाहीत ना? म्हणजे तू एक मोठा चित्रकार असल्याचं हे एक लक्षण आहे. या पिस्सारोला विचार दहा वर्षांपूर्वी ही मंडळी माझ्या चित्रांबद्दल काय लिहीत होते ते. आणि आज हीच मंडळी मला एक महत्वाचा चित्रकार म्हणून सलाम करतात.’’

त्या दिवशी देगास अगदी खुशीत येऊन गप्पा मारीत होता. अधूनमधून मित्रांना जमवून अशा बैठकी करणे हा त्याच्या एकाकी आयुष्यातील एक विरंगुळा होता. तो दिवस सगळयांना शिव्या घालण्याचा होता. समीक्षकांपासून झालेली सुरुवात आर्ट डिलर, अकादमीवर वर्षानुवर्षे जागा अडवून बसलेले ढुढ्ढाचार्य, कलेचे आश्रयदाते असे करता करता शेवटी गाडी त्याच्या म्हाताऱ्या स्वयंपाकिणीवर येऊन घसरली.

‘‘स्वयंपाकातल्या काही खुब्या अशा आहेत की त्या मूर्ख नोकरांवर सोपवून चालत नाहीत.’’ देगासने अतिशय काटेकोरपणे तोलून-मापून व्हिनेगर, मिरपूड व मीठ यांचे मिश्रण तयार केले. ‘‘आता यात ऑलिव्हचं तेल किती घालायचं रे? कॅमिल, तुला सॅलडमध्ये तेल भरपूर घातलेलं आवडतं की थोडंसंच?’’ त्याने मोठ्या गांभीर्याने विचारले.

"च्यायला. या भुक्कड गोष्टीला किती महत्त्व देतोयस? घाल तुला हवं तेवढं." पिस्सारो म्हणाला.

"बघ हेन्री -" देगास उसळून म्हणाला, "तुझे हे इम्प्रेशनिस्ट, सॅलडच्या चवीतील सीझनिंगचे महत्त्व हा एक विचार करण्यासारखा विषय आहे हे यांना कधी पटणारच नाही. सॅलड ते काय. कसंही करता येतं. थोडं तेल, लसूण, मिरपूड, व्हिनेगर, मीठ. जे हाताला लागेल ते टाका आणि ढवळा की झालं तयार. सगळे इम्प्रेशनिस्ट असेच आहेत. ड्रॉइंग, ॲनाटॉमी. कोणी सांगितलीय एवढी तसदी घ्यायला? प्रायमरच्या पेस्टचा मोठा लपका कॅनव्हासवर फासा, त्यात थोडे गुलाबी, निळे अशा रंगांचे फराटे मारा. की झालं तुमचं पेंटिंग तयार! सनराईज - ॲन इम्प्रेशन. वा!"

"हे बघ देगास, असा चिडून तुझा इम्प्रेशनिस्टांवरचा राग त्या लेट्यूसवर काढू नकोस." पिस्सारो शांतपणे म्हणाला.

"हे बघ. मी जरी इम्प्रेशनिस्टांवर चिडलो असलो तरी तो राग आजच्या मेजवानीवर काढणार नाही. आज जेवण खरंखुरं अस्सल आणि पोटभर असणार आहे. नुसतं जेवणाचं इम्प्रेशन नव्हे." नंतर देगास हेन्रीकडे वळून म्हणाला, "हा आमचा नेहमीचा वादाचा विषय. जाऊ दे. आता मला तुझ्या ब्रुसेल्सची हकिगत सांग. अर्थात तिथल्या लोकांनी तुला चर्चमधील प्रसिद्ध पेंटिंग दाखवली असतीलच. पण मी सांगितल्याप्रमाणे तू म्युझियममध्ये जाऊन व्हॅन डाइक पाहिलास का. तरुण माणसा, परिपूर्णता म्हणजे कशाला म्हणतात ते त्याची पेंटिंग्ज बघितल्याशिवाय कळणार नाही. काय ते हात. काय ती ड्रेपरी. त्याच्यापेक्षा जास्त परिपूर्ण काम करायचं तर फक्त देवालाच जमू शकेल. अरे तिकडे ब्रुसेल्समध्ये तू कोणाशी तरी द्वंद्वयुद्ध केलंस म्हणे. मी ऐकलंय ते खरंय का?"

हेन्रीला हा प्रश्न अपेक्षित होता. त्या द्वंद्वाची वार्ता एव्हाना साऱ्या मोंमार्त्रमध्ये पसरली होती. "तसं प्रत्यक्षात काही झालं नाही. मी फक्त आव्हान दिलं होतं एवढंच."

हेन्री ओशाळत म्हणाला. ''द ग्रूने व्हिन्सेंटविषयी जे वत्तव्य केलं ते मला सहन झालं नाही.''

मग त्याने तो प्रसंग वर्णन करून सांगितला. सोसायटीने शेवटच्या दिवशी एक मेजवानी ठेवली होती. एका मोठ्या टेबलावर सर्व आमंत्रित शांतपणे समोरच्या नानाविध खाद्यपदार्थांचा आस्वाद घेत होते. लोकांच्या कुजबुजण्याचा आवाज काट्या-चमच्यांच्या आवाजात मिसळून गेला होता. आणि एवढ्यात त्याचे लक्ष द ग्रूकडे गेले. त्याचा पेहेराव मोठा उंची व दिमाखदार होता. तो म्हणत होता की ''व्हिन्सेंट व्हॅन गॉगला प्रदर्शनात भाग घ्यायला बोलवायला नको होते. का तर तो वेडसर आहे. त्याने आपला कान कापून घेतल्यानंतर खरे तर त्याची रवानगी वेड्यांच्या इस्पितळातच करायला हवी होती. अशा इसमाला इथे बोलावून काय साधले?''

हेन्रीने स्वतःवर ताबा ठेवण्याचा खूप प्रयत्न केला. पण त्याच्या संयमाचे बंध तुटले आणि तो आपली मूठ टेबलावर जोरात आदळत ओरडला, ''मस्य द ग्रू!'' एवढ्या जोरात की टेबलावरचे काटे-चमचे थरथरले. हातातल्या शॅम्पेनच्या बाटल्या हवेत वर धरल्या आहेत अशा स्थितीत वेटर क्षणभर गोठल्यासारखे जागच्या जागी उभे राहिले.

''ज्या माणसाला स्वतःचा बचाव करता येणार नाही, अशा माणसावर टीका करणे हा भेकडपणा झाला. तू हे जे बोलतोयस तेसुद्धा त्याच्या पाठीमागे. सर्व महान माणसांना तुझ्यासारख्या मूर्खांनी कधी ना कधी तरी वेड्यात काढलं आहे. आता व्हिन्सेंट इथे हजर असता तर त्याने तुझं थोबाड फोडलं असतं किंवा त्याने तुला माफही केलं असतं. पण त्याच्या अनुपस्थितीत मी काही तुला सोडणार नाही. खरं म्हणजे तुझ्याशी तलवारीनेच दोन हात केले पाहिजेत. म्हणजे तुझे दोन्ही कान उडवता आले असते. पण त्यापेक्षा मला पिस्तूल चालवायला आवडेल.''

''आणि या द्वंद्वात मस्य तुलूझना जर काही बरं-वाईट झालं तर तलवारीचे दोन हात माझ्याशी करावे लागतील हे लक्षात ठेवा.'' जॉर्ज सुरा उसळून म्हणाला.

नंतर उडालेल्या गोंधळात क्लबच्या प्रेसिडेंटनी द ग्रूची समजूत घातली व त्याला बाहेर काढले. सोसायटीतर्फे दिलगिरी व्यक्त करून मेजवानी आटोपती घेतली.

"वंडरफुल. पूर्वी अशीच धमाल ऑलिंपिया या पेंटिंगवरून उडाली होती. त्या वेळी पेंटिंग व पेंटरशी काहीही संबंध नसलेले लोक कसे हमरीतुमरीवर यायचे व एकमेकांना द्वंद्वाचे आव्हान द्यायचे तुला आठवतय ना? बाय द वे, तुला त्या पोर्ट्रेटसाठी पोज देणारी ती मॉडेल आठवतेय कॅमिल?"

"व्हित्तोरीना. काय चिकनी होती ती. एव्हाना आजीबाई झाली असेल नाही?"

"तिच्या वक्षस्थळांइतकी सुंदर वक्षस्थळे मी अजून पाहिली नाहीत. चित्रकाराला हवी असलेली पोज व मुद्रेवरचे भाव किती चटकन द्यायची ती."

- ४९ -

जेवण जसे होत आले तशा गप्पाही कमी होत गेल्या. मित्रांना निरोप द्यायला म्हणून देगास त्यांच्याबरोबर बाहेर पडला. जानेवारी महिन्यातील थंडीने कुडकुडणारी रात्र होती. पण मैत्रीच्या उबेपुढे थंडीचे ते काय! पिस्सारोला निरोप देऊन झाल्यावर ते दोघे दिहोच्या घराच्या दिशेने गेले. त्याच्या घराच्या जिन्यातच पियानोची सुरावट त्यांना ऐकू आली. दिहोने दरवाजा उघडताच त्यांना पाहून त्याला आनंदाचा सुखद धक्का बसला. आत दिहोची बहीण क्लेमाँतीन पियानोवर बसली होती. त्या भावंडांनी त्या दोघांचे मनःपूर्वक स्वागत केले.

"थोडी कॉफी घेऊ या. संगीताचा आस्वाद घेताना कॉफी किंवा बीअर बरोबर असेल तर मजा काही औरच. वॅग्नर ऑपेराची तालीम चालू असताना एक पिंपभर बीअर संपवीत असे. आम्ही त्याच्याबरोबर शंभरएक तरी तालमी केल्या असतील. प्रीमियरच्या वेळी अंडी मिळाली ती गोष्ट वेगळी." एक डोळा मिचकावीत दिहो तिथे उपस्थित असलेल्यांना म्हणाला.

क्लेमाँतीन कॉफी घेऊन आली. कॉफी पिता पिता दिहो म्हणाला, ‘‘आता त्याची आणखी वाट पाहण्यात अर्थ नाही. तो एक तर विसरला असावा किंवा पत्ता सापडला नसेल.’’

क्लेमाँतीन पियानो स्टुलावर जाऊन बसली व म्हणाली, ‘‘मोझार्टच्या सोनाटापासून सुरुवात करते.’’

तेवढ्यात दरवाजा खटखटवण्याचा आवाज आला. एक पांढऱ्या केसांचा इसम दरवाजात उभा होता. ‘‘सॉरी. तुझ्याकडून लिहून घेतलेल्या पत्त्याचा काही उपयोग झाला नाही. कारण तो कागदच हरवला. शेवटी आठवणीला ताण देत कसाबसा येऊन पोचलो. अडुसष्टाव्या वर्षीसुद्धा स्मरणशक्ती थोडी फार शिल्लक आहे म्हणायची.’’

त्याचा हात धरून क्लेमाँतीनने त्याला सर्वांसमोर आणले व म्हणाली, ‘‘कदाचित सगळ्यांची प्रत्यक्ष ओळख नसली तरी यांचे नाव आपल्या सर्वांच्या परिचयाचे आहे. मस्य सेझार फ्रँक.’’

सेझार फ्रँकच्या उपस्थितीतील ती मैफल रात्री खूप उशिरापर्यंत चालली. क्लेमाँतीनच्या आग्रहावरून त्याने पियानोवर एक सुरावट वाजवायला घेतली. योगायोग असा की ती सुरावट होती डेनिसने त्या संध्याकाळी वाजवलेली प्रील्यूड. ती सुरू होताच हेन्री दचकला. हेन्री ज्या घटनेच्या क्लेशकारक स्मृती विसरला होता त्या पुन्हा चाळवल्या गेल्या. आपले शारीरिक व्यंग व कुरूप चेहरा यामुळे कोणत्याही मुलीच्या प्रेमाला आपण कधीही पात्र ठरू शकणार नाही ही जाणीव उफाळून वर आली. मनक्षोभाने अस्वस्थ झाल्याने त्याने ऐन रंगात आलेल्या मैफलीतून काढता पाय घेतला. तो निघाला तेव्हा रात्रीचे तीन वाजले होते. एवढ्या कडाक्याच्या थंडीत रस्त्यावर कोणीही नव्हते. एखादी बग्गी मिळेल या आशेत त्याने लॉजच्या दिशेने पाय ओढत चालायला सुरुवात केली. वाटेत एक बिस्ट्रो उघडा दिसलेला पाहून हेन्री आत शिरला. मनक्षोभामुळे आलेले औदासीन्य व शारीरिक थकवा यांनी तो पार गळून गेला होता. खुर्चीत बसून त्याने थोडा दम घेतला. आतील वातावरण थोडे उबदार होते. त्याने खिडकीतून बाहेर पाहिले. खिडकीच्या तावदानात त्याला स्वतःचेच

प्रतिबिंब दिसले. पलीकडे मिणमिणत्या प्रकाशातील निर्मनुष्य रस्ता. काही क्षण तो स्वतःची ओळख विसरला, स्थळकाळाचे संदर्भ हरवले.

थोड्या वेळाने त्याचे लक्ष दुसऱ्या कोपऱ्यातल्या एका टेबलाकडे गेले. त्या टेबलावर एक तरुण मुलगी शरीराचे मुटकुळे करून निवांत झोपली होती. समोर एक वाईनची रिकामी बाटली, कपडे अस्ताव्यस्त, हॅट जमिनीवर पडलेली. तिचा श्वासोच्छ्वास एखाद्या लहान मुलासारखा संथ लयीत चालू होता. तेवढ्यात बिस्ट्रोचा मालक त्या मुलीजवळ आला. त्याने तिचे बखोट पकडून तिला गदागदा हलवून उभे केले. "ए कुत्तरडे, आपल्या बापाचं घर समजलीस काय टेबलावर झोपायला? चल उठ आणि चालायला लाग. नाहीतर गांडीवर लाथ मारून घालवून देईन." त्याने उलट्या हाताने तिला एक थप्पड मारली. "साली रांड कुठली. आज कोण ठोक्या भेटला नाही वाटतं."

हा प्रसंग इतक्या थंडपणे घडला की त्यातील क्रौर्य हेन्रीच्या लक्षात यायला थोडा वेळ लागला. 'बास्टर्ड. सन ऑफ अ बीच.' त्याने जिभेवर आलेल्या शिव्या मुकाट्याने आतल्या आत गिळल्या. त्याला वाटले की तो उंच व तगडा असता तर त्या जनावराला तिथल्या तिथे धडा शिकवता आला असता. पण त्याला आलेला राग एका विलक्षण ऊर्मीच्या उन्मेषाने निवाल्यासारखा झाला. तो त्या दुर्दैवी मुलीचे टक लावून निरीक्षण करीत होता. तिने पाय खुर्चीवर ओढून घेतले. पाय जास्तच मुडपून घेतल्याने गुडघे जवळपास गालाला टेकले होते. एवढी थप्पड खाऊनही तिच्या डोळयांवरची धुंद झापड उडाली नव्हती. तिच्या भावशून्य नजरेचा रोख समोरच्या रिकाम्या बाटलीकडे होता. तिचा चेहऱ्यावरून तिला दारूचे व्यसन असावे असा संशय येत होता. त्या क्षणी तिच्या रूपाने माणसाची दैन्यावस्थाच समोर बसली आहे असे वाटत होते.


त्याने खिशातून एक पेन्सिल व एक कागद बाहेर काढला व टेबलावर पसरला. फक्त एक मिनिटभर तरी अशी स्थिर रहा. तो पुटपुटला. त्याची पेन्सिल विलक्षण झपाट्याने कागदावर झरझर फिरू लागली. काही क्षणात चित्राने आकार घेतला. माणूसपण हरवलेला चेहरा, चुरगळलेले कपडे, विखुरलेले केस, समोरच्या बाटलीवर

खिळलेले बिलोरी डोळे व शून्यात हरवलेली नजर... मुर्तीमंत दुःखाचे दर्शन घडविणारे हे दृश्य नजरेसमोरून जाण्यापूर्वी समोरच्या कागदावर उतरवता येतील तेवढे तपशील त्याने उतरवून घेतले आणि राहिलेले सर्व तपशील आपल्या स्मृतिपटलावर नोंदवून ठेवले. तिच्या शरीराची थोडी हालचाल झाली. पापण्या जड होऊन मिटल्या गेल्या व बदकन आवाज करून तिच्या देहाचे गाठोडे टेबलावर पडले व ती गाढ झोपी गेली.

(या स्केचच्या आधारे लोत्रेकने केलेले गल-द-ब्वा या नावाचे पेंटिंग प्रसिद्ध आहे.)

हेन्रीने बिस्ट्रोच्या मालकाला तिला सकाळपर्यंत काही त्रास न देण्यास सांगितले व तिच्यासाठी कांद्याचे सूप, पाव व वाईनची बाटली मागवली. वाईन आणि पाव तिच्यासमोर ठेवलेला त्याने पाहिला व तो तिथून निघाला. बाहेर थंडी होती. त्याने आपल्या कोटाची कॉलर वर ओढून घेतली. वर आकाशात वादळी ढगात गुरफुटून गेलेला हिवाळयातला निस्तेज चंद्र होता. एखादी बग्गी, घोडागाडी दिसते का म्हणून त्याने मोठ्या आशेने गल्लीच्या दुसऱ्या टोकाकडे पाहिले. दिवसा नेहमी गजबजलेला असणारा तो रस्ता उत्तररात्री दिव्यांच्या अंधूक प्रकाशात भकास वाटत होता. थोडे भराभर चालले तर अर्ध्या तासात मादाम ल्युबेतच्या लॉजवर पोहोचून मऊ उबदार बिछान्यात शिरता येईल या कल्पनेने तो सुखावला व त्याने चालण्याची गती थोडी वाढवली.

(पॅरीसमधील भटकंतीत लोत्रेक नेहमी आपले स्केचबुक आपल्या बरोबर ठेवत असे. रस्ते, नाईट क्लब, बाजार, वेश्यागृह, सर्कस, नाट्यगृह ठिकाण कोणतेही असो, थंडी, वारा पाऊस, दिवस, रात्र लोत्रेक केव्हाही स्केच करताना दिसे. या स्केचीस वरून त्याने पेंटींग केली आहेत. ग्राफिक कलेला आवश्यक असलेल्या जोरकस रेषेची त्याला उपजत देणगी होती. अशाच एका झटपट केलेल्या स्केचवरून स्टुडियेत गेल्यावर सुझान व्हेलदाँ या चित्रकार मैत्रीणीला घेऊन त्याने त्या स्केचच्या आधारे एक पेंटींग केले. चारकोल आणि पेन्सिल या माध्यमातून येणारा परिणाम त्याने ब्रशचा पेन्सिलसारखा वापर करून साधला आहे. ब्रशच्या अर्धचंद्राकृती फटकाऱ्यातून त्याने चित्रप्रसंगातील उस्फुर्ततेला धक्का न लावता त्यातील निष्ठूरतेला उठाव दिला आहे.)



(गल-द-ब्वा – द हँगओव्हर – पोर्ट्रेट ऑफ सुझान व्हेलदाँ – तैलरंग आणि
शाई, कॅनव्हास – ४५x५३ सेमी – १८८८
फॉग आर्ट म्युझियम, मॅसॅच्युसेटस.)

- ५० -

मुलँ रूजवरील पवनचक्राची पाती फिरण्याची थांबली होती. दिव्यांचा लखलखाट विझल्यामुळे काळोखात बुडालेली मुलँ रूजची वास्तू एखाद्या पुरातन चर्चसारखी वाटत होती. निर्मनुष्य बुलेव्हारवरून चालताना त्याला मागून दबक्या पावलांचा आवाज ऐकू आला. एक मुलगी त्याच्या जवळ येऊन त्याला अगदी लगटून चालू लागली व हळूच म्हणाली, ‘‘मस्य प्लीज. कोणी विचारलं तर मी तुमच्याबरोबरच आहे असं सांगा.’’

पाठून जड बुटांच्या पावलांचा आवाज ऐकू आला. एक दांडगट इसम पुढे आला व त्याने त्या मुलीचे मनगट पकडले.

‘‘तुझं कार्ड दाखव.’’ तो दरडावणीच्या सुरात म्हणाला. तिने त्याच्या हाताच्या पकडीतून आपला हात सोडवण्याची धडपड केली. त्या इसमाने तिच्या हातावरील पकड घट्ट करीत तिला एक शिवी हासडली व तिचा हात पिरगळला. ती ओणवी होत वेदनेने विव्हळली. ‘‘आता बऱ्या बोलाने चलतेस की तुला फरफटत घेऊन जाऊ?’’

‘‘सोडा पाहू तिचा हात. दिसत नाही किती कळवळतेय ती.’’ हेन्री म्हणाला.

‘‘पाच मिनिटांपूर्वीच तुमची ओळख झाली, नि लागलात बाजू घ्यायला?’’

‘‘मस्य. काल संध्याकाळी मित्राच्या घरी पार्टीत ती मला भेटली तेव्हापासून आम्ही दोघं बरोबर आहोत.’’ हेन्री नकळत खोटे बोलून गेला.

‘‘उगाच बतावणी करू नका. मी आताच तिला माझ्या डोळयांनी तुमच्या मागे येताना पाहिलंय.’’ तो मधेच थांबला आणि थोड्या नरमाईने म्हणाला, ‘‘ओह! तुम्ही मस्य तुलूझ ना? सॉरी मी तुम्हाला पहिल्यांदा ओळखलं नाही.’’

‘‘नशीब ओळखलंत ते. आता सोडा तिला. नाही तर मला पोलिसांना बोलवावे लागेल.’’

“ठीक आहे. तुम्हाला लांब जायला नको. मीच पोलीस आहे.”

“पोलीस? युनिफॉर्म नाही घातला तो?”

“मी सार्जंट बार्ताझार पाटू.” तो खिशातून आपले ओळखपत्र बाहेर काढून दाखवीत म्हणाला.

“ओह! तुमची बरीच तारीफ मी ल एलीसमध्ये ऐकलीय. या विभागातील सर्वात कर्तव्यदक्ष ऑफिसर म्हणून. पण या मुलीच्या बाबतीत मात्र तुमची काहीतरी गफलत होतेय.”

“एका मुलीला त्या गल्लीतून या रस्त्यावर येताना मी नक्की पाहिलंय.”

“ती दुसरी कोणीतरी असेल. तुम्ही तिचा चेहरा नीट पाहिलाय का?”

“कसा पाहणार? गल्लीत रस्त्याला दिवे नाहीयेत.”

“तुम्ही म्हणताय ती मुलगी त्या मागच्या बोळात गेली असणार. कारण मी तिकडे कोणाला तरी पळत जाताना पाहिलं.”

“मलासुद्धा कोणतरी तिकडे पळताना दिसलं खरं.” इतका वेळ गप्प असलेली ती मुलगी मनगट चोळत म्हणाली.

पाटू गोंधळात पडला. तो थोडा विचार करून म्हणाला, “सॉरी. मी तुम्हाला उगाच त्रास दिला.” त्याने मोठ्या अदबीने हेन्रीचा निरोप घेतला.

आपण ही थाप कशाला मारली या विचाराच्या तंद्रीत हेन्री चालत होता. ती शेलाट्या बांध्याची उंच तरुणी लांब पावले टाकीत चालत होती. त्याला तिच्या चालीने चालताना सारखी धाप लागत होती. तो मधेच थांबलेला पाहून मागे वळून ती म्हणाली, “एवढ्या धापा का टाकताय. असं पाय फरफटत चालायला काय धाड भरलीय तुम्हाला?” तिने चिडून विचारले. “जरा भराभर पाय उचला की.”

तिच्या या उद्‌गारांनी त्याला अगदी चीड आली. "हे बघ. तुला दिसत नाहीय का. मला शक्य होईल तेवढ्या जोरात मी चालतोय ते. "

ती थोडा वेळ गप्प राहिली. तिने विचारले, "जन्मापासून तुमचे पाय असेच आहेत की नंतर काहीतरी झालं. माझ्या माहितीत एक माणूस होता. मशिनीत सापडून त्याचा हात तुटला. मोठ्या नशिबाचा तो. पाचशे फ्रँक मिळाले त्याला विमा कंपनीकडून." तिच्या कोरड्या आवाजात ना सहानूभूती होती, ना हेटाळणी, ना साधे कुतूहल.

"तुला जर माझ्या चालीने यायचं नसेल तर तू पुढे का जात नाहीस? तो आता लांब गेलाय. तो काही आता परत तुला पकडायला येणार नाही."

"तो परत आला तर त्याचे दात पाडायला मी कमी करणार नाही. त्याच्या तोंडात शेण घालीन. हलकट कुठला." तिच्या आवाजात खुन्नस होती.

"आता कशाला शिव्या देतेस त्याला? त्याने तुला सोडलं ना."

"कुत्र्याची जात ती. येऊ दे तर भडव्याला. आंडावर लाथ मारीन त्याच्या." सावजाला शिकाऱ्याबद्दल वाटणारा युगानयुगाचा तिरस्कार तिच्या बोलण्यातून दिसत होता.

"तुम्ही त्याला चांगला मामा बनवलात. पोलिसाला थापा मारणं लय कठीण असतं. चांगले हुशार दिसताय." तिच्या आवाजात तोच भावनाशून्य कोरडेपणा कायम होता. ती त्याचे आभार मानत नव्हती की त्याला दुवा देत नव्हती.

हिवाळ्यातील ती लांबलचक रात्र संपता संपत नव्हती. उजाडायला अजून खूप अवकाश होता. ते दोघे चालत चालत रू कुलँकूरपर्यंत आले. तो एका दिव्याच्या खांबापाशी थांबला व त्याने एका हॉटेलकडे बोट दाखविले. "हे हॉटेल रात्रभर उघडं असतं. इथे तुला झोपायला एखादी खोली मिळेल. तुझ्याकडे पैसे आहेत का?"

‘‘मला हॉटेलात जायचं नाहीय. कार्ड दाखवल्याबिगर ते खोली देणार नाहीत. दिली तरी डब्बल भाडं लावतील. आणि सकाळी पोलिसांना खबर देऊन वर दहा फ्रँक बक्षीस मिळवतील. लई वंगाळ लोक.’’

इतक्या वेळात आता कुठे त्याचे तिच्या चेहऱ्याकडे लक्ष गेले. तिची कांती गोरी नितळ होती. केस सोनेरी. त्याला वाटले होते त्यापेक्षा ती खूप तरुण दिसत होती. अगदी कोवळया वयाची. फार तर अठरा किंवा एकोणीस असेल. रात्रीच्या वेळी तिचे डोळे गडद तपकिरी वाटत होते. दिवसा बदामी वाटले असते. तिचे ओठ थोडे बद्दड होते. तिच्या डोक्यावर हॅट नव्हती. तिने दोन-तीन जागी रफू केलेला जुनाट कोट घातला होता. गुडघ्याखाली येणारा स्कर्ट बऱ्याच दिवसात धुतलेला नसावा. त्या गलिच्छ अवस्थेतही तिच्या देहाचे सौष्ठव लपत नव्हते. एवढ्या लहान वयात परिस्थितीचे टक्केटोणपे खाऊनही तिच्या चेहऱ्यावरचा निरागस भाव लोपला नव्हता. तिच्या रूपाने एक धोकेबाज आव्हान त्याच्यासमोर उभे होते.

‘‘तुम्ही इथं जवळच राहता का.’’

‘‘पुढच्या गल्लीत माझा स्टुडिओ आहे.’’

‘‘कृपा करून आजच्या रात्रीपुरतं मला तुमच्या घरी घेऊन चला.’’ प्रथमच तिच्या तोंडून विनवणीचा स्वर बाहेर पडला. तिने त्याच्या नजरेला नजर दिली व नंतर आपली नजर खाली वळवत ती म्हणाली, ‘‘त्याच्या बदल्यात पाहिजे तर मला शेजेला घ्या. एक दमडीसुद्धा घेणार नाही तुमच्याकडून.’’ वर पाहत तिने त्याच्याकडे एक सिगरेट मागितली. त्याने आपली सोनेरी सिगरेट केस तिच्या पुढे केली. तिने ती हातात घेऊन नवलाईने निरखून पाहिली. एक सिगरेट घेऊन परत देताना म्हणाली, ‘‘खऱ्या सोन्याची दिसतेय. मागे एकाने मला खऱ्या सोन्याची कानातली दिली होती. पण त्यातलं एक कुठेतरी हरवलं. माचिस आहे का?’’

त्याने काडी ओढून तिच्यासमोर धरली. सिगरेटचा एक खोल झुरका मारून ती म्हणाली, “काय भयंकर दिसता तुम्ही? लहान मुलं तुम्हाला पाहून रात्रीची घाबरत असतील.”

संतापाने त्याची कानशिले गरम झाली. “तू चालती हो पाहू इथून.”

तो तरातरा चालत पुढे निघाला. तिने दोन पावलातच त्याला गाठले, “तुम्हाला एवढी डोचक्यात राख घालायला काय झालं? आता एवढ्या रात्री कुठे जाऊ मी?”

“हे बघ. मी तुला माझ्या स्टुडिओवर घेऊन जाणार नाही हे नक्की.”

“अहो असं काय करता? मी तुमच्या एकाही वस्तूला हात लावणार नाही, का कसली चोरी करणार नाही. तुम्ही कसे बी असा. मला त्याचं काही देणं नाही की घेणं नाही. मला फकस्त एका रात्रीपुरता आसरा पाहिजे. बदल्यात तुम्ही माझ्यासंगे तुम्हाला काय पाहिजे ते करा.” तिचा स्वर थोडा खाली आला, “मी वागायला तशी चांगली आहे. एकदा मला तुमच्या पांघरुणात घ्या. मग समजेल. कशी मजा येईल ती.”

- ५१ -

चंद्रप्रकाशात चमकणाऱ्या पावसाच्या पाण्याच्या डबक्यांना काळजीपूर्वक चुकवीत हेन्री निःशब्दपणे पावले टाकीत चालला होता. ती मुलगी त्याच्या बाजूने सावकाश चालत होती. नाकातून धूर सोडीत. तो थांबेल तेथे थांबत. मादाम ल्युबेतचे लॉज आल्यावर ती म्हणाली, “तुमचा स्टुडिओ आहे म्हणजे तुमी नक्कीच पेंटर असणार.”

त्याने दरवाजा उघडून केरोसिनचा दिवा लावला. दिव्याच्या पिवळसर प्रकाशात ती मोठी जागा उजळून निघाली. छप्पराचे लाकडी वासे, भिंतीवर टांगलेले कॅनव्हास, तिरप्या इझलच्या सावल्या, मध्यभागी स्टोव्हचा लालसर प्रकाश.

तिने सभोवती एक दृष्टिक्षेप टाकला. ‘‘जागा खूप मोठी आहे.’’ तिने आपला कोट काढला व ती खिडकीजवळच्या कोचाकडे गेली. तिच्या पोलक्याचे पातळ कापड तिच्या स्तनांना घट्ट चिकटून बसले होते त्यामुळे त्यांची गोलाई व टचटचीत स्तनाग्रे उठून दिसत होती. हेन्री तिच्याकडे मोहित होऊन पाहू लागला. भिंतीवरच्या सावलीतसुद्धा ती किती रेखीव दिसत होती. त्याच्या स्टुडिओत रात्र काढणारी ती पहिलीच स्त्री होती. तिच्यामुळे त्याला एवढा मनःस्ताप का झाला? तिने त्याच्या व्यंगाचा उल्लेख केला म्हणून की त्याचे आभार मानले नाहीत म्हणून? का तिच्या वागण्यातील बेफिकिरीमुळे? तिच्या या सहानुभूतिशून्य स्वभावाला ती ज्या सामाजिक स्तरातून आली होती तेथील रांगडेपणा कारणीभूत असेल. आपल्याला ती हवी आहे हे तिने कसे ओळखले असेल? तिला माझ्या डोळ्यांत दिसले असेल का? तिला येऊन पाच मिनिटेसुद्धा झाली नसतील तोच तिने कपडे काढायला सुरुवात केली. जणू काही स्वत:च्या घरीच असावी अशा सहजतेने. ल पेरॉक्वेमधल्या मुली कपडे काढताना त्याच्याशी गप्पा करायच्या. *शेरी*, डार्लिंग म्हणून त्याला लाडाने हाक मारून कपडे काढताना त्याची मदत मागायच्या. कदाचित ते सर्व नाटक असेल तरी त्या ते आवर्जून करीत.

कोचावर बसून तिने शांतपणे पोलक्याची बटणे काढली व पोलका काढून कोचाच्या पाठीवर टाकला. तिची नाजूक मान, गोल स्तन व द्राक्षांसारखी तांबूस टपोरी स्तनाग्रे. एखाद्या ग्रीक शिल्पासारख्या तिच्या बांध्याचे हेन्री निरीक्षण करीत होता.

‘‘तुम्ही काय बघताय एवढं? कधी पाहिलं नाही कोणाला कपडे काढताना?’’ तिने आपले मांजरासारखे डोळे वर करीत विचारले.‘‘तुम्ही पेंटर लोक जास्त बोलत नसणार. मी एका पेंटरला ओळखते. पण तो तुमच्यासारखा गप्प रहात नाही. सारखे जोक सांगून खूप हसवतो.’’

त्याच्या उत्तराची वाट न बघता तिने तिच्या स्कर्टचा पट्टा सोडला व ती उठून उभी राहिली. स्कर्ट सरकन घसरून खाली पडला. तिने आत पेटिकोट वगैरे काही

घातला नव्हता. चड्डी काढून तिने एका कोपऱ्यात भिरकावली व संपूर्ण नग्नावस्थेत त्याच्यासमोर येऊन उभी राहिली.

"टॉयलेट कुठेय?" तिने विचारले.

या बयेला मी माझे आरशासारखे सुंदर बाथरूम मुळीच वापरू देणार नाही. या थंडीत जाऊ दे तिला कुडकुडत त्या दुसऱ्या टोकाकडच्या सामाईक बाथरूममध्ये.

"कॉरीडॉरच्या दुसऱ्या टोकाला जा." हेन्रीने दिलेला दिवा व टॉवेल घेऊन ती टॉयलेटला गेली.

मंद प्रकाशात हेन्री एकटाच उभा होता. जर घाई केली तर ती येण्याच्या आतच आपल्याला बिछान्यात शिरता येईल. म्हणजे आपले पाय तिला दिसायला नकोत. या विचाराने पटकन कपडे उतरवून तो बिछान्यात शिरला. तेवढ्यात त्याला तिची चाहूल लागली.

"एवढ्यात पडलात वाटतं बिछान्यावर. एक मिनिटसुद्धा फुकट घालवायचं दिसत नाहीय." ती बिछान्याजवळ येऊन म्हणाली. "दिवा राहू दे की विझवू?" दिव्याच्या प्रकाशाच्या पार्श्वभूमीवर तिच्या शरीराची गोलाई उठून दिसत होती.

"मालवून टाक." दिवा मालवण्यासाठी म्हणून ती वाकली. पुढच्याच क्षणी हेन्रीला उत्तेजित करणारा तिचा देहाकार काळोखात बुडून गेला.

"दिवा मालवायला का सांगितला? मला तुमचे पाय दिसतील म्हणून भीती वाटली की काय?" तिच्या शब्दांतील विखारामुळे तो संतापला.

"गेट आऊट. मी तुला बोलावलं नाहीय माझ्याबरोबर झोपायला. चल. उचल तुझे कपडे आणि चालू लाग ताबडतोब." तो रागाने थरथर कापत होता. त्याला वाटले की, 'मी जर उंच व तगडा असतो तर हिच्या एक थोबाडीत ठेवून दिली असती. किंवा पाटूने पिरगळला तसा हिचा हात पिरगळला असता. किती वर्षे हा व्यवसाय करीत असेल. बहुधा वयात आल्यापासून. तेव्हापासून किती प्रकारचे, वयाचे, रंगाचे पुरुष

हिच्या सहवासात आले असतील. माझ्यासारखा एखादे व्यंग असलेला माणूस हिच्या वाटेला आलाच नसेल का?'

''केवढ्या मोठ्याने ओरडता तुम्ही. मला वाटलं नाही तुम्ही एवढे चिडाल ते. तुमच्या पायांशी मला काय करायचंय. कसे बी असेनात. तुमच्याबरोबर मला एक वेळ झोपू दे. मग बघा तुमाला कशी खूश करीन ते.''

हेन्रीच्या ओरडण्याकडे दुर्लक्ष करीत शांतपणे ती त्याच्या पांघरुणात शिरली. तिच्या रेशमासारख्या मुलायम कायेचा उष्ण स्पर्श त्याला जाणवला. तिच्या शब्दांचा उष्ण श्वास त्याच्या मानेजवळ त्याला जाणवत होता. तिचा हात त्याचे पौरुष कुरवाळत होता. ती त्याच्या कानात हळूच म्हणाली, ''तुमचे पाय लहान असले तरी हा मधला पाय मात्र भक्कम दिसतोय. बिछान्यात हाच कामाला येतो.''

एखाद्या नागिणीच्या आवेशाने तिने आपला देह त्याच्या देहाभोवती लपेटला. दोन्ही हात त्याच्या शरीराखाली घातले आणि ओठ त्याच्या ओठांवर घट्ट टेकले. ''तुमाला मी हवीय ना? मग घ्या तर. अगदी पुरेपूर.''

तिने त्याला आपल्या शरीरावर ओढून घेतले. आता सर्व देहाला अवंगठून टाकणाऱ्या नग्नतेशिवाय दुसरी कोणतीही जाणीव उरली नव्हती.

- ५२ -

हेन्रीला जाग आली तेव्हा शेकोटीत जळणाऱ्या सरपणावरून मादाम ल्युबेत येऊन गेल्याचे त्याला कळले. ती आली तशीच परस्पर काही न बोलता निघून गेली. तिच्या या गप्प राहण्यामुळे तिची झाल्या प्रकाराबद्दलची नाराजी दिसून येत होती. बाहेर पाऊस पडत होता. वातावरणात मरगळ होती.

त्याने शेजारी झोपलेल्या त्या मुलीकडे उशीवरून मान वळवून पाहिले. हाताची उशी करून शांतपणे ती झोपली होती. नेहमी सार्वजनिक बागेतल्या एखाद्या बाकड्यावर नाहीतर दुकानाच्या वळचणीला किंवा अशीच कुठेतरी जागा मिळेल तिथे हाताच्या घडीची उशी करून झोपण्याची सवय असली पाहिजे. ज्या दिवशी गिऱ्हाईक मिळेल त्या वेळी एखाद्या भिकार हॉटेलातल्या कापूस बाहेर आलेल्या

फाटक्या गादीवर. आजच्यासारखा मऊ-मुलायम बिछाना क्वचितच तिच्या वाट्याला आला असेल. तिचे ओठ किंचित विलग झाले होते. एक स्तन उघडा पडला होता. तिच्याकडे पाहून त्याला क्लाऊटच्या पेंटिंगमधल्या तरुण कुमारिकांची आठवण झाली. थोड्या वेळाने ती उठेल व निघून जाईल. कुठे ते देवच जाणे. पुन्हा पोलिसांचा ससेमिरा चुकवत, पावसात भिजत, थंडीत कुडकुडत दिवसभर या गल्लीतून त्या गल्लीत धावपळ करीत, दुपारच्या जेवणाला गाडीवरून पळवलेले एखादे फळ, नाहीतर पाण्याच्या घोटाबरोबर कोरडा पाव. रात्री चार-पाच फ्रँकसाठी आपला देह एखाद्या अनोळखी इसमाच्या स्वाधीन करायचा. कधी कधी रात्रीच्या आसऱ्याच्या बदल्यात फुकटसुद्धा. जसा काल रात्री आपल्याला मिळाला तसा. आज रात्री दुसऱ्या कोणासमोर तरी ही कपडे उतरवेल आणि तो अनोळखी इसम तिच्या कोवळ्या लुसलुशीत देहाचा भोग घेईल.

तिचा सुंदर देह कोणालाही मोहित करेल असा असला तरी तिच्या स्वभावात प्रेम आणि आपुलकी यांचा लवलेशही नव्हता. आपल्या बोलण्याचे दुसऱ्याला काय वाटेल याची तिला फिकीर नव्हती. तिच्या वागण्या-बोलण्यात उर्मटपणा ठासून भरलेला होता. पण त्याच बरोबर तिच्या रोमारोमांत एक प्रकारचा उत्तानपणा भरलेला होता त्यामुळे हेन्रीला तिचे आकर्षण टाळता आले नाही.

तिला जेव्हा जाग आली तेव्हा तो इझलपाशी उभा होता. आळस देऊन पुरा होताच तिने त्याच्याकडे उद्धटपणे एक सिगरेट मागितली. रागाची तिडीक त्याच्या मस्तकात गेली. एवढीसुद्धा रीतभात हिला नाही. तो काहीतरी बोलणार होता पण थोड्या वेळात ती जाणारच आहे तर कशाला उगाच वाद घालून स्वतःला त्रास करून घ्या अशा विचाराने त्याने आपल्या रागाला आवर घातला.

"ऊठ आता. केवढी दुपार झालीय बघ."

तिने सिगरेट शिलगावून एक खोल झुरका घेतला. "ही सगळी चित्रं तुम्हीच काढलीयत का?" ती सभोवताली भिंतीवर लटकवलेले कॅनव्हास बघत होती. तिच्या नजरेत ना कौतुक होते ना साधे कुतूहल. "काय करता हो या सगळ्या चित्रांचे?"

“विकतो.” तो थंडपणे म्हणाला.

“कधी गिऱ्हाइक भेटते का? किती पैसे भेटतात एकेका चित्राला?”

त्याने कॅनव्हासवरील नजर काढून तिच्याकडे एक दृष्टिक्षेप टाकला. ती अजूनही कपडे न घालता संपूर्ण नग्नावस्थेत बसून होती. त्याने काठीच्या टोकाने जमिनीवर पडलेली चड्डी तिच्याकडे भिरकावली व म्हणाला, “घाल ती चड्डी आणि ऊठ तिथून.”

ती तशीच आढ्याकडे नजर लावून बसून राहिली. तिचा तो वर वळलेला चेहरा ढगाळ दुपारच्या परावर्तित मंद प्रकाशात किंचित उजळलेला दिसत होता. तिचे डोळे फिकट बदामी रंगाचे होते. तिचे खांदे जरासे वर आलेले, काखा जांभळट, त्याला वाटले तिला तीच पोज घ्यायला सांगून चटकन एखादे स्केच करावे. पण त्याने स्वतःला आवरले.

“ते काय तुम्ही डोईवर घातलंय.” तिने विचारले.

“ही माझी काम करताना घालायची हॅट आहे. ब्रश पुसायला चटकन हाताशी मिळते.”

“काय येड्यावानी दिसताय.”

“हे बघ. तुझ्यावर बघायची कोणी सक्ती केलेली नाही. आता ते कपडे एकदाचे अंगावर चढव आणि चालू लाग. मला पुष्कळ काम आहे.” तो वैतागून म्हणाला.

“तुम्हाला जरा पण मस्करी केलेली चालत नाही. मी काही बोलले की केवढे ओरडता.” ती त्याच्या जवळ जाऊन लाडीक नजरेने बघत म्हणाली. तिचे समोरच्या दरवाजाकडे लक्ष गेले.

“काय आहे तिकडे?” तिने विचारले.

“माझी खोली आणि बाथरूम.”

तिने धावत जाऊन दरवाजा उघडला. "प्लीज. मला अंघोळ करायला द्याल का या बाथरूममध्ये. अंघोळ झाल्यावर मी चकाचक साफ करून देईन. प्लीज एकदा तरी करू दे ना." लहान मुलाला नव्या खेळण्याविषयी वाटते त्या उत्सुकतेने तिने विचारले.

त्याचे अंतर्मन त्याला सांगत होते नको. तिला घालवून दे. पण त्याच्या स्वैर मनाने त्याच्या ताब्यातून निसटून परस्पर परवानगी देऊन टाकली. होकाराचे शब्द त्याच्या तोंडून केव्हा बाहेर पडले ते त्याचे त्यालाच कळले नाही.

"पण लवकर बाहेर ये." स्वतःच्या मनावर ताबा मिळवण्याची केलेली केविलवाणी धडपड.

आतून नळाच्या तोट्या इकडे तिकडे फिरवल्याचे व पाण्याचे चित्रविचित्र आवाज येत होते. मधूनच गाण्याची लकेर. नळ बंद होत नाही म्हणून तिने त्याला बाथरूममध्ये बोलावले. ती टबमधल्या पाण्यात मजेत खेळत होती. आयुष्यात पहिल्यांदाच एवढ्या थाटात स्नान करायला मिळाले असावे. रस्त्यावरचे अनाथ मूल पंचपक्वान्नावर तुटून पडावे तसे दृश्य दिसत होते. तिचा चेहरा अधिकच बालिश वाटत होता. तिचे सुकुमार स्तन नुकत्याच वयात आलेल्या मुलीसारखे दिसत होते. एकदा तिने आपले केस सावरण्यासाठी म्हणून हात वर केला त्या क्षणी ती लुव्हरमधल्या एखाद्या शिल्पासारखी भासली. आणखी एक रात्र. फक्त एकच.

"मला माहितेय तुम्ही मला तुमच्या बाथरूममध्ये काल रात्री का येऊ दिलं नाही ते." ती आपल्या छातीला साबण चोळीत म्हणाली. "तुमच्या या छान छान वस्तूंना मी हात लावून घाण करीन म्हणून भीती वाटली तुम्हाला. तुम्हाला मी आवडत नाही. म्हणूनच तुम्ही माझ्या आंगावर सारखे ओरडत असता."

तिने डोळयाच्या कोपऱ्यातून त्याच्याकडे पाहिले."पण मी तुमच्याशी काल रात्रीला चांगले वागले की नाही? तुम्ही कबूल करायचा नाही. तुम्ही तो चष्मा लावला नाहीत तर अगदी हिरो दिसाल." ती काहीतरी असंबद्ध बडबडत होती.

"काय फरक पडतो मला तू आवडलीस की नाही त्याने? तुझं काम झालंय. पोलिसांच्या तावडीतून तुझी सुटका झाली. रात्रीपुरता आसरा मिळाला. आता लवकर आटप आणि निघ इथून."

"आंघोळ झाली की निघतेच. आजच्या रात्रीला पुन्हा येईन, तुम्हाला पाहिजे असेल तर."

मोहाचा हा क्षण टाळला पाहिजे. तिला नको म्हणून सांग. तिला फक्त रात्रीपुरता निवारा हवाय. ही बाथरूम, हा मऊ उबदार बिछाना, वर तुझे पैसे यापलीकडे तिला काही देणंघेणं नाहीय. पण त्याचे स्वैर मन भोगाच्या एका रात्रीची मागणी करीत होते. फक्त एक रात्र. त्याने चष्मा काढून पुसायला सुरुवात केली.

"अहो, तुम्ही अजून मला माझं नावसुद्धा इचारलं नाहीत. माझं नाव मारी. तुमचं?"

"हेन्री."

"फार छान नाव आहे. शोभतं तुम्हाला."

मारी. किती साधे पण गोड नाव आहे नाही? तिला थोडी चांगली वागणूक मिळाली की तिला सभ्य गृहस्थ व तिचे ते मवाली मित्र यातील फरक कळून येईल. इतकी वर्षे बिचारीने थंडी, भूक, भय यांचा सामना करीत रस्त्यावरच्या कुत्र्याच्या एखाद्या बेवारशी पिल्लासारखे दिवस काढले असतील. त्यात इतरांकडून सतत होणारी हिडीसफिडीस. उगाच नाही तिच्या स्वभावात एवढा तुसडेपणा आला. सारखे मारत राहिले तर कुत्र्याचे बेवारशी पिल्लूसुद्धा दिसेल त्याला चावत सुटते. हिला थोडेसे प्रेमाने वागवले पाहिजे. म्हणजे ती तिचा भूतकाळ विसरेल. तिचा स्वभाव जोखण्यात आपली केवढी चूक होत होती. वरवर बघता ती केवढी अप्पलपोटी, दुष्ट आणि मूर्ख वाटते. थोडी अशिक्षित आहे खरी. लहानपणी शाळेत जायला मिळाले नसेल. परिस्थितीचे टक्केटोणपे खाल्ल्यामुळे स्त्रियांच्या स्वभावातील

नैसर्गिक ऋजुता आत खोल गाडली गेली असेल. परिस्थितीत बदल झाल्यावर हळूहळू ती वर येईलही.

त्याने तिला अंग पुसायला आपला टॉवेल दिला तेव्हापासून त्याचे मतपरिवर्तन व्हायला सुरुवात झाली. तिच्या हालचालीत एक नजाकत होती. तिचे टबमधून पाणी निथळत्या अंगाने बाहेर येणे, अंग पुसणे, तसेच नग्नावस्थेत आरशासमोर उभे राहून आपले दाट सोनेरी केस विंचरणे या सर्वात विलक्षण मोहकता होती. हे सर्व करताना तिची टिटवीसारखी सतत वटवट चालू होती. रस्त्यावरच्या भटक्या मुलांना नकला करण्याची एक उपजत देणगी मिळालेली असते. तिने पाटूची जी नक्कल केली ती फारच थोर होती. ओठावर फणी धरून तिने पाटूचा भसाडा आवाज काढला. त्याची यथेच्छ टवाळी केली. हेन्रीची ब्रश पुसून रंगाने बरबटलेली हॅट डोक्यावर तिरपी ठेवून एका हाताने आपली योनी झाकत दुसरा हात डोक्यावर ठेवून आरशात बघत तोंड वेडेवाकडे करीत तिने जी फक्कड पोज दिली ती बघून हेन्रीला हसू आवरेना.

त्याने जेव्हा पैसे देऊ केले तेव्हा तिने ते घ्यायला नकार दिला.“मी तुम्हाला कबूल केलं होतं की मी पैसे घेणार नाही म्हणून.” हो-ना करता करता ती जेव्हा पैसे घ्यायला राजी झाली तेव्हा शंभर फ्रँकची नोट हातावर पडलेली पाहून ती उडालीच. बिचारी आयुष्यात प्रथमच शंभराची नोट हाताळत होती.

- ५३ -

त्या दिवशी संध्याकाळी घरी जाताना त्याची फार धावपळ उडाली होती. कारण मारीने ठीक सात वाजता येईन म्हणून सांगितले होते. त्याला लिथोग्राफी शिकण्यासाठी म्हणून पेर कोटेलकडे जायचे होते. पण आता त्याला त्यापेक्षा जास्त महत्वाचे काम होते. मुलँ रूजच्या पोस्टरच्या कामात एका दिवसाने एवढा काय फार मोठा फरक पडणार होता? झिडलर थोडा थांबू शकेल. पण मारी पुन्हा थोडीच भेटणार आहे? रात्री काय काय करायचे ते त्याने सर्व ठरवून ठेवलेले होते. रेस्तोराँमध्ये जाऊन जेवण्यापेक्षा खऱ्या प्रेमिकांप्रमाणे घरीच जेवण घ्यायचे. वाईन कोणती आणायची. शॅम्पेनच हवी ही घटका साजरी करायला. शॅम्पेन पिता पिता तिच्या चित्तवृत्ती खुलून येतील, ती हसेल, हसता हसता लाडात येईल. अशा वेळी उत्तेजित

होऊन थोडासा नर्म शृंगार, किंचित चावटपणा करता येईल. थोडीशी फुलेसुद्धा आणली पाहिजेत. त्याशिवाय स्टुडिओला घरपण येणार नाही. एका चांगल्या रेस्तोराँमध्ये त्याने जेवणाची ऑर्डर दिली. बरोबर मोये ए शाँदाँ ७८ व कोनॅक. ऑर्डर देऊन झाल्यावर काहीतरी खायला म्हणून क्रिमरीमध्ये जात असता त्याला हाक ऐकू आली.

''*बाँज्यूर मस्य तुलूझ्*. काय योगायोग पाहा. मी तुमच्याकडेच यायला निघालो होतो.'' हेन्रीला पाहून पाटू म्हणाला.

''काय खास काम?''

''तसं महत्वाचं काही नाही. पण तुम्हाला एक सूचना करायची होती. तुमच्या भल्यासाठी म्हणून.'' हेन्रीला तो जवळच्या एका क्रिमरीमध्ये घेऊन गेला. तिथे फक्त पौष्टिक पदार्थ मिळत. उदाहरणार्थ, अंडी, लोणी, चीज वगैरे. पेय फक्त दूध. अशी दुकाने नगरपालिकेने गरिबांना चांगले व पौष्टिक पदार्थ वाजवी दरात मिळावेत व ते दारूसारख्या व्यसनांपासून दूर राहावेत म्हणून मुद्दाम गरीब वस्तीत उघडली होती. अशा दुकानांत कमालीची स्वच्छता असे.

खाणे झाल्यावर पाटू म्हणाला, ''काल तुम्ही मला चांगली थाप मारलीत. मला सहसा कोणी बनवू शकत नाही. पण काल तुमच्या थापेवर माझा विश्वास बसला. पण तुम्ही गेल्यावर माझ्या लक्षात आलं की तुम्ही माझा मामा केलायत ते. मला बनवलंत त्याचं एवढं काही नाही. पण तरीही मी एका बाबतीत तुम्हाला सावध करणार आहे. तुम्ही त्या मारीचा नाद सोडा.''

तिचे नाव त्याला कळल्याचे लक्षात येताच हेन्री चमकला. पण त्याने ते दिसू दिले नाही.

''तुम्ही खूप तरुण आहात. तुमच्यापेक्षा चार पावसाळे मी जास्त पाहिले आहेत. माझा सल्ला ऐका. काल रात्री तुम्ही तिला घरी घेऊन गेलात. एका रात्रीने काही बिघडत नाही. पण तिला घरात कायमची ठेवू नका. ती एक नालायक, फुकट गेलेली

पोरगी आहे. नासक्या फळासारखी. माझ्या विभागाच्या हद्दीत असली पोरटी मला नकोय. ताबडतोब तिला हाकलून द्या. तेच तुमच्या हिताचे आहे.''

''तुम्हाला तिची फारशी माहिती दिसत नाहीय. ती एक भटकी वेश्या आहे. वेश्यांना प्रीफेक्टकडे जाऊन नोंदणी करणं कायद्याप्रमाणे आवश्यक असतं. पण बऱ्याच वेश्या ते करणं टाळतात. एक म्हणजे नोंदणीकृत वेश्यांना महिन्यातून दोनदा सँ लझारला जाऊन तपासणी करून घ्यावी लागते. ती त्यांना नको असते. दुसरं म्हणजे असं कार्डाशिवाय रस्त्यावर फिरण्यात त्यांना एक प्रकारची फुशारकी वाटते. त्यामुळे अशा रस्त्यावर फिरणाऱ्या वेश्यांची नियमित तपासणी होत नाही. तिला काय रोग झाले असतील त्याचा आपल्याला पत्ताही लागणार नाही. माझे ऐका. लाथ मारून हाकलून द्यायच्या लायकीची पोरगी आहे ती.''

''अशा पोरींचा जन्म कुठल्या तरी झोपडपट्टीत होतो. आईच्या दुधातूनच त्यांना सगळया दुर्गुणांचे बाळकडू मिळत असते. गटाराच्या कडेला खेळत खेळत त्या वाढतात. पाचएक वर्षांची झाली की त्यांचे आई-बाप त्यांना भीक मागायला पाठवतात. बाराव्या वर्षापासून धंद्याला लागतात. सुरुवात दुकानाच्या वळचणीला नाही तर एखाद्या सार्वजनिक मूत्रीत होते. पंधराव्या वर्षापासून दिव्याच्या खांबाखाली उभ्या राहायला लागतात.''

''सार्जंट पाटू, तुमचा काहीतरी गैरसमज होतोय. तुम्ही त्या मुलीला नीट पाहिलंसुद्धा नाही.'' इतका वेळ गप्प राहून ऐकणारा हेन्री म्हणाला.

''एकदा पाहिलेला चेहरा आम्ही पोलीस लोक आयुष्यात विसरत नाही. काल मला वाटलं होतं मी चुकत असेन. पण आज सकाळी थोडा तपास केल्यावर खात्रीच पटली. आता तुम्हाला तिचा सगळा इतिहासच सांगायला हवा. तिचे पूर्ण नाव मारी फ्रँक्वा शार्लेत. तिचा जन्म ऱ्यू मुफतार्दमध्ये झाला. असा काही भाग पॅरीसमध्ये आहे हे तुमच्यासारख्या मोठ्या लोकांना ठाऊकही नसेल. दारूच्या भट्ट्या ज्या भागात आहेत तोच हा भाग. तुम्ही जर कदाचित तिथे पाऊल ठेवलंत तर घाण व दुर्गंधीने तुम्हाला उलटी होईल. या ठिकाणी तुमच्या या मारीचा जन्म झाला. तिची आई

तरुणपणी रस्त्यावर उभं राहून धंदा करायची. आता तिच्याकडे ढकलगाडीचा परवाना आहे. बाप एका गावठी दारूच्या गोदामात कामाला होता. प्यायला फुकटची मिळाल्याने नेहमी पिऊन टेर असायचा. मारीची थोरली बहीण रोझ सोळाव्या वर्षी घरातून पळून गेली व सॅबॅस्टोपलला राहायला आली. पाठोपाठ तीन वर्षांनी मारी तिला येऊन मिळाली. त्या वेळी मी सॅबॅस्टोपलच्या ठाण्यावर होतो. म्हणून एवढ्या खात्रीने सांगतोय."

"आज सकाळीच मी सॅबॅस्टोपलला जाऊन आलो. मारीच्या नावाची फाईल त्यांच्याकडे आहे ती पाहिली. बेबेर नावाच्या एका मवाल्याबरोबर तिची खास मैत्री आहे. एखाद्या माजावर आलेल्या कुत्रीसारखी ती त्याच्याशी लगट करीत असते. भडवेगिरी, अधूनमधून भुरट्या चोऱ्या, बेकायदा व्यवसाय करणाऱ्यांची किरकोळ कामे करून गुजराण करणाऱ्या गुंडांपैकी तो एक छोटा गुंड आहे. अशा लोकांच्या आयुष्याची अखेर ठरलेली असते. एक तर रस्त्यावरच्या मारामारीत कोणाच्या तरी हातून मरण आणि याच्या हातून कोणी मारला गेला तर मग गिलोटीनखाली शिरच्छेद. वयाची तिशी गाठायला मिळाली तरी नशीब. पस्तीस म्हणजे डोक्यावरून पाणी."

"अशा मवाल्यावर या मारीसारख्या कोवळया पोरी कशा भाळतात कळत नाही. तिला चार पैसे मिळाले की ती सगळे याच्या स्वाधीन करते. मग हा चार दिवस केसांना पोमेड लावून, गळयात रुमाल बांधून फिरेल. आणि रात्र झाली की दारू पिऊन टेर. ही मारी त्या बेबेरसाठी एवढा जीव टाकत होती तरी एक दिवस त्याने ढुंगणावर लाथ मारून तिला बाहेर काढलं. त्यानंतर ती जी गायब होती ती काल या भागात गस्त घालताना दिसली."

हेन्री हातातल्या सिगरेटच्या थोटकाकडे बघत होता. मारी एक गावभवानी आहे हे त्याला ठाऊक होते. दारुडा बाप, रांड आई, छिनाल बहीण, भडवा प्रियकर. मारीच्या आयुष्यातील या गोष्टी वेश्येच्या जीवनातील अभिजात घटकांसारख्याच होत्या. तिने एखाद्या गुंड व दुष्ट प्रवृत्तीच्या इसमावर प्रेम करावे हेसुद्धा वेश्यांच्या

अभिजात पार्श्वभूमीला साजेसे होते. तिचे आपल्यावर प्रेम वगैरे बसेल असे वाटण्याइतका तो उल्लू नक्कीच नव्हता. पण तरीही त्याच्या मनात चलबिचल झाली.

"हाकलून द्यायला काय कारण घडलं?" निव्वळ कुतूहलापेक्षा जास्त काही अर्थ काढता येऊ नये याची काळजी घेत त्याने विचारले.

पाटू जोरात हसू सागला, "कारण सरळ आहे. त्याला जेवढे पैसे हवे होते तेवढे ती त्याला पुरवू शकत नव्हती. याचा अर्थ असा नव्हे की स्वतःसाठी ती काही राखून ठेवायची. आपली सगळी कमाई ती त्याच्या हवाली करायची, पण त्याची अपेक्षा अशी होती की, तिने तिच्याकडे जे भांडवल आहे त्याचा वापर पूर्ण क्षमतेने करून जास्तीत जास्त पैसे कमवावेत, पण तेच तिला नीटपणे जमत नव्हतं. कारण ती खरोखरच त्याच्या प्रेमात एवढी आकंठ बुडाली आहे की तिचे धंद्यावर नीट लक्ष लागत नव्हतं. कधीतरी अक्कल येईल म्हणून वाट बघून शेवटी तो कंटाळला. एक आठवडा तिने काहीच धंदा केला नाही तेव्हा त्याने दिली हाकलून."

अचानक त्याच्या आवाजात हळुवारपणा आला. "मला कल्पना आहे की तुम्हाला हे सगळं ऐकून त्रास होतोय ते. पण ही सगळी कहाणी मी तुम्हाला ती पोरटी कशी फुकट गेलेली आहे ते समजावे म्हणून सांगतोय. तुम्ही फ्रान्समधील एका घरंदाज घराण्यातील आहात. मस्य कॉम्ते अल्फान्सो तुमचे पिताजी..." किंचित हसून तो पुढे म्हणाला, " होय. तुमच्याविषयी सगळी माहिती आम्ही गोळा केलीय. आमच्या व्यवसायाचा तो भागच आहे म्हणा ना."

"तुम्ही सगळयांची एवढी माहिती गोळा केलीय. आता तुमच्याविषयी काही आम्हाला सांगाल की नाही?"

पाटूच्या ठोकळेबाज चौकोनी चेहऱ्यावर मार्दव आले. तो हळुवार आवाजात म्हणाला, "मला एक मुलगी आहे. कोणालाही हेवा वाटावा एवढ्या गुणाची आहे माझी लेक. पुढच्या वर्षी लग्न होईल तिचं. मुलगा अगदी हुशार व होतकरू आहे.

एकुलत्या एक लेकीचा हात त्याच्या हातात देताना सगळी चौकशी करून खात्री करून घेतलीय.''

''मारीविषयी एवढी माहिती देऊन मला सावध केलंत त्याबद्दल मी तुमचे आभार मानतो. काल तुम्हाला थाप मारली ते माझं चुकलंच. त्यावद्दल मला माफ करा. याची भरपाई करण्यासाठी मी तुमच्यासाठी काही करू शकलो तर मला बरं वाटेल.''

''त्याची काही गरज नाही. मी माझं कर्तव्य केलं. तुम्ही आपण होऊन म्हणताय म्हणून सांगतो. माझ्या लेकीचं एक पोर्ट्रेट करून घ्यावं असा विचार आहे. लग्न होऊन सासरी गेली की आठवण डोळ्यांसमोर राहील. आर्टिस्टची फी द्यायला पुरेसे पैसे नाहीत म्हणून बेत सारखा पुढे ढकलत होतो. तुम्ही करून दिलंत तर माझी बऱ्याच दिवसांची इच्छा पूर्ण होईल.''

''वा! तुमच्या मुलीचं पोर्ट्रेट करायला मला आवडेल. माझ्या स्टुडिओवर तिला फुरसतीने घेऊन या. माझा पत्ता तुम्हाला नक्कीच ठाऊक असणार.'' डोळे मिचकावत हेन्री म्हणाला.

- ५४ -

तो लॉजवर परतला तेव्हा मादाम ल्युबेतने जेवणाचे टेबल नीट लावून ठेवले होते. खोलीचा स्वच्छ केर काढला होता. फुले फुलदाणीत नीट रचून ठेवली होती. शेकोटीत लाकडे जळत होती. ती कोपऱ्यातल्या खुर्चीत शांतपणे बसून होती. ती काही बोलली नाही तरी तिच्या नजरेतील नापसंती त्याला जाणवल्यावाचून राहिली नाही. ठीक आहे. फक्त आजची रात्र. उद्यापासून मारीला जायला सांगू.

''इकडे बघितलं का?'' दरवाजातूनच मारी ओरडली. वेल्व्हेटचा एक स्वस्तातला ड्रेस तिच्या अंगावर होता आणि खांद्यावर पिसांची झूल.

''कशी दिसते मी?'' दोन्ही हातांनी ड्रेस उचलून वर धरत एक हलकी गिरकी घेत ती म्हणाली.

रात्रीचे बारा वाजून गेले होते. हेन्री सोफ्याच्या एका टोकाला बसला होता. कोनॅकची बाटली पायाशी आडवी पडली होती. गेले पाच तास तो जागा राहून वाट पहात होता. कुठे जिन्यावर पाऊल वाजले की त्याचे हृदय उचंबळून यायचे आणि प्रत्येक वेळी पदरी पडलेली निराशा तो कोनॅकच्या घोटाबरोबर गिळायचा. ही रांड आता काही येत नाही. नक्कीच ती तिच्या याराला भेटायला गेली असणार आणि काल रात्रीच्या सगळ्या घटना मीठमसाला लावून सांगत बसली असेल. एका दाढीवाल्या बुटक्याच्या मदतीने पोलिसांच्या हातातून ती कशी निसटली. कुचेष्टेने हसत तिने त्याच्या चालण्याची नक्कलही केली असेल. वर निघताना त्याने दिलेली शंभर फ्रँकची कोरी करकरीत नोट त्याच्या हवाली केली असेल.

पण तिला आलेली बघताच त्याच्या मनात चिंता, संताप आणि आनंद या भावना एकाच वेळी दाटून आल्या.

''काय झालंय तुम्हाला? बरं वाटत नाहीय का? गप्प का असे? हे कपडे पाहिलते का माझ्या अंगावरचे? कसे आहेत? मी माझ्या मित्राकडून एकदम स्वस्तात आणलेत. फक्त पन्नास फ्रँक पडले. ''

''या टुकार ड्रेसला पन्नास फ्रँक. कोणाला बाता मारतेस? फार तर दहा फ्रँक पडले असतील. ते जाऊ दे. किती वेळ वाट बघतोय मी? जेवणाचे काय? सातला येणार होतीस तू.''

''दहा फ्रँक. कपड्यातलं काय कळतं तरी तुम्हाला. हात लावून बघा तर. असली खरंखुरं वेल्वेट आहे हे.'' ती सोफ्यावर त्याच्याजवळ त्याला खेटून बसत म्हणाली. हेन्रीने चिडून तिचा दंड पकडला व तिला ढकलून दिले. त्याच्या हाताच्या पोलादी पकडीतील ताकदीचे तिला आश्चर्य वाटले.

''या ड्रेसपायी दुपारी मी खूप फिरले. संध्याकाळी मी बहिणीकडे गेले होते. तर ती तापाने अंथरूण धरून बसलेली. मला खूप म्हणत होती आलीस तर आजच्या दिवस राहून जा, पण मी म्हणाले की, तुम्हाला शब्द दिलाय म्हणून.''

“काही तरी फेकाफेक करू नकोस. तुझा तो ड्रेस, मैत्रीण आणि बहीण गेले उडत. तिथे टेबलावर जेवण ठेवलंय. हवं तर जेवून घे. मी खूप थकलोय. मला झोपू दे आता.” हेन्री त्राग्याने म्हणाला व कपडे न बदलता पलंगावर जाऊन डोळे मिटून आडवा झाला. मारी त्याच्याशेजारी जाऊन निजली व त्याच्या अंगाभोवती हात टाकला. तिचा उष्ण श्वास त्याच्या मानेवर जाणवला. तिचे स्तन त्याच्या कुशीत दबले गेले. त्याने तिच्या शरीराच्या विळख्यातून स्वतःला सोडवण्याचा दुबळा प्रयत्न केला, पण तिने आवेगात घेतलेले चुंबन व तिच्या पायांच्या कैचीत त्याचा प्रतिकार कोलमडून पडला.

रात्रभर त्याचा झगडा चालू होता. त्याचे मन विरुद्ध तिचे शरीर. कधी चिडून ओरडणे तर कधी आर्जव. तिने कशालाही दाद न देता आपला देह त्याच्या देहावर झोकून दिला. गिऱ्हाइकाला फसवण्यासाठी म्हणून शोधलेल्या नवनव्या युक्त्या वापरून तिने त्याची वासना जागृत केली. शेवटी कामतृप्तीनंतरच्या क्लांत अवस्थेत त्याला गाढ झोप लागली.

सकाळी जाग आल्यावर किलकिलत्या डोळ्यांनी त्याने तिच्याकडे पाहिले. पाटूने काहीही सांगितलेले असू दे, किंवा मादाम ल्युबेत कितीही डोळे वटारून पाहू दे, काय फरक पडणार आहे? या घटकेला मारी माझ्या कुशीत झोपलेली आहे. तिच्या देहाचा भोग मी केव्हाही घेऊ शकतो. आता, आज रात्री आणि पुढे कितीही वेळा.

त्याने डोळे मिटले. अंतरीचा संघर्ष संपला होता. रात्रभरची रणधुमाळी संपल्यावर ज्याप्रमाणे रणांगणावर पहाटेची शांतता पसरते तशी शांतता त्याच्या चेहऱ्यावर पसरलेली दिसत होती. पराभवानंतरची शांतता.

- ५५ –

मारी हेन्रीच्या घरी रहायला आली.

मारीच्या गृहप्रवेशानंतर हेन्रीची बाथरूम तिच्या वापरातल्या गोष्टींनी भरून गेली. कंगवे, फण्या, केसांना लावायच्या पिना, आकडे अशा असंख्य चीजा जागोजागी पडलेल्या दिसू लागल्या. ती त्याचे ब्रश, उंची सुवासिक साबण, परफ्युम वगैरे

महागड्या वस्तू बिनदिक्कत वापरू लागली. तिच्या सहवासात अशा गोष्टींमुळे त्याला सुरुवातीला जो मनस्ताप व्हायचा तो आता सवयीने त्याला होईनासा झाला. त्याच्या टॉवेलला तिची लिपस्टिक लागलेली असायची. इकडे-तिकडे वाळत घातलेली तिची मळकी अंगवस्त्रे त्याच्या नजरेला खुपेनाशी झाली. एवढेच नव्हे हळूहळू त्याला हे सर्व आवडू लागले. आयुष्यात प्रथमच स्त्रीचे एवढ्या जवळून निरीक्षण करण्याची संधी त्याला मिळत होती. स्नान, वेणीफणी, प्रसाधन अशा स्त्रियांच्या म्हणून ज्या खास गोष्टी असतात त्या करताना तिला पाहाण्यात त्याला खूप मजा वाटायची. आता काय ती त्याची स्वत:ची रखेली होती.

"तुम्हाला मी जर रोज यायला पाहिजे असेल तर मला पैसे द्यावे लागतील," एके दिवशी सकाळीच तिने त्याला बजावले. सर्वसाधारणपणे वेश्यांना असलेली पैशांची हाव तिला नसावी असे त्याला उगाचच वाटत होते. तिच्यामध्ये गुंतल्यामुळे तिचा देह हेच तिच्याकडचे एकमेव भांडवल आहे व तो देह भाड्याने देणे हेच तिच्या उत्पन्नाचे साधन आहे हे वास्तव तो विसरला होता.

"फुल नाईटला दहा फ्रँक पडतील." तिच्या शब्दांनी तो ताळयावर आला. दिवसासुद्धा त्याच्याकडे राहिले पाहिजे, असे त्याने सांगितले तेव्हा तिला थोडे आश्चर्य वाटले, पण तिने हिशेब केला.

"दिवसाचे पाच फ्रँक अलग." घासाघिशीला थोडा वाव असावा म्हणून तिने भाव वाढवून सांगितला होता, पण त्याने ताबडतोब मान्य केले तेव्हा ती अचंब्यात पडली.

हेन्रीने मोठ्या उत्साहात तिला त्याच्या सगळया आवडत्या ठिकाणी फिरवून आणले. आपल्या मित्रपरिवाराची ओळख करून दिली. पण चार दिवसांत तिला त्याचा कंटाळा आला. त्याच्या मित्रांबरोबरच्या गप्पांचा तिला कंटाळा यायचा. मोंमार्त्रमधील त्याची जिव्हाळयाची ठिकाणे, त्याचा मित्रपरिवार अशा कोणत्याही गोष्टीत तिला काडीचाही रस नव्हता. कला, साहित्य, राजकारण, तत्त्वज्ञान वगैरे विषयांवरील चर्चेत तिला ना गती होती ना समजून घेण्याची इच्छा. लवकरच

त्याच्या लक्षात आले की, तिच्या ठायी कोणत्याही इच्छा-आकांक्षेचा लवलेशही नाही. किमानपक्षी हा एक श्रीमंत बकरा मिळालाय तर त्याला धरून असावे असा व्यवहारी विचारही तिच्या मनाला शिवला नसावा. तिचा जन्म एका झोपडपट्टीत झाला होता. दोन वेळ पोटभर जेवण मिळण्याची मुष्कील. असे असले तरीही त्याला जर ती हवी असेल तर तिच्या अटींवरच ती त्याला मिळणार होती. त्याच्यासाठी म्हणून ती तिच्या कोणत्याही सवयी सोडणार नव्हती. त्यालाच तिच्यासाठी बदलणे भाग होते आणि त्याने ते तसे जमवून घेतले.

त्याने आपले मित्र, ॲपरटीफस्, उंची रेस्तराँमधील दुपारचे जेवण, मुलँ रूजमधील रम्य संध्याकाळ या सर्वांवर पाणी सोडले. रात्रीचे जागरण व दिवसा झोप या प्रकारात कामही बंद झाले. साराला कबूल केलेल्या चित्राचे कामही रखडले. झिडलरला कबूल केलेले मुलँ रूजचे पोस्टर, त्यासाठी पेर कोटेलकडे घ्यायचे लिथोग्राफीचे धडे सर्व काही तो विसरून गेला. मॉरीसला तो टाळू लागला.

बाह्य जगाशी असलेल्या त्याच्या संबंधात एक प्रकारचा चोरटेपणा आला. तो आणि ती सोडून इतर कोणालाही त्यांच्या जगात जागा नव्हती. दिवस आळसात लोळण्यात जाई. एखाद्या रेस्तोराँमध्ये नाश्ता व जेवण. संध्याकाळ कारमेन नावाच्या एका टुकार बारमध्ये. तेथे वेश्या व त्यांचे दलाल यांची सतत वर्दळ असे. एका कोपऱ्यात ती दोघे सिगरेट फुंकत, दारू ढोसत रात्र पडण्याची वाट बघत तासन्तास बसलेली असायची.

हजार वेळा तरी त्याला प्रश्न पडला असेल की, आपण हे काय आयुष्य जगतोय? काय झालेय तरी काय मला. उत्तर एकच होते. मला ती हवी आहे. तिचा कोवळा लुसलुशीत मांसल देह, लासवट वासना. ती जर रखेली म्हणून राहायला हवी तर तिचे सर्व अस्तित्व जसे आहे तसे सहन करीत राहिले पाहिजे. तिच्या वर्तनात एक थंड निष्क्रियता होती. तिचा मठ्ठपणा आश्चर्यकारक होता. तिचा बांधा कमनीय होता, रतीक्रीडेच्या शारिरीक अंगात ती प्रवीण होते, पण वरचा मजला मात्र रिकामा होता. कधी कधी त्याने ज्या बुळेपणाने तिला शरणागती दिली त्याची त्याला लाज वाटायची. पण तिचा तो गात्रन्‌गात्र उत्तेजित करणारा स्पर्श, मादक चुंबन, टोकदार

जिभेने केलेला लडिवाळ खेळ, कंबरेची लयबद्ध हालचाल यापुढे कशाची तमा. अवघ्या पंधरा फ्रँकच्या बदल्यात तिच्या सुकुमार देहाचा इंचन्‌इंच त्याच्या ताब्यात होता.

मार्च महिन्यातील एका सकाळी उठल्या उठल्याच तिने त्याला बँकेत खाते कसे उघडायचे ते विचारले. तिच्या या चौकशीचे त्याला आश्चर्य वाटले.

''अगदी सोपे आहे ते. बँकेत जा आणि काउंटरमागे बसलेल्या कारकुनाला सांग मला खाते उघडायचंय म्हणून. बाकीचे तो सगळं करेल.''

''फक्त एवढंच. बाकी काय बी विचारणार नाहीत ना?''

''फक्त तुझं नाव तेवढं विचारेल, लेजरमध्ये लिहिण्यासाठी.''

''आणि माझे पैसे मला पाहिजे तेव्हा मिळतील?''

''अगदी व्याजासकट. काही चिंता करू नकोस.''

ती आज प्रथमच घरच्यासारखी बोलत होती.

''पण तुला बँकेत खाते कशासाठी उघडायचंय?''

''ढकलगाडीच्या परवान्यासाठी,'' उपासमारीचे दिवस आठवून तिचा स्वर थोडा कातर झाला, ''आईने बजावून ठेवलंय जेव्हा कधी चार पैसे हातात पडतील तेव्हा त्यातले थोडे ढकलगाडीचा परवाना घेण्यासाठी म्हणून बाजूला काढून ठेव. एकदा परवाना जवळ असला की मग दोन घास कसेही मिळत्यात.''

तिच्या आईने तिच्यावर केलेला तो एकमेव संस्कार असावा. अन्न, वस्त्र, निवारा मिळवण्याचा, आपले जैविक अस्तित्व टिकवून धरण्याचा मूलभूत संस्कार.

''किती पडतात एका परवान्याला?''

“पंधराशे फ्रँक माहितेय का?” हेन्रीच्या लेखी किरकोळ असलेली रक्कम तिच्या कल्पनेच्या आवाक्याबाहेरची होती. त्यामुळे तो आकडा सांगताना तिची छाती दडपून गेली होती. “पण एकदा परवाना घेतला की पुन्हापुन्हा काढावा लागत नाही. मग जन्मभर जिवाला घोर नसतो.”

“तुझ्याकडे किती पैसे जमा झालेयत.”

“तीनशे.”

एक वेळ त्याला वाटले की बाकी पैसे तिला एकरकमी देऊन टाकावेत, पण नको. एकदा पैसे हातात पडल्यावर ती परत तोंड दाखवणार नाही. बँकेत खाते उघडून आल्यावर तिने आपले खाते पुस्तक मोठ्या उत्साहाने त्याला दाखवले. नंतर कित्येक दिवस ते खाते पुस्तक तिच्या कौतुकाचा विषय झाले होते. ते पुस्तक ती सदैव जवळ बाळगायची. मधेच पर्स काढून उघडून बघायची. सारखे त्या खाते पुस्तकाविषयी बोलायची.

- ५६ -

मारीचा एकदा असाच मूड लागला होता आणि त्यात ती तिच्या पूर्वायुष्यातील गोष्टी सांगायला लागली. ज्या झोपडपट्टीत तिचा जन्म झाला तिथली वस्ती, दारूच्या भट्ट्या, पिंपे, आसमंतात भरून राहिलेला दारूच्या रसायनाचा आंबूस वास, कुजणाऱ्या कचऱ्याची दुर्गंधी. आई, बाप, भाऊ, बहीण, शेजारीपाजारी, तिचे सवंगडी वगैरे. आईबापांची रोजची भांडणे, एकमेकांची समजूत काढणे. शनिवारी दोघेही इतकी झिंगून असत की मग मुलांच्या जेवणाचीही शुद्धही नसे. बाप कधी कधी घरातल्या सगळयांना बदडून काढायचा. शुद्धीवर आला की एकदम प्रेमाने जवळ घेऊन माफी मागायचा. बोलता बोलता अचानक ती थांबली आणि सर्व गरिबांना श्रीमंतांविषयी वाटणाऱ्या आदिम तिरस्काराने हेन्रीकडे बघू लागली.

“मी हे सगळं तुमाला का सांगतेय? तुम्हाला काय कळणार खायचे वांदे होतात म्हणजे काय होतं ते. एका वख्ताला तरी कधी उपास काढलायत तुम्ही?”

मग एकदम स्वतःच्या लैंगिक अनुभवांविषयी सांगू लागली. तिच्या मनात लाज, अपराधीपणा वगैरे भावनांचा लवलेशही नव्हता.

“एकदा शनिवारी रात्री बापाच्या कारखान्यात काम करणारा एक माणूस मला वळचणीला घेऊन गेला. तेव्ही मी चौदा वर्षांची होते. एका कोपऱ्यात नेऊन माझा फ्रॉक वर करून उभ्यानेच मला घासायचा त्याने प्रयत्न केला. पण पिऊन एवढा टाईट होता की त्याला काम करायला काही जमलं नाही. तरी त्याने माझ्या हातावर एक फ्रँक टेकवला. त्या एका फ्रँकच्या मी रिबिनी घेतल्या माझ्या फ्रॉकला बांधायला.”

एकदा सतत तीन दिवस उपाशीपोटी काढावे लागले. चौथ्या दिवशी ती सरळ सॅबॅस्टोपलला बहिणीकडे पळून आली. तिथे तिच्या मार्गदर्शनाखाली ती हळूहळू धंद्याला तयार झाली. पहिला संभोग, सहज हाती खेळणारा पैसा, धुराने भरलेल्या गुत्त्यात भडक कपडे केलेल्या मवाली मुलांबरोबर केलेला वॉल्टझ्, या सगळया गोष्टी ती अगदी मोकळेपणाने त्याला सांगत होती.

“एकदा नाचताना बेबेरशी वळख जाली. काय हिरो दिसतो तो. सगळ्या पोरी त्याच्यासाठी जीव टाकायच्या. मी त्याला झॅट भाव देत नव्हते. तरी तो माझ्या मागे मागे असायचा. तो राग त्या पोरी माझ्यावर काढायच्या. आमचा नेहमी त्यावरून झगडा व्हायचा. या रोजच्या कटकटीला कंटाळून शेवटी मी सॅबॅस्टोपल सोडून मोंमार्त्रला आले.” बेबेरने लाथ मारून हाकलून दिले हे लपवण्यासाठी तिने सहजगत्या खोटे बोलण्याच्या आपल्या स्वभावानुसार एक बंडल लपेटून दिले.

“पण कसलं काय. इकडे तो भडवा, नालायक पाटू कावळयासारखा माझ्यावर नजर ठेवून आहे. तुम्ही मला त्याच्या तावडीतून सोडवलं नसतं तर एव्हाना त्याने मला सँ लझारला पाठिवलं असतं.” त्या दिवशी तिच्या आवाजातून पहिल्यांदाच कृतज्ञतेचा अंश व्यक्त झाला, पण दुसऱ्याच क्षणी तिने त्याचावर पाणी फिरवले.

‘‘तुम्ही दिसायला कायतरीच, तुम्हाला चालताही धड येत नाही. तरी तुम्ही माझ्याशी केवढे चांगले वागलात.’’ तिच्या नजरेत चेष्टा व सहानुभूती यांचे विचित्र मिश्रण होते.

- ५७ -

मार्च महिना हा हेन्री व मारी यांच्या संबंधातील त्यातल्या त्यात सुखाचा काळ ठरला. वसंत ऋतूच्या चाहुलीबरोबर तिचा मूळ स्वभाव उसळी मारून वर आला. ती स्वतःच्या भूतकाळाविषयी बोलायची बंद झाली. तिची नजर पुन्हा भावशून्य दिसू लागली. एखादे जनावर हिवाळयाच्या दीर्घ निद्रेतून हळूहळू जागे व्हावे तसा तिच्या वर्तनात फरक दिसू लागला. तिचा स्वभाव लहरी झाला. अस्वस्थता वाढली. तासन्तास ती खिडकीतून बाहेर बघत बसे, नाही तर कोचावर पडून राही.

ती कंटाळली असेल. त्याने आपल्या मनाची समजूत घातली.

एके दिवशी त्याने तिच्यासाठी एक महागडा ड्रेस घेतला. तिने तो पाहिल्यासारखा करून दूर भिरकावून दिला. प्रत्येक गोष्टीत ती त्याचा हिरमोड करू लागली. कुठे जायचे असेल तर आयत्या वेळी काहीतरी खुसपट काढून हट्टाने घरी बसायची, फिरायला बाहेर पडले तर त्याला दम लागलाय हे दिसत असूनसुद्धा मुद्दाम होऊन लांबच्या ठिकाणी जायची व त्याला पायपीट करायला भाग पाडायची व त्याच्या हळू चालण्याला हिणवायची.

ती कितीही वाकड्यात शिरली तरी तो संयमपूर्वक सरळ वागत होता.

‘‘चल. आज व्हेर्सायला जाऊन येऊ.’’

‘‘काय वाढून ठेवलंय तिथं?’’

‘‘आज हवा चांगली पडलीय. एखादे नाटक पाहू. नाही तर ऑपेरा किंवा कन्सर्ट.’’

"नको. एका बुटक्याबरोबर लंबूटांग बाईला हातात हात घालून चालताना लोकं टकामका बघतात ते मला बिल्कूल आवडत नाही. काय करायचं ते इथे घरी करा."

तिचे हे वाव्‌ताडन ऐकून त्याला अधिकच खुज्यासारखे वाटू लागले. कंटाळयाने कोंडल्यामुळे तिच्या स्वभावातील क्रौर्य उफाळून वर आले होते. जोडीला गरिबांना श्रीमंतांविषयी वाटणारी पुरातन असूया. केवळ गंमत म्हणून किंवा वेळ घालवायचे साधन म्हणून ती पदोपदी त्याचा अपमान करू लागली. त्याला छळण्याची एखादी क्लृप्ती शोधण्यात तिला स्फुरण यायचे. त्याच्या नीटनेटकेपणाची, स्वच्छतेच्या कटाक्षाची ती खिल्ली उडवीत असे.

"माझ्या माहितीत एक माणूस हाय. दहा ठिकाणी ठिगळे लावलेले फाटके कपडे घालतो. अंघोळ पण आठवड्यातून एकदा केली तर केली, पण दिसतो कसा अगदी मर्द हिरो. अवो, मुळात असावं लागतं. ते नसलं तर एवढे झ्याक-पाक, भारी कपडे करून काय बी उपयोग होत नाई."

त्याला चिडवण्यासाठी म्हणून खुजा, खुरटा, बुटका असे शब्द ती सारखे आपल्या बोलण्यात वापरे. त्याच्या व्यंगाचा उल्लेख करण्याची एकही संधी ती सोडत नसे. दोघांची वारंवार भांडणे होत. तिच्या उद्दामपणाने तो थक्क होई. कारण नसताना ती भडकायची. उगाच आरडाओरडा करीत अर्वाच्य शिव्या देणे नित्याचे होते. हा सगळा तमाशा पहायला जिन्यावर लोक जमा होत. मादाम ल्युबेतच्या डोळयांतून टिपे गळत.

पण मारी प्रकरण तुटेपर्यंत कधीच ताणत नसे. त्याच्या संतापाने हद्द गाठलीय हे लक्षात येताच ती आपला पवित्रा बदलून त्याची क्षमा मागे. अगदी हातापाया पडायलासुद्धा कमी करीत नसे. त्यानेही भागले नाही तर ती आपले ठेवणीतील अस्त्र बाहेर काढी. ती जवळ येताच तिच्या स्पर्शाच्या, चुंबनाच्या जादूने त्याचा सगळा संताप, अपमान विरघळून जाई. मग दोन दिवस शांततेत जात.

अशाच एका दिवशी त्याने तिला पोर्ट्रेटसाठी पोज द्यायला सांगितले. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे तिने अगदी तात्काळ मान्य केले.

‘‘माझं पेंटिंग? अगदी खरंखुरं?’’ तिचा विश्वास बसेना.

‘‘होय. अगदी अस्सल. ऑईलपेंटमध्ये.’’

आनंद आणि उत्साह तिच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता. ती बाथरूममध्ये गेली आणि तासाभराने भडक मेकअप करून बाहेर आली. तिने तो पन्नास फ्रँकला घेतलेला काळा वेल्व्हेटचा ड्रेस घातला होता आणि खांद्यावर पिसांची झूल पांघरली होती. तिचा तो अवतार बघताच तो वैतागला. तो ड्रेस बदलायला सांगावे असे त्याच्या तोंडावर आले होते, पण वाद नको म्हणून त्याने काही सांगायचे टाळले. हेन्री देत असलेली पोज न घेता तिने स्वतःहून एक पोज घेतली. ‘‘मी किनई या बाजूने छान दिसते,’’ असे म्हणून केस सारखे करीत तिने एक फाकडू पोज घेतली. तिच्या आविर्भावातील सहजता जाऊन ती ठोकळ्यासारख्या एखाद्या टिनपाट मॉडेलसारखी दिसायला लागली. हेन्रीने कामाला सुरुवात करण्याच्या उद्देशाने स्टूल इझलजवळ ओढून घेतले.

तासाभरात ती कंटाळली. ‘‘असं एका जागी नुसतं बसून राह्याला लय कंटाळा येतो. तुमी काम जरा पटापट आटपून घ्या.’’ आणखी थोडा वेळ गेल्यावर तिने त्याला सरळ विचारले, ‘‘तुम्ही या कामाला किती पैसे देता?’’

‘‘मी सहसा मॉडेल वापरून काम करीत नाही, पण बाहेर या कामाला साधारणतः दिवसाला पाच फ्रँक देतात.’’

‘‘तर मग तेवढे पैसे तुम्ही मला देयला पाहिजेत. कारण तुम्हीच माझं चित्र काढतो म्हणाला.’’ त्याने कपाळावर हात मारला. तिच्या या धंदेवाईक बेरकी वृत्तीचा त्याला तिटकारा होता. पाटूने तिला दिलेली सडक्या फळाची उपमा अगदी योग्य होती.

"मी तुला हे पोर्ट्रेट देणार आहे. ते पुरेसे होणार नाही का? शिवाय तुला दर दिवसाचे पाच फ्रँक मी देतो ते कुठे गेले?"

"ते तुमच्याबरोबर नुसते राहाण्याचे. काही काम करायला सांगितले तर त्याचे वर तीन फ्रँक पडतील आणि पेंटिंगसाठी तुमच्या पुढ्यात बसायचे पाच तर तुम्हीच कबूल केलेयत."

"एक तास पण पोज दिली नाहीस तर हिशेब करायला लागलीस."

"ते तुमचं तुम्ही बघून घ्या. मी काय तुमच्या पाठी लागले नव्हते मला ठेवून घ्या म्हणून." ती ताडकन उठली आणि त्याच्या जवळ येऊन कॅनव्हास बघू लागली. "वा! काय काढलंयत हे कापडावर. मी किती छान दिसते. या चित्रात कसं ध्यान दिसतंय. मला वाटलंच होतं की तुम्हाला चित्रसुद्धा नीट काढायला जमत नाही."

"गेट आऊट!" शेवटी त्याच्या संतापाचा स्फोट झाला, "चालती हो येथून. एक क्षणभरसुद्धा तुझं तोंड बघायची माझी इच्छा नाहीय."

"मी बरी जाईन माझे पैसे घेतल्याशिवाय." त्याने चिडून तिच्या अंगावर भिरकावलेले पाच फ्रँकचे नाणे तिने वरच्या वर झेलले व दोन पावलांत तिने दरवाजा गाठला. "एक मिनिटसुद्धा तुमच्याबरोबर काढण्याची माझी ही इच्छा नाही. तुम्हाला माझी संगत हवी असेल तर स्वतःसाठी एक पायांची जोडी आणि चांगला चिकना चेहरा कुठे मिळाला तर घेऊन या." असे म्हणून तिने दाणकन दरवाजा आपटला व घराबाहेर पडली.

नंतर तासाभरात ती परत आली. माझे चुकले, मला माफ करा असे म्हणून तिने चक्क त्याचे पाय धरले.

"घरात बसून बसून माझं डोचकं फिरल्यावाणी झालं होतं. माझ्या बहिणीच्या काळजीने माझ्या जीवाला घोर लागलाय. फक्त एकदाच सॅबॅस्टोपलला जाऊन तिला भेटून येते."

ही शुद्ध थाप होती. वास्तविक तिला तिच्या सॅबॅस्टोपलच्या मित्रमंडळींना भेटून आपले बँकेतील खातेपुस्तक दाखवून मी कसे एका श्रीमंत बुटक्याला गटवलंय त्याची फुशारकी मारायची होती. तिने एक श्रीमंत बकरा गळाला लावलाय ही बातमी कळली तर बेबेरने तिला परत घरात घेतले असते.

त्याने निरुपाय म्हणून एकदा परवानगी दिली तर ती रोज दुपारची सटकायला लागली. रात्री परत यायला उशीर झाला तर बहिणीच्या नावावर काहीतरी थाप मारून वेळ मारून न्यायची, पण कधीतरी तिच्या तोंडून तिचे भांडे फुटत असे, पण तरीही त्याला तिच्या थापांवर विश्वास बसल्याचे नाटक चालू ठेवावे लागे. नाही तर भांडणाला आमंत्रण.

मारी दिवसा गाव भटकायला जायला लागल्याचा एक फायदा म्हणजे त्याला दुपारची थोडी शांतता मिळू लागली. त्याने पुन्हा कामावर लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न केला, पण त्याला ते जमेना. तो दिवसभर स्टुडिओत काही न करता स्वस्थ बसून असायचा. अशा एका निवांत दुपारी स्टुडिओच्या दरवाजावर बार्ताझार पाटू येऊन उभा राहिला. त्याच्याबरोबर त्याची मुलगी होती. वय वर्षे वीस, लांबोडे नाक, पुढे आलेले दात व कपाळावर मुद्दाम ओढून काढलेली काळया केसांची बट. तिच्या त्या भावी नवऱ्याबद्दल सहानुभूती वाटावी असेच तिचे रूप होते.

"आम्ही पोर्ट्रेट करण्यासाठी आलोयत. अर्थात तुम्हाला वेळ असेल तरच, मस्य तुलूझ." पाटू मोठ्या अदबीने म्हणाला.

सतत तीन दिवस खपून हेन्री ते पोर्ट्रेट करीत होता. पोर्ट्रेट पूर्ण होताच त्या रांगड्या शिपाईगड्याचे डोळे अश्रूंनी भरून आले.

('द पोलीसमन्स डॉटर' या नावाचे हे पोर्ट्रेट मॉरीस ज्वाय्याँच्या कॅटलॉगप्रमाणे बर्नहेमच्या संग्रहात आहे.)

त्याने मुलीच्या लग्नाचे आमंत्रण अगत्यपूर्वक दिले. जाता जाता मागे वळून तो म्हणाला, ''ती पोरटी अजून गेलेली दिसत नाहीय. पावडरचा वास येतोय.''

हेन्रीने निर्जीवपणे मान डोलावली.

''माझा सल्ला तुम्हाला पटलेला दिसत नाहीय. तुमची मर्जी. पण तुम्हाला जर ती कधी त्रास देऊ लागली तर मला सांगा. ताबडतोब तिची रवानगी सँ लझारला करीन.''




(द पोलीसमन्स डॉटर – तुलूझ लोत्रेक – तैलरंग, कार्डबोर्ड
६७x५० सेमी, १८९२, हॅम्बुर्ग म्युझियम)

- ५८ -

मारी गाव भटकायला गेल्यावर दिवसभर तो मोकळाच असायचा. बऱ्याच दिवसांत भेट न झाल्यामुळे एक दिवस मॉरीस येऊन त्याच्या प्रकृतीची चौकशी करून गेला. स्वतः हेन्री एकदा आईला भेटून आला. वेळ घालवण्यासाठी तो दुपारी कॅफेत नाही तर एखाद्या मित्राच्या घरी किंवा स्टुडिओत जाऊन बसे. जॉर्ज सुराकडे जाऊन तो त्याचे बिंदूचित्राचे काम तासन्‌तास बघत राही. आर्ट डीलरकडे जाऊन जपानी प्रिंटचे कॅटलॉग उगाच चाळत बसे. त्याच्या अशा या निरुद्देश भेटींचा मित्रांनाही ताप होई. मुलँ रूजमध्ये असाच एकदा रिकामटेकडा बसला असता झिडलरने त्याला पोस्टरच्या प्रगतीवरून झापले. अष्टौप्रहर मारीचा ध्यास घेतल्याने त्याचे एका उडाणटप्पू प्रेमवीरात रूपांतर झाले होते.

एके दिवशी मारी मोठ्या खुशीत म्हणाली, ‘‘आज किनई सगळे नातेवाईक, मित्रमंडळी आमच्या घरी जमले होते बहिणीला भेटायला. त्या वेळी मी सगळयांना तुमच्याबद्दल सांगत होते. हा स्टुडिओ, इथल्या मऊ मऊ गाद्या, हा बाथ टब, तुमची पेंटिंग. पण कोणाचाही विश्वासच बसेना. आपण सगळयांना एकदा इकडे बोलावून पार्टी देऊया का? माझ्या बहिणीला पण तुम्हाला एकदा भेटायचंय. माझा एक चुलतभाऊ आहे. तो गिटार छान वाजवतो, त्यालाही बोलवू या. खूप मजा येईल.’’

हेन्रीच्या ठाम विरोधामुळे ती पार्टी झाली नाही. त्या दिवशी रात्री ती स्टुडिओत खूप उशिराने परतली ती बरोबर गुत्त्याचा वास घेऊन, ॲकॉर्डियनच्या धूनवरील एक लोकप्रिय गाणे गुणगुणत. तिची पावले त्या गाण्यावरील नृत्याच्या ठेक्यात पडत होती. कुठे गेली होतीस दिवसभर, असे विचारण्याचा अवकाश की तुम्हाला काय करायच्यात नसत्या पंचायती म्हणून ती गरजणार. नाही विचारले तर त्याला जळवण्यासाठी मुद्दाम एखादी गोष्ट रंगवून सांगणार. उदाहरणार्थ, आज वाटेत एकाने डोळा मारला. काय चिकना होता तो दिसायला. मी त्याच्याकडे बघून हसले तर त्याने मला धक्का मारून कुल्ल्यावर चिमटा काढला. गेले होते त्याच्याबरोबर दोन घटका. त्याच्याकडे तुमच्यासारखे पैसे नव्हते पण काय मज्जा आली म्हणून सांगू.

एकदा तिने सहानुभूतीचा खोटा आव आणून मानभावीपणाने विचारले, ''तुमचे पाय हे असे कसे हो?''

''मी लहानपणी जिन्यावरून पडलो होतो हे मी तुला मी पूर्वी सांगितलंय.''

''पण त्याने एवढं काय झालं व्हायला. दुसरी कुणी मुलं पडत नाहीत काय लहानपणी. पण तुमच्यासारखी कोणी जन्माची फेंगडी होत नाहीत.''

''या कुबड्या तुम्ही लहानपणापासून वापरायचा का हो?''

''किती वेळा काढशील हा विषय. गप्प बस एकदाची नाही तर चालती हो.''

''तुमचं कोणाबरोबर जमणं कठीणच आहे. प्रेमाने नुसती विचारपूस केली तर एवढं संतापायला काय झालं? मी एकदा खरंच गेले ना की मग कोणीही विचारायलासुद्धा येणार नाही. बघा जायची बात काढली तर कसा चेहरा पडलाय ते. जरा आरशात पहा तोंड आपलं.''

''आता दहा फ्रँकमध्ये नाही जमायचं मला. वीस पाहिजेत.''

पुढल्या आठवड्यात विसाचे तीस झाले. पुढच्या महिन्यात तिसाचे पन्नास.

हेन्री चिडतो म्हणून मारी मुद्दाम होऊन उशिरा येई. वर त्याला जळवण्यासाठी मित्राबरोबर फिरायला गेल्याच्या थापा मारी. अशा रीतीने त्याला छळण्यात तिला मनापासून आनंद होई. ती कोणाबरोबर झोपेना. शेवटी ती एक वेश्या आहे, असे म्हणून हेन्री स्वतःची समजूत घालायचा प्रयत्न करी.

पण अति झाले नि शेवटी त्याचा संयम सुटला. दररोज संध्याकाळी दारू पिऊन त्यांची भांडणे होऊ लागली. शब्दाला शब्द, उत्तराला प्रत्युत्तर, अपमानाला प्रतिअपमान अशा चढत्या क्रमाने होणाऱ्या भांडणाचा शेवट अर्थहीन, नीरस अशा

शरीरसंबंधाने होई. मनाने व शरिराने मलूल होऊन तिच्या सहवासाचा पुरता उबग येऊन शेवटी कधीतरी तो निद्रेच्या अधीन होई.

हेन्रीला मारीविषयी एकाच वेळी प्रेम व प्रचंड घृणा वाटत असे. जेव्हा ती नसे तेव्हा तो अगदी बेचैन होऊन जाई. दिवस कसाबसा निघून जाई पण संध्याकाळ खायला उठे. त्याने कॅफेत जाणे सोडून दिले. रस्त्यावरील गर्दी व आवाज त्याला सहन होईनासे झाले. स्टुडिओच्या बाहेर पडणे जवळ जवळ बंदच झाले. दिवसभर कोनॅक पीत कोचावर बसून असे. हळूहळू जसा दारूचा अंमल डोक्यावर होऊ लागे तशी मारीची प्रतिमा डोळयांसमोरून अंधूक होऊ लागे व तो निष्क्रियतेने ग्रासलेल्या रिकामपणात स्वतःला हरवून जाई.

अशाच एका निवांत दुपारी मॉरीसने त्याला गाठले. इतस्ततः अस्ताव्यस्त पडलेला पसारा पाहून तो म्हणाला, ‘‘कामात खूप बुडून गेलेला दिसतोयस. मला माहितेय काम करण्याची तुझी क्षमता आम्हा सर्वांपेक्षा खूप जास्त आहे. थोड्या विश्रांतीची शरीराला गरज असते हे लक्षात असू दे.’’

‘‘कशाला उगाच माझ्या पाठीला लागतोयस. इतक्या दिवसांनी कशी काय फुरसत मिळाली बुवा. आज काय रविवार नाही की कसली सुट्टीही नाही. तुझं ते ल फिगारो अजून चालू आहे की तू त्यांना राम राम ठोकलायस?’’

‘‘माझ्या कशाला उगाच फिरक्या घेतोयस? बऱ्याच दिवसांत महाशयांचं दर्शन नाही म्हणून मुद्दाम होऊन अर्धा दिवस सुटी घेऊन आलोय तुला भेटायला.’’

थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर मॉरीसने मुद्याला हात घातला.

‘‘काय तुझी ही अवस्था करून घेतलीयस. तुला झालंय तरी काय?’’

‘‘काही नाही. ठीक आहे मी.’’

“माझ्याकडे थापा चालणार नाहीत. तुझं काहीतरी बिनसलंय नक्कीच. काय ते मोकळेपणाने सांग.”

“दुसऱ्याच्या गोष्टीत नाक कशाला खुपसतोस तू? तुझं काम आटप आणि टळ इथून.”

“तुला काय झालंय याचा शहानिशा केल्याशिवाय मी काही आज इथून जाणार नाही.”

मॉरीस त्याच्या जवळ गेला व हळुवार आवाजात म्हणाला, “हेन्री, कोणाकडे तरी तू तुझं मन मोकळं केलंस तर बरं होईल. बाटलीला बूच लावून बंद करून किती दिवस चालेल? मन मोकळं करायला माझ्याशिवाय दुसरं कोण इथे जवळ आहे? आपण मानलेले भाऊ भाऊ आहोत. विसरलास?”

“ठीक आहे. तू तयार आहेस तर ऐक. मला एक पोरगी भेटलीय. मारी तिचं नाव.ती रस्त्यावरची एक भटकभवानी आहे. मूर्ख, खोटारडी, अप्पलपोटी अन् पक्की डँबीस!” त्याने सिगरेटचा एक खोल झुरका घेतला व पुढे म्हणाला, “तिच्याशिवाय जगणं मला मुष्कील झालंय. बस्स एवढंच. झालं समाधान?”

“तू तिच्या प्रेमात पडलायस की काय?”

“प्रेम! हँ.” त्याच्या हसण्यात कडवटपणा होता,“मी प्रेमाविषयी चकार शब्दसुद्धा काढलेला नाही. मी एवढंच म्हणालो की, मी तिच्याशिवाय राहू शकत नाही. प्रेमाविषयी चर्चा करणं म्हणजे कालापव्यय आहे. प्रेम या एकाच शब्दातून शेकडो अर्थ ध्वनित होतात. देवावरचं प्रेम, आईवरचं प्रेम, रेम्ब्रांदवर तुमचं प्रेम असू शकतं, एवढंच नव्हे तर घरातल्या कुत्र्यावरसुद्धा प्रेम बसू शकतं. पण मारीवर प्रेम म्हणशील तर अशक्यच. चंद्रप्रकाशात तिचा हात हातात घ्यावा, तिच्यावर एखादं

सुनीत लिहावं असं मला कधी वाटलं नाही. मला ती आवडते याचा अर्थ म्हणजे तिचे ओठ, तिची टपोरी स्तनाग्रं, तिच्या लुसलुशीत शरीराबरोबर केलेली शय्यासोबत. यापलीकडे काहीही नाही. तिचा मी जेवढा तिरस्कार करतो तेवढा मी आयुष्यात कोणाचाही केला नसेल. ज्या क्षणी आमची पहिली गाठ पडली त्या क्षणापासून तिने जे जे काही केलं त्यामुळे मला मनस्तापाशिवाय काहीही मिळालं नाहीय.''

''तिचा मूर्खपणा, असंस्कृतपणा, लोभी वृत्ती व रोमारोमांतून जाणवणाऱ्या लासवट वासनेचा विखार.'' तो जसेजसे तिच्याविषयी बोलू लागला तसतसे त्याला मोकळे वाटू लागले. त्याने त्याला मारीची पहिली भेट, पाटूने त्याला दिलेला सल्ला वगैरे सर्व हकिकत सविस्तर सांगितली.

''ही बाई एकाच वेळी मला हवीही आहे आणि नकोही. हे कसं काय ते काही मला सांगता येणार नाही. कदाचित द्वेषभावना हीच सर्वात मोठी कामोत्तेजक प्रेरणा ठरत असावी. भांडणात एकमेकांची उणी काढून, शाब्दिक बोचकाऱ्यांनी एकमेकांना ओरबाडून, संताप शिगेला पोचलेला असताना केलेल्या शृंगारात काही और आनंद असला पाहिजे यार.''

त्याची नजर खोलीच्या छताकडे होती. तो पुढे म्हणाला, ''या प्रकारच्या समागमाने कामवासना तात्पुरती जरी शमली तरी त्यातून ना समाधान मिळते ना मनःशांती. भोगूनही अतृप्तच राहायला होते.'' त्याने सिगरेटचा खोल झुरका घेतला. पेल्यात कोनॅक ओतली व म्हणाला, ''कदाचित ही अतृप्ती माणसाला हळूहळू पण अटळपणे विनाशाकडे घेऊन जात असावी.''

त्याने कोनॅक एका घोटात संपविली. मद्याचा घोट त्याच्या घशातून खाली उतरेपर्यंत मॉरीसने वाट पाहिली व म्हणाला, ''मला एक सांग. असे काय मोठे आकर्षण तिच्या ठायी आहे की ज्याचा मोह तुला टाळता येत नाही?''

हेन्री खिन्नपणे हसला, "मला वाटलंच होतं की तू नेमका हाच प्रश्न विचारशील. मीही हाच प्रश्न स्वतःला हजारो वेळा विचारलाय. पण अजूनही मला त्याचे पटेल असं उत्तर सापडायचंय. प्रत्येकाला वाटत असतं की आपण अगदी नॉर्मल आहोत म्हणून. पण वेळ आली की याच नॉर्मल माणसाचे रूपांतर बलात्कारी, परपीडक, समसंभोगी अशा माणसात होऊ शकतं. काम हा विषय विलक्षण गूढ आहे. एखाद्या महासागरासारखा. जेवढं खोलात जावं तेवढं थोडं. तळाशी गडद अंधकार आणि राक्षसी प्राण्यांचा वावर."

"मारीचं एवढं विलक्षण आकर्षण का? मला नाही सांगता येत. चौदाव्या वर्षापासून ती इतक्या जणांबरोबर झोपली असेल. पण मी सोडून इतर कोणीही तिच्यात एवढा गुंतला नसेल. आता पुढची गंमत बघ. मी तिच्यामागे तर ती एका मवाल्याच्या मागे हात धुऊन लागलेली आणि त्याचा डोळा फक्त हिच्या पैशांवर. हे सगळं उघड्या डोळयांनी दिसत असूनही मला तिचं आकर्षण का टाळता येऊ नये? सुरुवातीला वाटायचं की तिच्या मोहक रूपामुळे असं होत असेल. एका कमनीय बांध्याच्या तरुणीच्या कंबरेभोवती हात टाकून आपण रस्त्यातून चालताना किती बरं वाटायचं म्हणून सांगू? नंतर वाटायचं हे आकर्षण तिच्या रतिक्रीडेतील नैपुण्यात असेल किंवा तिच्या व्यक्तिमत्वात पदोपदी असलल्या लैंगिक आव्हानात. किंवा तिच्या लासवट सौंदर्यात, नसानसांत भिनलेल्या वैषयिकतेमुळे असेल."

"मी काय बोलतोय त्यात तुला काही अर्थ वाटतोय का?" हेन्रीने मधेच थांबून अंदाज घेतला. मॉरीस त्याचे बोलणे लक्षपूर्वक ऐकत होता हे पाहून तो पुढे म्हणाला, "तिच्या वर्तनात एक अलिप्त कोरडेपणा आहे. ती ज्या नजरेने बघते त्याने अंगाची कशी लाही लाही होते म्हणून सांगू? तुला ते कळणं कठीण आहे. कारण तू माझ्यासारखा बुटका नाहीस. स्त्रियांची अशी नजर तुझ्या वाट्याला आली नसेल आणि येणारही नाही. मॉरीस, कामवासनेपेक्षा अधिक गुंतागुंतीची कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे आत्मभान. एखाद्या क्षुद्र किडामकोड्याकडे पाहावं तशा नजरेने ती माझ्याकडे बघते. माणसाच्या वेषातला एक दाढीदीक्षित बेंगरूळ प्राणी. तिच्या

नजरेतल्या त्या उपहासाने माझ्या मस्तकात संतापाची तिडीक जाते. तुला त्या गिर्यारोहकाची गोष्ट माहितीय का? त्याने सातव्या प्रयत्नांत आल्प्समधील अत्युच्च शिखर सर केलं. त्याला लोकांनी विचारलं, एवढा जीव धोक्यात घालून दरवर्षी वारंवार प्रयत्न करण्यामागची तुमची प्रेरणा कोणती? तर तो काय म्हणाला माहितेय? तो भोसडीचा पर्वत माझ्याकडे पाहून हसत होता म्हणूनच मी दरवर्षी येत राहिलो. मलासुद्धा अगदी तसंच वाटतंय. साली दीड दमडीची रांड ती काय. तिने मला अगदी किड्यामुंगीपेक्षाही कमी लेखावे? ती अशी बघायला लागली की वाटतं एकदा ही आपल्या तावडीत सापडली, की मग तिला अंगाखाली रगडून हवं तसं कुस्करायला हवं.''

दोन मित्रांच्या गप्पागोष्टीत संध्याकाळ केव्हा झाली ते कळले नाही. खिडकीतून दिसणाऱ्या आकाशाच्या पॅलेटवर मावळत्या सूर्याचे रंग एकमेकात मिसळून गेले होते.

''सध्या आमची अवस्था पिंजऱ्यात सापडलेल्या दोन उंदरांसारखी झालीय. एकमेकांना बोचकारणं, चावे घेणं, एकमेकांचा सतत पाणउतारा करणं आणि शक्य झालं तर जमेल तेवढा समागम, याशिवाय दुसरं काही नाही. तिला तिच्या सगळ्या गोतावळ्याला एकदा इकडे आणायचंय, दिवसाला पन्नास फ्रँक देणारा श्रीमंत, कुरूप, फेंगडा, बुटका माणूस दाखवायला. ती येता-जाता काहीतरी निमित्ताने माझ्या व्यंगाचा उल्लेख करायची संधी शोधत असते. मी सतत तिचा प्रचंड तिरस्कार करीत असतो. माझी कुरूपता तिच्यावर लादून तिच्या देहाचा उपभोग घेतो. स्त्रीचा घोर अपमान म्हणजे तिच्या मनाविरुद्ध केलेला संभोग. मनातील राग, द्वेष या भावनांचा निचरा करण्याची ही किती छान पद्धत आहे.'' हेन्री उपरोधाने हसून कडवटपणे म्हणाला.

''पुढे काय करायचं ठरवलंयस?'' मोरीसने सहानुभूतीने विचारले.

“काही नाही.” हेन्रीने विमनस्कपणे खांदे उडवले, “कदाचित एके दिवशी ती मला सोडून जाईल व सगळा गुंता आपोआपच सुटेल किंवा तिला घालवून देण्याचा मला धीर होईल.”

“हे माझ्या कमाईचे पैसे आहेत हां. मी काय पण करीन. तुम्ही कोण विचारणार मला?”

एखाद्या कुत्रीसारखी भुंकत मारी हेन्रीच्या अंगावर गेली. “बँकेत ठिवलेले सगळे पैसे मी त्याला देऊन टाकलेयत. माझं प्रेम आहे त्याच्यावर. मी काय पण करीन त्याच्यासाठी. आता मी त्याच्याकडेच चाललेय कायमची. तुमचं खत्रूड तोंड बघत जन्मभर कोण बसणाराय इथं.” ती धाड धाड जिना उतरत खाली गेली. जाताना ती मुद्दाम मोठ्या आवाजात गाणे म्हणत होती.

त्या दिवशी त्याने सहजच तिचे पासबुक पाहिले होते. त्यात तिने सर्व पैसे काढून घेतल्याची नोंद होती. ती पाहताच त्याचे माथे भडकले व त्याने तात्काळ तिला चालती व्हायला सांगितले त्याला आता दोन आठवडे होत आले. आता त्याचा राग निवळला होता. क्षणोक्षणी त्याला तिची आठवण यायची. तिची खरोखरच हकालपट्टी केल्याबद्दल त्याला स्वतःलाच शाबासकी द्यावी असे वाटायचे, पण ते तेवढ्यापुरतेच. अशा शाबासकीने शरीराची भूक थोडीच भागणार होती? तिचे लहानसे स्तन, त्याचे पौरुष सामावून घेणाऱ्या तिच्या मांड्या. आठवणीने तो रात्र रात्र तळमळून काढी. तिच्या शोधात त्याने सॅबोस्टोपलचे सर्व गल्लीबोळ धुंडाळले. प्रत्येक गुत्त्यात तो डोकावला. दर संध्याकाळी दारू पीत तिची वाट पाहताना जिन्यावर पावलांचा आवाज येताच त्याच्या जिवाची घालमेल होई. शेवटी त्याची जवळ जवळ खात्री झाली की ती काही आता परत येत नाही.

- ५९ -

२७ मेच्या सकाळी तो असाच उद्विग्न मनःस्थितीत सतरंजीवर पडलेल्या उन्हाच्या कवडशाकडे बघत बसला होता. एवढ्यात जिन्यावर कोणाची तरी पावले वाजली. क्षणभर त्याची आशा पल्लवित झाली, पण ती काही मारी नव्हती.

पावलांचा आवाज दबका, पुरुषी वाटत होता. इतक्या दिवसांच्या निष्क्रियतेनंतर अचानक त्याला काम करण्याचा झटका आला. तो उठून इझलपाशी गेला व पॅलेटवर रंग काढू लागला. तेवढ्यात कोणीतरी दरवाजा ठोठावला.

''एन्त्रेज.'' हेन्री बसल्या जागेवरून म्हणाला. दरवाजा उघडला जाता क्षणी त्याच्या तोंडून आनंदाचा चीत्कार आला, ''व्हिन्सेंट!''

हातातील रंगाची ट्यूब तशीच खाली टाकून त्याने आपली काठी उचलली व तो लगबगीने त्याच्या दिशेने गेला.

''कधी आलास तू पॅरीसला? इकडे ये. बस असा. मला जरा बघू दे तरी कसा आहेस तो.''

''थोडा आजारी होतो, पण आता ठीक आहे.'' मोठ्या आजारातून उठलेल्या माणसासारख्या खोल आवाजात तो म्हणाला. ''परवाच आलो. दोन दिवस तेओ व जोहान्नाकडे होतो. तुला माहितेय त्यांनी त्यांच्या मुलाचं नाव व्हिन्सेंट ठेवलंय ते.''

बोलताना व्हिन्सेंटमध्ये पडलेला फरक त्याला जाणवला. नेहमीचा परिचयाचा व्हिन्सेंट कुठच्या कुठे हरवून गेला होता. डोळयांतील आग विझून शांत झाली होती. काखोटीला पोर्टफोलियो नाही की खिशात रमची बाटली. ना बोलताना हातवारे. एखाद्या सद्वर्तनी गुणी मुलासारखा शांत दिसत होता. त्यामुळेच तो परक्यासारखा वाटत होता.

''किती छान ऊन पडलंय नाही?'' त्याच्या चेहऱ्यावर शुष्क हास्य पसरले, पण त्याच्या आवाजात जान नव्हती.

''आर्ल्समध्ये ऊन खूप कडक असायचे. कदाचित तेच मला बाधलं असेल.''

''तेथे तुला तुझा आवडता पिवळा रंग अगदी मनमुरादपणे वापरायला मिळाला असेल नाही? तुला आठवतंय? तू म्हणायचास की पिवळा रंग देवाचा रंग आहे म्हणून

आणि मी तुला सांगायचो की आपला देव कॉर्मेन आहे आणि या देवाला व्हॅन डाईक सोडून इतर कोणताही रंग आवडत नाही.''

सुरुवातीचा अवघडलेपणा हळूहळू कमी होत गेला. गतस्मृतींना उजाळा मिळताच जुनी जवळीक पुन्हा प्रस्थापित झाली. दोघांचे चेहरे स्नेहार्द स्मिताने खुलले.

''तू भेटल्याने किती बरं वाटलं म्हणून सांगू? मला सारखी तुझी आठवण यायची. तू गेल्यापासून मोंमार्त्र खूप बदललंय. तुला आठवतो आपला चित्रकलेचा वर्ग?''

''मी आणखी थोडे दिवस ॲतलिएमध्ये यायला पाहिजे होतं. माझी ॲनाटॉमी एकदा कच्ची राहिली ती राहिलीच.''

''ॲनाटॉमीला मार गोळी. भर रस्त्यावर, बागेत, कॅफेत बसून चित्र काढताना जी मजा आली ती कार्मोनच्या वर्गात चार भिंतींच्या आत कोंडून ॲनाटॉमी घोटवताना आली असती काय? अरे, अशी धमाल करत असताना नकळत आपण स्वतःचा मार्ग शोधत होतो.''

''तू म्हणतोस ते एका अर्थी खरं आहे.'' व्हिन्सेंट आपल्या शिरांच्या गाठी वर आलेल्या हाडकुळया हातांकडे पाहत म्हणाला, ''हा शोध घेता घेता मी जवळपास मरणाच्या दारात जाऊन आलोय. कदाचित या शोधासाठी अशी किंमत चुकवावी लागत असेल... वेड्याचे इस्पितळ. हेन्री, एखाद्याला वेड्यांच्या इस्पितळात ठेवणे म्हणजे काय याची कल्पना आहे तुला?''

''शू! तो विषयसुद्धा आता काढू नकोस. विसरून जा ते सगळे. तू आता बरा झालायस.''

''पण मला त्याविषयीच बोलायचंय.'' व्हिन्सेंट आग्रहाने म्हणाला, ''कदाचित बोलण्याने माझ्या डोक्यातून तो विचार निघून जायला मदत होईल. एकांतवास एक

वेळ सहन करता येईल, पण वेड्यांचा सहवास फारच भयंकर. त्यांचे ते वेडे चाळे. रात्री-अपरात्री बेभान होऊन आसपासचे वेडे ओरडू लागत. त्यांच्या काळीज गोठवणाऱ्या किंकाळयांनी दचकून जाग येई. पहारेकरी बेभान झालेल्या त्या वेड्यांना फरफटत लांबच्या खोल्यांमध्ये नेऊन कोंडून ठेवीत. तरीही त्यांचे भीषण ओरडणे ऐकू येईच. कधी कधी मला वाटायचं मीसुद्धा त्यांच्यासारखा ठार वेडा होईन.''

त्याच्या मनाचे बंद दरवाजे उघडले व तो त्याच्या आर्ल्समधल्या दिवसांविषयी घडाघडा सांगू लागला. तो रोज सकाळी गावाबाहेरच्या शेतात जाऊन पेंटिंग करायचा. दोन-तीन तासांत एक पेंटिंग पूर्ण व्हायचे. दिवसभर तळपत्या उन्हात उभे राहून केलेले दोन-तीन कॅनव्हास घेऊन संध्याकाळी तो लॉजवर परतायचा. पाठीवर इझल लटकावलेले, काखोटीला अर्धवट सुकलेले कॅनव्हास, दुसऱ्या हातात ट्यूब, ब्रश, पॅलेट वगैरे सामानाची पेटी, डोक्यावर हॅट असा व्हिन्सेंट गावात सगळयांच्या परिचयाचा झाला होता.

(ह्याच विषयावरचे व्हॅन गॉगचे सेल्फ पोर्ट्रेट जगप्रसिद्ध आहे.)

व्हॅन गॉगच्या पाठोपाठ पॉल गोगँ आर्ल्समध्ये येऊन थडकला. सुरुवातीला दोघांचे चांगले जुळले. इतके की दोघे एकत्रच राहत, पण हळूहळू कुरबुरींना सुरुवात झाली. क्षुल्लक गोष्टींवरून झालेल्या वादाचे रूपांतर पाहता पाहता भांडणात होई. मुद्द्यांवरून गुद्द्यांवर यायला त्यांना मुळीच वेळ लागत नसे. शेवटी कॅफेमध्ये ॲबसिंथ पिता पिता नाही तर वेश्येच्या माडीवर त्यांची दिलजमाई होई. एके दिवशी एका क्षुल्लक कारणावरून झालेल्या भांडणात व्हिन्सेंटने ॲबसिंथ भरलेला ग्लास गोगँला फेकून मारला. त्या दिवशी दोघांचे संबंध तुटले. आर्ल्समधल्या तळपत्या उन्हात झपाटल्यासारखे सतत काम करत राहिल्यामुळे असेल कदाचित व्हिन्सेंटच्या डोक्यातला घंटानाद दिवसेंदिवस वाढतच होता. एके दिवशी त्याच्या डोळयांत रक्त उतरले. पायाखालची जमीन फिरू लागली. एका झटक्यात त्याने दाढीच्या वस्तऱ्याने आपला कान कापला व एका कागदात गुंडाळून त्याच्या लाडक्या वेश्येला नजर केला. कापलेल्या कानाच्या जागेवरून रक्त ओघळतेय अशा अवस्थेत लॉजवर परत येताना त्याच्या डोक्यातला तो घंटानाद अधिकच वाढत होता. शेवटी सहन न होऊन तो

खाली कोसळला. त्याच्या नजरे समोर सतत धगधगणारा जाळ विझला आणि हळूहळू सर्व शांत होत गेले.

(कापलेल्या कानावरून बँडेजची पट्टी गुंडाळली आहे असे एक व्हॅन गॉगचे सेल्फ पोर्ट्रेट प्रसिद्ध आहे.)

‘‘तुला पुढची हकिकत ठाऊक आहेच. तेओ मला पॅरीसमध्ये घेऊन आला व त्याने मला सेंट रेमीमध्ये ठेवले. तिथल्या नन खूप चांगल्या होत्या. त्यांनी मला पेंटिंग करायची परवानगी दिली होती. इस्पितळातले दिवस कसे भुर्रकन उडून गेले कळलेच नाही.

‘‘तिथून बाहेर आलो ते तडक तुझ्याकडे. एखाद्या दुःस्वप्नातून जागं व्हावं तसं वाटतंय. जणू काही मी मोंमार्त्र सोडून आर्ल्सला कधी गेलोच नव्हतो.’’

हेन्रीने मोठ्या आश्वासकपणे आपला हात त्याच्या खांद्यावर ठेवला, ‘‘खरंय व्हिन्सेंट. ते एक दुःस्वप्नच होतं. आता सगळं संपलंय. आयुष्याला नव्यानं सुरुवात झालीय असं समज.’’

व्हिन्सेंट आशेने किंचित हसला, ‘‘तुझं कसं काय चाललंय?’’

‘‘माझं काय,’’ हेन्री खांदे उडवत उसासा सोडत म्हणाला, ‘‘ठीक चाललंय. जसा जमेल तसा वेळ ढकलतोय झालं. कधी पेंटिंग, कधी मासिकांची, गाण्याच्या चोपड्यांची मुखपृष्ठं, वर्तमानपत्रासाठी इलस्ट्रेशन असं काहीतरी चालू असतं. मुलँ रूजसाठी एक पोस्टर करायचं कबूल केलंय. कधी जमतंय कोण जाणे. बरं तू पॅरीसमध्ये किती दिवस आहेस?’’

‘‘मी उद्याच ओव्हेरला जायचं म्हणतोय. इथे तेओची जागा खूप लहान आहे. त्यात लहान मूल.’’

“त्यासाठी पॅरीस थोडंच सोडायला पाहिजे. तू इथे माझ्याकडे येऊन राहा. मी एकटाच आहे.”

व्हिन्सेंटने मोठ्या प्रेमाने हेन्रीचा हात आपल्या हातात घेतला. “तुझ्या आपुलकीबद्दल धन्यवाद. पण पॅरीस माझ्यासारख्याला मानवणार नाही.”

तो कोचावरून उठून भिंतीच्या दिशेने गेला व म्हणाला, “मला तुझी पेंटिंग बघू दे. बऱ्याच दिवसांत कोणाचं काम पाहिलं नाहीय.”

“सावकाश बघ. तोपर्यंत मी कपडे बदलून येतो. आपण जेवायला बरोबरच जाऊ, ओग्युस्तिनाजमध्ये. ठीक आहे ना?” त्या दोघांनी एकमेकांकडे पाहिले. गतस्मृती चाळवल्या गेल्या. जवळच्या आणि दूरच्याही.

त्या दोघांची जोडी पाहताच ओग्युस्तिना एप्रनला हात पुसत धावत बाहेर आली.

“व्हिन्सेंतो, कॅरिस्सिमो, व्हिन्सेंतो!”

तिने व्हिन्सेंटला दोन्ही हातांनी धरले. क्षणभर त्याच्या डोळयांत रोखून पाहिले व आनंदाने उचंबळून मिठी मारली. गालाचे चुंबन घेतले. जेव्हा तिने त्याला सोडले तेव्हा तिच्या गालांवरून अश्रू ओघळत होते.

“मला वाटलं नव्हतं आपली पुन्हा कधी भेट होईल म्हणून.” ती हुंदके देत म्हणाली, “आणि तुम्ही मस्य तुलूझ्, किती दिवसांनी इकडे फिरकलात. तेसुद्धा अशा वेळी की सगळे निघून गेल्यावर.” तिच्यातील आनंदी वृत्ती व उत्साह अजून टिकून होता, पण तरीही कालानुसार तिच्यात थोडासा फरक पडला होताच. काळयाभोर केसात रुपेरी तारा डोकावत होत्या. गोबरे गाल निबर दिसू लागले होते.

त्या दोघांनी एका कोपऱ्यात बसून शांतपणे जेवण घेतले. जेवण संपल्यावर ती लिक्युअरची बाटली घेऊन त्यांच्या टेबलावर येऊन बसली.

“हे खास आजचा दिवस साजरा करण्यासाठी. ल स्ट्रेटा. जगातील उत्कृष्ट लिक्युअर आहे हे. याचं वैशिष्ट्य म्हणजे हे प्याल्याने प्रेमभंगामुळे झालेला दाह शांत होतो.” ती तीन ग्लास भरत म्हणाली.

“काय झालं एवढं उदास व्हायला?” हेन्रीने विचारले.

तिच्या भोकरासारख्या मोठ्या सुंदर समजूतदार डोळयांमध्ये काहीतरी हरपल्याची जाणीव दिसत होती. पॅरीसमध्ये तिचा जीव रमत नव्हता. तिला तिच्या घरची ओढ लागली होती. समुद्रकिनाऱ्यावर वसलेल्या, वर्षभर भरपूर सूर्यप्रकाशात न्हाणाऱ्या, टुमदार गावातल्या लहानशा घराची. ओग्युस्तिनाजमधून निघाल्यावर हेन्रीने एक घोडागाडी केली व व्हिन्सेंटला आयफेल टॉवर दाखवायला घेऊन गेला. ऑपेरा, प्लेस द ल कॉनकॉर्ड, शाँझ् एलिजे असे करीत ते आयफेल टॉवरपाशी आले.

“कधी कधी मला वाटतं संगीतापेक्षा वास्तुकलेच्या दर्शनाने भावना जास्त उचंबळून येतात.” हेन्री म्हणाला.

आयफेल टॉवर पाहून झाल्यावर ते इकडे तिकडे मनमुराद भटकत होते. कॉनसर्जरी, लूव्हर असे फिरत फिरत ते सीन नदीच्या डाव्या काठावर आले.

“पॅरीस किती सुंदर शहर आहे नाही? मी विसरूनच गेलो होतो.” व्हिन्सेंट म्हणाला.

“खरं आहे तू म्हणतोस ते. हा एक असा रंगमंच आहे की येथे नटांपेक्षा नाटकाचे पडदेच जास्त भाव खाऊन जातात.” हेन्री म्हणाला.

आकाशात मावळतीला नोत्र दॅमची भव्य कमान उठून दिसत होती. ते दोघे सहज चर्चमध्ये गेले. मेणबत्तीच्या फडफडत्या ज्योतीकडे बघत व्हिन्सेंट अस्पष्ट आवाजात काही तरी पुटपुटत होता, जणू काही देवाशी बोलत असल्यासारखा. बिचारा व्हिन्सेंट. तो जिंकला होता तसाच थकलाही होता. जीवनाचा प्रवाह एखाद्या प्रपातासारखा कोसळून गेल्याने पार रिता झाला होता.

“आज पीएर टँग्वीने आपल्या सगळ्या मित्रांना जेवायला बोलावलंय. तू आल्याचं माहीत असतं तर तुलाही बोलावलं असतंच. तू चल आमच्याबरोबर. तुला भेटून सर्वांना आनंदच होईल.”

त्या दिवसाच्या फेरफटक्याची अखेर पीएर टँग्वीच्या दुकानासमोर झाली. त्यांना घोडागाडीतून उतरताना पाहताच टँग्वीने धावत पुढे होऊन व्हिन्सेंटला मिठी मारली.

“तुमचीच काय ती कमी होती. आता पार्टीला खरी रंगत येईल.”

पीएर त्या दोघांना घेऊन स्वयंपाकघरात गेला. वाफाळलेल्या सुपाच्या पातेल्यासमोर उभी असलेली त्याची बायको एखाद्या चेटकिणीसारखी वाटत होती. व्हिन्सेंटच्या अनपेक्षित येण्यामुळे स्वयंपाकघरात परत एकदा आनंदाचे चीत्कार, मिठ्या, गालांचे चुंबन वगैरे भावनांचे उत्स्फूर्त आविष्कार झाले. नंतर टँग्वी सर्वांना घेऊन पाठच्या अंगणात गेला. अंगणात जेवणाचे टेबल मांडले होते.

“बघ कसं एखाद्या खेडेगावासारखं मोकळं वाटतं की नाही? हवासुद्धा कशी छान पडलीय. तुला मी सांगतच होतो की या वातावरणासाठी पिस्सारोसारखं पॅरीस सोडून दूर रहायला जाण्याची काही गरज नाही.”

सर्वांनी जेवायला सुरुवात केली, पण टँग्वी मात्र वाइन किंवा जेवण कशालाही हात न लावता तसाच बसून होता.

“तुम्ही का थांबला आहात?” हेन्रीने विचारले.

“मस्य तुलूझ् माझं पोट बिघडलंय. थोडं कमी जेवलेलं बरं.”

“हा त्रास बरेच दिवस चालू आहे. मी किती वेळा सांगितलं की डॉक्टरला दाखव म्हणून. दवाखाना अगदी आमच्या शेजारीच आहे, पण हा काही ऐकायला तयार

नाही. आता तुम्ही काही समजावलंत तर तुमच्या या म्हाताऱ्या मित्राला.'' टँग्वीची बायको म्हणाली.

''मी काही त्या बुर्झ्वा डॉक्टरला माझ्या पोटाला हात लावू देणार नाही. काही झालं तरी हा तत्वाचा प्रश्न आहे.'' टँग्वी एकेकाळीचा खंदा अराजकवादी. मित्रांच्या आग्रहाला त्याने भीक घातली नाही. चर्चा टँग्वीच्या पोटदुखीवरून अराजकवाद्यांनी केलेले फ्रान्सचे नुकसान यावर घसरण्याच्या पूर्वीच त्याने होकूसाईच्या (प्रसिद्ध जपानी चित्रकार) प्रिंट्सचा फोल्डर दाखवायला काढला.

रात्र हळूहळू सरत होती. हवा शांत होती. सभोवताली टिपूर चांदणे पडले होते. टेबलावरच्या एकुलत्या एक दिव्यावर रात्रीच्या अंधारात उडणारे पतंग झडप घालीत होते. त्यांच्याकडे पाहत हेन्री म्हणाला, ''या कीटकांच्या आणि काही माणसांच्या वर्तनात किती साम्य आहे नाही? सर्वनाश समोर दिसत असूनही आपला ध्यास सोडायचा नाही.''

हेन्रीच्या या बोलण्यावर निःशब्द शांतता पसरली. रातकिड्यांच्या किर्र आवाजाच्या पार्श्वभूमीवर दिव्यावर झडप घालून मरून पडणाऱ्या पतंगांकडे सर्वजण गंभीरतेने बघत होते.

''हेन्री,'' शांततेचा भंग करीत व्हिन्सेंट म्हणाला, ''काल तू कपडे करीत असताना मी तुझी पेंटिंग पहात होतो. ती भुऱ्या केसांची मुलगी आहे ना, तुझ्या पोर्ट्रेटमध्ये वारंवार दिसणारी, तिच्यापासून तू सांभाळून रहा. तिला तुझं आयुष्य उध्वस्त करू देऊ नकोस. मी तुझ्यापेक्षा दहा पावसाळे जास्त पाहिलेयत. या जगाला सांगण्यासारखं अजून बरंच काही तुझ्याकडे आहे. ते सर्व कॅनव्हासवर उतरव. त्या मुलीच्या नादामुळे तुला जे सांगायचं आहे ते राहून जाईल.''

व्हिन्सेंटची आणि आपली पुन्हा भेट होणार नाही असं हेन्रीला आत खोल कुठेतरी जाणवले. त्याला आठवणारा व्हिन्सेंट केव्हाच संपला होता. अंतर्यामी असलेल्या कणवेमुळे त्याच्या ओबडधोबड चेहऱ्यावर एक प्रकारची ऋजुता दिसून


येई. ती ऋजुता, अस्वस्थपणा, अंतर्मनातील खळबळ आता शांत झाली होती. त्या जागी एक धीरगंभीर भाव आला होता आणि निळीशार नजर दूर पैलतिरी लागल्यासारखी दिसत होती.

टँग्वी झोपायला गेल्यानंतरसुद्धा बराच वेळ त्यांच्या गप्पा चालू होत्या. निघताना हेन्री त्याच्याबरोबर तेओच्या सिटी पिगालमधल्या घरापर्यंत गेला.

''मित्राचा निरोप घेताना डचमध्ये आम्ही *फारवेल म्येन फ्रिएंद* असं म्हणतो. फ्रेंचमध्ये याचा अर्थ *अदियू मोन आमी* असा होतो.'' व्हिन्सेंटचा चेहेरा प्रसन्न हास्याने खुलला होता.

अदियू. म्हणजे ही भेट अखेरची ठरणार आहे याची व्हिन्सेंटलाही कल्पना होती की काय. हेन्रीने व्हिन्सेंटचा हात हातात घेतला. त्याच्या एकाकी, खिन्न चेहऱ्याकडे पोटभर पाहून घेतले.

''*अदियू मोन आमी. अदियू व्हिन्सेंट.*'' त्याचा आवाज रुद्ध झाला होता.



(पोर्ट्रेट ऑफ पीएर टँग्वी – व्हॅन गॉग – तैलरंग, कॅनव्हास, ६५x५१ सेमी, १८८७ – रोदँ म्युझियम)

- ६० -

लॉजवर परतल्यावर हेन्रीला मारीशिवाय चैन पडेनासे झाले. रात्र रात्र तिचा सुकुमार देह त्याच्या नजरेसमोरून हलत नसे. शेवटी एके दिवशी तो तिचा पत्ता शोधत सॅबॅस्टोपलच्या एका गुत्त्याच्या समोर येऊन उभा राहिला. हेन्रीशी अत्यंत उद्धटपणे वागणारी मारी तिथे बेबेरसमोर अगदी गरीब गायीसारखी बसली होती. तो तिला कशावरून तरी रागे भरत होता. बोलता बोलता त्याने तिच्यावर हात उगारला. तेवढ्यात हेन्रीचा गाडीवान तिला हेन्रीचा निरोप सांगायला आला आणि थोडक्यात ती बचावली.

"ओह! तुम्ही आलात होय." मोठ्या फणकाऱ्यात ती म्हणाली, "आता काय पायजे तुम्हाला?"

"मारी! माझं चुकलं. मी तुला परत बोलवायला आलोय." नशिबाने हेन्री अंधारात उभा असल्याने त्याचा पडलेला चेहरा तिला दिसण्याची शक्यता नव्हती. त्यातल्या त्यात तेवढेच समाधान.

"मला गरज नाही आता. माझं ठीक चाललंय इकडे. लई श्रीमंत लोक माझ्या पाठी लागले आहेत. ते माझ्याशी प्रेमाने वागतात. तुमच्यासारखं अंगावर ओरडत नाहीत."

"मी तुला वचन देतो. मी परत तुझ्या अंगावर ओरडणार नाही."

"आणखी एक गोष्ट. आता मला पन्नास नाही शंभर पाहिजेत. बघा. परवडत असेल तर येते." ती जिंकली होती आणि तिच्या विजयाची खंडणी वसूल करीत होती.

तो गाडीत खाली मान घालून हातातल्या काठीवर भार देऊन बसला होता. कामवासनेने माणसाचे किती अधःपतन होऊ शकते त्याचा विचार करीत. पाच मिनिटांत ती धावत आली. गाडीत चढता चढता मागे वळून दरवाजात उभ्या असलेल्या तिच्या याराकडे तिने एक कटाक्ष टाकला व हात उंचावून उडते चुंबन घेतले.

गाडी रू कलँकूरच्या दिशेने धावू लागली. ती हेन्रीला अगदी बिलगून बसली होती. दोन्ही हातांनी हेन्रीचा चेहरा आपल्याकडे ओढून त्याचे चुंबन घेत ती म्हणाली,

''मला ठाऊक होतं की तुम्ही परत मला बोलवायला येणार ते. माझाही जीव लागत नव्हता तुमच्याबिगर.''

तिच्या मऊ लुसलुशीत वक्षस्थळांचा स्पर्श त्याला सुखावत होता. तिचे ओठ त्याच्या ओठांवर होते तर हात जांघेत. ती खोटे बोलत असली तरी त्याने काय मोठा फरक पडणार होता?

''बेबेर मला म्हणाला की, मी तुमच्याशी जे वागले ते बरोबर नाही. मी तुमची माफी मागायला पाहिजे.''

बेबेर आणखी काय म्हणाला असेल ते तिने न सांगताही त्याच्या लक्षात आले. रोज शंभर फ्रँक देणारा बकरा मोठ्या नशिबाने मिळाला आहे तो हातचा सोडू नकोस. जमेल तेवढा कापून घे. त्याने तिच्याकडे पाहिले. शिष्टपणे मान उडवणे, नापसंतीने ओठ मुरडणे, तिच्या वागण्यातला सगळा नखरा नाहीसा झाला होता. एका मारकुट्या नाठाळ गायीचे रूपांतर मारूनमुटकून का होईना पण एका गरीब गायीत झाले होते. ही गाय एका कसायावर भाळली होती. त्याच्या हातात आपले दावे देऊन ती त्याच्या इशाऱ्यांवर फिरत होती, पण तिचा मूळचा नाठाळपणा काही गेला नव्हता.

''ठीक आहे. माफी मागायची तशी गरज नाहीय. झालं गेलं विसरून जा. बेबेरने विचारलं तर सांग मी माफ केलंय म्हणून.''

मादाम ल्युबेतच्या लॉजवर आल्यावर परत पहिला पाढा सुरू झाला, पण या खेपेला मारीमध्ये एक महत्वाचा फरक पडला होता. ती अगदी बेबेरच्या आज्ञेत असल्यासारखी वागत होती. एके दिवशी सकाळी तिने आपण होऊन पोज द्यायची तयारी दाखवली.

“तुमाला पायजे असेल तेव्हा मी सगळे कपडे काढूनसुद्धा उभी राहीन.” हे सगळे नाटक बेबेरने पढवून दिल्याप्रमाणे वठत होते, पण त्यातला खोटेपणा लपत नव्हता. तिने झटकन आपले कपडे उतरवले व ती नग्न झाली.

“बघा. माझं अंग कसं नितळ आहे ते. कुठे एक डाग नाही की पुळी. बघा तर हात लावून कसं मऊशार आहे ते.”

तिने त्याचा हात हातात घेतला व आपल्या मांडीवर ठेवला. क्षणभर दोन मांड्यांत दाबून धरून मग वर उचलून छातीवर ठेवला.

“बघा माझी थानं कशी घट्ट आहेत ती.”

त्याने हळूच आपला हात सोडवून घेतला व म्हणाला, “फार छान आहेत तुझे स्तन, पण आता तुला उशीर होत असेल नाही? तुझी जायची वेळ झाली.”

“पोज द्यायचे वेगळे पैसे मी घेणार नाही. शंभर फ्रँकमध्ये सगळं. दिवसातून कितीही वेळा मला पोज द्यायला सांगा, नाही तर शेजेला घ्या. मी कशालाही नाही म्हणणार नाही.”

“फार आभारी आहे तुझा. पण आता चटकन कपडे घाल आणि जा पाहू एकदाची. पोजचं पुन्हा कधीतरी फुरसतीने बघू.”

दुसऱ्या दिवशी तिने सकाळी लवकर उठून सगळा स्टुडिओ झाडून साफ करून ठेवला. पूर्वीचा तिरसटपणा कुठे आणि आताची ही खुशामतखोरी कुठे? तिने त्याच्या पेंटिंगची तारीफ करायला सुरुवात केल्यावर मात्र या सगळया नाटकाची तालीम काल बेबेरच्या दिग्दर्शनाखाली झाली असणार याची खात्री पटली. त्या बुटक्याच्या पेंटिंगची स्तुती कर. चांगले म्हणायला तुझे काय जातेय? दिवसाकाठी शंभर फ्रँक हाती पडले की काम झाले!

दोन दिवसांनी नाटकाचा पुढचा अंक सुरू झाला.

"मी तुम्हाला सांगितलं होतं ना की एका माणसावर माझे प्रेम आहे म्हणून. तो एकदम नालायक निघाला. काल त्याचं नि माझं लई कडाक्याचं भांडण झालं. मी त्याचं तोंडसुद्धा बघणार नाही अशी शप्पत घेतलीय. आता मी तुमच्याबरोबरच कायमचं राहायचं ठरवलंय. तुमच्यासारखा जंटलमन मिळायला मोठं नशीब लागतं." बेबेर दिग्दर्शित नाटकाचा दुसरा अंक.

अशा तऱ्हेने ती खऱ्या अर्थाने त्याची रखेली झाली. त्याला हवी होती तशी ती चोवीस तास त्याच्याबरोबर राहू लागली. दिवसा घरकाम, स्वैंपाक, धुणी-भांडी, झाडलोट, संध्याकाळी त्याच्याबरोबर फिरायला, रात्री शेजेला. स्वतःला नाकारत जगण्याच्या तिच्या या शक्तीचे त्याला आश्चर्य वाटायचे. कशासाठी म्हणून या वेश्या एवढी तडजोड करीत असतील? ती सतत त्याच्याबरोबर असल्याने आपल्या निर्बुद्ध प्रश्नांनी त्याला भंडावून सोडी. कधी कधी ती स्वतःत हरवून गेल्यासारखी शून्यात नजर लावून बसे. त्या वेळी ती बेबेरचा विचार करीत असणार हे त्याला सहज कळून येई.

तिच्या वर्तनातील या बदलाचा परिणाम त्यांच्या लैंगिक जीवनावर झाला. त्यांच्या संबंधांतील खरी लज्जत परस्परांविषयी वाटणाऱ्या तिरस्कारात होती. आता तिचे रूपांतर आपल्या गिऱ्हाइकाची मर्जी सांभाळण्यात सदैव दक्ष असणाऱ्या वारांगनेत झाले होते. रतिक्लांत अवस्थेतील सुस्कारे वगैरेची अगदी छान नक्कल करणाऱ्या चतुर वारांगनेत.

"मला अगदी दमवलंत हो."

"आता तू झोप पाहू. खूप उशीर झालाय."

"माझं तुमच्यावर खरंखुरं प्रेम आहे. तुमचं आहे का माझ्यावर?"

"तू मला आवडतेस."

"नाही तसं नाही. प्रेम आहे का तुमचं माझ्यावर?"

"प्रेम. या शब्दाचे बरेच अर्थ होतात."

"मी तुम्हाला सुख देते की नाही? तुमच्या घरातली सगळी कामं करते. तुमच्याशी चांगलं वागते. तुम्हाला पाहिजे तेव्हा तुमच्याबरोबर झोपते. अशी दुसरी कुणी भेटली होती का तुमाला यापूर्वी?"

"नाही बाई तूच पहिली. आता उजाडायला झालंय. थोडं झोपू या आता."

थोड्याच दिवसांत त्याच्या लक्षात आले की त्याची तिच्याविषयीची वासना हळूहळू कमी होत चाललीय. अशा निर्बुद्ध मूर्ख वेश्येची त्याला एका परीने दया वाटायची. तिच्यातील मूळचा तिखटपणा जाऊन आता उरले होते ते फक्त बुळबुळीत लांगुलचालन. वरवर दिसणाऱ्या सौजन्यामागे भावनांचा अभाव होता. जसजशी तिच्याविषयी वाटणारी ओढ कमी होत गेली तसतसा त्याच्या वागण्यात त्रयस्थपणा येऊ लागला. पण त्याच्या सहृदय स्वभावामुळे तिला वाटायचे की तो तिच्या पार मुठीत आहे. त्यालाही तिचा हिरमोड होऊ द्यायचा नव्हता. पण खरे पाहता तो आता पार कंटाळला होता. हे संबंध जितक्या लवकर संपतील तेवढे त्याला हवे होते, पण कसे तर अगदी शांतपणे एखादे पिकलेले फळ झाडावरून गळून खाली पडावे तेवढ्या नैसर्गिक रीतीने अलगद, कसलाही आवाज न करता.

ॲझम्पशन डेच्या निमित्ताने त्याने तिला कानातल्या रिंगची एक जोडी घेऊन दिली.

"तुला आठवतंय. आपण पहिल्यांदा भेटलो त्या रात्री तू मला म्हणाली होतीस की तुझ्याकडे पूर्वी कानातली होती, पण नंतर ती हरवली."

"पण ती तर खोटी होती."

"ही खऱ्या सोन्याची आहेत. वेळ पडल्यास तुला गहाण ठेवता येतील."

"तुम्ही एवढ्या प्रेमाने दिलीयत. एक वेळ उपाशी राहीन, पण कधीही गहाण ठेवणार नाही."

त्याला खात्री होती की बेबेर काही फार दिवस तिच्याकडे ती कानातली टिकू देणार नाही. पण त्याचे त्याला आता काही वाटत नव्हते. हे संबंध आता शक्य तितक्या लवकर आणि शक्य तेवढ्या समजूतदारपणे कसे संपवता येतील याचा तो विचार करू लागला.

- ६१ -

एके दिवशी त्याने हळूच जाहीर केले की एका महत्वाच्या कामासाठी त्याला दोन-तीन दिवस पॅरीसच्या बाहेर जावे लागणार आहे. तीन दिवस बेबेरबरोबर घालवायला मिळणार याचा आनंद तिच्या चेहऱ्यावरून ओसंडून जात होता, पण तिने मी घरीच राहते वगैरे खूप नाटक केले. इतके की त्या तद्दन खोटेपणाची त्याला उबग आली. मग त्यानेसुद्धा अधिक खोलात न जाता तिला तिच्या बहिणीकडे जाण्याची परवानगी दिली व वर थोडे पैसेही. त्या दिवसांत त्याने स्वतःला स्टुडिओत कोंडून घेतले व सपाटून काम केले. त्या तीन दिवसांत तो पूर्ण ताळयावर आला. शेवटचा फटका मारण्याचा कठोर निर्णय त्याने घेतला. एकदा हे नक्की झाल्यावर त्याला जाणवले की हे वाटते तितके सोपे नाही. संसारात दुःखी असणारी कित्येक जोडपी वेगळे होण्यापेक्षा आहे तसेच फरफटत जगणे का पसंत करतात हे त्याला उमगले. सहजीवनातल्या परवडीपेक्षा वेगळे होण्यातील दुःख कितीतरी पटीने मोठे असते.

तिची पाठवण कशी करावी याचा त्याने नीट विचार केला. आपण तिला घालवून दिल्यावर मिळकत बंद झाली म्हणून बेबेर तिला थारा देणार नाही याची त्याला कल्पना होती. मग ती कुठे जाईल, काय करेल, कशी जगेल? अंधाऱ्या गल्लीबोळातील चोरटा वेश्या व्यवसाय, पाठीवर पोलिसांचा ससेमिरा, कधीतरी पकडले जाऊन सँ लझार सुधारगृहात रवानगी, कार्ड, फार तर एखादे अधिकृत वेश्यागृह, दारूचे व्यसन, घाणेरडे रोग व शेवटी एखाद्या गटाराच्या कडेला आलेला बेवारशी मृत्यू.

मनाचा निश्चय करण्यात एक आठवडा गेला. सप्टेंबरमधल्या एका शांत दुपारी सगळे धैर्य गोळा करून तो म्हणाला,

“मारी, बरेच दिवस मी या गोष्टीचा विचार करतोय. आता हे सगळं थांबवायची वेळ आलीय.”

हे तिला अगदी अनपेक्षित होते. तिने गोंधळून त्याच्याकडे पाहिले व म्हणाली,

“म्हणजे मी तुम्हाला नकोशी झालेय का?”

“तसं नव्हे. प्लीज मला समजून घे. हे बघ, तू एका रात्रीसाठी म्हणून माझ्याकडे आलीस. त्याला आता सात महिने होतील. या सात महिन्यांत तू मला खूप सुख दिलंस. त्याबद्दल मी तुझा आभारी आहे. पण कोणत्याही गोष्टीला शेवट हा असतोच. तेव्हा शक्य तितक्या समजुतीने आपण हे थांबवूया.”

त्याने आपल्या कोटाच्या खिशातून एक पाकीट बाहेर काढले. “हे बघ. मी तुझ्यासाठी काय आणलंय ते.”

तिचा चेहरा काळाठिक्कर झाला. या गोष्टीचा नेमका अर्थ तिच्या मठ्ठ डोक्यात नीट शिरला नसला तरी तिच्या शरीराला मात्र तो चांगलाच जाणवला होता. कसायाच्या पुढ्यातील बकरी जशी प्राणभयाने थरथर कापू लागते तसे तिचे सर्वांग कंप पावू लागले. जैविक अस्तित्वाला धोका पोचल्यावर शारीरिक जाणीव बौद्धिक जाणिवेवर कशी कुरघोडी करते ते पाहणे मोठे भयप्रद होते.

“इथे बस बघू माझ्या जवळ.”

ती अगदी खिळून गेल्यासारखी उभी होती.

“मी काय केलं? माझं काही चुकलं का?” बोलताना ती अडखळत होती. “मी एवढी चांगली वागत होते. पाहिजे तर नागव्याने पोज देईन...रोज फरशी घासेन.”

तिला जसे पढवले होते त्याबरहुकूम वागूनसुद्धा अखेर हेच फळ पदरात पडले काय असा दयनीय भाव तिच्या बोलण्यातून प्रकट होत होता.

“तुझा यात काही दोष नाहीय.”

“आता बघा तुम्ही आपल्या तोंडाने कबूल करताय की माझे काहीही चुकलेलं नाही. तरी तुम्ही...”

“तसं नाही मारी. पाहिजे तर माझंच चुकलं असं म्हणेनास का? शब्दाला शब्द वाढवण्यात काय अर्थ आहे.”

त्याने ते पाकीट पुन्हा तिच्या पुढे केले. “उघडून तर बघ. तुझ्या नावाचा ढकलगाडीचा परवाना. यासाठीच तू बँकेत पैसे साठवीत होतीस ना?”

तिच्यावर ओढवलेल्या प्रसंगाचे परिणाम तिच्या लक्षात येऊ लागले. बेबेरने सांगितलेल्या नाटकातील भूमिकेचे भान विसरून अनावधानाने ती म्हणाली, “हे सगळं मी बेबेरला कोणत्या तोंडाने सांगू? तो म्हणेल माझंच काही चुकलं असेल. कृपा करून मला माघारी जायला सांगू नका. तुमच्या पाया पडते मी. तुम्ही सांगाल ते करायला मी तयार आहे. शंभर फ्रँक जास्त वाटत असतील तर पहिल्यासारखे पन्नास द्या. चाळीससुद्धा चालतील. नाही तर तुम्हाला काय द्यायचे असतील तेवढे द्या. पण कृपा करून मला येथून जायला सांगू नका.”

तिच्या गळयात हुंदका दाटून आला. डोळे पाण्याने डबडबले. ती त्याच्यासमोर गुडघे टेकून बसली आणि त्याच्या हाताची चुंबने घेऊ लागली.

“प्लीज. माझं ऐक.”

पण ती काही ऐकण्याच्या परिस्थितीत नव्हती. तिने आवेगाने ब्लाऊज फाडून आपली छाती त्याच्यासमोर उघडी केली. दोन हातात आपला स्तन घेऊन त्याला दाखवीत ती म्हणाली,

"बघा माझी थानं कशी घट्ट आहेत. तुम्हाला आवडतात ना. घ्या तुमच्या हातात. काय पाहिजे ते करा. दाबा, आवळा, मी काहीही बोलणार नाय."

हुंदके देत तिने आपली चड्डी काढली व स्कर्ट वर करीत त्याला कोचावर खेचण्याचा प्रयत्न केला. पण या वेळी ही मात्रा लागू पडत नाहीसे पाहून तिने अचानक आपला पवित्रा बदलला, नांगी वर उचलेल्या विंचवासारखा.

"तुमचे मनसुद्धा तुमच्या चेहऱ्यासारखे कुरूप आहे. तुम्ही अगदी नंबर एकचे दुष्ट माणूस आहात. फेंगड्या पायाचा बुटबैंगण. जशी चाल तसेच वागणे. तुमचा हात अंगाला लागला की अंगावर झुरळ चढल्यासारखं वाटतं. बेबेरने माझ्यावर जबरी केली नसती तर कितीही पैसे दिले तरी मी तुम्हाला जवळसुद्धा येऊ दिलं नसतं एवढे तुम्ही विद्रुप आहात."

"तुमचं हे खुरटेपण म्हणजे तुम्हाला मिळालेली एक शिक्षाच आहे. लई बेस्ट झालं तुम्ही खुरटे निपजलात ते. मी काय म्हणतेय ते कानात शिरतंय का तुमच्या?"

किंचाळल्यासारख्या आवाजात बोलताना ती कुचेष्टेने हसत होती. तिच्या प्रत्येक शब्दात नागिणीच्या फुत्कारातील विखार होता. सगळे तारतम्य सोडून ती बरळत होती. ज्या समंजसपणाने हा प्रश्न सोडवण्याचे त्याने ठरविले होते ते आता शक्य नव्हते. त्याचा निश्चय अधिकच दृढ झाला आणि पुढचे काम सोपे झाले. शेवटी तिचे तोंड बंद करण्यासाठी त्याला पाटूला बोलावण्याची धमकी द्यावी लागली तेव्हा कुठे ती ताळयावर आली. तिने पटापट कपडे केले.

"माझं सगळं सामान माझ्या बहिणीकडे पाठवून द्या."

"तू बेबेरकडे का जात नाहीस?"

"तो मला घरात घेणार नाही. त्याचं दुसऱ्या एका मुलीवर प्रेम आहे. त्याला फक्त माझे पैसे हवेयत."

“आपलं ज्याच्यावर प्रेम नाही अशा व्यक्तिवर प्रेम करण्याचे दुःख तुझ्याही वाटेला आलेलं दिसतंय. ठीक आहे. काही काळ एकट्याने काढावा लागेल. एखादा दयाळू, प्रेमळ माणूस तुझ्या जीवनात लवकरच येवो अशी आशा करू या.”

त्याच्या बोलण्याकडे तिचे लक्ष नव्हते. तिने केस सारखे केले. एखाद्या लहान मुलीसारखे गालावरचे अश्रू पालथ्या मुठीने पुसले. तिच्या त्या बालिश आविर्भावाने त्याचे मन करुणेने भरून आले. तिने त्याच्या हातातील पाकीट घेतले आणि आभारसुद्धा न मानता मागे वळून यंत्रवत जडपणे दरवाजाबाहेर निघून गेली.

ती गेल्यावर स्टुडिओ सुना सुना वाटू लागला. संध्याकाळची वेळ होती. सूर्यकिरणांच्या तिरिपीत माशा उडताना दिसत होत्या. तिच्या पावडरीचा उग्र वास मागे दरवळत होता. तो जायला आणखी दोन-तीन दिवस लागले असते.

तो जागचा उठून इझलजवळ गेला. त्याने पॅलेट हातात घेतले व झपाट्याने रंगकाम करायला सुरुवात केली.



(रेड हेअर गर्ल वुईथ व्हाईट ब्लाऊज – तुलूझ लोत्रेक – तैलरंग, कॅनव्हास, १८८८,
म्युझियम ऑफ फाईन आर्ट्स, पॅरीस)

## पोस्टर

पेर कोटेलचा ॲतलिए द लिथोग्राफिक अर्टिस्टिकचा वर्ग नोत्र दॅम चर्चच्या मागच्या बाजूला एका जुन्यापुराण्या मोडकळीस आलेल्या इमारतीत होता. पूर्वी त्या जागेचा वापर घोड्यांचा तबेला म्हणून केला जात असे. त्या जागेला अजूनही येणाऱ्या घोड्यांच्या लिदीच्या वासात आता छपाईची शाई, नायट्रिक ॲसिड, शिरस, तंबाखू आणि कॉफी यांचे वास छानपैकी मिसळून गेले होते.

हेन्रीने आपली ओळख करून दिली व लिथोग्राफी शिकण्याचा आपला मनोदय व्यक्त केला. हेन्रीचे बोलणे ऐकत असताना पेर कोटेलचे अर्धे लक्ष कागदांच्या थप्पीवर पडलेल्या एका छपाईच्या जाडजूड शिळेकडे होते. त्याने डोक्यावर एक घट्ट बसणारी टोपी घातली होती. एका हाताने तो आपल्या लांब दाढीतील एक बट कुरवाळत होता. त्याचा एकूण अवतार एखाद्या चिनी पंडितासारखा किंवा एखाद्या म्हाताऱ्या बकऱ्यासारखा दिसत होता. नक्की कोणासारखा यावर हेन्रीचे एकमत होत नव्हते.

‘‘मस्य झिडलरना एक पोस्टर करून द्यायचं तुम्ही कबूल केलंयत असं मी ऐकलंय ते खरं आहे ना?’’

‘‘रंगीत पोस्टर.’’

‘‘रंगीत पोस्टर.’’ पेरे कोटेल मान डोलावत म्हणाला, ‘‘आणि लिथोग्राफीचे काम तुम्ही पूर्वी कधी केलंय?’’

‘‘नाही.’’

‘‘म्हणजे या कलेविषयी अगदी प्राथमिक ज्ञानसुद्धा तुम्हाला नाही.’’

‘‘बरोबर.’’

‘‘हे काम स्वतःच करायचा तुमचा विचार आहे.’’

“होय. मला हवा तो परिणाम साधण्यासाठी सगळ्या शक्यता अजमावून पाहायचा विचार आहे.”

आपली लंबेलांब दाढी कुरवाळीत बराच वेळ पेर कोटेल विचारात गढून गेल्यासारखा गप्प होता. दरम्यान हेन्री छापखान्याचा अस्ताव्यस्त पसारा न्याहाळत होता. खिडकीतून स्वच्छ सूर्यप्रकाश आत येत होता. दुरून पक्ष्यांचे कुजन ऐकू येत होते. सप्टेंबरमधील तो एक प्रसन्न दिवस होता.

“तुमचे रंगीत पोस्टर झिडलरला तुम्ही कधी द्यायचं कबूल केलंय?” त्याच्या स्वरात किंचित उपहास होता. पहिल्यांदाच त्याने आपली नजर समोरच्या शिळेवरून त्याच्याकडे वळवली.

“एक वर्षात. त्यातील सहा महिने अगोदरच गेलेयत. झिडलर अगदी मेटाकुटीला आलाय. त्यामुळे शक्य तितक्या लवकर.”

“पोस्टरसाठी म्हणून काही रेखाटने केली आहेत?”

“नाही. माझ्या डोक्यात काहीच येत नाहीय. म्हणूनच लिथोग्राफी शिकण्याचा विचार आहे. लिथोग्राफी शिकता शिकता काहीतरी सुचेलच. किती दिवस लागतील शिकायला?”

“दिवस. लवकरात लवकर म्हणजे पाच वर्षं लागतील.”

“पाच वर्षं? काय म्हणताय काय तुम्ही?”

“एखादं वर्ष जास्तच, पण कमी नाही. तुमच्या अजून लक्षात आलेलं दिसत नाहीय. सर्व ग्राफिक कलांमध्ये लिथोग्राफी ही सर्वात कठीण आणि गुंतागुंतीची अशी कला आहे आणि त्यात रंगीत लिथोग्राफी म्हणजे अधिक गुंतागुंत. कॅप्चर ऑफ जेरुसलेम हे प्रसिद्ध चित्र तयार व्हायला तब्बल दोन वर्षं लागली. तरी त्याला लंडनच्या डे अँड हेग या चित्रशाळेतील तज्ज्ञांचा हातभार लागला होता.”

त्याने हेन्रीकडे रोखून पाहिले.

“ज्याला संगीतातला ओ की ठो कळत नाही अशा माणसाने सरळ सिंफनीला हात घालावा तशी तुमची गत झालीय. या कामात उडी घेण्यापूर्वी तुम्हाला ठाऊक असावं म्हणून सांगतोय. तुम्हाला नाउमेद करण्याचा माझा उद्देश नाही. तरीही तुमचा निश्चयच असेल तर तुम्हाला शिकवण्यात मला आनंदच वाटेल.”

“ठीकय. लगेच सुरुवात केलेली बरी. अगोदरच उशीर झालाय. आता आणखी वेळ फुकट दवडण्यात अर्थ नाही.”

“चला तर मग. तुमचा कोट आणि हॅट काढून ठेवा आणि तिथला एखादा एप्रन घाला पाहू.”

“लिथोग्राफी या शब्दापासूनच सुरुवात करू या. हा ग्रीक भाषेतला एक जोडशब्द आहे. लिथोस म्हणजे शिळा आणि ग्राफी म्हणजे लिहिणे. ह्या तंत्राचा शोध गेल्या शतकात ॲलोइस सेनफेल्डर नामक एका बव्हेरीयन प्रिंटरने लावला. केवढा थोर प्रतिभावंत माणूस असला पाहिजे मस्य.” अशा रीतीने हेन्रीची लिथोग्राफीची शिकवणी चालू झाली.

आल्हाददायक वातावरणाचा सप्टेंबर महिना संपला. शरद ऋतूतील बोचऱ्या वाऱ्यांनी चेस्टनटची रस्त्यावर गळून पडलेली पिवळी पाने भिरभिरत गटारात उडवून द्यायला सुरुवात केली. पण लिथोग्राफीच्या वर्गात मात्र शांतपणे काम चालू होते. छपरावर पावसाची टिपरी वाजत असली तरीही कामात खंड पडत नसे. सकाळी हेन्री निळा एप्रन चढवून शिळेवर वाकून कामाला सुरुवात करी. या माध्यमाचे तंत्र आत्मसात करीत असताना त्याच्या नव्या शक्यतांचा विचार हेन्रीच्या मनात सतत चालू असे.

काम चालू असताना एखाद्या वेळी मद्यपान करायला पेर कोटेलचा विरोध नाही हे लक्षात येताच त्याने थंडी पडायला लागल्याचे निमित्त करून कोनॅकच्या बाटल्यांचा एक खोका चित्रशाळेवर मागवून ठेवला. त्याच्या कामावर पेर खूष असल्याने तो त्याच्या पिण्याकडे दुर्लक्ष करी.

"तुमचं काम विलक्षण आहे. तुम्हाला इथे येण्याच्या पूर्वी लिथोग्राफीची काहीच माहिती नव्हती हे खरं आहे का. तसं असेल तर तुम्हाला लिथोग्राफीचे ज्ञान उपजतच असले पाहिजे असं म्हणावं लागेल."

लवकरच हेन्री लिथोग्राफीमध्ये नवे प्रयोग करायला लागला.

"थांब. सांभाळ. कोणाही लिथोग्राफरने ही पद्धत पूर्वी वापरली नाहीय."

एके दिवशी सकाळी येताना हेन्री टूथब्रश बरोबर घेऊन आला व छपाईच्या शाईत बुडवून बोटांनी त्याचा फवारा शिळेवर उडवायला सुरुवात केली.

"*नॉम दे दियू*. तुम्ही करताय तरी काय." पेर कोटेल धावत त्याच्या टेबलाकडे आला.

"शिळेवर ठिपक्यांचं काम करायचा माझा विचार आहे."

"टूथब्रशने. *मे नो, मे नो, मे नो*. शिळाचित्राचं काम खूप नाजूक हातांनी करावं लागतं ठाऊक आहे ना तुम्हाला? त्यावर असे शिंतोडे उडवून चालणार नाही."

"एकदा स्वतःच्या हातांनी करून पाहा तर. किती छान काम होतंय ते तुम्हाला समजेल."

त्या बुजुर्ग माणसाने टूथब्रश हातात घेऊन स्वतः फवारा उडवून पाहिला.

"झकास. फारच सोपं आहे. इतके दिवस कसं कोणाला सुचलं नाही? शाबास. तुम्ही हाडाचे लिथोग्राफर दिसताय."

थोड्याच दिवसात हेन्री लिथोग्राफीच्या सर्व अंगांत पारंगत झाला. कोणतेही कसब शिकता शिकताच तो त्यात प्रावीण्य मिळवी. शिळेवरचे रेखाटन, ठिपक्यांचे काम, रंगीत लिथोग्राफीतील क्लिष्टता. हात शाईने माखलेयत, चेहेऱ्यावर रंगीत खडूचे फराटे उडालेयत अशा अवतारात तो एक निष्णात लिथोग्राफर म्हणून शोभून

दिसायचा. पेर कोटेल सुरुवातीला हेन्रीला सबुरीने घ्यायला सांगत असे. पण त्याची विलक्षण प्रगती पाहून तो थक्क झाला होता. हेन्रीचे अप्रतिम रेखाटन कौशल्य, कोणतेही क्लिष्ट काम कमीतकमी वेळात आत्मसात करण्याचा त्याचा झपाटा. त्याच्या कामात कोणतीही अडचण, कौशल्याच्या मर्यादा कधीही पडल्या नाहीत. या बुटक्या, दारुड्या तरुणाच्या ठायी विलक्षण प्रतिभावंताची लक्षणे दिसत होती.

- ६३ -

नाताळनंतर हेन्रीने पेर कोटेलकडे काही दिवसांची सुटी मागितली.

''मला वाटतं आता पोस्टरच्या कामाला सुरुवात करायला हरकत नाही.''

तो संपूर्ण आठवडा हेन्री स्टुडिओच्या बाहेर पडला नाही. फक्त दोन मॉडेल सोडून इतर कोणालाही तो भेटला नाही. मादाम ल्युबेत जे काही करून वाढी ते खाल्ले न खाल्ले, झोपले न झोपले असं करून तो रात्रंदिवस कामात मग्न होता. सिगरेट पेटवणे, कोनॅकचा पेला भरणे एवढाच काय तो त्यात खंड पडला असेल. फरशीवर सिगरेटच्या थोटकांचा आणि कच्च्या रेखाटनांच्या कागदांचा खच पडला होता. प्रत्येक नवे रेखाटन पहिल्यापेक्षा सोपे, सुबोध आणि जोरदार. शेवटी मनात जे होते ते आपल्या रेषेत पकडण्यात तो यशस्वी झाला.

आठवड्याच्या अखेरीस जलरंगात केलेले एक पोस्टर त्याने पेर कोटेलच्या समोर ठेवले. त्या वृद्ध लिथोग्राफरने एकवार ते पोस्टर निरखून पाहिले. व्हॅलेंटाईनची नशिली पडछाया आणि नर्तिकेने वर उचललेल्या पायावरून घसरणाऱ्या लिंगरीचा प्रचंड व्याप पाहून त्याच्या डोक्यावर जे काही थोडे केस उरले होते ते ताठ उभे राहिले.

''हे आपल्याला छापता येणार नाही.''

''का?''

''एक म्हणजे असे रंग पूर्वी कधीही लिथोग्राफीमध्ये वापरले गेलेले नाहीत.''

“आपण वापरून पाहू.”

“दुसरं म्हणजे हे पोस्टर जेव्हा रस्त्यावर लागेल तेव्हा आपल्या सर्वांना तुरुंगाची हवा खावी लागेल. तुम्हाला पोस्टर केल्याबद्दल, मला तुम्हाला मदत केल्याबद्दल, चार्लस् लेव्हींना छापल्याबद्दल तर झिडलरना प्रसिद्ध केल्याबद्दल.”

“जरा फुकटात थोडा हवापालट झाला तर मजा येईल. चला. ताबडतोब कामाला सुरुवात करू या.”

आता सर्वात कठीण आणि अतिशय किचकट कामाला सुरुवात झाली. प्रथम रेखाटनाची प्रत्येक रंगछटेनुसार अनेक पायऱ्यांमध्ये विभागणी. प्रत्येक रेखाटन उलट बाजूने करायचे, त्यात मेणाच्या खडूने काळजीपूर्वक शेडिंग करायचे. नंतर त्यात छपाईची शाई भरायची. हेन्रीच्या कित्येक दिवसांच्या अथक परिश्रमानंतर लिथोग्राफीची शिळा तयार झाली.

यापुढचे काम पेर कॉटेलचे. ते तो मोठ्या नाटकी आविर्भावात करायचा. प्रत्येक वेळी श्वास रोखून, दाढी कुरवाळीत, आद्य लिथोग्राफर ॲलोइस सेनफेल्डरची करुणा भाकत.

“एखादी चूक आणि सारा खेळ खल्लास.” डोके खाजवत तो म्हणाला. बाजूच्या शिरसाच्या द्रावणात त्याने नायट्रिक ॲसिडचे काही थेंब तोलूनमापून टाकले. “थोडं ॲसिड कमी पडलं तर इचिंग होणार नाही आणि जास्त झालं तर सर्व बारकावे जळून जायचे. मला वाटतं मनासारखं काम होईपर्यंत तीन-चार तरी शिळा फुकट जातील.”

नशिबाने पहिल्याच शिळेचे इचिंग मनासारखे झाले आणि हेन्रीची तेच काम पुन्हा करण्यापासून सुटका झाली. दिवसरात्र सतत काम करून अखेर सर्व शिळांचे इचिंग निर्विघ्नपणे पार पडले. रंगांचे काम सुरू झाले आणि पेर कोटेलच्या चेष्टेला ऊत आला. मोठ्या मुष्किलीने त्याला हव्या त्या रंगांच्या शाईंचे मिश्रण तयार झाल्यावर हेन्रीने सुटकेचा निःश्वास टाकला.

ज्या दिवशी इचिंगचे सर्व काम आटोपले त्या संध्याकाळी हेन्रीने मुलँ रूजमध्ये पाऊल ठेवले व पाय ओढत ओढत बार काउंटरवर गेला.

"हॅलो. मस्य तुलूझ." साराने बघता क्षणी हाक मारली. "बऱ्याच दिवसांत इकडे फिरकला नाहीत ते? काय झालं काय तुम्हाला? तब्येत ठीक आहे ना?"

काउंटरच्या कठड्याचा आधार घेत धापा टाकत त्याने कोनॅक मागवली. साराने ग्लास भरून त्याच्यासमोर ठेवला.

"थोडा दम खा आणि मग प्या. अशी घाईत प्याल्याने काळीज जळतं."

हाताच्या आधारावर आपल्या शरीराचा भार उचलून तो बारच्या स्टुलावर मोठ्या कष्टाने चढून बसला.

"झिडलरना निरोप दे की पोस्टरच्या छपाईच्या शिळा तयार आहेत. लेव्हींना सांगून पेर कोटेलकडून मागवून घ्या आणि छापा म्हणावं हवी तेवढी."

"माझी खात्री होती एक दिवस तुम्ही तुमचा शब्द खरा करून दाखवाल याची. आताच्या आता निरोप धाडते झिडलरना. तुमची रोज चौकशी करायचे ते." तिच्या डोळ्यांत कौतुक होते.

- ६४ -

पोस्टरची छपाई चालू असल्याच्या दरम्यान आर्टिस्ट इंडिपेंडंटसच्या उन्हाळी प्रदर्शनाची तयारी जोरात चालू होती. हेन्री कमिटी एक्झीक्युतीफच्या बैठकीला मोठ्या गंभीरतेने गेला. ही बैठक मोंमार्त्रमधल्या एका कॅफेच्या मागच्या एका कोंदट खोलीमध्ये होती. खोली धुराने भरली होती. अध्यक्ष महाराज आपल्या ॲबसिंथच्या ग्लासावर चमचा आपटून मोठ्याने ओरडून शांतता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नात होते.

“खामोश. बैठक चालू असताना अध्यक्षांच्या परवानगीशिवाय कोणालाही बोलता येत नाही. कृपा करून शांत बसा. त्याशिवाय काम सुरू करता येणे शक्य नाही.”

अध्यक्षांच्या आरडाओरडीकडे कोणाही सभासदाने लक्ष दिले नाही. सर्वजण एकमेकांशी बोलण्यात गुंतले होते. सर्वांचे लक्ष काडेपेटी शोधण्यात, पाईप शिलगावण्यात किंवा दारू मागवण्यात होते. अध्यक्षांनीसुद्धा शांतता प्रस्थापित करण्याचा आपला प्रयत्न सोडून दिला व ॲबसिंथचे घुटके घेत शेजारच्या सभासदाशी गप्पा मारण्यास सुरुवात केली.

हेन्री जॉर्ज सुराच्या शेजारी जाऊन बसला.

“असं आणखी तासभर चालेल. शेवटी सगळे शांत झाल्यावर कामकाजाला सुरुवात होईल.”

हेन्रीने डबल कोनॅक मागवली. जेवण झाल्यावर त्याने जॉर्ज सुराला विचारले, “तुझे ते ठिपक्यांचे काम कसं काय चाललंय?”

“या सर्कसने माझ्या नाकी दम आणलाय. एक तर याचे कंपोझिशन भयंकर गुंतागुंतीचे आहे. त्यात सर्कस म्हणजे परावर्तित प्रकाशातील काम. सूर्यप्रकाशातील काम त्या मानाने खूप सोपं असतं. या सर्कससमोर माझं ग्रँड जेट म्हणजे अगदी पोरखेळ वाटेल. ही बैठक संपल्यावर माझ्याकडे ये. तुला गंमत दाखवतो.”

“*नॉम दे दियू.* आता गप्प बसायला काय घ्याल? ह्यापुढे जो कोणी माझ्या परवानगीशिवाय बोलेल त्याला दंड करण्यात येईल.” अचानक अध्यक्ष महाराज गर्जले. त्यांच्या संयमाची जागा संतापाने घेतली होती. दोन मिनिटांत सगळा गोंधळ शांत झाला. अध्यक्ष एका जाडजूड बांध्याच्या गबाळयासारखे कपडे केलेल्या माणसाकडे वळून म्हणाले, “रुसॉ, तुम्हाला जे काही सांगायचं असेल ते थोडक्यात सांगा. उगाच लांबण लावू नका.”

''मस्य प्रेसिडेंट,'' नम्र अभिवादन करीत त्याने भाषण सुरू केले, ''मस्य अँड डीयर कलीग्ज. सुमारे शंभर वर्षांपूर्वीच्या त्या देदीप्यमान...''

''तुमची जी काही तक्रार असेल ती सरळ सांगा. आम्हाला रात्रभर येथे थांबायची इच्छा नाहीय.''

रुसॉ थोडासा दुखावला गेला. तो म्हणाला, ''मागच्या वर्षीच्या प्रदर्शनातील पेंटिंगबद्दल खूप तक्रारी आहेत. मुख्यतः ती ज्या प्रकारे टांगली होती त्याबद्दल. पेंटिंग लावताना त्यांच्या रंगात्मक मूल्यांचा नीट विचार करूनच ती लावली पाहिजेत. आपल्या चित्रांबद्दल आपणच इतके बेफिकीर राहून कसे चालेल? माझ्या पेंटिंगचेच उदाहरण घ्या ना...''

''आता गप्प बसा.'' त्याला मधेच तोडत अध्यक्ष म्हणाले, ''या वर्षी पेंटिंग लावण्याचे काम तुम्हीच करा. मग तर तुमची तक्रार नाही ना? आता आपले खजिनदार हिशेब सादर करणार आहेत.''

एका सुतकी चेहऱ्याच्या इसमाने खिशातून चोपडे काढून जमाखर्चाची आकडेमोड वाचायला सुरुवात करताच सभासदांमधील अस्वस्थता वाढू लागली.

''मला सांगायला अतिशय वाईट वाटतंय की आपला खर्च वाढत चाललाय, पण आवक मात्र शून्यच आहे. आपली देणी एवढी वाढलीयत की आता सर्वांनी आपली वर्गणी मागील सर्व थकबाकीसकट तात्काळ भरली नाही तर आपल्याला ताबडतोब गाशा गुंडाळावा लागेल.''

आर्थिक बाब थोडी नाजूक होती. वर्गणीचा विषय काढताच सर्वांची परिस्थिती अवघडल्यासारखी झाली. अध्यक्षांनी एक सुंदर भाषण ठोकले. त्यात त्यांनी चित्रकारांच्या हलाखीच्या परिस्थितीबद्दल हळहळ व्यक्त केली. कळ सोसून सर्वांनी आपापली वर्गणी ताबडतोब भरावी असे आवाहन केले. यानंतर अध्यक्षांनी हेन्रीला कॅटलॉगच्या कामाविषयी माहिती सांगण्यास सांगितले. हेन्रीकडे सांगण्यासारखे

काही नव्हतेच. कारण छापखानेवाला मागच्या वर्षाची थकबाकी मिळाल्याशिवाय पुढच्या कामाविषयी काही ऐकूनसुद्धा घ्यायला तयार नव्हता. बहुधा आपल्याला कलेविषयी चाड असलेला दुसरा एखादा छापखाना शोधावा लागेल असे दिसतेय.

लुच्चे कुठले. सगळेजण पैशांच्या मागे लागलेयत. आपल्या सोसायटीचा कॅटलॉग छापण्यातला बहुमान कोणीच लक्षात घेत नाही. ठीक आहे. मस्य तुलूझ लोत्रेक यांनी सुचवल्याप्रमाणे दुसरा छापखाना शोधूया. जरा लांबचा एखाद्या खेड्यातला पाहावा लागेल इतकेच. खेड्यातील लोक शहरातील लोकांइतके लोभी नसतात.

वार्षिक प्रदर्शनासाठी ज्युरींची निवड करण्याच्या विषयावरून जंगी खडाजंगी माजली. अगदी सोसायटी फुटण्यापर्यंत पाळी आली. ज्युरी असावेत की नसावे हा सदोदित वादाचा मुद्दा होता. अकादमीच्या सॅलाँसाठी पेंटिंगची निवड ज्युरी करीत. हवश्या, गवश्या व नवश्या चित्रकारांना तिथे प्रवेश नसे.

रुसॉने ज्युरींची निवड करण्याच्या सूचनेला पाठिंबा दिला. आपले प्रदर्शन म्हणजे एक टिंगलीचा विषय होत चालला आहे. कोणाही येरागबाळ्याची पेंटिंग आपण स्वीकारतो. त्यामुळे गुदस्ताचे आपले प्रदर्शन टिंगलीचा विषय झाले होते. आता दर्जा राखायचा म्हणजे काही तरी मानदंड, निकष ठेवायला पाहिजेत, असा विचार व्यक्त करीत हळूहळू बहुतेकांनी त्याला पाठिंबा दिला.

यातील गमतीचा विरोधाभास म्हणजे अशा प्रकारे पूर्वनिश्चित निकषांनुसार निवड करण्याच्या पद्धतीला आता पाठिंबा देणारे लोक काही वर्षांपूर्वी याच मुद्द्यावरून अकादमीच्या विरोधात ठामपणे उभे राहिले होते. ह्याच लोकांनी व्यवस्था व राजमान्यता यांची पूर्वी टिंगल उडविली होती. प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारणाऱ्या क्रांतिकारकांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे या उद्देशानेच आर्टिस्ट इंडिपेंडंटसची स्थापना झाली होती. आता त्याच क्रांतिकारकांना सत्ता, व्यवस्था व त्याच्या जोडीने येणारे मानमरातब व प्रतिष्ठा हवी होती.

''माझा या सूचनेला विरोध आहे.'' हेन्री आपली काठी आपटत म्हणाला.

''माझासुद्धा.'' जॉर्ज सुराने त्याच्या सुरात सूर मिळवला.

"लोक आपल्या पेंटिंगना हसतात हे मान्य आहे. त्याने कलाकृतीचे बाजारातील मूल्य ठरत असेल, पण पेंटिंगच्या कलात्मक मूल्यात त्या हसण्याने काही फरक पडतो का? रेम्ब्रांदचे नाईटवॉच, मानेचे ऑलिंपिया पाहून लोक एकेकाळी हसलेच होते. हसणे हे मूर्खपणाचे पहिले लक्षण आहे. एखादी गोष्ट समजून घेण्यासाठी साकल्याने विचार करावा लागतो. त्यापेक्षा हसणे फार सोपे असते. ठीक आहे आपण काही सामान्य दर्जाची पेंटिंग प्रदर्शनात लावली होती. पण त्याचबरोबर काळाच्या ओघात पुढे महान कलाकृती होण्याची क्षमता असलेलीही काही पेंटिंग त्यात होतीच की. त्यापेक्षा महत्वाची बाब म्हणजे श्रेष्ठ काय व कनिष्ठ काय याचा निवाडा करणारे आपण कोण? असे काही निकष ठरवता येतात का? आपल्या सहकाऱ्यांची टिंगल करण्यात कलाकारांचा हात कोणीही धरू शकणार नाही. मायकेल अँजेलो लिओनार्दोला कमी लेखायचा, डेव्हिड वॉत्तोला तर इंग्रेस दलाक्रवाला. इंप्रेशनिस्टांना तर सेझानची लाज वाटायची आणि सेझानला वाटतं की तो सोडून दुसऱ्या कोणाला पेंटिंग म्हणजे काय ते समजलेलंसुद्धा नाहीय. त्यामुळे या विषयावर वादविवाद करणं व्यर्थ आहे. प्रत्येकाला संधी मिळू दे. काळाच्या ओघात जो टिकेल तोच खरा."

ज्युरींच्या निवडीचा ठराव किंचित फरकाने नामंजूर झाला. त्यानंतर सभेचे इतर कामकाज, अहवाल वाचणे, ठराव वगैरे संमत करणे चुटकीसरशी उरकून घेण्यात आले. व्हिन्सेंट व्हॅन गॉगच्या पेंटिंगसाठी या वर्षी एक खोली राखून ठेवण्याचा ठराव एकमताने संमत झाला. बैठक संपता संपता व्हिन्सेंट व तेओ या गॉग बंधूंना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. बैठक संपली तेव्हा मध्यरात्र उलटून गेली होती. हेन्री जॉर्ज सुराबरोबर त्याची पेंटिंग बघण्यासाठी त्याच्या स्टुडिओवर गेला.

- ६५ -

फेब्रुवारीतील एका दुपारी पॉव्हियाँ द ला प्रेस मधल्या एका खोलीत हेन्री, जॉर्ज सुराला व्हिन्सेट व्हॅन गॉगची पेंटिंग लावायला मदत करीत होता. हेन्री कॅटलॉगमधून एक एक नंबर वाचून दाखवीत होता तर सुरा भिंतीवर खिळे मारून एक एक नीट लावण्यात गुंतला होता.

"ह्याचा नंबर काय आहे?" सुराने विचारले. त्याच्या तोंडात भिंतीवर मारायचे खिळे होते, हातात हातोडी तर काखोटीला कॅनव्हासची गुंडाळी.

"अठ्ठावीस. सायप्रस. थोडं डावीकडे लाव."

सुराने कॅनव्हास सरळ केला व भिंतीवर लावला. हेन्री आपल्या जाड भिंगांच्या चष्म्याआडून डोळे बारीक करून पेंटिंग बघत होता. मागे येऊन सुरा त्याला सामील झाला.

"रंगसंगतीच्या दृष्टीने पाहिले तर ही रंगयोजना साफ चुकीची ठरेल, पण काय विलक्षण परिणाम साधलाय म्हणतोस."

"जणू काही अग्नी प्रलयाच्या हिरव्या ज्वाळाच!" हेन्री त्या झपाटल्यासारख्या वाटणाऱ्या सायप्रस वृक्षाकडे बघून म्हणाला. "विचार कर ही किमया त्याने काही तासांत साध्य केलीय. तुला ठाऊक आहे आर्ल्समधल्या त्याच्या फक्त दोन महिन्यांच्या वास्तव्यात त्याने पन्नास पेंटिंग केलीत ते आणि त्याला तुझ्यासारखं पॉइंटॅलिस्ट व्हायचं होतं. बिचारा."

"काय म्हणतोस? दोन महिन्यांत पन्नास कॅनव्हास?" सुरा आश्चर्याने म्हणाला. बोलता बोलता त्याला खोकल्याची उबळ आली. त्याचा श्वास कोंडला.

"मों व्ह्यू. अरे यार. हा खोकला साधा दिसत नाहीय. वेळीच इलाज कर." त्याच्या खोकण्याकडे पाहून हेन्री काळजीच्या सुरात म्हणाला.

"विशेष काही नाही. काल रात्री स्टोव्ह विझल्यावर उठून पेटवायचा आळस केला. त्यामुळे थंडी बाधली. ते जाऊ दे. तुला कळलं का पॉल गोगँ पुढच्या महिन्यात ताहीतीला जाण्याची तयारी करतोय ते."

"नक्की चाललाय ना?" हेन्री सिगरेट शिलगावीत म्हणाला, "गेली दहा वर्षे तो तेथील नारळांची झाडं आणि त्याखाली बसलेल्या अर्धनग्न स्त्रिया यांच्याविषयी

बोलतोय. तू बघ. तो लवकरच कंटाळेल आणि परत येईल. जसा मार्तीनेकवरून परत आला तसा. तिकडे तो आयुष्याभर राहाण्याची प्रतिज्ञा करून गेला होता, पण उन्हाळ्यात फार उकडतं म्हणून वर्षाच्या आत परत आला.''

''त्याच्यासाठी एक मेजवानी आयोजित केली आहे.''

''माझी खात्री आहे. स्टेशनवर जाताना तो बँड वाजवत जाईल. मोठा नाटकी माणूस आहे तो. कोणतीही गोष्ट तो सरळ साधेपणाने करणार नाही.''

''तुला तो फारसा आवडलेला दिसत नाहीय.'' सुरा हेन्रीकडे डोळ्यांच्या कोपऱ्यातून बघत म्हणाला.

''व्हिन्सेंटशी तो आर्ल्समधे ज्या तऱ्हेने वागला ते मला मुळीच आवडलं नाही. व्हिन्सेंटला त्याने स्वतःला मास्टर म्हणायला सांगितलं. त्याचा तो एकूण अवतार, भरतकाम केलेली जर्सी, नक्षीदार चढाव. त्याच्याकडे टॅलंट जरूर आहे, पण व्हिन्सेंटच्या निम्म्यानेसुद्धा नाही. त्याचं तू जॅकोब स्ट्रगलिंग वुईथ एंजल्स पाहिलंस. असं वाटतंय की एंजल्स जॅकोबची जणू काही नाडी परीक्षा करतायत आणि त्याचं ते यलो ख्राईस्ट. माझ्या मते त्याची ही धार्मिक विषयांवरची पेंटिंग म्हणजे शुद्ध बकवास आहे. एखाद्या शेअर दलालाने आदिवासींसारखे साधे आदिम पातळीवरचे जीवन जगण्याचा अट्टहास धरायचा तोसुद्धा एवढा गाजावाजा करून हे शुद्ध ढोंग वाटतं. त्यापेक्षा आपला हेन्री रुसॉ परवडला. तो बोअर जरूर करतो, पण तो प्रामाणिक तरी आहे. त्याची ती जंगलाची पेंटिंग पाहिलीस? अगदी सीध्यासाध्या शैलीतील आहेत, पण विलक्षण परिणाम साधून जातात. एक दिवस जाऊ या त्याच्या स्टुडिओत. पण गोगँविषयी विचारशील तर माझं कदाचित चुकत असेल, पण मला वाटतं की तो जाणूनबुजून तुमची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतोय. एकीकडे तो भोळेपणाचा आव आणतो, पण दुसरीकडे आपली हुशारी लोकांच्या नजरेत भरावी असाही त्याचा प्रयत्न चालू असतो. मला या खोट्या भोळेपणाचा राग येतो. अर्थात असं माझं मत आहे.''

“कदाचित त्याला अजून स्वतःचा शोध लागला नसेल.” सुरा मोठ्या उदारपणे म्हणाला.

“ताहीतीमध्ये त्याचा हा शोध संपेल अशी आशा आपण करू या.” हेन्री खांदे उडवीत म्हणाला, “आता गप्पा पुरे झाल्या. कामाला लागू या. क्रमांक एकोणतीस. सनफ्लॉवर्स.”

सुराला पुन्हा एकदा खोकल्याची जोरदार उबळ आली.

“माझी छाती अगदी पिंजून निघतेय.” बऱ्याच वेळाने त्याला बोलवले तेव्हा तो म्हणाला, “मला पूर्वी असं कधी झालं नव्हतं.”

“तू आता घरी जाऊन विश्रांती घे पाहू. तुझी आई काळजी करत असेल. ही पेंटिंग लावायचे काम आपण उद्या करू या.” दुसऱ्या दिवशी सुरा पॅव्हेलियनवर येऊ शकला नाही. कारण तो तापाने फणफणून घरी झोपला होता.

१० मार्चला सॅलां दी आर्टिस्ट इंडिपेंडंटसचे उद्‌घाटन झाले. प्रदर्शनाला आलेल्या प्रेक्षकांच्या चेष्टामस्करीने पॅव्हेलियनचा हॉल गजबजून गेला. झकपक पोशाखातील रुसॉ येणाऱ्या-जाणाऱ्या प्रेक्षकांचे लक्ष वेधून घ्यायला धडपडत होता.

“हे बघा. माझं नाव हेन्री रुसॉ. मी पूर्वी सैन्यात सार्जंट होतो. नंतर कस्टम्समध्ये ऑफिसर होतो. हे माझ्या पेंटिंगमधले झाड पाहिलंत ना? किती छान दिसतंय. दिवाणखान्यात लावले तर शोभेल. फक्त पंचवीस फ्रँक. बावीससुद्धा चालतील. अहो, वीस तरी द्या. कॅनव्हास आणि रंगांची किंमत तरी सुटायला हवी. अठरा...”

व्हिन्सेंटच्या पेंटिंगकडे कोणी ढुंकूनही पाहिले नाही. जॉर्ज सुराने समुद्रकिनाऱ्याचा देखावा त्याने विकसित केलेल्या पॉइंटॅलिस्ट शैलीत काढला होता. एखाद्या वाफेने धुरकटलेल्या काचेच्या तावदानाआडून पाहावे तसे वाटत होते. प्रदर्शनात या कॅनव्हासची खूप टवाळी केली गेली. समीक्षकांनी कॉन्फेट्टी पेंटिंग म्हणून

त्याची संभावना केली. कॉन्फेट्टी पेंटिंग हे संबोधन नंतर थोडे दिवस खूप लोकप्रिय झाले होते.

पण ही उपेक्षा आणि उपहास त्या चित्रकाराच्या कानी गेला नाही. कारण तेव्हा तो रुग्णशय्येवर आसन्नमरण अवस्थेत तळमळत होता. हेन्रीला जेव्हा कळले की तो शेवटच्या घटका मोजतोय तेव्हा तो तात्काळ त्याच्या घरी गेला, पण उशीर झाला होता.




(या प्रदर्शनातील आणि या प्रकरणात उल्लेखलेली बहुतेक सर्व पेंटींग गुगल इमेज / विकीमिडियावर उपलब्ध आहेत. जिज्ञासूंनी ती इंटरनेटवरून जरून पहावी)

- ६६ -

व्हिन्सेंटच्या आत्महत्येच्या मागोमाग जॉर्ज सुराच्या अकाली मृत्यूमुळे हेन्रीला मोठा धक्का बसला. दोघेही तरुण होते. उमेदीच्या ऐन भरात असतानाच मृत्यूने त्यांना गाठले होते. सुराच्या मृत्यूनंतर असाच एके दिवशी इझलसमोर विमनस्क मनःस्थितीत बसला असताना अचानक झिडलर समोर येऊन उभा राहिला.

"आताच लेव्हिजकडून पोस्टरचे गठ्ठे छापून आलेयत. आज रात्री सर्व पॅरीसभर गल्लोगल्ली पोस्टर लावण्याचे काम पूर्ण होईल. मग बघ उद्या काय धमाल उडेल ती."

दुसऱ्या दिवशी उजाडताच लोकांची कुजबुज सुरू झाली. संध्याकाळी दिवस मावळेपर्यंत ज्याच्या त्याच्या तोंडी मुलँ रूजच्या पोस्टरचाच विषय होता.

"तू पाहिलंस काय?"

"काय पाहिलंस म्हणून विचारतोस. पोस्टर?"

"कॅनकॅन नाचणाऱ्या मुलीचं."

"अगदी खुल्लमखुल्ला दाखवलंय."

"शी. किती अश्लील."

"मास्टरपीस म्हणून गाजेल."

"कळायला अक्कल लागते."

मुलँ रूजच्या त्या पोस्टरमुळे सर्व पॅरीसभर खळबळ माजली. शहरातील प्रत्येक भिंतीवर, टपरीवर, मुत्रीवर जिकडे पाहावे तिकडे पोस्टर नजरेला पडत होते. पोस्टर बघायला चौकाचौकांतून लोकांची गर्दी जमे. हमरीतुमरीवर येऊन वाद चालत. शेवटी गर्दी इतकी वाढे की रहदारीचा खोळंबा होई. मग पोलिसांना येऊन गर्दी हटवावी लागे.

"*नॉम दे दियू.* ढुंगण दाखवून नाचणारी पोरगी कधी पाहिली नाहीत काय? चला हटा. पुढे व्हा."

लोक माना वर करून, डोळे बारीक करून चित्रकर्त्याचे नाव शोधत. डाव्या कोपऱ्यात त्यांना सही दिसे.

'लोत्रेक.'

थोड्याच दिवसांत ते नाव सर्वतोमुखी झाले. फुटपाथवरचे ओपन कॅफे, रेस्तोराँ, बिस्ट्रो, कचेऱ्या, क्लब, केस कापण्याची दुकाने, कोपऱ्यावरचे वाणी, वेश्यागृह, शाँझ् एलिझेवरची फॅशनेबल दुकाने, भव्य डायनिंग रूम्स, नाईट क्लब अशा सर्व ठिकाणी लोत्रेकच्या नावाची चर्चा चालू झाली. वृत्तपत्रांचे रकाने मुलँ रूजच्या पोस्टरविषयीच्या बातम्या, परीक्षणे, वाचकांचे मत अशा गोष्टींनी भरून गेले. कलात्मक मूल्य असलेले हे पहिलेच पोस्टर यापासून ते हे पोस्टर म्हणजे जणू सैतानाची निर्मिती शोभेल इथपर्यंत. काही सनातन्यांनी हे पोस्टर जनतेच्या नैतिकतेला घातक असल्याचे जाहीर केले व यामुळे स्त्रियांना मान वर करून रस्त्यावरून चालता येणे अशक्य झाल्याने पोस्टर ताबडतोब काढून टाकावे असा अर्ज नगरपालिकेकडे केला. त्यांना अकादमीच्या सभासदांचा पाठिंबा मिळाला. सनातन्यांच्या गटाने ते पोस्टर अनैतिक आहे असे ठरवले. त्यामुळे पुरोगामी व बंडखोर चित्रकार व समीक्षकांचा गट पोस्टरच्या बाजूने उभा राहिला. त्यांनी ते पोस्टर म्हणजे कला-नैतिकतेचा एक नमुना आहे असे जाहीर केले. त्या पोस्टरमध्ये त्यांना दांभिकतेचा उपहास आणि नव्या नीतिमत्तेचे दर्शन झाले. व्हॅलेंटाईनच्या हॅट घातलेल्या पडछायेत काहींना जीवनाचे क्षणभंगुरत्व दाखविणारे तांडव दिसले. अशा रीतीने दोन गटांच्या भूमिका नक्की झाल्यानंतर साहित्यिक, प्राध्यापक, तत्त्वज्ञ, वकील, डॉक्टर व अन्य व्यावसायिक मंडळी या ना त्या गटाच्या बाजूने उभे राहिले. एवढे झाल्यावर राजकारणी यापासून अलिप्त राहणे शक्य नव्हते.

मुलँ रूजच्या पोस्टरमुळे लिथोग्राफीच्या तंत्राची बाटल्यांची लेबले व सिगारेटची पाकिटे छापणे यांच्या मर्यादेतून सुटका झाली व तिचा एक स्वतंत्र ग्राफिक कला म्हणून उदय झाला. मस्य तुलूझ् द लोत्रेकने म्युझियम व आर्ट गॅलरीमध्ये बंदिस्त असलेल्या कलेला नकळत रस्त्यावर आणले होते. पोस्टरला मिळालेल्या प्रसिद्धीमुळे हेन्री स्तंभित झाला. गंमत म्हणून फेकलेल्या एखाद्या खड्याने हिमकडा कोसळावा तसे झाले.

मॉरीसशी खाजगीत बोलताना त्याने कबूल केले की एवढी खळबळ माजेल याची त्याला पुसटशीही कल्पना नव्हती.

“मला फक्त झिडलरला थोडीशी मदत करायची होती. ही क्रांती वगैरे काहीही त्या वेळी मनातसुद्धा नव्हतं.”

“पण एक कबूल कर. पोस्टरसाठी तू मेहनत खूप घेतलीस. दुसऱ्या कोणी दोन-तीन तासांत चार-पाच स्केचीस काढून एकदा पेर कोटेलच्या स्वाधीन केल्यावर तिकडे ढुंकूनही पाहिले नसते. तू तर स्वतः लिथोग्राफी शिकण्यापासून सुरुवात केलीस ते अगदी छपाई पूर्ण होईपर्यंत तू पोस्टरच्या मागे लागला होतास. वरवर साध्या वाटणाऱ्या या पोस्टरमागच्या तुझ्या सहा महिन्यांच्या अखंड तपश्चर्येची कोणाला कल्पना येणार नाही. बरं ते असू दे. तुमच्या मातोश्री काय म्हणाल्या या पोस्टरबद्दल?”

“आईनं पोस्टर पाहिलं की नाही याची मला काही कल्पना नाही. ती तसं काही मला अजून बोललेली नाही. पण बाकी सगळयांनी मात्र मला खूप भंडावून सोडलंय. दिवसातून इतके लोक भेटायला येतात की काय सांगू. प्रत्येकाला त्यांच्या उत्पादनासाठी एक पोस्टर करून हवंय. कॉर्सेटचे निर्माते, पर्फ्युम, ब्युटी क्रीम, थिएटरचे मालक, नाटककार, नट, नट्या कोण कुठले ज्यांची नावंसुद्धा कधी ऐकली नाहीत असे. या गर्दीमुळे मला काही काम करायची सोय राहिली नाहीय.”

“तू काय सांगतोस त्यांना?”

“सांगणार काय कपाळ. फुटवतो काहीतरी सांगून.”

“आणि तुला येणाऱ्या ढीगभर पत्रांचं, आमंत्रणांचं काय करतोस?”

“चुलीत घालण्यासाठी सरळ मादाम ल्युबेतच्या हवाली करतो. तेवढा तरी उपयोग होतो त्यांचा.”

“त्यातली काही पत्रे उघडून बघ. थोड्या आमंत्रणांचा स्वीकार कर. झाला तर फायदाच होईल. थोरामोठ्यांच्या ओळखी होतील. तुझ्या त्या नेहमीच्या गोतावळ्यातून तेवढीच सुटका. मोंमार्त्रमध्ये आणखी किती दिवस राहायचा विचार आहे तुझा?”


“असं का विचारतोयस तू? जणू काही माझ्या मोंमार्त्रमध्ये राहाण्यामुळे माझा सामाजिक दर्जा जो कमी झाला होता तो आता या पोस्टरमुळे वाढलाय असं तर तुला म्हणायचं नाहीय? हे बघ मला तिथे अगदी घरच्यासारखं वाटतं. म्हणून मी तिथे कायमचं राहायचं ठरवलंय.”

“दर संध्याकाळी त्या मुलँमध्ये जाऊन बसण्याचा कंटाळा नाही येत तुला? त्या मोंमार्त्रमधल्या रिकामटेकड्या, फालतू, अपयशी लोकांच्या संगतीत किती दिवस घालवणार आहेस? जरा बाहेर पड. त्याशिवाय पॅरीसमधील कलाविश्वाची कल्पना तुला येणार नाही. यशस्वी, सुसंस्कृत लोकांत उठबस वाढव. मी तुझ्या ओळखी करून देईन. मादाम नातानसोनचं नाव ऐकलं असशील. ती पॅरीसमधील एक सर्वात सुंदर, सुसंस्कृत व बुद्धिमान अशी स्त्री आहे. मला तिने आपण होऊन तुला तिच्याकडे घेऊन यायला सांगितलंय. माझं ऐक. सौंदर्य, बुद्धिमत्ता, संपत्ती आणि रसिकता यांचा असा मिलाफ सहसा एका व्यक्तित सापडत नाही.”

“मला कोणाकडेही जाण्यात रस नाहीय. मी माझ्या मुलँमध्ये आहे ते ठीक आहे. तिथे सर्वजण मला ओळखतात. माझ्याशी फार चांगले वागतात. ओह. बाय द वे. तिथे एक नाचणारी नवी मुलगी आलीय. तू येशील तेव्हा तिच्याशी तुझी ओळख करून देईन. जेन ॲव्हरील तिचं नाव.”

(एम हे अक्षर खूप मोठे करून इतर मजकूराची तीन ओळीत केलेली विभागणी, पात्रांची भाऊगर्दी कमी करून ला गुल्वी आणि व्हॅलेंटाईन या मुलँ मधील लोकप्रिय कलाकारांना मध्यभागी दिलेले स्थान, पार्श्वभूमीला प्रेक्षकांच्या पडछायेचा वापर

केल्याने पेंटींगमधे दाखवतात तसा खोलीचा आभास या वैशिष्ट्यांमुळे हे पोस्टर ज्यूल शेरच्या पोस्टरच्या तुलनेत उठून दिसते.)




(मुलँ रूज ला गुल्वी – चार रंगातील लिथोग्राफ – पोस्टर ६७x७४ सेमी –
१८९१, म्युझियम ऑफ आर्ट, सॅन डिएगो

- ६७ -

गेली कित्येक वर्षे हेन्रीचे त्याच्या वडिलांशी असलेले संबंध ताणलेले होते. आईच्या आग्रहाखातर तो अधूनमधून त्यांना भेटायला जाई. भेटीत दोघेही आपला अवघडलेपणा लपविण्याचा कसोशीने प्रयत्न करीत. पोस्टर प्रसिद्ध झाल्यावर थोड्याच दिवसांत एके दिवशी सकाळीच त्याचे वडील धाडकन त्याच्या स्टुडिओत येऊन दाखल झाले.

‘‘तुमची हिंमत तरी कशी झाली?’’ काउंट महाशय रागाने थरथर कापत होते, ‘‘त्या फालतू नाच्या पोरींच्या घाणेरड्या अश्लील पोस्टरखाली लोत्रेक म्हणून सही करायची? तुम्ही असे आजारी, विकलांग नसता तर चाबकाने फोडून काढलं असतं तुम्हाला.’’

हेन्री भीतीने पांढराफटक पडला. वडिलांच्या संतापाचा त्याला अनुभव होता. त्यांच्या मुठीतील गरगर फिरणाऱ्या सोनेरी मुठीच्या वेताच्या छडीकडे तो काही क्षण पाहत राहिला. अचानक त्याची भीती पार नाहीशी झाली. हा भंपक काउंट मला चाबकाने फोडण्याची धमकी देतो काय. पांगळा असलो म्हणून काय झाले. माझ्या धमन्यातसुद्धा तुलूझ लोत्रेकांचे रक्त वाहातेय. माझा असा अपमान करण्याची छाती कशी होते यांची. त्याने मान वर करून पाहिले व बर्फासारख्या थंडगार आवाजात तो म्हणाला,

‘‘माझं पोस्टर तुम्हाला आवडलेलं दिसत नाहीय? पण त्याला माझा नाइलाज आहे. तुमच्याबरोबर शाँझ् एलिझेवरून घोड्याची रपेट मला करता येत नाही याचं मला वाईट वाटतं. माझ्या या व्यंगामुळे तुम्हाला किती घोर मनस्ताप होत असेल याची मला कल्पना आहे. पण एक लक्षात घ्या, तुम्ही मला जन्माला घातलंयत याचा मलाही तेवढाच मनस्ताप होतो. मी काही तुमच्या पोटी जन्म मागितला नव्हता. मी तुमचा एकुलता एक मुलगा आहे व तुलूझ लोत्रेक घराण्याचा शेवटचा वारसदार. मला हेही माहितेय की माझे वर्तन तुम्हाला पसंत नाही. तुमचे वर्तनसुद्धा मला कितपत आवडतं सांगता येत नाही. एकेकाळी मी तुम्हाला खूप मानायचो, तुमच्याबद्दल आदर

वाटायचा, पण आता तसा वाटत नाही. प्रेम तर जाऊ दे पण तुमचा सहवाससुद्धा माझ्या आईला आणि तुमच्या मुलाला कधी मिळाला नाही.''

''तुमची हरकत नसेल तर हा तमाशा आपण इथेच थांबवू या. यापुढे मी कधीही तुमच्या वाटेला जाणार नाही. तुम्हीही माझ्या वाटेत येऊ नका. आता राहिलं माझ्या चित्रांबद्दल. माझी सही माझ्या मर्जीप्रमाणे मला वाटेल तशी मी करेन. हे काम माझे आहे आणि हेन्री द तुलूझ लोत्रेक हे नावसुद्धा माझेच आहे. एक लक्षात ठेवा. मी आता सज्ञान झालो आहे आणि माझे नाव बदलण्याचा अधिकार तुम्हाला नाही. या नावाची तुम्हाला जर एवढी लाज वाटत असेल तर तुमचे नाव बदलून घेण्यास तुम्ही मुखत्यार आहातच.''

''कला? या तुझ्या पेंटिंगना तू कला म्हणतोस.'' भिंतीवरच्या कॅनव्हासकडे आपल्या हातातील काठीने निर्देश करीत उपहासाने हसत काउंट म्हणाला, ''ही घाणेरडी आणि अश्लील पेंटिंग्ज. त्या निमित्ताने दारू प्यायला आणि वेश्यांची माडी चढायला मिळते म्हणून कॅनव्हासवर काहीतरी फराटे मारले की झालं. याला काय कलाकृती म्हणायचं.''

''होय. माझ्या दृष्टीने ही सगळी पेंटिंग माझ्या कलेचा आविष्कारच आहेत. माझ्या कलेचा दर्जा ठरविणारे तुम्ही कोण? तुमचा आणि कलेचा काय संबंध? तुमच्यासारख्यांचा अशा कामाशी किंवा कसल्याही प्रकारच्या शारीरिक श्रमाच्या किंवा कौशल्याच्या कामाशी कधी संबंध आलाय? श्रम हे कनिष्ठवर्गीयांनी करायचे. कलाकौशल्याचे काम करायला बुर्झ्वा मध्यमवर्ग. आपण श्रीमंत सरदार. कष्टाची कामे आपली नव्हेत. आपण तलवार गाजवायची. लोक अजून आपल्याला मान देतात, पण हा मान फुकाचा आहे हे आपल्या लक्षात येत नाही. आपण उच्च कुलीन. शुद्ध रक्ताचे. घराण्याचा सात पिढ्यांचा इतिहास, मानमरातब, उच्चकुलीन रीतिरिवाज या खोट्या बेगडी वेष्टनात तुम्ही एवढे गुरफटून गेला आहात की आपले अस्तित्व आता कालविसंगत झाले आहे हे आपल्या लक्षात आलं नाहीय. आपले सर्व जीवन अर्थशून्य झाले आहे. काही अर्थ उरला असेल तर तो फक्त घोड्यावरून केलेल्या रपेटीत आणि

प्रतिकारहीन जनावरांच्या शिकार नामक केलेल्या कत्तलीत. नशिबात असेल तर कधीकाळी एखादे युद्ध होईल आणि त्यात रणांगणावर मृत्यू आला तर या अर्थशून्य जगण्याचे झाले तर तेवढेच सार्थक होईल. नाही तर आपल्या नावाची झूल एखाद्या भरजरी वस्त्राप्रमाणे पांघरून लोत्रेक या नावाने जन्म घेतला यातच धन्यता मानून गतवैभवाच्या अफूच्या नशेत दिवस कंठायचे.''

''पाले द व्हेर्साय आणि मारी अंतोनेतबरोबरच आपले जग संपलंय. आपलासुद्धा राणीबरोबरच गिलोटीनखाली शिरच्छेद व्हायला हवा होता. सध्याच्या जगातील आपले अस्तित्व अश्मीभूत झालेल्या अवशेषांसारखं झालंय. डायनोसॉरच्या हाडांना जेवढं महत्त्व असतं तेवढेच महत्त्व आपल्याला आहे. तुमचं म्हणणं आहे की, मी वेश्यांच्या संगतीत असतो. होय. खरं आहे ते आणि त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. दुसऱ्या कोणत्या स्त्रीच्या सहवास मला मिळाला असता? तुम्ही म्हणता मी दारू पितो. होय. मी पितो. मी दारू का पितो म्हणून कधी विचारपूस केलीत? मी जेव्हा पितो तेव्हा माझी ही कुरूपता, व्यंग, एकाकीपणा, या खुरट्या पायातील वेदना थोडा वेळ का होईना मी विसरतो म्हणून मी पितो. माझ्या जागी तुम्ही आहात अशी जरा कल्पना तरी करून पाहा. असं पाय फरफटत कुबड्याघेऊन चालणं कसं वाटलं असतं तुम्हाला? मी पितो. माझ्या जागी तुम्ही असतात तर तुम्हीही असेच प्याला असता किंवा स्वतःच्या डोक्यात गोळी मारून घेतली असतीत. प्रत्येकाचा मार्ग वेगळा असतो. आईला तिच्या देवाची प्रार्थना, तुम्हाला घोडे आणि ससाणे आणि मला माझा ब्रश आणि कोनॅक. मी काय करावं असं तुमचं म्हणणं आहे? आरामखुर्चीत बसून दिवस कंठावेत. मी तसं करून पाहिलंय. फार कंटाळा येतो. तुम्हालासुद्धा आला असता.''

हेन्रीने वडिलांकडे पाहिले. ते एका पुतळ्यासारखे स्तब्ध उभे होते. त्यांच्या नजरेतील अंगार विझला होता, पण ताठा कायम होता. वृद्धत्वाची किंचित झाक दिसू लागलेल्या करारी मुद्रेवर एकाकीपणा दिसत होता. एक क्षणभर त्यांच्या सरदारकीच्या वस्त्रांची रेशमी झिलई फिकुटल्यासारखी वाटली आणि त्या जागी त्याला दिसू लागला अंगात चिलखत घातलेला, सोनेरी शिरस्त्राणधारी, कंबरेला

तलवार, हातात रेमंड द फोर कॉम्ते द तुलूझ यांची ढाल घेतलेला वीरपुरुष. पार्श्वभूमीला फडकणारे क्रुसेडर्सचे ध्वज, उन्हात तळपणाऱ्या नागव्या तलवारी, खिंकाळणारे घोडे. ड्रमचा ताल व बिगुलाचा निनाद. पुन्हा त्या जागी आला पांढरी तुमान व अ‍ॅस्कॉट टाय परिधान केलेला पॅरीसमधील एक खुशालचेंडू काउंट. हेन्रीला त्या उध्वस्त झालेल्या उन्मत्त उमरावाची कीव आली. त्या उमरावाला या जगात यायला तब्बल पाच शतकांचा उशीर झाला होता. त्याला वाटले की त्यांचा हात आपल्या हातात घ्यावा आणि सांगावे की तुमचा दुखावलेला अहंकार, गतकाळाचा अभिमान सगळे मला समजते आहे. लंगडा असलो तरी मीसुद्धा या नष्टप्राय होत चाललेल्या उमरावांच्या गोतावळयापैकीच एक आहे. कदाचित अखेरचा तुलूझ लोत्रेक.

“हेन्री.” काउंट रुद्ध आवाजात म्हणाले, “आपली ही भेट शेवटचीच समजा. तुम्हाला हवे ते करायला तुम्ही समर्थ आहात. पण एक गोष्ट स्पष्ट सांगतो. माझ्याकडून कसल्याही मदतीची अपेक्षा करू नका. मागितलीत तरी मिळणार नाही हे पक्के लक्षात असू दे.”

“तुम्ही यापूर्वीही कधी मदत केलेली नव्हती. पुढेही तुमच्याकडून तशी अपेक्षा नाही.” हेन्री कडवटपणे म्हणाला. काउंटनी हॅट उचलली व निरोपाचा एकही शब्द न उच्चारता ताडकन बाहेर पडले. दरवाजातून थंड हवेचा झोत आत आला. हेन्रीने आपल्या ग्लासात थोडी कोनॅक ओतून घेतली व प्यायला सुरुवात केली.

- ६८ -

हेन्रीचा मोंमार्त्रमधील नित्याचा दिनक्रम चालू होता. म्हणण्यासारखे नवे कोणतेही काम त्याने अजून हाती घेतले नव्हते. संध्याकाळ झाली की न चुकता त्याची पावले मुलँ रूजकडे वळत.

“तुला दररोज मुलँमध्ये जाऊन बसायचा कंटाळा कसा काय येत नाही बुवा?” मॉरीस त्याच्या सारखा पाठी लागला होता. “तीच जागा, तीच माणसं, तेच विषय आणि शिळया कढीला ऊत आणून केलेल्या त्याच त्या चर्चा.”

“आजच्या घडीला तू पॅरीसमधील एक यशस्वी कलाकार समजला जातोस. कलाविश्वात तुझ्या नावाची चर्चा होते. मोंमार्त्रमधील फालतू, रिकामटेकड्या आणि अपेशी लोकांच्या गोतावळयात राहण्याचा तुझा अट्टहास का तेच मला समजत नाही. जीवनाच्या या अंगाचा तुला अनुभव घ्यायचा होता. तो घेऊन झाला. आता तुझी खरी जागा जिथे आहे ती तुला घेतली पाहिजे.” मॉरीसने आपला मुद्दा पटवून देण्याचा प्रयत्न केला.

“त्या तुझ्या उच्चभ्रू लोकांना छानछोकीने मिरवण्याच्या पलीकडे दुसऱ्या कशात रूची आहे असं मला वाटत नाही. कलाकाराच्या कामाने प्रभावित होण्याऐवजी ते त्याच्या व्यक्तिमत्वाकडे जास्त आकर्षित होतात. खांद्यावर घ्यायच्या फरच्या झुलीसारखा त्याला घेऊन त्यांना मिरवायचं असतं. माझ्या कामाकडे पाहण्याऐवजी तुझी ती रसिक मंडळी माझ्या पायांकडे प्रथम बघतील. चेष्टा आणि सहानुभूती दोन्हीही गोष्टी मला नकोयत.” हेन्री विषादाने म्हणाला.

“तुझे पाय. सारखे तुझे पाय. तुला काय वाटतं? लोकांना फक्त तुझे पाय दिसतात. काही लोक तसे असतीलही, पण सर्वजण तसे नसतात. तुला या नातानसोन दाम्पत्याविषयी सांगितलं आहेच. ते तसे नाहीत. त्यांना सरसकटपणे इतरांसारखं जोखताना हेन्री तू चुकतोयस. पॅरीसमध्ये त्यांच्यासारखी सुसंस्कृत व जाणकार माणसं फारच थोडी असतील. गेले कित्येक दिवस मिसीया नातानसोन माझ्या पाठीशी लागल्यायत की तुला घेऊन ये म्हणून. त्या स्वतः पियानो खूप चांगला वाजवतात. शिवाय कलेच्या चांगल्या जाणकार आहेत. त्यांच्या संग्रहात...”

“स्त्रियांमध्ये मला रस नाहीय,” हेन्री त्रासिक आवाजात म्हणाला, “आणि त्यांच्यासारख्या लब्धप्रतिष्ठित स्त्रियांमध्ये तर अजिबात नाही. या बायका जेव्हा

एखादं पेंटिंग विकत घेतात तेव्हा त्या आपण जणू काही चित्रकारालाच विकत घेतलंय असं समजत असतात. त्यांना चित्रकलेतील ओ का ठो कळत नसतं. ना त्यांना काही शिकण्याची तळमळ असते. त्यांना फक्त क्लब आणि टी पार्टीमध्ये गप्पागोष्टींपुरता एक विषय हवा असतो. पेंटिंग विकत घेतल्यावर त्यांना चित्रकाराला अशा पार्ट्यांना बोलावून मिरवायचं असतं. आता तू सांग, मुलँमध्ये काय वाईट आहे? मला ती जागा आवडते. तिथली ती गर्दी, गलबलाट, दिव्यांची झगमग सगळं काही. बारटेंडर सारा आणि इतर नर्तिकांशी गप्पा मारत बसायला मला फार आवडतं. झिडलरला कृतज्ञता शब्दांत व्यक्त करता येत नाही. तो अधूनमधून चांगल्या शँपेनची बाटली माझ्या टेबलावर पाठवून देतो. माझ्या दारूचे पैसेही तो मला कधी द्यायला देत नाही.''

''झिडलरसाठी तू जे पोस्टर करून दिलंस त्या मानाने तो तुझे जे आदरातिथ्य करतोय ते काहीच नाही. या पोस्टरचा खरं म्हणजे तुला याहून खूप फायदा व्हायला हवा होता, पण झिडलरचं वर्तुळ खूप छोटं आहे. नातेनसोनचं तसं नाहीय.''

''हे बघ. मी ते पोस्टर मैत्रीखातर केलं आणि मी ते पोस्टर करण्यापूर्वीसुद्धा झिडलर माझा चांगला पाहुणचार करीत होता. पोस्टर केल्यावर तो वाढलाय असं नाही. तुला तुझे ते नातानसोन बरे आणि मला माझं मुलँ रूज.''

हेन्री काहीही म्हणाला तरी तो आतून कंटाळला होता हे खरे होते. कॅफेत शिरताच त्याला सर्वजण आपल्या टेबलावर बसायला बोलावीत. पण त्याच त्या गप्पातील त्याचा रस आटू लागला. कलाकार म्हणून स्वतःबद्दलच्या अवास्तव कल्पना, भ्रामक स्वप्ने, आत्मप्रौढी व पोकळ बढाया, सतत कशाविषयी तरी कुरबूर. तो कितीही सोशीक श्रोता असला तरी रोज तेच ते ऐकून त्याला कंटाळा आला होता. कॅनकॅन नाचणाऱ्या मुलीही आता बदलल्या होत्या. ल एलीसमधील मंतरलेले दिवस केव्हाच मागे सरले होते. मुलँतील तीन वर्षांनी त्या मुलींना पार बदलून टाकले होते. त्यांच्या वागण्यातला भोळाभाबडा खट्याळपणा जाऊन त्याची जागा धंदेवाईक सफाईने घेतली होती. आपल्या व्यवसायाच्या नव्या स्वरूपाविषयी त्या आता जागरूक होत्या. पोस्टरमुळे प्रसिद्धीला आलेली ला गुल्वी आता स्वतःला कॅनकॅनची सम्राज्ञी म्हणवून घेऊ लागली होती. तिला वाटायचे की ही जी गर्दी होते ती केवळ

तिच्यामुळेच. अल्पावधीत मिळालेले यश डोक्यात गेल्याने तिच्यात एक प्रकारचा उद्धटपणा आला होता. इतका की एक दिवस तिने चक्क खुद्द प्रिन्स ऑफ वेल्सकडे शॅम्पेनची फर्माइश केली. मोंमार्त्रसारख्या तळागाळातल्या समाजातून स्वतःच्या अंगभूत गुणांच्या जोरावर वर आलेली, साधीभोळी, उत्साहाने सतत मुसमुसणारी अशी तिची प्रतिमा हेन्रीच्या मनात पक्की झाली होती. त्या जागी तिची आजची संपूर्ण व्यावसाईक प्रतिमा त्याच्या मनाला पटेना.

मोंमार्त्रशी असलेली भावनात्मक जवळीक जरी संपली होती तरी प्रत्यक्ष ताटातूट व्हायला एक नाट्यपूर्ण घटना घडली. एका विचित्र अपघातात एक नर्तिका कॅनकॅन नृत्य करीत असताना मरण पावली. या घटनेचा हेन्रीच्या मनावर खूप परिणाम झाला. त्यातच एकदा त्याची जुनी मैत्रीण बेर्थ त्याच्या स्टुडिओत रडत रडत आली. तिच्या ल पॅरोक्केमधील एका सहचरिणीचा खून झाला होता आणि त्यामुळे ल पॅरोक्केला टाळे लागले होते. तिची दुसऱ्या ठिकाणी सोय होईपर्यंत हेन्रीने तिला आसरा दिला. बाकीच्या मुली पॅरीसभर विखुरल्या. परिणामी हेन्रीला लैंगिक भूक भागवण्यासाठी स्टुडिओपासून दूर जावे लागे. भरीत भर त्याची जिव्हाळयाची मैत्रीण जेन ॲव्हरील मुलँ सोडून फॉलीज बर्जेरामध्ये गेली.

शेवटचा धक्का आणखी एका महिन्याने बसला. त्या संध्याकाळी झिडलर नेहमीप्रमाणे सिगारचे थोटूक चघळत हेन्रीच्या टेबलाकडे आला.

"सगळं संपलं. मी आजच सही केली." तो समोरच्या खुर्चीत बसत म्हणाला. हेन्रीला काही कळेना.

"मी मुलँ रूज विकून टाकलंय. मस्य तुलूझ्. तुम्हाला आठवतंय. मी म्हणायचो माझ्या मुलँमधील गुंतवणुकीतून मला कमीतकमी दहा लाख तरी सुटले पाहिजेत. हे पैसे थोडेसे अडकल्यासारखे झाले होते. ते आज सुटले. पण हे पैसे मिळाल्यावर मी काही स्वस्थ बसणार नाहीय. पैसा लवकर वसूल होण्यासाठी जरा चांगल्या वस्तीत हाच व्यवसाय पुन्हा सुरू करायचा विचार आहे. शाँझ् एलिझेवर एक नवा आलिशान नाईट क्लब सुरू करण्याचा विचार आहे. तीन गोष्टी नक्की केल्यात. नाव 'ल जारदाँ द

पॅरीस', बारटेंडर सारा, लीड डान्सर जेन ॲव्हरील. आणखी एक सर्वात महत्वाचं म्हणजे, पोस्टर बाय तुलूझ् लोत्रेक."

(लोत्रेकचे 'जेन ॲव्हरील ॲट जारदाँ द पॅरीस' हे पोस्टर खूप प्रसिद्ध आहे.)

हेन्रीचे सारे विश्व त्याच्यासमोर कोसळून पडत होते. झिडलर, सारा आणि जेन ॲव्हरील गेल्यामुळे मुलँ रूजमध्ये इतरांच्या दृष्टीने फारसा फरक पडणार नसला तरी त्याचे भावविश्व रिते झाले. मुलँ रूजमध्ये त्याच्या असण्याला असलेले प्रयोजन संपले. त्याला जे काही सांगायचे होते ते त्याच्या मुलँ रूजवरील पोस्टर, पेंटिंगमधून पुरेपूर व्यक्त होत होते. मॉरीसचे म्हणणे बरोबर आहे. कलाकार म्हणून वाढ व्हायची असेल तर येथून आता बाहेर पडले पाहिजे.

त्या रात्री तो नेहमीप्रमाणे कॅनकॅनचा नाच होईपर्यंत थांबला पण त्याने एकही स्केच केले नाही. शो संपल्यावर बारवर जाऊन सारा वगैरे सर्वांचा त्याने आवर्जून निरोप घेतला. जाता जाता लॉबीमध्ये लावलेल्या त्याच्या सर्कस या पेंटिंगसमोर जाऊन तो क्षणभर थबकला आणि काठीवर भार टाकत पाय ओढत बाहेर पडला.

घोडागाडीत चढता चढता त्याने पुन्हा एकदा मुलँ रूजकडे, विद्युत दिव्यांची रोषणाई केलेल्या फिरत्या पवनचक्राकडे डोळे भरून पाहून घेतले.

"गुड बाय मुलँ रूज."

एखाद्या मित्राचा निरोप घ्यावा तसे तो हात हलवून म्हणाला. घोडागाडी सुरू झाल्यावर स्वतःशी बोलावे तसे हळूच पुटपुटला,

"गुड बाय मोंमार्त्र."

(इन द प्रोमोनेद ऑफ द मुलँ रूज या पेंटींगमध्ये मुलँ रूजच्या स्टेजभोवती बसलेल्या व्यक्तिंचे चित्रण केले आहे. यातील सर्व व्यक्ति ओळखता येतात. मध्येभागी बसलेल्या शँपेनचा व्यापारी मॉरीस गिल्बर्ट आणि त्याच्या मित्रांच्या मागे तुलूझ लोत्रेक आणि त्याचा चुलतभाऊ गॅब्रिएल उभे आहेत. दुसऱ्या बाजूला ला गुल्वी

आरशासमोर उभी राहून केस नीट करत आहे. तिच्याकडे बघणारी स्त्री म्हणजे तिची मैत्रीण मॉम फ्रोमांज. उजव्या कोपऱ्यात दिसणारा मोठा चेहेरा मे मिल्टन या दुसऱ्या नर्तिकेचा आहे. छायाविरहीत कृत्रीम प्रकाशामुळे पेंटींगचे सर्वसाधारण नियम या पेंटींगला लागू पडत नाहीत. रंगीत प्रकाशाच्या विचित्र परावर्तनाने तिचा चेहेरा भितीदायक वाटत आहे. कादंबरीत लोत्रेकला आवडणाऱ्या हिरव्या शॅडोज त्या ह्या. लोत्रेकच्या वारसांनी या पेंटींगचा उजव्या कोपऱ्यातील हा भाग कापून टाकला होता, तो १९१४ साली पुन्हा जोडण्यात आला. *मुलँ रूजचा मालक झिडलर, तेथील नर्तिका, कर्मचारी, वादकवृंद आणि आश्रयदाते यांच्यावर आधारित एका उपकथानकाचे बाझ लुहमन दिग्दर्शित मुलँ रूज या हॉलीवूड चित्रपटात हृद्यस्पर्शी आणि मनोरंजक चित्रण केले आहे. या चित्रपटाला २००१ मध्ये एकूण आठ ऑस्कर नॉमिनेशन्स मिळाली.)



(इन द प्रोमोनेद ऑफ द मुलँ रूज – तैलरंग, कॅनव्हास,
१३३x१४१ सेमी – १८८२, आर्ट इन्स्टिट्यूट ऑफ शिकागो)

## मिरीयम

थोड्या दिवसांनी मॉरीस ज्वाय्याँ हेन्रीला घेऊन नातानसोन दाम्पत्याकडे गेला. दरवाजात गणवेश घातलेला फुटमन त्यांच्या हॅट, कॅप्स, ग्लोव्हज् वगैरे वस्त्रसांभार सांभाळायला मोठ्या अदबीने उभा होता. ते दोघे तरुण हॉलमधून मोठा जिना चढून ड्रॉइंग रूमच्या दिशेने जाऊ लागले. तो उंच जिना चढताना हेन्रीला थोडी धाप लागली. रेशमी कापडाची शेड लावलेल्या दिव्यांचा उजेडात घर होते त्यापेक्षा अधिक भव्य वाटत होते. कोपऱ्यातील फायरप्लेसमध्ये जळणाऱ्या ओंडक्यांचा लालसर प्रकाश चकचकीत फरशीवर पसरला होता. दुसऱ्या कोपऱ्यातील ग्रँड पियानो एखाद्या शवपेटीसारखा वाटत होता. जमलेली मंडळी छोट्या छोट्या गटांत विखुरली होती. दागिन्यांनी मढलेल्या स्त्रिया, झोकदार दाढी राखलेले पुरुष, सावकाशपणे शेरीचे घुटके घेत, सभ्यता आणि शिष्टाचाराच्या साऱ्या मर्यादा सांभाळून हळू आवाजात एकमेकांशी गप्पा मारीत होते. पांढरे हातमोजे घातलेले फुटमन उंची वाईन व मौल्यवान क्रिस्टल सांभाळीत जमलेल्या गर्दीतून लीलया फिरत होते.

हेन्रीने मिसीया नातानसोनला पाहताक्षणी ओळखले. ती काही तिथे जमलेल्या स्त्रियांतील सर्वात सुंदर स्त्री होती अशातला भाग नव्हता. हे सगळे माझे आहे हे तिच्या एकूण आविर्भावातून अगदी सहजगत्या दिसत होते. त्यात आपण मालकीण असल्याचा तोरा नावालासुद्धा नव्हता. त्यांच्याकडे लक्ष जाताच ती ताबडतोब आपला गाऊन सांभाळत मोठ्या डौलदारपणे एक हात पुढे करीत त्याच्या दिशेने आली.

"मस्य ज्वाय्याँ, बरं झालं तुम्ही तुमच्या मित्रांना घेऊन आलात ते." ती हेन्रीकडे वळून तिच्या किंचित स्लाव्हिक उच्चारात म्हणाली, "मस्य तुलूझ द लोत्रेकनी अखेर माझ्यावर मेहरनजर केली म्हणायची. तुम्हाला कल्पना नसेल मी किती दिवस तुमची भेट व्हावी म्हणून वाट पाहात होते. आता मी तुमचा पूर्ण ताबा घेणार आहे. अर्थात तुमची हरकत नसेल तर."

तिच्या वेड लावणाऱ्या मोहक हास्याने हेन्री विरघळून गेला.

“ज्वाय्याँ गॅलेरी. ९ रू फॉरेस्ट.” हेन्रीने गाडीवानाला सांगितले. मॉरीसने नुकतीच स्वतःची आर्ट गॅलरी सुरू केली होती. त्या गॅलरीत त्याने लोत्रेकच्या चित्रांचे प्रदर्शन आयोजित केले होते. गाडी चालू झाली आणि गाडीच्या धक्क्यांबरोबर हेन्रीचे मन भूतकाळात हिंदकळू लागले.

गेली पाच वर्षे दैवाने त्याची क्रूर थट्टा चालविली होती आणि आज त्याच्यावर नशिबाने एकदम मेहेरनजर केली होती. पाच वर्षे काही थोडाथोडका काळ नव्हे. तोसुद्धा ऐन उमेदीतला. पूर्वी पदोपदी त्याला स्वतःच्या व्यंगाची जाणीव व्हायची आणि आता पाहावे तो सर्वांनी मिळून त्याच्या व्यंगाकडे दुर्लक्ष करायचे ठरविले असल्यासारखे.

मिसीयाचे उदाहरण घ्या. तिने त्याच्यावर अशी काही मोहिनी घातली होती की विचारता सोय नाही. अक्कलहुशारीवर फारसे विसंबून चालत नाही एवढी हुशारी तिच्याकडे नक्कीच होती आणि त्यामुळेच तिने सहज हौसेखातर म्हणून सुरू केलेल्या सॅलाँची ख्याती थोड्याच अवधीत साऱ्या पॅरीसभर पसरली. एमिल झोला, क्लेमॅन्सो, ॲनातोल फ्रान्स यांसारख्या ख्यातनाम मंडळींना तिने तिच्या प्रतिस्पर्ध्यांकडून आपल्याकडे ओढून घेतले होते तर बिचाऱ्या हेन्रीची काय कथा! तो तर पहिल्याच दृष्टिक्षेपात खलास झाला होता. तिच्या मोहक हास्याने भूतकाळातील कटू आठवणी विसरून त्याला भविष्यकाळातील गोड स्वप्ने पडू लागली होती. पहिली ओळख झाली ती रात्र अजून त्याच्या चांगली लक्षात होती. त्या रात्री ती खूप सुंदर दिसत होती. सुंदर असणे आणि सुंदर दिसणे यात फरक आहे. ती बुद्धिमान होती. तिने रसिकता आपल्या अंगी काळजीपूर्वक बाणवली होती. संपत्तीमुळे येणारा उद्दामपणा तिच्यात नव्हता. तिच्या व्यक्तिमत्वातील खानदानी अदबेची बघताक्षणी छाप पडे. तिच्या केशभूषेवर सर्वांत महागड्या हेअर ड्रेसरचा हात फिरायचा, तिचे कपडे पॅरीसमधल्या सर्वांत महाग दुकानातून, वर्थ नाही तर पाकीन्समधून, यायचे. कपडे परिधान करण्यासाठी चार सेविकांचा हातभार लागायचा. हेन्री तेव्हा सत्तावीस वर्षांचा होता. वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी स्त्रीदेहाची चांगलीच जाण त्याला आली होती. तिने त्या किमती ड्रेसखाली तशीच किमती लिंगरी घातली असेल आणि त्या लिंगरीखाली तिचा गोरापान नितळ देह कसा दिसत असेल त्याची तो कल्पना करू शकत होता.

पहिल्याच भेटीत मिसीयाने हेन्रीकडे पाहून टाकलेल्या कटाक्षाची तशी गरज नव्हती. असा कलिजा खलास करणारा कटाक्ष टाकायचा म्हणजे एखाद्या सशाला मारण्यासाठी तोफेचा गोळा डागण्यासारखे होते. एक साधे स्मित त्याच्यासाठी पुरेसे होते. एरवी तो कुठे गेला की त्याच्याकडे निर्देश करून लोक कुजबुजत असत, 'तो बुटका पाहिलात. फेंगड्या पायांचा. केवढा भयानक दिसतो नाही?' लोकांच्या नजरेतूनच त्यांचे कुजबुजणे हेन्रीला ऐकू येई. त्याऐवजी त्या रात्री त्याच्या वाटेला आली सौजन्यशील वागणूक. उपस्थितांनी आपल्या बोलण्यात हेन्रीच्या व्यंगाचा उल्लेख चुकूनही केला नाही. एवढेच नव्हे तर त्यांच्या नजरेतही तसे जाणवले नाही. उलट त्यांनी केलेल्या स्तुती व प्रशंसेने त्याला संकोचल्यासारखे झाले.

त्या रात्री उपस्थितांपैकी प्रत्येक व्यक्ति, घडलेला प्रत्येक प्रसंग हेन्रीला तपशीलवार आठवत होता. पांढराशुभ्र वेष परिधान केलेली सारा बर्नहार्ट, क्लॉड डेबसी व ऑस्कर वाईल्ड यांच्यामध्ये बसली होती. ॲनातोल फ्रान्स कोणाशी तरी वाद घालत होता. येथे वादसुद्धा कसे अगदी मुद्द्यांना धरून चालत. कुजबुजत्या आवाजात काचपात्र किणकिल्यासारखे हसत, कंबरेत वाकत, फारच झाले तर भ्रुकुटी किंचित वक्र व्हायची. ला नुव्हेलच्या तुलनेत येथील वाद म्हणजे विणकामाच्या सुयांनी खेळलेले द्वंद्वयुद्ध वाटले असते. ही दुनिया यशस्वी लोकांची दुनिया होती. अपेशी लोकांच्या दुनियेहून एकदम निराळी.

मिसीयाच्या अगत्यशील स्वागताने हेन्री अगदी हवेत विहार होता. तिच्या नवऱ्याने तिचा वेळ जावा म्हणून एक मासिक सुरू केले होते. त्याच्या मुखपृष्ठाचे काम पहिल्याच भेटीत त्याने हेन्रीकडे सोपविले आणि निघताना पुन्हा परत यायचे बजावून सांगितले.

त्या रात्री पहिल्यांदाच त्याला जाणवले की त्याची गणना एका यशस्वी पुरुषात केली जात आहे? बुटका असलो तरी मी तुलूझ-लोत्रेकांच्या कुळातील एक आहे. एक तरुण आणि धाडसी चित्रकार म्हणून जग मला ओळखते. पॅरीसमधील कोणतेही दरवाजे माझ्यासाठी उघडतील. मी जाईन तेथे कंबरेत लवून माझे स्वागत होईल.

स्वतःच्या या नव्या ओळखीनंतर हेन्रीने पॅरीसमधील झगमगत्या जीवनप्रवाहात स्वतःला झोकून दिले. दिवसभर स्टुडिओत काम. रात्री भटकंती. आज इथे तर उद्या तिथे. कॅफे शे वेबेर, कॅफे आँग्लीस, आयरीश-अमेरिकन बार, रू रोयाल, शे मॅक्झीम, ल एल दोरॅदो, ल लाम्ब्रा, लेझ् अँम्बॉसॉदर, ल कझिनो द पॅरीस, फॉलीज बर्जेरा, पोलेझ् द ग्लास, व्हेलोड्रोम. पहाटेपर्यंत भटकंती आणि अखंड मद्यपान. साहजिकच त्या पाच वर्षांत म्हणण्यासारखे फारसे काही झाले नाही. मोंमार्त्रमध्ये फारसा मानसन्मान त्याच्या वाटेला येत नसे. तरीही त्याची निर्मिती अखंड चालू होती. कदाचित कलाकाराची निर्मितीप्रक्रिया ही आत्मसन्मान मिळवण्याचा एक मार्ग असली पाहिजे.

पॅरीसमधील सर्व ख्यातनाम बार, तेथे भेटणाऱ्या स्त्रिया, यौवना व मध्यमा, गोऱ्या व सावळया, नट्या, नर्तिका, गायिका, फॅशन मॉडेल, रात्रीची सुरुवात संध्याकाळी जेन ॲव्हरीलबरोबर मारलेल्या गप्पांनी तर सांगता पहाटे पाच वाजता झिमरमनचा व्हेलोड्रोमवरील सायकलचा सराव बघण्याने व्हायची. प्रिन्स ऑफ वेल्सने ल जारदाँ द पॅरीसमध्ये दिलेली शाही मेजवानी, ड्रेफ्युज प्रकरणाअगोदर एमिल झोलाबरोबर घेतलेले जेवण, अधूनमधून केलेल्या लंडन, ॲमस्टरडॅमच्या फेऱ्या यात त्याचे दिवस गेले. लंडनच्या फेरीत त्याने जेम्स व्हिसलरच्या चेल्सीमधल्या स्टुडिओत केलेले स्केच, समलिंगी संभोगाच्या आरोपाखाली अटक होण्यापूर्वी थोडे दिवस आधी ऑस्कर वाईल्डचे केलेले एक पोस्टर अशा फुटकळ गोष्टींशिवाय त्याच्या हातून महत्वाचे असे काही झाले नाही. ला गुल्वी आता स्वतंत्रपणे कार्यक्रम करू लागली होती. तिने तिच्या कनातीचे पडदे हेन्रीकडून रंगवून घेतले.

(हे पडदे म्हणजे दोन मोठे कॅनव्हास होते. हेन्रीच्या निधनानंतर ला गुल्वीच्या पडत्या काळात तिने ते एका आर्ट डीलरला विकले. त्या डीलरने अजाणतेपणी त्याचे कापून तुकडे केले. नंतर १९२९ साली त्याचा शोध लागला आणि ते जोडून एकत्र केले गेले. सध्या हे पडदे म्हणजे लूव्हरचे एक भूषण समजले जातात.)

डकार, लिस्बन, माद्रिद, बार्सिलोना अशा ठिकठिकाणी हेन्री हिंडला. या भटकंतीत तो शेकडो लोकांना भेटला. पार्ट्यांमध्ये विदूषकी चाळे केले. तरी अंतर्यामी

तो एकाकीच होता. हे एकलेपण दूर करण्यासाठी तो मद्यपानाचा आसरा घेई. सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत. मग घोडागाडीतच झोप. दुसऱ्या दिवशी पुन्हा नवे ठिकाण नवी माणसे. त्याला कळून चुकले होते की कोणत्याही स्त्रीच्या प्रेमाचा लाभ त्याला कधीही होणार नाही. युवतींचे मोहक हास्य त्याच्यासाठी नसायचे. ते असायचे एका प्रसिद्ध चित्रकाराकरिता. त्याच्या वयाला बत्तीस वर्षे पूर्ण झाली होती. पण तो दहा वर्षांनी अधिक वृद्ध दिसायचा. त्याची प्रकृती झपाट्याने खालावत चालली होती. तो पूर्वीच्या निम्म्यानेसुद्धा काम करू शकत नसे. मद्याचा पेला उचलताना त्याचे हात कंप पावत. पाय इतके दुखायचे की कितीही दारू प्यायली तरी वेदनांचा विसर पडत नसे.



(फोटो - हेन्री तुलूझ लोत्रेक विदुषकाच्या वेषात)

- ७० -

घोडागाडी एका बाजूच्या गल्लीत वळली आणि एका साध्यासुध्या दिसणाऱ्या दुकानासमोर थांबली. त्या दुकानावर सोनेरी अक्षरात रंगवलेली पाटी होती. ‘गॅलेरी ज्वाय्याँ’. हेन्री काचेचा दरवाजा ढकलून आत शिरला. पुढची दोन दालने ओलांडून हेन्री मागच्या ऑफिसमध्ये गेला. मॉरीस टेबलावर काहीतरी लिहिण्यात दंग होता. त्याने डोके वर करून पाहिले.

“*बाँज्यूर* हेन्री. ओह, *नॉम दे दियू*! परत दारू प्यायला सुरुवात केलीस?”

“दारू कुठे प्यायलोय मी. फक्त दोन ॲपरटीफस् घेतलीयत सकाळपासून. फार तर तीन झाली असतील.”

“कोणाला थापा मारतोयस. तुझे डोळे आणि चेहेरा सांगतोय तू किती प्यायलायस ते.”

“मी बसलो तर तुझी काही हरकत नाही ना? मी बसल्यावर तुला काय प्रवचन द्यायचे ते दे.”

हेन्री एका खुर्चीवर बसला आणि म्हणाला, “मी इकडे येता येता विचार करीत होतो. माझी गेली पाच वर्षं नुसती फुकट गेलीयत. आणि याला एका परीने तूच कारणीभूत आहेस. तूच माझी मिसीयाशी ओळख करून दिली होतीस आठवतंय? तेव्हापासून मी फारसं काही करू शकलो नाही.”

“सभ्य लोकांच्या जगात तुझी ऊठबस व्हावी म्हणून मी तुझी तिच्याशी ओळख करून दिली. वाटलं होतं तुझ्या चार ओळखी झाल्या, मोठ्या लोकांत ऊठबस वाढली, थोडी प्रसिद्धी मिळावी की तुझं पिणं कमी होईल. पण झालं उलटंच. तुझं पिणं वाढलं आणि पेंटिंग कमी झालं.”

बाजूला पडलेल्या वर्तमानपत्रातील एका बातमीकडे लक्ष वेधत हेन्री म्हणाला, “हे वाचलंस ना. आपल्या उद्याच्या प्रदर्शनाविषयी काय छापून आलंय ते. तरुण आणि धाडसी चित्रकाराचा पहिलाच वन मॅन शो. तरुण व धाडसी चित्रकार अशी बॅलड रिॲलिस्तपासून तयार केलेली बिरुदावली हे पत्रकार माझ्या नावामागे किती दिवस लावणार आहेत कोण जाणे. मी पाऊणशे वर्षांचा म्हातारा झालो तरी हे मला तरुण आणि धाडसी चित्रकार म्हणत राहाणार आहेत की काय.”

“पाऊणशे? या गतीने दारू ढोसत राहिलास तर वयाची चाळिशी गाठलीस तरी नशीब समज.”

“कोनॅकने काही होत नाही. रफाएल, कॅरिज्जो, वॉत्तो दारू पीत होते तरी ते भरपूर जगले. ते जाऊ दे. तुला जे काही प्रवचन झोडायचं असेल ते झोडून एकदा मोकळा हो बरं. म्हणजे तूही सुटलास आणि मीही सुटलो.”

आपल्या या मित्राला कसे समजवावे या विचारात मोरीस थोडा वेळ गप्प राहिला. “कित्येक वेळा मला वाटतं की जाणूनबुजून आपल्या करीयरची वाट लावायची असं तू ठरवलेलं दिसतंय. परवा त्या ऑपेरा बॉलला कोणत्या फालतू बाईला बरोबर घेऊन आलास. नुसता बरोबर घेऊन आलास असं नाही. वर सर्वांशी माझी आल्बीतील मावशी म्हणून आवर्जून ओळख करून द्यायची काय गरज होती? अशाने तुझी काय इज्जत राहिली?”

“ओह. तू त्या मादाम पोतीएरोंबद्दल बोलतोयस. एक तर ती फालतू बाई नाहीय. तिचा स्वतंत्र व्यवसाय आहे आणि त्यात ती बऱ्यापैकी पैसा कमावते. दुसरं म्हणजे तिला ऑपेरा बॉलला यायची खूप इच्छा होती. त्या दिवशी तिने कपडेसुद्धा अगदी टिपटॉप केले होते. शिवाय ती माझी मावशी म्हणून खपून जाण्यासारखी होती.”

“पण बॉलला आलेली बरीच मंडळी तुझ्या सगळया मावशांना चांगले ओळखत होती. ही नवी मावशी कोण आहे, तिचा काय व्यवसाय आहे हे तिने कितीही चांगले कपडे केले असले, खानदानीपणाचा आव आणला असला तरी त्यांनी अंदाजाने बरोबर ओळखलं होतं. तिला बॉलला आणून तू एका अलिखित संकेताचा भंग केलास. तुझ्या ओळख करून देण्याने त्यांचा अवमान झाला. तुझ्यापाठी ते काय बोलत होते याची तुला कल्पना आहे काय?”

“लोक पाठीमागे बोलतात. मी कोणाकोणाला अडवू? दुसऱ्यांची हेटाळणी केल्याने जर त्यांच्या संभाषणात रंग भरणार असेल तर करू दे त्यांना तसं. मॉरीस, मी तुला मागेच सांगितलंय. ल फ्लुर ब्लां या एकाच जागी मला खरी विश्रांती मिळते आणि शांतपणे पेंटिंग करता येतं. अधूनमधून तिथल्या मुली येतात गप्पा मारायला. तुला खरं वाटणार नाही त्यांच्या गप्पा किती निर्मळ असतात ते. शिवाय तिथे मिळणारे जेवणही खूप चांगलं असतं ते वेगळंच. वेश्यागृहात राहण्यात केवढी गंमत असते ते प्रत्यक्ष अनुभवल्याशिवाय तुला कधीच कळणार नाही.”

“न अनुभवताच मला कळतंय काय गंमत येते ती.”मॉरीस उपहासाने हसून म्हणाला.

“डोंबल. तुला काय कळणार? हे बघ त्या सगळया तथाकथित चारित्र्यवान लोकांसारखा हलकटपणा करू नकोस. मला म्हणायचंय की वेश्यांच्या जीवनाचे खरेखुरे चित्रण त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्यावरच करता येतं. त्यांचे चेहेरे, गप्पा मारताना त्यांच्या चेहऱ्यावरचे विविध भाव, त्यांच्या शारीरिक हालचाली ह्यांचे निरीक्षण त्यांच्या भावजीवनाचा एक भाग झाल्याशिवाय नुसतं स्टुडिओत बसून मॉडेलला पोज देऊन करता येणार नाही. आपल्या समाजजीवनाचा हा भाग अविभाज्य असला तरी आजवर तो बहिष्कृत असल्यासारखा आहे. अगदी पेंटिंगचा विषय म्हणूनही.”

“उगाच नाही समीक्षक तुला व्हेलाक्वेझ ऑफ व्होर्स म्हणतात.”

"मला हे माहीत नव्हतं. पण तसं असेल तर मी हा माझा बहुमानच समजेन. हे बघ मॉरीस, थोडा वेळ तुझ्या त्या ख्रिश्चन सोवळेपणाच्या कल्पना बाजूला ठेव. स्टुडिओत बसून नग्न मॉडेलचे चित्र काढणे आणि वेश्यागृहात बसून नग्न वेश्येचे चित्र काढणे ह्यात नैतिकदृष्ट्या काय फरक आहे तो मला कधी कळला नाही. पण कलात्मकदृष्ट्या खूप फरक आहे. म्युझियममधला पेंढा भरलेला वाघ, प्राणीसंग्रहालयातल्या पिंजऱ्यातील वाघ आणि जंगलातील वाघ यात जो फरक आहे तोच फरक यात आहे. तुला एक गंमत सांगतो. स्टुडिओत चित्रकारासमोर जी मॉडेल कपडे काढायला आढेवेढे घेत नाही ती बिछान्यात त्याच्याबरोबर झोपण्यासाठी कपडे काढताना लाजते. जी वेश्या तिच्या गिऱ्हाईकांसमोर बिनदिक्कत नग्न होईल ती चित्रकाराला पोज देण्यासाठी कपडे काढताना लाजून चूर होते."

"मॉडेलच्या स्टँडवर बसलेली न्यूड ही एक विवस्त्र स्त्री असते. तुम्ही तिचं पेंटिंग करता तेव्हा ते एक लैंगिक भावना चाळवणारं पेंटिंग होतं. त्याची लायकी एखाद्या घाणेरड्या अश्लील पिक्चर-पोस्टकार्डपेक्षा जास्त नसते. पण अशा पेंटिंगला तुम्ही एक कलाकृती म्हणून डोक्यावर घेऊन नाचता. वेश्यागृहातील न्यूड ही एक वेगळीच चीज असते. तिच्यावर कसलाही दबाव नसतो. अगदी निःसंकोचपणे तिचा वावर चालू असतो. ती उठते, बसते, चालते. मधेच मांजरीसारखी झक्कपैकी अंग ताणून आळस देते. एडनच्या बागेतील ईव्ह अशाच सहजतेने वावरली असेल. तेथे तुम्हाला स्त्रीच्या नग्न देहाची विविध रूपे दिसतात आणि लक्षात येतं की स्त्री देह म्हणजे कपडे लटकविण्याचा नुसता हँगर नाहीय. तिच्या देहावर नितळ कांती आहे, दोन हात आहेत, दोन पायांवर तो उभा आहे. चित्रकाराला हवी असलेली कोणतीही पोज देण्याची क्षमता असलेला देह. नग्न स्त्री हसताना तिचं पोट कसं दिसतं हे तू पाहिलंयस? हास्याला सुरुवात बेंबीपासून होते आणि मग ते शरीरभर पसरत जातं. हसताना कुल्ले कसे थरथरतात, पायाचे चवडे कसे धनुष्यासारखे ताणले जातात. एकदा एका मुलीला डॉक्टरने तपासताना सांगितलं की तुला उपदंश झालाय. ते ऐकताच तिच्या चेहेऱ्यावर प्रेतकळा आली. पण त्यापेक्षा तिच्या मांडीचा स्नायू कसा आखडला गेला त्यावरून तिची प्रतिक्रिया जास्त चांगली उमगत होती. कलेचा

आविष्कार, निर्मिती ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. कलाकृती निर्माण झाल्यानंतर तू ती बघत असतोस. कलाकृती विकणे हा तुझा व्यवसाय आहे. तू एक जाणकार रसिक आहेस हे मान्य. तरीही तुझी भूमिका वेगळी. तुला नाही कळणार हे सगळं.''

''ठीक आहे. नाही कळणार. पण तुझी भूमिका एवढी स्पष्ट आहे तर तुझी ही वेश्यांची पेंटिंग तू वरच्या मोठ्या हॉलमध्ये लावण्याऐवजी लपूनछपून तळघरात का लावतोयस? लोकांच्या टीकेची तू कधीपासून पर्वा करायला लागलास?''

''कोणाच्या टीकेला मी भीक घालत नाही. पण उगाचच कोणाचे कुतूहल मला चाळवायचं नाही. ज्यांना माझी भूमिका समजू शकेल अशा मोजक्या लोकांनाच मी खाली तळघरात बोलावलंय. मुलँ रूजच्या पोस्टरच्या वेळी केलेली चूक मला यावेळी परत करायची नाहीय. त्या पोस्टरमुळे केवढा गहजब उडाला आणि मुलँ रूजमधील माझी निवांतपणे बसायची जागा गेली. आता माझ्या पेंटिंगमुळे उगाच मादाम पोतीएराँची बदनामी व्हायची. ती काही चित्रकारांसाठी लॉजिंग बोर्डिंग उघडून बसली नाहीय. आता चर्चा पुरे. सगळी तयारी झालीय ना? खायची-प्यायची काय व्यवस्था आहे? कोनॅक किती आणलीय?''

''पोहता येईल एवढी भरपूर आहे, पण जास्त पिऊन गोंधळ घालू नकोस म्हणजे झालं.''

''काही घाबरू नकोस. माझ्या पाहुण्यांची येण्याजाण्याची व्यवस्था मागच्या दरवाजाने केलीय. तुला वर कळणारसुद्धा नाही खाली काय चाललंय ते. मग तर झालं. तशी अगदी मोजकीच मंडळी येणारायत. मिसीया. जेन ॲव्हरील, पण या नट्यांचा काही भरवसा नाही. देगासला बोलावलंय. पण प्रदर्शनाला म्हणून तो येणं कठीण आहे. तो गर्दी टाळत असतो. तो आलाच तर व्हिसलरला घेऊन येईल.''

''ठीक आहे. जर इथे वर दुकानात कोणी तुझी चौकशी करायला लागला तर मी काय सांगायचं? उदाहरणार्थ, कामोंदो. तुला माहीत आहे का? ते एक मोठे

संग्राहक म्हणून ओळखले जातात. ते म्हणाले होते, सध्या सर्बियाचे राजेसाहेब पॅरीसमध्ये आहेत. त्यांना काही पेंटिंग घ्यायची आहेत आणि ते त्यांना त्यात मदत करतायत.''

''फुटव त्यांना काहीतरी सांगून. सांग मी आजारी आहे. त्यापेक्षा सांग लोत्रेक मेला म्हणून. मग नक्कीच माझं एखाददुसरं पेंटिंग विकत घेतील. जिवंत चित्रकारापेक्षा दिवंगत चित्रकाराच्या पेंटिंगला दसपट अधिक मोल येतं.''

''आणि जर समज त्याच्याबरोबर दस्तुरखुद्द राजेसाहेब जातीने आले तर.''

''त्यांना सांग मी खाली तळघरात आहे म्हणून. गरज असेल तर येतील खाली पायऱ्या उतरून.''

''हेन्री, तू अगदी पक्का अहंमन्य आहेस.''

''नक्की काय ते ठरव. थोड्या वेळापूर्वी मी वेश्यांशी जवळीक करतो, मादाम पोतीएरोंला घेऊन मी ऑपेराला आलो म्हणून मी पायरी सोडून वागतो असं तुला वाटत होतं आणि आता तुझ्या या बाल्कनच्या राजेसाहेबांना भेटायला मी वर येत नाही म्हणून मी अहंमन्य झालो. बरा न्याय आहे.''

''अहंमन्य नाही तर दुसरं काय म्हणायचं. मला एक सांग, त्या दिवशी मस्य द्युरँद रूएलसाहेबांची एवढी मस्करी तू का केलीस?''

हेन्रीला जोरात हसू आले.''ओह. म्हणजे त्यांनी तुला सगळी हकिगत सांगितली वाटतं?''

''होय, पण त्या वेळी ते हसत नव्हते. अगदी गंभीरपणे ते सांगत होते.''

''अरे, ती एक गंमतच झाली. पण ती त्यांनी आपण होऊन ओढवून घेतली. त्यांना माझ्या स्टुडिओमध्ये यायचं होतं पेंटिंग बघायला. सध्या माझा मुक्काम मादाम

पोतीएराँकडे असतो आणि तसं बघायला गेलं तर तोच माझा स्टुडिओ म्हटला पाहिजे. मी त्यांना तिचा पत्ता दिला. पण तिथल्या मुलींना द्युरँदसाहेब माझे पाहुणे आहेत हे सांगायचं राहून गेलं. ते आत शिरले तेव्हा त्यांचा चेहेरा तू पाहिला हवा होतास. सगळ्या पोरी त्यांच्याभोवती गोळा झाल्या व त्यांना आपल्याकडे ओढू लागल्या. ते आपले परोपरीने सांगतायत की ते दुसऱ्या कामासाठी आले आहेत. पत्ता बरोबर आहे ना? माझं लग्न झालंय. मला तसलं काही करायचं नाही. त्यांची ती त्रेधातिरपीट पाहून माझी हसून हसून मुरकुंडी वळली.''

''तुला कल्पना असेलच की मस्य द्युरँद रूएल हे पॅरीसमधील एक मोठे आर्ट डीलर आहेत आणि ते काय करू शकतात याचीही तुला कल्पना असेलच. त्यांनी आपल्या स्टुडिओला भेट द्यावी म्हणून सगळे चित्रकार पायघड्या पसरून त्यांची आर्जवे करीत असतात आणि तुझ्याकडे ते आपण होऊन येत होते तर तू त्यांना मादाम पोतीएरांच्या कोठीवर बोलावलंस.''

''त्यांची मस्करी करण्याचा माझा उद्देश नव्हता. जे घडलं ते नकळत झालं. ते दुखावले असेल तर मला माफ कर. आता मी तुझा मित्र असल्यामुळे तुझ्या धंद्यावर याचा काही परिणाम होणार नाही ना? तसं असेल तर मी आपला चंबूगबाळं आवरून निघून जातो कसा.''

- ७१ -

दुसऱ्या दिवशी प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. दुपारी चार वाजल्यानंतर एक एक करून लोक यायला लागले. थोड्या वेळाने समीक्षक मंडळी आली. आपण कोणाच्या गावचे नाहीत असे वरवर भासवीत पण आपले महत्त्व नजरेत भरू देण्याची एकही संधी न सोडता ते वावरत होते. एखाद्या जनरलने जवानांची पाहाणी करावी तशा रुबाबात ते हातात छत्री अडकवून सगळ्या कॅनव्हाससमोरून फिरत होते. मधेच थांबून मान वाकडी करून, थोडे मागेपुढे सरकून बारकाईने निरीक्षण करीत हातातल्या वहीत काहीतरी खरडत होते. साडेपाच वाजेपर्यंत सगळा हॉल गर्दीने फुलून गेला. कसलाही गाजावाजा केला नव्हता तरी सांगोवांगी झालेल्या प्रसिद्धीने खूप गर्दी झाली. मॉरीसची सारखी खालीवर धावपळ चालू होती. सगळ्यांशी मोठ्या तत्परतेने तो दोन शब्द बोलत होता.

थोड्या वेळाने काउंट इसाक कामोंदो व किंग मिलान ऑफ सर्बिया असे दोघे जण आले. लोकांनी अदबीने त्यांना वाट करून दिली. मॉरीस त्यांच्याबरोबर फिरत त्यांना मोठ्या उत्साहाने माहिती पुरवत होता. राजेसाहेब एका पेंटिंगसमोर किंचित थांबले. ते विदूषकाचा पेहराव केलेल्या बाईचे पेंटिंग होते.

"इथल्या एका सर्कशीत काम करते. काय तौलनिक रचना आहे पाहा. शिवाय रंगांचे संतुलन."

"केवढ्याला?" काउंटने विचारले.

"सहा हजार फ्रँक."

"काय सहा हजार. लोत्रेक अजून लहान आहे."

"रफाएलसुद्धा एकेकाळी लहान होता साहेब." मॉरीस हेन्रीचा एक जिवलग मित्र होता तसाच एक जाणकार विक्रेताही.

"मागच्या वर्षी देगास मी सहा हजारात घेतला."

“आणि एका वर्षात त्याची किंमत दुप्पट झाली. मस्य तुमची अभिरुची आणि व्यापारी दृष्टी यांचे कौतुक करायला हवे. या दोघांचा मेळ क्वचितच जमतो.”

संध्याकाळी सात वाजल्यानंतर मॉरीसला जरा फुरसत मिळाल्यावर तो खाली तळघरात गेला. हेन्री हातात ग्लास घेऊन जेन ॲव्हरीलशी गप्पा मारत होता. मॉरीसला पाहून तो म्हणाला,

“काय कामोंदोसाहेब आले की नाही शेवटी?”

“नुसते आले असं नाही तर तुझं ते शा-तु-काओचे पेंटिंग घेऊन गेले. सहा हजार फ्रँक आले, आहेस कुठे? राजेसाहेबांनी पण एक पेंटिंग घेतलं. तू आता नुसता पोस्टर आर्टिस्ट राहिला नाहीस. महाशय तुम्ही आता पेंटर झालायत. पुढचा शो लंडनमध्ये करू. पुढच्या वर्षी न्यूयॉर्क. खरा पैसा तिकडेच आहे. अमेरिकेत.”

(काउंट कामोंदोने घेतलेले शा-तु-काओ हे पेंटिंग सध्या लूव्हरमध्ये आहे, तर दुसरे पेंटिंग किंग मिलान ऑफ सर्बियाच्या खाजगी संग्रहात आहे असा उल्लेख ज्वाय्यांच्या कॅटलॉगमध्ये सापडतो. पण त्यानंतर झालेल्या बऱ्याच हस्तांतरामुळे सध्या कोणाकडे आहे त्याचा पत्ता लागत नाही.)

तेवढ्यात वरती बेल वाजली. इतक्या उशिरा कोण आले असावे असा विचार करीत मॉरीसने दार उघडले. देगास व्हिसलरला घेऊन आला होता.

“तुम्ही यायला बराच उशीर केलात. सगळे गेले.”

“म्हणूनच आम्ही उशिरा आलोय. लोत्रेक कुठे आहेत?” देगासने विचारले.

देगास आपल्या प्रदर्शनाला आला याचा हेन्रीला अतिशय आनंद झाला. जेव्हा हेन्री खालून वर आला तेव्हा देगास आणि व्हिसलर दोघेही एका मोठ्या कॅनव्हास ‘मुलँ रूज’ समोर उभे होते.

(दोन स्त्रिया आणि एक पुरुष एका टेबलाभोवती बसले आहेत असे हे पेंटिंग सध्या आर्ट इन्स्टिट्युट ऑफ शिकागोमध्ये आहे.)

‘‘या बाईचा चेहरा तू हिरव्या रंगात का रंगवलायस?’’ देगास लांबूनच ओरडला. जवळ जात तो म्हणाला, ‘‘मला माहितेय तू हिरवा रंग का वापरलास ते आणि तुझं बरोबर आहे. आता समीक्षक मंडळी काय म्हणतात ते बघ.’’

पुढे वाकून कॅनव्हासला अगदी नाक चिकटेल इतक्या जवळ जात व्हिसलर म्हणाला, ‘‘केस बाकी झकास काढलेयस हां. अगदी माझ्या गर्ल इन व्हाईटची आठवण येते. ही कलाकुसर आहे हे जरी खरं असलं तरी, ती कलाकुसर अशा सफाईने केलीयस की ती कलाकुसर आहे हे बघणाऱ्याला कळणारही नाही. हे मात्र अगदी अप्रतिम. मागच्या वर्षी तू लंडनमध्ये असताना मी तुला काय सांगितलं होतं आठवतंय?’’

‘‘ए जिमी. तुझी बकबक पुरे कर. सध्या आपण लंडनमध्ये नाही पॅरीसमध्ये आहोत आणि येथे आपण लोत्रेकचे प्रदर्शन बघायला आलो आहोत. हेन्री, चल तुझी बाकीची पेंटिंग दाखव बरं.’’ देगास म्हणाला. नंतर एक तासभर त्या दोघांनी खाली तळघरात ठेवलेली हेन्रीची वेश्यांच्या जीवनावरची पेंटिंग पाहिली.

‘‘तुझं वय काय आहे हेन्री?’’ देगासने विचारले.

‘‘बत्तीस.’’

‘‘तू माझ्यापेक्षा बत्तीस वर्षांनी लहान आहेस. तुला आता जेवढी अक्कल आहे तेवढी अक्कल आम्हाला यायला खूप उशीर लागला आणि अक्कल आली तरी तुझ्या एवढी आम्हाला आली नाही. तुला आठवतंय दहाएक वर्षांपूर्वी मी तुला सांगितलं होतं की या जगात आजपर्यंत फार तर पन्नास-साठ चित्रकार होऊन गेले असतील की ज्यांच्याकडे जगाला देण्यासारखं काही होतं आणि ते त्यांनी दिलं. इतिहास तुला त्यांच्या पंक्तीत नेऊन बसवेल.’’ असे बोलून देगास व्हिसलरबरोबर निघून गेला.



(शा-तू-काओ – तुलूझ लोत्रेक, तैलरंग, कॅनव्हास, १८९५, लुव्हर, पॅरीस)

- ७२ -

सर्वजण निघून गेल्यावर हेन्री एकटाच मागे उरला. त्याने एका कॅफेत जाऊन जेवण घेतले व नंतर फॉलीज बर्जेरामध्ये जाऊन बसला. 'लामोर अ व्हेनीस'चा शेवटचा अंक चालू होता. रिआल्टोवरील पूल, खाली गोंडोला वगैरेचा सेट लावलेला होता.

ऑर्केस्ट्रावर प्रेमगीताची आर्त धून वाजविली जात होती. गायिका तारसप्तकात गात होत्या तर नर्तिका व्हेनेशियन वेषभूषेत एक हात कंबरेवर, दुसरा हात उंचावत नाचत होत्या. पुलाखाली गोंडोला डोलत होता. लय हळूहळू टिपेला पोचली, सिंबल्सचा झणत्कार झाला व टाळयांच्या कडकडाटात पडदा पडला.

हेन्री थिएटरबाहेर पडला. रात्रीचे बारा वाजले होते. रस्त्यावर शुकशुकाट होता. आणखी एखादा पेला झोकण्याच्या बेताने तो कॅफे रीशमध्ये गेला. शेवटचा खेळ आटोपल्यावर नाटकातील कलाकार मंडळी तेथे ओनीयन सूप प्यायला जात. तेथे वातावरण अगदी मोकळे असे. चंदेरी दुनियेतील छोटे-मोठे सितारे खेळीमेळीने एकमेकांना पहिल्या नावाने हाक मारताना दिसत. या कॅफेत वरिष्ठ कलाकार मंडळी आपला बडेजाव थोडा वेळ विसरत. रात्रपाळीचे वार्ताहर व गॉसिप लेखक कोणाकडे काय बातमी मिळतेय इकडे अगदी कान लावून असत. कित्येक वेळा मोठमोठ्या करारमदारांचा मसुदा इथल्या टेबलावर बसून नक्की होई. हेन्रीला एकटा बसलेला पाहून जेन ॲव्हरील त्याच्या टेबलावर आली. तिने ओनीयन सूप, स्क्रँबल्ड एग्ज व कॉफी मागविली.

(कॅफे रीशमध्ये बसून सूप द ल्योनो घेणे हा पॅरीसला भेट देणाऱ्या पर्यटकांचा एक कार्यक्रम असतो.)

"मला एक डबल ब्रँडी." हेन्री.

"अहो, तुम्हाला झालंय तरी काय? बघावं तेव्हा आपले दारू पीत असता. मी कधी तुम्हाला खाताना पाहिलेच नाहीय."

“तूसुद्धा प्रवचन झोडायला लागलीस. खूप दमलोय मी. जरा निवांतपणे एखादा पेला पिऊ देशील की नाही?”

“अशाने लवकरच प्रकृतीची वाट लागेल. ते काही नाही चालायचं. आता माझ्याबरोबर तुम्हीसुद्धा काहीतरी खाऊन घ्या.” तिने हेन्रीसाठी सूप व एग्ज मागविली.

“मला एक पोस्टर करून हवंय. कराल माझ्यासाठी?”

“मी तुला मागेच सांगितलंय की मी पोस्टर करणं बंद केलंय म्हणून आणि तुला नव्या पोस्टरची गरज काय? सध्या आहे ते ठीक आहे की.”

“ते तुम्ही झिडलरसाठी केलं आहे. तुम्ही एवढ्या जणांना पोस्टर करून दिलेली आहेत. पण माझ्यासाठी म्हणून एकही केलं नाहीत. हे बघा, पुढच्या वर्षी मी लंडनला शो करणार आहे. तेव्हा त्या इंग्लिश लोकांच्या नजरेत भरेल असं काहीतरी नवीन हवंय.”

“आजपर्यंत तुझी जवळपास एक डझनभर तरी पोर्ट्रेट्स मी केली असतील. ती कुठे गेली? स्केचीस् किती केली असतील त्याची तर गणतीच नाही.”

“माझ्या पोर्ट्रेटचा मला काय उपयोग? ते विकत घेऊन माझ्या संग्रहात ठेवणं मला काही परवडण्यासारखं नाहीय. पोस्टर करून दिलंत तर काही फायदा. हेन्री, प्लीज. लंडनचा हा शो खूप महत्वाचा आहे. तुमच्या पोस्टरने नशीब फळफळतं असा इतिहास आहे. व्हेट गिलबर्ट, लुआ फ्युलर आणि कोण ती आयरीश बया मे मिल्टन का बेलफोर्ट. काय आहे तिच्याकडे? स्टेजवर मांजरीसारखी म्यॉँवम्यॉँव करत नुसती फिरत असते. हसायला काय झालंय तुम्हाला?”

“विशेष काही नाही. मनात आलं एका बाईने दुसऱ्या बाईला कधी चांगलं म्हटलंय?”

तेवढ्यात मे बेलफोर्ट एका मध्यमवयीन गृहस्थाच्या हातात हात घालून आली.

“सटवीला शंभर वर्षं आयुष्य आहे. आज आपला बँक अकाउंट बरोबर घेऊन आलेली दिसतेय.”

वेटरने सूप व एग्ज आणून ठेवले. तिने सावकाशपणे खायला सुरुवात केली. जेन ॲव्हरील मुलँमध्ये आल्यापासून हेन्री तिला ओळखत होता. तिचे नृत्यातील उपजत गुण तिने मेहनतीने जोपासले होते. सामान्य परिस्थितीतून आलेली एक नर्तिका आता एक प्रसिद्ध नटी होऊ पाहत होती. हेन्री तिच्या नृत्यकौशल्यावर फिदा होता. त्या दोघांची अतिशय जिव्हाळ्याची मैत्री होती.

“मस्य हेन्री, तुम्ही काही खात का नाही? सारखं पिणं चाललंय. ही कोनॅक तुमचा जीव घेईल एके दिवशी.”

“प्लीज जेन. मी जास्त पितो. एवढं पिणं चांगलं नव्हे. कबूल आहे. पण आता हे पिणं बंद करणं कठीण आहे. तू किंवा आणखी कोणी कितीही प्रयत्न केला तरी काही उपयोग होत नाही. मलाही वाटतं थांबवावं, पण नाही जमत.”

त्याच्या निबर चेहऱ्याकडे तिने पाहिले. त्याची ती दाढी आणि पुढे आलेले ओठ यामुळे त्याच्या कुरूपतेत भर पडली होती.

“हेन्री. एकटेपणा खायला उठतो तर दारू पिणं हा काही एकच उपाय नाहीय. तुमच्याबरोबर तुमची कला तर आहे.”

जेन ॲव्हरील जेव्हा तिच्या नव्या प्रियकराबरोबर निघून गेली तेव्हा पहाटेचे दोन वाजून गेले होते. कॅफेसमोर रेंगाळत असलेल्या घोडागाडीत हेन्री चढला व गाडीवानाला त्याने उगाच कुठेतरी जायला सांगितले. थोडा वेळ मॅक्झीममध्ये नंतर आयरीश अमेरिकन बार. गाडीत बसल्यावर त्याला पॉल गोगँची आठवण झाली.

एकेकाळी तो असाच अस्वस्थ असायचा. भरतकाम केलेले लालभडक रंगाचे जॅकेट घालून तो बुलेव्हारवर भटकताना आढळायचा. त्याच्या काकाने त्याच्या नावे तेरा हजार फ्रँक ठेवले होते. त्यामुळे तो अगदी छानछोकीने राहायचा. आपल्या ताहिती पेंटिंगनी आपण पॅरीसमध्ये खळबळ उडवून देणार आहोत अशा वल्गना करीत फिरायचा. इकडून तिकडून जमा केलेल्या सटरफटर पॉलीनेशियन कलावस्तू दाखविण्याच्या निमित्ताने स्टुडिओत चहापार्ट्या करण्यात थोडे दिवस गेले. शेवटी गुत्त्यात बसून दिवस ढकलण्याची पाळी आली. कोट, टाय, हॅट, ग्लोव्हज सगळा जामानिमा गेला. फाटके जॅकेट, ठिगळ लावलेली पँट व समोर ॲबसिंथची बाटली. खिशात दमडी नाही. पन्नाशी उलटलेली, तेरा हजार फ्रँक केव्हाच संपलेले. ताहितीला जाऊनही फारसे यश हाती लागलेले नव्हते. शरीराला जडलेले रोग, मोडलेला पाय, तोंडात अपयशामुळे आलेली कडवट चव, डोक्यात विरलेली स्वप्ने व कुरतडणाऱ्या आठवणी. बिचारा पॉल गोगँ. मनाने व शरीराने पिचलेला, दारिद्र्याने गांजलेला. आता या घटकेला तो काय करीत असेल बरे?-

विचारांच्या तंद्रीत हेन्रीला थोडा वेळ डुलकी लागली. घोडागाडी अगदी संथपणे चालली होती. त्याने डोळे किलकिले करून पाहिले. आकाशात थोडे फटफटू लागले होते. इतका वेळ काळयाभोर शाईसारख्या दिसणाऱ्या आकाशात दगडी पाटीचा करडेपणा दिसू लागला होता. दूर क्षितिजावर सीन नदीच्या पार्श्वभूमीवर नोत्र दॅमची धूसर आकृती दिसत होती.

“कोचर. ल फ्लूर ब्लां.”

रू द मुलँ ही पॅरीसमधील एक छोटीशी गल्ली होती. इतकी क्षुल्लक की बहुतेक नकाशांत ती दाखवलेलीसुद्धा नसे. गेल्या बाजारी कोणतीही महत्वाची घटना रू द मुलँमध्ये घडली नव्हती. ना एखादा खून ना खळबळजनक गुन्हा किंवा रस्त्यावर रक्ताचा सडा पडेल अशी एखादी ऐतिहासिक कत्तल. नेपोलीयन पॅरीसभर एवढा हिंडला, पण त्याचे पाय या गल्लीला कधी लागले नव्हते. दगडी भिंतींच्या आणि लोखंडी सज्जांच्या इमारती यामुळे वातावरण अठराव्या शतकातील वाटत असे. एकूण वस्ती कनिष्ठ मध्यमवर्गीयांची. या गल्लीत आजूबाजूच्या वातावरणाशी विसंगत अशी

एक हवेली होती. ही हवेली एका धनाढ्य सावकाराने त्याच्या अंगवस्त्राच्या निवासासाठी शहरापासून थोडीशी लांब अशी बांधली होती. सावकाराच्या मृत्यूनंतर थोड्याच दिवसांत त्याचे रूपांतर मध्यमवर्गीयांना राहायला भाड्याने जागा दिलेल्या वाड्यात झाले. कालांतराने त्या दरिद्री मंडळींचे घरभाडे वारंवार थकू लागले. त्यामुळे एक एक करून ते सोडून गेले. त्यांच्या जागी रस्त्यावरच्या गावभवान्या येऊन राहू लागल्या. ज्यांना आपली जागा सोडायची नव्हती त्यांनी घरभाडे परवडावे यासाठी वेश्या व्यवसाय पत्करला. कालपरत्वे त्या हवेलीचे रूपांतर एका वेश्यागृहात झाले. दुसऱ्या नेपोलीयनच्या कारर्किर्दीत त्या इमारतीला बरकतीचे दिवस आले. दरबारी मंडळी अधूनमधून तेथे मुक्कामाला येऊ लागली. बड्या धेंडांच्या सेवेत तेथील मुली कोणतीही कमतरता ठेवत नसत. उच्च नैतिक मूल्यांचा घोष करणाऱ्या प्रजासत्ताकवाद्यांनी सत्ता काबीज केल्यानंतर साहजिकच जुन्या सरंजामशहांच्या नैतिक अधःपतनाच्या दर्शक अशा बाबींवर त्यांचा रोष झाला. त्यांनी वेश्यांचा व्यवसायाचा परवाना रद्द करण्याचे ठरविले. तेव्हा तेथील वेश्यांची प्रतिनिधी अशी एक मादाम प्रजासत्ताकवादी नेत्यांना जाऊन भेटली. ल प्लूर ब्लांमधील सगळया मुली या मूलतः प्रजासत्ताकवाद्यांच्याच बाजूच्या आहेत, असे तिने शपथेवर सांगितले. पूर्वी त्या सरंजामवाद्यांच्या सेवेत होत्या हे खरे असले तरी तो एक जबरदस्तीचा मामला होता. रोज रात्री झोपताना मस्य तीएरचा फोटो उशीखाली ठेवूनच त्या झोपायच्या. आता क्रांतीनंतर त्यांनी ते फोटो उघडपणे भिंतीवर लावले आहेत आणि प्रजासत्ताकवाद्यांपैकी कोणीतरी पाहुणा येण्याची त्या सगळया आतुरतेने वाट पाहत आहेत.

या प्रकरणाचा विचार करण्यासाठी सरकारने चौकशी करण्याचे ठरविले. आता चौकशी म्हटली की मुळापासून व्हायला पाहिजे. म्हणून काही सरकारी अधिकाऱ्यांनी जातीने ल फ्लूर ब्लांला भेट दिली, चौकशी केली आणि ते परत गेले. थोड्या दिवसांनी अधिक चौकशीसाठी नवीन अधिकारी येऊन गेले. अशी चौकशी वारंवार होत राहिली, पण परवाना रद्द करण्याचे नाव आता कोणी काढीत नसे.

हेन्रीने जेव्हा ल फ्लूर ब्लांमध्ये पाऊल ठेवले तेव्हा रात्र ओसरत आली होती. मादाम पोतीएरों आपल्या खुर्चीत भकास नजरेने बसली होती. तिच्या मांडीत तिचा आवडता कुत्रा टुटु डोके मुडपून शांतपणे झोपला होता. मादाम पोतीएरॉंला

घडवताना निसर्गाचे सुंदरतेकडे साफ दुर्लक्ष झाले होते. तिचा देह म्हणजे जणू मूर्तिमंत कुरूपता होती. देह बटाट्याच्या पोत्यासारखा, चेहेरा एखाद्या डुकरिणीची आठवण करून देणारा. असे असले तरी ती स्वभावाने अतिशय प्रेमळ होती. एकाकी हेन्रीवर ती मायेची पखरण करीत असे.

(कुत्र्याला मांडीवर घेऊन बसलेली मादाम पोतीएराँ व शेजारी तिचा नवरा असे लोत्रेकने केलेले एक पोर्ट्रेट आल्बीमधील म्युझियममध्ये आहे.)

मादामशी थोडा वेळ गप्पा मारून झाल्यावर हेन्री वर जाऊन झोपला. सकाळी जरा उशिराने उठल्यावर बघतो तो बिछान्यात शेजारी एल्सा झोपली होती.

"आज मी सोडून सगळया पोरींना गिऱ्हाईकं भेटली. मला एकट्याने झोप येईना म्हणून तुझ्या शेजारी येऊन झोपले." एल्साने उठल्यावर खुलासा केला. एल्सा व्हिएन्नाची होती. एकेकाळी ती खूप सुंदर दिसायची. आता तिच्या तारुण्याचा बहर ओसरला होता. हेन्रीने उठल्याबरोबर तिचे पोर्ट्रेट करायला घेतले. दिवसभर ती हेन्रीच्या खोलीत आळसावल्यासारखी बसून गप्पा मारीत होती. लहानपणच्या व्हिएन्नातील आठवणी, तेथील सुंदर रस्ते, बीअर गार्डन्स, इमारती, वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी चुलत्याने केलेला बलात्कार सगळे काही ती अगदी त्रयस्थपणे सांगत होती. मधेच हेन्रीच्या पिण्यावर तिची टीका चालू होती.

(लोत्रेकने केलेले 'एल्सा द व्हिएन्नीज्' हे पोर्ट्रेट आल्बीमध्ये आहे.)


दुपार टळल्यानंतर एक एक जणी उठून तयार व्हायला लागल्या. आळसावलेल्या, केस मोकळे सोडलेल्या अशा त्या मधूनच हेन्रीच्या खोलीत डोकावायच्या. थोडा वेळ पेंटिंग बघ, जांभया देत उगाच खाली रस्त्यावर बघ असे वेळ काढणे चालू होते. एवढ्यात त्यांना रस्त्यावरून पायघोळ डगला घातलेला एक पाद्री जाताना दिसला.

"तो पाद्री पाहिलास का? त्या डगल्याखाली त्याने पँट घातली असेल का?" एल्साने गमतीने विचारले.

“त्या डगल्याखाली पँट आहे की नाही ते वरून कसं कळणार, पण तू स्कर्टच्या आत चड्डी घातलेली नाहीस हे त्याला खालून दिसलं आणि तो वर आला तरच आपल्याला कळेल की त्याने पँट घातलीय की नाही?”

सगळया जणी मनापासून हसल्या. वातावरणातील मरगळ पळून गेली. पाद्रीबोवांच्या पोशाखावरून विषय देवाची प्रार्थना करताना बसून करावी की गुडघे टेकून करावी यावर गेला. वादविवादात दोन तट पडले आणि मग एकच खडाजंगी उडाली. एकमेकांना शिव्या देत, एकमेकांची उणीदुणी काढत, आईबाप, भाषा, प्रांत, देश, वांशिक पोटभेद यांचा उद्धार करीत एवढा गदारोळ उडाला की प्रकरण एकमेकींच्या झिंज्या उपटण्यावर जाणार की काय असे वाटण्याची पाळी आली. देवाची प्रार्थना कशी करावी यावरून झालेल्या भांडणातील शब्द पाद्रीबोवांच्या कानावर गेले असते तर त्यांना नक्कीच झीट आली असती. भाषातज्ज्ञांना युरोपातील सगळया भाषांतील शिव्यांचा अभ्यास एकाच ठिकाणी करता आला असता.

ते निरर्थक भांडण हेन्री शांतपणे बघत होता. रोज रोज मनाविरुद्ध करावा लागणारा शरीरसंबंध, अंधःकारमय भविष्य, पापी जीवन जगत असल्याची पोखरणारी जाणीव यामुळे त्या सर्वांचा स्वभाव अत्यंत चिरचिरा झाला होता. त्यात भर एकत्र राहण्याची. त्यामुळे क्षुल्लक कारणावरून चालू झालेली भांडणे नेहमी विकोपाला जात. हेन्रीने त्या भांडणाऱ्या पापाच्या जोगिणींचे हावभाव पटापट आपल्या स्केचबुकात उतरविले. तेवढ्यात लॉड्रीवाला आला आणि त्या निमित्ताने उगाचच चालू झालेले भांडण तसेच अचानक थांबले.



(लोत्रेकचे लाँड्रीमॅन हे पोर्ट्रेट आल्बीमधल्या म्युझियममध्ये आहे.)

- ७३ -

ल फ्लूर ब्लांमधील हेन्रीचा दिवस कोनॅकचे घुटके घेत घेत पेंटिंग करण्यात जायचा. रात्री शहरात भटकंती नाही तर तिथल्याच एखाद्या मुलीबरोबर शय्यासोबत. हेन्रीची त्या मुलींना एवढी सवय झाली होती की त्या त्यांचे नित्याचे व्यवहार आंघोळ करणे, कपडे बदलणे, वेणीफणी, मेकअप वगैरे त्याच्यासमोर अगदी निःसंकोचपणे करीत. हेन्रीशी त्या मनमोकळेपणाने गप्पा मारीत. यातूनच हेन्रीला या पुरातन व्यवसायातील अनेक गुपिते कळून आली. एखाद्या धार्मिक मठात जसा आध्यात्मिक सुखाचा शोध घेतला जातो तसा ल फ्लूर ब्लांमध्ये वैषयिक सुखांच्या विविध परिमाणांचा शोध लागला.




(लोत्रेकने वेश्यांच्या समलिंगी कामजीवनावर बरीच अभ्यासचित्रे काढली आहेत. या विषयावरील त्याचे ‘द किस’ हे पेंटिंग लूवरमध्ये आहे.)

एके दिवशी सकाळी ॲड्रीन नावाची एक मुलगी स्फुंदत स्फुंदत त्याला म्हणाली, “काल मी एक पाप केले. आता मी माझ्या शोशूला तोंड कसे दाखवू? मी कुत्रीच्या लायकीची आहे.”

त्याला सुरुवातीला काही कळेना. असा कोणता अप्रामाणिकपणा तिच्या हातून घडला असेल. पण नंतर त्याच्या डोक्यात प्रकाश पडला. काल रात्री गिऱ्हाईकाकडून तिची नकळत संभोगतृप्ती झाली होती. तिच्या दृष्टीने ही प्रियकराशी केलेली एक प्रकारची प्रतारणाच होती. खास वेश्यांचे असे वेगळेच विश्व होते. तेथील नियम, नैतिक संकल्पना, विचार, संस्कृती सारे काही त्यांच्या जीवनशैलीशी बद्ध होते. त्यातील सुसंगती त्यांच्या निकट सहवासात राहिल्यामुळे त्याला उमगली.

महिन्यातून एका सोमवारी सगळ्या मुलींची वैद्यकीय तपासणी होई. डॉक्टरला एक खोली दिली जायची आणि मुली बाहेर रांग लावून उभ्या राहायच्या. सर्वांच्या चेहऱ्यावर भीतीचे दडपण असायचे. त्या वैद्यकीय तपासणीच्या नाट्यामधील केविलवाणा तणाव त्याने आपल्या पेंटिंगमध्ये अचूक पकडला.



(मेडिकल इन्स्पेक्शन – तुलूझ लोत्रेक – तैलरंग, कार्डबोर्ड ऑन वुड, ८३.५x६१.५ सेमी, १८९४ नॅशनल गॅलेरी ऑफ आर्ट्स, वॉशिंग्टन डीसी)

हेन्री जेव्हा ल प्लुर ब्लां सोडून जायला निघाला तेव्हा मादाम पोतीएरों, तिचा नवरा अलेक्सांद्र व तेथील मुली या सगळयांच्या अगदी जिवावर आले. हेन्रीने मोठ्या जड अंतःकरणाने त्यांचा निरोप घेतला. जाण्यापूर्वी शेवटचा प्याला घेण्यासाठी म्हणून अलेक्सांद्र हेन्रीला घेऊन कॅफेत गेला. त्याच्याबरोबर त्याचे आणखी दोन मित्र होते. ते तिघेही वयाच्या पन्नाशीच्या जवळपास होते. डोळयांखालील त्वचा लोंबू लागली होती. व्यवसायातल्या ओढगस्तीमुळे कपाळावर आठ्यांचे जाळे आले होते. या वयात तारुण्यातील जोम ओसरला होता. तरी एकेकाळचा मर्दानी देखणेपणा लपत नव्हता. कॅफेत त्यांनी पत्त्यांचा डाव टाकला. नेहमीप्रमाणे मॉरीस जिंकला.

"तू नशीबवान आहेस बुवा."

"पत्त्यात जे नशीब साथ देतं तशी साथ धंद्यात मिळाली तर किती बरं होईल. आजच्या तपासणीत माझी दोन कबुतरं सापडली. आता दर वेळी नवीन पोरी आणायच्या कोठून?"

"या आजकालच्या पोरी मोठ्या डँबीस असतात. पहिल्यासारख्या सीध्यासाध्या पोरी आता कितीही शोधल्या तरी मिळणार नाहीत. तो व्हिक्टर ह्युगो मेला तेव्हा माझ्या पोरी काय रडल्या म्हणून सांगू? नाही तर या स्वतःला समाजवादी समजणाऱ्या कालच्या पोरी. त्यांचे नखरे पाहून घ्यावेत. आपली देशभक्ती दाखवायला ढुंगणाला राष्ट्रध्वजसुद्धा गुंडाळून फिरतील."

नंतर धंद्यातील नेहमीची रडगाणी सुरू झाली. "तुम्हाला काय सांगू मस्य तुलूझ. आता स्पर्धा किती वाढलीय. पहिल्यासारखं राहिलं नाहीय. आजकाल शहरातून जोडधंदा म्हणून बऱ्याच संसारी स्त्रियासुद्धा वेश्या व्यवसाय करू लागल्यायत. शिवाय रस्त्यावर दिव्याच्या खांबाखाली उभे राहून अनधिकृत धंदा करणाऱ्या मुली आहेत त्या वेगळयाच. पोलिसांनासुद्धा आता पूर्वीसारखी नुसती दारू देऊन भागत नाही. त्यांना रोख पैसे हवे असतात."

"आम्ही किती कष्टाने पैश्याला पैसा जोडून पैसे मिळवलेयत. धंद्याला सुरुवात केली तेव्हा फक्त बायको आणि जोडीला मेव्हणी होती. माझ्या बायको अगदी साधी आहे. मी पुरे म्हणून सांगीतलं, तरी एक शेवटचा म्हणून नवीन गिऱ्हाईक घ्यायची. तिचं माझ्यावर केवढं प्रेम होतं म्हणून सांगू? अशी बाई बायको म्हणून मिळायला फार मोठं भाग्य लागतं."

- ७४ -

हेन्री जेव्हा लॉजवर येऊन पोहोचला तेव्हा मादाम ल्युबेत शेगडीत कोळसे घालीत होती. अशा अधूनमधून अचानक गायब होण्याची हेन्री जी कारणे सांगायचा त्या सगळया थापा आहेत हे तिला चांगलेच ठाऊक होते. कारण एक तर हेन्रीला थापा नीट मारता येत नसत आणि दुसरे म्हणजे मॉरीसशी बोलताना हेन्रीच्या थापेतील विसंगती उघड्या पडत. वरवर ती काही दाखवत नसे, पण आतून तिचा जीव तीळ तीळ तुटायचा. हेन्रीबद्दल तिच्या पोटात विलक्षण माया होती. हेन्रीचे पिणे आणि त्याची दिवसेंदिवस ढासळणारी प्रकृती पाहून तिच्या काळजाला घरे पडत.

बाहेर कुंद हवा पडली होती. थोड्याच वेळात येते असा जेन ॲव्हरीलचा निरोप होता. हेन्री शेकोटीजवळ शेकत मादाम ल्युबेतबरोबर गप्पा मारीत बसला होता. त्याने तिला एक ब्रूच दिला. तो पाहून तिचे डोळे पाण्याने भरून आले. तेवढ्यात बाहेर दरवाजात वस्त्रांची सळसळ ऐकू आली. जेन ॲव्हरील धाडकन दरवाजा उघडून आत आली. त्या दिवशी तिचा उत्साह उतू जात होता. तिने पोस्टरला पोज दिली, पण तासाभरातच ती कंटाळली. आळस देऊन ती उठली व म्हणाली,

"बाकीचं काम उद्या केलेलं चालेल ना? मला आता कंटाळा आलाय. चला फिरून येऊ."

हेन्री तिच्याबरोबर फिरायला म्हणून बाहेर पडला. वाटेत तिने गाडी 'पाकीन्स' या स्त्रियांच्या कपड्यांच्या दुकानासमोर थांबविली. हेन्री गाडीतच बसून राहिला. पण तिने त्याला तिच्याबरोबर दुकानात बोलाविले. ती एक मोठी भपकेबाज इमारत

होती. दारवानाने मोठ्या अदबीने आत घेतले. आतला भाग म्हणजे एक गोलाकार खोली होती. चहूकडे आरसे लावलेले. जमिनीवर जाड गालिचा अंथरलेला होता. हेन्री सोफ्यावर बसून विसावतो तोच एक शेलाट्या बांध्याची काळयाभोर केसांची स्त्री आत आली. तिचे व्यक्तिमत्त्व पाहताक्षणी आकर्षून घेईल असे होते. विशेषतः तिचे डोळे. खोल, गहिरे, कॉफीसारख्या गडद तपकिरी रंगाचे.

‘‘बाँज्यूर, जेन.’’ जेनचा व तिचा खूप परिचय असावा असे दिसत होते.

‘‘मिरीयम, हे मस्य हेन्री द तुलूझ लोत्रेक.’’

मिरीयम हेन्रीकडे वळून म्हणाली,‘‘मी तुमच्या प्रदर्शनाला गेले होते, पण गर्दीमुळे पेंटिंग्ज नीट बघता आली नाहीत.’’ तिच्या मंदस्मितातून तिची मोत्यासारखे पांढरे शुभ्र दात चमकले. तिच्या नजरेत निखळ कौतुक होते.

‘‘आमच्याकडे एक नवा ड्रेस आलाय. तुम्हाला घालूनच दाखवते हां. थांबा थोडं.’’ मिरीयम जेनला म्हणाली.

‘‘आता नको. मला जरा दुसरीकडे जायचंय. उद्या परत येईन.’’असे म्हणून जेन घाईघाईने बाहेर पडली. एवढी घाई होती तर दुकानात आली कशाला या विचाराने हेन्री बुचकळयात पडला.

‘‘कशी वाटली तुम्हाला? आवडली?’’ दुकानातून बाहेर पडता पडता जेनने विचारले.

‘‘सुंदर आहे. पण मला आवडून काय फायदा?’’

‘‘तुम्हीही तिला आवडला आहात, म्हणून मुद्दाम होऊन विचारलं.’’

‘‘तुला कसं कळलं?’’

''माझा असा होरा आहे की तुम्हा दोघांचं जमेल. तुमची मिरीयमशी ओळख करून देण्याच्या उद्देशाने मुद्दामच मी तुला पाकीन्समध्ये घेऊन आले. तिला तुमच्याविषयी सगळी माहिती, म्हणजे चांगली आणि वाईट दोन्ही बाजू मी अगोदरच सांगितल्या होत्या.''

''तुला या नसत्या उचापती करण्याची काय गरज होती?''

''मी तुम्हा दोघांना चांगली ओळखते. मिरीयमला यशस्वी लोक खूप आवडतात. चित्रकलेच्या जगाचा विचार करायचा झाला तर तुमची गणना या दशकातील एका यशस्वी पुरुषात नक्की होईल. शिवाय तुमचे उच्च खानदान. या दोन गोष्टींच्या पुढे तुमचे शारीरिक व्यंग ही दुय्यम बाब ठरते. मिरीयम एक महत्वाकांक्षी स्त्री आहे. जीवनात काय मिळवायचं हे तिला चांगलं ठाऊक आहे. तिची स्वप्नं मोठी आहेत आणि ती वास्तवात आणण्यासाठी लागणारी जिद्द तिच्याकडे आहे.''

''हे सगळं तू मला कशासाठी ऐकवतेयस?''

''कारण तुमच्या दोघांची चांगली मैत्री होऊ शकेल.''

''माझ्याशी मैत्री म्हणजे प्रेमात फसण्याची भीती नाही असेच ना?''

''अं... एका अर्थाने तसंही म्हणता येईल. हे बघा तुम्ही काही आता नवशिका तरुण नाही आहात. मैत्री, प्रेम, शरीराची भूक या गोष्टी तुम्हाला नीट माहितेयत. मिरीयमला मैत्रीची गरज आहे आणि माझ्या मते तुम्हालाही.''

''तुला असं सुचवायचं आहे की तिला माझ्याशी शुद्ध मैत्रीचे संबंध राखायचेयत. म्हणजे बरोबर जेवायला जाणे, थिएटर, पार्टी वगैरे ठिकाणी जायला बरोबर कोणीतरी असावं एवढ्यापुरते संबंध.''

“होय. तेच. सुरुवातीपासून दोघांनाही कल्पना असली की गैरसमजाला वाव कमी राहतो आणि अपेक्षाभंगाचे दुःख होत नाही. बघा. तुम्हाला पसंत असेल तर पुढच्या आठवड्यात शो संपल्यावर ल रिशमध्ये भेटू.”

- ७५ -

हेन्रीला कॅफे ल रिशच्या दरवाजात पाहताच जेनने ओरडून त्याला हाक मारली. जेनच्या शेजारी मिरीयम बसली होती. हेन्रीने मिरीयमकडे पाहिले. या वेळीसुद्धा तिने काळी वस्त्रे परिधान केली होती. हेन्रीने तिला वाकून अभिवादन केले. जेनबरोबर तिचा नवा प्रियकर जॉर्ज होता. जेनला लेखक, कवी, चित्रकार वगैरे कलावंतांबद्दल मनापासून आत्मीयता वाटत असे. त्यामुळे तिच्या मित्रपरिवारात अशी मंडळी भरपूर असत. ती बऱ्यापैकी पैसे कमवीत असल्याने ती गरजू कलावंतांना तिच्या परीने काही ना काही मदत करीत असे. जॉर्ज हा एक होतकरू आणि तरुण लेखक होता. त्यातच तो निष्कांचनही असल्यामुळे जेनची कणव आणि त्यापोटी बसलेले प्रेम याचे गिऱ्हाईक झाला होता.

“जॉर्ज एक कादंबरी लिहितोय. जॉर्ज, या दोघांना सांग तुझी कथाकल्पना.” जेन उत्साहाने म्हणाली. “त्याचं काय आहे. कथानक मत्सरावर आधारलेलं आहे. दोस्तोयवस्कीच्या शैलीत.” असे म्हणून जॉर्जऐवजी जेनच मध्यवर्ती कल्पना सांगू लागली. सांगण्याच्या भरात तिने उलटसुलट इतक्या गोष्टींचे पाल्हाळ लावले की त्यातून कथावस्तू नेमकी काय आहे याचा बोध होणे कठीणच होते. त्यात तिचे स्वतःचे मत, संपादकांचा सल्ला, टीकाकारांची टिपण्णी अशा अनेक गोष्टींची सरमिळ करून एवढे लांबण लावले की आपण बोलावलेल्या पाहुण्यांना ती विसरून गेली तेव्हा मिरीयमने हळूच हेन्रीला विचारले,

“तुम्ही सध्या कोणते नवीन पोस्टर करताय?”

“जेनचे करतोय.”

“पोर्ट्रेट आणि पोस्टर यात काय कठीण असतं?” असे विचारून तिने संभाषणाचा धागा पकडला.

“दोन्ही प्रकार मूलतः भिन्न आहेत. त्यामुळे तशी तुलना करणं अप्रस्तुत ठरेल. पण एक लक्षात ठेवा की, पोस्टर वरवर पाहायला सोपे वाटले तरी तो सोपेपणा त्या पोस्टरमध्ये उतरेपर्यंत ते खूपच कठीण वाटते. पोस्टरनिर्मितीची एकूण प्रक्रिया खूप गुंतागुंतीची असते.”

“तुमचे सर्वात आवडते पोस्टर कोणते?”

“अर्थात माझे पहिले पोस्टर. मुलँ रूज.”

“मला आठवतंय. त्यात एक टांग वर करून कॅनकॅन नाचणारी एक मुलगी दाखवली होती. काय गाजलं होतं त्या वेळी.”

“बऱ्याच जणांना ते अश्लील वाटलं होतं.”

“पण त्या विरोधामुळेच तर तुम्हाला प्रसिद्धी मिळाली.”

“तो नंतरचा भाग झाला. पण त्या वेळी मला त्याचा खूप त्रास झाला.”

“मुलँ रूजसाठी किती दिवस लागले होते?”

“सात-आठ महिने, पण त्या वेळी लिथोग्राफीमधला ओ का ठो मला मला माहीत नव्हता.”

“लिथोग्राफी म्हणजे काय?”

तो किलकिलत्या डोळ्यांनी तिच्याकडे पाहत होता. त्याच्या चेहऱ्यावरचा मूक भाव पाहून ती पुढे म्हणाली, “मला खरंच जाणून घ्यायचंय.”

“ठीक आहे. माझी अगदी खात्री आहे की तुम्हाला अगदी मनापासून या विषयात रस आहे. लिथोग्राफीच नव्हे तर एट्रूस्कन पॉटरीमध्ये सुद्धा तुम्हाला तेवढाच रस असेल. मला तुमचं अभिनंदन करावंसं वाटतंय. आयुष्यभर पुरतील एवढे विषय तुमच्याजवळ आहेत.” हेन्री किंचित उपहासाने म्हणाला.

“तुमचा विश्वास बसत नाही त्याला मी काय करू? मला या सगळया विषयांत खरंच रस असतो. इतिहास, समाजशास्त्र, साहित्य, कला आपल्याभोवती घडणाऱ्या सगळया गोष्टींचे आकलन झाले पाहिजे अशी उत्सुकता मला असते.” हेन्रीच्या उपहासाने ती थोडी चिडून म्हणाली. हेन्रीने लिथोग्राफीची तपशीलवार माहिती सांगायला सुरुवात केल्यावर तिची नाराजी मावळली. एक सुंदर मुलगी आपले बोलणे मन लावून ऐकतेय हे पाहून हेन्री मोहरून गेला. तिचा निरोप घेण्याच्या निमित्ताने हेन्रीने तिला तिच्या घरापर्यंत सोबत केली. निरोप घेताना दुसऱ्या दिवशी भेटण्याचे तिने आपण होऊन सुचविले.

मिरीयमने त्याच्यावर जादू केली. तिची वाट पाहण्यात, तिला भेटण्यात, गप्पागोष्टी करीत तिच्या सहवासात जास्तीतजास्त वेळ घालवण्यात त्याला अतीव समाधान मिळत असे. त्यामुळे त्याच्या मद्यपानाचे प्रमाणही कमी झाले. त्याच्या चेहऱ्यावर थोडा तजेला दिसू लागला. मिरीयमला सगळया विषयात गती होती. बऱ्याच वेळा दोघांची मते अगदी विरुद्ध टोकाची असत, पण त्याने उलट संभाषणातील रंगत वाढत असे.

एकदा कर्नल व्हेंदोमविषयी बोलता बोलता हेन्री म्हणाला, “स्वतःचा पुतळा स्वतःच्या हयातीत उभारण्याएवढा निर्लज्ज उद्धटपणा दुसरा नसेल. पण लोकांना असेच लोक जास्त आवडतात. लोकशाही सरकार ही कल्पना म्हणून कितीही योग्य असली तरी जनतेचे खरं प्रेम हुकूमशहांवर जास्त असतं. हुकूमशहा जेवढा वाईट तेवढा अधिक लाडका.”

“तुम्हाला पटत नाहीसं दिसतंय. हे बघा. नेपोलीयनचेच उदाहरण घ्या. त्याच्या कारकिर्दीत फ्रान्सचा सत्यानाश झाला. त्याच्या पूर्वीच्या सगळया राजवटीत

मिळून जेवढे लोक मारले गेले नसतील तेवढे याच्या एकट्याच्या राजवटीत मारले गेले. पण बघा. अवघं पॅरीस शहर जणू त्याचं स्मारक झालंय. आता या कर्नल व्हेंदोमचं ताजं उदाहरण आपल्यासमोर आहे. मी एक राजसत्तावादी आहे त्यामुळे असेल कदाचित मला तो मुळीच आवडत नाही. त्याची अगदी शिसारी येते.''

''मस्य हेन्री, वेश्यांच्या आणि समाजातील तळागाळाच्या लोकांच्या जीवनाकडे अत्यंत सहानुभूतीने पाहणारा, आपल्या कलेतून त्यांच्या दुःखाला वाचा फोडणारा चित्रकार अशी प्रसिद्धी असलेले तुम्ही आणि राजसत्तावादी.''

''त्यात आश्चर्य कसलं. सरळच आहे. उद्या एखाद्या कार्डिनलला तुम्ही पोपच्या बाजूचे आहात का म्हणून विचाराल?''

''आता तुम्ही त्या थेरड्या राजांची बाजू घेणार आहात की काय?''

''हे बघा, ते थेरडे नव्हते. पंधरावा लुई गादीवर आला तेव्हा अवघ्या पाच वर्षांचा होता.''

''थेरडे नसतील एकवेळ. पण नादान होते त्याचं काय.''

''ते नादानसुद्धा नव्हते आणि जरी त्यांनी नादानपणा केला असला तर तो नादानपणा एखाद्या कारकून, शेतकरी, कामगार, पाद्री वगैरे सामान्य लोक करतात त्यापेक्षा काही जास्त नव्हता. चौदावा लुई तर माणूस म्हणून अगदी सज्जन होता हे त्याचे विरोधकसुद्धा मान्य करतात.''

''ते खरं असलं तरी राजपरिवारातील इतरांचे काय? ते जसे काही सद्‌गुणांचे पुतळेच होते नाही. त्यांच्याइतकी उद्दाम आणि नालायक माणसं शोधून मिळणार नाहीत.''

“उद्दाम होते ते त्यांचे नोकरचाकर. उलट उमराव लोकांच्या हृदयात आपल्या रयतेविषयी ममत्वच असे. एखाददुसरा अपवाद असेल, नाही असं नाही. पण हे नोकर मात्र एकजात उद्धट आणि हलकट असत. आपल्या मालकासमोर अगदी मान खाली घालून उभे राहतात. पण संधी मिळताच रयतेला मालकाच्या नावाने झोडपून काढायला कमी करत नाहीत. आमच्या म्हाताऱ्या जोसेफएवढा मूर्ख व उद्दाम माणूस दुसरा शोधून सापडणार नाही.”

“तुमच्या पेंटिंगवरून तुमची मतं अशी असतील असं वाटत नाही. पीएर टँग्वीशी असलेली तुमची मैत्री आणि तुमचे चित्रविषय यावरून मला वाटायचं की तुम्ही समाजवाद्यांच्या बाजूचे आहात.”

“तुम्ही म्हणताय ते एका अर्थी खरंय. वैचारीक दृष्ट्या समाजवादी मला जवळचे वाटतात. येणारा काळ त्यांचाच असेल. जे आतून भावतं तेच कलेतून प्रकट व्हायला हवं. नाही तर ती स्वतःशीच केलेली प्रतारणा ठरेल. आजकाल उमराववर्गाला काळया रंगात रंगवायची फॅशन झालीय. मला फक्त एवढंच दाखवून द्यायचं होतं की उमराव आज दाखवले जातात तेवढे काही काळेकुट्ट नव्हते. चला, जास्त बोलत राहिलो तर नाटकाला उशीर होईल.”

त्या दिवशी त्यांनी मोलीयरचे नाटक पाहिले. रात्री जेवण झाल्यावर हेन्री मिरीयमबरोबर तिच्या घरापर्यंत गप्पा मारत गेला. पाऊस पडल्यामुळे थंडी थोडी जास्तच होती. तिने त्याला घरात बोलाविले. तो शेकोटीसमोरच्या कोचावर बसला. तिने शेकोटीत लाकडे सारली. काही वेळ दोघेही मूकपणे शेकोटीतील विस्तवाकडे पाहत होते. बाहेरील पावसाची रिपरिप व शेकोटीतील लाकडांची तडतड याशिवाय दुसरा कोणताही आवाज ऐकू येत नव्हता.

“हेन्री. त्या ड्रेफ्युज प्रकरणाची तुम्हाला कितपत माहिती आहे?”

हेन्रीने तिच्याकडे पाहिले. विस्तवाच्या नारंगी प्रकाशाने तिचा चेहरा उजळला होता.

“ड्रेफ्युज ॲल्सेशियन आहे. माझा मित्र मॉरीस तुम्हाला ठाऊक आहे? त्याच्याच गावचा. मोठेपणी तो सैन्यात गेला. आपल्या हुशारीच्या जोरावर कॅप्टनच्या हुद्द्यापर्यंत वर चढला. चार वर्षांपूर्वी एकाएकी त्याला राजद्रोहाच्या आरोपावरून अटक करण्यात आली. तडकाफडकी खटला भरून आरोप शाबीत झाल्याचे जाहीर करण्यात आले व त्याला जन्मठेपेची शिक्षा ठोठावली गेली. न केलेल्या गुन्ह्यासाठी सजा भोगत तो सध्या डेव्हिल्स आयलंडवर खितपत पडलाय.”

“कशावरून तुम्ही म्हणता की तो निर्दोष आहे म्हणून. सगळे जग म्हणते की तो दोषी आहे.”

“तेवढे एकच कारण पुरे आहे त्याचे निर्दोषीपण सिद्ध करायला.” हेन्री उपहासाने हसत म्हणाला, “दुसरेही काही महत्वाचे मुद्दे आहेत.”

मग त्याने ड्रेफ्युजवरचा आरोप त्याने लिहिलेल्या ज्या पत्रावरून सिद्ध केला गेला त्या पत्राच्या हस्ताक्षराविषयी असलेले तज्ज्ञांचे मतभेद, गुप्तपणे झटपट निकालात काढलेल्या खटल्याची पद्धत, खोटी कागदपत्रे, खोट्या साक्षी, ड्रेफ्युजचे ज्यू असणे वगैरे सगळया गोष्टी तिला सविस्तरपणे सांगितल्या.

“पण आपल्या सुदैवाने फ्रान्समध्ये प्रामाणिकपणा, न्याय व सत्याची चाड असलेले थोडे लोक अजून शिल्लक आहेत. त्यांनी धैर्याने हे प्रकरण उकरून काढून धसाला नेण्याचे ठरवलंय. तसं काम सोपं नाहीय. ड्रेफ्युज ज्यू असल्याने तुमची ती सर्वसामान्य जनता त्याच्यावर देशद्रोहीपणाचा शिक्का मारून केव्हाच मोकळी झाली आहे. डावे, उजवे, समाजवादी, प्रजासत्ताकवादी, ज्यूद्वेष्टे, मानवतावादी, चर्च वगैरे सर्व गटांनी या प्रकरणात आपापल्या राजकारणाच्या सोयीनुसार भूमिका न घेता केवळ सत्याची बाजू घेण्याचं ठरवलं तरच ड्रेफ्युजला न्याय मिळणे शक्य होईल.”

“फॉर ड्रेफ्युज.” असे म्हणून त्याने हातातील पेला उंचावला व शेवटचा घोट घेत रिकामा केला. रविवारचा सुंदर दिवस संपल्याची हुरहुर लागली होती. परत भेटण्याचं ठरवून त्याने मोठ्या जड अंतःकरणाने निरोप घेतला.

- ७६ -

पुढच्या रविवारी मिरीयमने लुव्हरला जायचे सुचविले. तेथे बघण्यासारखे काय आहे. ते एक कबरस्तान आहे. फक्त पर्यटकांशिवाय तेथे कोणी ढुंकूनही बघत नाही. म्हणून हेन्रीने तो बेत मुळातूनच धुडकावून लावला.

"हेन्री प्लीज, श्रेष्ठ कला कशाला म्हणतात ते मला तुमच्याकडून समजावून घ्यायचं आहे."

"ते तर मुळीच शक्य नाही. कलेतील सौंदर्य हे स्त्रीच्या सौंदर्यासारखेच केवळ शब्दांतून समजावून सांगणं कठीण आहे. ते जाणवावं लागतं. त्याची सरळ सोपी व्याख्या करता येत नाही. श्रेष्ठ कला ही समजायला सोपी असते हे तद्दन खोटं आहे. कलेतील सौंदर्यमूल्यं ही खूप गुंतागुंतीची असतात आणि ती तशी का असू नयेत? मानवी जीवनसुद्धा तेवढ्याच गुंतागुंतीनं भरलेलं आहे. मानवी मन, बुद्धी, संगीत, गणित ह्या सगळया गोष्टी समजायला मुळीच सोप्या नाहीयेत."

"तर मग आपल्याला जायलाच हवं. आजच नव्हे तर दर रविवारी. वारंवार पाहिल्यानेच त्या मोनालिसाच्या स्मितामागचे गूढ कळून येईल."

"त्या बुर्झ्वा फ्लॉरेंटाईन बाईचं नावसुद्धा काढू नका. त्या पोर्ट्रेटला त्याच्या लायकीपेक्षा उगाचच जास्त प्रसिद्धी मिळालीय."

त्याच्या पुढच्या रविवारपर्यंत हेन्रीचा विरोध मावळला व तो तिला लुव्हरला घेऊन गेला. त्यानंतर पुन्हा बऱ्याच वेळा ते तिथे गेले. ती जगप्रसिद्ध पेंटिंग बघताना तिचे विस्फारलेले डोळे पाहून हेन्रीला मजा वाटायची. तिच्या प्रश्नांना उत्तरे देताना तिला कलेच्या आस्वादातील बारकावे समजावून सांगायचा. रेम्ब्रांद व फ्रॅगोनार्ड हे पीटर हूच व नॅटीयरपेक्षा श्रेष्ठ का हे तिला समजावून सांगताना त्याने तिला कला व कुसर यातील फरक कसा ओळखावा ते सोदाहरण दाखवून दिले.

व्हीनस द मिलोचा पुतळा पाहताना मिरीयम म्हणाली, "किती सुंदर आहे."

“एका ग्रीक शेतकऱ्याला ती शेतात मिळाली. यापेक्षा या पुतळयाविषयी आपल्याला जास्त काहीही माहीत नाही. त्या गरीब शेतकऱ्याने तिला अवघ्या सहा हजार फ्रँकना आपल्या फ्रेंच सरकारला विकून टाकली. फ्रेंच सरकारला जमलेला हा सर्वोत्तम सौदा असेल.” हेन्री दबक्या आवाजात पुढे म्हणाला,“नेपोलिअनने इटलीमधून लुटून नेलेले कॅनव्हास सोडले तर.”

“तुम्हाला माहीत आहे, ही व्हीनस, जी आज आपण बघतोय ती या पॅरीस शहरापेक्षा पुराणी आहे, कदाचीत ख्रिस्त जन्माच्याही आधीची असण्याची शक्यता आहे.”

“चला, आपण आज खूप पाहिलं. इजिप्शियन, ग्रीक व फोनेशियन शिल्पकला. एवढ्याने एका आठवड्यापुरती तरी तुमची कलात्मक भूक शमायला हरकत नाही.”

“तुम्ही आज फिलीपो लिपीची मॅडोना दाखवायचं कबूल केलं होतं.”

“अरे देवा. तुम्ही काहीच विसरत नाही. चला लवकर म्युझियम बंद व्हायची वेळ झालीय.”

ती दोघे मॅडोनाच्या पेंटिंगसमोर अख्रिश्चन भक्तिभावाने उभे राहिले. मॅडोना तिच्या पायाजवळ उभ्या असलेल्या बालयेशूकडे मोठ्या ममतेने बघत आहे असे ते दृश्य होते.

“मिरियम, एक पाहिलत का? मॅडोनाची कांती कशी तेजःपुंज दिसतेय ती. प्रकाश जणू काही तिच्या त्वचेखालून येतोय असं वाटतं. ही किमया फिलीपो लिपीने कशी साधली माहितीय? त्याने ऑकरचा एक हात तिच्या त्वचेखाली दिलाय. आता हे तंत्र जुनं झालंय. पण त्या वेळी ते नवं होतं. लिपीचे मोठेपण यात आहे की त्याने ते पहिल्या प्रथम वापरलं. मॅडोना कशी अगदी एंजलसारखी वाटतेय ना.”

“सगळया मोठ्या चित्रकारांनी आपल्या पेंटिंगमध्ये पौराणिक कथांवर आधारित विषयांचे चित्रण केले आहे. त्यात एक गमतीचा योगायोग असा की, बहुतेक सगळया चित्रकारांनी आपल्या चित्रातून पुण्यवान माणसांपेक्षा पापी माणसं जास्त वेळा दाखवली आहेत. यासाठी तरी चित्रकलेने जगातील यच्चयावत पापी जनांचे ऋणी राहिलं पाहिजे.” हेन्रीच्या डोळयात मिष्कीलपणाची चमक होती.

“बायबलातल्या भाकडकथा थोड्या वेळापुरत्या खऱ्या मानल्या तर या वेळी आपण हे मॅडोनाचे पेंटिंग बघत असताना फिलीपो लिपीने ती मॅडोना ज्या मॉडेलवरून बेतली ती बाई तिच्या पापांची सजा भोगत नरकात उकळत्या तेलाच्या कढईत पडली असेल आणि हे आमचे मॅडोनाला तेजःपुंज करणारे फिलीपो लिपी महाशय बाजूच्या कढईत पोहत असतील.” हेन्री डोळे मिचकावीत म्हणाला. धक्का देणारी विधाने करीत आपल्या बोलण्याकडे लक्ष वेधून घेण्याच्या कलेत हेन्री ला नुव्हेलपासून तरबेज झाला होता.

“त्या दोघांनी असं कोणतं पाप केलं होतं?” हेन्रीच्या अर्धवट बोलण्याने मिरीयमचे कुतूहल चाळवले गेले.

“फिलीपो लिपी हा एक धार्मिक शिक्षण घेतलेला मध्यमवयीन इसम होता. तो चर्चमध्ये पॅस्टर म्हणून काम पाही आणि फावल्या वेळात चित्र काढीत असे. एक म्युरल काढण्याचे काम चर्चने त्याच्यावर सोपवले. त्यातील मॅडोनाच्या चित्रासाठी त्याने मदर सुपीरियरच्या परवानगीने एका ननची निवड केली. ती नन तरुण व सुंदर होती हे त्या म्युरलवरून आपल्याला आजही कळतं. म्युरल करता करता त्या दोघांचं प्रेम जमलं.” उत्सुकता ताणण्यासाठी हेन्रीने नाट्यपूर्ण पॉज घेतला.

“पुढे काय झालं?”

“पुढे काय होणार? स्त्रीपुरुषांचे एकमेकांवर प्रेम असेल तर सहसा जे होते तेच त्यांच्या बाबतीत झालं. म्युरल पूर्ण झाल्यामुळे त्या दोघांना एकमेकांना भेटता येणं शक्य नव्हतं. मॅडोनाच्या चित्रासाठी पोज द्यायला परवानगी देताना मदर

सुपीरियरने कितीही उदारपणा दाखवला असला तरी यापुढे तिच्याकडून कसल्याही उदारपणाची अपेक्षा करणं मूर्खपणाचं ठरलं असतं. म्हणून म्युरलचे काम झाल्यावर ते दोघे दूर देशी पळून गेले आणि मुलंबाळं, नातवंडं, पतवंडं होईपर्यंत सुखाने संसार केला. सेंट पीटरच्या दरबारात त्यांची पापी म्हणून नोंद झाली असली तरी या इथे पृथ्वीतलावर त्यांनी सर्व सुखांचा पूर्ण उपभोग घेतला.”



(मॅडोना वुईथ चाईल्ड – फिलीपो लिपी – ऑईल ऑन पॅनेल – १४५२, पॅलेझो पिती, इटली)

- ७७ -

पुढच्या रविवारी हेन्री मिरीयमला घेऊन सॅलाँ द इंडिपेंडन्सच्या प्रदर्शनाला गेला. प्रदर्शनाला आलेल्या परिचितांशी ओळख करून देताना अभिमानाने त्याची छाती फुगली. भिंतीवर दाटीवाटीने लावलेले कॅनव्हास बघून हेन्री म्हणाला, ‘‘चित्रकारांना उपाशीपोटी का राहावं लागतं ते आता तुमच्या लक्षात येईल. खरेदी करण्याच्या वस्तूंच्या यादीत पेंटिंगला सर्वांत तळाची जागा मिळते. पण पेंटिंगचे

उत्पादन बघा केवढं विपुल आहे ते. आता काय भाव मिळेल या पेंटिंग्जना. कॅनव्हास, रंग व ब्रश यात घातलेले पैसे सुटले तरी खूप म्हणायचं. चित्रकला पेशा म्हणून पत्करणारे लोक एक तर मूर्ख तरी असतात किंवा अत्यंत प्रतिभावान तरी. नाही तर माझ्यासारखे दुसरा काही पर्याय नसल्याने नाइलाजाने या पेशाकडे वळलेले.''

प्रदर्शन बघून रू द पतीत शाँवर परत येताना हेन्रीने तिला इंडिपेंडंट आर्टिस्ट्सच्या एक्झिक्युटिव्ह कमिटीच्या बैठकीतील किस्से रंगवून सांगितले. बोलता बोलता विषय जॉर्ज सुरा व व्हिन्सेंट व्हॅन गॉगवर आला.

''दोघांच्या व्यक्तिमत्वात, शैलीत तसा जमीन-अस्मानाचा फरक आहे. पण ते दोघेही आपल्या परीने फार मोठे होते. त्यांच्या कलेचे महत्त्व जगाला कळण्यासाठी कदाचित आणखी पन्नास वर्षे जावी लागतील. विशेषतः व्हिन्सेंटची आणि तुमची ओळख व्हायला पाहिजे होती. तुम्हाला तो आवडला असता. तुमच्यासारखाच तोही प्रजासत्ताकवादी होता. नादान राजांचा आणि त्यांच्या नालायक उमरावांचा नायनाट करण्यावरून तुम्हा दोघांचं एकमत झालं असतं. कोणी सांगावं तो तुमच्या प्रेमातही पडला असता. बिचारा! आयुष्याच्या अंतापर्यंत तो प्रेमाचा भुकेला होता. काहींच्या नशिबात प्रेम नसतं हे त्याला वेळीच कळलं असतं तर कदाचित आत्मनाशाला प्रवृत्त झाला नसता.''

दर संध्याकाळी तो तिला प्लेस व्हेंदोम येथे भेटायचा. एके दिवशी तो तिला घेऊन व्हेलोद्रोमवर सायकलींच्या शर्यती बघायला घेऊन गेला. तेथे त्याने तिची झिमरमॅनशी ओळख करून दिली. दुसऱ्या आठवड्यात तिच्या आग्रहावरून तो तिला बुलेव्हार द कॅपूसिनच्या तळघरातल्या सॅलाँ इंडियनमधील सिनेमॅटोग्राफिक पाहिला घेऊन गेला. चित्रपटाचा खेळ बघणे हा एक अविस्मरणीय अनुभव होता. पडद्यावरून धावत अंगावर येणारी आगगाडी पाहून प्रेक्षक भीतीने किंचाळत, घाबरून खुर्चीवरून उठून पळून जात. काही तर मूर्छितसुद्धा होत.

रविवारी सकाळी कित्येक वेळा ती त्याच्या स्टुडिओवर जाई व त्याचे पेंटिंगचे काम बघत बसे. नाही तर मादाम ल्युबेतशी गप्पा मारीत बसे. त्यांची मैत्री अधिकाधिक घट्ट होत गेली तशी हेन्रीने आपल्या भावजीवनातील सगळया गोष्टी एक

एक करून तिला सांगितल्या. डेनीस आणि नंतर मारी शार्लेत. एके दिवशी मिरीयमनेसुद्धा तिचे हृदय त्याच्याकडे उघड केले.

मिरियमचे वडील पोलंडवरून त्यांच्या लहानपणी पॅरीसमध्ये आले होते. सोन्याचांदीच्या दागिन्यांच्या एका पेढीवर ते काम करीत. त्यात त्यांना जेमतेम पोटापुरते मिळत असे. ते सतत आजारी असत आणि जे पैसे मिळत ते त्यांच्या औषधपाण्यात संपून जायचे. लहानपणच्या गरिबीमुळे शाळेत जाण्याची फारशी संधी तिला कधी मिळाली नव्हती. वयाच्या तेराव्या वर्षी तिचे वडील वारल्यानंतर परिस्थिती अत्यंत हलाखीची झाली आणि तिची शाळा कायमची सुटली. आई दिवसभर कपड्यांच्या दुकानात मान मोडेस्तोवर काम करी. मिरियम घरी बसून काजेबटणांचे काम करून तिला आपल्यापरीने हातभार लावी. जेवायला उकडलेले बटाटे आणि कोमट पाण्यात भिजवलेला पाव. वर घरमालक कधी हाकलून देईल याची सतत टांगती तलवार. रविवार नाही की सुटीचा दिवसही नाही. सीन नदीकाठची सहल, होडीतून नदीत फेरफटका, घोडदौड अशा चैनी तर सोडाच, पण बरोबरीच्या मुलांबरोबर सार्वजनिक बागेत साधी लपाछपी खेळायलासुद्धा तिला कधी मिळाले नव्हते.

''मी सोळा वर्षांची असताना आमच्याच गल्लीत राहाणारा आंद्रे नावाचा एक तरुण मला खूप आवडायचा. मी त्याच्या प्रेमात पडले होते म्हणाना. तो आमच्याच धर्माचा होता. एका कारखान्यात फोरमन म्हणून नोकरीला होता. आई गेल्यानंतर त्याने मला मागणी घातली होती. पण मीच त्याला नाही म्हटलं.'' मिरीयम शेकोटीतल्या विस्तवाकडे टक लावून बघत होती. तिचा आवाज कोरडा होता.

''तुमचं दोघांचं एकमेकांवर प्रेम होतं तर नाही का म्हटलंत?''

''कारण तो आमच्यासारखाच गरीब, दरिद्री होता म्हणून. तो बुद्धिमान होता. कष्टाळू होता. दिसायलाही देखणा होता. माझे वडीलसुद्धा बुद्धिमान, कष्टाळू आणि देखणे होते. तरीही माझ्या आईला कसे हलाखीमध्ये दिवस कंठावे लागले ते मी पाहिलं होतं. वडील तापाने फणफणले असता अंगावर घालायला उबदार पांघरूण नव्हतं, शेकोटीत जाळायला लाकडं नव्हती. एक दिवस त्यांचा खोकून खोकून प्राण गेला.

कारण औषधं आणायला आमच्याकडे पैसे नव्हते. त्या दिवशी मी ठरवलं की दरिद्री म्हणून जन्माला आले असले तरी दरिद्री म्हणून मरायचं नाही. आंद्रेला नाही म्हटल्यावर मी त्याला पुन्हा भेटलेही नाही. न जाणो चुकून भावनेच्या भरात तोंडून होकार गेला तर.''

मे महिना लागला आणि वसंत ऋतूची किमया पॅरीसवर जागोजागी दिसू लागली. झाडांवर नवी पालवी आली. सोलर हॅट व छत्र्या घेतलेल्या माणसांनी बुलेव्हार फुलले. पार्क मोनेक्यूवर कठपुतळयांचा खेळ पुन्हा सुरू झाला व तो बघायला पुढच्या पिढीतल्या मुलांची गर्दी लोटू लागली. प्रेमी युगुले बागेत एकमेकांचे चुंबन घेताना आढळू लागली. हेन्रीने जेन ॲव्हरीलचे लंडनच्या शोसाठी केलेले पोस्टर तयार झाले होते.

व्हिएन्नाचा ख्यातनाम संगीतकार ब्राह्म याच्या स्मृत्यर्थ एक संगीत महोत्सव आयोजित केला होता. त्या कार्यक्रमाचे अतिशय महागडे तिकीट काढून हेन्री मिरीयमला घेऊन गेला. कार्यक्रमाला पॅरीसमधील सगळे प्रतिष्ठीत झाडून हजर होते. त्या कार्यक्रमात ब्राह्मची सी मायनॉरमधील सिंफनी आणि पियानो कॉन्सेर्टो ऐकताना ती देहभान विसरून गेली. तिच्या आयुष्यातील तो एक रोमांचकारी अनुभव होता.

''ही सिम्फनी पुन्हा कधी ऐकण्याचा योग आलाच तर मला तुमचीच आठवण येईल.''

हेन्रीने या कार्यक्रमाला तिला बरोबर नेले याचे आभार कसे मानावेत हे तिला कळेना. कार्यक्रम संपल्यानेतर हेन्री तिच्या घरी गेला. तिने हेन्रीसाठी म्हणून कोनॅक घरी आणून ठेवली होती. ती पीत पीत बराच वेळ ते दोघे गप्पा मारीत होते. गप्पांच्या ओघात पॅरीसच्या हवामानाचा विषय आला.

''या उन्हाळयात अर्कोनला जायचा बेत का करीत नाही?'' मिरीयमने विचारले, ''जेन म्हणत होती तेथे तुमचा एक व्हिला आणि एक बोटसुद्धा आहे.''

''अर्कोन तसं एका बाजूला पडतं, तिथला समुद्रकिनारा तसा फारसा मोठा नाही, पण जो आहे तो फार सुंदर आहे.''

“तुम्हाला माहीत नसेल. मी अजून पॅरीसच्या बाहेर पाऊलसुद्धा ठेवलं नाहीय. समुद्रकिनारा तर दूरच राहिला.”

“असं असेल तर मग चला. ताबडतोब तयारीला लागा. उद्याच व्हेर्सायपासून सुरुवात करू.”

भारावल्यामुळे तिला काय बोलावे ते सुचेना. ती शांतपणे बसून होती. मध्यरात्र उलटून गेली होती. हेन्री तिच्याकडे अर्धोन्मिलीत नेत्रांनी पाहत होता.

“हेन्री, तुम्हाला एक विचारू? तुम्ही माझ्या प्रेमात वगैरे तर पडला नाहीत ना?” अचानक तिने विचारले.

एक क्षणभर हेन्रीला काय उत्तर द्यावे ते सुचले नाही. पण दुसऱ्या क्षणी स्वतःला सावरत तो म्हणाला, “छे छे. प्रेमात पडायला आता मी काही नुकतीच मिसरूड फुटलेला बच्चा नाहीय. अनुभवांचे टक्केटोणपे खाऊन मी आता शहाणा झालोय.”

“अगदी मनापासून बोलताय का हे?”

“खरंच बोलतोय मी. तुम्हाला काय वाटलं सगळे पुरुष सुंदर मुलींच्या प्रेमात पडण्यासाठी हपापलेले असतात की काय! बरेच जण तसे असतीलही, पण मी त्यातला नाहीय. मला हवी आहे तुमची निव्वळ मैत्री, तुमचा सहवास.” हेन्रीने मोठ्या प्रयासाने मनातील खळबळ दाबून ठेवली.

“ठीक आहे. तुम्ही म्हणता म्हणून मी विश्वास ठेवते. तुम्हाला प्रेम नको असले तरी मी हवीय की नाही? खरं की नाही?”

“जर सुरुवातीपासून आपल्याला काय हवंय हे जर एकमेकांना ठाऊक असेल तर ती गोष्ट वेगळी. प्रेमात पडल्याने किंवा प्रेमाचे नाटक केल्याने आयुष्य बरबाद होतं. त्यापेक्षा बाहेरख्याली केलेली परवडली. त्यात भावनिक गुंतवणूक नसते. आता

तूम्ही तरुण आणि सुंदर आहात. मलाही शरीरसुख मिळालं तर हवंच आहे. पण त्यासाठी पॅरीसमध्ये दुसऱ्या जागा उपलब्ध आहेत. माझी वैषयिक भूक शमवण्यासाठी तुम्हाला कशाला उगाच भावनेच्या जाळयात गुंतवू. मिरीयम, मला तुमची शुद्ध मैत्री हवीय. मला ठाऊक आहे एके दिवशी तुम्हाला तुमच्या आयुष्याचा वेगळा मार्ग सापडेल. तोपर्यंत तरी मला तुमच्या सहवासाचा लाभ मिळाला तर मला त्यात आनंदच आहे.'' हेन्रीच्या मनातील खळबळ शांत झाली.

''गुड नाईट मिरीयम.'' असे म्हणून त्याने उरलेली कोनॅक एका घोटात संपवून ग्लास टेबलावर ठेवला व काठी घेण्यासाठी आपला हात पुढे केला. तो उठणार इतक्यात मिरीयम त्याच्या जवळ येऊन त्याला बिलगून बसली व त्याच्या ओठांचे चुंबन घेत म्हणाली,

''हेन्री, तुम्ही आज येथेच राहा.''

दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर हेन्रीने मरियमला बरोबर घेऊन आपल्या साऱ्या जामानिमा सकट अर्कोनच्या दिशेन कूच केले.. समुद्रकिनाऱ्यावरच्या व्हिलामध्ये मिरीयमबरोबर घालवलेले तीन आठवडे म्हणजे हेन्रीच्या आयुष्यातील परमोच्च सुखाचा काळ होता. सकाळी बऱ्याच उशिराने जेव्हा हेन्रीने डोळे किलकिले करून पाहिले तेव्हा ऊन खिडकीतून त्याच्या अंगावर आले होते. बाजूला मिरीयम अजून झोपेतच होती. अकरा वाजायला आले होते. थोड्याच वेळात वारे वाहू लागण्याचे लक्षण दिसत होते. मिरीयमची सुटी संपत आली होती. त्या दिवशी त्यांनी दुपारी शिडाच्या होडीतून समुद्रात एक फेरफटका मारला. होडीत पहिल्यांदाच बसताना मिरीयम अतिशय घाबरली होती. पण शिडे उभारून होडी खोल समुद्रात शिरल्यावर तिचा आनंद गगनात मावेना.

संध्याकाळी ते दोघे लाउंजमध्ये बसून सूर्यास्त बघत होते. आकाश निरभ्र होते. वारा पडला होता. हेन्री मिरीयमचा हातात हात घेत म्हणाला,

''हे दिवस कधी संपूच नये असं वाटतं नाही?''

“पण संपणार आहेत कुठे? पॅरीसमध्ये आपण परत एकमेकांना भेटूच की.”

“पॅरीसमध्ये ते शक्य होणार नाही. मी माझ्या स्टुडिओत तू तुझ्या दुकानात. आठवड्यातून फार तर एकदा आपली भेट होणार. रेस्तराँमध्ये नाहीतर थिएटरमध्ये.”

“पण तुम्ही तर म्हणाला होता की आहे त्यात सुख मानावं. भलताच हव्यास बाळगू नये.”

“मी म्हणतो ते सहज जमण्यासारखं आहे. इथे हवा इतकी छान आहे की उन्हाळा संपेपर्यंत इकडेच राहू. शरद ऋतूच्या सुमारास पॅरीसमध्ये परतू आणि वसंत चालू झाला की परत इकडे समुद्राच्या काठी.” हेन्री बोलण्याच्या भरात नकळत वाहावत गेला खरा, पण तिचा हात थोडा ताठर झाल्याचे त्याला जाणवताच तो चटकन भानावर आला.

“हेन्री, एक विचारू?” तिने त्याच्या नजरेला नजर भिडवीत सरळ विचारले, “कितीही नाही म्हटलंस तरी तुम्ही माझ्या प्रेमात पडला आहात. खरं सांगा.”

हेन्री थोडा वेळ गप्पच होता. नंतर मान खाली घालून सावकाश म्हणाला, “होय. मागे तुम्ही हेच विचारलं तेव्हा मी खोटं बोललो होतो. मी स्वतःची समजूत घालू पाहात होतो. खरं म्हणजे मी प्रथमदर्शनीच तुमच्या प्रेमात पडलो होतो. पण कबूल करायला भीती वाटत होती आणि लाजही.” त्याने मान वर केली आणि तिच्याकडे पाहिले, पण तिच्या नजरेला नजर देणे त्याला जमले नाही.

“मला माहीत होतं की तुमचं माझ्यावर प्रेम नाहीय ते. तशी माझी अपेक्षाही नव्हती. जेनने तुमच्याशी ओळख करून देताना सर्व शक्यतांचा विचार करून स्पष्ट कल्पना दिली होती. तुम्हाला ज्या प्रकारचे आयुष्य जगायचे आहे ते जगण्याची संधी मी तुम्हाला देऊ शकतो. त्या बदल्यात मला प्रेम हवे आहे. खोटे का असेना. मिरीयम

प्लीज मला समजून घ्या...'' मिरीयमने त्याच्या हातातून आपला हात सोडवून घेतला आणि त्याचे शब्द त्याच्या ओठातच राहिले.

“हेन्री, मी तुमची परिस्थिती समजू शकते. पण तरीही मला वाटतं की ही वेळ यायला नको होती. तुम्ही म्हणता की मी तुमच्यावर प्रेम करेन अशी तुमची अपेक्षा नव्हती. पण तरीही तुम्ही एकतर्फी प्रेम करीत राहिलात. हे चुकीचं आहे. कारण प्रतिसाद मिळण्याची वेडी का होईना अपेक्षा असल्याशिवाय नुसते एकतर्फी प्रेम होऊ शकत नाही. तुम्ही म्हणाला होतास की मागच्या दोन अनुभवांवरून तुम्ही धडा शिकलायत. पण मला वाटतं की अजूनही तुम्ही काहीच शिकला नाहीत आणि यापुढे त्याची शक्यताही दिसत नाही. यामुळे आयुष्यात तुमच्या वाटेला नेहमीच निराशा येत राहील. माझ्या या बोलण्याने तुम्हाला यातना होत असतील नाही? पण त्याला माझा नाइलाज आहे. सत्य कितीही कठोर असलं तरी त्याचा स्वीकार करता आला पाहिजे. आपल्या दोघांनाही आपापल्या परीने प्रेम हवं होतं. पण दोघांनाही ते मिळणं शक्य नाही. मला शक्य नाही. कारण मी त्याचा बुद्ध्याच त्याग केलाय. तुम्हाला शक्य नाही. कारण तुमचं शारीरिक व्यंग आणि कुरूपता.''

मिरीयमचे हे शब्द त्याच्या कानात तप्त शिशासारखे शिरले. तप्त लोखंडाचा तुकडा ऐरणीवर ठोकून ठोकून सरळ करावा तशी ती पुनश्च म्हणाली, “हेन्री, तुमचा खुजेपण आणि कुरूपता तुम्ही कितीही विसरण्याचा प्रयत्न केलात, लोकांनी विसरावं आणि कोणीतरी विसरून तुमच्यावर प्रेम करील ही तुमची जी अपेक्षा आहे ती पूर्ण होणारी नाही. शक्य असतं तर मीच तुमच्यावर प्रेम केलं असतं. मी तसा प्रयत्नही केला, पण मला जमलं नाही आणि कधी जमेलसं वाटतही नाही.''

हेन्रीने बोलण्यासाठी तोंड उघडले पण त्याला थांबवीत ती पुढे म्हणाली, “जरा थांबा. माझं पूर्ण ऐकून घ्या. मी तुमच्यावर का प्रेम करू शकत नाही माहितेय? कारण माझं अजूनही आंद्रेवर प्रेम आहे. त्याला माझ्याशी लग्न करायचं होतं. त्याला शक्य होतं तेवढं तो मला सुखात ठेवण्यासाठी झटला असता, पण मी त्याला पैशासाठी नकार दिला. आता जरी कोणी मला ॲव्हेन्यु द बुवावरील मॅन्शन जरी देऊ केलं तरी

माझं प्रेम आंद्रेवरच राहील. तुमच्याकडे पैसा आहे, उंची कपडे, फर, दागदागिने, पैशाने विकत घेता येणाऱ्या सगळया गोष्टी, सुखं तुम्ही मला देऊ शकाल आणि यासाठी जर मी तुम्हाला पत्करलं तर तुमच्या जागी मला तुमचा पैसाच दिसू लागेल आणि मी तुमचा तिरस्कार करू लागेन. पैशासाठी मला कोणाला तरी पत्करणं भाग असलं तर त्यासाठी मी दुसरा कोणीतरी गाठेन.''

''मला कल्पना आहे की मी तुमच्याशी फार कठोरपणाने वागतेय. तुमचं माझ्यावर प्रेम असल्याने माझं वागणं तुम्हाला क्रूरपणाचेही वाटेल. हेन्री, पैशांनी विकत घेता येणार नाहीत अशीसुद्धा काही सुखं असतात आणि ती तुमच्या सहवासात मला मिळाली आहेत. सुखाचे चार दिवस आपण एकत्र घालवलेयत. ते नातं निर्भेळ राहू दे. पैशांनी त्याची चव बिघडून जाईल.''

थोडा वेळ ते दोघेही गप्प होते.

''मग मी काय करावे अशी तुमची अपेक्षा आहे? तुम्हाला भेटायचं बंद करू?''

''तुम्ही मला भेटत राहावं असं मला अजून वाटतंय. गेल्या हिवाळयात आपण कसे मजेत फिरत होतो. लूव्हर, सीन, सिनेमॅटोग्राफिक, ऑपेरा, व्हेलोद्रोम. असं तुमच्याबरोबर फिरायला मला अजूनही आवडेल. पण प्रेमाचा विषय पुन्हा काढणार नसाल तर. मी सगळं तुमच्यावर सोपवते.''

दूर क्षितिजावर सूर्य डोंगरांच्या मागे केव्हाच बुडाला होता. शिडांच्या दोन होड्या संथपणे किनाऱ्याकडे परतत होत्या. सगळया परिसरावर शांततेची दुलई पसरली होती.

- ७९ -

पॅरीसला परतल्यानंतर जरी दोघे एकमेकांना अधूनमधून भेटत होते तरी त्यातील उत्कटता आता संपली होती. कितीही प्रयत्न केला तरी गप्पांमध्ये पहिल्यासारखा रंग भरत नसे. बदललेल्या संदर्भामुळे एक प्रकारचा अस्वस्थपणा

जाणवे. गप्पांचा ओघ मधेच आटून जाई. अवघडलेले हसू, बोलायचे म्हणून उगाचच सुरू केलेले संभाषण. इतक्या दिवसांच्या सहज सुंदर मैत्रीत अंतर पडले. मिरीयमला घेऊन सार्वजनिक ठिकाणी जायला हेन्रीला खूप आवडत असे. पण आता त्याला गर्दीचा तिटकारा वाटू लागला. एखाद्या देखण्या पुरुषाने तिच्याकडे नुसता कटाक्ष टाकला तरी त्याला कसेतरी वाटू लागे. पार्टी, समारंभांना तिला घेऊन जाणे तो टाळू लागला. कोणीतरी तिला आपल्यापासून हिरावून घेईल अशी त्याला भीती वाटे.

तिच्याशी बोलताना प्रेमाचा उल्लेख करण्याचे तो कटाक्षाने टाळत होता. तरीही तो आतून प्रेम करतच होता. हे प्रेम एकतर्फीच राहणार आहे हे ठाऊक असल्याने त्यात तो झुरू लागला. त्यात भर पडली मत्सराग्नीची. या सर्वांचा कोंडमारा त्याला असह्य होऊ लागला. या विचित्र मानसिक अवस्थेत त्याचे निरुद्देश भटकणे आणि दारू पिणे पहिल्यासारखे चालू झाले.

अशा रीतीने शरद ऋतू जवळ जवळ संपत आला. सकाळी सकाळीच मादाम ल्युबेतने उशाशी ठेवलेल्या सुंदर पुष्पगुच्छामुळे त्याच्या लक्षात आले की आज त्याचा वाढदिवस आहे. दिवसभर त्याने आळसात लोळून काढला. त्याला भयंकर उदासवाणे वाटत होते. संध्याकाळी त्याला भेटायला मिरीयम आली. त्याच्या चित्तवृत्ती आनंदाने फुलून आल्या. तो तिला ल तूर दार्ज्यांमध्ये जेवायला घेऊन गेला. त्याने आग्रह करून शँपेन मागविली. जेवण झाल्यावर ती त्याला घरी घेऊन गेली. जेवणानंतर ती दोघे शेकोटीसमोर शेकत बसले असताना ती त्याला म्हणाली,

“आज मी तुमच्यासाठी एक गोष्ट आणलीय.” असे म्हणून तिने मोरोक्कन कातडी बांधणीचे एक सुरेख पुस्तक त्याच्या हातात दिले. ‘ल आंतोलोजी द एस्तँप जॅपोनेज.’ पुस्तकावर सोनेरी अक्षरात हेन्रीचे नाव लिहिलेले होते. त्याने पुस्तकावरून हात फिरवला. ते एक अतिशय महागडे पुस्तक होते. त्याचे डोळे भरून आले. त्याच्या गळयात आवंढा आला. भावनावेगाने तो गलबलून गेला.

“तुम्ही... एवढं... नको होतं.” त्याच्या तोंडून कसेबसे शब्द बाहेर पडले.

"तुम्हाला काय द्यावं याचा खूप विचार केला. शेवटी आठवलं. तुम्ही एकदा या जपानी चित्रांविषयी तोंड भरून बोलत होतास. खूप शोधलं आणि एके ठिकाणी हे पुस्तक दिसलं. कसं आहे? आवडलं?"

"कशाला एवढा खर्च केलात? खूप महागडं आहे हे. मीसुद्धा विकत घेताना विचार केला असता. साधे हातरुमाल दिले असते तरी चाललं असतं. थँक यू मिरीयम. थँक यू व्हेरी मच." त्याला राहावले नाही. तो जवळ जवळ रडतच होता. त्याने आपले दुःख तिच्यासमोर उघड केले. तिचे मतपरिवर्तन करण्याचा पुन्हा एकवार प्रयत्न करून पाहिला. पण ती तिच्या भूमिकेला चिकटून राहिली. मिरीयम एक ना एक दिवस आपल्याला सोडून जाणार आहे ह्या सत्याचा स्वीकार करणे त्याला खूप जड गेले.

मिसिया नातानसोनला अधूनमधून मेजवानी देण्याची हौस होती. मेजवानीला ती पॅरीसमधील प्रसिद्ध व्यक्तींना बोलावीत असे. अशा एका मेजवानीला जाताना हेन्री मिरीयमला बरोबर घेऊन गेला. त्याने नाताळात दिलेला किमती पेहेराव तिने चढवला होता. त्या रात्री ती खूप सुंदर दिसत होती. त्याला ब्राह्मच्या संगीत महोत्सवाला तो तिला घेऊन गेला होता त्याची आठवण झाली. पण त्या वेळचे मैत्रीचे सहज सुंदर नाते आता संपले होते. घोडागाडीत ती शेजारी बसली असली तरी खूप दूर असल्यासारखी वाटत होती. ओझरता स्पर्श, तिरका कटाक्ष, किंचित स्मित, एखादा शब्द, सगळी मौज केव्हाच उडून गेली होती. काहीतरी ओढूनताणून संभाषणात जेन आणण्याचा दोघांचाही प्रयत्न चालू होता.

"आजच्या मेजवानीला मस्य क्लेमेन्सो आणि झोला येणार आहेत काय?"

"बहुतेक येतील असं वाटतंय. जर त्या ड्रेफ्युस प्रकरणात अडकले नाहीत तर."

"काल आमच्या दुकानात एक बाई मला विचारत होती तू ज्यू आहेस का म्हणून. मी होय म्हणून सांगितलं तर तिने मॅनेजरकडे तक्रार केली की मला दुकानात ठेवले तर ती पुन्हा दुकानाची पायरी चढणार नाही म्हणून. जणू काही मीच लष्करी गुपिते जर्मनांना विकली होती."

"ड्रेफ्युसनेसुद्धा त्याच्यावर जो आरोप ठेवण्यात आलाय ती लष्करी गुपिते जर्मनांना विकलेली नाहीत. लष्करी महत्वाचे काही कागदपत्रं गहाळ झाली होती. या जनरलना स्वतःची इज्जत वाचवण्यासाठी तोबडतोब कोणाला तरी पकडणे आवश्यक होते. ड्रेफ्युसला केवळ तो ज्यू असल्याने यात गुंतविले आहे. खरा गुन्हेगार शोधण्यापेक्षा ते सोपे होते. एकदा ड्रेफ्युसला दोषी ठरवायचेच हा निश्चय झाल्यावर त्याप्रमाणे खोटे पुरावे आणि साक्षी गोळा करून त्याला झटपट जन्मठेप ठोठावून मोकळे झाले. पण तो निर्दोष आहे. खटला निःपक्षपातीपणे चालवला तर त्या साक्षी व पुरावे टिकणार नाहीत. पण तो ज्यू असल्याने त्याचा वाली कोणी नाहीय. पण तू चिंता करू नकोस. लवकरच सुटेल तो. या देशात अजूनही सज्जन व प्रामाणिक माणसे शिल्लक आहेत."

मेजवानीवर ड्रेफ्युस प्रकरणाची सावली पडली होती. सगळे जण शांत होते. एमिल झोला खालच्या पण ठाम आवाजात निवेदन वाचून दाखवीत होता. सर्वजण गंभीरपणे ऐकत होते. झोलाचे निवेदन वाचून झाल्यावर एवढी शांतता पसरली की स्त्रियांच्या वस्त्राची सळसळ ऐकू यावी. वातावरणातील ताण सैल करण्यासाठी क्लेमेन्सो मिसीयाला म्हणाला, "उद्या हे भाषण प्रसिद्ध झाल्यावर तुमच्या पाहुण्यांच्या यादीतून दोघांची नावे तुला गाळावी लागतील. तुमच्या पुढच्या मेजवानीतील आमच्या वाटेची कोंबडी तुरुंगातच पाठवून दे."

"आता राजकारण पुरे झालं. जेवणाच्या टेबलावर तरी कोणीही त्या ड्रेफ्युसचा विषय काढू नका."

जेवताना हेन्रीच्या शेजारी ज्युल्स ड्युप्रे हा फ्रान्समधील एक श्रीमंत असामी बसला होता. तो हेन्रीला म्हणाला,

"तुम्हाला त्या कॅलेताचे प्रकरण माहीत आहे ना? तो मोंमार्त्रमधील वेश्यांचा दलाल. एका पोरीचा खून करून पळून गेला होता तो. त्या घटनेचा वर्तमानपत्रातून खूप गाजावाजा झाला होता. आठवतंय?"

"मला चांगलं आठवतंय. ब्रुअँटने त्यावर एक हृदयद्रावक गीतसुद्धा रचले होते."

"गेल्या महिन्यात त्या खुन्याला मार्सेलीसला पकडलं. त्या खटल्यात त्याला मृत्युदंड ठोठावला आहे. बहुधा शिक्षा कायम करून येत्या महिन्यात त्याचा पॅरीसमध्ये शिरच्छेद करण्यात येईल. आमच्या मासिकात या विषयावर एक लेखमाला सुरू आहे. यासाठी मला तुमच्याकडून रेखाटने करून हवीयत."

"दोन महिन्यांनी माझे एक प्रदर्शन लंडनला आहे. त्यामुळे मी सध्या मासिकांसाठी रेखाटने करण्याचं बंद केलंय."

"किमान शेवटच्या लेखासाठी तरी मला तुमच्याकडून चित्र काढून हवंय. विशेषतः गिलोटीनखाली शिरच्छेद होत असतानाच्या प्रसंगाचे. तुम्ही सोडून दुसरं कोणी हे काम करू शकेल असं मला वाटत नाही."

शेजारी बसलेली मिरीयम व मॉरीस त्यांचे बोलणे लक्षपूर्वक ऐकत होते. मॉरीस म्हणाला, "भीतीने थरथर कापणाऱ्या माणसाला गिलोटीनकडे नेतायत, तो त्या गिलोटीनच्या जड पात्याकडे, अवतीभोवती जमलेल्या प्रचंड गर्दीकडे भिरभिरत्या नजरेने बघतोय. थोड्याच वेळात त्याचे मुंडके धडावेगळे होऊन त्या समोरच्या वेताच्या टोपलीत पडणार आहे या कल्पनेने त्याचा चेहेरा भयभीत झालाय. विचार कर चित्रकाराच्या दृष्टीने किती आव्हानात्मक विषय आहे."

"होय. मॉरीसचं म्हणणं खरं आहे. अशी संधी पुन्हा मिळणं कठीण आहे. वाटल्यास तुझं लंडनला जाण्याचं पुढे ढकल." मिरीयम म्हणाली.

"लिओनार्दो द व्हिन्सी देहान्ताच्या शिक्षेच्या प्रसंगी कटाक्षाने गुन्हेगाराच्या चेहऱ्यावरच्या भावांचे चित्रण करायला जात असे. सिस्टीन चॅपेलच्या लास्ट जजमेंटचे उदाहरण घे. भयकंपित झालेल्या त्या माणसाच्या चेहऱ्याचं चित्रण मायकेल अँजेलोने किती विलक्षण प्रभावीपणे केले आहे. आपण नरकात खितपत पडणार आहोत हे त्या माणसाला नुकतंच कळलंय. त्याच्या चेहऱ्याचा अर्धा भाग

प्रकाशात तर अर्धा काळोखात. पण तरीही त्याच्या चेहऱ्यावरचे भाव पाहून बघणाऱ्याचे रक्त गोठून जाते.'' मोरीस म्हणाला.

''मागच्या पिढीतल्या गोयाच्या कलोससचे उदाहरण घे. बंदुकीच्या नळीसमोर उभ्या असणाऱ्या त्या अभागी कैद्याचा भयकंपित चेहरा. तूच तर मला ते दाखवलं होतस.'' मिरीयम म्हणाली.

''मी काही स्वतःला दा व्हिन्सी किंवा मायकेल अँजेलो समजत नाही.'' हेन्री म्हणाला.

''पण प्रयत्न करून पाहिला हरकत नाही.'' मॉरीस पाठ सोडायला तयार नव्हता. शेवटी मोठ्या मिनतवारीनंतर हेन्री तयार झाला. तो मार्च महिना होता. हेन्री पहाटे लवकर उठून देहदंडाची शिक्षा बघायला गेला. नीट दिसावे म्हणून हेन्री अगदी जवळ जाऊन उभा राहिला. आपल्या स्केचबुकात त्याने त्या प्रसंगाची अनेक स्केच केली. कॅलेताचे भादरलेले डोके, भयाकुल चेहेरा. भीतीने त्याचे पाय लटपटत असल्याने त्याला गिलोटीनकडे फरफटत नेले व लाकडी चौकटीवर दाबून बांधले. पाद्र्याची प्रार्थना संपताच तुरुंगाधिकाऱ्याने इशारा केला. फाशी देणाऱ्याने खटका ओढताच लखलखत्या धारेचे प्रचंड पोलादी पाते झर्रकन खाली आले. खटकन आवाज झाला आणि तुळतुळीत तासलेले कॅलेताचे डोके क्षणार्धात धडावेगळे होऊन समोरच्या वेताच्या टोपलीत पडले. मस्तकविहीन मानेतून रक्ताच्या चिळकांड्या भळभळ उडू लागल्या. पाद्री छातीवर क्रूसाची खूण करीत प्रार्थना पुटपुटतोय. हेन्री विलक्षण झपाट्याने स्केच करीत होता.

त्यानंतर आठवडाभराच्या अथक परिश्रमानंतर लिथोग्राफिक स्टोन तयार झाला. शिरच्छेदाचा प्रसंग व मासिकाची जाहिरात. नुकत्याच छापलेल्या शाईचा वास येत असलेले पोस्टर दोन हातात लांब धरून मिरीयम म्हणाली, ''प्रसंग भयंकर आहे खरा. पण तुझं काम फारच छान झालंय. ग्रेट.''

“मस्य हेन्री, तुम्ही खरे महान कलाकार आहात.” ज्युल्स ड्युप्रे म्हणाला, “आता तुम्ही लंडनला जायला मोकळे झालात.”

- ८० -

पिस्सारो पॅरीसला कंटाळून जवळच्या एका खेडेगावात राहायला गेल्यापासून हेन्री त्याला भेटला नव्हता. एप्रिल महिन्यातल्या एके दिवशी तो मिरीयमला घेऊन त्याला भेटायला गेला. पिस्सारो त्याला घ्यायला स्टेशनवर आला होता. त्याची लांब दाढी व पायघोळ पोशाखात तो बायबलच्या काळातल्या एखाद्या मेंढपाळासारखा दिसत होता. पिस्सारोच्या कुटुंबीयांसमवेत सगळयांनी एका प्रचंड डेरेदार चेस्टनटच्या सावलीत बसून भोजन घेतले. मुले वाढण्याचे काम करीत होती. मोठी मंडळी वारुणीचे घुटके घेत गप्पा मारीत होती. डेझर्ट आल्यावर त्या बुजुर्ग कलाकाराने आपला भला मोठा पाईप शिलगावला आणि मग गप्पा मारताना इंप्रेशनिझिमच्या सुरुवातीच्या दिवसांच्या आठवणी एक एक करून निघू लागल्या. मोने, देगास, झोला, सेझान, रेन्वा, व्हिसलर यांच्याबरोबर कॅफे गुर्बामध्ये बसून तासन्‌तास घातलेले वितंडवाद, चित्रातल्या मोकळया जागा, निळया सावल्या वगैरे जुन्या आठवणींची पुन्हा एकदा उजळणी झाली. ऐन उमेदीत ओढगस्तीच्या परिस्थितीमुळे सोसाव्या लागलेल्या चटक्यांच्या आठवणी सांगताना त्याचे डोळे पाणावले. आयुष्यात बरेच चढउतार पाहूनही कडवटपणाचा लवलेश त्याच्या बोलण्यात दिसून येत नव्हता.

“अरे, त्या पॉल गोगँचे पत्र मला आलंय. सध्या तो मार्क्वेज बेटावर आहे. बिचारा! आपण होऊन ओढवून घेतलेली परिस्थिती. त्यामुळे कोणाला बोलून करणार काय. आयुष्यात तडजोड करायला त्याला जमलीच नाही. व्हिन्सेंटसुद्धा तसाच होता.”

“देगास भेटला तर त्याला विचारलंय म्हणून सांग. त्या ड्रेफ्युस प्रकरणानंतर आमची भेटच नाहीय. तोसुद्धा एकटाच असतो. एका क्षुल्लक गोष्टीवरून एवढी जुनी दोस्ती तोडून टाकायची हे काही खरं नाही. सर्व ज्यू जर्मनांचे छुपे हस्तक असतात असं

त्याचं अगदी ठाम मत आहे. ज्यू म्हटलं की ज्याचा सारासार विवेक सोडून जातो त्याच्याशी काय वाद घालणार?''

लंडनला जायचा दिवस जसा जवळ येऊ लागला तसा हेन्रीचा अस्वस्थपणा वाढू लागला. मिरीयमला पॅरीसमध्ये सोडून जायची कल्पना त्याला सहन होईना. शेवटी जायला तीन दिवस राहिले असताना त्याने मॉरीसला मी लंडनला जाणार नाही म्हणून सांगितले तेव्हा मॉरीस खवळला.

''तुझं डोकं तर ठिकाणावर आहे ना? आयत्या वेळी तू नाही म्हणतोस म्हणजे काय.''

''मी स्वतः प्रत्यक्ष येण्याची काय गरज आहे. माझी पेंटिंग तर मी पाठवतोय ना?''

''तू न जाऊन कसं चालेल? गेले वर्षभर मी या शोची तयारी करतोय. तुझा लंडनमधला सगळा कार्यक्रम तपशीलवार नक्की केला आहे. वर्तमानपत्रातून तुझ्या आगमनाची तारीख जाहीर केली आहे. तुझ्या सन्मानाखातर एक मेजवानी ठेवलीय. त्याची आमंत्रणे पाठवून झालीयत. प्रिन्स ऑफ वेल्सनी खास तुझ्यासाठी म्हणून ...''

''मी विसरलोच होतो. हे महाशय माझ्या शोचे उद्‌घाटन करणार आहेत नाही का?''

''अरे बाबा, यात तुझा केवढा बहुमान आहे हे तुझ्या लक्षात आलंय का?''

बहुमानाचा विषय काढताच हेन्री उसळला. ''हे बघ मॉरीस, प्रिन्सने प्रदर्शनाला माझा मित्र म्हणून भेट द्यावी इतपत ठीक आहे. पण तू मानाच्या गोष्टी करशील तर यात कोण कोणाचा मान राखतोय ते जरा मला कृपा करून सांगशील काय? मी कोण आहे हे तू विसरलास की काय? अरे, मी कॉम्ते द तुलूझ लोत्रेकांचा वंशज आहे. तुलूझ. जे कॉन्स्टँटिनोपलच्या पहिल्या धर्मयुद्धात तुर्कांविरुद्ध लढताना सेनापती होते. आमच्या व इंग्लंडच्या राजघराण्यात रक्ताचे नातेसंबंध आहेत. आमचा एक चुलता

जेव्हा इंग्लंडच्या सिंहासनावर बसून राज्य करीत होता तेव्हा आताच्या या प्रिन्स ऑफ वेल्सचे पूर्वज, सॅक्स-कॉबर्गस् मंडळी शेतात नांगर धरून फिरत होती हे तुला ठाऊक नसेल.''

मॉरीस, मिसीया आणि मिरीयम या तिघांच्या समजावण्याने हेन्री एकदाचा लंडनला जायला तयार झाला. लंडन शहरातील नीटनेटकेपणा, टापटीप, ऐतहासिक स्थळांची भव्यता व शान, गर्दीतील शिस्त यासाठी त्याला ते शहर खूप आवडायचे. विशेष करून पिकॅडलीमधून चक्कर मारायला. ट्रॅफल्गार स्क्वेअरमधील नेल्सनचा पुतळा पाहून त्याला पॅरीसमधील कर्नल व्हेंदोमच्या पुतळयाची आठवण झाली. रीजंट स्ट्रीटवरील ग्युपिलची आर्ट गॅलरी मात्र त्याला फारशी आवडली नाही. बंदिस्त, काळोखी आणि गंभीर. तेथील वातावरण आत शिरताक्षणी जांभया याव्यात असे होते. तेथे व्हायचा तो फक्त धंदा. कुजबुजणाऱ्या आवाजात तेथील सौदे होत. पेंटिंग आवडले म्हणून नव्हे तर दुसऱ्यांनी हेवा करावा म्हणून खरेदी केले जाई. खरेदी-विक्रीच्या व्यवहारात हौसेपेक्षा व्यापारी मूल्याचा विचार जास्त होई. तेथे चेक लिहिले जात व पावत्या फाडल्या जात. या असल्या ठिकाणी आपल्या पेंटिंगचे प्रदर्शन होणार आहे हे बघून हेन्रीचा उत्साह मावळला. त्यातच त्याच्या मनात सारखा मिरीयमचा विचार चालू होता. वार्ताहरांनी घेतलेल्या मुलाखती, चेल्सी क्लबमधील जेवणानंतरचे भाषण या सगळयांत त्याची पार तारांबळ उडाली. कधी एकदा पॅरीसला जाऊन मिरीयमला भेटतोय असे त्याला होऊन गेले. त्यातच त्याची पेंटिंग बघून काही विक्रेत्यांनी नाके मुरडली. लंडनमधील उच्चभ्रू वर्गाच्या पसंतीला ती पेंटिंग कितपत उतरतील अशी शंका त्यांनी व्यक्त केली. प्रदर्शन रद्द करण्यासंबंधानेही विचार करून झाला. पण राजेसाहेबांना आमंत्रण दिलेले असल्याने तेही शक्य नव्हते.

शेवटी एकदाचा उद्घाटनाचा दिवस उगवला. रात्रभर त्याला झोप लागली नव्हती. उशीर होऊ नये म्हणून तो तासभर अगोदरच जाऊन पोचला. इतका वेळ काय करायचे या विचारात तो एका खोलीतील कोचावर जाऊन बसला होता त्यातच त्याचा डोळा लागला. राजेसाहेबांच्या आगमनानंतर हेन्रीसाठी शोधाशोध झाल्यावर तो बाजूच्या खोलीतील सोफ्यावर गाढ झोपलेला आढळला. हेन्री आपल्या स्वागताला पुढे आला नाही. फ्रेंच आहे म्हणजे पिऊन तर्रच असणार अशा समजुतीमुळे त्याला

उठवून जागे करेपर्यंत राजेसाहेब आले तसे निघून गेले. एवढा फजितवाडा उडाल्यानंतर हेन्रीनेही तिथून काढता पाय घेतला.

मिरीयमची ओळख झाल्यानंतर तिची भेट झाली नाही असा फार तर एखादा दिवस गेला असेल. आता चक्क एक आठवडा झाला होता. त्याला कधी एकदा ती भेटते असे झाले होते. गाडीत बसल्यापासून त्याच्या मनात सतत तिचाच विचार होता. त्या दिवशी आपले थोडे चुकलेच. तिला आपल्या संपत्तीचे आमिष दाखवायला नको होते. मी तिला एखाद्या रखेलीसारखे तर वागवले नसेल? उगाच नाही तिने त्रागा करून आपल्या व्यंगाचे उणे काढले. तशी ती अगदी सालस म्हणता येईल अशी आहे. तिला स्पष्टपणे लग्नाची मागणी घालायला पाहिजे होती. मी उगाच धरून चाललो होतो की ती लग्नाला तयार होणार नाही. लग्नाने तिला एक नाव मिळेल. आणि तेच तर तिला हवे असेल. आता भेटल्याबरोबर ताबडतोब तिला लग्नाविषयी सूतोवाच केले पाहिजे. गाडी पॅरीसमध्ये शिरेपर्यंत त्याचा निश्चय पक्का झाला.

पॅरीसच्या दर्शनाने त्याच्या चित्तवृत्ती उल्हसित झाल्या. त्याने एक दीर्घ श्वास घेऊन पॅरीसची हवा छातीत भरून घेतली. रस्त्यात गस्त घालणारे मिशाळ हवालदार, तुरूतुरू चालणाऱ्या यौवना, रस्त्याच्या कोपऱ्यावर फुले विकत बसलेल्या मुली, कॅफेची फुटपाथवर आलेली पट्ट्यापट्ट्यांच्या कापडांची छप्परे. मधेच एखाद्या भिंतीवर कॅलेताचे गिलोटीनखाली शिरच्छेद होतानाचे त्याने केलेले पोस्टर लागलेले होते पण त्याकडे त्याचे लक्ष नव्हते.

घोडागाडी २१ रू कलॅनकूंर समोर येऊन उभी राहिली. तो घाईघाईने जिना चढून वर गेला. स्टुडिओत येऊन श्वास घेतोय तेवढ्यात मादाम ल्युबेत दरवाजात येऊन उभी राहिली. तिला तसे उभे असलेले पाहताच त्याला काहीतरी चुकल्यासारखे वाटले. तिचा चेहराच सांगत होता. त्याचे पाय जमिनीला खिळले. एका अनामिक भीतीने तो थरथरू लागला. जशी त्या दिवशी मारी त्याच्यासमोर थरथरत उभी होती.

“काय आहे त्यात?” त्याने तिच्या हातातल्या लिफाफ्याकडे पाहून विचारले.

“मस्य तुलूझ. जरा बसाल तर खरे.”


त्याने त्या दिवशी मारीला असेच बसायला सांगितले होते. मारी जिथे बसली होती त्या रिकाम्या कोचाकडे त्याने पाहिले. त्याच्या अंगातले सगळे त्राण गेले. तो तसाच पांढऱ्याफटक नजरेने शून्यात बघत असल्यासारखा तिच्या हातातल्या लिफाफ्याकडे बघत राहिला.

"मादम्वाझेलने हे आणून दिलं. तुम्ही ज्या दिवशी लंडनला गेलात त्या दिवशी."

त्याने तो लिफाफा थरथरत्या हाताने उघडला व आतला कागद आपल्या अधू डोळयांच्या अगदी जवळ नेऊन वाचू लागला.

'मी आज रात्री मस्य ज्युल्स ड्युप्रे बरोबर जात आहे. *शेरी*, कदाचित हेच आपल्या दोघांच्या हिताचे असेल.'

(लोत्रेकने स्थिरचित्रात गतीचा आभास करण्यासाठी घोडेस्वार, सायकल शर्यत, सर्कस वगैरे चित्रात एक खास तंत्र वापरले. लोत्रेकने वापरलेले तंत्र आणि त्यावेळी नुकत्याच विकसित होत असलेल्या चलतचित्रणाच्या तंत्र यांचा परस्परांवर दाट प्रभाव होता. हे लोत्रेकचे मोठे योगदान.)



(द जॉकी – चार रंगातील लिथोग्राफ, ५१x३६ सेमी, १८९९,
खाजगी संग्राहक, लंडन)
ॲबसिंथ

“ॲबसिंथ. *नॉम दे दियू*. प्लीज व्हिक्टर. जल्दी लाव.”

“मस्य तुलूझ्. खूप झाली आतापर्यंत. आता पुरे करा.”

“ए. तू कोण मला सांगणारा? तू तुझं काम कर. ॲबसिंथ आण लवकर.”

“या दारुड्यांना समजावण्यात काही अर्थ नसतो.” व्हिक्टर काउंटरवर बसलेल्या कॅशियरला उद्देशून म्हणाला.

“जल्दी लाव.” हेन्री बसल्या जागेवरून जोरात ओरडला आणि पाठोपाठ हवा निघून गेलेल्या फुग्यासारखा फसकन समोरच्या टेबलावर पडला.

“साली रोजची कटकट आहे. किती प्यायची याला काही सुमारच नाही. चढली की खिशातून एक पत्र काढतो, वाचतो आणि चक्क रडायला लागतो. दर वेळेला पत्र तेच असतं, पण रडणं मात्र असं की जणू काही एखादी दुःखद घटना घडलेली कळली असावी. आता एकदा वाचलं, समजलं, रडलं, भरपूर दारू प्यायली की संपलं सगळं. रोज तेच तेच दुःख नव्याने काय चघळत बसायचं?”

“प्रेमभंगाचं काहीतरी प्रकरण असलं पाहिजे. त्याशिवाय कोणी त्यात इतका बुडून जाणार नाही.”

“दुःख कोणाला नसतं काय. जन्माला आलेल्या प्रत्येकाच्या वाट्याला काही ना काही तरी दुःख येतंच. म्हणून सगळेच स्वतःला दारूत बुडवून घेत नाहीत. याने नुसता उच्छाद मांडलाय. रडतो काय, आरडाओरडा काय, भसाड्या आवाजात गाणं काय. एवढंच नव्हे तर कधी कधी मारामारीसुद्धा करण्याची सुरसुरी येते याला. आता एक फुंक मारली तर उडून जाईल असा याचा अवतार. पण करणार काय? पाटूसाहेबांचा मित्र पडला. त्यांनी इथल्या सगळया बिस्ट्रोच्या मालकांना दम देऊन ठेवलाय. मस्य माझे मित्र आहेत. त्यांना कसलाही त्रास होता कामा नये. म्हणून सहन करावं लागतं.

माझ्या वाटेला आलेलं दुःख म्हणशील तर हेच आहे. म्हणून मी काय हा गल्ला सोडून प्यायला सुरुवात करू.''

व्हिक्टर हसला. एवढ्यात हेन्रीचे ओरडणे त्याला ऐकू आले.

''माझी ॲबसिंथ कुठेय? विसरलास की काय?''

व्हिक्टर ॲबसिंथचा प्याला घेऊन हेन्रीच्या टेबलाकडे गेला.

''पाटूसाहेबांनी सांगितलंय...''

''तेल लावत गेला तुझा पाटूसाहेब. डुक्कर कुठला. मी कुठे व किती पितोय याची काळजी करणारा तो कोण? हे बघ मित्रा, मला एक सांग, बायकांविषयी तुझं काय मत आहे?''

''मला बायकांचा काही फार अनुभव नाही. पण माझ्या बायकोपुरतं बोलायचं झालं तर ती झोपेत घोरते. एवढंच नव्हे तर चक्क शीळ घालत गाणंसुद्धा म्हणते.''

''यावर एक अगदी साधा उपाय आहे. माझ्या एका मित्राची बायकोसुद्धा अशीच घोरत असे. त्याने काय केलं माहितेय. एक उशी तिच्या तोंडावर बांधून ठेवली. घोरण्याचा आवाजच काय अगदी श्वासोच्छ्वासाचासुद्धा आवाज यायचा बंद झाला. म्हणजे प्रश्न कायमचा सुटला.'' असे म्हणून हेन्री जोरजोरात हसायला लागला. हसता हसता त्याला धाप लागली, श्वास कोंडला, डोळ्यांसमोर अंधारी आली, बुबुळे दिशाहीन फिरली, सर्वांगातून कळा येऊ लागल्या, पोटात ढवळू लागले. पित्तरस अन्ननलिकेतून हळूहळू वर सरकू लागला. तोंडात कडवट चव गोळा झाली. डोक्यात हातोडीचे घाव बसू लागले. त्याने दोन्ही हातांनी डोके गच्च दाबून धरले. पोटातल्या ढवळण्याचा एक आवेग संपला. त्याला क्षणभर बरे वाटले. पण दुसऱ्याच क्षणी तोंडात लाळ गोळा होऊ लागली. ताबडतोब काठी उचलून तो लटपटत मुतारीकडे गेला. त्याने दरवाजा उघडला. भपकन वास आला. त्या वासाने पोटातला द्रव बूच उघडलेल्या शॅम्पेनसारखा फसफसून बाहेर आला. त्याला भडाभडा उलटी झाली.

डोक्यातील ठणका असह्य झाला. पाय लटपटू लागले. भिंतीचा आधार घेत कसाबसा तोल सावरीत तो उभा होता. पुन्हा पुन्हा उलटी झाल्यावर आवेग शांत होत गेला. त्याने रुमाल काढून दाढीला लागलेली लाळ पुसली. थोडा वेळ वाट पाहून अत्यंत सावधतेने जपून पावले टाकीत तो आपल्या टेबलावर गेला व तिथेच डोके टेकून झोपी गेला. थोड्या वेळाने पाटू आला व त्याने त्याला लॉजवर पोचविले.



ॲबसिंथ

(एकोणीसाव्या शतकात पॅरीसमधील कलाकारांमध्ये ॲबसिंथ हे मद्य चटकन चढणारी नशा आणि स्वस्त किंमत यामुळे खूप लोकप्रिय होते. नशा जास्त येण्यासाठी

या मद्यात काही वनस्पतींचा अर्क मिसळला जाई. हे मद्य रेडियमचे क्षार मिसळलेल्या काचेच्या पेल्यामधून देत. भोके असलेल्या चमच्यावर साखरेचा खडा ठेऊन पेल्यात ॲबसिंथ ओतण्याची पद्धत होती. अंधारात रेडिममुळे ॲबसिंथचा पेला चमके. त्यामुळे ॲबसिंच्या पेयपानाला एखाद्या विधीचे स्वरूप येई. पण या मद्याचे व्यसन फार लवकर लागे आणि बऱ्याच जणांना अपस्माराचे झटके येत. हे लक्षात आल्यावर पुढे या मद्यातील घातक घटकांवर व रेडियम ग्लासेसवर बंदी घालण्यात आली. लोत्रेकच्या आवडते ॲबसिंथ व कोनॅकचे कॉकटेल अर्थक्केक या नावाने प्रसिद्ध आहे.)

८२ -

दुसऱ्या दिवशी दुपारी तो उठला तेव्हा त्याचे डोके प्रचंड दुखत होते. तोंड कडूजार झाले होते. काल नक्की काय झाले ते तो आठवण्याचा प्रयत्न करीत होता. पण काही केल्या कसलीही सुसंगती त्याला लागत नव्हती. त्याने नकळत ग्लासात कोनॅक ओतली व एक घोट घेतला. घसा जाळत जेव्हा थोडीशी कोनॅक पोटात गेली तसे हळूहळू सगळे ताळ्यावर येऊ लागले. मग परत एक पेला...

गेल्या वर्षभरात सगळे मित्र एक एक करून तुटले होते. कोण किती सहन करील? प्रत्येकाला आपापला उद्योग होता. मॉरीसने त्याला सावरण्याचा पोटतिडिकेने खूप प्रयत्न केला खरा, पण त्यानेही कंटाळून हात टेकले. हेन्री कॉम्ते द तुलूझ लोत्रेक. इतिहास प्रसिद्ध तुलूझ लोत्रेक घराण्याच्या वंशाचा एकुलता एक दिवा. ॲबसिंथ, अपोलो बार, नावाची पाटीही नसलेला कळकट बिस्ट्रो, असह्य दुर्गंधी येणारी मुत्री, तेथे बसून केलेल्या वांत्या. यातच एके दिवशी तुलूझ लोत्रेकांच्या शेवटच्या वंशजाचा अंत होणार या कल्पनेने त्याच्या अंगावर काटा उभा राहिला. कसेही करून यातून स्वतःला बाहेर काढले पाहिजे. मॉरीससुद्धा अंतरल्यात जमा होता. त्याला आईची आठवण झाली. ममा, मला तुझ्या कुशीत घे ग.

"रिरी. मों पेती. बरं झालं तुम्ही इकडे रहायला आलात." आई शेकोटी जवळच्या आरामखुर्चीत बसली होती. "किती वाट बघत होते तुमची."

जोसेफने चहा व बिस्किटे आणून ठेवली. जोसेफ गेल्यावर हेन्रीने आईजवळ जाऊन तिच्या गालाचे हळूच चुंबन घेतले.

''काय दशा करून घेतलीयत स्वतःची.'' आईने त्याला थोपटत म्हटले, ''अगोदर थोडी बिस्किटे खाऊन घ्या व गरमागरम चहा प्या.'' तिने बिस्किटांची बशी पुढे केली व कपात चहा ओतला.

पुढचा एक तासभर ती त्याला संसारातील किरकोळ घरगुती गोष्टी मोठ्या आस्थेने तपशीलवार सांगत होती. बशीभर बिस्किटे, दोन कप चहा आणि शेकोटीची ऊब यांनी हेन्रीला थोडे बरे वाटले आणि डोळयांवर झोपेची झापड आली. डोळे क्षणभर मिटतात तोच त्याच्या घशाला कोरड पडली. डोळयांसमोर हिरव्या रंगाच्या ॲबसिंथची बाटली दिसू लागली. बार काउंटरचे दृश्य नजरेसमोर तरळू लागले.

त्याने डोळे उघडले व आईच्या हातावर हात ठेवून म्हणाला, ''ममा, प्लीज मी एक ड्रिंक घेऊ का?''

त्याचे हात कापत होते, कपाळाववर घर्मबिंदू गोळा झाले, अंग थंडगार पडू लागले. आईने त्याची अवस्था पाहिली व ती ताबडतोब उठली. तिने कपाटातून कोनॅकची बाटली काढली व एका ग्लासात ओतली.

''हेन्री! ही घ्या.'' त्याच्यासमोर ग्लास ठेवीत ती म्हणाली.

''मला माफ करा ममा.'' त्याने एका घोटात पेला रिकामा केला. मद्य पोटात जाताच त्याच्या हाताचा कंप थांबला. आईच्या नजरेला नजर देत तो म्हणाला, ''आता तुम्हाला समजलं असेल?''

''मला ठाऊक होतं रिरी.''

''पण तुम्हाला माहीत नसेल मी किती पितो ते.'' हेन्रीचा आवाज पडला, मान खाली गेली. ''मी तुम्हाला फसवायचो. पहिल्यांदा जेव्हा दारू प्यालो तेव्हा तुम्हाला

वास येऊ नये म्हणून मी तुमच्या जवळ येण्याचे टाळलं. सुरुवाती सुरुवातीला दारू प्याल्यावर पायातील वेदनांचा थोडा वेळ विसर पडायचा. शिवाय आपण दारू पचवू शकतो याचा किंचित अभिमानही वाटायचा. एखाद्या सद्‌गृहस्थाप्रमाणे माझा आपल्या पिण्यावर ताबा आहे असं वाटायचं. पण हळूहळू दारूने माझ्यावर केव्हा ताबा मिळवला ते कळलंच नाही. आता दारू प्या किंवा न प्या पाय दुखतच असतात. या दारूमुळे मी कोणत्या गर्तेत पडलोय याची तुम्हाला कल्पना नसेल. कालच एका बिस्ट्रोमध्ये झिंगून पडलो होतो. मला उचलून लॉजवर न्यावं लागलं. दिवसातील बराच वेळ मी शुद्धीत नसतो. जेव्हा शुद्धीत येतो तेव्हा मला काहीही आठवत नसतं. मी कोणतेही काम करीत नाही. जवळ जवळ वर्षभर मी ब्रशसुद्धा हातात धरला नाहीय. मला कोणी मित्र उरले नाहीयत. फक्त मॉरीस राहिला होता. काल त्याच्याशीसुद्धा भांडून मी इकडे आलोय.''

''ममा, मला जगायचंय. प्लीज. मला तुमची मदत हवीय. मला यातून सुटायचंय. मी डॉक्टरांचे उपचार घेईन. आपण कुठेतरी जाऊ या. बर्जेस् नाही तर एव्हीअँ. आठवतंय? मी लहान असताना तुम्ही मला घेऊन गेला होतात.''

त्याचे बोलणे आई लक्ष देऊन ऐकत होती. त्याच्या बोलण्यातील लहान मुलाचा उत्साह करुणाजनक वाटत होता. त्याच्या व्यक्तिमत्वाचा एक भाग प्रौढ न होता आहे तसाच बालीश राहिल्याने त्याची सत्य व भ्रम यात सदैव गल्लत होत होती.

''ठीक आहे. तुम्हाला आवडत असेल तर आपण एव्हीअँला जाऊ या. उद्या चालेल. दुपारी गाडी आहे. आता झोपा. सकाळी उठल्यावर तयारी करू.'' असे म्हणून ती झोपण्याच्या खोलीत निघून गेली.

इकडे हेन्री बिछान्यात तळमळत पडला होता. एका क्षणिक उत्साहाच्या लाटेत त्याने आईबरोबर एव्हीअँला जायचे ठरविले होते. एव्हीअँ एक निसर्गसुंदर स्थळ आहे. हॉटेल समोर तलाव आहे. खिडकीतून आल्प्स पर्वत दिसतो. पण तेथे आईबरोबर असताना दारू पिण्याची तलफ आली तर काय करणार? जेव्हा घशाला कोरड पडेल, जीभ जड होईल तोंडातील थुंकीसुद्धा गिळण्याचे त्राण उरणार नाही तेव्हा काय? एखाद्या रात्री स्त्रीदेहाची आठवण होईल. तिथे थोडीच ल फ्लूर ब्लांसारखी सोय

असेल? पूर्वी ठीक होते. तेव्हा मी एक लहान मुलगा होतो. आता पस्तिशी उलटलेला घोडा झालोय. त्यात दारुडा. आपल्याला हे एव्हीअँ वगैरे काही परवडणार नाही. त्यापेक्षा मोंमार्त्र व तेथील बिस्ट्रो बरे. आईसमोर जास्त काही तमाशा होऊन तिला जास्त दुःख देण्यापेक्षा लवकरच येथून काढता पाय घेतलेला बरा.

त्याने हळूच आपली काठी उचलली आणि तो पाऊल न वाजवता तिथून सटकला.

रात्री मादाम ल्युबेतला कसल्यातरी गडबडीने जाग आली. तिने हेन्रीचा आवाज ताबडतोब ओळखला. तो कोणावर तरी जोरात ओरडत होता. एवढ्या मोठ्याने की आसपासच्या सगळयांना जाग आली. तिने खिडकीतून खाली पाहिले. हेन्री पाटूला मोठमोठ्याने शिव्या घालत होता.

“तुला माझ्या भानगडीत नाक खुपसायची गरजच काय? माझ्यावर येथे लॉजवर येण्याची जबरदस्ती तू का करतोयस? मला तिथे जायचं नाहीय. तिथे किती झुरळं आहेत तुला ठाऊक नाहीय. पाजी. डुक्कर कुठला.”

पाटूने गाडीवानाच्या मदतीने त्याला बाहेर काढले. मादाम ल्युबेत धावत धावत खाली गेली. हेन्रीचे कपडे चुरगळलेले होते. टायची गाठ ढिली झाली होती. नाकातून किंचित रक्त येत होते. ओठ सुजले होते. कपाळावर टेंगूळ आले होते. डोक्यावरची महागडी डर्बी हॅट कुठेतरी हरवलेली दिसत होती. गेल्या सहा महिन्यांत अशा डझनभर हॅट हरवल्या होत्या. पाटूने त्याला उचलून वर आणले व मादाम ल्युबेतच्या मदतीने बिछान्यात आडवे केले.

“काउंटनी फारसा त्रास दिला नाही ना?” मादाम ल्युबेतने विचारले.

“पिऊन ओकले नाहीत एवढेच. दिवसेंदिवस यांचं पिणं फार वाढत चाललंय. मोंमार्त्रमधल्या सगळया बिस्ट्रोना तंबी देऊन ठेवलीय की यांना जास्त दारू देऊ नका म्हणून. तर आज हे साहेब दुसऱ्या भागात गेले. तेथे या काउंटना ओळखणारं कोणी नव्हतं. यांनी तिथे होत्या नव्हत्या त्या सगळया प्रकारच्या दारूचा एक एक पेग मागवला. व्हिस्की, रम, ब्रँडी, व्हरमाउथ, ॲबसिंथ, कॅल्व्हॅडोज्. एवढ्याने एखादा

घोडासुद्धा आडवा होईल.'' पाटू सांगत होता, ''गेली पंधरा वर्षे मी यांना ओळखतोय. तुमच्यासारखी माझीही माया आहे त्यांच्यावर. समजवायला हे काही लहान राहिले नाही. स्वतःलाच मारायचे ठरवल्यावर आपण दोघं किती पुरे पडणार? मी बरेच दारुडे पाहिलेयत. पण यांच्यासारखा पागल कोणी अजून पाहिला नव्हता.''

हेन्रीची अवस्था पाहून मादाम ल्युबेतच्या डोळयांतून पाणी आले. त्याच्या काळजीने त्या दोघांचाही जीव तीळ तीळ तुटत होता. दोघांनी हेन्रीची दारू कशी सोडवता येईल याचा बराच खल केला. रात्रीचा शेवटचा प्रहर चालू होता. पाटू जायला निघणार एवढ्यात हेन्रीच्या किंकाळयांनी ते दचकले. हेन्री आपल्या खोलीचा दरवाजा धाडकन उघडून बाहेर आला. त्याचे डोळे भीतीने विस्फारले होते.

''मादाम ल्युबेत मला वाचवा. मला वाचवा. ती झुरळं येतायत. कितीही मारली तरी संपत नाहीयत. एका मागोमाग एक हजारो, लाखो झुरळं माझ्या अंगावर येतायत. मला वाचवा. नाही तर ही झुरळं मला कुरतडून खाऊन टाकतील.'' हेन्री नसलेली झुरळं झटकून टाकण्याचा प्रयत्न करीत होता. त्याचा चष्मा त्याच्या नाकावर नव्हता. अर्धवट उजेडात चाचपडत त्याने जिन्याच्या कठड्याचा आधार घेण्याचा प्रयत्न केला. त्याचा पाय त्याच्या पायघोळ पायजम्यात अडकला व तो जिन्यावरून गडगडत खाली गेला.



(फोटो – मद्यपान करताना लोत्रेक)

- ८३ -

डॉक्टर सेलामीनचे मेझाँ द साँते हे आरोग्यधाम श्रीमंतांची वस्ती असलेल्या एका शानदार उपनगरात होते. हे वेड्यांचे इस्पितळ आहे असा संशय बघणाऱ्याला चुकूनसुद्धा आला नसता. मेरी ॲन्तोनिएतच्या परिवारातील एकाच्या मालकीची, अठराव्या शतकातील ती एक प्रचंड वास्तू होती. सभोवताली उत्कृष्ट निगा राखलेली भली मोठी बाग होती. तेथे डॉक्टर सेलामीन त्यांच्या श्रीमंत रुग्णांवर उपचार करीत. असे असले तरी हेन्रीला ती जागा मुळीच आवडली नाही. त्याच्या तीन आठवड्यांच्या वास्तव्यात तो अगदी पार कातावून गेला होता. तेथील लांबलचक अंधारे कॉरिडॉर, दात विचकून कृत्रिम हसणारे डॉक्टर, पांढऱ्या पोशाखातील परिचारक, अंधाऱ्या रहस्यमय खोल्या. त्यांच्या बंद दरवाजांच्या आडून ऐकू येणारी कारस्थानी कुजबुज. रात्री मिणमिणत्या प्रकाशात तर ती वास्तू झपाटल्यासारखी दिसे. दिवसा नयनरम्य दिसणारी बाग रात्रीच्या फिकुटलेल्या चांदण्यात भयाण वाटे. झाडांच्या पानांची

सळसळ, भरीला जवळच्या रानातील प्राण्यांचे काळीज गोठवणारे आवाज. रात्रीचे वातावरण एखाद्या कबरस्तानासारखे असे.

मार्च महिन्यातील ती एक टळटळीत दुपार होती. हेन्री जाडजूड गजांच्या खिडकीतून बाहेरच्या तळपत्या आकाशाकडे पाहत होता. त्याच्या मनाचा असह्य कोंडमारा होत होता. येथून काहीतरी करून पळून गेले पाहिजे असे त्याला वाटू लागले, पण ते जवळ जवळ अशक्य होते. खोलीला बाहेरून कडी लावलेली होती. बाहेर एक पहारेकरी खुर्चीवर शांतपणे पेपर वाचीत बसला होता. खिडकीतून बाहेर दिसणाऱ्या कोणाशी बोलण्याचा प्रयत्न केला तर कोणीही त्याला प्रत्युत्तर करीत नसे. ओरडून लक्ष वेधण्याच्या प्रयत्नांनासुद्धा यश मिळाले नाही. कारण बाहेरच्या जगाच्या दृष्टीने तो एक मनोरुग्ण म्हणजे वेडा होता. तेथील डॉक्टरांनी एखाद्या डिटेक्टिव्ह किंवा वकिलापेक्षा जास्त सफाईने त्याच्याविषयी सगळी माहिती पद्धतशीरपणे गोळा केली होती. घरातील झुरळे मारण्यासाठी त्याने घरात केरोसीन ओतून ठेवले होते, समुद्रकिनाऱ्यासारखे वातावरण स्टुडिओत असावे म्हणून कित्येक पोती वाळू त्याने फरशीवर पसरून ठेवली होती. एकदा भिकाऱ्याचे सोंग घेऊन द्युरँद रूएलच्या दारात उडवलेली धमाल, कोणत्या पार्टीला कोणता चित्रविचित्र पोशाख करून गेला होता वगैरे सगळ्या गोष्टी त्यांनी खणून काढून त्यांची एक बारीकसारीक तपशीलवार जंत्री केली होती. नंतर या सगळ्याला एकदा लॅटिनमध्ये नावे दिली की मग त्याला वेडा ठरविणे सोपे होते.

सुरुवातीचे काही दिवस त्याला रात्री कॉटवर पट्ट्यांनी बांधून ठेवीत. दारूच्या थेंबासाठी शरीराचा कणन्‌कण आसुसलेला असे. रात्रभर तो किंचाळत असे. कोणीही एकजण ओरडू लागला की आजूबाजूच्या खोल्यांमधील रुग्णसुद्धा ओरडू लागत. किंचाळण्याच्या भेसूर आवाजाने ऐकणाऱ्याच्या जीवाचा थरकाप होई. पण तेथील पहारेकरी व परिचारक अगदी स्वस्थ असत. आपल्या किंचाळण्याचा काहीही परिणाम होत नाही हे कळल्यावर हेन्री शांत झाला. इतका शांत की काय हवे नको ते सांगायलासुद्धा तोंडातून शब्द फुटत नसे. परिणामी त्याच्या केसपेपरवरची घातकी वेडा अशी नोंद बदलून निरुपद्रवी वेडा अशी करण्यात आली. त्याची खोली बदलण्यात आली. कॉटला बांधून ठेवणे बंद झाले.

एके दिवशी मोठ्या मिनतवारीने त्याला बागेत फिरण्याची परवानगी मिळाली. बागेत काही चाळे करायचे नाही असे बजावून सांगण्यात आले. म्हणजे तो वेडा आहे आणि वेडा म्हटला की काहीतरी वेडे चाळे करणारच हे सर्वांनी एवढे गृहीत धरलेले पाहून त्याच्या अंगावर शहारे आले. तिथे त्याला पहिल्यांदाच बागेत पाय ठेवायला मिळाला होता. त्याने बागेत फिरणाऱ्या एकदोघांबरोबर बोलण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या हरवलेल्या नजरा, विक्षिप्त हालचाली यावरून त्याच्या लक्षात आले की त्या बागेत फिरणारे बहुतेक रुग्ण अगदी ठार वेडे आहेत. वेड्यांची बाग. तो नखशिखांत हादरला. त्याला व्हिन्सेंटची आठवण झाली. अशा वेड्यांच्या सहवासात थोडे दिवस काढले तर शहाणासुरता माणूससुद्धा लवकरच ठार वेडा होईल.

बागेत फिरता फिरता त्याला एक पीस मिळाले. त्याने पहारेकऱ्याला मस्का मारून एक शाईची दौत व कागद मिळवले. दौत व कागद हातात मिळताच त्याने चित्रे काढायला सुरुवात केली. सर्कसची चित्रे. तास-दोन तास कसे गेले ते कळलेच नाही. त्याने काढलेली चित्रे पहारेकऱ्याला आवडली. त्यामुळे त्याने ती त्याला देऊन टाकली.

दोन दिवसांनी त्याला ऑफिसमध्ये बोलावण्यात आले. थोडेसे तपासल्यावर डॉक्टर म्हणाले, ‘‘फारच छान. तुमच्यात खूपच सुधारणा झालेली दिसतेय. भूक वगैरे चांगली लागते ना? आणखी थोडी विश्रांती मिळाली की तब्येत लवकरच टुणटुणीत होईल. तुम्ही सर्कसची जी स्केच केलीत ती आम्ही पाहिली बरं का.’’

‘‘सर्कस माझा आवडीचा विषय आहे. मी खूप सर्कशी पाहिल्या आहेत.’’

‘‘फारच सुंदर चित्र काढलीयत तुम्ही. कशावरून कॉपी केलीत.’’

‘‘कॉपी करायला इथे माझ्याकडे आहे काय? मोठ्या मिनतवारीने मला कागद मिळाले.’’

‘‘काय सांगता काय? नुसत्या स्मरणशक्तीवर विसंबून तुम्ही ही चित्रे काढलीत? तुमच्या मनाच्या या अवस्थेत?’’

“मनाची अवस्था. मी मद्यपी आहे, पण माझे डोके शाबूत आहे. स्मरणशक्तीला काहीही धाड भरली नाहीय. तुम्ही काहीही विचारा. सगळ्या घटना अगदी तारीखवार मला आठवतायत. पाहिजे तर परीक्षा घेऊन बघा.”

“आमच्या फाईलवरच्या नोंदीप्रमाणे...”

“आग लागो तुमच्या फाईलींना. तुमच्यासमोर मी उभा आहे ते तुम्हाला दिसतेय ना? मी काय बोलतोय ते ऐकू येतंय ना? का तुमचे डोळे, कान फुटलेयत?”

त्याचा आवाज चढल्यावर तो डॉक्टर गप्प झाला. आपल्या सहायकाकडे बघून गालातल्या गालात हसला.

“मला वेडा समजता की काय तुम्ही? माझी परीक्षा का घेत नाही? मी वेडा नाहीय. काय समजलात?”

तो जेवढा आरडाओरडा करीत होता तेवढेच ते सगळे डॉक्टर शांत होते.

“तुम्ही खरंच शहाणे आहात.”डॉक्टर गुळचट हसत म्हणाला, “फक्त तुम्हाला थोडी विश्रांतीची गरज आहे. दोनतीन महिन्यांत...”

“काय म्हणता तीन महिने!” हेन्री बेंबीच्या देठापासून ओरडून म्हणाला, “या वेड्यांच्या इस्पितळात डांबून मला अगदी पार वेडा करून टाकाल तुम्ही. तुमचा विचार काय आहे? मला बरं करायचा की पुरता वेडा करायचा? माझी कोणतीही परीक्षा घ्या. मी तुम्हाला सिद्ध करून दाखवीन की माझं डोकं ठिकाणावर आहे.”

तो मोठ्याने ओरडत होता. एक दांडगट परिचारक आला व त्याला बखोटीला धरून कुत्र्याच्या पिल्लासारखा उचलून घेऊन गेला. त्याची अवस्था अगदी केविलवाणी झाली. कितीही सांगितले, विनवण्या केल्या तरी त्या आरोग्यधामात ते अरण्यरुदनच ठरत होते. बाहेरच्या कोणत्याही माणसाला भेटण्याची त्याला परवानगी नव्हती त्यामुळे त्याला बाह्य जगाशी संपर्क साधणे अशक्य होते. हे सगळे

त्यांच्या उपचारपद्धतीचा भाग आहे हे एकदा लक्षात आल्यावर त्याने आरडाओरडा करणे बंद केले. अगदी मोजके बोलण्याचा त्याने प्रघात ठेवला. थोड्याच दिवसात डॉक्टरांनी त्याच्या फाईलमध्ये तो सुधारत असल्याची नोंद केली आणि त्याला आईला भेटण्याची परवानगी मिळाली. आईला बघताक्षणी हेन्रीला रडू कोसळले.

"ममा! प्लीज मला येथून सोडवा. इथे हे लोक मला ठार वेडा करतील."

"हे बघा. माझा अगदी नाइलाज होता. मी तुम्हाला येथे आणून ठेवलं नसतं तर डॉक्टरांना कायद्याप्रमाणे तुमची रवानगी एखाद्या सरकारी इस्पितळात करावी लागली असती."

"होय ममा, तुमचं खरंय." हेन्री खाली मान घालून शांतपणे म्हणाला. त्याने आईला कसेही करून आपल्याला येथून बाहेर काढायला सांगायचे ठरविले होते. पण त्याच्या लक्षात आले की डॉक्टरांनी तिला त्याची फाईल दाखवली असावी. त्यांच्या उपचार पद्धतीनेच तो बरा होईल हे त्यांनी तिला पटवून दिले असणार. आधीच त्याने तिला भरपूर मनस्ताप दिला होता. त्यात आणखी भर टाकण्याची त्याची इच्छा नव्हती.

"ठीक आहे. तुम्ही भेटलात यातच मला खूप आनंद झालाय. तुम्ही जे काही माझ्यासाठी करतायत ते माझ्या भल्यासाठीच आहे याची मला खात्री आहे."

"रिरी, *माँ पेतीत*, थोडा धीर धरा. यातून तुम्ही लवकरच बरे व्हाल. देवाची करुणा भाकत जा. त्याला सगळं दिसतं."

- ८४ -

मेझाँ द साँते मधून लवकर सुटका होईल याची आशा त्याने जवळपास सोडून दिली होती. शेवटी त्याचा बालमित्र मॉरीस त्याच्या मदतीला धावून आला. मॉरीसला खोलीच्या दारात पाहून हेन्रीला रडू कोसळले. त्यांनी एकमेकांना घट्ट मिठी मारली. मॉरीसने पाठीवर थोपटत त्याला धीर दिला.

“तुला कसं काय सोडलं आतमध्ये.”

“अरे, तुला काय सांगू? एक वेळ इंग्लंडच्या राणीची भेट घेता येईल. पण इथे कोणाला भेटायची परवानगी काढणं म्हणजे महाकठीण काम आहे. एवढ्या चौकश्या, एवढे प्रश्न. एवढे करून शेवटी परवानगी मिळाली नाहीच. मग सरळ पहारेकऱ्याच्या हातावर पन्नास फ्रँक टेकवले आणि आत आलो.”

“हे बघ. तो पहारेकरी मला येथे फार वेळ थांबू देणार नाही. तेव्हा तू मला नक्की काय झालं ते सांग पाहू. वर्तमानपत्रातून आलं होतं तेवढंच मला ठाऊक आहे.”

हेन्रीने त्या दिवशी पाटूने त्याला मादाम ल्युबेतच्या लॉजवर कसं पोचवलं, तो जिन्यावरून कसा पडला ती हकिगत तपशीलवार सांगितली. मॉरीस त्याने काढलेली चित्रे पाहत होता.

“इतक्या वर्षांनी तू सर्कशीची चित्रे काढतोयस? तीसुद्धा कसल्याही संदर्भाशिवाय. फार चांगली जमलीत. ही चित्रे काढणाऱ्या चित्रकाराला जर कोणी वेडा म्हणणार असेल तर मला काय म्हणतील? तू कधी कधी डोकं फिरल्यासारखा वागतोस. पण तेवढ्याने तू काही वेडा होत नाहीस. ते काही नाही. मी तुला येथून लवकरच बाहेर काढीन. ही चित्रे मी घेऊन जाऊ का आमच्या गॅलरीत ठेवायला?”

“वाटल्यास सगळी घेऊन जा, पण मला एकदाचा येथून सोडव.”

“त्याची काही चिंता करू नकोस. दोन-तीन दिवसांतच मी तुला येथून बाहेर काढतो की नाही ते बघ. तुला सोडवण्यासाठी एखादा बाँब वगैरे फोडून मारामरी करावी लागली तरी त्याला माझी तयारी आहे.”

मॉरीस आला होता त्या संध्याकाळी हेन्रीला कलासंचालनयाच्या मंत्र्यांकडून एक पत्र आले. कलावंतांना देण्यात येणाऱ्या पुरस्कारासाठी त्या वर्षी लोत्रेकची निवड करण्यात आली होती. फ्रेंच कलेची आणि संस्कृतीची बहुमूल्य सेवा केल्याबद्दल दर वर्षी लीजन ऑफ ऑनर हा किताब एका समारंभात कलाकारांना दिला जायचा.

चित्रकलेतील नव्या प्रवाहांची दखल घेतली पाहिजे अशा मताच्या मंडळींची वर्णी समितीवर लागली होती. त्यांनी त्या वर्षी एकमताने लोत्रेकची निवड केली. हा बहुमान स्वीकारायला त्याची मान्यता आहे का, अशी विचारणा त्या पत्रातून खास सरकारी भाषेत केली होती. हेन्रीला हा बहुमान वयाच्या अवघ्या पस्तिसाव्या वर्षी मिळत होता. ज्या वयात बहुतेक चित्रकार कोणीतरी आपली साधी दखल घ्यावी म्हणून धडपडत असतात त्या वयात हेन्रीला हा सर्वोच्च बहुमान मिळत होता. स्त्रीच्या प्रेमाला तो अजून पारखा असला तरी प्रसिद्धीची देवता मात्र त्याच्या प्रेमात पडली होती.

हा बहुमान स्वीकारावा की नाही, असा प्रश्न हेन्रीला पडला. स्वीकारला तर वर्तमानपत्रांना एक सनसनाटी विषय चघळायला मिळेल. वेड्या चित्रकाराला लीजन ऑफ ऑनर. एकाच वाक्यात स्तुती व निंदा. झाली तेवढी प्रसिद्धी खूप झाली. परत वर्तमानपत्रातून एखादा रकाना भरून यायला नको. आईला काही फारसे वाटणार नाही. ती तर कोणत्याही सुखदुःखाच्या पलीकडे गेली आहे. पपा. ते तर नक्कीच म्हणतील अश्लील चित्र काढणाऱ्याला लीजन ऑफ ऑनर. चित्रकाराचेच नव्हे तर सरकारचेही डोके फिरलेले दिसतेय. या बातमीमुळे आनंद झालाच तर तो फक्त मिरीयम आणि मॉरीसला झाला असता.

पत्र वाचून विचारात पडलेला पाहून पहारेकऱ्याने विचारले, "काय वाईट बातमी तर नाहीय ना?"

"छे छे. तसं काही विशेष नाही." असे बोलून त्याने पत्राचा बोळा करून तो समोरच्या शेकोटीत टाकला.

दुसऱ्या दिवशी मॉरीस ल फिगारोच्या आर्सेन अलेक्सांद्र या कला समीक्षकाला बरोबर घेऊन आला.

"मी तुला सांगितलं होतं ना, मी काही तरी शक्कल लढवतो म्हणून."

"मला जरा तुमची चित्रं बघायला मिळतील का?" समीक्षक महाशय म्हणाले.

"वा! फारच छान. प्राथमिक रेखाटने, नोंदी वगैरे कोणत्याही पूर्वतयारीशिवाय फक्त आठवणींवर विसंबून एवढं तपशीलवार चित्र काढणं म्हणजे विलक्षणच आहे. विश्वास बसत नाही."

या गोष्टीला मिळालेल्या प्रसिद्धीमुळे थोड्याच दिवसात हेन्रीची विचारपूस करायला त्याच्या मित्रमंडळींची रीघ लागली. मॉरीस, मिसीया, मादाम पोतीएरों, बेर्थ. आर्टिस्ट इंडिपेंडंटसने हेन्री रुसॉच्या नेतृत्वाखाली एक छोटीसी तुकडीच पाठवली. जेन ॲव्हरीलबरोबर तिचा तो कादंबरीकार मित्र भावी दोस्तोयव्हस्की कुठे दिसत नव्हता. त्याऐवजी एक नवा तरुण होता. त्याची एक कवी म्हणून तिने मोठ्या उत्साहात ओळख करून दिली. पुढच्याच महिन्यात प्रसिद्ध होणाऱ्या त्याच्या काव्यसंग्रहाने साऱ्या फ्रान्सला वेड लागणार होते.

"ती कादंबरी म्हणजे एक कंटाळवाणं चऱ्हाट होते. मी पहिलं प्रकरण वाचून त्याच्या प्रेमात पडण्याची घाई केली. पण तेव्हा मला काही कळत नव्हतं." जेन म्हणाली.

"प्रेमातलं की कादंबरीतलं?" हेन्रीने हसून विचारले. "आता कविता तरी नीट समजावून घेतल्यास ना?" मिरीयमचा विषय दोघांनीही टाळला.

दोन दिवसांनी आई आली. "तुम्ही आता काय करायचं ठरवलंयत."

"ठरवण्यात काही अर्थ नाही. मी ठरवतो एक आणि होतं दुसरंच. आता मॉरीस म्हणतोय पुढच्या वर्षी एक शो करूया. तसं झालं तर कदाचित अमेरिकेला जाईन म्हणतो." बोलताना हेन्रीचा चेहरा उजळला होता.

"त्याला अजून खूप वेळ आहे, पण तोपर्यंत काय?"

"येथून सुटल्यावर ताबडतोब मॉरीसचं पोर्ट्रेट करायला घेणार आहे. इतक्या जणांची पोर्ट्रेट केली. मॉरीसचं राहून जायला नको." बोलता बोलता तो गंभीर झाला.

“ते तुम्ही करालच रे. पण तुमचा मुक्काम कोठे असणार आहे?”

“कुठे म्हणजे? मादाम ल्युबेतच्या लॉजवर.”

“तिकडे नको. तुमचं एवढ्या उपचारांनंतर सुटलेलं दारू पिणं तिकडे गेल्यावर पुन्हा सुरू होईल.”

“ममा, झालं गेलं विसरून जा. मी तुम्हाला वचन देतो. मी दारूला पुन्हा स्पर्श करणार नाही.”

“रिरी, मला तुमची फार काळजी वाटते. तुम्ही अगदीच माझ्या जवळ राहायला पाहिजे असे नाही. मी तुमच्या सोबतीला म्हणून एकाला पाठवणार आहे. चालेल ना?”

“तुमचा माझ्यावर विश्वास दिसत नाहीय म्हणून तुम्ही एक रखवालदार पाठवताय. असंच ना?”

“होय रिरी. तुम्हाला सांभाळण्यासाठी एका रखवालदाराचीच गरज आहे.”

- ८५ -

हेन्रीची काळजी वाहण्यासाठी पॉल व्ह्यू या त्याच्या एका लांबच्या चुलत भावाची नेमणूक करण्यात आली. त्यानंतर जवळपास एक वर्ष भर हेन्रीने दारूला स्पर्शही केला नाही. या काळात हेन्री पार बदलून गेला होता. त्याचा एरवीचा शीघ्रकोपी, मनस्वी स्वभाव सौम्य झाला. इतका की मादाम ल्युबेत व पॉलला विचारल्याशिवाय तो काही करीत नसे. प्रकृतीही चांगली राहिल्याने तो उत्साही असे. या काळातच त्याने मॉरीसचे पोर्ट्रेट केले. इतरही अनेक पोर्ट्रेट केली, पण त्यात न्यूड एकही नव्हते. रात्री-अपरात्री भटकणे, चिल्लर कॅफेत तासन्‌तास ठाण देऊन बसणे, फालतू निरुद्योगी लोकांत मिसळणे, वेश्या, नाटकातील नटनट्या वगैरे लोकांबरोबर

रात्र रात्र गप्पा मारत बसणे हे सगळे आता थांबले होते. आईला आपल्या मुलात हव्याशा वाटणाऱ्या सगळया सद्‌गुणांचा संचार त्याच्या वयाच्या पस्तिसाव्या वर्षी का होईना त्याच्यात झाला होता. पण ह्या सद्‌गुणांच्या उदयाने त्याच्या सृजनशक्तीचा स्रोत मात्र लुप्त झाला होता.

ज्या समीक्षकांनी त्याच्या कलेची बंडखोर, रासवट, असंस्कृत अशी संभावना केली होती तेच समीक्षक घर सोडून गेलेला उधळा मुलगा स्वगृही परत आला म्हणून त्याच्या स्वागतासाठी उभे राहिले. सुरुवातीच्या काळात केलेली कित्येक पेंटिंग हेन्रीने कलाविक्रेत्यांना बेफिकिरीने देऊन टाकली होती. अशा विक्रेत्यांनी अडगळीत पडलेली त्याची पेंटिंग शोधून काढली आणि फ्रेम करून भरपूर किमतीला विकली. आता हेन्री एक प्रतिथयश चित्रकार समजला जाऊ लागला. त्याच्या पेंटिंगच्या बनावट नकला व्हायला सुरुवात झाली. हुबेहूब त्याच्या शैलीत काढलेली पेंटिंग त्याची सही ठोकून विकली जात.

(त्या काळात लोत्रेकच्या पेंटिंगच्या एवढ्या नकला झाल्या की मॉरीस ज्वाय्यांने त्याच्या समग्र चित्रांचा एक कटलॉग बनवून प्रसिद्ध केला.)

फिरायला जाताना पॉल व्ह्यू बरोबर असे. कधी लेमोनेड किंवा कॉफी प्यायला एखाद्या कॅफेत गेला की तिथे टोळक्याने गप्पा छाटत बसलेले चित्रकलेचे विद्यार्थी त्याच्याकडे आदराने बघत, जसा हेन्री पूर्वी देगासकडे बघत असे. तो कॅफेत आला की तरुण विद्यार्थी त्याच्या टेबलाभोवती गोळा होत. तोसुद्धा त्यांच्याशी अगदी मोजक्या शब्दात बोले. यशस्वी माणसांच्या बोलण्यात आत्मविश्वासामुळे येणारी किंचित आढ्यता त्याच्या बोलण्यात कधी कधी दिसू लागली. प्रसिद्धीने आपण होऊन त्याच्या गळयात वरमाला घातली होती. पुन्हा एकदा लीजन ऑफ ऑनरचा सन्मान त्याला देऊ करण्यात आला. विसाव्या शतकाच्या आगमनाची जोरदार तयारी फ्रान्समध्ये सुरू झाली. त्याच्यासाठी एक पोस्टर तयार करण्याचे ठरविले होते. हेन्रीला त्या निवड समितीचा प्रमुख करण्यात आले. हेन्रीच्या नावाभोवती एक वलय निर्माण व्हायला हळूहळू सुरुवात झाली होती.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दिवशी साऱ्या पॅरीसभर जल्लोष चालू होता. मुलँ रूजमध्ये एक खास कार्यक्रम ठेवला होता. त्या दिवशी तो बुलेव्हारवरील

आईच्या घरी गेला. व्ह्यूच्या देखरेखीखाली राहायचा त्याला कंटाळा आला होता. रात्रीचे जेवण झाल्यावर कॉफी पिताना त्याने आईकडे विषय काढला.

“आता मी बरा झालोय. गेले वर्षभर मी दारूच्या थेंबालासुद्धा स्पर्श केला नाहीय्. या पॉलला आपण परत आल्बीला पाठवलं तर चालेल काय?”

“हेन्री या विषयावर आपण नंतर बोललं तर चालणार नाही का?”

“ममा, मी तुम्हाला वचन देतो हवं तर.”

“हे बघा. पॉलला पैशांची गरज आहे.”

“तसं असेल तर ठीक आहे.”





(पोर्ट्रेट डावीकडे मॉरिस जॉय्याँ, उजवीकडे पॉल व्ह्यू – तुलूझ लोत्रेक – तैलरंग कॅनव्हास)

- ८६ -

''प्लीज. व्हिक्टर.'' दारुड्या माणसाच्या बरळण्याच्या आवाजाने त्या रिकाम्या कळकट बिस्ट्रोतील शांतता भंग पावली.

''प्लीज. फक्त एकच.'' त्या बरळण्यातून लाचारी व्यत्त होत होती.

''प्लीज. मी तुला दहा फ्रँक देईन. हवं तर शंभर देतो. पण आणखी एकच. प्लीज.''

शेवटी वैतागून व्हिक्टरने त्याच्या ग्लासात ॲबसिंथ ओतली.

''हे बघा मस्य तुलूझ. खूप प्यायलात मगापासनं. आता हा शेवटचा.''

हेन्रीने नेहमीप्रमाणे एका घोटात पेला घशाखाली रिकामा केला. अन्ननलिका जाळत दारू पोटात जाऊन पोचली. मेंदूला झिणझिण्या आल्या. डोळे विस्फारले. समोरचे दृश्य अंधूक झाले. टेबलावरचा संगमरवर डोळ्यांसमोर तरंगू लागला. कानात गुणगुणल्यासारखा आवाज ऐकू येऊ लागला. हेन्री एका हाताने टेबलाची कड पकडत खुर्चीत मागे रेलला. श्वासाची गती मुद्दाम होऊन धीमी करीत तो छातीवरून हात फिरवीत होता. पोटातून वर उसळू पाहणारा पित्तरस तो खाली ढकलण्याचा प्रयात्न करीत होता. थोड्या वेळाने पोटातील मळमळ शांत झाली, पण डोके मात्र भणभणायचे थांबले नाही.

बाहेर पाऊस पडत होता. अशा पावसाळी हवेत त्याची उदासी आणखीनच वाढायची. बिचारा व्ह्यू. पावसात भिजत, थंडीने कुडकुडत त्या आडवेळी हेन्रीला शोधत मोंमार्त्रभर या बिस्ट्रोतून त्या बिस्ट्रोत फिरत होता. हेन्रीला जायला शेकडो गुत्ते मोकळे होते. हेन्री रोज काहीतरी नवी थाप मारून सटकायचा. खूप शोधाशोध केल्यावर एखाद्या बिस्ट्रोत स्वारी झिंगून पडलेली आढळायची. कित्येक वेळा त्याला शोधण्यासाठी पाटूची मदत घ्यावी लागे. मग दोघेही त्याला घेऊन लॉजवर जात. तेथे

मादाम ल्युबेत त्याला कॉफी पाजे व व्ह्यूच्या मदतीने त्याला बिछान्यावर झोपवे. असा कार्यक्रम आता रोजचाच झाला होता.

"मस्य ... मस्य."

हेन्रीने डोके जोरजोरात हलविले. नजर स्थिर करण्याचा प्रयत्न केला व आवाजाच्या दिशेने पाहिले. त्याच्या टेबलाच्या बाजूला केसांच्या झिंज्या झालेली एक वयस्कर स्त्री त्याच्याकडे शून्य नजरेने बघत होती. तिच्या अंगावरच्या मळकट कपड्यांच्या फाटून चिंध्या झाल्या होत्या. तिने एक फाटकी शाल अंगावर पांघरली होती. पावसात अर्धवट भिजल्यामुळे ती थंडीने कुडकुडत होती.

"मला जरा ते देता का?"

हेन्रीला ती काय मागतेय तेच कळेना.

"ती सिगारेटची थोटकं." तिने टेबलावरच्या सिगारेटच्या थोटकांनी शिगोशीग भरलेल्या ॲशट्रेकडे बोट दाखवले, "ह्या थोटकांचे चार पैसे येतात."

दारिद्र्य, दुःख, आयुष्य सगळयाचे शेवटचे टोक तिने गाठले होते. आता याहून अधिक अधोगती म्हणजे ती काय होणार? अशा या परिस्थितीतही तिच्या मागण्यात लाचारी किंवा आशाळभूतपणाचा लवलेशही दिसत नव्हता. तिच्या वागण्यातील थंड अलिप्ततेमुळे तिच्या त्या अवनत अवस्थेतही तिच्या अस्तित्वात एक शान जाणवत होती.

"घ्या." त्याने ॲशट्रे तिच्याकडे सरकविला. "हे पण घ्या."

त्याने खिशात हात घातला. हाताला लागलेली सोन्याचा मुलामा दिलेली सिगारेटकेस त्याने तिला देऊन टाकली.

"तुम्ही काही घेणार का? बसा इथे."

"थोडी रम मागवा."

ती खुर्चीवर बसली. अंगाभोवती गुंडाळलेली फाटकी शाल नीटनेटकी केली. कपाळावर आलेल्या पांढऱ्या केसांच्या बटा तिने मागे सारल्या. तिच्या सध्याच्या हलाखीच्या परिस्थितीला न शोभणारे असे एक विलक्षण मार्दव तिच्या त्या लकबीत होते.

"तुम्ही चित्रकार आहात वाटतं?"

"होय. म्हणजे एकेकाळी होतो. पण तुम्ही कसं ओळखलंत?"

"चित्रकार मला पटकन ओळखता येतात. एकेकाळी बरेच चित्रकार माझ्या परिचयाचे होते."

वेटरने तिच्या समोर रम आणून ठेवली.

*"अ व्होत्र सान्ते मस्य."*

*"अ व्होत्र सान्ते मादाम."* हेन्रीने आपला ग्लास उंचावत मोठ्या अदबीने म्हटले.

तिने सावकाश घोट घेतला. ग्लास टेबलावर ठेवून किंचित मान झटकली. डोळे मिटून मद्याचा आस्वाद घेत स्वतःशीच पुटपुटल्यासारखी म्हणाली,

"तुम्ही मला मादाम म्हणालात. तेसुद्धा मला मादाम म्हणायचे. तुमच्या सारखेच ते सभ्य आणि सज्जन होते. भला माणूस. तुम्ही त्यांचे नाव ऐकलं असेल कदाचित. माने."

"माने. एदुआर माने." एका क्षणात त्याच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. "तुम्ही ऑलिंपिया आहात तर."

"होय. मला ऑलिंपिया म्हणूनच ते हाक मारायचे. माझे खरं नाव व्हित्तोरीना. पण ते म्हणायचे तू माझी ऑलिंपिया आहेस. त्यांनी काढलेलं माझं पोर्ट्रेट तुम्ही बघितलं असेल?"

“बघितलं म्हणून काय विचारता? ते पोर्ट्रेट पाहिलेलं नाही असा माणूस शोधून सापडायचा नाही एवढं ते प्रसिद्ध झालंय. आज त्या पोर्ट्रेटची गणना जगातल्या महान कलाकृतींमध्ये केली जाते.”

“खूप नाटक केलं त्यांनी ते पेंटिंग करताना. तुम्ही असायला पाहिजे होता तेव्हा स्टुडिओत. मी सगळे कपडे काढून कोचावर आडवी झोपले होते. खूप विचार करून त्यांनी एक उशी मला डोक्याखाली घ्यायला दिली. मग त्यांनी एक फूल आणून माझ्या केसात माळलं. तरी त्यांच्या मनाला काही उतरेना. बराच वेळ तसेच टक लावून बघत होते माझ्याकडे. त्यांच्यासमोर नागव्याने पोज द्यायची ती काही माझी पहिलीच वेळ नव्हती. तरीही मला कसंतरीच वाटायला लागलं. तुम्हाला माहितेय कलाकार कसे असतात ते? त्यांच्या मनात काय आहे ते नीट कळतच नाही. तेवढ्यात ते चटकन बाहेरच्या खोलीत गेले. एवढा वेळ विचार करून त्यांनी काय आणलं महितेय? एक काळी रिबीन. त्यांनी ती रिबीन माझ्या गळयात बांधली व म्हणाले आता छान दिसतेयस. तशीच राहा. हलू नकोस. असं म्हणून त्यांनी समोरच्या कॅनव्हासवर चारकोल चालवायला सुरुवात केली.”

ऑलिंपिया. ही समोर बसलेली कळाहीन, चिरगुटे ल्यालेली, बेवारशी भिकारीण. वृद्धत्वाने अकाली घाला घातलेली स्त्री. तारुण्य व सौंदर्य चिरकाळ टिकत नसते. त्याचा विनाश हा अटळ असतो हे सृष्टीच्या विलयाचे तत्त्व आहे. पण त्या विलयातदेखील एवढे भयंकर क्रौर्य कोणाच्या वाटेला येऊ नये. हे विलयाचे तत्त्व थोडा काळ का होइना थांबविण्याचे सामर्थ्य फक्त चित्रकलेतच आहे. त्यामुळेच जीवनापेक्षा कला ही श्रेष्ठ समजली जाते.

“मला आता गेलं पाहिजे. मला अजून खूप थोटकं गोळा करायचीयत. त्याशिवाय मला आजचं जेवण मिळणार नाही. एका किलोचे फक्त साडेतीन फ्रँक मिळतात. पूर्वी चार मिळायचे तेव्हा जरा लवकर जेवायला मिळायचं. सगळीकडे महागाई वाढत चाललीय. आणि इकडे मात्र उलटंच. काय करणार? दिवस मोठे कठीण होत चाललेत. पण जगण्यासाठी काहीतरी केलंच पाहिजे. ड्रिंकबद्दल थँक्स.”

हेन्रीने खिशातून एक नोट काढली व तिच्या हातात सरकवीत तो म्हणाला, ‘‘प्लीज. याचे आभार मानू नका.’’

तिने निर्विकार नजरेने त्या नोटेकडे पाहिले व म्हणाली, ‘‘तेसुद्धा तुमच्यासारखेच मोठ्या मनाचे आणि दयाळू होते.’’

ती आपली फाटकी शाल सारखी करून निघून गेली. हेन्री आता बिस्ट्रोमध्ये एकटाच राहिला होता. त्याने पुढ्यातील ॲबसिंथ संपविली. त्याच्या कानातील गुणगुण वाढली. पोटाचे स्नायू आक्रसू लागले. त्याचा चेहरा वेदनेने पिळवटून गेला.

त्याच्यासमोरचा रिकामा ग्लास छताला टांगलेल्या दिव्याच्या प्रकाशात चमकत जणू त्याच्याकडे पाहून कुचेष्टेने हसत होता.

काही गोष्टी रडतात, काही हसतात, त्याला वाटले.

हा ग्लास, एक यमदूत, आपल्याकडे बघून हसतोय. कारण पिण्यासाठी त्यात दारू शिल्लक राहिलेली नाही.

‘‘तू एक विष आहेस. ॲबसिंथ.’’ हेन्री मोठ्याने ओरडला, ‘‘मी तुझ्यावर थुंकतो.’’

जड झालेल्या जिभेने तोंडातील लाळ कशीबशी गोळा करून हेन्री त्या ग्लासावर थुंकला व उलट्या हाताच्या फटकाऱ्याने ग्लास फरशीवर भिरकावून दिला.



(ऑलिंपिया – एदुआर्द मॅने – तैलरंग, कॅनव्हास, १३०x९० सेमी, १८६३
म्युसे द ओर्से,पॅरीस)

- ८७ -

हेन्री बिस्ट्रोतून बाहेर आला. अंधारून आले होते. पाऊस थांबला होता. उरलेली रात्र कुठे घालवायची त्याचा निर्णय होत नव्हता. एखादी घोडागाडी करावी. गाडीत बसल्यावर काहीतरी सुचेल या विचाराने हेन्री गाडी शोधत पावलोपावली दम घ्यायला थांबत, लडखडत, काठीवर जोर देत पाय उचलत रस्त्याने चालत होता. वाटेत तो पीएर टँग्वीच्या दुकानासमोर नकळत थांबला. त्याने दुकानाकडे पाहिले. नावाच्या पाटीचा रंग केव्हाच उडाला होता. दरवाजा सताड उघडा होता. आत अंधार होता. काउंटरच्या बाजूची कपाटे अजून तशीच होती. फक्त त्यावर भरपूर धूळ साठली होती. भिंतींचा रंग पार उडाला होता. जेथे पूर्वी सेझान, व्हॅन गॉग वगैरे चित्रकारांची पेंटिंग टांगलेली असायची तेवढी जागा आता पेंटिंग नसल्यामुळे ओकीबोकी दिसत होती. एखाद्या वेताळाचे प्रदर्शन भरले असावे अशी अवकळा त्या जागेला आली होती. सेझान, जॉर्ज सुरा, व्हॅन गॉग, पीएर टँग्वी, त्याची बायको सगळे केव्हाच मृत्यू पावले होते. एकटा हेन्री तिथे भुतासारखा उभा होता.

तसाच पाय ओढत तो रू द मर्टीरपर्यंत आला. पाऊस परत भुरभुरायला सुरुवात झाली. चौकात एकही घोडागाडी नव्हती. आयुष्य अशाच लहानमोठ्या आशा-निराशेच्या अभ्यासातून समजून घ्यायचे असते. थंडीने त्याच्या अंगावर शहारे आले. तो तसाच प्लास पिगालपर्यंत चालत गेला. पाऊस गळतच होता. एवढ्यात त्याला एक चुकार घोडागाडी दिसली. तो चटकन आत शिरला. कुठे जावे? बिचारा व्ह्यू. या पावसात त्याला अजून शोधत असेल. त्या साध्या सरळ मनाच्या तरुणाला असा गुंगारा द्यायला नको होता. त्याला वाईट वाटले. पण दारुड्या माणसाचा दारूच्या व्यसनापायी नाइलाज होतो आणि आयुष्यभर मग त्याला सारखे वाईट वाटत राहते. आईबद्दल, मादाम ल्युबेतबद्दल, व्ह्यूबद्दल आणि नंतर स्वतःबद्दल. ओह. जाऊ दे तेल लावत.

''मुलँ रूज.'' त्याने गाडीवानाला सांगितले.

''आता या वेळी अजून उघडले नसेल.''

“अं. मग ल एलीसमध्ये चल.”

“मस्य या भागात तुम्ही नवखे दिसताय. ल एलीस बंद होऊन कित्येक वर्षं झाली.”

“अं. मी विसरलोच होतो. मग आपण गेर द नॉरमध्ये जाऊ.”

घोडागाडी चालू झाली. त्याने खिशातून एक सिगरेट काढली. हातांना थरथर लागली होती. कापणाऱ्या हातांनी त्याला धड काडीसुद्धा ओढता येईना. त्याला वाटले पूर्वीपेक्षा आता थरथर वाढली आहे. कशीबशी एकदाची काडी ओढून त्याने सिगरेट शिलगावली. एक खोल झुरका घेतला. अर्ध्या रस्त्यावर बेत बदलून गाडी ल नुव्हेलकडे घ्यायला सांगितली. गाडी परत मागे वळून प्लास पिगालवरील ल नुव्हेलच्या रस्त्याला लागली. पावसाने भिजलेल्या रस्त्यावर घोड्याच्या खुरांचा पचक पचक आवाज येत होता.

गाडी ल नुव्हेलसमोर येऊन उभी राहिली. पण हेन्रीला खाली उतरावेसे वाटेना. आत जाऊन करणार काय? एक वयस्कर गृहस्थ शांतपणे पेपर वाचत बसला होता. चित्रकलेच्या विद्यार्थ्यांचा गोंगाट चालू होता. क्वार्दुरॉयचे जाकीट व तुमानी घातलेले मध्यमवयीन बेकार लोक आपले आयुष्यातील अपयश ॲबसिंथमध्ये बुडवीत बसले होते. जुन्या आठवणींची भुते जागोजागी तरंगत होती. रॅचो, ज्युली, व्हिन्सेंट आणि हेन्री स्वतः.. लिओनार्दो, मी तुझ्या थोबाडावर थुंकतो, *नॉम दे दियू, मेर दलोर*. सगळे काही भूतकाळात जमा झाले होते. वातावरणात मेलेल्या शब्दांचा कुजका वास येत होता. त्याने गाडी परत गेर द नॉरकडे घ्यायला सांगितली.

“सावकाश घे. काही घाई नाहीय.”

गाडी चालू झाली. एकदा त्याला मिसीया नातानसोनकडे जावेसे वाटले. बऱ्यात दिवसांत भेटलेली नाहीय. तिने स्वागत नक्कीच केले असते. पण त्यात पहिल्यासारखा आपलेपणा नसण्याची शक्यता होती. वेड्यांचे इस्पितळ किंवा तुरुंग यातून माणूस बाहेर आला तरी लोकांना वाटते की तो परत वेड्यासारखे चाळे करू लागेल नाही तर घरातल्या किमती वस्तू खिशात घालेल. त्याला ऑस्कर वाईल्डची

आठवण झाली. समसंभोगी असल्याच्या आरोपावरून त्याला तुरुंगात पाठवले होते, पण त्याची खरी शिक्षा तो तुरुंगातून सुटल्यावरच चालू झाली. एरवी दयेच्या नावाने नारा पिटणारे ख्रिश्चन जग त्याच्या बाबतीत केवढे निष्ठुर व निर्दयतेने वागले. त्या अवहेलनेतून अखेर मृत्यूनेच त्याची सुटका केली. साध्या देवदाराच्या शवपेटीत तो केवढा रुबाबदार वाटत होता. ना हार ना तुरे, ना फुले ना गुच्छ. फक्त गळयात रोझरी व छातीवर सेंट फ्रान्सिसचे पदक.

मिसीया नातानसोनकडे जाण्यात काही अर्थ नाही. ले फोली बर्जेर, ल एलदोरॅदो, ल रीश, मॅक्झीम्स्, सर्कस. छे, कुठेही जाण्यात त्याला रस वाटेना. ऑपेराला गेले तर तेथे मिरीयमच्या आठवणींचे भूत मानेवर बसले असते. आता उरलेले ठिकाण म्हणजे ल फ्लूर ब्लां. तेथे त्याला ओळखणारे आता कोणीही राहिले नव्हते. बेर्थशिवाय पेरॉक्के ग्रीमधल्या मरगळलेल्या वातावरणात त्याला मळमळायला झाले असते.

आता आजची रात्र कशी आणि कुठे घालवणार? त्याच्यापुढे मोठा यक्षप्रश्न उभा राहिला. आजचा प्रश्न सुटला तरी उद्या, परवा, तेरवा काय करायचे हा प्रश्न होताच.

निराशेने त्याने आपला चेहरा दोन्ही हातांनी झाकून घेतला. खाली वाकून तोंड गुडघ्यात खुपसले, दुःखाच्या कढाने त्याचे सर्व शरीर गदगदले. 'ममा... ममा..' तो अस्फुट हुंदके देत रडू लागला.

'ममा... ममा...' खोल गर्तेत पडून भयाकुल होऊन तो आईला साद घालत होता. नुसती हाक मारण्याने त्याच्या मनाला दिलासा मिळाला. मृत्यूच्या भयाने त्याला ग्रासले. काखेत फ्लेगच्या गाठी आढळल्यावर माणूस जसा गर्भगळीत होतो तसे त्याचे झाले. आता असे झटके वारंवार येणार होते. शरीरावर वर्षानुवर्षे केलेल्या अत्याचाराच्या परिणामाने सर्व इंद्रिये मोडकळीस आली होती. मृत्यू कणाकणाने शरीराला ग्रासत होता. डोळे जड होतील व मिटतील. परत आपण डोळे उघडून हे जग पाहू शकणार नाही. श्वास हळूहळू मंदावत जाईल. हृदयाची धडधड थांबेल. मग

आपले पार्थिव शरीर जमिनीत खोल गाडले जाईल. सडण्याच्या दुर्गंधीने कोणा जीवित व्यक्तींना त्रास होऊ नये म्हणून.

मृत्यूच्या क्षणिक दर्शनाने एक विचित्र गोष्ट घडते. इतका वेळ ज्या गोष्टी महत्वाच्या वाटत असतात त्यांचे महत्त्व आता वाटेनासे होते. आपल्या अवतीभवतीचे बरेचसे लोक आपल्याला विसरून जातील, त्यांचे आपल्यावाचून काहीही अडणार नाही याची जाणीव होते. मग लख्ख प्रकाशात काही गोष्टी नव्याने दिसू लागतात.

पहिली गोष्ट म्हणजे जर मरायचे असेल तर आपल्याला मोंमार्त्रमध्ये मरून चालणार नाही. तुलूझ लोत्रेकांच्या शेवटच्या वंशजाला एखाद्या बिस्ट्रोमध्ये, घोडागाडीत नाही तर गटाराच्या कडेला मृत्यू आला तर कसे दिसेल?

दुसरी गोष्ट म्हणजे मरण्यापूर्वी काही ऋणे फेडली पाहिजेत. ज्या काही मोजक्या लोकांनी माझ्यावर निरपेक्षपणे माया केली... मॉरीस, मादाम ल्युबेत, पाटू आणि बेर्थ. त्यांच्यासाठी काहीतरी करायला हवे.

उद्याच या सर्वांचे आभार मानून घेऊ. माझ्यासाठी ज्यांनी खस्ता काढल्या, मनस्ताप भोगला त्याची भरपाई करणे तसे कठीण असले तरी शब्दांनी, थोड्या फार पैशांनी, जेवढे जमेल तसे काहीतरी केले पाहिजे. मॉरीस आणि पाटूच्या बाबतीत पैशांनी काही करणे तसे कठीण होते. पैशांचा त्यांना काही उपयोग नव्हता असे नाही. पण पैशांनी काही केले तर लोकांचा गैरसमज होतो. आयुष्यभर सर्वजण पैसे मिळवण्यासाठी धडपडतच असतात, पण कोणी कृतज्ञतेपोटी आपल्याला पैसे दिले तर त्याने अपमानित व्हायला होते.

बेर्थ कदाचित समजून घेईल की हे पैसे म्हणजे तिने जे दिले त्याची किंमत म्हणून दिलेले नाहीत तर तिच्या ऋणाची अल्पांशाने केलेली परतफेड म्हणून आहेत. मादाम ल्युबेतला समजावणे मोठे कठीण होते. शेवटी गरीब घ्या किंवा श्रीमंत घ्या. कोणीही काही द्यायचे झाले तर आपल्याकडे असलेली गोष्टच देणार.

सर्वात शेवटी त्याला आईची क्षमा मागायची होती. आयुष्याची दोरी थोडी लांबली असती तर उरलेला जो काही काळ मिळाला असता तो तिच्या सहवासात

काढायचे त्याने ठरवले. आपले तिच्यावर केवढे प्रेम आहे ते सिद्ध करण्याचा प्रयत्न करायला हवा. तिने त्याच्यासाठी जे काही केले त्यातून उतराई होणे त्याला शक्य नव्हते तरीही तिला जे दुःख आणि जो मनस्ताप त्याने आतापर्यंत दिला त्याबद्दल सुचतील त्या शब्दांत क्षमा मागायचे त्याने मनोमनी ठरवले.

- ८८ -

दुसऱ्या मजल्यावरील हेन्रीच्या खोलीतून येणारा उजेड सोडला तर मार्लोम येथील घर अंधारात बुडून गेले होते.

"मला वाटतं आज रात्री त्यांना चांगली झोप लागेल." लोत्रेक कुटुंबीयांचे वृद्ध डॉक्टर हेन्रीची नाडी तपासत म्हणाले. त्यांच्या बाजूला काउंटेस उभ्या होत्या.

"पक्षाघाताचा झटका आल्याने त्यांना यापुढे फारशा वेदना होणार नाहीत. एका परीने झालं ते बऱ्यासाठीच झालं असं म्हणायचं."

नाडी तपासून झाल्यावर त्यांनी त्याचा कृश हात अलगद बिछान्यावर ठेवला.

"मादम्वाझेल कॉम्ते. तुम्ही जरा तुमच्या खोलीत जाऊन पडा. मला वाटतं तुम्हाला विश्रांतीची खूप गरज आहे."

म्हातारा नोकर जोसेफ खाली दरवाजात त्यांची वाट बघत उभा होता. डॉक्टरांना मॅकिंटॉश घालायला मदत करताना त्याने हेन्रीच्या प्रकृतीची चौकशी केली.

"फारशी सुधारणा म्हणता येणार नाही. या झटक्यातून वाचले हेच मोठे आश्चर्य आहे. पण आता काही फार दिवस उरलेयत असं मला वाटत नाही. काउंट साहेबांची काही बातमी?"

जोसेफने मान हलवली.

"जेवढ्या लवकर येतील तेवढं बरं." गाडीत चढता चढता वृद्ध डॉक्टर म्हणाले.

काउंटेस हेन्रीकडे टक लावून त्याचे शेवटचे रूप आपल्या स्मृतीत साठवून घेत होत्या. फिकुटलेला चेहेरा, करडे पडलेले केस, विस्कटलेल्या दाढीखाली लपलेले आत गेलेले गाल, डोळयांखाली पडलेली काळी वर्तुळे, पांघरुणाबाहेर आलेला कृश हात, हाडांवर ताणून बसवलेल्या एखाद्या रबरी हातमोजासारखी दिसणारी त्वचा. नाकपुड्यातून चाललेला अनियमित, मंद श्वास. सगळी लक्षणे मृत्यू अगदी समीप आल्याचे दाखवीत होती.

हेन्री परत आला होता. आपल्या शेवटच्या दिवसांत हेन्रीने आपल्या भावनाशील स्वभावानुसार आईवरील प्रेम व्यक्त करण्याचा परोपरीने प्रयत्न केला होता. त्याच्या प्रत्येक शब्दातून, हास्यातून, नजरेतून त्याला वाटणारा पश्चाताप व्यक्त होत होता. विझण्यापूर्वी ज्योत जशी मोठी होते तसे हेन्रीचे आईवरील प्रेम अत्यंत उत्कटपणे उफाळून येत होते.

अजून काउंट अल्फान्सो का आले नाहीत? हेन्री फार तर दोन किंवा तीन दिवस काढेल. वडिलांच्या भेटीशिवायच हा देवाघरी जाईल का?

कसा एखाद्या लहान मुलासारखा दिसतोय. तो वरवर निराश झाल्यासारखा वाटतोय पण शेवट जवळ आला तरी आतून त्याचे अंतःकरण एखाद्या लहान मुलासारखे निर्मळ आणि कोमल आहे. बिचारा रिरी. तो प्रेमाचा भुकेला होता. पण दैव असे क्रूर की त्याच्या वाटेला प्रेमाचा ओलावा कधी आलाच नाही. त्याने या जगात कोणाला त्रास दिला असेल तो स्वतःलाच.

हेन्रीने डोळे उघडले तेव्हा उजाडायला खूप अवकाश होता. खिडकीतून दिसणारे जांभळट रंगाचे आकाश रात्र संपत आल्याचे दर्शवीत होते. ताऱ्यांचा प्रकाश मंद झाला होता. पूर्वी अशा वेळेला तो गाडीवानाला सांगायचा, ‘चलो. २१ रू कुलँकूर. वाटेत लागणाऱ्या पहिल्या बिस्ट्रोकडे थोडा थांब.’ या वेळी गुत्ते बंद व्हायला येत. रस्त्यावरची रात्रीची वर्दळ ओसरलेली असे. सर्वजण घरी परतून झोपायच्या बेतात असत. त्याच वेळी दुसरीकडे दिवसाच्या व्यवहारांना सुरुवात झालेली असे. भाजी विक्रेत्यांच्या ढकलगाड्या लेझ हॉल्सच्या दिशेने खडखड करीत धावू लागलेल्या

असत. मारीसुद्धा अशीच एखादी ढकलगाडी ढकलत बाजाराच्या दिशेने चालली असेल. कदाचित अजूनही तिला जाग आली नसेल आणि एखाद्या बाकड्यावर अंगाचे मुटकुळे करून झोपली असेल. कदाचित... कदाचित एव्हाना या जगातून गेलेली असेल. अकरा वर्षांच्या काळात काहीही घडू शकते.

जोसेफला खुर्चीत बसल्या बसल्या झोप लागली होती. या वयात त्याला असे जागायला लागायला नको होते. काउंटेस एक परिचारक ठेवत होती. पण आपले इमान दाखवण्यासाठी त्याने परिचारक ठेवू दिला नाही. जणू काही सर्व आयुष्य लोत्रेकांच्या सेवेत घालवल्यावर त्याच्या इमानदारीवर कोणाला शंका येणार होती. आईच्या अंगात तर कसलेही त्राण राहिले नव्हते. तिचा चेहेराच मूकपणे सगळे काही सांगत होता. एवढे दुःख, शारीरिक व मानसिक थकवा क्वचितच कोणी भोगला असेल.

आपल्या मरणामुळे आपल्या भोवतालच्या सर्व व्यक्तींना त्रास होतोय हीच मरण्यातील सर्वात दुःखद गोष्ट असते. मी माझ्या कृतीमुळे अंथरुणावर खिळून आहे. मी यातून बरा होण्याची कोणतीही शक्यता नाही. तुम्ही माझ्यासाठी घेतलात तेवढा त्रास पुरे आहे. आणखी कोणताही त्रास तुम्ही घेऊ नका, असे सांगूनही फायदा नव्हता. त्यापेक्षा पक्षाघाताच्या पहिल्या झटक्यातच मृत्यू आला असता तर किती बरे झाले असते. तेव्हा नाही तर आज अगदी या क्षणी मरण आले तर किती बरे. बिचारी आई. तीही एकदाची सुटेल. आपल्या लाडक्या लेकाच्या मृत्यूचे दुःख कमी व्हायला थोडा अवधी लागेल. पण मनावरचा ताण तरी ढिला होईल. शिवाय जोसेफला असे अवघडल्या स्थितीत खुर्चीत बसून झोपावे लागणार नाही.

सततच्या प्रतीक्षेमुळे मृत्यूची भीती त्याला वाटत नव्हती. तो शांतपणे पडून वाट बघत होता. देवाशी त्याने समझोता केला. आईला सुखी ठेव. तिने त्याच्यासाठी एवढ्या खस्ता खाल्ल्या, प्रार्थना केल्या होत्या की त्यातून उतराई होणे त्याला शक्य नव्हते. तिचे उर्वरित आयुष्य शांततेत जावो एवढी एकच मागणी त्याने देवाकडे केली.

मृत्यू दिसू लागला की काही गोष्टी नव्याने उमगू लागतात. सत्याच्या ज्ञानापेक्षा आता गरज असते ती शांततेची. बुद्धिवादाने थकून जायला होते. बुद्धीची कास धरल्याने जीवनातील काव्य हरवून बसते. बुद्धीने सगळ्या गोष्टी जाणता येतातच असे नाही. शिवाय ज्या गोष्टी कळतात त्या गोष्टी न कळल्या तरी त्यात बिघडण्यासारखे

फारसे काही नसते. आयुष्यातील सर्वच गोष्टींचा निव्वळ बुद्धीच्या निकषांवर खुलासा करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे पायाच्या चवड्यांवर उभे राहण्यासारखे असते. जेव्हा आपण तरुण असतो, अंगात रग असते तेव्हा ते शक्य असते, पण जेव्हा माणूस गलितगात्र होऊन अंथरुणाला खिळतो तेव्हा विश्वासाच्या बिछान्याची मऊशार ऊब हवीशी वाटू लागते. पैलतीरी जाण्यासाठी मदतीच्या हाताची गरज भासू लागते.

पक्षाघाताचा झटका येण्याच्या दोन दिवस अगोदर हेन्रीने पाद्र्याकडे कबुलीजबाब दिला. रात्रीचे जेवण झाले होते आणि गच्चीवर सर्वजण गप्पा मारीत बसले होते. स्वच्छ चांदणे पडले होते. त्या चंदेरी प्रकाशात पॉपलर वृक्ष चमचमताना दिसत होते. मंद उन्हाळी वारा वाहत होता. कीटकांची किर्रकिर्र चालू होती. हेन्रीने पाद्री ॲबे सुलॉकला हळूच आपल्या बाजूला बोलवून घेतले व आपली सर्व जीवनकहाणी त्याच्यासमोर उघड केली. अर्थात त्याने ती लपवून कधीच ठेवली नव्हती. आयुष्यात आलेल्या स्त्रिया, बिस्ट्रोमधील बेताल मद्यपान, वेश्याघर. गंमत म्हणजे ह्या गोष्टी सांगताना त्यात आपण काही पापकृत्य केल्याची भावना नसल्यामुळे त्या अगदी क्षुल्लक व किरकोळ वाटू लागल्या.

- ८९ -

पहाटवाऱ्याच्या झुळुकेत त्याचा डोळा लागला. जाग आली तेव्हा दिशा फाकल्या होत्या. आकाशाचा रंग गुलाबी झाला होता. रात्र आपल्याबरोबर चांदणे घेऊन निघून गेली होती. दूरवर कोंबडा आरवल्याचा आवाज ऐकू आला. जोसेफ डोळे चोळत उठला.

‘‘*बाँज्यूर* जोसेफ, झोप चांगली लागली का?’’ हेन्री त्याच्याकडे बघत म्हणाला.

‘‘सॉरी मस्य. माझा नुकताच डोळा लागला.’’

‘‘तू थकलायस. हे सगळं घरच थकलंय माझ्यामुळे. जरा जवळ ये. मला उठव आणि माझा चष्मा मला दे.’’

जोसेफने जवळ जाऊन हेन्रीला अलगद उठवून बसते केले आणि त्याला चष्मा दिला.

‘‘तू अजून आहे तसाच आहेस. काही बदलला नाहीस. तुला आठवतंय, माझ्या लहानपणी, आमच्या फाँतेन्समधल्या घरी तू मला सकाळी उठवायला यायचास आणि मी झोपेचे सोंग घेऊन पांघरूण घेऊन पडून राहायचो. जरा इकडे बस. मला तुझ्याशी काही बोलायचंय.’’

‘‘डॉक्टरांनी सांगितलंय की जास्त बोलू नका. त्रास होईल तुम्हाला.’’

‘‘काही हरकत नाही. आता फार दिवस उरले नाहीयेत. हे बघ. मी गेल्यावर आईची काळजी घे. सारखा तिच्या जवळ राहा. तिने बोलावले नाही तरी काही तरी निमित्त काढून तिच्या खोलीत जा. तिला पांढरे गुलाब खूप आवडतात. रोज सकाळी तिच्या खोलीत ताजी फुले ठेवायची व्यवस्था कर.’’ बोलण्याच्या श्रमाने त्याला धाप लागली. दम घेण्यासाठी त्याने डोळे मिटले.‘‘जा खाली जाऊन कॉफी वगैरे घेऊन ताजातवाना हो.’’

जोसेफ त्याला सोडून खाली जाण्यास नाखूष होता.

"काही घाबरू नकोस. तुझ्या गैरहजेरीत मी काही मरत नाही."

त्या दिवशी हेन्रीला थोडे बरे वाटले. त्याने दोन चमचे खीर घेतली. दुपारी त्याला भेटायला सगळे जुने नोकरचाकर जमा झाले. ॲनेत व ऑगस्टने त्याला अंगाखांद्यावर खेळवले होते. ते आल्बीहून सकाळीच आले होते. संध्याकाळी आई त्याच्या उशाशी काहीतरी विणकाम करीत बसली होती.

"आज दिवस कोणता?" त्याने क्षीण आवाजात विचारले.

"रविवार. ८ सप्टेंबर."

"ममा, आज माझ्यामुळे तुम्हाला चर्चमध्ये प्रार्थनेला जाता आलं नाही."

"काय *माँ पेतीत*?" तो काय बोलतोय ते तिला नीट ऐकू आले नाही.

"डेनिसचं पुढे काय झालं? तिचं लग्न झालं का?"

"होय. तिचा नवरा नेव्हीमध्ये ऑफिसर आहे. तीन मुलं आहेत त्यांना."

"ममा, आमचं थोडं चुकलंच..."

आईने ओठांवर बोट ठेवले व त्याला पुढे बोलू दिले नाही. त्याने डेनिसच्या आठवणी चाळवण्याचा प्रयत्न केला. पण तिचे केस आईच्या केसांसारखेच ऑबर्न रंगाचे होते यापलीकडे त्याला काही आठवेना. आयुष्याची अखेर दिसू लागल्याने पूर्वस्मृती अंधूक व्हायला लागल्या होत्या.

अर्धवट झोपेत त्याला एक स्वप्न पडले. खेड्यातील बालपण, पॅरीसमधील नवीन शाळा, मॉरीस, आजारपण, उपचारासाठी केलेली भटकंती, ॲतेलीए, रॅचो, मोंमार्त्रमधल्या धोबिणींचे धुणी बडविणे, ल नुव्हेल, मुलँ रूज, मिसीया नातानसोनकडील पार्टी. अशा एकमेकांशी विसंगत दृश्यांची मालिका त्याच्या

डोळयांसमोरून सरकत होती. मधेच आई शेजारी बसलीय याची जाणीव व्हायची. आपण मेल्यावर आपल्या वापरातल्या वस्तूंचे, कपड्यांचे काय होईल याचा विचित्र विचार त्याच्या डोक्यात तरळून गेला. मोठ्या माणसाचे पण एवढ्या लहान मापाचे कपडे आणि वेताची काठी. आपल्यासारख्याच दुसरा कोणी बुटका मिळाला तरच यांचा उपयोग होईल. आता त्या रंगांच्या ट्यूब पिळून रंग कोण काढणार? ब्रश, पॅलेट, नाईफ, इझल. सर्व काही अडगळीत पडून राहील.

‘‘ममा.’’ त्याने क्षीण आवाजात हाक मारली. ‘‘तुम्हाला माझे ते जपानी चित्रांचे पुस्तक कुठे आहे ते माहीत आहे ना? त्याची नीट काळजी घ्या.’’

‘‘माझ्या सगळया पेंटिंगची व्यवस्था मी मॉरीसला बघायला सांगितली आहे.’’

त्याने केलेली तैलरंगातील पेंटींगची संख्याच काही शेकड्यात भरली असती. शिवाय असंख्य ड्रॉइंग्ज, स्केचेस, वॉटर कलर्स, सँग्वाईन्स, लिथोग्राफ्स, चारकोल, पेन आणि इंक. त्याला नावे ठेवणाऱ्या लोकांनी त्याची ही प्रचंड निर्मिती पाहिली असती तर त्यांना हेन्रीला किमानपक्षी लोफर म्हणणे तरी सोडून द्यावे लागले असते.

‘‘ममा-’’ पुन्हा आईने तोंडावर बोट ठेवलेले पाहून तो म्हणाला, ‘‘मला थोडा वेळ बोलू दे. शेवटचंच. मग मी गप्प बसेन. कायमचा...’’

‘‘एक विचारू? तुम्ही तुमच्या लहानपणी अगदी चांगले वागायचात का?’’

तिने हातातील विणकाम बाजूला ठेवले व म्हणाली, ‘‘नेहमी नाही. कधी कधी मीसुद्धा दंगा करायचे. सगळी मुलं करतात तशी. राजे आता झोपा बरं.’’

तेवढ्यात जोसेफने दरवाजावर टकटक केले व आत आला.

‘‘तार. मादाम ल कॉम्तेस.’’ जोसेफने लिफाफा तिच्या हातात दिला.

‘‘काय आहे?’’ हेन्रीने विचारले, ‘‘पपांची तार आहे का?’’

“मॉरीसची. तुम्हाला वाचून दाखवते.” तिने खुर्ची बिछान्याजवळ ओढून घेतली व लिफाफा उघडून वाचायला सुरुवात केली.

“तुमच्या पेंटिंगचा कामोंदोकडे असलेला संग्रह सरकारने लुवरसाठी म्हणून विकत घेतलाय. यू आर इन, हेन्री.”

“द लुवर...” घशाशी आलेला आवंढा गिळत तो म्हणाला, “नक्की लुवर असंच आहे ना तारेत?”

अचानक अत्यानंदाने तिला रडू आले. तिने खाली वाकून त्याच्या गालाचे, कपाळाचे पटापट मुके घेतले.

“रिरी. मला कळायला हवं होतं. मला तुमची कला, तुमची लायकी शेवटपर्यंत कळलीच नाही. मला इतका आनंद झालाय म्हणून सांगू.”

“ममा, खरं सांगा? तुम्हाला माझा अभिमान वाटतो का?”

“होय रिरी. खरंच. मी तुमची आई आहे याचा मला खूप अभिमान वाटतोय.”

“द लुवरचा मान सॅलाँपेक्षा खूप मोठा आहे ना?”

“ममा, मी खरं सांगतोय. तुमचा तेव्हा विश्वास बसला नसता. सॅलाँसाठी निवड व्हावी म्हणून इकॅरसवर मी खूप मेहनत घेतली होती, पण हा आजचा मान त्यापेक्षा फार मोठा आहे. नाही का?” त्याचा आवाज कापरा होत हळूहळू खोल गेला. घशातून अर्थहीन घरघर ऐकू येऊ लागली. त्याचे ओठ हलत होते.

पहाटेची वेळ झाली तरी काउंट अजून आले नव्हते. जोसेफ खिडकीतून बाहेर नजर लावून उभा होता. आई वाकून त्याच्या कानाजवळ तोंड नेऊन त्याला धीर देत होती.

“रिरी. *माँ पेतीत*. थोडा धीर धरा.”

ॲनेतच्या हातात रोझरी होती. तिचा एक मणी तोंडाजवळ नेऊन ती मुसमुसून रडत होती. समोर येऊन उभ्या राहिलेल्या मृत्यूचे स्वरूप हे असे होते. फुप्फुसांच्या स्पंदनातील जोर हळूहळू कमी होत चालला होता. घशातून घरघर असा आवाज येत होता. शरीरातील सर्व शक्ती क्षीण होत चालल्या होत्या. शुद्ध हरपू नये म्हणून मेंदूला तारेवरची कसरत करावी लागत होती. फुप्फुसात हवा शिरली की आकाशात भरारी मारणाऱ्या पतंगासारखे वाटायचे. हवा बाहेर आली की गोता खाल्ल्यासारखी अवस्था व्हायची. पुन्हा हवा पाठीवर भरून घेऊन पतंग वर उडेल याची खात्री नसल्याप्रमाणे. जीवनाचा धागा केव्हाही तुटेल इतका नाजूक झाला होता.

'पपा, लवकर या पपा. आणखी एक श्वास मला घेऊ दे. हे मृत्यो, थोडी दया कर माझ्यावर. थोडा वेळ थांब.'

श्वास घेण्याची धडपड चालू असताना त्याला कोंबडा आरवलेला ऐकू आला. त्याच्या आयुष्यात आणखी एक दिवस उजाडला होता. सप्टेंबरमधील एक सुरेख दिवस. निरभ्र आकाश, प्रसन्न हवा. त्याच्या आईच्या चेहऱ्यावर वाट पाहण्याचा विलक्षण ताण पडलेला दिसत होता. एवढ्यात बाहेरून आवाज ऐकू आला. फाटक उघडल्याची परिचित किरकीर, मागोमाग घोड्याच्या टापा.

''पपा आले.''

बोर्दोमार्गे येताना गाडी चुकल्यावर पुढच्या गाडीची वाट न बघता काउंटनी सरळ घोड्यावर मांड ठोकली होती. दिवसरात्र चौखूर दौड करीत ते आले. लोत्रेकांच्या कुळाची बिरुदावली लावणारे ते एक खरेखुरे सरदार होते. त्या अखेरच्या सरदाराने घोडदौडीतील आपले सारे कौशल्य पणाला लावून वेळ गाठली होती. तुलूझ् लोत्रेकांच्या शेवटच्या वंशजाला तो शेवटच्या घटका मोजत असताना भेटण्याची.

खालच्या मजल्यावरूनच काउंटचा भरदार आवाज वर ऐकू आला, ''मला उशीर तर झाला नाही ना?''

दुसऱ्या क्षणी काउंट खोलीचा दरवाजा धाडकन उघडून आत आले. कपडे चुरगळलेले, बुटांवर चिखलाचा थर, चेहरा धुळाने माखलेला. हातातील चाबूक अजून

तसाच. त्या अवतारातही त्यांच्या चेहऱ्यावरील दुःख स्पष्ट दिसत होते. धापा टाकीत हेन्रीच्या कानाजवळ तोंड नेत ते म्हणाले,

“मला माफ कर बेटा.” त्यांनी त्याच्या कपाळाचे हळूच चुंबन घेतले आणि त्याच्याकडे डोळे भरून पाहिले. त्यांनी जर त्यांच्या कुरूप खुज्या मुलाला वेळीच समजून घेतले असते, पण हा तरचा प्रश्न झाला. आता त्याला खूप उशीर झाला होता. कदाचित मुलाच्या मृत्यूने काउंट आणि काउंटेस आपले मतभेद विसरून उरले आयुष्य एकमेकांच्या सहवासात घालविण्यास तयार झाले असते. दोघांचेही वय झाले होते आणि या वयात दोघांना एकमेकांच्या सोबतीची गरज होती.

काउंट ताठ उभे राहिले आणि आपल्या पत्नीकडे वळून म्हणाले, “अेदल. मला तुमचीसुद्धा माफी मागायला हवीय.”

दोन पावले मागे सरकून त्यांनी तिला डोळयांनी खुणावून हेन्रीच्या जवळ जाण्याचा इशारा केला. “त्यांच्याजवळ जा. त्यांना तुम्ही हव्या आहात.”

आई त्याच्या जवळ गेली. आता त्याला फक्त आईचा चेहरा दिसत होता. त्याच्या डोक्यावरून हात फिरवीत ती म्हणाली, “*माँ पेतीत*, झोपा आता.”

तिचे गाल अश्रूंनी भिजून चिंब झाले होते. पण तिचा चेहरा मुलाच्या अभिमानाने फुलून आला होता. तिच्या ओठांवर किंचित स्मित होते.

आता उगाच धडपडण्यात काय अर्थ आहे? आईचा चेहरा त्याच्यापासून दूर जातोय असा त्याला भास झाला. उगवत्या सूर्याचे किरण खिडकीतून आत येत होते, पण त्याच्या नजरेसमोर अंधारून येत होते. हा अंधार आतून उगवत होता.

“ममा. अदियू ममा.”



(वर्देले सिमेटरी मधील हेन्री तुलूझ लोत्रेकची कबर)

## उपसंहार


लोत्रेकने प्रामुख्याने पॅरीसच्या गावकुसाबाहेरील जगाचे चित्रण केले. स्वत:ची अशी खास शैली निर्माण करण्यात तो यशस्वी झाला. आपल्या व्यंगामुळे आपली हेटाळणी होते असे जरी त्याला वाटत असले तरी त्याचा मित्र परिवार खूप मोठा होता. त्याच्या परीचितांमध्ये तो लोकप्रिय होता. त्याची चित्रकार म्हणून प्रस्थापित होतानाची धडपड, त्याचे आणि वडिलांचे ताणलेले नाते या पार्श्वभूमीवर त्याचे आणि आईचे परस्परांवरचे अतूट प्रेम यांनी ही कहाणी हृदयस्पर्शी होते.

या कादंबरीतील सगळया व्यक्तिरेखा ह्या खऱ्या आहेत. लोत्रेकने स्वत: त्यातील बऱ्याच जणांची पोर्ट्रेट केली आहेत. पीएर ल मूरने थोडे फार लेखकाचे स्वातंत्र्य घेतले असले तरी कादंबरी बऱ्याच प्रमाणात लोत्रेकच्या जीवनाशी प्रामाणिक आहे. या कादंबरीतील बहुतेक व्यक्तिरेखांचा कथानकाच्या ओघात परिचय होत असला तरी लेखकाने काही वेळा वाचकाला ते माहित असावे असे गृहित धरले आहे. पॉल गोगँ, व्हॅन गॉग, देगास, सेझान, जॉर्ज सुरा, हेन्री रुसॉ, ऑस्कर वाईल्ड, प्रिन्स ऑफ वेल्स, ड्रेफ्युज, एमिल झोला सारख्या ऐतिहासिक व्यक्तिंचा परिचय जिज्ञासूंनी इंटरनेटवर करून घेतला तर त्यांच्या आनंदात भर पडेल.

बोहेमियन जीवनशैली आणि अतिरीक्त मद्यपान यामुळे बदनाम झालेल्या लोत्रकेने आपल्या अवघ्या छत्तीस वर्षांच्या आयुष्यात जी प्रचंड निर्मिती निर्मीती केली ती पाहून आपण थक्क होतो. आयुष्य कितीही झोकून दिले तरीही लोत्रेक आपल्या कलेशी सदैव प्रामाणिक राहिला. त्याचं एकूण जीवनावर आणि मुख्य म्हणजे माणसांवर विलक्षण प्रेम होतं आणि ते त्याच्या पेंटींगमध्ये दिसून येतं. त्याने आपल्या सभोवतालच्या व्यक्तींचे चित्रण मोठ्या सहानभूतीने केलं. लोत्रेक आज लक्षात राहतो तो त्याच्या जीवनदृष्टीमुळे.

लोत्रेकच्या काळी पोस्टर, पुस्तकांची मुखपृष्ठे, जाहिराती, वेष्टने वगैरे उपयोजित कलेला कलेच्या जगात फारशी प्रतिष्ठा नव्हती. चित्रकार म्हणून प्रस्थापित होताना त्याने या उपयोजित कलेला कमी लेखलं नाही. एवढंच नव्हे तर लिथोग्राफी सारख्या तंत्राधिष्ठीत कलेत त्याने परीश्रमपूर्वक प्राविण्या मिळवलं आणि आपल्या योगदानाने त्या कलेला अभिजातेचा दर्जा मिळवून दिला. याची आठवण म्हणून फ्रान्सने त्याच्या स्मरणार्थ लोत्रेकच्या शंभराव्या पुण्यतिथी निमीत्त २००१ साली


एक कला प्रदर्शन आयोजित केले होते. त्यासाठी त्यांनी जगभरातील ग्राफिक आर्टीस्ट कडून लोत्रेकला श्रद्धांजली म्हणून आपल्या कलाकृती मागवल्या होत्या. त्या कलाकृतींचे प्रदर्शन वर्षभर जगातील वेगवेगळया शहरात भरवलं होतं. लोत्रेकच्या पुण्यतिथीच्या वर्षातलं शेवटचं प्रदर्शन नॅशनल गॅलेरी ऑफ मॉडर्न आर्ट, मुंबईत होतं. त्यातील काही पेंटींग देऊन मी आपला निरोप घेतो.




लोत्रेकची सही

(ॲन्टी बोहेमियन लाईफस्टाईल ऑईन्टमेन्ट: गेल्या शतकात संगीत, चित्रकला, काव्य या प्रांतात मुशाफिरी करू पाहाणाऱ्यांच्यामध्ये सृजनशक्ती जागृत होण्यासाठी बोहेमियन जीवनशैली, दारू, हशीश, कोकेन सारख्या मादक पदार्थांची नशा या गोष्टी आवश्यक आहेत असा एक समज होता. स्वत:ला अवाँ गार्द, नव्या मनुचे बिनीचे कलाकार समजणाऱ्या बऱ्याच प्रतिभावान कलाकारांनी विशेषत: चित्रकार, कवि, गायक या व्यसनांच्या आहारी जाऊन आत्मनाश करून घेतला याची बरीच उदाहरणे आहेत. विमुक्त जीवनशैलीची खाज असणाऱ्या कलाकारांसाठी रामबाण इलाज.)

# लेखकाचा अल्प परिचय



जयंत गुणे: बँकिंग, माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रातून निवृत्त.

पत्ता: ए१३/७०९, एक्झर्बिया, मारूंजी रस्ता, हिंजवडी, पुणे ४११०३३

टेलिफोन: ९६१९०१८५६३ ईमेल: jayant.gune@gmail.com

विशेष रूची: साहित्य, चित्रकला, शिल्पकला आणि इतर दृश्यकला, विज्ञान विषयक लेख.
वाचन आणि आवडते लेखक: प्रामुख्याने मराठी, थोडे-फार इंग्रजी. कथा-कादंबऱ्या, सामजिक, ऐतिहासिक, कोणत्याही विषयावरील बौध्दिक आनंद देणारे काहीही पण मनोरंजनाचे वावडे नाही.

प्रसिद्ध साहित्य: अनुवादित कादंबऱ्या – लोकवाङमयगृह - मुलँ रूज (२०११), मेहता प्रकाशन - झॅप्ड (२०१२), प्रॉफेट मर्डर (२०१४), किस मर्डर (२०१४). दिवाळी अंकातील लेख: मौज - ओव्हेरचे चर्च (२०११), नेव्हर मोअर (२०१४). वसा – मिडवाईफ टोड आणि उत्क्रांती (२०१२), हितगूज – जिवर्नीची बाग (२०१३).

ब्लॉग - https://jayantgune.blogspot.com

ई साहित्य प्रतिष्ठान – मून अँड सिक्स पेन्स

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/moon_and_sixpense_moghum_jayant_gune.pdf

**ई साहित्य प्रतिष्ठान** दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची बारा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत
अध्यक्ष
ई साहित्य प्रतिष्ठान